सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०

# महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

(१३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

**MAHARASHTRA ACT No. XL OF 1965**

# The Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965

*(As modified upto 13th November 2006)*

# महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

## अनुक्रमणिका

उद्देशिका

प्रकरण एक

### प्रारंभिक

**कलमे**

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

### नगरपरिषदा

#### (१) नगरपालिका क्षेत्रे व त्यांचे वर्गीकरण

३. क्षेत्रांचा अधिक लहान नागरी क्षेत्रे म्हणून विनिर्देश करणे.

४. अधिक लहान नागरी क्षेत्रांचे वर्गीकरण.

५. नगरपालिका क्षेत्रांच्या फेरवर्गीकरणाचा परिणाम.

६. नगरपालिका क्षेत्राच्या सीमांमध्ये फेरफार करणे.

#### (२) नगरपालिका प्राधिकरणे व नगरपरिषदांची स्थापना

७. अधिनियमाच्या अंमलबजावणीचे काम सोपविलेली नगरपालिका प्राधिकरणे.

८. नगरपरिषदांची स्थापना व कायद्याने संस्थापन.

९. नगरपरिषदांची घडण.

#### (३) निवडणुका आणि निवडून आलेल्या व नामनिर्देशित परिषद सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे

१०. नगरपालिका क्षेत्रांची प्रभागांमध्ये विभागणी आणि स्त्रिया, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी प्रभाग राखून ठेवणे.

१०-क. राज्य निवडणूक आयुक्त.

## अनुक्रमणिका

**कलमे**

१०-कक. तोतयेगिरीस प्रतिबंध करण्यासाठी निदेश देण्याचा राज्य निवडणूक आयुक्ताचा अधिकार.

११. मतदार यादी तयार करणे.

११-क. मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नावे समाविष्ट करण्यासाठी तरतूद.

११-ख. खोटी प्रतिवेदने केल्याबद्दल शास्ती.

१२. मतदानाचा हक्क.

१३. मतदानाची रीत.

१४. मतदानावरील इतर निर्बंध.

१५. परिषद सदस्य होण्यासाठी अर्हता.

१६. परिषद सदस्य होण्यासाठी अनर्हता.

१७. निवडणुकांच्या विनियमनासाठी नियम करण्याचा अधिकार.

१८. निवडून न येणे.

१९. निवडणुकीचे निकाल जाहीर करणे.

१९-क. [वगळण्यात आले].

२०. नामनिर्देशित परिषद सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे.

### (४) परिषद सदस्यांची निवडणूक किंवा नामनिर्देशन या बाबतीतील विवाद

२१. परिषद सदस्यांची निवडणूक किंवा नामनिर्देशन या बाबतीतील विवाद.

### (५) भ्रष्टाचार व निवडणूकविषयक इतर अपराध

२२. भ्रष्टाचार.

२३. निवडणुकीच्या दिवशी जाहीर सभांना मनाई.

२४. निवडणुकीच्या सभेतील दंगली.

२५. मतदान केंद्रात किंवा त्याच्या जवळपास प्रचारास मनाई.

२६. मतदान केंद्रात किंवा त्याच्या जवळपास गैरशिस्त आचरण केल्याबद्दल शास्ती.

२७. मतदान केंद्रावर गैरवर्तणुकीबद्दल शास्ती.

२८. निवडणुकीत बेकायदेशीर रीतीने वाहने भाड्याने घेणे किंवा प्राप्त करणे याबद्दल शास्ती.

२९. मतदानाची गुप्तता राखणे.

## अनुक्रमणिका

**कलमे**

३०. निवडणुकीसंबंधातील अधिकारी, वगैरेंनी उमेदवारांच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणे.

३१. निवडणुकीच्या संबंधातील अधिकृत कर्तव्यांचा भंग.

३२. मतदान केंद्रातून मतप्रत्रिका काढून नेणे हा अपराध असणे.

३३. निवडणूकविषयक इतर अपराध व त्याबद्दल शास्ती.

३४. विवक्षित अपराधांबाबत कार्यपद्धती.

**(६) निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी अधिग्रहण करण्याचा अधिकार**

३५. निवडणुकीसाठी जागा, वाहन इत्यादींचे अधिग्रहण.

३६. भरपाई देणे.

३७. माहिती मिळविण्याचा अधिकार.

३८. अधिग्रहण केलेल्या जागेतून काढून टाकणे.

३९. अधिग्रहणातून जागा मुक्त करणे.

**(७) परिषदेची मुदत आणि परिषद सदस्यांचा पदावधी**

४०. परिषदेची मुदत.

४१. परिषद सदस्यांचा पदावधी.

४१-क. परिषदेची रचना करण्यासाठी निवडणूक.

४२. परिषद सदस्य पदावरून दूर केले जाण्यासाठी पात्र ठरणे.

४३. राजीनाम्यामुळे परिषद सदस्याच्या त्यानंतर होणाऱ्या अपात्रतेस बाध न येणे.

४४. परिषद सदस्य त्याच्या पदावधीच्या काळात अनर्ह ठरणे.

४५. नगरपरिषदेस देय असलेले कर न दिल्यामुळे होणाऱ्या अनर्हतेसंबंधी विशेष तरतूद.

४६. कलम ४५ मुळे परिषदेच्या कर वसूल करण्याच्या इतर अधिकारांस बाध न येणे.

४७. परिषद सदस्य असण्याचे बंद झाल्यास परिषद सदस्याने सर्व अधिकारपदे सोडून देणे.

४८. नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात.

४८-क. [वगळण्यात आले].

## अनुक्रमणिका

**कलमे**

### प्रकरण तीन

### नगरपरिषद व नगरपालिका कार्यकारी अधिकारी यांची कर्तव्ये व कामे

### (१) नगरपरिषदेची आवश्यक कर्तव्ये आणि स्वेच्छाधीन कार्ये


४९. परिषदेची कर्तव्ये आणि कामे.

४९-क. अभिकरणांनी कामे पार पाडणे.


### (२) पाणीपुरवठ्याची योजना हाती घेण्यासंबंधी खास तरतुदी


५०. पाणीपुरवठ्याची योजना तयार करणे आणि विवक्षित मुदतीत पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे बंधनकारक असणे.


### (३) अध्यक्ष व उपाध्यक्ष


५१. अध्यक्षाची निवडणूक.

५१-१ क. अध्यक्षाचे पद राखून ठेवणे.

५१-क. उपाध्यक्षाची नेमणूक.

५२. अध्यक्षाचा पदावधी.

५३. अध्यक्षाचा राजीनामा.

५४. उपाध्यक्षाचा राजीनामा.

५५. परिषद सदस्यांनी अध्यक्षास काढून टाकणे.

५५-१क. परिषद सदस्यांनी उपाध्यक्षास काढून टाकणे.

५५-क. शासनाने अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास काढून टाकणे

५५-ख. कलम ५५क अन्वये अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पदावरून दूर करण्यात आल्यानंतर परिषद सदस्य म्हणून राहण्यासाठी किंवा परिषद सदस्य होण्यासाठी निरर्हता.

५५-ग. परिषद सदस्यांनी थेट निवडून आलेल्या अध्यक्षाला पदावरून दूर करणे.

५६. अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी परवानगीशिवाय गैरहजर राहण्याचा परिणाम.

५७. अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी कार्यभार सोपविणे.

५८. अध्यक्षाची कामे.

५९. उपाध्यक्षाची कामे.

६०. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची पदे एकाच वेळी रिकामी होणे.

६१. अध्यक्षास मानधन किंवा आतिथ्य भत्ता व परिषद सदस्यांना सभा भत्ता.

अनुक्रमणिका

कलमे

(४) समित्या


६२. ‘अ’ वर्ग आणि ‘ब’ वर्ग नगरपरिषदांच्या स्थायी समित्यांची व विषय समित्यांची नेमणूक.

६३. ‘अ’ वर्ग आणि ‘ब’ वर्ग नगरपरिषदांच्या विषय समित्यांची रचना.

६४. ‘अ’ वर्ग आणि ‘ब’ वर्ग नगरपरिषदांच्या स्थायी समित्यांची रचना

६५. ‘क’ वर्ग नगरपरिषदांसाठी स्थायी आणि विषय समित्या.

६६. ‘क’ वर्ग नगरपरिषदांच्या स्थायी समितीची रचना.

६६-क. प्रभाग समित्यांची रचना.

६७. विशेष समित्या.

६८. स्थायी व विषय समित्यांच्या सभापतीचा व सदस्यांचा पदावधी.

६९. नगरपरिषदेच्या समित्यांत झालेल्या नैमित्तिक रिकाम्या जागा.

७०. स्थायी समिती आणि विषय समित्या यांची कार्ये व अधिकार.

७१. कलम ७० खालील उपविधि संचालकाच्या पूर्वमंजुरीच्या अधीन असणे.

७१-क. आवश्यक असल्यास, परिषदेने किंवा विशेष विषय समितीने स्थायी समितीच्या किंवा विशेष समितीच्या अधिकाराचा वापर करणे व कर्तव्ये पार पाडणे.

७२. वित्तीय मंजुरीच्या बाबतीत समित्यांच्या आणि नगरपरिषदेच्या अधिकारांच्या मर्यादा.

७३. समित्या नगरपरिषदेच्या अधीन असणे.


प्रकरण चार

**नगरपालिका प्रशासन संचालक आणि जिल्हाधिकारी**


७४. नगरपालिका प्रशासन संचालकाची आणि प्रादेशिक संचालकाची नेमणूक व त्यांचे अधिकार व जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार.


प्रकरण पाच

**अधिकारी आणि कर्मचारी यासंबंधीच्या तरतुदी**


७५. मुख्य अधिकारी, अभियंता, जलदाय व्यवस्था अभियंता, आरोग्य अधिकारी, लेखा परीक्षक, शिक्षण अधिकारी आणि अग्निशमन अधिकारी व इतर विवक्षित अधिकारी यांची नेमणूक.

७५-क. महाराष्ट्र नगरपरिषद सेवा स्थापन करणे व त्यासंबंधीच्या तरतुदी.

७६. इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक.

७७. मुख्य अधिकाऱ्याचे अधिकार आणि कर्तव्ये.

## अनुक्रमणिका

**कलमे**


७७-क. मुख्य अधिकाऱ्याला आतिथ्य भत्ता देणे.

७८. इतर अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये

७९. अधिकारी व कर्मचारी यांना शिक्षा.

७९-क. परिषदेचा अधिकारी व कर्मचारी यांच्या खटला भरण्याच्या कार्यवाहीत मंजुरी देणे.

८०. सेवेच्या विवक्षित शर्तींचे विनियमन करण्यासंबंधी उपविधी करणे.

प्रकरण सहा

**कामकाज चालविणे**

**(१) सभा**

८१. नगरपरिषदेच्या सभांसंबंधी तरतूद.

८२. समित्यांच्या बैठकी.

८३. मुख्य अधिकाऱ्याने नगरपरिषदेच्या प्रत्येक सभेस हजर राहणे आणि जरूर असल्यास समितीच्या बैठकीस हजर राहणे, परंतु मत न देणे किंवा कोणतीही सूचना न करणे.

८४. मुख्य अधिकाऱ्याकडून माहिती, दस्तऐवज, वगैरे मागविण्याचा नगरपरिषदेचा किंवा समितीचा अधिकार.

८५. स्थानिक संस्थांच्या संयुक्त समित्या

८६. [वगळण्यात आले].

**(२) कामकाजाची विधिग्राह्यता**

८७. नगरपरिषद आणि समित्या यांच्या कृती व कार्यवाही, त्यांच्या सदस्यांची निरर्हता, इत्यादींमुळे रद्दबातल न होणे.

प्रकरण सात

**नगरपरिषदेची मालमत्ता, निधी, संविदा आणि दायित्वे**

८८. मालमत्ता संपादन करण्याचा आणि धारण करण्याचा अधिकार.

८९. नगरपरिषदेने किंवा तिच्याविरूद्ध मालमत्तेसंबंधी सांगितलेल्या दाव्यांचा निर्णय.

९०. नगरपालिका निधी.

९१. वेतन राखीव निधीची स्थापना.

९१-क. टोपलीच्या शौचकुपांच्या रुपांतरासाठी निधी.

## अनुक्रमणिका

**कलमे**

९२. नगरपालिकेच्या मालमत्तेच्या हस्तांतरणाविषयी तरतुदी.

९२-क. जंगम मालमत्तेचे हस्तांतरण.

९३. संविदा व निविदा यांबाबतच्या तरतुदी.

९४. अधिकारी किंवा कर्मचारी यांचा संविदेत हितसंबंध असण्यास प्रतिबंध.

९५. संविदा वगैरेमध्ये अयोग्य हितसंबंध ठेवल्याबद्दल परिषद सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना शास्ती.

९६. हानी किंवा नुकसानी यासंबंधी परिषद सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे दायित्व.

९७. नगरपालिका क्षेत्रात व क्षेत्राबाहेर असलेली नगरपालिकेची मालमत्ता व निधी यांचे उपयोजन.

९८. अग्निशामक सामग्री, इत्यादी उसनवारीने देण्याबाबत विशेष तरतूद.

९९. शिलकी पैसा ठेव म्हणून ठेवण्याचा व गुंतविण्याचा अधिकार.

१००. दाव्यात तडजोड करण्याचा अधिकार

१००-क. सरकारी जागांतून काढून टाकण्याबाबतचा अधिनियम नगरपालिकांच्या जागांबाबत काही फेरबदलांसह लागू करणे.

प्रकरण आठ

**अर्थसंकल्प आणि लेखे**

१०१. अर्थसंकल्प.

१०२. नगरपालिका लेखे.

१०३. लेख्यांची प्रसिद्धी.

१०४. लेखापरीक्षा.

प्रकरण नऊ

**नगरपालिकेची कर आकारणी**

(१) सक्तीचे व ऐच्छिक कर बसविणे

१०५. सक्तीचे कर बसविणे.

१०६. सूट दिल्यामुळे करापासून होणाऱ्या उत्पन्नातील तोट्याची शासनाने प्रतिपूर्ती करणे.

१०६-क. अधिक लहान नागरी क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेल्या जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये कमी केलेल्या दराने सर्वसाधारण कर बसविण्यासाठी तात्पुरती तरतूद.

१०७. विवक्षित कर बसविण्यापासून 'क' वर्ग नगरपरिषदांना तात्पुरती सूट देण्यासाठी तरतूद.

## अनुक्रमणिका

**कलमे**

१०८. नगरपरिषदेस बसविता येतील असे इतर कर.

१०८-क. फी.

१०९. कलम १०८ खाली कर आणि कलम १०८-क खाली फी बसविण्यापूर्वी अनुसरावयाची कार्यपद्धती.

११०. स्वेच्छाधीन कर जेव्हा मंजूर करण्यात येईल तेव्हा शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय तो रद्द न करणे.

१११. करांच्या संबंधातील उपविधींना नोटिशीसह स्थानिकरित्या प्रसिद्धी.

११२. नगरपरिषदेस विहित मर्यादेपर्यंत कराच्या दरात बदल करता येणे.

**(२) इमारतींवरील व जमिनींवरील कराचे निर्धारण व दायित्वे**

११३. प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकाऱ्याची नेमणूक

११४. करयोग्य मूल्य कसे ठरविण्यात यावे. .

११५. करनिर्धारण यादी तयार करणे.

११६. मालमत्ता कर देण्यास प्रथमतः दायी असलेल्या व्यक्तीच्या नावाची खात्री करता येत नसेल तर तिला कसे संबोधावे.

११७. करनिर्धारण तपासणीसाठी प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकारी.

११८. करनिर्धारण यादीची नोटीस प्रसिद्ध करणे.

११९. आक्षेप दाखल करण्यासाठी ठरविलेल्या वेळेबद्दल जाहीर नोटीस.

१२०. आक्षेपावर कार्यवाही कशी करावी.

१२१. करनिर्धारण यादीचे अधिप्रमाणन.

१२२. अधिप्रमाणित यादी कोठवर निर्णायक आहे.

१२३. करनिर्धारण यादीची दुरुस्ती.

१२४. नवीन निर्धारण सूची तयार करणे व करपात्र मूल्यांमध्ये नियतकालिक सुधारणा.

१२५. मालमत्ता कर देण्याबद्दलची प्राथमिक जबाबदारी कोणावर असेल.

१२६. मालमत्ता कर देण्याबद्दल भोगवटादारांना केव्हा जबाबदार धरता येईल

१२७. भोगवट्याखाली नसलेल्या मालमत्तेच्या बाबतीत अंशतः माफी.

१२८. इमारतीपासून किंवा जमिनीपासून भाड्याचे उत्पन्न मिळते, असे केव्हा समजण्यात येईल.

१२९. मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित पक्षकारांनी हस्तांतरणाची नोटीस देणे.

१३०. नोटिशीचा नमुना.

## अनुक्रमणिका

कलमे

१३१. नोटिशीच्या अभावी मूळ धारकावर कर देण्याचे दायित्व चालू राहणे

१३२. विशेष पाणीकराच्याऐवजी ठराविक आकार व पैसे देण्याबद्दल करार.

१३३. विशेष स्वच्छताविषयक कराऐवजी विशेष पट्टी ठरविण्याचा अधिकार

१३४. लगतपूर्वीच्या दोन कलमांन्वये दावा सांगितलेल्या रकमांची वसुली.

१३५. नगरपरिषदेला नगरपालिका क्षेत्राच्या बाहेर वापराकरिता जादा पाणी विकता येणे.

### (३) पथकर

१३६. [वगळण्यात आले].

१३७ [वगळण्यात आले].

१३८. [वगळण्यात आले].

१३९ [वगळण्यात आले].

१४०. पथकराचे तक्ते मागितले असता ते दाखविणे.

१४१. पथकर न दिल्याबद्दल वाहन किंवा जनावर किंवा माल जप्त करण्याचा आणि जप्त केलेल्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार.

१४२. [वगळण्यात आले].

१४३. [वगळण्यात आले].

१४३-क. [वगळण्यात आले].

१४४. पथकराचा मक्ता देणे.

### (४) करांसंबधी पूरक तरतुदी

१४५. वाहने किंवा जनावरे यांवरील कराबद्दल तडजोड करण्याचा अधिकार.

१४६. नमुन्यातील दोषांमुळे करनिर्धारण बेकायदेशीर नसणे

१४७. कर बसविण्यास नगरपरिषदांस भाग पाडण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

### (४क) मुद्रांक शुल्क

१४७-क. नगरपालिका क्षेत्रातील स्थावर मालमत्तांच्या विवक्षित हस्तांतरणावर जादा मुद्रांक शुल्क आकारणे.

### (५) फी

१४८. विवक्षित लायसने, परवानगी इत्यादींसाठी फी आकारता येईल.

## अनुक्रमणिका

**कलमे**

### प्रकरण नऊ-क

### मालाच्या प्रवेशावर उपकर बसविणे, तो गोळा करणे व त्याची वसुली करणे यासंबंधीच्या तरतुदी


१४८क. उपकर बसविणे.

१४८ख. उपकराचा भार.

१४८ग. विवक्षित माल, उपकरापासून सूट मिळण्यास पात्र नसणे.

१४८घ. विवक्षित बाबतीत उपकर विषयक दायित्व.

१४८ङ. उपकर प्राधिकारी.

१४८च. नोंदणी.

१४८छ. विक्रीचे किंवा खरेदीचे ज्ञापन.

१४८ज. उपकर वसूल करण्यास मनाई.

१४८झ. लेखे ठेवण्याची जबाबदारी.

१४८ञ. लेखे व कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागांची झडती, लेखापुस्तके आणि माल, इत्यादी जप्त करणे.

१४८ट. मुख्य अधिकाऱ्यास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

१४८ठ. अपराध व शास्ती.

१४८ढ. अपराधांबाबत तडजोड करणे.

१४८न. क्षतिपूर्ती.


### प्रकरण दहा

### नगरपालिकेने दावा सांगितलेल्या रकमांची वसुली


१४९. या अधिनियमान्वये दावा सांगता येईल अशी कोणतीही रक्कम वसूल करण्याची पद्धती.

१५०. नगरपरिषदेस देय असलेल्या रकमांबद्दल देयक देणे आणि रक्कम सत्वर भरल्याबद्दल बट्टा देणे.

१५१. मागणीची नोटीस केव्हा देण्यात येईल.

१५२. अधिपत्र केव्हा काढता येईल.

१५३. अधिपत्र कोणाला उद्देशून लिहावे.

१५४. विशेष आदेशान्वये बळाचा वापर करून प्रवेश करण्याचा अधिकार.

## अनुक्रमणिका

**कलमे**

१५५. अधिपत्राची अंमलबजावणी कशी व्हावी.

१५६. अटकावून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री; विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग.

१५७. काही शिल्लक राहिल्यास तिची व्यवस्था कशी लावावी.

१५८. नगरपालिकेच्या क्षेत्राबाहेरील विक्री

१५९. आकारण्यायोग्य फी व खर्च.

१६०. नगरपालिका क्षेत्र सोडून जाण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तीविरूद्ध संक्षिप्त कार्यवाही करता येईल.

१६१. इतर प्रकरणांत विक्रीबाबत आदेश कोणी द्यावयाचा आणि अशी विक्री करण्याची व ती कायम करण्याची रीत.

१६२. जमिनी, इमारती वगैरे यांच्यावरील कराचे दायित्व.

१६३. मिळालेल्या सर्व रकमांबद्दल पावत्या देणे.

१६४. जमीन महसुलाची थकबाकी म्हणून विवक्षित रकमा वसूल करणे.

१६५. अधिपत्रांच्या बाबतीत स्थगन आदेश कोणी द्यावेत.

१६६. करांबाबत देय असणाऱ्या रकमांवर द्यावयाचे व्याज

१६७. रकमा निर्लेखित करण्याचा अधिकार.

१६८. वसुली अधिकाऱ्याची नेमणूक.

१६९. दंडाधिकाऱ्याकडे किंवा समितीकडे अपिले.

१७०. अपिलाची कार्यपद्धती.

१७१. न्यायालयाकडून पुनरीक्षण.

१७२. इतर कार्यवाहींना रोध.

प्रकरण अकरा

**रस्ते आणि खुल्या जागा**

१७३. सार्वजनिक रस्त्यांसबंधी अधिकार.

१७४. मालकांच्या आक्षेपांच्या अधीन, कोणताही रस्ता हा, सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करण्याचा अधिकार.

१७५. खाजगी रस्त्यांची दुरुस्ती वगैरे करण्यात भाग पाडण्याचा व ते सार्वजनिक रस्ते म्हणून घोषित करण्याचा अधिकार.

१७६. सार्वजनिक रस्त्याची नियमित रेषा

## अनुक्रमणिका

**कलमे**


१७७. पुढे येणाऱ्या इमारती मागे हटविणे.

१७८. रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत इमारत पुढे घेणे.

१७९. सार्वजनिक रस्त्याच्या पृष्ठभागावरील प्रक्षेपणे, अडथळे व अतिक्रमणे.

१८०. रस्ते, इत्यादींच्या पृष्ठभागावरील प्रक्षेपणांव्यतिरिक्त इतर प्रक्षेपणांवर प्रतिषेध.

१८१. नगरपरिषदेकडे निहित असलेल्या किंवा निहित नसलेल्या व सार्वजनिक जागा व खुल्या जागा यांवरील प्रक्षेपणे, अतिक्रमणे इत्यादी.

१८२. सीमा-भिंती, वई इत्यादी बांधण्यास किंवा काढून टाकण्यास फर्माविण्याचा अधिकार.

१८३. नवीन खाजगी रस्ते.

१८४. पावसाच्या पाण्यासाठी पन्हाळी व नळ.

१८५. रस्त्यांना नावे व क्रमांक देणे व जागांना क्रमांक देणे.

१८६. फरसबंदी, इत्यादी काढून टाकणे.

१८७. सार्वजनिक रस्त्यांवर लायसनशिवाय वस्तू विकण्यास मनाई.

१८८. लायसनशिवाय हातगाड्या चालविण्यास मनाई.


### प्रकरण बारा

### इमारतींवर नियंत्रण


१८९. इमारत बांधण्याची नोटीस.

१९०. परवानगी नाकारण्याचा मुख्य अधिकाऱ्याचा व नगरपरिषदेचा अधिकार.

१९१. इमारतींची पातळी.

१९२. इमारतींची छपरे व बाहेरील भिंती ज्वालाग्राही साहित्यापासून तयार न करणे.

१९३. बांधकाम पूर्ण न झाल्याचे प्रमाणपत्र, भोगवटा किंवा वापर करण्याची परवानगी.

१९४. माणसाने राहण्यासाठी असलेली इमारत ही गोदाम, इत्यादी म्हणून न वापरणे किंवा गोदाम वगैरेकरिता असलेली इमारत मनुष्यवस्तीसाठी न वापरणे.

१९५. भग्नावस्थेतील किंवा पडण्याचा संभव असलेल्या इमारती, संरचना वगैरे काढून टाकणे.

१९६. इमारत, इत्यादी खराब करण्याबद्दल शास्ती.

१९७. घरांना दिवे, त्रिकोणी आधार, इत्यादी बसविणे.

१९८. झोपड्यांचे नियमन.

१९९. झोपड्यांची सुधारणा.

## अनुक्रमणिका

**कलमे**

### प्रकरण तेरा

### जलनि:सारण


२००. जलनि:सारणावर नगरपालिकेचे नियंत्रण.

२०१. मोऱ्या तयार करण्याचा व दुरूस्त करण्याचा अधिकार.

२०२. घरांसाठी जलनि:सारणाची पुरेशी व्यवस्था आवश्यक ठरविण्याचा अधिकार.

२०३. जलनि:सारणाची व्यवस्था केल्यावाचून नवीन इमारत न बांधणे.

२०४. इमारतींच्या किंवा जमिनींच्या मालकांचा व भोगवटादारांचा मोरीचे पाणी नगरपालिकेच्या मोऱ्यांत सोडण्याचा अधिकार.

२०५. इतर व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीतून किंवा मोऱ्यांतून सांडपाणी नेण्याचा अधिकार.

२०६. ज्या जमिनीतून मोरी काढण्यात आली आहे त्या जमिनीच्या मालकाचे त्यानंतर त्या जमिनींवर इमारत बांधण्याबाबतचे अधिकार.

२०७. संडास, वगैरेंची तरतूद.

२०८. मोऱ्या, इत्यादी चांगल्या स्थितीत ठेवण्याविषयी अथवा संडास किंवा मलकुंडी पाडून टाकण्याविषयी किंवा बंद करण्याविषयी मालकास फर्माविण्याचा अधिकार.

२०९. खाजगी मोऱ्या व मलकुंड्या बंद करण्याचा अधिकार.

२१०. नगरपालिकेच्या मोऱ्यांवर अतिक्रमण.

२११. प्राधिकारावाचून बांधलेल्या, पुन्हा बांधलेल्या किंवा उघडलेल्या मोऱ्या, इत्यादीसंबंधी अधिकार.

२१२. मोरी, वगैरे यांची तपासणी.

२१३. नगरपरिषदेस विवक्षित कामे संबंधित व्यक्तींना ती करण्याचा विकल्प न देता स्वतः करता येतील.

२१४. नगरपरिषदेने बांधलेले नळ, वगैरे नगरपालिकेची मालमत्ता असणे.


### प्रकरण चौदा

### पाणीपुरवठा


२१५. नगरपालिकेच्या जलव्यवस्था केंद्रास हानिकारक ठरतील अशी विवक्षित कृत्ये करण्यास मनाई.

२१६. जलव्यवस्था केंद्राबाबत हेतुपुरस्सर किंवा निष्काळजीपणाची कृत्ये करण्यास मनाई.

२१७. पाणीपुरवठ्याच्या साधनांजवळ मोऱ्या, वगैरे बांधण्यास मनाई.

२१८. पाण्याचे मोठे नळ पुढे नेण्यासंबंधी अधिकार.

## अनुक्रमणिका

**कलमे**


२१९. पाणीपुरवठा घेणे आवश्यक ठरविण्याचा अधिकार.

२२०. धोकादायक, साचलेल्या किंवा अनारोग्यकारक अशा प्रकारच्या पाणीपुरवठ्याच्या साधनासंबंधी अधिकार व कर्तव्ये.

२२१. स्नानाच्या व धुण्याच्या जागांचे नियमन करण्याचा अधिकार.

२२२. राज्य शासनाने नेमलेल्या व्यक्तींनी नगरपालिका जलव्यवस्था केंद्राची तपासणी करणे.

२२३. परवानगीशिवाय विहिरी, वगैरे खोदण्यास मनाई.

प्रकरण पंधरा

**सार्वजनिक सुरक्षितता आणि सोयी**

२२४. दुरूस्ती, इत्यादी चालू असताना कुंपण घालणे व दिव्याची व्यवस्था करणे.

२२५. धोकादायक खाणकाम.

२२६. दुरूस्ती, इत्यादी चालू असताना उंच फळ्यांचे कुंपण उभारणे.

२२७. सार्वजनिक करमणुकीच्या जागी सावधगिरीचे उपाय आवश्यक करण्याचा अधिकार.

२२८. आग विझविण्याबाबत अधिकार.

प्रकरण सोळा

**उपद्रव**

२२९. धूळ, वगैरे जमा करून उपद्रव देणे.

२३०. मलप्रवाह, इत्यादी सोडून देणे.

२३१. घाण, इत्यादी काढून न टाकणे.

२३२. मैला काढून टाकणे.

२३३. दुर्गंधीयुक्त खत, इत्यादी वापरणे.

२३४. विहिरी, इत्यादींपासून होणाऱ्या उपद्रवाची समाप्ती.

२३५. माणसाला राहण्यास अयोग्य अशा इमारती किंवा इमारतींतील खोल्या.

२३६. गलिच्छ इमारती, इत्यादी.

प्रकरण सतरा

**घातक रोगांचा प्रतिबंध व त्यावर नियंत्रण**

२३७. घातक रोग.

२३८. घातक रोगाने पीडित असलेल्या व्यक्तीची ने-आण करण्यासाठी सार्वजनिक वाहनांचा वापर करण्यास मनाई करण्याचा अधिकार.

## अनुक्रमणिका

**कलमे**


२३९. घातक रोगाने पीडित असलेल्या व्यक्तींवरील निर्बंध.

२४०. घातक रोगांचे नियंत्रण व त्यांचा प्रतिबंध.

२४१. घातक रोगांचा प्रादुर्भाव झाल्याची माहिती मुख्य अधिकाऱ्यास किंवा आरोग्य अधिकाऱ्यास देणे.

२४२. घातक रोग झालेले रुग्ण असल्याचा संशय असेल अशा ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकार.

२४३. मुख्य अधिकाऱ्याने किंवा आरोग्य अधिकाऱ्याने मालकास किंवा भोगवटादारास विवक्षित सावधगिरीच्या उपाययोजना करण्याबद्दल निदेश देणे आणि तसे करण्यात कसूर झाल्यास त्या स्वतः करणे.

२४४. घातक रोग पसरण्याचा संभव असेल अशा पाण्याचा वापर करण्यास मनाई.

२४५. घातक रोगाचा प्रादुर्भाव होण्याची भीती उत्पन्न झाल्यावर नगरपरिषदेचे जादा अधिकार.

२४६. घातक रोगासंबंधातील तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

२४७. भरपाई देणे.

२४८. जनावरांमधील रोग.

२४९. इमारतीच्या अंतर्भागांतील अतिगर्दी कमी करण्यासाठी कार्यवाही.

२५०. या प्रकरणाखालील अधिकार व आदेश मागे घेणे व त्यात फेरबदल करणे.

२५१. अतिगर्दी असलेल्या क्षेत्रासंबंधी विशेष अधिकार.


### प्रकरण अठरा

### शवांची व जनावरांच्या मृतदेहांची विल्हेवाट


२५२. नगरपरिषदेने दहनभूमी व दफनभूमी यांची तरतूद करणे किंवा त्यासाठी परवानगी देणे.

२५३. शवांची विल्हेवाट लावण्याच्या जागा बंद करणे.

२५४. शवाची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात मनाई केलेली कृत्ये.

२५५. शवाची विल्हेवाट लावण्यासाठी प्रमाणपत्र.

२५६. मृत जनावरांची विल्हेवाट.


### प्रकरण एकोणीस

### जीवनविषयक आकडेवारी


२५७. नगरपरिषदेने नोंदणीसाठी निधींची तरतूद करणे व कर्मचारीवर्ग नेमणे.

२५८. जन्म व मृत्यूच्या नोंदवह्या.

## अनुक्रमणिका

**कलमे**

२५९. जन्माबद्दलची खबर देणे.

२६०. बेवारशी मुलांबद्दल माहिती देणे.

२६१. मुलाच्या नावाबाबत खबर देणे.

२६२. मृत्यूबद्दल खबर देणे.

२६३. वैद्यक व्यवसायींचे प्रतिवेदन. .. .. .. ..

२६४. नोंदवहीतील चुकांची दुरूस्ती. .. .. .. ..

२६५. जन्म आणि मृत्यूबद्दलची माहिती न दिल्याबद्दल आणि खोटी निवेदने केल्याबद्दल शास्ती.

प्रकरण वीस

**बाजार, कत्तलखाने, व्यापार आणि व्यवसाय**

**(१) बाजार आणि कत्तलखाने**

२६६. नगरपालिका बाजार आणि कत्तलखाने यांची तरतूद करण्याचा आणि ते सुस्थितीत ठेवण्याचा अधिकार.

२६७. खाजगी बाजार, वगैरे लायसनशिवाय न भरविणे. .. .. ..

२६८. नगरपालिका क्षेत्राबाहेरील कत्तलखाने, वगैरे. .. .. ..

२६९. विक्रीकरिता जनावरांची कत्तल करण्यावर निर्बंध. .. .. ..

२७०. खाजगी बाजाराच्या इमारतीत व कत्तलखान्यात योग्य रीतीने फरशी घालण्यास व निःसारणासंबंधी व्यवस्था करण्यास भाग पाडण्याबाबत तरतुदी.

२७१. खाजगी बाजारांचे प्रवेशमार्ग व भोवतालच्या जागा यांबाबत तरतुदी

२७२. गाळाभाडे, भाडे आणि फी बसविणे.

२७३. बाजार व कत्तलखाने यांचे भाडे वसूल करण्याचा मक्ता देणे.

**(२) इतर व्यवसाय आणि व्यापार**

२७४. खाद्यपदार्थ तयार करण्यावर, खाणावळी, हॉटेल, निवासगृहे, इत्यादींवर नियंत्रण.

२७५. दुग्धशाळा आणि दूध, दुग्धपदार्थ व मिठाई यांच्या धंद्यावरील नियंत्रण

२७६. गोठ्यांचे नियंत्रण.

२७७. अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियमान्वये लायसन्स मिळविण्यात आले असल्यास वेगळ्या लायसनची आवश्यकता नसणे.

## अनुक्रमणिका

कलमे

२७८. लायसनवाचून कारखाना, वगैरे स्थापन न करणे.

२७९. वाफेच्या शिट्या, वगैरे वापरण्यास मनाई.

२८०. लायसनवाचून काही इतर व्यापार व व्यवसाय न चालविणे.

२८१. विवक्षित वस्तू लायसनशिवाय न ठेवणे.

प्रकरण एकवीस

**कोंडवाडे आणि जनावरांसंबंधी इतर तरतुदी**

**(१) कोंडवाडे**

२८२. गुरे अतिक्रमण अधिनियम नगरपालिका क्षेत्रास लागू असण्याचे बंद होणे.

२८३. कोंडवाडे स्थापन करण्याचा व कोंडवाड्यांचे रखवालदार नेमण्याचा अधिकार.

२८४. कोंडवाड्याच्या रखवालदारांची कर्तव्ये.

२८५. गुरे कोंडवाड्यात घालणे.

२८६. मागणी केलेली गुरे स्वाधीन करणे.

२८७. कोंडवाड्यात टाकलेल्या गुरांसंबंधी प्रतिभूती.

२८८. मागणी न केलेल्या गुरांची विक्री.

२८९. कोंडवाड्याची आकारण्यायोग्य फी व खर्च ठरविणे.

२९०. बेकायदेशीररित्या गुरे जप्त केल्याच्या किंवा त्यांची अटकावणी केल्याच्या तक्रारी.

**(२) जनावरांसंबंधी इतर तरतुदी**

२९१. रस्त्यावर गुरे भटकू दिल्याबद्दल किंवा खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवरील अतिक्रमणाबद्दल शास्ती.

२९२. गुरे, वगैरे दोराने बांधून ठेवणे.

२९३. कुत्र्यासंबंधी तरतुदी.

२९४. डुकरे पाळण्यासंबंधी तरतूद.

२९५. जनावरांना गलिच्छ पदार्थ खाऊ घालण्यास मनाई.

प्रकरण बावीस

**खटले, दावे व पोलिसांचे अधिकार**

२९६. फौजदारी कारवाई दाखल करणे, तडजोड करणे, वगैरेसंबंधी तरतुदी.

२९७. अटकावणीच्या पद्धतीत दोष असला तरी ती कायदेशीर असणे.

## अनुक्रमणिका

**कलमे**

२९८. नगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान कसे भरून काढावे.

२९९. सर्वसाधारण शास्ती.

३००. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल किमान शास्ती.

३०१. दावे, वगैरे दाखल करणे व त्यांतील बचाव याबाबत अधिकार.

३०२. परिषद सदस्य, अधिकारी, कर्मचारी वगैरे हे लोकसेवक असणे.

३०३. सद्भावनेने केलेल्या कृत्याबद्दल नगरपरिषद, तिचे अधिकारी, कर्मचारी वगैरे यांच्याविरूद्ध वाद दाखल करण्यास रोध.

३०४. या अधिनियमास अनुसरून किंवा त्याची अंमलबजावणी करताना केलेल्या कृत्याबद्दल नगरपरिषद, तिच्या समित्या, अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूद्ध वाद दाखल करण्याची मुदत.

३०५. पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार.

### प्रकरण तेवीस

### नियंत्रण

३०६. पाहणी व पर्यवेक्षण याबाबतचे अधिकार.

३०७. विवरणे व प्रतिवृत्ते मागविण्याचे अधिकार.

३०८. विवक्षित कारणांवर नगरपरिषदेचे आदेश व ठराव यांची अंमलबजावणी तहकूब करण्याचे अधिकार.

३०९. निकडीच्या परिस्थितीत विवक्षित कामांची अंमलबजावणी करण्याचे असाधारण आधिकार.

३१०. कर्मचारीवर्गाची नेमणूक करण्यात होणाऱ्या उधळपट्टीस प्रतिबंध करण्याचा संचालकाचा अधिकार.

३११. राज्य शासनाकडून नगरपालिकेच्या कारभाराची चौकशी.

३१२. कर्तव्ये बजावण्यास भाग पाडण्याचा संचालकाचा अधिकार.

३१३. नगरपरिषद विसर्जित करण्याचा अधिकार.

३१४. [वगळण्यात आले].

३१५. [वगळण्यात आले].

३१६. विसर्जनाचे परिणाम.

३१७. विसर्जनानंतर नगरपरिषद पुन्हा स्थापन करणे.

३१८. राज्य शासनाचे पुनरीक्षणविषयक अधिकार.

३१९. आपल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याचे राज्य शासनाचे अधिकार.

३२०. पुनर्विलोकनासंबंधी अधिकार.

## अनुक्रमणिका

**कलमे**


प्रकरण चोवीस

**नियम आणि उप-विधी**

३२१. नियम करण्याचा शासनाचा अधिकार.

३२२. उपविधी करण्याचा नगरपरिषदेचा अधिकार.

३२३. नमुनेवजा उपविधी तयार करण्याचा व ते स्वीकारण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

३२४. अधिनियम, नियम आणि उपविधी यांच्या प्रती लोकांना पाहण्यासाठी आणि विक्रीसाठी नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध करून देणे.

प्रकरण पंचवीस

**नोटिसा बजावणे, कसूर केली असता कामे पार पाडणे व भरपाई**

३२५. व्यक्तींच्या नावांनी काढलेल्या नोटिसा, वगैरे बजावणे.

३२६. सार्वजनिक आणि सर्वसाधारण नोटिसा प्रसिद्ध करणे.

३२७. कोणत्याही फर्मावणीसाठी अधिनियमान्वये मुदत निश्चित केलेली नसेल तेव्हा वाजवी मुदत निश्चित करणे.

३२८. मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केली असता नगरपरिषदेस कामे पार पाडता येणे व खर्च वसूल करता येणे.

३२९. कोणत्याही भोगवटादाराने या अधिनियमाच्या अंमलबजावणीस विरोध केल्यास कार्यवाही.

३३०. हानीपूर्ती, भरपाई इत्यादी ठरविणे.

३३१. दावा खर्च किंवा इतर खर्च कसा ठरवावा व वसूल करावा.

प्रकरण सव्वीस

**संकीर्ण**

३३२. करनिर्धारणात उपचार दोष आणि चुका झाल्यामुळे असे निर्धारण, वगैरे विधिअग्राह्य न होणे.

३३३. या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता प्रवेश करणे.

३३४. लागून असलेल्या जागेत प्रवेश करण्यास मुख्य अधिकाऱ्यास कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत करता येणे.

३३५. कोणत्याही मालमत्तेच्या मालकीसंबंधात माहिती मागविण्याचा मुख्य अधिकाऱ्याचा अधिकार

३३६. अभिलेख व पैसे ताब्यात घेण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

३३७. कार्योत्तर मंजुरी देण्याचा अधिकार.

## अनुक्रमणिका

**कलमे**


३३८. लायसन्स व लेखी परवानगी देणे, तहकूब करणे किंवा काढून घेणे आणि फी बसविणे, वगैरे याबाबत सर्वसाधारण तरतुदी.

३३९. जागा बंद करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

३४०. जेव्हा एखादे नगरपालिका क्षेत्र निर्माण करण्यात येईल किंवा त्यात बदल करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे योग्य तरतूद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

३४१. नगरपालिका अस्तित्वात असण्याचे बंद होणे.

प्रकरण सव्वीस-क

**नगर पंचायती**

३४१-क. संक्रमणात्मक क्षेत्र विनिर्दिष्ट करणे व नगरपंचायत विधीसंस्थापित करणे. .

३४१-ख. नगरपंचायतीची रचना व निवडणुका. .

३४१-ग. नगरपरिषदांच्या संबंधातील या अधिनियमाच्या तरतुदी संक्रमणात्मक क्षेत्राला लागू करण्याचा अधिकार.

३४१-घ. संक्रमणात्मक क्षेत्र रद्द करणे किंवा त्यात फेरफार करणे.

३४१-ङ. अशा प्रकारे रद्द केल्याचे किंवा फेरफार केल्याचे परिणाम.

प्रकरण सव्वीस-ख

**औद्योगिक नगरी**

३४१-च. औद्योगिक नगरी विनिर्दिष्ट करणे.

३४१-छ. औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे विधीद्वारा संस्थापन.

३४१-ज. औद्योगिक नगरी प्राधिकरणाची रचना.

३४१-झ. सदस्यांचा पदावधी.

३४१-ञ. मुख्य कार्यकारी अधिकारी व सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

३४१-ट. औद्योगिक नगरी प्रधिकरणाच्या सभा.

३४१-ठ. औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे आदेश व कागदपत्रे यांचे अधिप्रमाणन

३४१-ड. औद्योगिक नगरी प्राधिकरणाची कामे व कर्तव्ये.

३४१-ढ. औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे अधिकार.

३४१-ण. विनियम करण्याचा अधिकार.

३४१-त. शासनाचे सर्वसाधारण नियंत्रण.

## अनुक्रमणिका

**कलमे**


३४१-थ. विवक्षित कारणांवरून औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे आदेश व निर्णय यांची अंमलबजावणी स्थगित करण्याचे अधिकार.

३४१-द. विवक्षित परिस्थितीमध्ये प्रशासकाची नियुक्ती करण्याचा अधिकार

३४१-ध. प्रादेशिक व नगररचना अधिनियम लागू होणे

प्रकरण सत्तावीस

**[वगळण्यात आले]**

३४२. [वगळण्यात आले].

प्रकरण अठ्ठावीस

**निरसन आणि संक्रमणकालीन तरतुदी**

३४३. निरसन.

३४४. अर्थ लावणे.

३४५. ज्यांचा पदावधी ३१ डिसेंबर, १९६५ नंतर समाप्त व्हावयाचा असेल अशा विद्यमान नगरपरिषदांच्या परिषद सदस्यांबाबत विशेष तरतूद.

३४५-क. विद्यमान परिषद सदस्यांची मुदत ३१ डिसेंबर, १९६७ पूर्वी संपविण्यास भाग पाडण्यास पहिल्या उत्तराधिकारी नगरपरिषदांची स्थापना, घडण आणि पदावधी.

३४६. विद्यमान नगरपरिषदांच्या पुन:स्थापनेमुळे होणारे परिणाम.

३४७. अधिकारी व कर्मचारी यांच्यासंबंधी तरतुदी.

३४८. हैद्राबाद क्षेत्र स्थानिक शासन सेवेतील विद्यमान सदस्यांच्या संबंधात विशेष तरतुदी.

३४९. विद्यमान नगरपरिषदांची विवक्षित कर्तव्ये व कामे पार पाडण्याबाबत आबंधने.

३५०. (वगळण्यात आले).

३५१. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**अनुसूची**

**अनुसूची एक**

**अनुसूची एक-क**

**अनुसूची दोन**

**अनुसूची तीन**

अनुसूची चार
अनुसूची पाच
अनुसूची सहा
अनुसूची सात
अनुसूची आठ
अनुसूची नऊ

# सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०[१]

## [ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ ]

[राष्ट्रपती यांची अनुमती दिनांक ७ सप्टेंबर, १९६५ रोजी मिळाली. ही अनुमती प्रथम **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग चारमध्ये, दिनांक १० सप्टेंबर, १९६५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली.]

**[१० सप्टेंबर, १९६५]**

या अधिनियमात खालील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५२.
सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.
सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.
सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.
सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.
सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.
सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.
सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८. (१-५-१९७४) †
सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.
सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. (१५-११-१९७६) †
‡ सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७. (१६-१०-१९७३) †
सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४. (२३-१०-१९७४) †
सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८. (२०-५-१९७४) †
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. (१-४-१९७५) †
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५. (१६-९-१९७५) †
सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (१२-४-१९७६) †
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१. (१-१-१९७८) †
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०*. (२९-१२-१९७९) †
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ¶. (१६-१०-१९८०) †

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९६५, भाग ५, अतिरिक्त, पृष्ठे २१४–२२२ पहा. संयुक्त समितीच्या प्रतिवृत्तासाठी वरील राजपत्राचा भाग ५, पृष्ठे ३९५–५८० पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

‡ हा अधिनियम, त्याचे कलम ५ खेरीजकरून, १६ ऑक्टोबर, १९७३ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात आले.

* सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० च्या कलम ११(१) द्वारे १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

¶ सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम २३ द्वारे १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. (४-२-१९८१) †

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९. (१५-७-१९८१) †

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. (२८-४-१९८१) †

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६७**. (१-१०-१९८१) †

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६८. (२८-१२-१९८१) †

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६९. (२८-१२-१९८१) †

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११. (१-५-१९८३) †

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७. § (२०-५-१९८३) †

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२. @ ‡ (१-४-१९८१) †

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

** सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६७ च्या कलम ६ द्वारे सन १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ निरसित करण्यात आला.

§ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम ५ द्वारे सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

@ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ द्वारे सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ निरसित करण्यात आला.

‡ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ च्या कलम ५ मध्ये खालील मजकूर आहे :—

मालमत्तेच्या मालकांना किंवा भोगवटादारांना कराच्या दरातील वाढीसंबंधी नोटीस न देता बसविण्यात आलेले व गोळा करण्यात आलेले विवक्षित कर विधिग्राह्य करणे.

" **५.** मुख्य अधिनियम किंवा तद्न्वये तयार करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा उप-विधी यांत किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही परिषदेने मालमत्तेच्या मालकांना किंवा भोगवटादारांना, त्यांच्या मालमत्तेवर आकारण्याजोग्या कराच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आल्यासंबंधी किंवा कराच्या दरात अशी कोणतीही वाढ झाल्यामुळे त्यांच्या मालमत्तेच्या संबंधातील कर निर्धारणात वाढ झाल्यासंबंधी कोणतीही नोटीस न देता, १ एप्रिल, १९८१ रोजी किंवा त्यानंतर, मुख्य अधिनियमाच्या तरतुदीनुसार बसवलेले किंवा वसूल केलेले कोणतेही कर विधिग्राह्य रीतीने बसवण्यात किंवा वसूल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल व ते नेहमीच विधिग्राह्य असल्याचे समजण्यात येईल आणि अधिक दराने कर बसवण्याच्या पूर्वी किंवा वसूल करण्यापूर्वी कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती याच केवळ कारणावरून अशा कोणत्याही करवाढीबाबत कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही. अशा रीतीने बसवण्यात किंवा वसूल करण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या रकमेचा परतावा मिळण्याबाबत कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा कोणतीही कार्यवाही चालवता किंवा चालू ठेवता येणार नाही. "

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४. @ @ (१८-६-१९८३) †

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७१ ‡ (३०-३-१९८४) †

@ @ १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ च्या कलम ४ व ५ मध्ये पुढीलप्रमाणे मजकूर आहे :—

१९७३ चा महा. २१.

**४.** महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी किंवा त्यापूर्वी, दुय्यम सेवेतील कोणत्याही पदावर नेमणूक करण्यात आलेली, आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अजूनही सेवेत असलेली प्रत्येक व्यक्ती ही, निवड मंडळाने, किंवा यथास्थिति विशेष निवड मंडळाने उक्त अधिनियमान्वये किंवा महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळ नियम, १९७६ या अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमान्वये किंवा आदेशान्वये नामनिर्देशित केलेली किंवा शिफारस केलेली नसली तरीही, किंवा निवड मंडळाने किंवा विशेष निवड मंडळाने उमेदवारांच्या निवडीसाठी सुधारित नियम तयार केलेले नसले तरीही, त्या पदावर कायदेशिररित्या नेमण्यात आलेली आहे, असे समजण्यात येईल आणि ती व्यक्ती रीतसर निवडण्यात वा नियुक्त करण्यात आलेली नाही केवळ याच कारणास्तव त्या नियुक्तीबाबत कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकरणासमोर आक्षेप घेण्यात येणार नाही : दुय्यम सेवेमधील विवक्षित नेमणुका विधिग्राह्य करणे.

परंतु,—

(अ) राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली अशी नियुक्ती करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीची प्रारंभिक नियुक्ती ही,—

(एक) अशा नियुक्तीच्या वेळी, त्या पदाकरिता जे सेवाप्रवेश नियम अंमलात असतील त्या नियमांत विहित केलेल्या वयोमर्यादेस व किमान अर्हतेस धरून असेल ;

(दोन) सेवायोजन कार्यालयाने किंवा समाजकल्याण अधिकाऱ्याने शिफारस केलेल्या किंवा राज्य शासनाने शासकीय सेवेत नियुक्त करण्यासाठी उमेदवार पाठवण्याकरिता प्राधिकृत केलेल्या मागासवर्गाच्या संघटनांनी शिफारस केलेल्या किंवा जिल्हाधिकाऱ्याने १९७७-७८ च्या संपकाळात नोकरीला लागलेल्या उमेदवारांच्या यादीतून शिफारस केलेल्या, उमेदवारांमधून करण्यात आलेली असेल ;

(तीन) शासनाने मागासवर्गातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींसाठी, माजी सैनिकांसाठी, अपंग व्यक्तींसाठी व अन्य कोणत्याही वर्गाच्या व्यक्तींसाठी पदे राखून ठेवण्यासंबंधात, वेळोवेळी, जे आदेश दिले असतील, त्यांना धरून असेल ;

१९४७ चा मुंबई ६१. १९४८ चा मुंबई ५४. १९५० चा मुंबई ६४.

(ब) अशा प्रकारची नियुक्ती जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ अन्वये स्थापन करण्यात आलेली नगरपालिका शाळा मंडळे, वीज (पुरवठा) अधिनियम, १९४८ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य वीज मंडळ आणि मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली असेल त्याबाबतीत, त्या व्यक्तीची प्रारंभिक नियुक्ती ही, अशा नियुक्तीच्या वेळी अंमलात असलेल्या संबंधित नियमांना व विनियमांना किंवा त्या पदांशी संबंधित अशा प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांना, किंवा शासनाने त्या संदर्भात दिलेल्या व कोणत्याही आदेशाला धरून करण्यात आलेली असेल.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या परंतुकामध्ये निर्देश केलेली प्रारंभिक नियुक्ती निश्चित करताना दुय्यम सेवेत भरती करण्यासंबधी केलेल्या कोणत्याही नियमांनुसार किंवा आदेशांनुसार आवश्यक असलेल्या गोष्टींचे अनुपालन करण्यासाठी दुय्यम सेवेतील कोणत्याही पदावर चालू ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीची तांत्रिक कारणासाठी खंडित केलेली सेवा आणि त्यानंतरचा कोणताही औपचारिक नियुक्ती आदेश विचारात घेतला जाणार नाही.

**५.** या अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून, मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ च्या कलम ७ चे उपबंध निरसनाच्या परिणामाच्या बाबतीत लागू होतील. व्यावृत्ती.

१९०४ चा मुंबई १.

‡ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम ७ चा मजकूर पुढीलप्रमाणे आहे :—

**७.** हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून एक वर्ष मुदतीच्या आत, या अधिनियमान्वये सुधारणा केल्याप्रमाणेच्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, आदेशाद्वारे, उक्त अडचण दूर करण्यसाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी उपबंधांशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करणे.

† ही खूण अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ *** (२०-१२-१९८५) †
सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ (१८-२-१९८८) †
सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० (१-११-१९८७) †
सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (२५-४-१९८८) †
सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ (१२-६-१९८९) †
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (१२-२-१९९०) †@
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ @ @
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ (१७-९-१९९०) † ££
सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ (९-९-१९९१) †
सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४* @ (१४-५-१९९२) †
सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ *@ @(१०-८-१९९२) †
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ @ @ @ ‡ (३०-१२-१९९२) †
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० (१-९-१९९३) †
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४

---

* * * सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ७ द्वारे १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ निरसित झाला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

@ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम १४ द्वारे १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ निरसित झाला.

@ @ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ चे कलम ९ पुढीलप्रमाणे :—

विद्यमान महिला पालिका सदस्यांनी पद धारण करणे चालू ठेवणे.

**९.** शंका निरसनार्थ याद्वारे, असे जाहीर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या एखाद्या नगरपालिकेतील राखीव जागेवर, निवडून आलेली व महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९० याच्या प्रारंभाच्या दिनांकास पालिका सदस्य म्हणून पद धारण करणारी प्रत्येक महिला पालिका-सदस्य ही, तिचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी तिने, आपल्या पदाचा राजीनामा दिला नसेल तर किंवा असे पालिका-सदस्याचे पद धारण करण्यास ती अनर्ह ठरवण्यात आली नसेल तर, जणू काही, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९० द्वारे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ यात केलेल्या सुधारणा कधीच करण्यात आल्या नव्हत्या, असे समजून तिचा पदावधी समाप्त होईपर्यंत अशी पालिका-सदस्य म्हणून राहील.

१९६५ चा महा. ४०. १९९० चा महा. १३.

१९६५ चा महा. ४०. १९९० चा महा. १३.

££ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ याच्या कलम ३ द्वारे १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ निरसित झाला.

* @ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३ द्वारे १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ निरसित झाला.

* @ @ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम २७ द्वारे १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ निरसित झाला.

@ @ @ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ७ द्वारे १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ निरसित झाला.

‡ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याचे कलम ७ पुढीलप्रमाणे :—

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**७.** या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, प्रसंग पडेल तर, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल परंतु अशा तरतुदींना विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश, ३० डिसेंबर, १९९२ पासून प्रारंभ होणारा दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर काढण्यात येणार नाही.

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ (३१-५-१९९४) †०
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ £ (२-११-१९९४) †
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ (११-११-१९९४) †
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ £@ (३१-५-१९९४) †
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (१२-६-१९९५) †
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (२१-१-१९९६) †
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ (१६-५-१९९६) †
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (२६-११-१९९६) †$
सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ (१-५-१९९०) †
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ (३०-४-१९९९) †*
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ (१३-९-२०००) †
सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (१४-९-२०००) †**
सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० (२९-६-२००१) †***
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (५-१-२००२) †
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ $ £
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ (१९-१-२००२) †
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ (१५-१२-२००१) £ @@
सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२
सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६
सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १
सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१
सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५

---

†० सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १६३ द्वारे १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० निरसित झाला.

£ सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४३ याच्या कलम ६ द्वारे १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ निरसित झाला.

* सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याचे कलम ५ पुढीलप्रमाणे :----

**५.** या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या कामात कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, प्रसंगानुसार ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल परंतु अशा तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, असा आदेश २ नोव्हेंबर, १९९४ पासून दोन वर्षांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर करण्यात येणार नाही.

£@ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५ द्वारे १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित झाला.

$ या अधिनियमाची कलमे १ आणि ५ ही, दिनांक २६ नोव्हेंबर, १९९६ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल आणि कलमे २, ३ आणि ४ ही ३१ मे, १९९४ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

$£ या अधिनियमाच्या कलमे ११, १३ ते २० आणि २३ ही, ७ सप्टेंबर, २००१ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल. कलमे २० आणि २३(एक) ही, ७ सप्टेंबर, २००१ रोजी आणि कलमे २१ आणि २३(दोन) ही दिनांक ७ नोव्हेंबर, २००१ रोजी आणि कलमे १२ आणि २२ ही, दिनांक १६ ऑक्टोबर, २००१ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

* सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५(१) द्वारे १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३ निरसित झाला.

** सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३ द्वारे २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ निरसित झाला.

*** सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३(१) द्वारे २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित झाला.

£@@ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ६ द्वारे २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २९ निरसित झाला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवते.

**महाराष्ट्र राज्यातील [१][नगरपरिषदांसंबंधात] असलेल्या कायद्याचे एकीकरण करणे, तो एकत्रित करणे व त्यात [१][सुधारणा करणे आणि नगरपंचायती व औद्योगिक नगरी यांची रचना करण्यासाठी तरतूद करणे] याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील नगरपालिकांची रचना, प्रशासन व अधिकार यांकरिता एका एकीकृत पद्धतीची तरतूद करणे आणि त्यासाठी अधिक चांगल्या स्वरूपाची तरतूद करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र शासनाने उपरोक्त बाबींवर त्यात सल्ला देण्याकरिता एक समिती नेमली होती ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त समितीच्या अहवालावर विचार केल्यानंतर, राज्यातील नगरपालिका कायद्याचे एकीकरण करणे, एकत्रीकरण करणे व त्यात सुधारणा करणे, आता इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र [२][नगरपरिषदा] [३][नगर पंचायती व औद्योगिक नगरी] अधिनियम, १९६५, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू आहे.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल ; आणि या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी [४][राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा क्षेत्रात व अशा दिनांकास अंमलात येतील आणि अधिनियमाच्या निरनिराळ्या तरतुदींसाठी व निरनिराळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळे दिनांक नेमण्यात येतील.]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १०६ द्वारे "नगरपालिकासंबंधी" व "आणि नगरपंचायती....... तरतूद करणे" या मजकुरांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २ द्वारे "नगरपालिका" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १०७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] (क) कलमे २, ४, ९ ते ३९, ७४, २९६ (१), (३), (४), २९९, ३२१, ३४२ (१), (२), (३), (४), (५), (१४), ३४५, ३५१ आणि अनुसूची १ यासाठी १४ सप्टेंबर, १९६५ शासकीय अधिसूचना, नगरविकास व आरोग्य विभाग, क्र. यूएमए-१३६५-(१)-युनि-अकरा, दिनांक १४ सप्टेंबर, १९६५ पहा.

(ख) कलम ३१८ साठी २७ ऑक्टोबर १९६५, शासकीय अधिसूचना, नगरविकास व आरोग्य विभाग, क्र. यूएमए-१३६५-(१)-युनि-अकरा, दिनांक २७ ऑक्टोबर, १९६५ पहा.

(ग) अधिनियमाच्या उर्वरित तरतुदींसाठी (यापूर्वीच अंमलात असलेल्या आणि कलम ७५ चे पोट-कलम (५), (६) आणि (७) या खेरीजकरून) दिनांक १५ जून, १९६६ शासकीय अधिसूचना, नगरविकास व आरोग्य विभाग, क्र. यूएमए-१३६६-(क)-एकत्रीकरण-चार, दिनांक २ जून, १९६६ पहा.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या अधिनियमात,—

(१) एखाद्या क्षेत्रासंबंधात " नेमलेला दिवस " याचा अर्थ, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदी त्या क्षेत्रात ज्या दिनांकास अंमलात येतील तो दिनांक, असा आहे ;

[१][(१-क) " नागरिकांचा मागासवर्ग " याचा अर्थ, राज्य शासनाने वेळोवेळी इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती म्हणून घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गांचे भाग अथवा त्यांमधील गट, असा होतो ;]

(२) " इमारत " या संज्ञेत, माणसांना राहण्यासाठी घर म्हणून किंवा अन्य प्रकारे उपयोग करण्यात येत असलेले घर, उपगृह, तबेला, छपरी, झोपडी व इतर परिवेष्टित जागा किंवा संरचना— मग ती चिरेबंदी असो किंवा विटा, लाकूड, चिखल, धातू किंवा इतर कोणतीही सामग्री यांची बांधलेली असो— याचा समावेश होतो ; तसेच व्हरांडे, कायम बसविलेले चबुतरे, जोते, दाराच्या पायऱ्या, भिंती (आवाराच्या भिंती धरून) व कुंपण व तत्सम भाग यांचाही यात समावेश होतो ;

[२][(२-क) " धंदा " या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(क) कोणताही व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग किंवा वस्तुनिर्मिती किंवा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग किंवा वस्तुनिर्मिती यांच्या स्वरूपातील कोणताही उद्यम किंवा संस्था— मग असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था ही लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने चालविली जात असो किंवा नसो आणि असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था यापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो, आणि असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था याच्या व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो ;

(ख) असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग किंवा वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था यांच्याशी संबंधित किंवा त्याला आनुषंगिक किंवा सहाय्यकारी असा कोणताही व्यवहार— मग असा व्यवहार भांडवली मत्तांच्या संबंधात असो किंवा नसो आणि तो लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो, आणि अशा व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो ;

(ग) ज्यामध्ये मालाच्या नगरपालिका क्षेत्रातील आयातीचा, खरेदीचा किंवा विक्रीचा अंतर्भाव होईल असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था या स्वरुपातील कोणताही प्रासंगिक व्यवहार— मग अशा व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो आणि असा व्यवहार, लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो, आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो ;

(घ) असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था सुरू करण्याशी किंवा बंद करण्याशी संबंधित किंवा त्याला आनुषंगिक किंवा सहाय्यकारी असा कोणताही व्यवहार— मग असा व्यवहार लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो, आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ मिळत असो किंवा नसो.

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनार्थ, मनुष्यनिर्मित वने उभारणे किंवा बीजरोपे अथवा रोपे वाढवणे ही कामे धंदा असल्याचे मानण्यात येईल ;]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १०८ (१) द्वारे खंड (१-क) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ च्या कलम २ (अ) द्वारे खंड २(क) समाविष्ट करण्यात आला.

(३) " उपविधी " याचा अर्थ, परिषदेने या अधिनियमान्वये केलेले किंवा केले आहेत असे समजण्यात येणारे उपविधी, असा आहे ;

[१][(३) " उपकर " याचा अर्थ, नगरपालिका क्षेत्रामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर प्रकरण नऊ-क च्या तरतुदींनुसार बसवलेला उपकर, असा आहे ;

(४) " मलकुंडी " या संज्ञेत, इमारतीतील घाण गोळा करण्यासाठी किंवा तिची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या अवसादन टाकीचा किंवा इतर टाकीचा समावेश होतो ;

(५) " मुख्य अधिकारी " याचा अर्थ, नगरपालिका क्षेत्रासाठी मुख्य अधिकारी म्हणून या अधिनियमान्वये नेमलेली किंवा नेमली असल्याचे समजण्यात आलेली व्यक्ती, असा आहे ;

[२][(६) " परिषद " याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ च्या खंड (२) अन्वये किंवा या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये, या संदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिक लहान नागरी क्षेत्रासाठी रचना करण्यात आलेली किंवा रचना करण्यात आली आहे असे मानण्यात आलेली नगरपरिषद, असा आहे ;]

[३][(७) " परिषद सदस्य " याचा अर्थ, परिषदेचा सदस्य [४][**] म्हणून रीतसर निवडून आलेली व्यक्ती, असा आहे ; व त्यामध्ये, ज्याला,—

(एक) परिषदेच्या आणि परिषदेच्या समित्यांच्या कोणत्याही सभेमध्ये मत देण्याचा ; आणि

[५][(दोन) परिषदेचा अध्यक्ष म्हणून किंवा परिषदेच्या कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा,]

हक्क असणार नाही, अशा नामनिर्देशित परिषद सदस्याचा समावेश होतो ;]

(८) " दुग्धशाळा " या संज्ञेत, जेथून विक्रीसाठी दूध पुरविण्यात येते किंवा जेथे विक्रीसाठी दूध ठेवण्यात येते किंवा दुधापासून लोणी, तूप, चीज, दही तयार करण्यात येते किंवा दुधाची भुकटी किंवा निर्जंतुक अथवा संघनित किंवा बनीव दूध तयार करण्यात येते, असे कोणतेही दुग्धशाळा प्रक्षेत्र, गुरांचा गोठा, गो-शाळा, दुग्धभांडार, दुधाचे दुकान किंवा इतर जागा याचा समावेश होईल; परंतु, या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होत नाही,—

(क) ज्या दुकानात किंवा इतर जागेत तेथल्या तेथेच पिण्यासाठी दूध विकले जाते असे दुकान किंवा इतर जागा, किंवा

(ख) ज्या दुकानातून किंवा इतर जागेतून हवाबंद किंवा न उघडलेली भांडी प्रथमत: ज्या अवस्थेत अशा दुकानात किंवा जागेत मिळाली त्याच अवस्थेत अशा भांड्यातून दुधाची विक्री किंवा पुरवठा करण्यात येत असेल असे दुकान किंवा अशी इतर जागा ;

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २(ब) द्वारे खंड (३क) समाविष्ट केला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधनियम, क्रमांक ४१ च्या कलम १०८ (२) द्वारे मूळ खंड (६) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १०८ (३) द्वारे मूळ खंड (७) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[४] सन २००६ चा महाराष्ट्र अधनियम क्रमांक ३१ च्या कलम २(क)(क) द्वारे हा मजकूर वगळला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २(क)(दोन) द्वारे खंड (दोन) दाखल करण्यात आला.

[1][(८-क) " व्यापारी " याचा अर्थ, जी स्वतःच्या धंद्याच्या प्रयोजनासाठी किंवा स्वतःच्या धंद्याच्या संबंधात किंवा त्या अनुषंगाने नगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही मालाची कमिशन, पारिश्रमिक यांवर किंवा अन्यथा आयात, खरेदी किंवा विक्री करते अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ; आणि त्यात पुढील व्यक्तींचा समावेश होतो :—

(क) जो नगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या किंवा प्रकर्त्यांच्या— मग त्यांची माहिती उघड केलेली असे वा नसो— मालकीच्या कोणत्याही मालाची खरेदी करतो, विक्री करतो, त्याचा पुरवठा करतो, त्याचे वितरण करतो किंवा त्याची आयात करतो असा, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा आणि यात यापूर्वी विनिर्दिष्ट केलेल्या अशा त्याच वर्णनाचा असणारा किंवा नसणारा असा अडत्या, दलाल, कमिशन एजंट, आश्वासक अभिकर्ता किंवा अन्य कोणताही वाणिज्य अभिकर्ता ;

(ख) जो नगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या— मग त्याची माहिती उघड केलेली असो वा नसो— मालकीच्या मालाची विक्री करतो किंवा लिलाव करतो तो लिलावकार— मग इच्छुक खरेदीदाराचा देकार त्याने किंवा प्रकर्त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीने स्वीकारलेला असो किंवा नसो ;

(ग) प्रत्यक्षपणे वा अन्यथा मालाची खरेदी, विक्री, पुरवठा, वितरण किंवा आयात (मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो) करणारे केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन ;

(घ) आपल्या सदस्यांसाठी किंवा त्यांच्यावतीने रोख रमकेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा कमिशनवर, पारिश्रमिकावर किंवा अन्यथा मालाची आयात, खरेदी, विक्री, पुरवठा किंवा वितरण— मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो— करणारी संस्था, क्लब किंवा व्यक्तींचा अन्य संघ (मग ते विधिद्वारे संस्थापित असोत किंवा नसोत) ;

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(क) अनिवासी व्यापाऱ्याचा नगरपालिका क्षेत्रामध्ये राहणारा जो व्यवस्थापक किंवा अभिकर्ता नगरपालिका क्षेत्रामध्ये मालाची आयात, खरेदी, विक्री, पुरवठा किंवा वितरण करतो अथवा अशा व्यापाऱ्याच्या वतीने,—

(क) माल विक्रय अधिनियम, १९३० मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेला वाणिज्य अभिकर्ता म्हणून; किंवा

(ख) मालाची किंवा मालाच्या संबंधातील हक्कविषयक दस्तऐवजांची हाताळणी करणारा अभिकर्ता म्हणून, किंवा

(ग) मालाच्या विक्रीची किंमत वसूल करण्यासाठी वा देण्यासाठी किंवा अशा वसुलीची वा प्रदानाची हमी देण्यासाठी अभिकर्ता म्हणून,

काम करतो तो व्यापारी किंवा अशा वसुलीसाठी अथवा प्रदानासाठी हमीदार असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) खंड (८क) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पुढीलपैकी जी व्यक्ती व संस्था, मालाची— यामध्ये बेवारशी असलेल्या किंवा सरकारजमा केलेल्या किंवा निकामी झालेल्या किंवा भंगार, जुने, अप्रचलित असलेले किंवा काढून टाकलेले सामान किंवा टाकाऊ उत्पादन म्हणून असलेल्या मालाचा समावेश आहे— लिलावाद्वारे वा अन्यथा, प्रत्यक्षपणे किंवा अभिकर्त्यामार्फथ रोख रकमेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा अन्य कोणताही मूल्यवान

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ च्या कलम २ (क) द्वारे खंड (ख) समाविष्ट केला.

मोबदला घेऊन विल्हेवाट लावते ती प्रत्येक व्यक्ती व संस्था व्यापारी असल्याचे मानण्यात येईल :—

(क) बंदर विश्वस्तमंडळे ;

(ख) महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा आणि इतर स्थानिक प्राधिकरणे ;

१८९० चा ९. (ग) भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेले रेल्वे प्रशासन ;

(घ) जहाजवाहतूक, परिवहन व बांधकाम कंपन्या ;

(ङ) विमान परिवहन कंपन्या व विमान वाहतूक कंपन्या ;

१९८८ चा ५९. (च) मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेला, भाड्याने वा मोबदल्यादाखल वापरल्या जाणाऱ्या किंवा वापर करण्यासाठी जुळत्या करून घेतलेल्या वाहतूक वाहनांचा परवाना धारण करणाऱ्या, वाहतूक करणाऱ्या व्यक्ती ;

१९५० चा ६४. (छ) मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ;

१९६२ चा ५२. (ज) सीमाशुल्क अधिनियम, १९६२ ची अंमलबजावणी करणारा, भारत सरकारचा सीमाशुल्क विभाग ;

(झ) विमा व वित्तीय महामंडळे किंवा कंपन्या, आणि बँक व्यवसायी कंपन्या ;

(ञ) जाहिरात कंपन्या ;

(ट) केंद्र सरकारच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीचे किंवा त्यांनी स्थापन केलेले अथवा त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले अन्य कोणतेही महामंडळ, कंपनी, संस्था किंवा प्राधिकरण ;

**अपवाद.—** (एक) केवळ स्वत:च्याच उपभोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारी कोणतीही व्यक्ती आणि धंद्यामध्ये न गुंतलेला राज्य किंवा केंद्र सरकारचा विभाग हे व्यापारी असणार नाहीत ;

(दोन) जो शेतकरी केवळ त्याने स्वत: कसलेल्या जमिनीत काढलेले कृषि उत्पादन विकतो तो शेतकरी या खंडाच्या अर्थानुसार व्यापारी असल्याचे मानण्यात येणार नाही];

(९) "संचालक" याचा अर्थ, नगरपालिका प्रशासन संचालक म्हणून राज्य शासनाने या अधिनियमान्वये नेमलेली व्यक्ती ,असा आहे.

(१०) "नाली" या संज्ञेत, मलजल, दुर्गंधीयुक्त पदार्थ, दूषित पाणी, घाण, सांडपाणी, पावसाचे पाणी किंवा भू-पृष्ठाखालील पाणी वाहून नेण्यासाठी किंवा त्याची व्यवस्था लावण्यासाठी केलेला मलप्रणाल, झाकलेली गटार, नळ, खंदक, गटार किंवा पाट आणि कोणताही हौद, उद्धावन टाकी, मलकुंड किंवा अन्य साधने यांचा समावेश होतो. तसेच तीत कोणत्याही अध:प्रणाल, वायुवीजनाचा दांडा किंवा नळ किंवा त्याच्याशी संबंध असलेले अन्य उपयंत्र किंवा जोडकाम यांचा व कोणतीही उत्सर्जके, संपीडित वात प्रधानवाही, पक्के बंद केलेले मलजल प्रधानवाही आणि कोणत्याही जागेतून मलजल किंवा दुर्गंधीयुक्त पदार्थ वर काढणारी, गोळा करणारी, काढून टाकणारी किंवा दूर करणारी खास यंत्रसामग्री किंवा उपकरणसंच यांचा समावेश होतो.

[१][(१०-क) " टोपलीचा शौचकूप " याचा अर्थ, जेथे मानवी मैला टोपलीत साठविला जातो व मग तो माणसाकडून काढून नेला जातो असा शौचकूप, असा आहे ;]

(११) " खाद्य-गृह " याचा अर्थ, ज्या जागेत लोकांस किंवा लोकांच्या कोणत्याही वर्गास प्रवेश मिळतो व ज्या जागेत तिची मालकी असणाऱ्या किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या किंवा तिची व्यवस्था ठेवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नफ्यासाठी किंवा लाभासाठी कोणत्याही प्रकारचा खाद्यपदार्थ तेथल्या तेथेच किंवा इतरत्र सेवन करण्यासाठी तयार केला जातो किंवा पुरविला जातो अशी जागा, असा होतो ;

[२][(१२) " निवडणूक " याचा अर्थ नगरपरिषदेची निवडणूक असा आहे व त्यात कोणत्याही पोट-निवडणुकांचा समावेश होतो ;]

(१३) " कारखाना " याचा अर्थ, भारतीय कारखाने अधिनियम, १९४८ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला कारखाना असा आहे ; १९४८ चा ६३.

(१४) " घाण " या संज्ञेत मलप्रवाह, मल व सर्व प्रकारच्या दुर्गंधीयुक्त वस्तू याचा समावेश होतो ;

[३][(१४-क) " वित्त आयोग, याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-झ च्या तरतुदींनुसार रचना करण्यात आलेला वित्त आयोग, असा आहे] ;

(१५) " अन्न " या संज्ञेत, औषधिद्रव्ये किंवा पाणी या व्यतिरिक्त अन्य ज्या ज्या पदार्थांचा मनुष्याकडून खाण्यासाठी किंवा पिण्यासाठी उपयोग करण्यात येतो अशा प्रत्येक पदार्थांचा आणि जो कोणताही पदार्थ मनुष्याच्या अन्नात सामान्यपणे असतो किंवा असे अन्न बनविण्यासाठी किंवा तयार करण्यासाठी ज्याचा उपयोग केला जातो अशा कोणत्याही पदार्थांचा समावेश होतो. तसेच, या संज्ञेत मिठाई, स्वाद आणणारे व रंग आणणारे पदार्थ आणि मसाल्याचे जिन्नस व मसाले यांचाही समावेश होतो ;

(१६) " माल " या संज्ञेत, प्राण्यांचा समावेश होतो ;

(१७) " घराची नाली " याचा अर्थ, एका किंवा अधिक इमारतींची किंवा जागांची व त्यांच्या निःसारणासाठी वापरण्यात येणारी आणि तेथून केवळ नगरपालिकेच्या नालीमध्ये मलप्रवाह नेऊन सोडण्याच्या प्रयोजनासाठी तयार केलेली नाली, असा होतो ;

(१८) " घरची गल्ली " किंवा " साफसफाईसाठी जाण्यायेण्याचा मार्ग " म्हणजे, नाली म्हणून उपयोगात आणण्याच्या प्रयोजनासाठी किंवा संडास, मुत्री, मलकुंडी किंवा घाणेरड्या किंवा दूषित पदार्थांसाठी ठेवलेले अन्य पात्र, यांकडे जाण्यासाठी परिषदेच्या कर्मचाऱ्यांना किंवा ती साफ करण्यासाठी किंवा त्यातील घाण काढून नेण्याकरिता नेमलेल्या व्यक्तीस त्याकडे जाण्यासाठी तयार केलेला, अलग राखलेला किंवा उपयोगात आणलेला मार्ग किंवा जमिनीची पट्टी ;

[४][(१८-क १) " आयात करणारा " याचा अर्थ, जी व्यक्ती नगरपालिका क्षेत्रामध्ये उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीमद्ये कोणताही माल आणते किंवा आणण्याची व्यवस्था करते ती व्यक्ती, असा आहे ;]

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ च्या कलम २ (अ) अन्वये खंड (१०-क) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ च्या कलम २ (ख) अन्वये खंड (१२) दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १०८ (४) द्वारे खंड (१४-क) समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ च्या कलम २ (ड) द्वारे खंड (१८ क-१) ) समाविष्ट केला.

[१][(१८-क) "औद्योगिक नगरी" याचा अर्थ, राज्य शासन, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ, खंड (१) च्या परंतुकात नमूद करण्यात आलेले घटक लक्षात घेऊन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कलम ३४१-च अन्वये औद्योगिक नगरी म्हणून विनिर्दिष्ट करील असे नागरी क्षेत्र किंवा त्याचा भाग, असा आहे ;]

(१९) "जमीन" या संज्ञेत जिच्यावर बांधकाम करण्यात येत आहे किंवा करण्यात आले आहे किंवा जी पाण्याने आच्छादलेली आहे अशी जमीन, जमिनीपासून उत्पन्न होणारे फायदे, जमिनीशी जोडलेल्या वस्तू किंवा कोणत्याही जमिनीशी जोडलेल्या वस्तूशी कायमच्या जखडलेल्या वस्तू आणि विधानमंडळाने केलेल्या अधिनियमान्वये कोणत्याही रस्त्यांबाबत निर्माण केलेले हक्क यांचा समावेश होतो ;

१९८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९६२ चा महा. ५. १९५९ चा मुंबई ३.

(२०) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, परिषद किंवा मुंबई महानगरपालिका अधिनियम* किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये प्रस्थापित महानगरपालिका किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये रचना केलेली जिल्हा परिषद किंवा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ या अन्वये रचना केलेली ग्रामपंचायत, असा होतो ;

[२][(२०-क) "स्थनिक वृतपत्र" याचा अर्थ, सार्वजनिक बातम्या किंवा सार्वजनिक बातम्यांवरील भाष्य यांचा अंतर्भाव असलेले, संबद्ध नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात खप असणारे कोणतेही छापील नियतकालिक, असा आहे ;]

(२१) "निवासगृह" याचा अर्थ, जेथे पैशाच्या मोबदल्यात भोजन किंवा अन्य सेवेसह किंवा भोजनावाचून किंवा अन्य सेवेवाचून राहण्याची सोय केली जाते अशी इमारत किंवा इमारतीचा भाग, असा आहे ; आणि या संज्ञेत कोणताही पैशाचा मोबदला घेऊन किंवा मोबदला न घेता यात्रेकरूंना राहण्यासाठी असलेले निवासगृह यांचाही समावेश होतो ;

(२२) "बाजार" या संज्ञेत, ज्या कोणत्याही जागेत, मग तेथे खरेदीदार व विक्रेते एकत्र जमण्याबाबत कोणताही सर्वसाधारण नियम नसला तरी आणि तसेच, अशा जागेच्या मालकाकडून किंवा कोणत्याही इतर व्यक्तीकडून बाजारात चालणाऱ्या धंद्यावर किंवा तेथे येणाऱ्या व्यक्तींवर कोणतेही नियंत्रण ठेवण्यात येवो वा न येवो—गुरेढोरे किंवा गुराढोरांचे अन्न किंवा मांस, मासळी, फळे, भाजीपाला, मानवी खाद्यासाठी असलेली जनावरे किंवा [३][माणसांच्या किंवा जनावरांच्या वापरासाठी किंवा सेवनासाठी उद्देशित असलेले अन्य कोणतेही पदार्थ] यांची विक्री करण्याकरिता किंवा ती विक्रीसाठी ठेवण्याकरिता लोक, जागेच्या मालकाच्या संमतीने किंवा संमतीवाचून ज्या जागी जमतात अशा जागेचा समावेश होतो ;

(२३) "दूध" या संज्ञेत मलई, मलईविरहित दूध, वेगळे केलेले दूध आणि संघनीत, निर्जंतूक केलेले, सुकविलेले किंवा बनीव दूध यांचा समावेश होतो ;

[४][(२४) "नगरपालिका क्षेत्र" याचा अर्थ, परिषदेचे किंवा नगर पंचायतीचे प्रादेशिक क्षेत्र, असा आहे ;]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १०८(५) द्वारे खंड (१८-क) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ३(अ) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) द्वारे "मानवी खाद्यासाठी असलेले कोणतेही पदार्थ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १०८(६) द्वारे खंड (२४) दाखल करण्यात आला.

* आता मुंबई महानगरपालिका अधिनियम.

(२५) "नगरपालिका बाजार" किंवा "नगरपालिका कत्तलखाना" याचा अर्थ, नगरपालिकेच्या मालकाचा किंवा तिने चालविलेला, यथास्थिति, बाजार किंवा कत्तलखाना, असा आहे ;

[१][(२५-क) "नगर पंचायत" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ३४१-क खाली अधिसूचित करण्यात आलेल्या संक्रमणात्मक क्षेत्रासाठी रचना करण्यात आलेली नगर पंचायत, असा आहे ;]

(२६) "उपद्रव" या संज्ञेत, ज्याच्या योगे डोळे, नाक किंवा कान यांच्या शक्तीस इजा, धोका, त्रास, किंवा पीडा होते किंवा होण्याचा संभव आहे किंवा जे जीवितास घातक किंवा आरोग्यास किंवा मालमत्तेस हानिकारक आहे किंवा होण्याचा संभव आहे, अशा कोणत्याही कृतीचा, अकृतीचा, जागेचा किंवा वस्तुचा समावेश होतो ;

(२७) "भोगवटादार" या संज्ञेत, पुढील व्यक्तींचा समावेश होतो :—

(क) ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात भाडे दिले जाते किंवा देण्याजोगे असते अशा जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे किंवा भाड्याचा कोणताही भाग, जी कोणतीही व्यक्ती मालकास त्यावेळी देत असेल किंवा देण्यास पात्र असेल अशी कोणतीही व्यक्ती ;

(ख) आपल्या जमिनीवर किंवा इमारतीत राहणारा किंवा अन्यथा तिचा वापर करणारा मालक ;

(ग) भाडे माफ असलेला भाडेकरू ;

(घ) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करीत असलेला लायसनधारक, आणि

(ङ) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर व भोगवटा केल्याबद्दल मालकास नुकसानभरपाई देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती.

[२](२८) * * * * *

(२९) "दुर्गंधीयुक्त पदार्थ" या संज्ञेत जनावरांची प्रेते, शेण, घाण व मलजलाव्यतिरिक्त अन्य सडणारे किंवा सडण्यास कारणीभूत होणारे पदार्थ यांचा समावेश होतो ;

(३०) "परिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी" याचा अर्थ, परिषदेने किंवा तिच्या अधीन असलेल्या अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने नेमलेला अधिकारी किंवा कर्मचारी, असा आहे, आणि त्या संज्ञेत परिषदेकडे त्यावेळी काम करीत असलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा समावेश होईल ;

(३१) "शासन वर्ष" किंवा "वित्तीय वर्ष" याचा अर्थ, दिनांक १ एप्रिल रोजी सुरू होणारे वर्ष, असा आहे ;

(३२) "मालक" ही संज्ञा,—

(क) एखाद्या जागेच्या संबंधात वापरण्यात येईल तेंव्हा तिचा अर्थ, जी व्यक्ती अशा जागेचे भाडे घेते ती व्यक्ती, किंवा उक्त जागा भाड्याने दिली असता ज्या व्यक्तीला तिचे भाडे घेण्याचा हक्क झाला असता ती व्यक्ती, असा आहे आणि तीत पुढील व्यक्तींचा समावेश होतो :—

(एक) मालकाच्या वतीने असे भाडे घेणारा अभिकर्ता किंवा विश्वस्त;

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १०८(७) द्वारे खंड (२५-क) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ च्या कलम २ द्वारे खंड (२८) वगळण्यात आला.

(दोन) धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी असलेल्या कोणत्याही जागेचे जो भाडे घेतो किंवा अशी जागा ज्याच्याकडे सोपविली आहे किंवा तिच्याशी ज्याचा संबंध आहे असा अभिकर्ता किंवा विश्वस्त ;

(तीन) उक्त जागेचा ताबा घेण्यासाठी किंवा तिचा मालक म्हणून हक्क बजावण्यासाठी सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला धारक, समपहर्ता किंवा व्यवस्थापक ; आणि

(चार) कब्जेगहाणदार ; आणि

(ख) कोणतेही जनावर, वाहन किंवा नाव याच्या संदर्भात ही संज्ञा वापरण्यात येईल तेव्हा, तीत असे जनावर, वाहन किंवा नाव यांचा त्यावेळी ताबा असलेला व्यक्तींचा समावेश होतो.

(३३) "लोकसंख्या" याचा अर्थ, ज्या जनगणनेची [१][संबंधित आकडेवारी [२][* * * *] प्रसिद्ध करण्यात आली आहे] अशा लगतपूर्वी झालेल्या जनगणनेवरून निर्धारित लोकसंख्या, असा आहे ;

[३][**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ "प्रसिद्ध" या शब्दाचा अर्थ, संबंधित जनगणनेची अलिकडची प्रसिद्ध झालेली आकडेवारी, मग ती तात्पुरती असो किंवा अंतिम असो, असा आहे, आणि अलिकडे प्रसिद्ध झालेली जनगणनेची आकडेवारी उपलब्ध नसल्यास अलिकडच्या जनगणनेच्या लगतपूर्वी झालेल्या ज्या जनगणनेची संबंधित अंतिम आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आलेली असेल ती संबंधित आकडेवारी, असा आहे];

(३४) "जागा" या संज्ञेत घरवाड्या, इमारती व कोणत्याही धारणाधिकारात येणाऱ्या जमिनी यांचा समावेश होतो.—मग त्या खुल्या असोत वा परिवेष्टित असोत किंवा त्यांच्यावर बांधकाम केलेले असो वा नसो आणि त्या सार्वजनिक असोत वा खाजगी असोत ;

(३५) "विहित" याचा अर्थ, नियमान्वये विहित केलेले, असा आहे ;

(३६) "अध्यक्ष" व "उपाध्यक्ष" याचा अर्थ, परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, असा आहे ;

(३७) (क) "खाजगी बाजार" याचा अर्थ, नगरपालिका बाजार नसलेला बाजार, असा आहे. परंतु, अशा बाजारामध्ये, शेतीविषयक आणि इतर उत्पादनाच्या खरेदी-विक्रीचे नियमन करण्यासाठी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या प्रयोजनाकरिता स्थापन केलेल्या बाजाराचा समावेश होत नाही ;

(ख) "खाजगी कत्तलखाना" याचा अर्थ, नगरपालिका कत्तलखाना नसलेला कत्तलखाना, असा आहे ;

(३८) "खाजगी रस्ता" याचा अर्थ, जो सार्वजनिक नाही तो रस्ता, असा आहे ;

---

[१] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ४ अन्वये हा मजकूर "संबंधित आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १०८(८) द्वारे "मग ती तात्पुरती असो अथवा अंतिम असो" हा मजकूर बगळण्यात आला.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ च्या कलम ११(ग) द्वारे स्पष्टीकरण जादा दाखल केले.

(३९) "संडास" याचा अर्थ, मल विसर्जनासाठी किंवा मूत्र विसर्जनासाठी किंवा या दोन्ही कारणांसाठी अलग राखलेली जागा, तसेच अशी जागा ज्यात आहे असे बांधकाम, माणसांच्या मलमूत्रासाठी ठेवलेले पात्र, त्यास जोडण्यात आली असतील अशी जोडकामे व उपकरण संच, असा आहे ; आणि त्यात निर्जल शौचस्थान, जलधौत संडास, शौचकूप व मुत्री यांचा समावेश होतो ;

(४०) "सार्वजनिक जागा" यात कोणतेही सार्वजनिक उपवन किंवा उद्यान किंवा जेथे लोकांना प्रवेश करता येतो किंवा प्रवेश करण्यास परवानगी असते अशी कोणतीही जागा, यांचा समावेश होतो ;

(४१) "सरकारी कर्जरोखे" याचा अर्थ,—

(क) केंद्र सरकारचे किंवा कोणत्याही राज्य शासनाचे कर्जरोखे ;

(ख) ज्यांवरील व्याजाची हमी केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने दिलेली आहे असे कर्जरोखे; रोखे, ऋणपत्रे किंवा शेअर ;

(ग) भारताच्या राज्यक्षेत्रातील कोणत्याही भागात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्यावतीने पैशाबद्दल दिलेली ऋणपत्रे किंवा अन्य कर्जरोखे ; किंवा

(घ) राज्य शासनाने याबाबतीत दिलेल्या कोणत्याही आदेशान्वये स्पष्टपणे प्राधिकृत केलेले कर्जरोखे ;

(४२) "सार्वजनिक रस्ता" याचा अर्थ—

(क) ज्या रस्त्यावरून मार्गक्रमण करण्याचा जनतेस हक्क आहे ;

(ख) जो, नगरपालिकेच्या किंवा इतर सार्वजनिक निधीच्या खर्चाने यापूर्वी समतल करण्यात आलेला, फरसबंदी करण्यात आलेला, खडी घालण्यात आलेला, पाणी वाहून जाण्याकरिता पाट काढण्यात आलेला, मलप्रणाल खोदण्यात आलेला किंवा दुरूस्त करण्यात आलेला ; किंवा

(ग) जो, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये सार्वजनिक रस्ता होतो किंवा सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर करण्यात आलेला आहे, दुरूस्त करण्यात आलेला ;

असा कोणताही रस्ता, असा आहे ;

[1][(४२-क) "नोंदणीकृत व्यापारी" याचा अर्थ, कलम १४८फ अन्वये नोंदणी करण्यात आलेला व्यापारी असा आहे ;

(४३) "कचरा" या संज्ञेत, धूळ, राख, विटांचे तुकडे, कमावलेला चुना, काचेचे तुकडे, बागेतील किंवा तबेल्यातील केरकचरा व दुर्गंधीयुक्त पदार्थ किंवा मलजल नसलेला कोणताही केरकचरा याचा समावेश होतो ;

(४४) "नियम" याचा अर्थ, राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे ;

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ च्या कलम २(ई) द्वारे खंड (४२-क) समाविष्ट केला.

[१][(४४-क) "सफाई कामगार" याचा अर्थ, रस्ते झाडण्यासाठी किंवा ते स्वच्छ करण्यासाठी किंवा केरकचरा वाहून नेण्यासाठी किंवा शौचकूप, मलप्रणाल, गटारे किंवा सार्वजनिक जागा स्वच्छ करण्यासाठी प्रत्यक्षात नोकरीवर ठेवलेला कर्मचारीवर्ग, असा आहे ] ;

(४५) "अनुसूचित जाती" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ज्या जाती, वंश किंवा जमाती किंवा अशा जाती, वंश किंवा जमाती, यांतील जे भाग किंवा गट यांस अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येत असेल, त्या जाती, वंश किंवा जमाती, असा आहे ;

(४६) "अनुसूचित जमाती" याचा अर्थ, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ज्या जमाती किंवा वन्य जमाती किंवा अशा जमाती किंवा वन्य जमाती यांतील जे भाग किंवा गट यांस अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येत असेल अशा जमाती किंवा वन्य जमाती, असा आहे ;

(४७) "मलजल" याचा अर्थ, मलमूत्र व जलधौत संडास, शौचकूप, संडास, मुत्र्या, मलकुंड्या किंवा नाल्या यातील इतर घाण आणि सांडवण्या, स्नानगृहे, तबेले, गुरांचे गोठे व तत्सम इतर जागा यांतील दूषित पाणी, असा आहे आणि त्यात धंद्याच्या जागेतील निःसृत व सर्व प्रकारच्या कारखान्यातील निस्सरण यांचा अंतर्भाव होतो.

[२][ (४७-क) "अधिक लहान नागरी क्षेत्र" किंवा "संक्रमणात्मक क्षेत्र" याचा अर्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ च्या खंड (२) अन्वये किंवा या अधिनियमान्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे "अधिक लहान न [illegible] क्षेत्र" किंवा यथास्थिति "संक्रमणात्मक क्षेत्र" म्हणून विनिर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र, असा आहे ;

(४७-ख) "राज्य निवडणूक आयोग" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-ट च्या खंड (१) च्या तरतुदींनुसार नियुक्त करण्यात आलेल्या राज्य निवडणूक आयुक्ताचा समावेश असलेला राज्य निवडणूक आयोग. ];

(४८) "रस्ता" याचा अर्थ, लोकांना कायम किंवा तात्पुरती सुगम असलेली कोणतीही सडक, पायवाट, चौक, आवार, आळी, किंवा मार्ग, असा आहे— मग तो रहदारीचा असो किंवा नसो ; आणि त्यात ज्या मोकळ्या जागेच्या कडेला घरे, दुकाने, अगर इतर इमारती असून जिचा कोणत्याही व्यक्ती—मग त्या अशा इमारतींचे भोगवटादार असोत किंवा नसोत— कोणत्याही सार्वजनिक जागेकडे किंवा जागेपासून किंवा रहदारीच्या रस्त्याकडे किंवा रस्त्यापासून जाण्यायेण्याचा मार्ग म्हणून उपयोग करीत असतील त्या जागेचा समावेश होतो. मग अशी जागा खाजगी मालमत्ता असो किंवा नसो आणि तो अंशतः किंवा पूर्णतः कोणत्याही दरवाज्याने, खांबाने, साखळीने किंवा इतर अडथळ्याने अडविलेली असो किंवा नसो; परंतु, त्यात अशा कोणत्याही इमारतीच्या भोगवटादारास अशा जागेच्या ज्या कोणत्याही भागाचा वर सांगितल्याप्रमाणे उपयोग करण्याची इतर सर्व व्यक्तींस कोणत्याही वेळी मनाई करण्याचा हक्क असेल त्या भागाचा समावेश होणार नाही ;

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ च्या कलम २(ब) अन्वये खंड (४४-क) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १०८(९) द्वारे खंड (४७-क) व (४७-ख) समाविष्ट करण्यात आले.

(४९) परिषदेच्या संबंधात "परिषद सदस्यांची एकूण संख्या" याचा अर्थ, त्या परिषदेच्या निवडून आलेल्या [1][परिषद सदस्यांची] एकूण संख्या, असा आहे;

[2][ (४९-क) "खरेदीची उलाढाल" याचा अर्थ, व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने एखाद्या विशिष्ट मुदतीत केलेल्या मालाच्या कोणत्याही खरेदीसंबंधात त्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने दिलेल्या आणि तिने देय असलेल्या खरेदी किंमतीच्या एकूम रकमांतून, विक्रेत्यांकडून खरेदी करण्यात आलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात त्या विक्रेत्याने त्या व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला खरेदी किंमतीची कोणतीही रक्कम परत केलेली असल्यास ती रक्कम वजा करून राहिलेली रक्कम, असा आहे ;

(४९-ख) "विक्रीची उलाढाल" याचा अर्थ, व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला एखाद्या विशिष्ट मुदतीत केलेल्या मालाच्या कोणत्याही विक्रीसंबंधात मिळालेल्या व मिळण्यायोग्य असलेल्या विक्री किंमतीच्या एकूण रकमांतून, खरेदीदाराने त्यांच्याकडून खरेदी केलेल्या आणि सहा महिन्यांच्या मुदतीत त्यास परत केलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात त्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने खरेदीदाराला विक्री किंमतीची कोणतीही रक्कम परत केलेली असल्यास ती रक्कम वजा करून आणि नोंदणीपत्र रद्द करण्यात आलेले असेल त्याबाबतीत, ते ज्या दिनांकापासून रद्द होईल त्या दिनांकापूर्वी केलेल्या विक्रीच्या संबंधात अशा दिनांकानंतर मिळालेल्या किंवा मिळण्यायोग्य असलेल्या रकमा वजा करून राहिलेली रक्कम, असा आहे ;

(५०) "वाहन" या संज्ञेत गाडी, खटारा, व्हॅन, छकडा, मालमोटार, हातगाडी, सायकल, तिचाकी, मोटारगाडी आणि रस्त्यावर वापरण्यात येणारे किंवा वापरण्यायोग्य असलेले चाकाचे प्रत्येक वाहन यांचा समावेश होतो;

[3][ (५०-क) "प्रभाग समिती" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ६६-क अन्वये रचना करण्यात आलेली प्रभाग समिती, असा आहे ];

(५१) "जलधौत संडास" याचा अर्थ, ज्यात जलनिस्सारण यंत्रणेस जोडलेले व कायम बसविलेले असे स्वतंत्र पात्र असेल व जो यांत्रिक किंवा स्वयंचलित क्रियेने स्वच्छ पाण्याने खळदिशी धुतला जाण्याची सोय केलेली असेल असा संडास, असा आहे ;

(५२) "जलसंयोजन" या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होतो,—

(क) खाजगी मालमत्तेत असलेली व परिषदेच्या मालकीच्या पाण्याच्या मुख्य नळाशी किंवा नळाशी जोडलेली कोणतीही टाकी, हौद, नळखांब, उभा नळ, मीटर किंवा तोटी; आणि

(ख) अशा टाकीला, हौदाला, नळखांबाला, उभ्या नळाला, मीटरला किंवा तोटीला अशा पाण्याच्या मुख्य नळाशी किंवा नळाशी जोडणारा पाण्याचा नळ;

---

[1] सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १०८ (१०) द्वारे " आणि स्वीकृत केलेले व नामनिर्देशित केलेले कोणतेही परिषद सदस्य असल्यास त्यांची " ह्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २(फ) द्वारे खंड (४९ क), (४९ ख) समाविष्ट केले.

[3] सन १९९४ चा अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १०८ (११) द्वारे खंड (५०-क) समाविष्ट करण्यात आला.

(५३) "जलव्यवस्था केंद्र" या संज्ञेत, सरोवर, ओढा, झरा, विहीर, पंप, जलाशय, हौद, टाकी, वाहीनी— मग ती झाकलेली असो अगर उघडी असो— जलद्वार, मुख्यनळ, अध:प्रणाल, इंजिन, पाण्याची गाडी, नळखांब, उभा नळ, प्रणाल आणि पाण्याचा पुरवठा करण्याकरिता असलेली किंवा वापरण्यात येणारी किंवा पाणी पुरवठ्याच्या साधनांचे संरक्षण करण्याकरिता असलेली यंत्रसामग्री, जमीन, इमारत किंवा वस्तू यांचा समावेश होतो;

[१][ (५४) "पाण शौचकूप" याचा अर्थ, जेथे मैला पाण्याद्वारे मलकुंडात किंवा नगरपालिकेच्या भुयारी गटारातून वाहून नेला जातो व जेथे तो मैला माणसांनी काढून नेण्याची आवश्यकता नसते असा शौचकूप, असा आहे ]

## प्रकरण दोन

## नगरपरिषदा

### (१) नगरपालिका क्षेत्रे व त्यांचे वर्गीकरण

१९९४ चा महाराष्ट्र ४१.

[३][क्षेत्रांचा अधिक लहान नागरी क्षेत्रे म्हणून विनिर्देश करणे].

**३.** [२][ (१) महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९४ अंमलात येण्याच्या दिनांकाला अस्तित्वात असलेल्या व त्यासंबंधात भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ, खंड (२) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये अधिक लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक पालिका क्षेत्राची परिषद ही,— नगरपरिषद या नावाने ओळखली जाणारी यथोचितरित्या रचना करण्यात आलेली नगरपरिषद असल्याचे मानण्यात येईल ;

(२) पोट-कलम (१) मध्ये केलेल्या तरतुदींव्यतिरिक्त इतर बाबतीत, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ च्या खंड (२) मध्ये नमूद करण्यात आलेले घटक विचारात घेऊन राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणतेही स्थानिक क्षेत्र, अधिक लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करता येईल :

परंतु, राज्य शासनास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर,----

(क) अशा क्षेत्राची लोकसंख्या २५,००० पेक्षा कमी नाही ; आणि

(ख) अशा क्षेत्रातील कृषीतर कार्यक्रमातील रोजगाराची टक्केवारी पस्तीस टक्क्यापेक्षा कमी नाही, याबद्दल राज्य शासनाची खात्री पटल्याखेरीज असे कोणतेही क्षेत्र अधिक लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येणार नाही.

(२-क) पोट-कलम (२) खाली राज्य शासनाद्वारे अशाप्रकारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक अधिक लहान नागरी क्षेत्रासाठी . . . . . . . . नगरपरिषद या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका नगरपरिषदेची रचना करण्यात येईल. ]

---

[१] सन १९९५ चा अधिनियम क्रमांक ४५, कलम २ (क) अन्वये खंड (५४) जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १०९(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी पोट-कलम (१), (२) व (२-क) दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १०९ (क) द्वारे मूळ समासटीपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

(३) [१][पोट-कलम (२)] अन्वये अधिसूचना प्रकाशित करण्यापूर्वी, राज्य शासनाने, अशी अधिसूचना प्रकाशित करण्याचा शासनाचा हेतू जाहीर करणारी एक उद्घोषणा आणि उक्त प्रस्तावाबाबत ज्यांचे कोणतेही आक्षेप असतील अशा सर्व व्यक्तींस ते आक्षेप उक्त उद्घोषणा **राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासून [२][तीस दिवसांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीच्या] आत त्याबाबतच्या कारणांसह जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी सादर करण्यास सांगणारी अशी उक्त उद्घोषणा, **राजपत्रात** आणि अधिसूचनेत विनिर्दिष्ट करावयाच्या क्षेत्रात खप असलेल्या कमीत कमी एका वृत्तपत्रात देखील प्रकाशित करविली पाहिजे ;

तसेच, उद्घोषणेच्या मराठी प्रती, नगरपालिका क्षेत्र म्हणून जाहीर करावयाचे योजिलेल्या क्षेत्रांत ठळक ठिकाणीसुद्धा लावल्या पाहिजेत.

(४) असा सादर केलेला कोणताही आक्षेप जिल्हाधिकारी, वाजवी वेळेच्या आत राज्य शासनाकडे पाठवील.

(५) अशा प्रकारे कोणत्याही हरकती सादर करण्यात आल्या असल्यास, त्या राज्य शासनाच्या मते अपुऱ्या किंवा बेकायदेशीर असल्याशिवाय, वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही अधिसूचना काढता कामा नये.

[४][अधिक लहान नागरी क्षेत्रांचे] वर्गीकरण.

४. [३][ (१) राज्य शासन, प्रत्येक अधिक लहान नागरी क्षेत्राचे त्याच्या लोकसंख्येच्या आधारे, खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे 'अ' वर्ग, 'ब' वर्ग किंवा 'क' वर्ग म्हणून वर्गीकरण करील :—

(क) १,००,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे 'अ' वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल ;

(ख) ४०,००० पेक्षा अधिक असेल परंतु १,००,००० पेक्षा अधिक नसेल इतकी लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे 'ब' वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल ; आणि

(ग) ४०,००० इतकी किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे 'क' वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ, खंड (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये अधिक लहान नागरी क्षेत्रे म्हणून विनिर्दिष्ट केलेली, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९४ अंमलात येण्याच्या दिवशी अस्तित्वात असलेली पालिका क्षेत्रे किंवा परिषदा यांच्या, या अधिनियमाच्या अनुसूची एक मध्ये दर्शविलेल्या वर्गीकरणामध्ये राज्य शासनाने पोट-कलम (५) अन्वये यथोचितरित्या सुधारणा केलेली नसेल तर त्या वर्गीकरणावर परिणाम होणार नाही.] ;

१९९४ चा महाराष्ट्र ४१.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १०९ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १२ द्वारे "दोन महिन्यांच्या" या मजकुराऐवजी दाखल केला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ११० (ब) द्वारे पोट-कलम (१) व (२) दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ११० (क) द्वारे "नगरपालिका क्षेत्राचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][* * * *]

१९९४ चा महा. ४१ [२][(४) महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९४ अंमलात आल्यानंतर अधिक लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक क्षेत्राचे राज्य शासन तशाच प्रकारे वर्गीकरण करील आणि त्यासाठी, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अनुसूची एक मध्ये वेळोवेळी सुधारणा करील];

(५) प्रत्येक जनगणनेनंतर किंवा कोणत्याही नगरपालिका क्षेत्राच्या सीमांमध्ये कोणत्याही स्थानिक क्षेत्रांची भर पडल्याने किंवा ते त्यातून वगळण्यात आल्याने फेरफार केले असतील तेव्हा किंवा कोणतेही क्षेत्र नगरपालिका क्षेत्र असण्याचे बंद झाले असेल तेव्हा, या कलमान्वये केलेल्या वर्गीकरणाचे, राज्य शासनाने पुनर्विलोकन केले पाहिजे व त्यानुसार आवश्यक असेल तेथे अनुसूची एक मध्ये सुधारणा केली पाहिजे.

**५.** ज्या ज्या वेळी कलम ४ अन्वये नगरपालिका क्षेत्राचे वर्गीकरण बदलण्यात येईल त्या त्या वेळी, उक्त क्षेत्राचे ज्यात फेरवर्गीकरण करण्यात आले असेल अशा नगरपालिका क्षेत्राच्या वर्गास लागू असलेल्या या अधिनियमाच्या सर्व संबंधित तरतुदी, या अशा फेरवर्गीकरणाच्या दिनांकापासून, उक्त फेरवर्गीकरण केलेल्या नगरपालिका क्षेत्रास लागू होतील : नगरपालिका क्षेत्राच्या फेरवर्गीकरणाचा परिणाम.

परंतु, अशा फेरवर्गीकरणाच्या लगतपूर्वी रचना केलेल्या परिषदेच्या रचनेस अशा फेरवर्गीकरणामुळे बाधा येणार नाही आणि अशा फेरवर्गीकरणामुळे कलम १०, पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश हा, अशा आदेशाच्या दिनांकानंतर लगेच येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी अंमलात येईल.

**६.** (१) [३][कलम ३, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य] शासनाला **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे,— नगरपालिका क्षेत्राच्या सीमांमध्ये फेरफार करणे.

(क) त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असे स्थानिक क्षेत्र नगरपालिका क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी किंवा त्यातून वगळण्यासाठी नगरपालिका क्षेत्राच्या सीमांमध्ये फेरफार करता येईल;

(ख) एक नगरपालिका क्षेत्र तयार करण्यासाठी दोन किंवा अधिक नगरपालिका क्षेत्रांचे एकत्रीकरण करता येईल;

(ग) कोणत्याही नगरपालिका क्षेत्राचे दोन किंवा अधिक नगरपालिका क्षेत्रामध्ये विभाजन करता येईल;

(घ) नगरपालिका क्षेत्र अंतर्भूत असलेले कोणतेही संपूर्ण स्थानिक क्षेत्र हे नगरपालिका क्षेत्र म्हणून असण्याचे बंद होईल असे जाहीर करता येईल :

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ च्या कलम २ द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ११०(ब) द्वारे पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १११ द्वारे " राज्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, संबंधित नगरपरिषदेशी किंवा नगरपरिषदांशी आणि इतर स्थानिक प्राधिकरणे यांच्याशी विचारविनिमय केल्याशिवाय राज्य शासनाने, या पोट-कलमाच्या कोणत्याही खंडान्वये अशी कोणतीही अधिसूचना काढता कामा नये.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, कलम ३ च्या पोट-कलमे (३), (४) आणि (५) मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीचा आवश्यक त्या फेरफारांसह अवलंब केला पाहिजे.

## (२) नगरपालिका प्राधिकरणे व नगरपरिषदांची स्थापना

अधिनियमाच्या अंमलबजावणीचे काम सोपविलेली नगरपालिका प्राधिकरणे.

७. प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे काम सोपविलेली नगरपालिकेची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :—

(क) नगरपरिषद,

(ख) अध्यक्ष,

(ग) स्थायी समिती,

(घ) विषय समित्या असल्यास, त्या, [१] * * *

[२][(घघ) प्रभाग समितीची रचना करण्यात आली असेल त्याबाबतीत प्रभाग समिती ; आणि]

(ङ) मुख्य अधिकारी.

नगरपरिषदांची स्थापना व वगयद्याने संस्थापन.

८. [३][ कलम ३ अन्वये प्रत्येक अधिक लहान नागरी क्षेत्राकरिता रचना करण्यात आलेली किंवा रचना केल्याचे मानण्यात येणारी नगरपरिषद, ही एक ] "........................ नगरपरिषद " या नावाचा निगम निकाय असेल व तिची अखंड परंपरा असेल आणि तिची एक सामान्य मुद्रा असेल, तसेच तिला मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट करण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल, व उक्त नावाने तिच्या मुख्य अधिकाऱ्यामार्फत तिला दावा लावता येईल किंवा तिच्या विरूद्ध दावा लावता येईल.

९. [४][ (१) प्रत्येक परिषदेमध्ये,—

नगरपरिषदांची घडण.

(क) प्रभाग निवडणुकांमध्ये थेट निवडणुकीद्वारे निवडून देण्यात आलेले [५][ [६][* *] परिषद सदस्य] ; आणि

(ख) विहित करण्यात येईल अशा रीतीने नगरपरिषदेने नामनिर्देशित करावयाचे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान वा अनुभव असणारे असे, निवडून आलेल्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाहीत इतके किंवा पाच सदस्य यांपैकी जी कमी असेल तेवढ्या संख्येतील नामनिर्देशित परिषद सदस्यांचा समावेश असेल.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ११२(अ) द्वारे " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ११२(ब) द्वारे खंड (घघ) समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ११३ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ११४(अ) द्वारे पोट-कलमे (१) व (१-क) दाखल करण्यात आली.

[५] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १३ द्वारे " पालिका सदस्य " याऐवजी " अध्यक्ष व परिषद सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल. (७ सप्टेंबर, २००१ रोजी व तेव्हापासून)

[६] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ३ द्वारे " अध्यक्ष व " हा मजकूर वगळला.

(१-क) प्रत्येक परिषदेमध्ये, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग व स्त्रिया यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात येतील.]

(२) संचालकाने, वेळोवेळी, प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी राजपत्रात प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे,—

[१][ (क) निवडून आलेल्या परिषद सदस्यांची संख्या खालील तक्त्यानुसार निश्चित केली पाहिजे :—

**तक्ता**

| पालिका क्षेत्राचा वर्ग | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची संख्या |
|---|---|
| (एक) 'अ' वर्ग | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या ३८ असेल आणि १,००,००० पेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ८,००० लोकसंख्येकरिता, निवडून आलेला एक जादा परिषद सदस्य असेल, तथापि, अशा रीतीने निवडून आलेल्या परिषद सदस्यांची एकूण संख्या ६५ हून अधिक असणार नाही ; |
| (दोन) 'ब' वर्ग | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २३ असेल आणि ४०,००० हून अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ५,००० लोकसंख्येकरिता निवडून आलेला एक जादा परिषद सदस्य असेल. तथापि, अशा रीतीने निवडून आलेल्या परिषद सदस्यांची एकूण संख्या ३७ हून अधिक असणार नाही ; |
| (तीन) 'क' वर्ग | निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या १७ असेल आणि २५,००० हून अधिक असलेल्या लोकसंख्येपैकी प्रत्येक ३,००० लोकसंख्येकरिता निवडून आलेला एक जादा परिषद सदस्य असेल. तथापि, अशा रीतीने निवडून आलेल्या परिषद सदस्यांची एकूण संख्या २३ हून अधिक असणार नाही.] |

१९९४ चा महाराष्ट्र १५.

[२][ (ख) [३][ महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९३] याच्या प्रारंभानंतर घेण्यात येणाऱ्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रयोजनार्थ, थेट निवडणुकीने भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या [४][एक-तृतीयांश] (अनुसूचित जातींतील,

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ११४(ब)(एक) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (क) दाखल करण्यात आला.

[२] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ च्या कलम ६(ब)(एक) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (ख) दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ५(२)(अ)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ११४(ब)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][अनुसूचित जमातींतील व [२][नागरिकांच्या मागासवर्गातील ] स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) या तत्वावर, प्रत्येक वर्गाच्या नगरपालिका क्षेत्रांच्या बाबतीत स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या ] ]

(ग) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या काही जागा असल्यास, त्यांची संख्या निश्चित केली पाहिजे. मात्र, अशा संख्येचे, निवडून दिलेल्या पालिका सदस्यांशी असलेले प्रमाण, शक्य तेथवर, जवळजवळ, नगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यांच्या लोकसंख्येचे, त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण बसत असेल, तेवढेच असले पाहिजे;

[३][ अशा प्रमाणामधील अपूर्णांक, जर एक द्वितीयांपेक्षा कमी असेल तर तो दुर्लक्षित केला पाहिजे आणि जर तो एक द्वितीयांश किंवा त्याहून अधिक असेल तर त्या अपूर्णांकाची एक म्हणून गणना केली पाहिजे :]

[४][ परंतु, अशा जागा राखून ठेवताना, अशा प्रकारे राखून ठेवलेल्या एकूण जागांपैकी [५][एक-तृतीयांश] जागा अनुसूचित जाती, किंवा यथास्थिति अनुसूचित जमाती यांमधील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ; आणि जिथे [६][अनुसूचित जाती किंवा यथास्थिति अनुसूचित जमाती यांच्यासाठी केवळ एक जागा राखून ठेवली असेल तेथे, अनुसूचित जातींतील, किंवा यथास्थिति अनुसूचित जमातींतील स्त्रियांसाठी कोणतीही जागा राखून ठेवली जाणार नाही आणि जेथे ] अनुसूचित जाती किंवा यथास्थिति, अनुसूचित जमाती यांच्यासाठी केवळ दोन जागा राखून ठेवल्या असतील तेथे, त्या दोन जागांपैकी एक जागा अनुसूचित जाती किंवा यथास्थिति, अनुसूचित जमाती यांमधील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येईल] ;

[७][ (घ) प्रत्येक वर्गातील परिषदेच्या नगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत [२][नागरिकांच्या मागासवर्गासाठी ] राखून ठेवण्यात यावयाच्या जागांची संख्या ही, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९३ याच्या प्रारंभानंतर घेण्यात येणाऱ्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनासाठी थेट निवडणुकीद्वारे भरण्यात यावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या [८][ सत्तावीस टक्के] इतकी असेल :] १९९४ चा महाराष्ट्र १५.

परंतु, अशा प्रकारे जागा राखून ठेवताना, राखून ठेवावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या [५][ एक-तृतीयांश] जागा [२][नागरिकांच्या मागासवर्गातील] स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

[९][ * * * * * ]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम ५(२)(अ)(एक) द्वारे " व अनुसूचित जमातींच्या " या मजकुराऐवजी, हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम २(एक) द्वारे " इतर मागासवर्गांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

[३] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ४(ब) (दोन) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ च्या कलम ६(ब)(दोन) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ११४(ब)(तीन)(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ११४(ब)(तीन)(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम ५(२)(ब) द्वारे, खंड(घ) समाविष्ट करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २(२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यांत आला.

[९] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ३(२)(ब) द्वारे हे स्पष्टीकरण वगळण्यात आले.

(३) भारताच्या संविधानान्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांसाठी राज्यातील विधानसभेत जागा राखून ठेवण्याचे बंद झाल्यानंतर, पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या आदेशाद्वारे अशा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांसाठी जागा राखून ठेवण्याचे बंद होईल :

परंतु , या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे अशा कोणत्याही राखीव जागेवर निवडून आलेली कोणतीही व्यक्ती, पदाच्या ज्या मुदतीसाठी ती कायदेशीररीत्या निवडून आली असेल त्या मुदतीत, जागा राखून ठेवण्याची पद्धत बंद झाली, याच केवळ कारणावरून परिषद सदस्य म्हणून काम करण्यास अपात्र ठरणार नाही.

(४) पोट-कलम (२) खालील प्रत्येक आदेश, त्याच्या प्रसिद्धीच्या दिनांकानंतर लगेच येणाऱ्या नगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनासाठी अंमलात येईल.

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

[1][९-क. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा,यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आश्यक असेल.]

सन २००१ चा महा. २३.

## (३) निवडणुका आणि निवडून आलेल्या [2]* * * व नामनिर्देशित परिषद सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे

नगरपालिका क्षेत्राची प्रभागांमध्ये विभागणी आणि स्त्रिया, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी प्रभाग राखून ठेवणे.

**१०.** (१) [3][कलम ९ च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य निवडणूक आयुक्त, वेळोवेळी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी, असे क्षेत्र ज्या प्रभागामध्ये विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व विस्तार निश्चित करील आणि त्या किंवा तशाच आदेशाद्वारे, ज्यामध्ये, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी (अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या व नागरिकांच्या मागासवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागांसह) जागा राखून ठेवण्यात आल्या असतील असे प्रभागदेखील विनिर्दिष्ट करील. राज्य निवडणूक आयुक्त, नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता असा कोणताही आदेश संमत करताना, सर्व प्रभागांना अशा आरक्षणाचा लाभ मिळावा यांसाठी नगरपालिका क्षेत्रातील निरनिराळ्या प्रभागांमध्ये आळीपाळीने जागा राखून ठेवल्या आहेत याबद्दल खात्री करून घेईल :]

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ च्या कलम ८ द्वारे कलम ९-क समाविष्ट केला.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ११५ द्वारे "स्वीकृत" हा मजकूर वगळण्यात आला.

[3] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ४(१) द्वारे " राज्य निवडणूक आयक्ताने " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " विनिर्दिष्ट केले पाहिजे " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. ३१ मे, १९९४ रोजी व तेव्हापासून.

[१][परंतु, असा कोणताही आदेश प्रसिद्ध करण्यापूर्वी [२][राज्य निवडणूक आयुक्त], नगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी त्याने करण्याचे योजिलेल्या आदेशाचा मसुदा, त्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर, नगरपालिका कार्यालयात आणि त्यास योग्य वाटेल अशा नगरपालिका क्षेत्रातील इतर ठिकाणी, लावण्याची व्यवस्था करील आणि असा आदेश प्रसिद्ध करण्याचा आपला इरादा घोषित करणारी एक नोटीस, त्या क्षेत्रात खप असलेल्या निदान एका वृत्तपत्रात तरी प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील आणि तीद्वारे, नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून [३][सात दिवसांच्या आत,] पूर्वोक्त आदेशाच्या मसुद्याबाबत ज्या कोणत्याही व्यक्तीचे आक्षेप असतील ते त्यांच्या कारणांसह लेखी सादर करण्याबद्दल त्यांना सांगेल.]

[४][ * * * * * *]

[५][(२) प्रत्येक प्रभागातून केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, अशा आदेशाच्या दिनांकानंतर लगेच येणाऱ्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्यां प्रयोजनासाठी अंमलात येईल.

(४) ज्यांच्यासाठी [६][एखाद्या परिषदेत जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत अशा स्त्रियांना, किंवा अनुसूचित जातींच्या, अनुसूचित जमातींच्या किंवा [७][नागरिकांच्या मागासवर्गांच्या] व्यक्तींना] अशा परिषदेतील राखून ठेवण्यात न आलेल्या जागांपैकी एखाद्या जागेच्या निवडणुकीसाठी उभे राहण्यास व निवडून येण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे बाध येतो असे समजण्यात येणार नाही.

[८][(५) या अधिनियमाची पोट-कलमे (१) व (३) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सार्वत्रिक निवडणुकीनंतर, कलम ६, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये एखाद्या नगरपालिका क्षेत्राचा विस्तार करण्यात आल्यास, विस्तारित क्षेत्राच्या लोकांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी व्यवहार्य असेल तितक्या लवकर, निवडणूक घेण्यात येईल आणि पोट-कलम (१) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह या निवडणुकींना लागू होतील :

परंतु, या पोट-कलमान्वये विस्तारित क्षेत्रासाठी नव्याने रचना केलेल्या प्रभागांसह नगरपालिका क्षेत्रातील एकूण प्रभागांची संख्या ही, कलम ९ पोट-कलम (२) खंड (क) मधील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या निवडणुक प्रभागापेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, यो पोट-कलमान्वये नव्याने रचना करण्यात आलेल्या प्रभागांची लोकसंख्या इतर प्रभांगाच्या सरासरी लोकसंख्येपेक्षा अंशतः अधिक किंवा कमी होऊ शकेल :

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ च्या कलम ५(ब) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ११६(एक) द्वारे "जिल्हाधिकाऱ्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ च्या कलम १४(क) द्वारे "पंधरा दिवसांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ च्या कलम ७(ब) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले आणि सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम ६(१)(ब) द्वारे ते वगळण्यात आले.

[५] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ च्या कलम ४ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी दाखल केले.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ च्या कलम ६(१)(अ), (ब), (क) आणि ६(२) द्वारे "आणि अनुसूचित जमातीच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ३(१) द्वारे "इतर मागासवर्गांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला..

[८] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ४२ द्वारे पोट-कलम (५) व (६) जादा दाखल केले.

परंतु तसेच, या पोट-कलमान्वये नव्याने रचना करण्यात आलेल्या प्रभागांतून निवडून आलेल्या परिषद सदस्यांचा पदावधी नगरपरिषदेच्या कालावधी एवढाच असेल.

(६) नगरपरिषदेचा उर्वरित अवधी जर एक वर्षापेक्षा कमी असेल तर, पोट-कलम (५) अन्वये निवडणूक घेता येणार नाही ].

[१][ (१०-क) (१) नगरपरिषदांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्याच्या कामावर देखरेख ठेवणे, त्यासाठी निदेश देणे व नियंत्रण ठेवणे आणि अशा सर्व निवडणुका घेणे ही कामे राज्य निवडणूक आयुक्ताकडे निहित असतील. राज्य निवडणूक आयुक्त.

(२) राज्य निवडणूक आयुक्ताला, त्याच्या अधिकारांपैकी आणि कामांपैकी कोणतेही अधिकार व कामे आदेशाद्वारे आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाच्या उप जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्याकडे सोपवता येतील.

(३) हा अधिनियम किंवा नियम या अन्वये मतदार याद्या तयार करणे आणि नगरपरिषदेची निवडणूक घेणे यांसाठी नेमण्यात आलेले किंवा विशेष रीतीने नेमण्यात आलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी राज्य निवडणूक आयुक्ताच्या देखरेखेखाली, निदेशानुसार व नियंत्रणाखाली काम करतील.

(४) या अधिनियमामध्ये आणि नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य निवडणूक आयुक्ताला न्याय्य आणि नि:पक्षपाती निवडणुकांसाठी अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश अथवा निदेश काढता येतील.]

[२][ (१०-कक) निवडणुकीच्या वेळी मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयुक्त, त्यास योग्य वाटतील असे निदेश, मतदान केंद्राध्यक्षांना देऊ शकेल, आणि अशा निदेशांमध्ये, मतदारांना लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या तरतुदींअन्वये देण्यात आलेली छायाचित्रासहित ओळखपत्रे, त्यांनी मतदानाच्या वेळी सादर करण्याच्या सूचनांचाही समावेश असेल.] तोतयेगिरीस प्रतिबंध करण्यासाठी निदेश देण्याचा राज्य निवडणूक आयुक्ताचा अधिकार. (१९५१ चा ४३.)

[३][**११.** लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० याच्या तरतुदींअन्वये महाराष्ट्र विधानसभेसाठी तयार केलेली आणि राज्य निवडणूक आयुक्त सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करील अशा दिनांकाला, त्या त्या वेळी अंमलात असलेली महाराष्ट्र विधानसभा मतदार यादी ही, राज्य निवडणूक आयुक्ताकडून पालिका क्षेत्रातील निरनिराळ्या प्रभागांशी, अनुरूप असलेल्या निरनिराळ्या भागांमध्ये विभागण्यात येईल; आणि राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने अशा प्रकारे विभागणी केलेल्या व अधिप्रमाणित केलेल्या मतदार यादीच्या प्रत्येक भागाची मुद्रित प्रत ही प्रत्येक प्रभागाची प्रभाग यादी असेल.] मतदार यादी तयार करणे. (१९५० चा ४३.)

[४][ * * * * * *]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम ११७ द्वारे कलम १०-क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ च्या कलम ७ द्वारे कलम १०-कक समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ९ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम १० द्वारे कलम ११क व कलम ११ख वगळण्यात आले.

मतदानाचा हक्क.

**१२.** (१) [१][कलम ११] अन्वये ठेवलेल्या [२][मतदारांच्या यादीत] जिचे नाव असेल अशी प्रत्येक व्यक्ती, यादी ज्या प्रभागासंबंधी असेल त्या त्या प्रभागाच्या परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी मत देण्यास अर्ह असेल आणि जिचे नाव अशा यादीत नसेल अशी प्रत्येक व्यक्ती अशा निवडणुकीच्या वेळी मत देण्यास अर्ह असणार नाही.

(२) एखादी व्यक्ती ही कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, मत देण्यास अर्ह आहे किंवा यथास्थिति नाही हे या कलमान्वये ठरविण्याच्या प्रयोजनासाठी [१][कलम ११] अन्वये ठेवलेली मतदारांची यादी हा, निर्णायक पुरावा असेल.

मतदानाची रीत.

[३][**१३.** निवडणुकीच्या वेळी मतदान हे, मत पत्रिकेद्वारे गुप्त मतदान पद्धतीने किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे होईल आणि कोणतीही मते पत्रिकाद्वारे स्वीकारली जाणार नाहीत.]

मतदानावरील इतर निर्बंध.

**१४.** (१) कोणत्याही व्यक्तीस, तिचे नाव एकाहून अधिक प्रभागांच्या मतदारांच्या यादीत नोंदण्यात आले असले तरी, सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी एका प्रभागाहून अधिक प्रभागात मत देण्याचा हक्क असणार नाही व तिने एका प्रभागाहून अधिक प्रभागांत मत दिल्यास, तिची सर्व प्रभागांतील मते रद्द ठरतील.

(२) कोणत्याही व्यक्तीस, तिचे नाव एखाद्या प्रभागाच्या मतदारांच्या यादीत एकाहून अधिक वेळा नोंदण्यात आले असले तरी, त्याच प्रभागात कोणत्याही निवडणुकीच्या वेळी एकाहून अधिक वेळा मत देण्याचा हक्क असणार नाही, व तिने तसे मतदान केल्यास, त्या प्रभागातील तिची सर्व मते रद्द ठरतील.

[४][परिषद सदस्य होण्यासाठी अर्हता.]

**१५.** [५][ (१) [६][प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीसाठी किंवा पोट-निवडणुकीसाठी नामनिर्देशन करण्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या शेवटच्या दिनांकाला जिचे वय एकवीस वर्षांहून कमी नाही आणि] कलम ११ खाली ठेवलेल्या मतदार यादीत जिचे नाव समाविष्ट केले आहे अशी आणि या अधिनियमाखाली किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली, परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास जिला अनर्ह ठरविण्यात आले नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीत परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्ह असेल आणि [७][जी व्यक्ती, उपरोक्तानुसार एकवीस वर्षे वयाची नाही आणि] जिचे नाव अशा यादीत समाविष्ट केलेले नाही किंवा जिला परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास अनर्ह ठरविण्यात आले आहे अशी प्रत्येक व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीत परिषद सदस्य म्हणून, निवडून येण्यास अर्ह असणार नाही.]

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ च्या कलम ६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम १९ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम (१५) द्वारे कलम १३ ऐवजी दाखल केले.

[४] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ७(ब) द्वारे मूळ समास टीपेऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[५] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम २० अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[६] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम १२(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १२(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) एखादी व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, यथास्थिति, निवडून येण्यास अर्ह आहे किंवा नाही हे या कलमान्वये ठरविण्याच्या प्रयोजनासाठी, कलम ११ अन्वये तयार केलेली मतदारांची यादी ही पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीन, निर्णायक पुरावा असेल.

परिषद सदस्य होण्यासाठी अनर्हता.

**१६.** (१) पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती, निवडणुकीद्वारे, [१][ * * * ] किंवा नामनिर्देशनाद्वारे परिषद सदस्य होण्यास अर्ह असणार नाही :—

[२][(क) (एक) जिला त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये राज्य विधिमंडळाच्या निवडणुकांसाठी अशा प्रकारे अनर्ह ठरविण्यात आले असेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीस, तिच्या वयाला एकवीस वर्षे पूर्ण झाली असतील तर, तिचे वय पंचवीस वर्षांहून कमी आहे या कारणावरून अनर्ह ठरविले जाणार नाही.

(दोन) जिला महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा कायद्याअन्वये अशा प्रकारे अनर्ह ठरविण्यात आले असेल ; किंवा] ;

[३][(क) जिला भारतातील न्यायालयाने कोणत्याही अपराधासाठी सिद्धापराधी ठरविले असेल आणि जिला कमीत कमी दोन वर्षे कैदेची शिक्षा झालीं असेल, मात्र ज्या व्यक्तीच्या बाबतीत कैदेतून सुटका झाल्यापासून पाच वर्षांचा कालावधी किंवा राज्य शासनाने परवानगी दिली असेल अशा एखाद्या विवक्षित बाबतीत, त्याहून कमी कालावधी लोटलेला नसेल अशी व्यक्ती ; किंवा]

१९७४ चा महा. ४. १८६० चा ४५.

[४][ (क क) जिला, महाराष्ट्र नगरपालिका आणि इतर तरतुदी (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभानंतर, कोणत्याही वेळी, भारतीय दंड संहितेच्या कलम १५३-अ किंवा कलम ५०५ याच्या पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असेल व असा अपराध सिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी लोटलेला नसेल, अशी व्यक्ती ; किंवा,

१९५५ चा २२.

(क ख) जिच्यावर, अस्पृश्यता (अपराध) अधिनियम, १९५५ खालील शिक्षापात्र अपराध सिद्ध झाला असेल आणि जिला कोणत्याही मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल किंवा द्रव्यदंड झाला असेल व तिची सुटका झाल्यापासून [५][सहा वर्षांचा] कालावधी लोटलेला नसेल, अशी व्यक्ती ; किंवा

(क ग) जिला भारतातील न्यायालयाने नैतिक अध:पाताचा अंतर्भाव होईल अशा कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविले असेल व असा अपराध सिद्ध झाल्याच्या दिनांकापासून [५][सहा वर्षांचा] कालावधी लोटलेला नसेल, अशी व्यक्ती ; किंवा]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२०(अ) द्वारे " स्वीकृतीद्वारे " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२०(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३ अन्वये मूळ खंड (अ) ऐवजी हा खंड दिनांक १६ फेब्रुवारी १९७४ पासून नेहमीकरिता दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ) (दोन) अन्वये खंड (क क) ते (क ग) समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२०(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) कलम ४२ अन्यवे जिला पदावरून दूर करण्यात आले आहे व अशा रितीने पदावरून दूर केल्याच्या दिनांकापासून [१][सहा वर्षांचा] कालावधी जिच्या बाबतीत लोटलेला नाही अशी व्यक्ती; परंतु, अशा रीतीने पदावरून काढून टाकल्यामुळे प्राप्त होणाऱ्या अनर्हतेतून तिला राज्य शासनाने याबाबतीत दिलेल्या आदेशाद्वारे अगोदरच मुक्त करण्यात आले असेल तर गोष्ट वेगळी, किंवा

[२][(खक) कलम ५५ख अन्वये तरतूद करण्यात आलेला अनर्हता कालावधी व्यपगत झाला नसेल तर, परिषदेच्या अध्यक्षाचे किंवा उपाध्यक्षाचे पद धारण करीत असताना आपली कर्तव्ये पार पाडताना गैरवर्तणूक केल्याबद्दल दोषी असल्याचे दोषी आढळून आले असेल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तणुकीबद्दल दोषी असेल ;]

(ग) जी अमुक्त नादार आहे अशी व्यक्ती ; अथवा

(घ ) जी विकल मनाची आहे व सक्षम न्यायालयाने जिला विकल मनाची म्हणून घोषित केले आहे अशी व्यक्ती ; अथवा

(ङ) जिने स्वेच्छेने परदेशी राज्याचे नागरिकत्व संपादन केले आहे किंवा परदेशी राज्याशी निष्ठा ठेवण्याचे किंवा अनुषक्त राहण्याचे मान्य केले आहे अशी व्यक्ती, अथवा

(च) जी न्यायाधीश आहे, अथवा

(छ) जी शासनाचा किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा दुय्यम अधिकारी किंवा कर्मचारी असेल किंवा शासनाच्या अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधीन कोणतेही लाभपद धारण करीत असेल, अथवा

[३][ (छ-क) कोणत्याही शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अधीन कोणतेही पद धारण केले असताना तिला गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल— मग ते महाराष्ट्र नगरपालिका व इतर तरतुदी (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर असो— आणि तिच्या बडतर्फीपासून पाच वर्षांचा कालावधी लोटलेला नसेल अशी व्यक्ती ; किंवा ] १९७४ चा महाराष्ट्र ४.

(ज) नगरपरिषदेस (विश्वस्त या नात्याव्यतिरिक्त इतर रीतीने) तिच्याकडून देय असलेल्या कोणत्याही रकमेबद्दल कलम १५० अन्वये तिला बिल देण्यात आल्यानंतर तिच्याकडे अशा रकमेची थकबाकी असेल ; अथवा

[४][ (ज-क) जिने मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० अन्वये देय असलेली कोणतीही रक्कम— मग ती अधिभारित करण्यात आलेली असो वा आकारण्यात आलेली असो— प्रदान केलेली नसेल, अशी व्यक्ती ; किंवा ] १९३० चा मुंबई २५.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२०(क) द्वारे "पाच वर्षांचा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ कलम ११(१) द्वारे खंड (खक) समाविष्ट केला.

[३] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ कलम ७(अ) (तीन) अन्वये खंड (छ क) समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ६ द्वारे खंड (ज क) समाविष्ट करण्यात आला.

(झ) यात यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपरिषदेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपरिषदेच्या अधीन किंवा नगरपरिषदेने किंवा नगरपरिषदेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशी व्यक्ती ; अथवा

(ञ) यात यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास दिलेल्या किंवा त्याच्याकडून घेतलेल्या कोणत्याही कर्जाऊ रकमेच्या व्यवहारात जिचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशी व्यक्ती.

[१][(ट) जिला दोनपेक्षा अधिक मुले असतीलअशी व्यक्ती :

२००० चा महा. ४३.

परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडात यापुढे ज्याचा निर्देश अशा प्रारंभाचा दिनांक असा करण्यात आला आहे). दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाही.

**स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(दोन) मूल यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही.]

[२][(ठ) राज्य विधानमंडळाचा किंवा संसदेचा सदस्य असेल :

परंतु, विद्यमान सदस्याच्या सदस्यत्वावर, असा पालिका सदस्य म्हणून असलेला त्याचा चालू पदावधी समाप्त होईपर्यंत, या खंडातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा पालिका सदस्याने, दिनांक ७ ऑक्टोबर, २००१ पासून २० ऑक्टोबर, २००१ या, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषद (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २००१ च्या प्रसिद्धीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत केलेली कोणतीही कारवाई वैधरीत्या करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि उक्त कालावधीत या खंडान्वये त्याला अनर्ह ठरविण्यात आलेले होते, केवळ याच कारणावरून, अशा कारवाईस कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.]

---

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ५ द्वारे खंड (ट) जादा दाखल केला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १६ द्वारे खंड (ठ) जादा दाखल केला.

[१][ (ठ-क) एखाद्या व्यक्तीस, तिच्या पदावधीच्या काळात, [२][कलम ५५ख अन्वये किंवा] महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ च्या अन्वये परिषद सदस्य असण्यास अनर्ह ठरविण्यात आले असेल तर, ती व्यक्ती, असा परिषद सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल].

[३][ * * * * * *]

(२) जेव्हा एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास अनुसूची एकच्या भाग २ किंवा ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नगरपालिका क्षेत्रासाठी असलेल्या नगरपरिषदेचा परिषद सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात येईल तेव्हा, पोट-कलम (१), खंड (छ) [४][किंवा पोट-कलम (ठक)] मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

[५][ २-क) एखादी व्यक्ती, ही ज्या पदावर राज्य शासनाकडून नेमणूक करण्यात येत असेल अशा (सहकारी संस्थांच्या नोंदणीसंबंधात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये जी नोंदण्यात आली असेल किंवा नोंदण्यात आल्याचे मानण्यात येत असेल अशा) कोणत्याही सहकारी संस्थेच्या समितीच्या सभापतीचे किंवा सदस्याचे पद सहकारी संस्थाच्या निबंधकाकडून ज्या पदावरील नेमणूक करण्यात येते अशा, परिसमापकाचे किंवा सहपरिसमापकांचे पद किंवा निबंधकाच्या नामनिर्देशित व्यक्तीचे पद,— मग तिला व्यक्तिशः नेमण्यात आलेले असो किंवा नामनिर्देशित व्यक्तीच्या मंडळावर नेमण्यात आलेले असो,— धारण करीत आहे याच केवळ कारणावरून, अशी व्यक्ती पोट-कलम (१), खंड (छ) खाली अनर्ह ठरल्याचे मानण्यात येणार नाही ].

(३) कोणतीही व्यक्ती,—

(क) जिचा कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या कोणत्याही भाडेपट्ट्यात, विक्रीत किंवा खरेदीत किंवा त्याबाबत केलेल्या कोणत्याही करारात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे ; अथवा

(ख) जी कोणतीही कंपनी किंवा सहकारी संस्था नगरपरिषदेबरोबर संविदा करील किंवा अशा नगरपरिषदेकडून किंवा तिच्या वतीने नेमली जाईल त्या कंपनीत किंवा त्या संस्थेत तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे ; अथवा

(ग) नगरपरिषदेच्या कामकाजासंबंधी कोणतीही जाहिरात ज्यात देता येईल अशा कोणत्याही वृत्तपत्रात तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे ; अथवा

(घ) नगरपरिषदेने किंवा तिच्यावतीने उभारलेल्या कोणत्याही कर्जातील ऋणपत्रे ती धारण करते किंवा अशा कर्जात तिचा अन्यथा हितसंबंध आहे ; अथवा

(ङ) ती ज्या कोणत्याही वस्तूचा नियमितपणे व्यापार करीत असेल त्या वस्तूची कोणत्याही एका सरकारी वर्षात, दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या किंमतीपर्यंत

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ११ च्या अनुसूचीद्वारे पोट-कलम (ठक) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ११(२) द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

[३] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ९ द्वारे पोट-कलम (१ख) व (१ग) वगळले.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ११(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ च्या कलम ७(ब) अन्वये पोट-कलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

किंवा नगरपरिषद राज्य शासनाच्या मंजुरीने जास्तीतजास्त दहा हजार रुपयांपर्यंतची जी जास्तीची रक्कम याबाबत ठरवील त्या रकमेच्या किंमतीपर्यंत नगरपरिषदेस कधी कधी जी विक्री करण्यात येते त्या विक्रीत किंवा तितक्याच किंमतीपर्यंत नगरपरिषदेकडून कोणत्याही वस्तूची जी खरेदी करण्यात येते त्या खरेदीत तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे ; अथवा

(च) कोणत्याही एका सरकारी वर्षात, दोनशे रुपयाहून अधिक नसेल इतक्या रकमेस किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीने जास्तीतजास्त एक हजार रुपयांपर्यंतची जी जास्तीची रक्कम नगरपरिषद याबाबत ठरवील त्या रकमेस कोणतीही वस्तू नगरपरिषदेस कधी कधी भाड्याने देण्यात किंवा नगरपरिषदेकडून भाड्याने घेण्यात तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे ; अथवा

(छ) कोणत्याही कराराऐवजी निश्चित आकार देण्यासाठी किंवा ठोक रक्कम देण्यासाठी किंवा आपल्या जागेकरिता कोणतेही जलनि:सारणाचे किंवा पाण्याचे नळ बसविण्याकरिता नगरपरिषदेशी केलेल्या कोणत्याही करारात ती पक्षकार आहे ; अथवा

[१][(ज) नगरपरिषदेकडून किंवा नगरपरिषदेचे निवृत्तिवेतन घेत आहे ; अथवा

(झ) तिचा कोणताही नातेवाईक नगरपरिषदेकडे किंवा नगरपरिषदेकडून किंवा नगरपरिषदेच्या वतीने तिचा अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून नेमण्यात आलेला आहे ;]

या कारणावरून पोट-कलम (१) च्या खंड (झ) अन्वये अनर्ह ठरते असे समजले जाणार नाही.

(४) एखादी व्यक्ती, नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला जी सहकारी संस्था कर्जाऊ रक्कम देते किंवा जिने अशी रक्कम दिली आहे किंवा जी त्यांच्याकडून कर्जाऊ पैसे घेते किंवा जिने असे कर्जाऊ पैसे घेतले आहेत, अशा सहकारी संस्थेचा अधिकारी किंवा सदस्य आहे, याच केवळ कारणावरून ती पोट-कलम (१), खंड (च) अन्वये अनर्ह ठरते आहे, असे समजले जाणार नाही.

निवडणुकांच्या विनियमनासाठी नियम करण्याचा अधिकार.

**१७.** (१) राज्य शासनाला सामान्यत: या अधिनियमान्वये घ्यावयाच्या निवडणुकासंबंधीच्या बाबींची तरतूद करण्यासाठी किंवा त्यांचे विनियमन करण्यासाठी [२][राज्य निवडणूक आयुक्ताशी विचारविनिमय करून] नियम करता येतील.

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता, राज्य शासनाला [२][राज्य निवडणूक आयुक्ताशी विचारविनिमय करून] पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीच्या संबंधात नियम करता येतील :—

(क) मतदारांची यादी [३][ तयार करणे, प्रसिद्ध करणे व ती ठेवणे ],

[४][ * * * * * * ]

(ख) निवडणुकांच्या निरनिराळ्या टप्प्यांचे दिनांक, वेळा आणि जागा निश्चित करणे ;

(ग) निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष आणि निवडणुकांकरिता नेमण्यात येणारा इतर कर्मचारीवर्ग यांची नेमणूक आणि त्यांची कर्तव्ये ;

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम २ अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२१ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, च्या कलम ७ अन्वये " ठेवणे " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम २१ (१) अन्वये खंड (कक) वगळण्यात आला.

(घ) उमेदवारांचे नामनिर्देशन, नामनिर्देशनपत्राचा नमुना, नामनिर्देशनास हरकती घेणे, नामनिर्देशनपत्रांची छाननी आणि नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याविरूद्ध किंवा नाकारण्याविरूद्ध अपिले ;

(ङ) उमेदवारांनी ठेवावयाच्या अनामत रकमा आणि ज्या परिस्थितीत अशा अनामत रकमा उमेदवारांना परत करण्यात येतील किंवा जप्त करून नगरपरिषदेकडे जमा करण्यात येतील ती परिस्थिती ;

(च) उमेदवारांना चिन्हे नेमून देणे ;

(छ) उमेदवारी मागे घेणे ;

(ज) उमेदवारांच्या प्रतिनिधींची नेमणूक ;

(झ) मतपत्रिकेचा नमुना ;

(ञ) लढविलेल्या आणि न लढविलेल्या निवडणुकांमधील कार्यपद्धती ;

(ट) मतदारांच्या तोतयेगिरीला प्रतिबंध करण्यासाठी योजावयाचे उपाय ;

(ठ) मतनोंदणीची रीत ;

(ड) आक्षेपित आणि प्रदत्त मतांच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ढ) मतांची छाननी, मतमोजणी किंवा फेरमतमोजणी, निकाल जाहीर करणे आणि समसमान मते पडल्यास किंवा एकाहून अधिक प्रभागांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी परिषद सदस्य निवडून आल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ण) निवडणुकांच्या संबंधातील कागदपत्रांची अभिरक्षा व विल्हेवाट ;

(त) ज्या परिस्थितीत मतदान स्थगित करता येईल किंवा नव्याने घेता येईल ती परिस्थिती ;

(थ) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी निवडणुकीच्या संबंधातील इतर कोणतीही बाब.

[१][ * * * * * ]

निवडून न येणे.

**१८.** (१) एखाद्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये किंवा पोटनिवडणुकीमध्ये कोणत्याही प्रभागातून एकही परिषद सदस्य निवडून आला नाही तर त्या प्रभागातून परिषद सदस्य निवडून देण्यासाठी नवीन निवडणूक घेण्यात येईल.

[२][ * * * * ]

[३][ * * * * ]

निवडणुकीचे निकाल जाहीर करणे.

**१९.** (१) पोट-निवडणूक असेल तर, त्या प्रभागामधील मतमोजणी झाल्यानंतर, आणि नगरपरिषद क्षेत्रातील सार्वत्रिक निवडणूक असेल तर सर्व प्रभागांतील मतमोजणी झाल्यानंतर, [४][राज्य निवडणूक आयुक्त] निवडणुकीचा निकाल सोयीस्कर व शक्य असेल तितक्या लवकर, **राजपत्रात** प्रसिद्ध करील.

---

[१] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २१(२) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १२२(अ) द्वारे "आणि अशा" पासून "भरता येईल" पर्यंतचा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२२ (ब) द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२३(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ एखाद्या सार्वजनिक निवडणुकीच्या वेळी, कोणत्याही कारणासाठी एखाद्या प्रभागात किंवा कोणत्याही प्रभागात त्या प्रयोजनासाठी अगोदरच निश्चित केलेल्या दिनांकास मतदान घेता आले नाही परंतु, त्या दिनांकास दोन-तृतीयांशापेक्षा अधिक प्रभागात ते घेण्यात आले असले तर, उक्त प्रभागांतील मतमोजणी संपताच [२][राज्य निवडणूक आयुक्त] प्राप्त झालेले निकाल, शक्य तितक्या लवकर, **राजपत्रात** प्रसिद्ध करील आणि उरलेल्या प्रभागाच्या किंवा प्रभागाच्या बाबतीत तेथे मतदान घेण्यात आल्यानंतर व तेथील मतमोजणी संपल्यानंतर त्यांचे निकाल **राजपत्रात** प्रसिद्ध करील. प्रभागांच्या बाबतीत दोन-तृतीयांश संख्या ठरविताना अपूर्णांक लक्षात घेतला जाणार नाही. प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर **राजपत्रात** या पोट-कलमानुसार निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर किंवा यथास्थिति, निकालांच्या प्रथम प्रसिद्धीनंतर, नगरपरिषदेची रीतसर रचना झाली आहे, असे समजण्यात येईल.]

(२) एखादी व्यक्ती एकाहून अधिक प्रभागांमध्ये निवडून आली असेल तर, ती, पोट-कलम (१) अन्वये निकाल प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून [३][किंवा यथास्थिति, तदन्वये तिचे नाव समाविष्ट असलेला निकाल त्यानंतर प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून] सात दिवसांच्या मुदतीच्या आत, स्वतःच्या सहीची लेखी नोटीस [४][राज्य निवडणूक आयुक्ताच्या] स्वाधीन करून ज्या प्रभागात काम करण्याची तिची इच्छा असेल त्या प्रभागाची निवड करील आणि अशी निवड अंतिम असेल.

(३) अशी निवड करण्यात येईल तेव्हा, उरलेल्या प्रभागात किंवा प्रभागांमध्ये नवीन निवडणुका घेण्यासाठी आदेश देण्यात येईल.

[५][ (४) पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत, आपली पसंती कळविण्यास अशा व्यक्तीने कसूर केल्यास [२][राज्य निवडणूक आयुक्त], अशा प्रभागांपैकी ज्या प्रभागात अशा व्यक्तीने काम करावे तो प्रभाग चिठ्ठ्या टाकून ठरवील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल. उर्वरित प्रभागात किंवा प्रभागांमध्ये नवीन निवडणुका घेण्याबद्दल आदेश देण्यात येईल.]

[६][ * * * * * ]

[७][ * * * * * ]

[८][**२०.** (१) राज्य निवडणूक आयुक्त नामनिर्देशित परिषद सदस्यांची नावे देखील **राजपत्रात** प्रसिद्ध करील.] नामनिर्देशित परिषद सदस्यांची नावे प्रसिद्ध करणे.

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३(अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२३(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्याकलम १२३(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १२३(क) द्वारे पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

[६] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ अन्वये पोट-कलम (५) वगळण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये कलम १९-क वगळण्यात आले.

[८] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १२४ द्वारे मूळ कलम २० ऐवजी दाखल केले.

## (४) परिषद सदस्यांची निवडणूक [१]* * * किंवा नामनिर्देशन या बाबतीतील विवाद.

[२][ * * * ] परिषद सदस्यांची निवडणूक [१][* * *] किंवा नामनिर्देशन याबाबतीतील विवाद.

**२१.** [३][ (१) निवडणुकीतील उमेदवाराने किंवा निवडणुकीत मत देण्याचा हक्क असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने यथास्थिति कलम १९ किंवा २० अन्वये परिषद सदस्यांची नावे **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत जिल्हा न्यायालयाकडे विनंती अर्ज दाखल केल्याशिवाय, परिषद सदस्याच्या कोणत्याही निवडणुकीस [४][ * * * ] किंवा त्याच्या नामनिर्देशनास हरकत घेता येणार नाही.] ;

(२) अशा कोणत्याही विनंतीअर्जात—

(क) विनंती अर्जदाराचा ज्या महत्त्वाच्या गोष्टींवर भरवसा असेल त्या गोष्टीचे संक्षिप्त निवेदन असेल ;

(ख) ज्या कारणामुळे किंवा कारणांमुळे निवडणुकीस, [५][ * * * ] किंवा नामनिर्देशनास हरकत घेण्यात आली असेल ते कारण किंवा ती कारणे, पुरेशा तपशिलांसह देण्यात येतील ; आणि

(ग) विनंती-अर्जदार अशा विनंतीअर्जावर सही करील आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा ५.
१९०८ मध्ये वाद-प्रतिवादांची पडताळणी करण्यासाठी घालून दिलेल्या रीतीने त्यांची पडताळणी करण्यात येईल.

(३) विनंती-अर्जदारास पुढीलपैकी सर्व किंवा कोणतीही एक घोषणा केली जाण्याची मागणी करता येईल :—

(क) निवडून आलेल्या सर्व किंवा कोणत्याही उमेदवाराची निवडणूक रद्दबातल आहे, अथवा

(ख) निवडून आलेल्या सर्व किंवा कोणत्याही उमेदवाराची निवडणूक रद्दबातल असून तो स्वतः किंवा दुसरा कोणताही उमेदवार हा योग्य रीतीने निवडून आलेला आहे; अथवा

(ग) [६][ * * * ] नामनिर्देशित अशा सर्व किंवा कोणत्याही परिषद सदस्याचे [७][ * * * ] नामनिर्देशन हे रद्दबातल आहे.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२५ द्वारे " स्वीकृती " हा शब्द वगळण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ७(ब) द्वारे " अध्यक्ष धरून " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ७(अ) द्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२६(अ) द्वारे " त्याच्या स्वीकृतीस " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १२६(ब) द्वारे " स्वीकृतीस " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १२६(क)(दोन) द्वारे " स्वीकृत किंवा " हा मजकूर वगळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १२६(क)(एक) द्वारे " स्वीकृती किंवा त्याचे " हा मजकूर वगळण्यात आला.

(४) विनंती-अर्जदार आपल्या विनंती अर्जात उत्तरवादी म्हणून पुढील व्यक्तींना सामील करून घेईल :—

(क) विनंती-अर्जदाराने पोट-कलम (३), खंड (क) खालील घोषणा केली जाण्याची मागणी केली असेल तेव्हा, निवडून आलेला उमेदवार किंवा ज्यांच्या बाबतीत असे घोषित करण्याविषयी मागणी केलेली असेल असे उमेदवार,

(ख) विनंती-अर्जदाराने पोट-कलम (३), खंड (ख) खालील घोषणेबाबत मागणी केली असेल तेव्हा, विनंती-अर्जदाराव्यतिरिक्त निवडणूक लढविणारे सर्व उमेदवार,

(ग) विनंती-अर्जामध्ये, ज्यांच्याविरूद्ध कोणतेही भ्रष्ट किंवा बेकायदेशीर कृत्य केल्याबद्दल अभिकथने करण्यात आली असतील असा दुसरा कोणताही उमेदवार,

[१][(घ) विनंती-अर्जदाराने पोट-कलम (३), खंड (ग) अन्वये घोषणेबाबत मागणी केली असेल तेव्हा, ज्यांच्याबाबतीत अशा घोषणेची मागणी केली असेल असे नामनिर्देशित सर्व किंवा कोणतेही परिषद सदस्य आणि ज्या नगरपरिषदेने परिषद सदस्यास नामनिर्देशित केले असेल ती नगरपरिषद.]

(५) जिल्हा न्यायाधीश किंवा जिल्हा न्यायाधीशाकडून असे प्रकरण किंवा अशी प्रकरणे ज्यांच्याकडे सर्वसाधारणपणे पाठविण्यात येतात अशा सहाय्यक न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही न्यायाधीश अशा विनंती-अर्जाची चौकशी करून तो निकालात काढील.

(६) (क) ज्या विनंती-अर्जामध्ये त्याच प्रभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी म्हणून निवडण्यात आलेल्या परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या कायदेशीरपणाबद्दल आक्षेप घेण्यात आला असेल अशा पोट-कलम (१) खालील सर्व विनंती अर्जाची सुनावणी एकाच न्यायाधीशाकडून करण्यात येईल, आणि

(ख) ज्या विनंती-अर्जामध्ये त्याच प्रभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडण्यात आलेल्या एकाच परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या कायदेशीरपणाबद्दल आपेक्ष घेण्यात आला असेल अशा पोट-कलम (१) खालील सर्व विनंती अर्जाची सुनावणी एकत्रितपणे करण्यात येईल.

(७) अशा विनंती-अर्जाच्या न्यायचौकशीसाठी, न्यायाधीशास, —

(क) (कागदपत्रांचा) शोध व निरीक्षण ;

(ख) साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे व त्यांच्या खर्चाची रक्कम ठेव म्हणून ठेवण्यास सांगणे ;

(ग) दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे ;

(घ) साक्षीदारांची शपथेवर तपासणी घेणे ;

(ङ) स्थगनकाल मंजूर करणे ;

(च) शपथपत्रावर साक्षीपुरावा स्वीकारणे ; आणि

(छ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे ;

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १२६(ड) द्वारे मूळ खंड (ड) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

या बाबीसंबंधातील अधिकारांसह दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि, ज्या व्यक्तीचा साक्षीपुरावा त्यास महत्वाचा वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस स्वाधिकारे समन्स काढून बोलविता येईल व त्याची तपासणी करता येईल ; असा न्यायाधीश हा फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* याची कलमे ४८० व ४८२ च्या अर्थानुसार दिवाणी न्यायालय आहे, असे समजण्यात येईल. १८९८ चा ५.

(८) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, तडजोड करण्यासाठी किंवा मागे घेण्यासाठी करण्यात आलेला अर्ज किंवा फेरबदल किंवा दुरूस्ती करण्यासाठी केलेला असा अर्ज हा, खराखुरा असून तो संगनमताने करण्यात आलेला नाही याबद्दल न्यायाधीशाची खात्री झाल्याशिवाय तो,— १९०८ ५.

(क) कोणत्याही अर्जाबाबत तडजोड करण्यास किंवा तो अर्ज मागे घेण्यास ; किंवा

(ख) कोणत्याही वाद-प्रतिवादात फेरफार किंवा सुधारणा करण्यास, कोणत्याही व्यक्तीस परवानगी देणार नाही.

(९) न्यायाधीशास, त्यास आवश्यक वाटेल अशा चौकशीनंतर, योग्य तो आदेश देता येईल व त्याचा आदेश निर्णायक असेल.

(१०) विनंती-अर्जदाराने, निवडून आलेल्या उमेदवाराच्या निवडणुकीबद्दलच्या हरकतीखेरीज तो स्वत: किंवा अन्य कोणताही उमेदवार योग्य रीतीने निवडून आल्याचे जाहीर करावे अशी मागणी केली असेल, आणि—

(क) विनंती-अर्जदारास किंवा अशा इतर उमेदवारांस निवडून येण्यास पुरेशी अशी विधिग्राह्य मते मिळाली आहेत ; किंवा

(ख) निवडून आलेल्या उमेदवारास भ्रष्टाचारामुळे मते मिळाली नसती तर,—

विनंती-अर्जदारास किंवा अशा अन्य उमेदवारास निवडून येण्यास पुरेशी अशी विधिग्राह्य मते मिळाली असती

याबद्दल न्यायाधीशाची खात्री झाल्यास,

न्यायाधीशास, निवडून आलेल्या उमेदवारांची निवडणूक रद्द ठरवून विनंती-अर्जदार किंवा असा अन्य उमेदवार योग्य रीतीने निवडून आला असल्याचे जाहीर करता येईल : परंतु,—

(एक) अशा संगणनेच्या प्रयोजनासाठी, मत देण्यात किंवा मिळविण्यात कोणत्याही ज्ञात किंवा अज्ञात व्यक्तीने कोणताही भ्रष्टाचार केला आहे असे न्यायाधीशास आढळून आल्यास असे कोणतेही, मत विधिग्राह्य म्हणून विचारात घेतले जाणार नाही.

(दोन) अशा संगणनेनंतर, काही उमेदवारांना समसमान मते पडली असल्याचे आढळून आल्यास आणि एका मताची भर घातली असता उमेदवारापैकी एखाद्या उमेदवारास निवडून आल्याचे जाहीर केले जाण्याचा हक्क प्राप्त होत असेल तर, न्यायाधीश ठरवील त्या रीतीने त्याच्यासमोर चिठ्ठ्या टाकून, यथास्थिति निवडलेल्या एका किंवा अनेक उमेदवारांच्या नमूद करण्यात आलेल्या विधिग्राह्य मतांच्या एकूण संख्येत एका जादा मताची भर टाकण्यात येईल.

---

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा दोन) पहा.

(११) अर्जात एखाद्या भ्रष्टाचाराबद्दल कोणताही आरोप करण्यात आला असल्यास न्यायाधीश ज्या व्यक्ती, कोणत्याही भ्रष्टाचाराबद्दल दोषी असल्याचे न्यायचौकशीत सिद्ध झाले असेल अशा (उमेदवार असल्यास, ते धरून) सर्व व्यक्तींची नावे व उक्त भ्रष्टाचाराचे स्वरूप नमूद करणारा एक आदेश काढील आणि अशा कोणत्याही व्यक्तीस, आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांपेक्षा अधिक नसेल परंतु दोन वर्षांपेक्षा कमी नसेल अशा, तो आदेशात विनिर्दिष्ट करील एवढ्या मुदतीपर्यंत, परिषद सदस्य किंवा इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य होण्यास अनर्ह ठरवील :

परंतु,---

(क) अशा कोणत्याही व्यक्तीस, न्यायाधीशासमोर हजर राहण्याची व तिचे नाव अशा रीतीने का नमूद करण्यात येऊ नये याबद्दल कारण दर्शविण्याबद्दलची नोटीस देण्यात आल्याशिवाय; आणि

(ख) जर अशा नोटिशीस अनुसरून ती हजर राहिली तर, तिला न्यायाधीशाने, पूर्वीच ज्याची तपासणी केली असेल व ज्याने तिच्याविरूद्ध साक्ष दिली असेल अशा कोणत्याही साक्षीदाराची उलटतपासणी करण्याची, स्वतःच्या बचावार्थ साक्षीदार बोलाविण्याची व आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय ;

अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव अशा आदेशात नमूद करण्यात येणार नाही.

[१][(११-क) कलम ९, पोट-कलम (२), खंड (ख) किंवा (ग) याच्या तरतुदी किंवा कलम १७ खाली केलेले नियम अंमलात आणण्याचे काम सोपविण्यात आलेल्या अधिकाऱ्याने चूक केली आहे किंवा भ्रष्ट आचरणामुळे नसेल अशी नियमबाह्यता किंवा उपचारभंग घडून आला आहे याच केवळ कारणावरून, कोणत्याही निवडणुकीच्या विधिग्राह्यतेसंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आला तर, न्यायाधीश ती निवडणूक रद्द ठरवणार नाही.]

(१२) जर निवडून आलेल्या उमेदवाराकडून किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीकडून किंवा उमेदवारांच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून भ्रष्टाचार करण्यात आला आहे या कारणावरून, न्यायाधीशाने एखाद्या उमेदवाराची निवडणूक रद्द ठरविली असेल आणि पोट-कलम (११) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशात अशा उमेदवाराचे नाव समाविष्ट केले नसेल तर, न्यायाधीश, आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांपेक्षा अधिक नसेल, परंतु दोन वर्षांपेक्षा कमी नसेल अशा, तो आदेशात विनिर्दिष्ट करील एवढ्या मुदतीपर्यंत, असा उमेदवार, परिषद सदस्य किंवा इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य होण्यास अपात्र असल्याचे जाहीर करील.

(१३) देय असलेल्या खर्चाची एकूण रक्कम निश्चित करणारा आणि उक्त खर्च ज्या व्यक्तीने द्यावयाचा व ज्या व्यक्तीला द्यावयाचा ती व्यक्ती विनिर्दिष्ट करणारा आदेशही
१९०८ चा नायाधीशास देता येईल. असे खर्च हे, जणू ते दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खालील
५. दाव्यामध्ये मंजूर करण्यात आले असल्याप्रमाणे वसूल करण्याजोगे असतील.

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १०(ब) द्वारे पोट-कलम (११-क) समाविष्ट करण्यात आले.

## (५) भ्रष्टाचार व निवडणूकविषयक इतर अपराध

भ्रष्टाचार. **२२.** या अधिनियमांच्या प्रयोजनांसाठी पुढील कृत्य ही भ्रष्टाचार असल्याचे समजण्यात येईल :—

(१) लाचलुचपत म्हणजे,—

(क) उमेदवाराने, किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने,—

(क) एखाद्या व्यक्तीस एखाद्या निवडणुकीत उभे राहण्याबद्दल किंवा उभे न राहण्याबद्दल किंवा उमेदवारी मागे घेण्याबद्दल ; किंवा

(ख) एखाद्या मतदारास, निवडणुकीत मत देण्याबद्दल किंवा मत न देण्याबद्दल प्रवृत्त करण्याच्या हेतूने, कोणत्याही व्यक्तीस कोणतेही परितोषण म्हणून, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही देणगी देणे, देऊ करणे किंवा देण्याचे वचन देणे ; किंवा

(एक) एखाद्या व्यक्तीस उमेदवार म्हणून अशा प्रकारे उभे राहिल्याबद्दल किंवा उभे न राहिल्याबद्दल किंवा आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दल ; किंवा

(दोन) एखाद्या मतदारास, मत दिल्याबद्दल किंवा मत न दिल्याबद्दल दिलेले बक्षीस, होय ;

(ख) (क) एखाद्या व्यक्तीस उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी किंवा उभे न राहण्यासाठी किंवा उमेदवारी मागे घेण्यासाठी ; किंवा

(ख) कोणत्याही व्यक्तीस, आपल्या स्वतःकरिता किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकरिता, मत देण्यासाठी किंवा मत देण्यापासून परावृत्त करण्यासाठी, किंवा कोणत्याही मतदारास मत देण्यास किंवा मत देण्यापासून परावृत्त करण्यास किंवा कोणत्याही उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यास, प्रवृत्त करण्यासाठी किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्यासाठी ;

उत्तेजन म्हणून किंवा मोबदला म्हणून, कोणतेही परितोषण मिळणे, किंवा असे परितोषण मिळण्यासाठी झालेला करार, होय.

**स्पष्टीकरण.**— या खंडाच्या प्रयोजनाकरिता " परितोषण " ही संज्ञा, रकमेच्या स्वरूपातील परितोषण किंवा रकमेच्या स्वरूपात ज्याचा अंदाज करता येईल असे परितोषण एवढ्यापुरतीच मर्यादित नसून तीत सर्व प्रकारच्या नोकऱ्यांचा तसेच, ज्या कामासाठी मोबदला दिला जातो अशा सर्व प्रकारच्या कामांचा समावेश होतो. परंतु तीत, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी केलेल्या किंवा निवडणुकीसाठी खरोखर झालेल्या खर्चाच्या रकमेचा समावेश होत नाही.

(२) गैरवाजवी प्रभाव म्हणजे, उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही मतदानविषयक हक्काचा मुक्त वापर करण्याच्या कामी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या केलेला कोणताही हस्तक्षेप किंवा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न होय :

परंतु,—

(क) या खंडाच्या तरतुदीच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता, त्यात उल्लेखिलेली जी कोणतीही व्यक्ती,—

(एक) एखाद्या उमेदवारास किंवा एखाद्या मतदारास किंवा उमेदवाराचा किंवा मतदारांचा हितसंबंध असेल अशा एखाद्या व्यक्तीस सामाजिक बहिष्कृती आणि कोणत्याही जातीतून किंवा जमातीतून बहिष्कृत करणे किंवा काढून टाकणे यांसह कोणत्याही प्रकारे इजा करण्याची धमकी देईल ; किंवा

(दोन) एखाद्या उमेदवाराची किंवा एखाद्या मतदाराची, त्याच्यावर किंवा त्याचा हितसंबंध असेल अशा कोणत्याही व्यक्तीवर दैवी कोप होईल किंवा त्यास पिशाच्चबाधा होईल अशी समजूत करून देईल किंवा समजूत करून देण्याचा प्रयत्न करील तर,

ती, या खंडाच्या अर्थानुसार, अशा उमेदवाराच्या किंवा मतदाराच्या मतदानविषयक अधिकारस्वातंत्र्यात हस्तक्षेप करीत आहे असे समजण्यात येईल.

(ख) सार्वजनिक धोरण जाहीर करणे, किंवा सार्वजनिक कारवाई करण्याबद्दल अभिवचन देणे किंवा ज्यामध्ये मतदानाच्या अधिकारात हस्तक्षेप निर्माण करण्याचा उद्देश नसेल अशी केवळ कायदेशीर अधिकाराची अंमलबजावणी करणे, हे या खंडाच्या अर्थानुसार हस्तक्षेप असल्याचे समजण्यात येणार नाही.

(३) एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, त्या उमेदवाराच्या निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढविण्याकरिता किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर बाधक परिणाम होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला तिचा धर्म, वंश, जात, जमात किंवा भाषा यावरून किंवा धार्मिक प्रतीकांचा वापर किंवा त्यासंबंधीचे आवाहन किंवा राष्ट्रीय ध्वज किंवा चिन्ह यांसारख्या राष्ट्रीय प्रतीकाचा वापर किंवा त्यासंबंधीचे आवाहन, या कारणावरून, मत देण्याचे किंवा मत न देण्याचे आवाहन करणे.

(४) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, एखाद्या उमेदवाराच्या निवडणुकीतील यशाच्या संभाव्यतेस वाजवी रीतीने बाधक ठरणारे कोणत्याही उमेदवाराच्या वैयक्तिक चारित्र्यासंबंधातील किंवा वर्तणुकीसंबंधातील किंवा उमेदवारीसंबंधातील किंवा उमेदवारी मागे घेण्याच्या संबंधातील जे कोणतेही वस्तुस्थितीकथण खोटे असेल आणि ते खोटे असल्याबद्दल त्याचा विश्वास असेल किंवा ते खरे असल्याबद्दल त्याचा विश्वास नसेल, असे कोणतेही वस्तुस्थितीकथन प्रसिद्ध करणे.

(५) कोणत्याही उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, (स्वत: उमेदवार, त्याचे कुटुंबीय किंवा त्याचा प्रतिनिधी यांव्यतिरिक्त) कोणत्याही मतदारास कोणत्याही मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा तेथून दुसरीकडे नेण्यासाठी कोणतेही वाहन किंवा जलयान, पैसे देऊन किंवा अन्यथा भाड्याने घेणे किंवा मिळविणे :

परंतु, एखाद्या मतदाराने किंवा अनेक मतदारांनी त्यास किंवा त्यांना अशा मतदान केंद्राच्या किंवा मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागी नेण्यासाठी किंवा तेथून दुसरीकडे नेण्यासाठी सामाईक खर्चाने एखादे वाहन किंवा जलयान भाड्याने घेणे, हा जर अशा रीतीने

भाड्याने घेतलेले वाहन किंवा जलयान यांत्रिक शक्तीवर चालणारे नसेल तर, या खंडान्वये भ्रष्टाचार आहे, असे समजले जाणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणत्याही मतदाराने अशा कोणत्याही मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागी जाण्यासाठी किंवा तेथून परतण्यासाठी आपल्या स्वतःच्या खर्चाने कोणत्याही सार्वजनिक वाहतुकीच्या साधनाचा किंवा जलयानाचा किंवा कोणत्याही ट्रामगाडीचा किंवा आगगाडीच्या डब्याचा उपयोग करणे, हा या खंडान्वये भ्रष्टाचार आहे, असे समजले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.—** या खंडामधील "वाहन" या संज्ञेचा अर्थ, मार्ग परिवहनाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आलेले किंवा वापरता येऊ शकेल असे कोणतेही वाहन, असा होतो— मग असे वाहन यांत्रिक शक्तीवर किंवा अन्यथा चालणारे असो आणि ते इतर वाहने ओढण्यासाठी किंवा अन्यथा वापरण्यात येत असो.

(६) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने इतर कोणत्याही व्यक्तीने, शासनाच्या किंवा नगरपरिषदेच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीकडून उक्त उमेदवाराची निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढविण्यासाठी अशा व्यक्तीचे (मत देण्याव्यतिरिक्त) इतर कोणतेही सहाय्य मिळविणे किंवा प्राप्त करणे किंवा ते मिळविण्यासाठी किंवा प्राप्त करण्यासाठी अपप्रेरणा देणे किंवा प्रयत्न करणे.

निवडणुकीच्या दिवशी जाहीर सभांना मनाई.

**२३.** (१) कोणतीही व्यक्ती, एखाद्या प्रभागामध्ये ज्या दिनांकास किंवा दिनांकाना त्या प्रभागातील एखाद्या निवडणुकीकरिता मतदान घेण्यात येईल, त्या दिनांकास किंवा दिनांकास कोणतीही जाहीर सभा बोलाविणार, भरविणार, किंवा तीस हजर राहणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

निवडणुकीच्या सभेतील दंगली.

**२४.** (१) नगरपालिका क्षेत्राच्या कोणत्याही प्रभागातील निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आल्यानंतर, नगरपालिका क्षेत्रात घेण्यात येणाऱ्या निवडणुकीसंबंधातील कोणत्याही जाहीर सभेस हे कलम लागू असेल.

(२) ज्या जाहीर सभेस हें कलम लागू असेल, त्या सभेत, जी कोणतीही व्यक्ती, उक्त सभा जे कामकाज चालविण्यासाठी बोलावण्यात आली असेल असे कामकाज होऊ न देण्याच्या प्रयोजनासाठी गैरशिस्त रीतीने वागेल किंवा तसे वागण्यात इतरांस चिथावणी देईल त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल.

(३) एखादी व्यक्ती, पोट-कलम (२) खालील अपराध करीत आहे असा जर एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास रास्त संशय आला तर, त्यास, सभेच्या सभापतीने ताबडतोब त्या व्यक्तीचे नाव व पत्ता घेण्याची विनंती केली असल्यास, त्या व्यक्तीस तसे करण्यास भाग पाडता येईल आणि जर त्या व्यक्तीने अशा रीतीने आपले नाव व पत्ता सांगण्यास नकार दिला किंवा तो सांगितला नाही किंवा ती खोटे नाव किंवा पत्ता देत आहे असा उक्त पोलीस अधिकाऱ्यास रास्त संशय आला तर, त्या पोलीस अधिकाऱ्यास अधिपत्राशिवाय त्या व्यक्तीस अटक करता येईल.

**२५.** (१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रात ज्या दिनांकास, किंवा दिनांकांना मतदान घेण्यात येईल त्या दिनांकास, किंवा दिनांकांना अशा मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्रापासून शंभर मीटर अंतरातील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, पुढील पैकी कोणतेही कृत्य करणार नाही :—

मतदान केंद्रात किंवा त्याच्या जवळपास प्रचारास मनाई.

(क) मते मिळविण्यासाठी प्रचार करणे ; किंवा

(ख) कोणत्याही मतदारास मदत देण्याची आग्रहाची विनंती करणे ; किंवा

(ग) कोणत्याही विशिष्ट उमेदवारास मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे ; किंवा

(घ) निवडणुकीत मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे ; किंवा

(ङ) (अधिकृत नोटिशी व्यतिरिक्त) निवडणुकीसंबंधी कोणतीही नोटीस किंवा चिन्ह प्रदर्शित करणे.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**२६.** (१) कोणतीही व्यक्ती, ज्या दिनांकास किंवा दिनांकांना कोणत्याही मतदान केंद्रात मतदान घेण्यात येईल त्या दिनांकास किंवा दिनांकांना मतदानाकरिता मतदान केंद्रावर येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस त्रास होईल किंवा मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या व इतर व्यक्तींच्या कामात अडथळा येईल अशा रीतीने —

मतदान केंद्रात किंवा त्याच्या जवळपास गैरशिस्त आचरण केल्याबद्दल शास्ती.

(क) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेश द्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत, ध्वनिवर्धक ध्वनिक्षेप यांसारखे माणसाचा आवाज मोठा करण्यासाठी किंवा तो पुन्हा निर्माण करण्यासाठी कोणतेही साधन वापरणार किंवा चालविणार नाही ; किंवा

(ख) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेश द्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपास असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत ओरडणार नाही किंवा इतर प्रकारे गैरशिस्त आचरण करणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील किंवा त्याचे उल्लंघन करण्यात जाणूनबुजून मदत करील किंवा अपप्रेरणा देईल तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा किंवा दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) मतदान केंद्राध्यक्षास, एखादी व्यक्ती या कलमान्वये शिक्षापात्र अपराध करीत आहे किंवा तिने असा अपराध केला आहे असे वाटण्यास संयुक्तिक कारण असेल तर, त्यास अशा व्यक्तीस अटक करण्याबद्दल कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास निदेश देता येईल, आणि त्यानंतर तो पोलीस अधिकारी तिला अटक करील.

(४) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास पोट-कलम (१) च्या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होऊ न देण्यासाठी वाजवीरितीने आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील

आणि वाजवी रीतीने आवश्यक असेल अशा बळाचा वापर करता येईल आणि अशा उल्लंघनासाठी वापरण्यात आलेले कोणतेही साधन त्यास जप्त करता येईल.

मतदान केंद्रावर गैरवर्तणुकीबद्दल शास्ती.

**२७.** (१) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मतदान केंद्रावर मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळेत स्वत: गैरवर्तन करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाच्या कायदेशीर निदेशाचे पालन करणार नाही तिला, मतदान केंद्राध्यक्ष किंवा कामावर असलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने या बाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, मतदान केंद्रातून घालवून देऊ शकेल.

(२) एखाद्या मतदान केंद्रावर मत देण्याचा अन्यथा हक्क असलेल्या कोणत्याही मतदारास त्या केंद्रावर मत देण्याच्या संधीचा उपयोग करण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करण्यात येणार नाही.

(३) मतदान केंद्रातून अशा रीतीने घालवून देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने मतदान केंद्राध्यक्षाच्या परवानगीशिवाय मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश केला तर, तिला अपराध सिद्धझाल्यानंतर, तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा किंवा दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(४) पोट-कलम (३) खालील अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

निवडणुकीत बेकायदेशीर रीतीने वाहने भाड्याने घेणे किंवा प्राप्त करणे याबद्दल शास्ती.

**२८.** निवडणुकीत किंवा निवडणुकीच्या संबंधात कलम २२, खंड (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही भ्रष्टाचार केल्याबद्दल जर कोणतीही व्यक्ती दोषी असेल तर तिला, अपराध सिद्धझाल्यानंतर, दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

मतदानाची गुप्तता राखणे.

**२९.** (१) निवडणुकीत मतनोंदणीशी किंवा मतमोजणीशी संबंध असलेले कोणतेही काम करणारा प्रत्येक अधिकारी, लिपिक, प्रतिनिधी किंवा इतर व्यक्ती मतदानाची गुप्तता राखील व त्याकामी मदत करील आणि (कोणत्याही कायद्याद्वारे किंवा कायद्याअन्वये प्राधिकृत अशा एखाद्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त अशा गुप्ततेचा भंग करण्याच्या हेतूने कोणत्याही व्यक्तीस कोणतीही माहिती देणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्धझाल्यानंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा होईल किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकी संबंधातील अधिकारी वगैरेनी उमेदवारांच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणे.

**३०.** (१) निवडणुकीत निवडणूक-निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असलेली किंवा निवडणुकीसंबंधीचे कोणतेही काम करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने किंवा मतदान केंद्राध्यक्षाने एखादा अधिकारी किंवा लिपिक म्हणून नेमलेली कोणतीही व्यक्ती निवडणुकीचे काम चालविताना किंवा निवडणुकीसंबंधी व्यवस्था ठेवताना, एखाद्या उमेदवाराच्या निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढेल असे (मत देण्याव्यतिरिक्त अन्य) कोणतेही कृत्य करणार नाही ;

(२) वर उल्लेखिलेली कोणतीही व्यक्ती, आणि पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती,—

(क) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीने आपले मत द्यावे म्हणून तिचे मन वळविण्याचा ; किंवा

(ख) निवडणुकीत आपले मत देण्यापासून कोणत्याही व्यक्तीस परावृत्त करण्याचा ; किंवा

(ग) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीने मत देण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे वजन खर्च करण्याचा प्रयत्न करणार नाही.

(३) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्धझाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकीच्या संबंधातील अधिकृत कर्तव्यांचा भंग.

**३१.** (१) हे कलम लागू असलेली कोणतीही व्यक्ती वाजवी कारणाशिवाय, आपल्या अधिकृत कर्तव्याचा भंग करून कोणतेही कृत्य किंवा वर्जन केल्याबद्दल दोषी असेल तर तिला अपराध सिद्धझाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) असे कोणतेही पूर्वोक्त कृत्य किंवा वर्जन केल्याबद्दल अशा कोणत्याही व्यक्तीविरूद्ध नुकसानभरपाईसाठी कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कारवाई दाखल करण्यात येणार नाही.

(३) हे कलम ज्यांना लागू आहे अशा व्यक्ती म्हणजे; निवडणूक निर्णय-अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि, नगरपालिका मतदारांची यादी तयार करणे, उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे किंवा उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील कागदपत्रे स्वीकारणे किंवा कोणत्याही निवडणुकीत मतनोंदणी किंवा मतमोजणी करणे यासंबंधी कोणतेही काम करण्यासाठी नेमलेल्या व्यक्ती होत, आणि या कलमाच्या प्रयोजनांकरिता, "अधिकृत कर्तव्य" या शब्दप्रयोगाचा अर्थ, त्याप्रमाणे लावण्यात येईल ; परंतु, या शब्दप्रयोगात प्रस्तुत अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये लादण्यात आलेल्या कर्तव्यांव्यतिरिक्त इतर कर्तव्यांचा समावेश होणार नाही.

मतदान केंद्रातून मतपत्रिका काढून नेणे हा अपराध असणे.

**३२.** (१) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीत, मतदान केंद्रातून मतपत्रिका लबाडीने बाहेर घेऊन जाईल किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करील किंवा असे कोणतेही कृत्य करण्यात जाणूनबुजून सहाय्य करील किंवा त्यासाठी अपप्रेरणा देईल तिला, अपराध सिद्धझाल्यानंतर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) एखादी व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने तो केला असे मतदान केंद्राध्यक्षास मानण्यास संयुक्तिक कारण असेल तर, अशा अधिकाऱ्यास अशा व्यक्तीस, तिने मतदान केंद्र सोडून जाण्यापूर्वी अटक करता येईल किंवा तिला अटक करण्याविषयी एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास निदेश देता येईल; तसेच त्यास अशा व्यक्तीची झडती घेता येईल किंवा एखाद्या पोलीस अधिकाऱ्यांकडून तिची झडती घेवविता येईल :

परंतु, एखाद्या स्त्रीची झडती घेणे आवश्यक असेल तेव्हा, अशी झडती सभ्यतेचे काटेकोर पालन करून दुसऱ्या एखाद्या स्त्रीकडून घेण्यात येईल.

(३) अटक केलेल्या व्यक्तीजवळ झडतीमध्ये मतपत्रिका सापडल्यास, ती, मतदान केंद्राध्यक्ष सुरक्षित अभिरक्षेसाठी पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील किंवा अशी झडती पोलीस अधिकाऱ्याने घेतली असेल तर, ती मतपत्रिका तो अधिकारी सुरक्षित अभिरक्षेत ठेवील.

(४) पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

निवडणूक-विषयक इतर अपराध व त्याबद्दल शास्ती.

**३३.** (१) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही निवडणुकीत,—

(क) कोणतेही नामनिर्देशनपत्र लबाडीने खराब करील किंवा लबाडीने नष्ट करील ; किंवा

(ख) निवडणूक-निर्णय अधिकाऱ्याने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये चिकटविलेली कोणतीही यादी, नोटीस किंवा इतर कागदपत्र लबाडीने खराब करील, नष्ट करील किंवा काढून टाकील ; किंवा

(ग) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह लबाडीने खराब करील किंवा लबाडीने नष्ट करील ; किंवा

(घ) योग्य प्राधिकारांवाचून, कोणत्याही व्यक्तीस कोणतीही मतपत्रिका देईल किंवा, कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही मतपत्रिका स्वीकारील किंवा कोणतीही मतपत्रिका ताब्यात ठेवील ; किंवा

(ङ) कोणत्याही मतपेटीत कायद्यानुसार तिला जी टाकण्याचा अधिकार आहे अशा मतपत्रिकेव्यतिरिक्त इतर कोणतीही वस्तू लबाडीने टाकील ; किंवा

(च) निवडणुकीसाठी त्यावेळी उपयोगात असलेली कोणतीही मतपेटी किंवा मतपत्रिका, योग्य प्राधिकारावाचून नष्ट करील, घेईल, उघडील, किंवा अन्यथा तीत हस्तक्षेप करील ; किंवा

(छ) यथास्थिति, लबाडीने किंवा योग्य प्राधिकारावाचून वरीलपैकी कोणतेही कृत्य करण्याचा प्रयत्न करील किंवा अशी कृत्ये करण्यास जाणूनबुजून सहाय्य करील किंवा अपप्रेरणा देईल, ती व्यक्ती निवडणुकीसंबंधातील अपराध केल्याबद्दल दोषी ठरेल.

(२) या कलमाखालील अपराध केल्याबद्दल दोषी असलेली कोणतीही व्यक्ती,—

(क) जर ती मतदान केंद्रावरील निवडणूक-निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा, निवडणुकीच्यासंबंधात अधिकृत कर्तव्य बजावण्यासाठी नेमलेला कोणताही इतर अधिकारी किंवा लिपिक असेल तर तिला, अपराध सिद्धझाल्यानंतर, दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ख) जर ती इतर कोणतीही व्यक्ती असेल तर, तिला अपराध सिद्धझाल्यानंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मदतीच्या कैदेची शिक्षा, किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) निवडणुकीचे किंवा निवडणुकीच्या भागाचे काम चालविण्यात भाग घेणे तसेच मतमोजणी करणे किंवा निवडणुकीनंतर, उपयोगात आणलेल्या मतपत्रिका व अशा निवडणुकीसंबंधीची इतर कागदपत्रे याबद्दल जबाबदार असणे हे जर एखाद्या व्यक्तीचे कर्तव्य असेल तर, या कलमाच्या प्रयोजनाकरिता ती व्यक्ती " अधिकृत कर्तव्य " बजावीत आहे असे समजण्यात येईल ; परंतु, " अधिकृत कर्तव्य " या संज्ञेत या अधिनियमाद्वारे किंवा त्यानुसार लादण्यात आलेल्या कर्तव्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कर्तव्याचा समावेश होणार नाही.

(४) पोट-कलम (२), खंड (ख), अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध हा दखलपात्र अपराध असेल.

**३४.** [१][राज्य निवडणूक आयुक्ताच्या] आदेशाद्वारे किंवा प्राधिकारान्वये तक्रार करण्यात आली नसेल तर, कलम ३० किंवा कलम ३१ खाली किंवा कलम ३३, पोट-कलम (२), खंड (क) खाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल कोणतेही न्यायालय घेणार नाही.

विवक्षित अपराधांबाबत कार्यपद्धती.

## (६) निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी अधिग्रहण करण्याचा अधिकार

**३५.** (१) [२][राज्य निवडणूक आयुक्तास] (ज्याचा यापुढे " अधिग्रहण प्राधिकारी " असा उल्लेख केला आहे) एखाद्या निवडणुकीच्यासंबंधात जर असे दिसून आले की,—

निवडणुकीसाठी जागा, वाहन, इत्यादींचे अधिग्रहण.

(क) मतदान केंद्र म्हणून उपयोग करण्यासाठी किंवा मतदान घेण्यात आल्यानंतर मतपेट्या ठेवण्यासाठी कोणत्याही जागेची आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता असण्याचा संभव आहे ; किंवा

(ख) कोणत्याही मतदान केंद्राकडे किंवा मतदान केंद्रातून मतपेट्या नेण्यासाठी किंवा अशी निवडणूक चालू असताना सुव्यवस्था राखण्याकरिता पोलीस दलातील व्यक्ती नेण्यासाठी, किंवा अशा निवडणुकीच्या संबंधात कोणतीही कर्तव्ये बजावण्याकरिता कोणताही अधिकारी किंवा इतर व्यक्ती यांना नेण्यासाठी कोणतेही वाहन, जलयान, किंवा जनावर आवश्यक आहे किंवा त्याची आवश्यकता असण्याचा संभव आहे ;

तर अधिग्रहण प्राधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे, यथास्थिति, अशी जागा किंवा असे वाहन, जलयान किंवा जनावर यांचे अधिग्रहण करता येईल ; आणि अशा अधिग्रहणाच्या संबंधात त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे आणखी आदेश देता येतील :

परंतु, ज्या कोणत्याही वाहनाचा, जलयानाचा किंवा जनावराचा एखाद्या उमेदवाराकडून किंवा त्याच्या प्रतिनिधीकडून अशा उमेदवारांच्या निवडणुकीच्यासंबंधातील कोणत्याही प्रयोजनांसाठी कायदेशीरपणे उपयोग करण्यात येत असेल त्या वाहनाचे, जलयानाचे किंवा जनावरांचे अधिग्रहण अशा निवडणुकीतील मतदान पूर्ण होईपर्यंत, या पोट-कलमान्वये करण्यात येणार नाही.

(२) अधिग्रहण प्राधिकाऱ्याच्या मते जी व्यक्ती मालमत्तेचा मालक समजण्यात आली असेल तिच्या नावे किंवा मालमत्ता जिच्या कब्जात असल्याचे समजण्यात आले असेल त्या व्यक्तीच्या नावे लेखी आदेश काढून अधिग्रहण करण्यात येईल आणि ज्या व्यक्तीच्या नावे आदेश काढला असेल त्या व्यक्तीवर, कलम ३२५ अन्वये नोटीस बजावण्यासाठी विहित केलेल्या रीतीने, तो बजावला जाईल.

(३) ज्या व्यक्तीच्या नावे असा आदेश काढला असेल त्या व्यक्तीने अशा जागेचा किंवा अशा वाहनाचा, जलयानाचा किंवा जनावराचा कब्जा अधिग्रहण प्राधिकाऱ्यास किंवा आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर अधिकाऱ्यास देणे तिला बंधनकारक राहील.

(४) जेव्हा जेव्हा पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही मालमत्तेचे अधिग्रहण करण्यात येईल तेव्हा तेव्हा अशा अधिग्रहणाची मुदत, त्या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता अशी मालमत्ता ज्या मुदतीसाठी पाहिजे असेल त्या मुदतीपेक्षा अधिक असणार नाही.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२७ द्वारे "जिल्हाधिकाऱ्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२८ द्वारे "जिल्हाधिकाऱ्यास किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता "जागा" याचा अर्थ कोणतीही जमीन, इमारत किंवा इमारतीचा भाग असा असून तीत झोपडी, छपरी किंवा इतर संरचना किंवा तिचा कोणताही भाग यांचा समावेश होईल.

(५) जी कोणतीही व्यक्ती या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्धझाल्यानंतर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

भरपाई देणे.

**३६.** (१) निकटपूर्ववर्ती कलमास अनुसरून, अधिग्रहण प्राधिकारी कोणत्याही जागेचे किंवा कोणत्याही वाहनाचे, जलयानाचे किंवा जनावराचे अधिग्रहण करील तेव्हा नगरपालिका हितसंबंधित व्यक्तीस भरपाई देईल. अशा भरपाईची रक्कम अधिग्रहण प्राधिकारी पुढील गोष्टी विचारात घेऊन ठरवील :—

(क) जागेच्या बाबतीत—

(एक) अशा जागेबाबत दिले जाणारे भाडे किंवा कोणतेही भाडे द्यावे लागत नसेल तर त्या वस्तीमधील तशाच जागेसाठी द्यावे लागणारे भाडे ;

(दोन) जागेचे अधिग्रहण केल्यामुळे हितसंबंधित व्यक्तीस आपले निवासस्थान किंवा धंद्याचे ठिकाण बदलणे भाग पडले असेल तर, अशा बदलांच्या अनुषंगाने झालेला वाजवी खर्च (कोणताही असल्यास) ;

(ख) कोणत्याही वाहनाच्या, जलयानाच्या किंवा जनावराच्या बाबतीत असे वाहन, जलयान किंवा जनावर भाड्याने घेण्यासाठी त्या वस्तीमध्ये प्रचलित असलेली भाडी किंवा दर.

(२) जी कोणतीही हितसंबंधित व्यक्ती किंवा भरपाई मिळण्याचा हक्क आहे असा दावा सांगणारी जी कोणतीही व्यक्ती,—

(एक) भरपाईच्या ठरविलेल्या रकमेसंबंधी ; किंवा

(दोन) भरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्कासंबंधी ; किंवा

(तीन) दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये भरपाईच्या रकमेच्या संविभाजनासंबंधी ;

अधिग्रहण प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झाली असेल तर, तिला पोट-कलम (१) अन्वये दिलेला आदेश मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत, किंवा आदेश तिच्या नावे दिला नसेल तर, त्या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, जिल्हा न्यायालयाकडे अपील करता येईल आणि जिल्हा न्यायालयाने अशा अपिलावर दिलेला निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.**--- या कलमाच्या प्रयोजनासाठी "हितसंबंधित व्यक्ती" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(क) जागेच्या बाबतीत—

(एक) अधिग्रहणाच्या लगतपूर्वी ती जागा जिच्या प्रत्यक्ष कब्जात होती ती व्यक्ती, किंवा

(दोन) प्रत्यक्ष कब्जा असलेली कोणतीही व्यक्ती नसेल तेव्हा, अशा जागेचा मालक ;

(ख) कोणत्याही वाहनाच्या, जलयानाच्या किंवा जनावराच्या बाबतीत, त्याचा मालक ; आणि

(ग) ज्यास भरपाई मिळण्याचा हक्क असेल अशी इतर कोणतीही व्यक्ती,

असा आहे :

परंतु, अधिग्रहणाच्या निकटपूर्वी, कोणतेही वाहन किंवा जलयान भाडे-खरेदी करारान्वये, मालकाव्यतिरिक्त इतर व्यक्तीच्या कब्जात असेल तर, अधिग्रहणाच्या संबंधात द्यावयाची एकूण भरपाई ती व्यक्ती व मालक यांच्यामध्ये ते कबूल करतील अशा रीतीने संविभाजित करण्यात येईल आणि त्यांच्यात असे मतैक्य घडून न आल्यास, अधिग्रहण प्राधिकारी ठरवील अशा रीतीने संविभाजित करण्यात येईल.

**३७.** (१) कलम ३५ अन्वये कोणत्याही मालमत्तेचे अधिग्रहण करण्याच्या किंवा कलम ३६ अन्वये द्यावयाची भरपाई ठरविण्याच्या उद्देशाने अधिग्रहण प्राधिकाऱ्यास, आदेशाद्वारे, कोणत्याही व्यक्तीने अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याला, अशा मालमत्तेसंबंधी तिच्या ताब्यात असलेली विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी माहिती पुरविण्यास फर्माविता येईल. माहिती मिळविण्याच्या अधिकार.

(२) ज्या कोणत्याही व्यक्तीच्या नावे असा आदेश दिला असेल त्या व्यक्तीने अशी माहिती पुरविण्याचे नाकारले किंवा जाणूनबुजून खोटी माहिती पुरवली तर तिला, अपराध सिद्धझाल्यानंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**३८.** (१) कलम ३५ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून जी कोणतीही व्यक्ती, अधिग्रहण केलेली कोणतीही जागा आपल्या कब्जात ठेवील, तिला अधिग्रहण प्राधिकाऱ्याने याबाबत अधिकार दिलेला अधिकारी अशा जागेतून तडकाफडकी काढून टाकू शकेल. अधिग्रहण केलेल्या जागेतून काढून टाकणे.

(२) अशा रीतीने अधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, चारचौघांसमोर उघडपणे न वावरणाऱ्या कोणत्याही स्त्रीस वाजवी ताकीद दिल्यानंतर व निघून जाण्यास वाजवी सवलत दिल्यानंतर कोणतेही कुलूप किंवा अडसर काढून टाकता येईल किंवा उघडता येईल किंवा कोणत्याही इमारतीचे कोणतेही दार फोडून उघडता येईल किंवा अशा प्रकारे काढून टाकण्यासाठी आवश्यक अशी कोणतीही इतर कृती करता येईल.

**३९.** (१) कलम ३५ अन्वये अधिग्रहण केलेली कोणतीही जागा अधिग्रहणातून मुक्त करावयाची असेल तेव्हा, अधिग्रहणाच्या वेळी ज्या व्यक्तीकडून त्या जागेचा कब्जा घेण्यात आला होता त्या व्यक्तीच्या ताब्यात ती देण्यात येईल किंवा अशी कोणतीही व्यक्ती नसेल तर, जी अशा जागेचा मालक आहे असे अधिग्रहण प्राधिकाऱ्यास वाटेल त्या व्यक्तीच्या ताब्यात ती देण्यात येईल आणि अशा रीतीने जागा ताब्यात दिल्यावर अधिग्रहण प्राधिकारी हा, ती ताब्यात देण्यासंबंधी असलेल्या सर्व दायित्वातून मुक्त होईल. परंतु, त्यामुळे ज्या व्यक्तीच्या ताब्यात उक्त जागा अशा रीतीने देण्यात आली त्या व्यक्तीविरुद्ध अशा जागेच्या संबंधात योग्य कायदेशीर कार्यवाहीद्वारे जे हक्क बजावण्याचा इतर कोणत्याही व्यक्तीस हक्क असेल त्या हक्कास बाध येणार नाही. अधिग्रहणातून जागा मुक्त करणे.

(२) कलम ३५ अन्वये अधिग्रहण केलेल्या कोणत्याही जागेचा पोट-कलम (१) अन्वये ज्या व्यक्तीला ताबा द्यावयाचा असेल अशी व्यक्ती सापडत नसेल, किंवा तिच्याबद्दल तत्परतेने निश्चित माहिती मिळविणे शक्य नसेल किंवा तिच्यावतीने जागा ताब्यात घेण्यास अधिकारप्राप्त असा तिचा कोणताही अभिकर्ता किंवा इतर कोणतीही व्यक्ती नसेल तर अधिग्रहण प्राधिकारी एक नोटीस काढवून त्याद्वारे अशी जागा अधिग्रहणातून मुक्त केली आहे असे जाहीर करील व अशी नोटीस अशा जागेच्या एखाद्या ठळक भागावर लावण्याची व्यवस्था करील आणि **राजपत्रात** ती प्रसिद्ध करील.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेली नोटीस, **राजपत्रात** प्रसिद्ध केली जाईल तेव्हा अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली जागा, अशा प्रसिद्धीच्या दिनांकास व त्या दिनांकापासून अधिग्रहणाधीन असण्याचे बंद होईल आणि तिचा कब्जा मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीच्या ती स्वाधीन करण्यात आली आहे असे समजले जाईल आणि उक्त दिनांकानंतरच्या कोणत्याही कालावधीबद्दल अशा जागेच्या संबंधात कोणतीही भरपाई किंवा इतर मागणी या बाबतचे दायित्व अधिग्रहण प्राधिकारी किंवा नगरपालिका यांवर असणार नाही.

## [१][(७) परिषदेची मुदत आणि परिषद सदस्यांचा पदावधी]

परिषदेची मुदत.

[२][**४०.** प्रत्येक नगरपरिषद, तिच्या पहिल्या बैठकीसाठी नियत केलेल्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी चालू राहील. त्यापुढे ती चालू राहणार नाही ; मात्र, ती त्यापूर्वीच विसर्जित झाल्यास गोष्ट वेगळी.

(२) मुदत संपण्यापूर्वीच परिषद विसर्जित करण्यात आल्यामुळे घटित करण्यात आलेली परिषद, विसर्जित करण्यात आलेली परिषद अशा तऱ्हेने विसर्जित झाली नसती तर, पोट-कलम (१) अन्वये जेवढ्या मुदतीसाठी चालू राहिली असती, तेवढ्या उर्वरित मुदतीपुरतीच चालू राहील.]

परिषद सदस्यांचा पदावधी.

[३][**४१.** (१) परिषद सदस्यांचा पदावधी परिषदेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.

(२) परिषद सदस्यास कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्यास उद्देशून लिहिलेल्या, व्यक्तिशः स्वाधीन केलेल्या आणि जिल्हाधिकाऱ्यासमक्ष सही केलेल्या नोटिशीद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि केवळ नंतरच असा राजीनामा अंमलात येईल.

परिषदेची रचना करण्यासाठी निवडणूक.

**४१-क.** परिषदेची रचना करण्यासाठी घ्यावयाची निवडणूक ही,—

(क) कलम ४० च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली तिची मुदत समाप्त होण्यापूर्वी,

(ख) ती विसर्जित करण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी,

पूर्ण करण्यात येईल :

परंतु, विसर्जित परिषद ज्या कालावधीपर्यंत चालू राहिली असती तो उर्वरित कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असेल तर अशा कालावधीसाठी परिषदेची रचना करण्याकरिता या कलमान्वये कोणतीही निवडणूक घेण्याची आवश्यकता असणार नाही.]

परिषद सदस्य पदावरून दूर केले जाण्यासाठी पात्र ठरणे.

**४२.** (१) कोणताही परिषद सदस्य आपली कर्तव्ये बजावीत असता परिषद कोणतेही गैरवर्तन केल्याबद्दल, किंवा [४][त्याच्या परिषद सदस्य म्हणून चालू असलेल्या पदावधीमध्ये किंवा त्याच्या परिषद सदस्य म्हणून झालेल्या निकटपूर्ववर्ती पदावधीमध्ये देखील कोणतेही लज्जास्पद वर्तन केल्याबद्दल] दोषी ठरला असेल तर, राज्य शासनाला स्वतः होऊन किंवा नगरपरिषदेच्या शिफारशीवरून त्यास पदावरून दूर करता येईल.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२९ द्वारे मूळ उपशीर्षकाऐवजी हे उपशीर्षक दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३० द्वारे मूळ कलम ४० ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३१ द्वारे मूळ कलम ४१ ऐवजी नवीन कलम ४१ व ४१-क दाखल करण्यात आले.

[४] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) त्याचप्रमाणे कोणताही परिषद सदस्य राज्य शासनाच्या मते, परिषद सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये बजावण्यास असमर्थ झाला असेल तर, राज्य शासनाला अशा परिषद सदस्यास पदावरून दूर करता येईल.

[१][* * * * *]

(३) पोट-कलम (१) किंवा (२) च्या प्रयोजनांसाठी नगरपरिषदेने, कोणत्याही परिषद सदस्यास पदावरून दूर करण्याविषयी शिफारस करणारा कोणताही ठराव आणि राज्य शासनाने परिषद सदस्यास पदावरून काढून टाकण्यासंबंधीचा कोणताही आदेश, तो ज्या परिषद सदस्यांसंबंधी असेल त्या परिषद सदस्यास, यथास्थिति, अशी शिफारस का करण्यात येऊ नये किंवा असा आदेश का देण्यात येऊ नये याविषयी कारण दाखविण्याची वाजवी संधी दिल्यावाचून, संमत करण्यात येणार नाही किंवा देण्यात येणार नाही.

(४) राज्य शासनाने पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये एखादा आदेश दिल्यास तो परिषद सदस्य, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत पालिका सदस्य होण्यास किंवा कोणत्याही इतर स्थानिक प्राधिकरणाचा सभासद किंवा सदस्य होण्यास अनर्ह ठरेल.

राजीनाम्यामुळे परिषद सदस्याच्या त्यानंतर होणाऱ्या अपात्रतेस बाध न येणे.

**४३.** कलम ४१ अन्वये परिषद सदस्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असला तरी, जर त्यानंतर तो कलम ४२, पोट-कलम (१) अन्वये दोषी असल्याचे आढळून आले तर, राज्य शासनाला आपल्या आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीपर्यंत, त्यास परिषद सदस्य होण्यास किंवा कोणत्याही इतर स्थानिक प्राधिकरणाचा सभासद किंवा सदस्य होण्यास अनर्ह ठरविता येईल :

परंतु, कोणत्याही [२][* * * *] व्यक्तीस, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, अशा व्यक्तीविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

परिषद सदस्य त्याच्या पदावधीच्या काळात अनर्ह ठरणे.

**४४.** (१) एखादा परिषद सदस्य त्याच्या पदावधीत कोणत्याही वेळी,—

(क) कलम १६ चे पोट-कलम (१), खंड (ज) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनर्हतेव्यतिरिक्त त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अनर्ह असेल किंवा अनर्ह होईल तर ; किंवा

(ख) परिषद सदस्य म्हणून किंवा नगरपरिषदेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोट-कलम (३), खंड (क), (ख), (ग), (घ) व (ङ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल— मग अशा हिश्श्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो,— किंवा जीत त्याच्या अशिलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिकदृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील तर ; किंवा

(ग) कोणत्याही प्रकरणात तो नगरपरिषदेच्या बाजूने किंवा नगरपरिषदेविरुद्ध व्यावसायिकदृष्ट्या हितसंबंधित असेल किंवा गुंतला असेल तर ; किंवा

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ९ अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ४ अन्वये " व्यक्तीने राजीनामा दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर आणि अशा " हा मजकूर वगळण्यात आला.

(घ) त्याने अनुपस्थितीच्या परवानगीसाठी लेखी अर्ज केल्यानंतर नगरपरिषदेने ठरावाद्वारे अशी परवानगी दिली असेल त्याखेरीज तो नगरपरिषदेच्या सभांस लागोपाठ सहा महिने अनुपस्थित राहिला, [१][तर ; किंवा]

[२][(ङ) त्याने/तिने स्वतः त्याच्या बायकोने/तिच्या नवऱ्याने किंवा त्याच्या/तिच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीने, या अधिनियमाच्या किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या किंवा उक्त अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांच्या किंवा उप-विधींच्या तरतुदींचा भंग करून कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत संरचनात्मक बांधकाम केले असेल किंवा करीत असेल ; किंवा असे बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम करण्यास असा परिषद सदस्य या नात्याने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असेल किंवा या नात्याने त्याने त्याकामी मदत केलेली असेल किंवा कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याचे आपले पदीय कर्तव्य पार पाडणाऱ्या कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या कामात लेखी प्रत देऊन किंवा प्रत्यक्ष जागेवर जाऊन अडथळा आणला असेल किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केलेला असेल ;]

१९६६चा महा. ३७.

तर, त्यास त्याचे परिषद सदस्य म्हणून पद धारण करण्यास अनर्ह ठरविण्यात येईल आणि त्यास पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीन, परिषद सदस्य म्हणून चालू राहण्यास निःसमर्थ करण्यात येईल आणि त्याचे पद रिकामे होईल :

पंरतु,—

(एक) एखाद्या परिषद सदस्यास कोणतेही पारिश्रमिक न देता नगरपरिषदेच्या कामासाठी नेमण्यात आले असेल किंवा अशा परिषद सदस्याचा व्यवसाय विधी व्यवसायीचा असो वा नसो या अधिनियमान्वये न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे नगरपरिषदेविरुद्ध स्वतःचे प्रकरण चालविण्यासाठी तो उपस्थित राहिला व त्याने ते चालविले तर खंड (क) अन्वये त्यास अनर्ह ठरविण्यात येणार नाही.

(दोन) खंड (घ) च्या प्रयोजनासाठी ज्यावेळी एखादा परिषद सदस्य परवानगीसाठी अर्ज करील त्यावेळी, त्याने अर्ज केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत परवानगी नाकारण्यात आली नसेल तर, अशी परवानगी देण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(२) जेव्हा एखादा परिषद सदस्य— मग तो निवडून आलेला असो [३][* * *] वा नामनिर्देशित असो—पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या अनर्हतांपैकी कोणत्याही बाबतीत अनर्ह ठरत असेल त्यावेळी, मुख्य अधिकाऱ्याने त्यास त्या अनर्हतेविषयी कोणत्याही मार्गाने माहिती मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत जिल्हाधिकाऱ्याकडे त्याबाबत अहवाल सादर करणे हे त्याचे कर्तव्य राहील.

(३) एखादी जागा रिकामी झाली की नाही हे ठरविणारा प्राधिकारी प्रत्येक बाबतीत जिल्हाधिकारी असेल. जिल्हाधिकाऱ्यास, पोट-कलम (२) अन्वये मुख्य अधिकाऱ्याचा अहवाल मिळाल्यानंतर किंवा स्वतः होऊन किंवा एखाद्या मतदाराने त्यांच्याकडे अर्ज केला असता आपला निर्णय देता येईल आणि असा निर्णय संबंधित परिषद सदस्यास, मुख्य अधिकाऱ्यास आणि एखादा अर्जदार असल्यास, त्यास कळविण्यात येईल. जागा रिकामी झाली आहे असा निर्णय जिल्हाधिकारी देईपर्यंत आणि वर तरतूद केल्याप्रमाणे तो कळविण्यात येईपर्यंत असा परिषद सदस्य पद धारण करीत असण्याचे बंद झाले आहे असे समजण्यात येणार नाही.

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ४४(अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४४(ब) द्वारे खंड (ङ) द्वारे जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १३२(अ) द्वारे "स्वीकृत" हा मजकूर वगळला.

(४) जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि राज्य शासनाने अशा अपिलात दिलेले आदेश हे अंतिम असतील :

परंतु, कोणत्याही परिषद सदस्यास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यावाचून पोट-कलम (३) खाली जिल्हाधिकारी किंवा पोट-कलम (४) खाली केलेल्या अपिलात राज्य शासन त्याच्याविरुद्ध कोणताही आदेश देणार नाही.

**स्पष्टीकरण.—** जर निवडून आलेला [१] [* * * ] किंवा नामनिर्देशत केलेला कोणताही परिषद सदस्य त्याच्या निवडणुकीच्या वेळी [२][ किंवा नामनिर्देशित करण्याच्या वेळी,] कलम १६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अनर्ह असेल आणि तो अशा रीतीने अनर्ह असण्याचे चालू राहिले तर, या कलमाच्या प्रयोजनासाठी, ज्या मुदतीसाठी तो निवडून आला असेल [१] * * * किंवा त्यास नामनिर्देशित केले असेल त्या मुदतीमध्ये तो अनर्ह ठरल्याचे समजण्यात येईल.

**४५.** (१) (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासह) ज्या परिषद सदस्यांनी लगतपूर्वीच्या वर्षातील अनुक्रमे दिनांक १ एप्रिल, १ जुलै, १ ऑक्टोबर व १ जानेवारी रोजी त्यांच्याकडून नगरपरिषदेस देय असलेला कोणताही कर किंवा कोणतेही कर, ते देय झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत दिले नसतील अशा परिषद सदस्यांची एक यादी प्रत्येक वर्षाच्या दिनांक १५ एप्रिल, १५ जुलै, १५ ऑक्टोबर किंवा १५ जानेवारी रोजी मुख्य अधिकारी तयार करील आणि तो जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील, तसेच, अशा यादीत अशा प्रत्येक परिषद सदस्याकडून प्रत्येक करापोटी येणे असलेली रक्कम नमूद करील. अशा यादीची एक प्रत नगरपरिषदेच्या पुढील बैठकीसमोर ठेवण्यात येईल.

नगरपरिषदेस देय असलेले कर न दिल्यामुळे होणाऱ्या अनर्हतेसंबंधी विशेष तरतूद.

(२) त्याचवेळी मुख्य अधिकारी अशा यादीत समाविष्ट केलेल्या प्रत्येक परिषद सदस्यास, त्याच्याकडून येणे असलेला कर अशी नोटीस काढल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत देण्यास सांगणारी विहित नमुन्यातील एक विशेष नोटीस देईल.

(३) मुख्य अधिकारी लगेच येणाऱ्या मे, ऑगस्ट, नोव्हेंबर व फेब्रुवारी या महिन्यांच्या अखेरच्या दिवसापर्यंत, पुढील गोष्टी दर्शविणारे एक विवरणपत्र जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील,—

(एक) पोट-कलम (१) खाली तयार केलेल्या यादीत समाविष्ट केलेल्या प्रत्येक परिषद सदस्याचे नाव ;

(दोन) अशा प्रत्येक परिषद सदस्याकडून अशा प्रत्येक कराच्या रूपाने येणे असलेली कराची रक्कम आणि ती ज्या दिनांकास देय झाली असेल तो दिनांक ;

(तीन) पोट-कलम (२) खाली अशा परिषद सदस्यास दिलेल्या विशेष नोटिशीचा दिनांक ; आणि

(चार) परिषद सदस्याने दिलेली कराची रक्कम आणि काही उर्वरित रक्कम असल्यास ती न दिल्याची कारणे.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १३२(ब)(एक) द्वारे "त्यास स्वीकृत करून घेण्याच्या वेळी" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३२(ब)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) पोट-कलम (३) खाली विवरणपत्र मिळाल्यानंतर, जिल्हाधिकारी पोट-कलम (२) खालील नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास ज्याने कोणताही कर दिलेला नसेल अशा प्रत्येक परिषद सदस्याच्या नावे एक विशेष नोटीस काढील आणि अशा नोटिशीद्वारे, त्यास अनर्ह का ठरविण्यात येऊ नये आणि त्याचे पद रिकामे झाल्याचे का जाहीर करण्यात येऊ नये याबाबत, त्यास विशेष नोटीस काढल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत नमूद करण्यास फर्मावील. परिषद सदस्याने जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने कर न दिल्याबद्दलचे स्पष्टीकरण न दिल्यास, जिल्हाधिकारी अशा परिषद सदस्यास अनर्ह ठरविण्याविषयी आदेश काढील आणि त्यानंतर त्याचे पद रिकामे होईल :

परंतु, परिषद सदस्याची आर्थिक परिस्थिती किंवा त्याने पोट-कलम (४) खालील नोटीस मिळाल्यानंतर थकबाकी दिलेली होती ही गोष्ट या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी समाधानकारक स्पष्टीकरण म्हणून समजण्यात येणार नाही.

(५) जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, जिल्हाधिकाऱ्याचा आदेश ज्या दिनांकास तिला मिळाला असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि अशा अपिलात राज्य शासनाने दिलेले आदेश अंतिम असतील :

परंतु, देय कराची रक्कम नगरपरिषदेच्या कार्यालयात जमा करण्यात आल्याखेरीज राज्य शासन कोणतेही अपील दाखल करून घेणार नाही.

(६) अशा रीतीने अनर्ह ठरविण्यात आलेल्या परिषद सदस्याने, त्याच्या अनर्हतेच्या दिनांकानंतर स्वत: होऊन अशी देय रक्कम दिली असली तरी किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये घालून देण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार त्याच्याकडून अशी देय रक्कम वसूल करण्यात आली असली तरी, अशा परिषद सदस्यास, त्यास अनर्ह ठरविण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी परिषद सदस्य होण्यास किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सभासद किंवा सदस्य होण्यास अनर्ह ठरविण्यात येईल.

कलम ४५ मुळे नगरपरिषदेच्या कर वसूल करण्याच्या इतर अधिकारास बाध न येणे.

**४६.** लगतपूर्वीच्या कलमातील कोणत्याही गोष्टींमुळे कोणत्याही परिषद सदस्याकडून देय कराची रक्कम या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही इतर रीतीने वसूल करण्याच्या नगरपरिषदेच्या अधिकारास बाध येते, असे समजण्यात येणार नाही.

परिषद सदस्य असण्याचे बंद झाल्यास परिषद सदस्याने सर्व अधिकार पदे सोडून देणे.

**४७.** एखादी व्यक्ती कोणत्याही कारणावरून परिषद सदस्य असण्याचे बंद झाली असेल तर ती परिषद सदस्याच्या नात्याने तिने धारण केलेली सर्व अधिकार पदे वस्तुत: सोडून देईल.

**४८.** (१) निवडून आलेल्या [१][* * *] किंवा नामनिर्देशित परिषद सदस्याने आपल्या अधिकारपदाचा स्वीकार न केल्यामुळे किंवा अशी व्यक्ती परिषद सदस्य होण्यास किंवा परिषद

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १३३(अ)(एक) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

सदस्य म्हणून चालू राहण्यास अनर्ह ठरल्यामुळे किंवा कोणतीही निवडणूक कलम २१ च्या तरतुदींन्वये रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे किंवा परिषद सदस्य त्याचा पदावधी संपण्यापूर्वी मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यास पदावरून दूर करण्यात आल्यामुळे किंवा तो निःसमर्थ झाल्यामुळे, एखादी जागा रिकामी झाली तर ती जागा जर तो परिषद सदस्य निवडणुकीद्वारे निवडून आला असेल तर पोट-निवडणूक घेऊन [१][* * *] किंवा जर तो नामनिर्देशित करण्यात आला असेल तर, नामनिर्देशित करून भरण्यात येईल :

नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात.

[२][परंतु, जागा रिकामी झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार असतील तर, तात्पुरती रिकामी झालेली जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही किंवा त्याजागी [१][* * *] कोणाचे नामनिर्देशन करण्यात येणार नाही. ]

(२) मुख्य अधिकारी परिषद सदस्याच्या रिकाम्या होणाऱ्या प्रत्येक पदाबाबत, ते रिकामे झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत किंवा त्याबाबत त्यास ज्यावेळी माहिती मिळाली असेल त्या वेळेपासून पंधरा दिवसांच्या आत, यापैकी जी मुदत नंतरची असेल त्या मुदतीत [३][राज्य निवडणूक आयुक्तास] कळवील.

[४][* * * * *]

## प्रकरण तीन

## नगरपरिषद व नगरपालिका कार्यकारी अधिकारी यांची कर्तव्ये व कामे

### (१) नगरपरिषदेची आवश्यक कर्तव्ये आणि स्वेच्छाधीन कामे

**४९.** (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त, एखाद्या नगरपालिका क्षेत्राच्या नगरपालिकेचे शासन नगरपरिषदेकडे निहित असेल.

नगरपरिषदेची कर्तव्ये आणि कामे.

(२) हा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात आलेला कोणताही इतर कायदा याद्वारे किंवा त्यान्वये तिच्यावर लादण्यात आलेल्या कर्तव्याशिवाय नगरपालिका क्षेत्राच्या सीमेतील पुढील कामे आणि जेव्हा परिणामकारक उपाययोजना करणे अन्यथा शक्य नसेल तेव्हा, उक्त सीमेबाहेरील पुढील कामे हाती घेणे आणि त्या विषयासाठी वाजवी तरतूद करणे हे प्रत्येक नगरपरिषदेचे कर्तव्य असेल :—

(क) सार्वजनिक रस्ते, जागा व इमारती यांठिकाणी दिवाबत्ती करणे ;

[६][(कक) सामाजिक व आर्थिक विकासाचे नियोजन करणे ;

(कख) नागरी वनीकरण, पारिस्थितिकी संरक्षण व पर्यावरणीय घटकांना चालना;]

(ख) सार्वजनिक रस्त्यांवर आणि जागांवर पाणी शिंपडणे ;

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १३३(अ)(दोन) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २ अन्वये हे परंतुक मूळ मजकुराऐवजी दिनांक ६ मे १९७२ रोजी दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ च्या कलम १३३(ब) द्वारे जिल्हाधिकाऱ्यास या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १३४ द्वारे कलम ४८-अ वगळण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १३५(अ) द्वारे खंड (कक) व खंड (कख) हा खंड दाखल करण्यात आला.

(ग) सार्वजनिक रस्ते, जागा आणि मलप्रणाल साफ करणे आणि खाजगी मालमत्ता नसलेल्या व सार्वजनिक उपभोगासाठी खुल्या असलेल्या सर्व जागा साफ करणे— मग अशा मोकळ्या जागा नगरपरिषदेकडे निहित असोत किंवा नसोत— ; आणि अपायकारक झाडे-झुडपे काढून टाकणे आणि सर्व सार्वजनिक उपद्रव नाहीसे करणे ;

[१][(घ) आगी विझवणे आणि आग लागल्यास तिच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे यासाठी योग्य त्या उपकरणांनी सज्ज अशी अग्नीशमन यंत्रणा बाळगणे];

(ङ) पीडादायक किंवा विघातक व्यवसाय किंवा प्रथा यांचे विनियमन करणे किंवा त्या नाहीशा करणे ;

(च) सार्वजनिक रस्ते किंवा जागा आणि खाजगी मालमत्ता नसलेल्या व लोकांच्या उपभोगासाठी खुल्या असलेल्या रिकाम्या जागा यांवरील अडथळे व पुढे आलेले भाग काढून टाकणे-- मग अशा जागा नगरपरिषद किंवा शासन यांच्याकडे निहित असोत वा नसोत ;

(छ) धोक्याच्या इमारती किंवा जागा सुरक्षित करणे किंवा काढून टाकणे, आणि अनारोग्यकारक वस्त्यांमध्ये सुधारणा करणे ;

(ज) मृतांची विल्हेवाट लावण्यासाठी जागा संपादन करणे, त्याची व्यवस्था ठेवणे, त्या बदलणे आणि त्यांचे विनियमन करणे ;

(झ) सार्वजनिक रस्ते, नाल्या, नगरपालिका सीमाचिन्हे, बाजार, कत्तलखाने, शौचकूप, संडास, मुत्र्या, मलप्रणाल, जलनि:स्सारणाची कामे, मलप्रणालाची कामे, स्नानाची ठिकाणे, धुण्याची ठिकाणे, पिण्याच्या पाण्याची कारंजी, तळी, विहिरी, धरणे, व तत्सम बाबी बांधणे, त्यात फेरफार करणे व त्याची व्यवस्था ठेवणे ;

(ञ) पाणीपुरवठा किंवा जादा पाणीपुरवठा वाजवी किंमतीला मिळण्याची शक्यता असेल तेव्हा, विद्यमान अपुऱ्या किंवा हानिकारक पाणीपुरवठ्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यास धोका पोहचू नये यासाठी योग्य व पुरेसा पाणीपुरवठा किंवा जादा पाणीपुरवठा करणे ;

(ट) रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे ;

(ठ) जन्म व मृत्यू यांची नोंद ठेवणे ;

(ड) सार्वजनिक लस टोचणी ;

(ढ) पशूंच्या लसिकेचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही वासरे, गायी किंवा म्हशी यांच्यासाठी नगरपालिका क्षेत्रात योग्य जागा ठरविणे ;

(ण) सार्वजनिक दवाखाने उघडणे व त्यांची व्यवस्था ठेवणे आणि सार्वजनिक वैद्यकीय मदतीची तरतूद करणे व [२][कुटुंब नियोजन केंद्र चालविणे, लोकसंख्या नियंत्रण, कुटुंब कल्याण याबाबींना चालना देणे तसेच छोट्या कुटुंबाची प्रमाणके ठरवून देणे] ;

(त) प्राथमिक शाळा उघडणे व त्या चालवणे ;

(थ) राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे नगरपरिषदेस सादर करण्यास भाग पाडील त्याप्रमाणे नगरपालिका क्षेत्रांच्या नगरपालिका प्रशासनावरील वार्षिक अहवाल छापणे ;

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ च्या कलम २ द्वारे मूळ खंड (घ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ७(अ) द्वारे " कुटुंब नियोजन केंद्र चालविणे " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(द) जिल्हाधिकाऱ्याकडून मान्य होईल अशा प्रकारची व अशा स्थितीतील नगरपालिका क्षेत्राच्या सीमा किंवा अशा सीमांतील कोणताही फेरफार निर्धारित करणारी महत्त्वाची सीमाचिन्हे उभारणे ;

[१][(द-क) नगरपालिका क्षेत्रातील टोपलीच्या शौचकूपांचे पाण-शौचकूपात रुपांतर करणे ] ;

(ध) मैला आणि केरकचरा यांची विल्हेवाट लावणे व राज्य शासनाने असा मैला आणि केरकचरा यांपासून मिश्र खत तयार करण्यास भाग पाडल्यास तसे करणे.

[२][(ध-एक क) कोणतीही व्यक्ती, नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही भागात, एका जागेहून किंवा ठिकाणाहून, दुसऱ्या कोणत्याही जागी किंवा ठिकाणी मैला नेण्यासाठी किंवा त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी, तो डोक्यावरून वाहून नेण्यास दुसऱ्या व्यक्तीला भाग पाडणार नाही किंवा तशी सक्ती करणार नाही आणि कोणतीही व्यक्ती तसे करणार नाही याची निश्चिती करणे ;].

[३][(ध-क) नगरपरिषदेच्या सफाई कामगारांच्या राहणीमानाच्या व काम करण्याच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा उपाययोजना हाती घेणे.]

[४][(ध-ख) नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत राहणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांच्यासाठी कल्याणकारी उपाययोजना आणि विशेषतः या वर्गाची स्थिती सुखावह करण्यासाठी राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा उपाययोजना करणे].

(न) घातक किंवा सांसर्गिक रोगाने आजारी असलेल्यांसाठी विशेष वैद्यकीय सहाय्य व राहण्यासाठी जागा यांची तरतूद करणे आणि अशा रोगाच्या उद्रेकास प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्याला आळा घालण्यासाठी व तो पुन्हा उद्भवू नये यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करणे ;

(प) नगरपालिका क्षेत्रांच्या सीमेत टंचाईच्या वेळी सहाय्य देणे आणि निराश्रित लोकांसाठी अशा वेळी दुर्भिक्ष निवारक कामे सुरू करणे व ती चालू ठेवणे ;

(फ) कलम १०५ मध्ये विनिर्दिष्ट केलेले सक्तीचे कर लादणे.

(३) नगरपरिषदेस स्वेच्छानिर्णयानुसार पुढील गोष्टींसाठी नगरपरिषदेच्या मालमत्तेतून आणि निधीतून पूर्णत : किंवा अंशतः तरतूद करता येईल :—

(क) कोणत्याही क्षेत्रात—मग तेथे पूर्वीच बांधकाम झालेले असो किंवा नसो—नवीन सार्वजनिक रस्त्यांची आखणी करणे आणि त्या प्रयोजनासाठी जागा संपादन करणे, आणि अशा रस्त्याच्या बाजूस इमारती बांधण्याकरिता किंवा त्याच्या प्रांगणाकरिता आवश्यक ती जमीन संपादन करणे ;

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, च्या कलम ४(अ) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६७ च्या कलम २ द्वारे खंड (ध-एक-क) हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, याच्या कलम ४(ड) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[1][(कक) झोपडपट्टी सुधारणा व त्यांचा दर्जा वाढविणे ;

(कख) नागरी क्षेत्रातील गरिबी कमी करणे ;

(कग) गुरांचे कोंडवाडे व जनावरांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणे ;

(कघ) चर्मसंस्करणीचे विनियमन करणे ; ]

(ख) सार्वजनिक रुग्णालय, पूर्व-प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संस्था, ग्रंथालय, वस्तुसंग्रहालय, वेडयांची इस्पितळे, व्यायाम शाळा, आखाडे आणि अपंग व निराश्रित यांच्यासाठी आश्रयस्थाने स्थापन करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे आणि त्यासाठी इमारती बांधणे व त्याची व्यवस्था ठेवणे व त्याबरोबर, नगर सभागृहे, नगरपालिका कार्यालये, दुकाने, धर्मशाळा, खुली नाट्यगृहे, प्रेक्षागारे व विश्रामगृहे बांधणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(ग) सार्वजनिक उद्याने व बगीचे यांची आखणी करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे, आणि रस्त्याच्या बाजूला लावावयाची झाडे व इतर झाडे लावणे व त्याची व्यवस्था ठेवणे ;

(घ) लोकांसाठी संगीताची तरतूद करणे ;

(ङ) जनगणना करणे व जन्म-मृत्युविषयक आकडेवारीची नोंद बिनचूकपणे करण्यास मदत होईल अशा प्रकारची माहिती देण्याबद्दल बक्षिसे देणे ;

(च) सर्वेक्षण करणे ;

(छ) कोणत्याही पगारी किंवा मानसेवी दंडाधिकाऱ्याचे न्यायालय चालविण्याच्या संबंधात वेतन व भत्ते, भाडे व इतर खर्च किंवा अशा खर्चाचा कोणताही भाग देणे.

(ज) या अधिनियमाच्या कलम २९३ अन्वये किंवा मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ याच्या कलम ४४ अन्वये ज्या कुत्र्यांना ठार करावयाचे किंवा अटकावून ठेवावयाचे असेल असे कुत्रे ठार करण्याची, त्यांना अटकावून ठेवण्याची किंवा त्यांचे संरक्षण करण्याची व्यवस्था करणे ; १९५१ चा मुंबई २२.

(झ) कलम २८० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पीडादायक व्यवसायासाठी योग्य जागा मिळविणे व त्या मिळविण्यास मदत करणे ;

(ञ) आरोग्य संचालकाने संमत केलेल्या सर्वसाधारण पद्धतीनुसार खाजगी जागात किंवा खाजगी जागांच्या उपयोगाकरिता, त्या जागेतील मलप्रवाह नगरपरिषदेच्या नियंत्रणाखालील मलप्रणालात नेऊन सोडण्यासाठी पात्रे, जोडण्या, नळ व इतर कोणतीही उपकरणे पुरविणे, तयार करणे व ती सुस्थितीत राखणे ;

(ट) चराईची मैदाने संपादन करणे व ती सुस्थितीत राखणे आणि दुग्धशाळा स्थापन करणे, त्या सुस्थितीत राखणे व पैदाशीसाठी वळू ठेवणे व त्यांची निगा राखणे ;

(ठ) मलप्रवाहाची विल्हेवाट लावण्याकरिता कृषि क्षेत्राची किंवा कारखान्यांची स्थापना करणे व ते सुस्थितीत राखणे ;

(ड) दूरध्वनीच्या तारांची उभारणी करणे, त्या सुस्थितीत ठेवणे, त्यांची व्यवस्था ठेवणे, त्यांची व्यवस्थित रचना करणे किंवा त्या खरेदी करणे किंवा जेव्हा दूरध्वनीच्या तारा नगरपालिका क्षेत्राच्या सीमेपलिकडे जात असतील तेव्हा, संचालकाच्या पूर्वमंजुरीच्या अधीन अशा दूरध्वनीच्या तारांच्या उभारणीसाठी खर्च केलेल्या पैशावरील व्याज देण्याची हमी घेणे ;

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १३५(ब) द्वारे खंड (कक), (कख) व (कघ) समाविष्ट केले.

(ढ) नगरपालिकेचे कर्मचारी किंवा नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा कोणताही वर्ग आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांच्या कल्याणाचे संवर्धन करणे ;

(ण) नगरपरिषदेने नेमलेल्या सेवकांसाठी निवासस्थानांची तरतूद करणे ;

(त) अधिक गरीब वर्गासाठी आरोग्यकारक निवासस्थाने बांधणे ;

(थ) लोकांची ने-आण करण्यासाठी लहान रेल्वे मार्ग, ट्राम मार्ग आणि यंत्रचलित वाहतुकीची साधने बांधणे, खरेदी करणे, त्यांची व्यवस्थित रचना, ती सुस्थितीत राखणे, त्यांचा विस्तार करणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ;

(द) वीज-शक्ती किंवा गॅस पुरविण्यासाठी कोणतीही बांधकामे करणे, ती सुस्थितीत ठेवणे, त्यांची दुरूस्ती करणे व ती खरेदी करणे ;

(ध) स्थानिक स्वराज संस्था, मुंबई, हिच्या निधीस किंवा केवळ नागरी क्षेत्रातील स्थनिक- स्वराज्यासंबधीच्या बाबी हाताळणाऱ्या आणि राज्य शासनाने मान्यता दिलेल्या राज्यातील कोणत्याही इतर संघटनेच्या किंवा संस्थेच्या निधीस अंशदान देणे ;

(न) ग्रंथालये व वस्तुसंग्रहालये धरून कोणत्याही शैक्षणिक परिसंस्था, कोणतेही रुग्णालय, दवाखाना किंवा सार्वजनिक वैद्यकीय मदत देणारी तत्सम संस्था, किंवा धर्मादाय स्वरुपाची कोणतीही इतर संस्था बांधणे, त्यांची स्थापना किंवा त्या सुस्थितीत राखणे याकरिता अंशदाने देणे ;

(प) विद्यार्थ्यांकरिता खाजगीरित्या चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांस किंवा वसतिगृहास अनुदाने किंवा देणग्या देणे ;

(फ) नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांच्या लाभासाठी दूध व दुग्धजन्य पदार्थ यांचा पुरवठा करणे, त्याचे वाटप करणे व त्यांवर प्रक्रिया करणे यासाठी दुग्धशाळा व दुग्धालय क्षेत्र स्थापन करणे ;

[१][(ब) नगरपालिका क्षेत्रातील कोणतीही समारंभ, जत्रा, करमणुकीचे कार्यक्रम, प्रदर्शन किंवा गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारांसह कोणताही सार्वजनिक सत्कार ; मात्र यांवरील एकूण वार्षिक खर्च, 'अ' वर्ग, 'ब' वर्ग आणि 'क' वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत प्रत्येकी अनुक्रमे रुपये ३०,०००, रुपये २०,००० आणि रुपये १०,००० यापेक्षा अधिक होता कामा नये ; परंतु यात यापूर्वी विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादांपेक्षा जेव्हा अधिक खर्च होत असेल अशा बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याची मंजुरी मिळविणे आवश्यक असेल];

(भ) ज्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य आणि सोय यांमध्ये वाढ होण्याचा संभव असेल अशी पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट न केलेली कोणतीही इतर उपाययोजना करणे.

(४) वरील पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कर्तव्ये पार न पाडल्याच्या कारणावरुन कोणतीही नगरपालिका, कोणताही पालिका सदस्य किंवा तिचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध नुकसानभरपाईसाठी किंवा विनिर्दिष्ट कार्यासंबंधीचा कोणताही दावा चालविता येणार नाही.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ७(ब) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(५) प्रत्येक नगरपरिषदेने, जे नगरपालिका क्षेत्रात राहत असतील किंवा ज्यांना त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये नगरपालिका क्षेत्रातून काढून टाकण्यात आले असेल अशा—

(क) फौजदारी प्रक्रिया संहिता*, १८९८, प्रकरण ३४ अन्वये ज्यांच्या बाबतीत बंदिवासात ठेवण्यासंबंधी आदेश अंमलात नसेल अशा वेड्यांना, आणि १८९८ चा ५.

(ख) महारोग्यांना—

औषधोपचारासाठी योग्य ठिकाण म्हणून राज्य शासन अधिसूचनेद्वारे जाहीर करील अशा नगरपालिका क्षेत्रात किंवा नगरपालिकेच्या क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील कोणत्याही वेड्यांच्या उपचारगृहात किंवा रुग्णालयात किंवा आश्रयस्थानात चरितार्थाकरिता व उपचार करण्याकरिता, राज्य शासन, वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा दरांनी नगरपालिकेची मालमत्ता व निधी यांतून पैसे सुद्धा देईल :

परंतु, कोणत्याही वेड्यास किंवा महारोग्यास वर सांगितल्याप्रमाणे कोणत्याही वेड्यांच्या उपचारगृहात, रूग्णालयात किंवा आश्रयस्थानात दाखल करून घेण्याच्या निकटपूर्वी तो अशा नगरपालिका क्षेत्रात कमीत कमी एक वर्ष राहत नसेल तर, त्यास चरितार्थासाठी व त्याच्यावर औषधोपचार करण्यासाठी नगरपरिषद या पोट-कलमान्वये जबाबदार असणार नाही :

परंतु आणखी असे की, भारतीय वेडाबाबत अधिनियम, १९१२ याच्या कलम ८८ अन्वये उच्च न्यायालयाकडे किंवा एखाद्या जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत अशा वेड्या व्यक्तीची तिच्या पोषणासाठी उपयोग करता येईल अशी मालमत्ता आहे किंवा तिचे पोषण करण्यास कायदेशीररीत्या बांधलेली आणि पोसण्याची ऐपत असलेली एखादी व्यक्ती आहे, असे दाखविण्याची नगरपरिषदेस संधी दिल्यावाचून, अशा वेड्या व्यक्तीच्या पोषणाचा खर्च नगरपरिषदेने देण्याबाबत कोणताही आदेश देण्यात येणार नाही. या कलमान्वये ज्यांना पोसण्यास व औषधोपचार करण्यास नगरपरिषद जबाबदार आहे त्या वेड्या व्यक्तींना, ज्यात दाखल करण्यात आले असेल अशा कोणत्याही वेड्यांच्या उपचारगृहाचा प्रभारी अधिकारी, अशा उपचारगृहात अटकावून ठेवलेल्या प्रत्येक वेड्याचे पोषण व औषधोपचार यासाठी केलेल्या खर्चाचा तपशीलवार हिशेब ठेवील आणि त्या हिशेबाची एक प्रत, त्यासाठी अर्ज करण्यात आल्यानंतर नगरपरिषदेस पुरवील. १९१२ चा ४.

(६) जर एखादी नगरपरिषद नळाद्वारे पाणीपुरवठा करीत असेल तर, ती राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेकडून पाण्याची तपासणी व पृथःकरण करून, अशा रीतीने पुरविलेले पाणी कसे आहे याची खात्री करून घेण्यासाठी राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवील अशा कालावधींनी व अशी फी देऊन उपाययोजना करील :

परंतु, राज्य शासनास, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून कोणत्याही नगरपरिषदेस या तरतुदीपासून सूट देता येईल.

(७) जेव्हा एखाद्या नगरपरिषदेने कोणत्याही शिक्षण संस्थेस किंवा धर्मादाय संस्थेस नगरपरिषदेच्या मालमत्तेतून किंवा निधीतून काही वार्षिक अंशदान देण्याविषयी स्वतःस किंवा आपल्या उत्तराधिकाऱ्यास काही वर्षासाठी किंवा अमर्यादित कालावधीपर्यंत बंधनकारक

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

असल्याचा आशय असलेली कोणतीही व्यवस्था केली असेल किंवा त्याबाबत कोणतेही वचन दिले असेल तेव्हा राज्य शासनाच्या मंजुरीने, अशा नगरपरिषदेने किंवा तिच्या उत्तराधिकाऱ्याने अशी व्यवस्था किंवा वचन रद्द करणे किंवा असे वार्षिक अंशदान बंद किंवा कमी करणे हे कायद्याला धरून असेल. परंतु, तसे करण्याबद्दल आपला हेतू असल्याची निदान बारा महिन्यांची नोटीस नगरपरिषदेने अशा संस्थेच्या व्यवस्थापकाला किंवा व्यवस्थापकांना दिली असली पाहिजे.

[१][४९-क. या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये परिषदेवर कोणतेही कर्तव्य लादण्यात आले असेल किंवा कोणतेही काम तिला नेमून देण्यात आले असेल किंवा एखादी योजना राबवण्याचे काम परिषदेकडे सोपविण्यात आले असेल त्याबाबतीत,— अभिकरणांनी कामे पार पाडणे.

(एक) परिषदेला स्वतःच अशी कर्तव्ये पार पाडता येतील किंवा अशी कामे करता येतील, किंवा अशा योजना राबविता येतील ; किंवा

(दोन) राज्य शासन देईल अशा निदेशांच्या आणि ठरवून देईल अशा अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून, कोणत्याही अभिकरणाकरवी ती पार पाडण्याची, करण्याची किंवा राबवण्याची व्यवस्था करता येईल :

परंतु, परिषदेला अशा व्यवस्थेसाठी राज्य शासन ठरवून देईल अशा अटींशी व शर्तींशी विसंगत नसतील अशा अटी व शर्ती देखील विनिर्दिष्ट करता येतील.]

## (२) पाणीपुरवठयाची योजना हाती घेण्यासंबंधी खास तरतुदी

**५०.** (१) नेमलेल्या दिवसानंतर शक्य असेल तितक्या लवकर, परंतु, अशा दिवसापासून एक वर्षापेक्षा अधिक नसेल एवढ्या मुदतीत प्रत्येक नगरपरिषद आपल्या क्षेत्रात राहणाऱ्या रहिवाशांसाठी संरक्षित पिण्याच्या पाण्याची एक योजना तयार करील आणि अशा दिवसापासून पाच वर्षांच्या मुदतीत त्या योजनेची अंमलबजावणी करील आणि संरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देईल. पाणी-पुरवठ्याची योजना तयार करणे आणि विवक्षित मुदतीत पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे बंधनकारक असणे.

(२) नगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्येतील प्रत्येक व्यक्तीस दर दिवशी कमीतकमी सत्तर लिटर पाणी उपलब्ध होईल अशा रीतीने ती योजना तयार करण्यात येईल.

(३) अशा योजनेबाबत अन्वेषण करणे, नकाशे आणि अंदाज तयार करणे व योजनेची अंमलबजावणी करणे यास आपण असमर्थ असल्याचे नगरपरिषदेस आढळून आले तर, तिला नेमलेल्या दिवसापासून चार महिन्यांच्या आत सहाय्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल.

(४) ज्या अटीवर व शर्तीवर राज्य शासन योजनेचे अन्वेषण करील, तिचे नकाशे व अंदाज तयार करील व अशा योजनेची अंमलबजावणी करील त्या अटी व शर्ती, याबाबतीत तयार केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येतील.

(५) संरक्षित पिण्याच्या पाणीपुरवठ्याच्या योजनेचे अन्वेषण करणे, त्यासाठी नकाशे व अंदाज तयार करणे आणि त्याबद्दलच्या कोणत्याही योजना अंमलात आणणे याकरिता नगरपरिषदेजवळ पुरेसा पैसा उपलब्ध आहे हे सुनिश्चित करण्यासाठी, अशा योजनेस मंजुरी देण्याच्या वेळी आणि त्या योजनेस पैसा पुरविण्यासाठी नगरपरिषदेला आवश्यक असलेल्या कोणत्याही कर्जासाठी कोणतीही हमी देण्यापूर्वी आणि संबंधित नगरपरिषदेचे विचार लक्षात

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १३६ द्वारे कलम ४९-क समाविष्ट करण्यात आले.

घेतल्यानंतर, राज्य शासन प्रत्येक बाबतीत ठरवील अशा, लगतपूर्ववर्ती वर्षाच्या त्या नगरपरिषदेच्या सर्वसाधारण महसुलाच्या टक्केवारीने येणारी रक्कम, राज्य शासन प्रत्येक बाबतीत ठरवील इतक्या वर्षासाठी, एका वेगळ्या निधीमध्ये दरवर्षी नगरपरिषद ठेवील असा निधी पाणीपुरवठा राखीव निधी या नावाने ओळखला जाईल आणि नगरपरिषद प्रत्येक वर्षी जूनच्या पहिल्या दिनांकापूर्वी आवश्यक असेल अशी अनामत रक्कम त्या निधीत ठेवील.

(६) नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने या निधीचे विनियमन करण्यात येईल.

(७) नगरपरिषदेने पोट-कलम (३) अन्वये सहाय्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज केला नाही तर, नगरपरिषदेस अशा सहाय्याची आवश्यकता नाही आणि ती स्वतःच अशी योजना तयार करून अंमलात आणील असे गृहीत धरण्यात येईल.

(८) नगरपरिषदेने अर्ज केल्यानंतर, आणि पुरेशी व समाधानकारक कारणे दर्शविल्यानंतर राज्य शासनाला, पोट-कलम (१) आणि (३) यात विहित केलेल्या मुदतीत वाढ करता येईल. पोट-कलम (१) किंवा (३) यात विहित केलेल्या मुदतीत किंवा वाढविलेल्या मुदतीत (तशी वाढविली असल्यास), नगरपरिषदेने, योजना तयार करण्यात किंवा ती अंमलात आणण्यात कसूर केल्यास, नगरपरिषदेने या अधिनियमाखाली आपले कर्तव्ये पार पाडण्यास कसूर केली आहे असे गृहीत धरण्यात येईल.

(९) पोट-कलम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम पाणीपुरवठा राखीव निधीत जमा करण्यात नगरपरिषदेने कसूर केली आहे असे कोणत्याही वेळी राज्य शासनाला दिसून आल्यास, राज्य शासनाला लेखी आदेशाद्वारे तो निधी आपल्या ताब्यात घेता येईल आणि उक्त निधीत ज्या रकमा भरावयाच्या राहिल्या असतील त्या रकमा नगरपरिषदेचा पैसा ज्या बँकेत ठेव म्हणून ठेवला असेल त्या बँकेस, अशा नगरपरिषदेच्या नावावर जमा असलेल्या रकमेतून राज्य शासन निदेश देईल अशा ठराविक मुदतीने आणि अशा हप्त्यांनी उक्त निधीत भरण्याबद्दल निदेशही देता येईल. अशा आदेशांचे पालन करणे हे अशा बँकेस बंधनकारक असेल. अशा आदेशानुसार दिलेली प्रत्येक रक्कम ही, अशा बँकेकडे नगरपरिषदेने ठेवलेल्या पैशातून, तिने अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्या बाबतीत, नगरपरिषदेच्या सर्व दायित्वातून बँकेला भारमुक्त होण्यास पुरेशी होईल.

(१०) पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असलेली संरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची योजना नेमलेल्या दिवशी, अंमलात आणणाऱ्या कोणत्याही नगरपरिषदेस पोट-कलम (१), (२), (३) आणि (४) च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

(११) पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असलेली योजना ज्या नगरपरिषदेत नेमलेल्या दिवशी चालू असेल अशा कोणत्याही नगरपरिषदेस या कलमातील काहीही लागू होणार नाही.

(१२) या कलमाच्या तरतुदीत नेमलेल्या दिवसाबाबत केलेला उल्लेख हा, अशा नगरपरिषदेची रचना प्रथमतः ज्या दिनांकास करण्यात आली त्या दिनांकासंबंधी आहे— या फेरफाराच्या अधीन राहून, नेमलेल्या दिवसानंतर रचना झालेल्या प्रत्येक नगरपरिषदेस या कलमाच्या तरतुदी लागू होतील.

### (३) अध्यक्ष व उपाध्यक्ष

अध्यक्षाची निवडणूक.

[1]५१. (१) कलम ५१-१क च्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक नगरपरिषदेचा एक अध्यक्ष असेल व तो निवडून आलेल्या परिषद सदस्यांकडून त्यांच्यामधून निवडण्यात येईल.

---

[1] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ च्या कलम ४ द्वारे मूळ कलम ५१ ऐवजी दाखल केले.

(२) नगरपरिषदेवर निवडून आलेल्या परिषद सदस्यांची नावे कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये, **राजपत्रात,** ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात येतील किंवा, यथास्थिति, प्रथम प्रसिद्ध करण्यात येतील, त्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी, अध्यक्षाला निवडून देण्यासाठी परिषद सदस्यांची एक विशेष सभा बोलावील :

परंतु या कलमाखालील अशी सभा मावळत्या परिषद सदस्यांचा पदावधी संपण्यापूर्वी घेता येणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी याबाबत लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा, त्याला, नगपरिषदेच्या अध्यक्षाला नगरपरिषदेच्या सभेच्या अध्यक्षपदी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही :

परंतु, सभेतील कार्यपद्धतीचे (सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीसह) विनियमन करण्यासाठी या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा सभेच्या अध्यक्षपदी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणावरून, अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल.

(४) कोणतेही नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासंबंधीच्या किंवा नाकारण्यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयामुळे बाधित झालेल्या कोणत्याही परिषद सदस्यास, असा निर्णय कळविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे अपील सादर करता येईल आणि त्याचवेळी त्यास, अशा अपिलाची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास देता येईल. संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रादेशिक संचालक, शक्य तितक्या शीघ्रतेने, असे अपील निकालात काढील. प्रादेशिक संचालकाचा अशा अपिलावरील निर्णय आणि केवळ अशा निर्णयास (कोणताही असल्यास) अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा किंवा यथास्थिति, अशा अधिकाऱ्याचा, उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्यासबंधीचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

(५) अध्यक्षाच्या निवडणुकीत जर समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल व चिठ्ठ्या टाकण्याचे काम जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा पीठासीन अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, तो ठरवील अशा रीतीने करण्यात येईल.

(६) अध्यक्षाच्या निवडणुकीबाबतचा कोणताही वाद राज्य शासनाकडे विचारार्थ पाठवण्यात येईल व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(७) अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर परिषद सदस्यास नामनिर्देशन स्वीकृत करण्याच्या प्रयोजनासाठी नगरपरिषद आपली सभा चालू ठेवील.

(८) परिषद सदस्यांचे नामनिर्देशन विहित रीतीने करण्यात येईल.

(९) जर अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणाने रिक्त झाले असेल तर, अध्यक्षाच्या नंतरच्या निवडणुकीकरिता, पोट-कलमे (२) ते (६) (दोन्ही धरून) यात ठरवून दिलेली कार्यपद्धती लागू होईल, मात्र पद रिकामे झाल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावील.]

अध्यक्षाचे पद राखून ठेवणे.

[१][५१-१ क. [२][(१)] अध्यक्षाचे पद हे विहित रीतीने, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती महिला व नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवण्यात येईल.]

[२][(२) महाराष्ट्र नगरपरिषदा व नगर पंचायती (अध्यक्ष निवडणूक) नियम, १९८१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नगरपरिषदांच्या अध्यक्षांची पदे राखून ठेवण्याच्या संबंधात दिनांक ३० एप्रिल, १९९९ रोजी अंमलात असलेल्या नामावलीमध्ये कलम ५२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अध्यक्षांच्या वाढीव पदावधीसाठी तरतूद करणारी सुधारणा केली असल्याचे मानण्यात येईल.]

उपाध्यक्षाची नेमणूक.

[३][५१-क. (१) प्रत्येक नगरपरिषदेचा एक उपाध्यक्ष असेल जो, कलम ५१ च्या पोट-कलम (९) अन्वये बोलविण्यात आलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडून दिला जाईल.

(२) उपाध्यक्षाची निवड करण्याच्या सभेमध्ये अध्यक्ष अध्यक्षस्थान स्वीकारील आणि जर अध्यक्ष नसेल तर, जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी त्यासंबंधात विशेषकरून नामनिर्देशित करील असा इतर अधिकारी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारील, परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास मत देण्याचा अधिकार असणार नाही :

परंतु, सभेची कार्यपद्धती (तिच्या गणपूर्तीसह) विनियमित करण्यासाठी या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणाऱ्या अध्यक्षास, किंवा यथास्थिति, अधिकाऱ्यास पुरेशी कारणे लेखी नोंदवून, अशी सभा स्थगित करण्यासाठी नकार देता येईल.

(३) उपाध्यक्षाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल अध्यक्षाकडून किंवा अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या अधिकाऱ्याकडून चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात येईल.

(४) जिल्हाधिकारी, अशा रीतीने निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नाव, अशा निवडणुकीपासून पंधरा दिवसांच्या आत राजपत्रात अधिसूचित करील.

(५) उपाध्यक्षाच्या निवडणुकीबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास, त्याबाबत राज्य शासनाकडे निर्देश करण्यात येईल आणि राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(६) कलम ५५-क च्या तरतुदींना व या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, उपाध्यक्ष, तो निवडून आल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(७) उपाध्यक्षाचे पद, कोणत्याही कारणामुळे का होईना, रिकामे झाले असेल तर, पोट-कलमे (१) ते (३) मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरून ते रिकामे पद भरण्यात येईल आणि अशा रीतीने निवडून आलेला उपाध्यक्ष, एक वर्षाच्या कालावधीकरिता, किंवा परिषद सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या उर्वरित पदावधीकरिता, यापैकी जे अगोदर घडेल त्याकरिता, आपले पद धारण करील.]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १३८ द्वारे कलम ५१-१क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ द्वारे विद्यमान कलम ५१-१क ला त्याचा पोट-कलम (१) असा क्रमांक दिला आणि त्यानंतर पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २ द्वारे मूळ कलम ५१क ऐवजी दाखल केले.

[१][**५२.** अध्यक्षांच्या पदाची मुदत ही ५ वर्षांची असेल आणि ती नगरपरिषदेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल : अध्यक्षाचा पदावधी.

परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) आणि महानगरपालिकांच्या २००१ चा महा. ८. निवडणुका घेण्यासाठी तात्पुरत्या तरतुदी अधिनियम, २००१ अंमलात आल्याच्या दिनांकास ज्यांनी अध्यक्षांची पदे धारण केली आहेत, अशा अध्यक्षांना या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही, आणि त्यांची मुदत त्यांच्या संबंधित परिषदेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल].

**५३.** (१) अध्यक्षास, जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी राजीनामा सादर करून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. अध्यक्षाचा राजीनामा.

(२) असा राजीनामा जिल्हाधिकाऱ्यास तो मिळाल्यानंतर अंमलात येईल.

[२][**५४.** (१) उपाध्यक्षास, अध्यक्षाकडे आपला लेखी राजीनामा देऊन, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. उपाध्यक्षाचा राजीनामा.

(२) असा राजीनामा अध्यक्षाला तो मिळेल तेव्हापासून अंमलात येईल.]

[३][**५५.** [४][(४) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र महानगरपालिका नगरपरिषदा (सुधारणा) आणि महानगरपालिकांच्या निवडणुका घेण्यासाठी तात्पुरत्या तरतुदी २००१ चा महा. ८. अधिनियम, २००१ अंमलात आल्यानंतर, परिषद सदस्यांनी विशेष सभेत एकूण परिषद सदस्यांपैकी कमीत कमी तीन चतुर्थांश बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे तसा निर्णय घेतला असला तर, अध्यक्ष हा, अध्यक्ष असण्याचे बंद होईल :] परिषद सदस्यांनी अध्यक्षास काढून टाकणे.

[५][परंतु,—

(क) अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत ; आणि

(ख) जर नगरपरिषदेचा कालावधी, सहा महिन्यांच्या आत समाप्त होत असेल तर, असा कोणताही ठराव मांडता येणार नाही.]

(२) अशी विशेष सभा बोलावण्यासाठी केलेल्या मागणीपत्रावर [६][* * *] एकूण सदस्यांपैकी कमीत कमी निम्म्या परिषद सदस्यांनी सही केलेली असेल आणि ते जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल :

[७][परंतु, दिनांक ३१ मे, १९९४ पूर्वी नगरपरिषदेवर स्वीकृत करून घेण्यात आलेल्या कोणत्याही स्वीकृत परिषद सदस्यास, विशेष सभेसाठी केलेल्या मागणीपत्रावर स्वाक्षरी करण्याचा हक्क असणार नाही ; तसेच अशा विशेष सभेत मतदानाचा हक्क देखील असणार नाही.]

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १८ द्वारे मूळ कलम ५२ ऐवजी दाखल केले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ११ द्वारे मूळ कलम ५५ ऐवजी कलम ५५ व ५५क दाखल करण्यात आले.

[४] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १९ द्वार पोट-कलम (१) ऐवजी दाखल करण्यात आला.

[५] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ५ द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल केले.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४१(ब) द्वारे "(स्वीकृत पालिका सदस्य वगळून)" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १४१(क) द्वारे परंतुक समाविष्ट केले.

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) अन्वये पाठविण्यात आलेले मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत नगरपरिषदेची विशेष सभा भरवील :

परंतु, जेव्हा जिल्हाधिकाऱ्याने विशेष सभा भरवलेली असेल तेव्हा तो त्याबाबत अध्यक्षास कळवील.

(४) पोट-कलम (१) खालील ठरावावर विचार करण्यासाठी बोलावलेल्या सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला कोणताही अन्य अधिकारी स्वीकारील. परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अन्य अधिकाऱ्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

(५) पोट-कलम (४) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही सभेत उपस्थित असणाऱ्या [१][नामनिर्देशित] परिषद-सदस्यांना अध्यक्षास काढून टाकण्याबाबतच्या कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

[२][ (६) पोट-कलम (३) च्या प्रयोजनार्थ बोलाविलेल्या विशेष सभेमध्ये अध्यक्षाला काढून टाकण्याबाबत जर ठराव मांडण्यात आला नसेल किंवा, यथास्थिति, तो फेटाळण्यात आला असेल तर, अशा विशेष सभेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीमध्ये अध्यक्षाला काढून टाकण्याबाबतचा कोणताही नवीन ठराव नगरपरिषदेपुढे मांडण्यात येणार नाही].

परिषद सदस्यांनी उपाध्यक्षास काढून टाकणे.

[३][**५५-१ क.** (१) नगरपरिषदेने, विशेष सभेत एकूण परिषद सदस्यांपैकी कमीत कमी दोन तृतीयांश बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे तसा निर्णय घेतला असेल तर, उपाध्यक्ष हा उपाध्यक्ष असण्याचे बंद होईल :

परंतु, उपाध्यक्षाची निवडणूक झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत असा ठराव मांडण्यात येणार नाही.

(२) अशी विशेष सभा बोलाविण्यासाठी केलेल्या मागणीपत्रावर एकूण परिषद सदस्यांपैकी कमीत कमी निम्म्या परिषद सदस्यांनी सही केलेली असेल आणि ते अध्यक्षांकडे पाठविण्यात येईल आणि अध्यक्ष, असे मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, नगरपरिषदेची विशेष सभा बोलावील, ज्यात नामनिर्देशित परिषद सदस्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

(३) पोट-कलम (२) खालील प्रयोजनासाठी बोलाविण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये जर उपाध्यक्षास काढून टाकण्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला नाही, किंवा यथास्थिति, तो फेटाळण्यात आला तर, अशा उपाध्यक्षाच्या पदावधीमध्ये अशा प्रकारे काढून टाकण्याचा ठराव नव्याने मांडण्यात येणार नाही.]

शासनाने अध्यक्षास व उपाध्यक्षास काढून टाकणे.

**५५-क.** कलमे [४][५१-१क] आणि ५५ यांच्या तरतुदीस बाध न आणता, राज्य शासनास, अध्यक्षाला किंवा उपाध्यक्षाला, त्याची कर्तव्ये पार पाडताना त्याने केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा त्याची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी हयगय केल्याबद्दल किंवा तो असमर्थ झाल्याबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तनाबद्दल दोषी असल्यावरून, पदावरून दूर करता येईल ; आणि अशा प्रकारे पदावरून दूर करण्यात आलेला अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, परिषद-सदस्यांच्या पदावधीच्या उर्वरित मुदतीत, यथास्थिति, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पुन्हा निवडून येण्यास, किंवा नेमला जाण्यास पात्र असणार नाही :

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४१(ड) द्वारे " स्वीकृत " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ द्वारे, मूळ पोट-कलम (६) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३ द्वारे कलम ५५-१क समाविष्ट केले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे, कलम ५१-क याऐवजी हा मजकूर दाखल केला.

परंतु, अशा अध्यक्षाला किंवा उपाध्यक्षाला स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज पदावरून दूर करण्यात येणार नाही.]

[१][**५५-ख.** कलम ५५क मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, एखादा परिषद सदस्य अथवा व्यक्ती त्याची/तिची कर्तव्ये पार पाडत असताना गैरवर्तन केल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा तो/ती यथास्थिति, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून त्याचे/तिचे पद धारण केलेले असताना किंवा ते पद त्याने/तिने धारण कलेले होते त्यावेळी कोणतेही लज्जास्पद वर्तन केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आले तर राज्य शासन,— कलम ५५क अन्वये अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पदावरून दूर करण्यात आल्यानंतर परिषद सदस्य म्हणून राहण्यासाठी किंवा परिषद सदस्य होण्यासाठी निरर्हता.

(क) अशा परिषद सदस्याला, परिषद सदस्य या नात्याने असलेल्या त्याच्या पदावधीच्या उर्वरित काळामध्ये परिषद सदस्य असण्याचे चालू राहण्यासाठी निरर्ह ठरवू शकेल आणि अशा निरर्हतेच्या आदेशापासून सहा वर्षांचा कालवधी समाप्त होईपर्यंत परिषद सदस्य म्हणून निवडला जाण्यास देखील निरर्ह ठरवू शकेल ;

(ख) अशा व्यक्तीला अशा निरर्हतेच्या आदेशापासून सहा वर्षाचा कालावधी समाप्त होईपर्यंत परिषद सदस्य म्हणून निवडला जाण्यास निरर्ह ठरवू शकेल.]

[२][**५५-ग.** या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००६ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास, परिषद सदस्यांनी थेट निवडून आलेल्या अध्यक्षाला पदावरून दूर करण्याच्या संबंधात कलम ५५ च्या तरतुदी जशा लागू होत्या तशाच लागू राहतील.] परिषद सदस्यांनी थेट निवडून आलेल्या अध्यक्षाला पदावरून दूर करणे.

२००६ चा महा. ३१.

**५६.** (१) प्रत्येक अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा, नगरपालिका क्षेत्रातून— अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी परवानगीशिवाय गैरहजर राहण्याचा परिणाम.

(क) नगरपरिषदेने त्याला गैरहजर राहण्याची परवानगी दिली नसेल तर एका वेळी तीन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत गैरहजर राहिल्यास, किंवा

(ख) एका वर्षात एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत गैरहजर राहिल्यास,— मग अशा गैरहजेरीस नगरपरिषदेने परवानगी दिलेली असो वा नसो—

यथास्थिति, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष असण्याचे बंद होईल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क) खालील परवानगी, एका वर्षात सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीसाठी देण्यात येणार नाही. जेव्हा जेव्हा उपाध्यक्षास परवानगी दिली जाईल तेव्हा तेव्हा, ज्या मुदतीसाठी अशी परवानगी देण्यात आली असेल त्या मुदतीत, उपाध्यक्षाची कामे पार पाडण्यासाठी व त्याच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी [३][ज्या दिनांकास रजा मंजूर करण्यात आली असेल त्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, निवडून आलेल्या इतर परिषद सदस्याची अध्यक्ष नेमणूक करील.]

(३) प्रत्येक बाबतीत अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा या कलमान्वये अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष असण्याचे बंद झाले आहे किंवा काय या बाबतीत निर्णय देण्यास, जिल्हाधिकारी हाच सक्षम प्राधिकारी असेल. जिल्हाधिकाऱ्यास कोणत्याही मतदाराने त्याच्याकडे अर्ज केल्यानंतर किंवा स्वत: होऊन आपला निर्णय देता येईल. असा निर्णय संबंधित अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, मुख्य

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १२ द्वारे, कलम ५५-ख समाविष्ट केले.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, याच्या कलम ६ द्वारे, कलम ५५-ग समाविष्ट केले.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, याच्या कलम १६ द्वारे, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अधिकारी आणि एखादा अर्जदार असल्यास, त्यास कळविण्यात येईल. अशी जागा रिकामी झाली आहे याबद्दल जिल्हाधिकाऱ्याकडून निर्णय घेण्यात येईपर्यंत आणि वर तरतूद केल्याप्रमाणे असा निर्णय कळविण्यात येईपर्यंत, यथास्थिति, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून असण्याचे बंद झाले आहे असे समजण्यात येणार नाही :

परंतु, अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय जिल्हाधिकारी या कलमान्वये कोणत्याही अध्यक्षाविरुद्ध किंवा उपाध्यक्षाविरुद्ध कोणताही आदेश काढणार नाही.

(४) जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला असा निर्णय कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि राज्य शासनाने अशा अपिलावर दिलेला निर्णय अंतिम असेल.

अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी कार्यभार सोपविणे.

[1][**५७.** (१) नवीन अध्यक्षाची निवड झाल्यानंतर, निवृत्त होणारा अध्यक्ष नवीन अध्यक्षाकडे आपल्या पदाचा कार्यभार सोपवील.

(२) ज्याने आपल्या पदाचा राजीनामा दिला असेल किंवा ज्यास पदावरून दूर करण्यात आले असेल किंवा नवीन अध्यक्षाची निवड झाल्याच्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव जो अध्यक्ष असण्याचे बंद झाले असेल असा प्रत्येक अध्यक्ष आपल्या पदाचा कार्यभार जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवील.

(३) कोणत्याही कारणावरून जो उपाध्यक्ष असण्याचे बंद झाले असेल असा प्रत्येक उपाध्यक्ष आपल्या पदाचा कार्यभार अध्यक्षाकडे सोपवील आणि अध्यक्षाचे पद रिकामे असेल तर, जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवील.

(४) कोणत्याही अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने पोट-कलम (१), (२) किंवा (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे आपल्या पदाचा भार सोपविण्यास नकार दिला तर, जिल्हाधिकाऱ्यास, लेखी आदेशाद्वारे, त्यास (अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास) त्याच्या पदाचा भार आणि असा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून त्याच्या कब्जात असलेले सर्व कागदपत्र आणि मालमत्ता (तसे असल्यास), पोट-कलम (१), (२) किंवा यथास्थिति, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीकडे सोपविण्याबद्दल निदेश देता येईल आणि असा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष अशा निदेशाचे ताबडतोब पालन करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये ज्याला निदेश देण्यात आले आहेत अशा कोणत्याही अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने अशा निदेशाचे पालन केले नाही तर त्यास, अपराध सिद्ध-झाल्यानंतर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची साध्या कैदेची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

अध्यक्षाची कामे.

**५८.** (१) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या आणि उपविधीच्या तरतुदींच्या अधीन राहून, नगरपरिषदेचा अध्यक्ष—

(क) वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला नसेल तर, नगरपरिषदेच्या सर्व सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारील आणि अशा सभांत चालणाऱ्या कामकाजाचे विनियमन करील.

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, याच्या कलम १७ द्वारे, मूळ मजकुराऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(ख) नगरपरिषदेच्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर लक्ष ठेवील ;

[१][ * * * * ]

(ग) हा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेला कोणताही इतर कायदा याअन्वये किंवा त्याखाली त्याला प्रदान करण्यात येतील अशी अंमलबजावणीची कार्ये पार पाडील किंवा अशा अधिकारांचा वापर करील ;

(घ) नगरपरिषदेच्या कार्यकारी प्रशासनाच्या बाबींमध्ये आणि लेखे आणि अभिलेख यासंबंधीच्या बाबींमध्ये नगरपरिषदेच्या [२][मुख्य अधिकाऱ्याच्या] कामावर व कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवील ; आणि

(ङ) राज्य शासनाला किंवा संचालकाला किंवा जिल्हाधिकाऱ्याला किंवा राज्य शासन वेळोवेळी प्राधिकृत करील अशा इतर कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याला, नियमाद्वारे विहित करण्यात येतील असे किंवा राज्य शासन, संचालक, जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी कोणत्याही वेळी मागवील असे अहवाल, विवरणे किंवा अभिलेख सादर करील.

(२) निकडीची परिस्थिती उद्‌भवेल तेव्हा, अध्यक्षास, नगरपालिकेच्या मंजुरीची आवश्यकता असेल असे आणि लोकांच्या सेवेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने जे ताबडतोब अंमलात आणणे किंवा करणे आवश्यक आहे असे त्याचे मत असेल असे कोणतेही काम अंमलात आणण्याचा किंवा ते थांबविण्याचा किंवा कोणतीही कृती करण्याचा निदेश देता येईल आणि असे कोणतेही काम अंमलात आणण्याचा किंवा अशी कोणतीही कृती करण्याचा खर्च नगरपरिषद निधीतून दिला पाहिजे, असा निदेश देता येईल :

परंतु,—

(क) कोणत्याही विशिष्ट कामाच्या अंमलबजावणीस किंवा कोणतीही विशिष्ट कृती करण्यास मनाई करणाऱ्या, नगरपरिषदेच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून तो या कलमान्वये कार्य करणार नाही ; आणि

(ख) त्याने या कलमान्वये केलेली उपाययोजना आणि त्याबद्दलची कारणे ताबडतोब स्थायी समितीस आणि नगरपरिषदेस अनुक्रमे त्यांच्या पुढील सभेत कळवील.

[३][(ग) पोट-कलम (२) अन्वये कार्य करताना तो पुढील गोष्टी करणार नाही—

(एक) नगरपरिषदेत कोणत्याही नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणार नाही ;

(दोन) कोणत्याही संघटनेला कोणतेही आर्थिक अंशदान देणार नाही ;

(तीन) नित्यक्रमाच्या कोणत्याही बांधकामांसाठी कोणतेही कंत्राट देणार नाही ;

(चार) परिषदेच्या कोणत्याही मालमत्तेच्या विक्रीस मंजुरी देणार नाही, कोणत्याही मालमत्तेची भाडेपट्ट्याची मुदत वाढवून देणार नाही किंवा खरेदीद्वारे किंवा भाडेपट्ट्याद्वारे परिषदेकरिता कोणतीही नवी मालमत्ता संपादित करणार नाही ; आणि

या सर्व बाबींचे या अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींनुसार काटेकोर पालन करण्यात येईल.]

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, याच्या कलम ५ द्वारे खंड (खख) वगळण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ९(अ) द्वारे "सर्व अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम ९(ब) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

उपाध्यक्षाची कामे.

**५९.** (१) नगरपरिषदेच्या उपाध्यक्षाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) अध्यक्षाच्या गैरहजेरीत आणि वाजवी करणामुळे प्रतिबंध झाला नसेल तर, नगरपरिषदेच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे ;

[१]* * * * *

(ग) अध्यक्ष वेळोवेळी त्याच्याकडे सोपवून देईल अशा अध्यक्षाच्या अधिकारांचा वापर करणे आणि त्याची कर्तव्ये पार पाडणे ;

(घ) अध्यक्षाच्या गैरहजेरीत, अध्यक्षाच्या अधिकाराचा वापर करणे व त्याची कर्तव्ये पार पाडणे.

(२) उपाध्यक्ष हा, काही विषय समित्या असल्यास त्यांपैकी नगरपरिषद ठरवील अशा कोणत्याही एका विषय समितीचा पदसिद्ध सभापती असेल.

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची पदे एकाच वेळी रिकामी होणे.

[२][**६०.** कोणत्याही कारणामुळे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची पदे एकाच वेळी रिकामी झाली तर त्याबाबतीत, मुख्य अधिकारी ती बाब जिल्हाधिकाऱ्याला कळवील, आणि नवीन अध्यक्ष निवडून येईपर्यंत, जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी त्याबाबतीत नेमील असा अन्य अधिकारी अध्यक्षाचे अधिकार वापरील आणि त्याची कर्तव्ये पार पाडील. मात्र त्याला मतदानाचा कोणताही हक्क असणार नाही. जिल्हाधिकाऱ्याने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, ज़िल्हाधिकारी निश्चित करील, इतके पारिश्रमिक नगरपालिकेच्या निधीतून देण्यात येईल].

अध्यक्षास [३][मानधन आणि] आतिथ्य भत्ता व परिषद सदस्यांना सभा भत्ता.

**६१.** (१) एखाद्या नगरपरिषदेने आपल्या अध्यक्षास, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमांच्या अधीन, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेहून अधिक नसेल इतके [३][मानधन आणि] आतिथ्य भत्ता देण्याचे ठरविले असेल तर तिला तो देता येईल :—

| [४][ नगरपालिका क्षेत्राचा वर्ग | दरमहा द्यावयाच्या मानधनाचा कमाल दर | दरवर्षी द्यावयाच्या आतिथ्य भत्त्याची कमाल रक्कम |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| अ | ३,००० | १५,००० |
| ब | २,५०० | १०,००० |
| क | २,००० | ७,५०० ] |

(२) [५][अध्यक्षासह] प्रत्येक परिषद सदस्यास नगरपरिषदेच्या, स्थायी समितीच्या, विषय समितीच्या किंवा एखाद्या विशेष समितीच्या सभेस हजर राहण्यासाठी प्रत्येक सभेसाठी [६][१०० रुपये] या दराने नगरपरिषदेकडून सभा भत्ता देण्यात येईल. परंतु, असा भत्ता दरमहा [७][५०० रुपये] या कमाल मर्यादेस अधीन असेल.

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १९ द्वारे खंड (ख) वगळण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम १२ द्वारे कलम ६० समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, याच्या कलम ४५(अ)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४५(अ)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २ द्वारे "अध्यक्षाव्यतिरिक्त" या मजकुराऐवजी हा मजकूर करण्यात आला.

[६] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, याच्या कलम ४५(ब)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ४५(ब)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**स्पष्टीकरण.—** जर परिषद-सदस्यास कोणत्याही दिवशी अशा एकापेक्षा अधिक सभांना हजर राहणे आवश्यक असेल तर जणू काही तो त्या दिवशी केवळ एकाच सभेस हजर राहिला होता असे समजून त्यास सभा भत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(३) कलम १६ किंवा ४४ यांत काहीही अंतर्भूत असेल तरी, उपरोक्तप्रमाणे कोणत्याही व्यक्तीस कोणतेही मानधन, आतिथ्य भत्ता किंवा सभा भत्ता मिळाल्यामुळे ती व्यक्ती परिषद-सदस्य होण्यास किंवा परिषद-सदस्य म्हणून चालू राहण्यास अनर्ह ठरणार नाही.

## (४) समित्या

**६२.** प्रत्येक 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदेसाठी एक स्थायी समिती आणि पुढील [१][सहा] विषय समित्या असतील :—

'अ' आणि 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या स्थायी समित्यांची व विषय समित्यांची नेमणूक.

(एक) सार्वजनिक बांधकाम समिती,

(दोन) शिक्षण समिती,

(तीन) स्वच्छता, वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती,

(चार) पाणीपुरवठा आणि जलनिःसारण समिती,

(पाच) नियोजन आणि विकास समिती.

[२][(सहा) महिला व बालकल्याण समिती.]

[३][ अशा कोणत्याही नगरपरिषदेने एखादा परिवहन उपक्रम संपादित व प्रस्थापित केला असेल तर, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने तिला परिवहन समिती या नावाने एक अतिरिक्त विषय समिती नेमता येईल. ]

**६३.** (१) लगतपूर्ववर्ती कलमान्वये नेमलेल्या नगरपरिषदेच्या प्रत्येक विषय समितीत, नगरपरिषद ठरवील एवढ्या परिषद-सदस्यांचा समावेश असेल. परंतु त्यामुळे विषय समितीच्या सभासदांची संख्या परिषद-सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-चतुर्थांशापेक्षा कमी किंवा एक-तृतीयांशापेक्षा अधिक होता कामा नये :

'अ' वर्ग आणि 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या विषय समित्यांची रचना.

परंतु, अशा रीतीने कोणत्याही विषय समितीच्या सभासदांची संख्या ठरविताना अपूर्णांक विचारात घेण्यात येणार नाही :

[४][परंतु आणखी असे की, महिला व बाल कल्याण समितीमधील पंचाहत्तर टक्क्यांहून कमी नसतील इतके सदस्य महिला परिषद सदस्यांमधील असतील :

परंतु तसेच, महिला व बालकल्याण समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे, तिच्या महिला परिषद सदस्यांमधील असतील.

**स्पष्टीकरण.—** पंचाहत्तर टक्के सदस्यसंख्या ठरविताना अपूर्णांक विचारात घेतले जाणार नाही ].

(२) [५][ जिल्हाधिकारी, कलम ५१ अन्वये अध्यक्षाची निवड झाल्यापासून सात दिवसांच्या आत] पुढील प्रयोजनासाठी नगरपालिकेची एक विशेष सभा भरवील :—

---

[१] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३३(अ) द्वारे " पाच " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३३(ब) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३३(ब) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ६ (अ) द्वारे " अध्यक्ष म्हणून त्याची निवड झाल्यापासून सात दिवसांच्या आत " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(क) लगतपूर्ववर्ती कलमात विनिर्दिष्ट केलेल्या [१]* * * विषय समित्यांपैकी प्रत्येक विषय समितीच्या सदस्यांची संख्या ठरविण्यासाठी आणि उपाध्यक्ष हा ज्या विषय समितीचा पदसिद्ध सभापती असेल ती विषय समिती ठरविण्यासाठी, आणि

(ख) एकल संक्रमणीय मत देऊन प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार, विहित केलेल्या रीतीने [१]* * * विषय समित्यांच्या निवडणुका घेण्यासाठी :

परंतु, अध्यक्ष हा, विषय समित्यांपैकी कोणत्याही विषय समितीचा सदस्य होण्यास पात्र असणार नाही. [२][परंतु, त्यास कोणत्याही विषय समितीच्या कामकाजाच्या संबधात बोलण्याचा आणि अन्यथा कामकाजामध्ये भाग घेण्याचा अधिकार असेल परंतु त्यास तेथे मत देण्याचा हक्क असणार नाही ].

[३][(२-क) पोट-कलम (२) अन्वये बोलाविण्यात आलेल्या सभेमध्ये, जिल्हाधिकारी किंवा या बाबतीत त्याने लेखी आदेशाद्वारे नेमलेला अधिकारी, अध्यक्ष म्हणून काम करील. नगरपरिषदेचा अध्यक्ष हा नगरपरिषदेच्या सभेत अध्यक्ष म्हणून काम करीत असताना त्याला जे अधिकार असतात तेच अधिकार अशा सभेत अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याला किंवा अशा अधिकाऱ्याला असतील, परंतु, त्यास मत देण्याचा हक्क असणार नाही.

(२-ख) कोणतेही नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासंबंधीच्या किंवा नाकारण्यासंबंधीच्या, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही परिषद सदस्यास, असा निर्णय कळवल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, संबंधित नगरपालिका प्रशासन प्रादेशिक संचालकाकडे अपील सादर करता येईल आणि त्याचवेळी त्यास अशा अपिलांची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास देता येईल. संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रादेशिक संचालक, असे अपील शक्य तेवढ्या त्वरेने, निकालात काढील. अशा अपिलावरील प्रादेशिक संचालकांचा निर्णय आणि केवळ अशा निर्णयास (तसा असल्यास), अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा, किंवा यथास्थिति, अशा अधिकाऱ्याचा, उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकृत करण्यासंबंधीचा किंवा ते नाकारण्यासंबंधीचा निर्णय, अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.]

(३) सर्व [४]* * * विषय समित्यांच्या निवडणुका घेण्यात आल्यानंतर, कोणताही परिषद सदस्य [५][चार]पेक्षा अधिक विषय समित्यांवर निवडून आल्याचे आढळून आल्यास, असा परिषद सदस्य आपल्या मर्जीनुसार त्यापैकी कोणत्याही [५][चार] विषय समित्यांचे सदस्यत्व कायम ठेवील, आणि ज्या दिनांकास अशा निवडणुका किंवा अशा निवडणुकांपैकी शेवटची निवडणूक घेण्यात आली असेल त्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या मुदतीत अशा इतर समित्यांच्या सदस्यत्वाचा राजीनामा देईल आणि त्यामुळे रिकाम्या होणाऱ्या कोणत्याही जागा असल्यास, त्या विहित केलेल्या रीतीने भरण्यात येतील.

---

[१] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ४(अ) अन्वये " पाच " हा शब्द वगळण्यात आला.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ च्या कलम १२(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ६(ब) द्वारे ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

[४] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४(ब) द्वारे " पाच " हा शब्द वगळण्यात आला.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४२ द्वारे " दोन " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१][(३क) पोट-कलम (३) मध्ये विहित केलेल्या मुदतीच्या आत, परिषदसदस्याने निवड केली नाही तर, अध्यक्ष, अशा परिषदसदस्याने ज्या [२][चार] समित्यांवर काम करायचे त्या समित्या ठरवून देईल आणि त्यांचा निर्णय अंतिम असेलआणि त्यामुळे रिकाम्या होणाऱ्या कोणत्याही जागा असल्यास त्या विहित रीतीने भरण्यात येतील.

(३ख) (एक) नगरपरिषदेने विषय समित्यांपैकी कोणत्याही विषय समितीच्या कोणत्याही सदस्याची कोणतीही रिकामी जागा किंवा सदस्यांच्या कोणत्याही रिकाम्या जागा, निवडणुकीद्वारे भरल्या नाहीत तर, किंवा नव्याने घेतलेल्या निवडणुकीत एखादा सदस्य निवडून दिला गेला नाही तर, अशी रिकामी जागा किंवा रिकाम्या जागा, या प्रकरणामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षाकडून परिषद सदस्याचे, किंवा यथास्थिति, परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करून भरण्यात येईल किंवा भरण्यात येतील.

(दोन) अध्यक्षाने खंड (एक) अन्वये नामनिर्देशित केलेले कोणतेही परिषद सदस्य हे, पोट-कलम (२)(ख), किंवा यथास्थिति, कलम ६९ अन्वये निवडून आले असल्याचे मानण्यात येईल.

(तीन) पोट-कलम (३) मधील कोणतीही गोष्ट खंड (एक) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही परिषद सदस्यास लागू होणार नाही.]

(४) प्रत्येक विषय समितीचा सभापती, (उपाध्यक्ष हा ज्या विषय समितीचा पदसिद्ध सभापती असेल त्या विषय समिती व्यतिरिक्त) पोट-कलम (२) अन्वये भरविलेल्या सभेत त्या समितीचे सदस्य निवडून देतील :

परंतु कोणताही परिषद सदस्य एकापेक्षा अधिक विषय समित्यांचा सभापती होण्यास पात्र असणार नाही.

अ वर्ग आणि ब वर्ग नगरपरिषदांच्या स्थायी समित्यांची रचना.

**६४.** कलम ६२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्थायी [३][समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल] :—

(एक) सभापती— नगरपरिषदेचा अध्यक्ष.

(दोन) सदस्य :—

(क) [४][सर्व विषय समित्यांचे] सभापती ;

(ख) विषय समित्यांच्या सदस्यांच्या निवडणुकीसाठी विहित केलेल्या रीतीने परिषद सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले तीन सदस्य :

परंतु, जो परिषद सदस्य एकापेक्षा अधिक विषय समित्यांचा सदस्य म्हणून आधीच निवडून आलेला असेल तो, स्थायी समितीचा सदस्य होण्यास पात्र असणार नाही.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम १२(ब) द्वारे पोट-कलमे (३क) आणि (३ख) समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४२ द्वारे "दोन" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] हा मजकूर "समितीमध्ये पुढीलप्रमाणे नऊ सदस्यांचा समावेश असेल" या मजकुराऐवजी, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५(अ) या द्वारे दाखल करण्यात आला.

[४] "पाच विषय समित्यांचे" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५(ड) द्वारे दाखल करण्यात आला.

क वर्ग नगरपरिषदांसाठी स्थायी आणि विषय समित्या.

**६५.** (१) प्रत्येक 'क' वर्ग नगरपरिषद एक स्थायी समिती नेमील आणि तिला [१][महिला व बालकल्याण समितीसह] आवश्यक वाटतील अशा विषय समित्या नेमता येतील.

(२) स्थायी समितीत, नगरपरिषद ठरवील इतके सदस्य समाविष्ट असतील. तथापि, अशा रीतीने ठरविलेल्या सदस्यांची संख्या, सभासदांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा अधिक होता कामा नये :

परंतु अशा रीतीने स्थायी समितीच्या सदस्यांची संख्या ठरविताना अपूर्णांक विचारात घेण्यात येणार नाहीत.

(३) नगरपरिषदेने कोणतीही विषय समिती नेमण्याचे ठरविल्यास, अशा समितीत, ती ठरवील त्याप्रमाणे, पाचपेक्षा अधिक सदस्यांचा समावेश असणार नाही.

[२][(३क) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महिला व बाल कल्याण समितीमध्ये, परिषद निश्चित करील एवढ्या सदस्यांचा समावेश असेल, मात्र अशा प्रकारे निश्चित केलेली संख्या, परिषद सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक चतुर्थांशापेक्षा अधिक असणार नाही :

परंतु, उक्त समितीमध्ये, तिच्या सदस्यांपैकी पंच्याहत्तर टक्क्यांपेक्षा कमी नसतील एवढे सदस्य महिला परिषद सदस्यांमधील असतील :

परंतु आणखी असे की, महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा व उपाध्यक्षा या तिच्या महिला परिषद सदस्यांमधील असतील.

**स्पष्टीकरण.**— पंच्याहत्तर टक्के सदस्य संख्येची गणना करण्याच्या प्रयोजनार्थ, अपूर्णांक असल्यास ती पूर्णांकात धरण्यात येईल ]

(४) [३][जिल्हाधिकारी, कलम ५१ अन्वये अध्यक्षाची निवड झाल्यापासून सात दिवसांच्या आत] पुढील प्रयोजनांसाठी नगरपरिषदेची एक विशेष सभा भरवील—

(क) स्थायी समितीच्या सदस्यांची संख्या ठरविण्यासाठी ;

(ख) विषय समिती किंवा विषय समित्या नेमावयाच्या असल्यास त्या ठरविण्यासाठी आणि अशा प्रत्येक समितीच्या सदस्यांची संख्या आणि जर अशा एकापेक्षा अधिक समित्या नेमावयाच्या असतील तर, उपाध्यक्ष हा. ज्या विषय समितीचा पदसिद्ध सभापती असेल ती विषय समिती ठरविण्यासाठी ;

(ग) कलम ६३, पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये ठरवून दिलेल्या रीतीने, स्थायी समिती व विषय समिती किंवा विषय समित्या असल्यास त्यांच्या निवडणुका घेण्यासाठी :

[४][परंतु, अध्यक्ष हा कोणत्याही विषय समित्यांचा सदस्य होण्यास पात्र असणार नाही; परंतु, त्यास कोणत्याही विषय समितीच्या कामकाजाच्या संबंधात बोलण्याचा आणि कामकाजामध्ये अन्यथा भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु, त्यास तेथे मत देण्याचा हक्क असणार नाही.]

---

[१] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, याच्या कलम २५(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २५(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम १३(अ) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[१][(४-क) पोट-कलम (४) अन्वये भरविण्यात आलेल्या सभेमध्ये, जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत त्याने लेखी आदेशाद्वारे नेमलेला अधिकारी अध्यक्ष म्हणून काम करील. नगरपरिषदेचा अध्यक्ष हा नगरपरिषदेच्या सभेत अध्यक्ष म्हणून काम करीत असताना त्याला जे अधिकार असतात तेच अधिकार अशा सभेत अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याला किंवा अशा अधिकाऱ्याला असतील. परंतु, त्यास मत देण्याचा हक्क असणार नाही.

(४-ख) कोणतेही नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासंबंधीच्या किंवा नाकारण्यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयाने व्यथित झालेल्या कोणत्याही परिषद सदस्यास असा निर्णय कळविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत संबंधित नगरपरिषद प्रशासन प्रादेशिक संचालकाकडे अपील सादर करता येईल आणि त्याचवेळी त्यास अशा अपिलाची नोटीस जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास देता येईल. संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रादेशिक संचालक, असे अपील शक्य तेवढ्या त्वरेने निकालात काढील. अशा अपिलावरील प्रादेशिक संचालकाचा निर्णय आणि केवळ अशा निर्णयास (तसा असल्यास) अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याचा किंवा यथास्थिति अशा अधिकाऱ्याचा उमेदवाराचे नामनिर्देशन स्वीकृत करण्यासंबंधीचा किंवा ते नाकारण्यासंबंधीचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.]

(५) एकापेक्षा अधिक विषय समित्या नेमावयाच्या असतील तर, उपाध्यक्ष हा ज्या विषय समितीचा पदसिद्ध सभापती होणार असेल त्या विषय समितीव्यतिरिक्त इतर विषय समितीच्या सभापतीची पोट-कलम (४) अन्वये भरविलेल्या सभेत तिच्या सदस्यांकडून निवड करण्यात येईल.

**६६.** लगतपूर्ववर्ती कलमाच्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्थायी समितीत पुढील सदस्यांचा समावेश असेल :— ('क' वर्ग नगरपरिषदांच्या स्थायी समितीची रचना.)

(क) सभापती म्हणून, नगरपरिषदेचा अध्यक्ष ;

(ख) त्या कलमाच्या पोट-कलम (४), खंड (ख) अन्वये नेमलेल्या कोणत्याही विषय समित्या असल्यास, त्यांचा सभापती आणि अशी कोणतीही विषय समिती नेमण्यात आली नसेल तर, सदस्य म्हणून उपाध्यक्ष ; आणि

(ग) कलम ६३, पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये ठरवून दिलेल्या रीतीने परिषद सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले इतर सदस्य ; तथापि स्थायी समितीच्या सदस्यांची एकूण संख्या, उक्त कलमाच्या पोट-कलम (४), खंड (क) अन्वये ठरविलेल्या संख्येपेक्षा अधिक होणार नाही ;

परंतु, एखादा परिषद सदस्य एकापेक्षा अधिक विषय समित्यांचा सदस्य म्हणून आधीच निवडून आला असेल तर, तो स्थायी समितीचा सदस्य होण्यास पात्र असणार नाही.

[३][ **६६-क.** (१) एखाद्या नगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या तीन लाखांहून अधिक असेल त्याबाबतीत, तेथे तीन प्रभाग समित्यांची रचना करण्यात येईल व अशा प्रत्येक प्रभाग समितीत नगरपरिषदेकडून ठरविण्यात येईल अशा लगतच्या मतदार प्रभागांचा समावेश असेल. (प्रभाग समित्यांची रचना.)

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ७(ब) द्वारे, पोट-कलम (४-क) व ४(ख) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४३ द्वारे कलम ६६-क समाविष्ट करण्यात आले.

(२) प्रत्येक प्रभाग समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल—

(क) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रातील प्रभागांचे प्रतिनिधित्व करणारे पालिका सदस्य ;

(ख) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्राचा प्रभारी अधिकारी ;

(ग) वरील खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या पालिका सदस्यांनी, प्रभाग समितीच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या, समाजकल्याणाच्या कार्यालयात गुंतलेल्या अशा मान्यताप्राप्त स्वयंसेवी संघटना व समाजलक्षी संघटना यांच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले, तीनपेक्षा अधिक नसेल इतक्या संख्येतील इतर सदस्य :

परंतु, अशा व्यक्तींची प्रभाग समितीच्या अधिकारितेमधील मतदार म्हणून नोंदणी झालेली असेल :

परंतु असे की, अशासकीय संघटनांना मान्यता देण्यासंबंधीची मानके, सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी आवश्यक अर्हता व त्यांच्या नामनिर्देशनाची रीत ही राज्य शासनाकडून विहित करण्यात आल्याप्रमाणे असेल.

(३) प्रभाग समितीची मुदत ही, नगरपरिषदेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.

(४) पोट-कलम (२) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले, निवडून आलेले परिषद सदस्य, प्रत्येक शासकीय वर्षातील, प्रभाग समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये, आपल्यामधून अध्यक्ष निवडून देतील आणि तो अध्यक्ष पुढील शासकीय वर्षातील पहिल्या बैठकीपर्यंत पद धारण करील.

(५) प्रभाग समितीचा अध्यक्ष, तो परिषद सदस्य असण्याचे बंद झाल्याबरोबर, त्याने आपले पद रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल.

(६) अध्यक्षाचे पद, त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वीच रिक्त होईल त्याबाबतीत, प्रभाग समिती नवीन अध्यक्ष निवडून देईल :

परंतु, अशा प्रकारे निवडून देण्यात आलेला अध्यक्ष, त्याला ज्याच्या जागी निवडून देण्यात आले असेल त्या अध्यक्षाने, जर अशा प्रकारे पद रिक्त झाले नसते तर ज्या मुदतीकरता ते पद धारण केले असते, तेवढ्याच मुदतीसाठी ते पद धारण करील.

(७) नगरपरिषदेच्या सर्वसाधारण पर्यवेक्षणास व नियंत्रणास अधीन राहून, प्रभाग समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील—

(क) पाणीपुरवठा, जलनि:सारण, स्वच्छता, पुराच्या पाण्याचा निचरा, यांसारख्या स्थानिक व अत्यावश्यक पालिका सेवांच्या संबंधातील, नागरिकांची सर्वसाधारण गाऱ्हाणी त्वरेने दूर करणे ;

(ख) अध्यक्षाकडे पाठवण्यापूर्वी, प्रभागांच्या संबंधातील अर्थसंकल्पाच्या निरनिराळ्या लेखाशीर्षाखालील खर्चाच्या अंदाजासंबंधीच्या प्रस्तावांवर विचार करणे व त्यासंबंधात शिफारशी करणे ;

(ग) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रामध्ये पार पाडावयाच्या वीस हजार रुपयांपर्यंत खर्च असणाऱ्या योजना वा परिषदेची कामे यांना प्रशासकीय मान्यता तसेच आर्थिक मंजुरी देणे ; मात्र, त्यासाठी नगरपरिषदेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पात विनिर्दिष्ट तरतूद असली पाहिजे.

(८) पोट-कलम (७) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नगरपरिषदेस ठरावाद्वारे, तिला योग्य व इष्ट वाटतील असे इतर अधिकार, प्राधिकार व कामे, प्रभाग समितीकडे सोपविता येतील.

(९) प्रभाग समितीची दरमहा किमान एकदा प्रभाग कार्यालयात बैठक होईल. ]

**६७.** नगरपरिषदेस, ती ठरवील अशा मुदतीसाठी व ती ठरवील अशा परिषद सदस्यांचा समावेश असलेल्या विशेष समित्या वेळोवेळी नेमता येतील ; आणि नगरपरिषदेस योग्य वाटतील त्याप्रमाणे नगरपरिषदेला या अधिनियमाच्या प्रयोजनांशी संबंधित असलेले विशेष विषय किंवा बाबी, अभिप्रायासाठी, चौकशीसाठी किंवा प्रतिवृत्तासाठी अशा समित्यांकडे पाठविता येतील. नगरपरिषदेस कोणत्याही वेळी अशा कोणत्याही समितीची रचना रद्द करता येईल किंवा तिच्यात फेरबदल करता येईल. अशा समितीने आपले प्रतिवृत्त किंवा अभिप्राय नगरपरिषदेकडे, स्थायी समितीकडे किंवा तिच्या कोणत्याही विषय समितीकडे पाठविण्याबाबत नगरपरिषदेस अशा समितीला निदेश देता येईल. विशेष समित्या.

[१] [ अध्यक्ष कोणत्याही विशेष समितीचा सदस्य नसेल तेव्हा, त्यास, त्या समितीच्या कामकाजाच्या संबंधात बोलण्याचा आणि कामकाजामध्ये अन्यथा भाग घेण्याचा हक्क असेल. परंतु, त्यास तेथे मत देण्याचा हक्क असणार नाही.]

**६८.** (१) स्थायी समितीच्या सभापतीचा पदावधी, अध्यक्ष म्हणून त्याचा पदावधी ज्यावेळी संपतो त्यावेळीच संपेल. स्थायी व विषय समित्यांच्या सभापतीचा व सदस्यांचा पदावधी.

(२) उपाध्यक्ष हा ज्या विषय समितीचा पदसिद्ध सभापती असेल त्या विषय समितीच्या सभापतीचा पदावधी, उपाध्यक्ष म्हणून त्याचा पदावधी ज्यावेळी संपतो त्यावेळीच संपेल.

*(३) इतर विषय समित्यांच्या सभापतीचा आणि स्थायी समितीच्या आणि सर्व विषय समित्यांच्या सदस्यांचा पदावधी हा, एक वर्ष किंवा परिषद सदस्य म्हणून त्यांच्या पदाचा उर्वरित कालावधी, यापैकी जो कालावधी कमी असेल, त्या कालावधीइतका असेल. परंतु, त्यांच्यापैकी प्रत्येक जण पुन्हा निवडला जाण्यास पात्र असेल :

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम १४ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

* सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याचे कलम २६ पुढीलप्रमाणे आहे :—

**२६.** महानगरपालिकेच्या किंवा, यथास्थिति, नगरपरिषदेच्या वेगवेगळ्या समित्यांवरील सदस्यांची संख्या, संबंधित नगरपरिषद कायद्यांमध्ये केलेल्या सुधारणांच्या आधारे वाढविण्यात आली असेल त्याबाबतीत, जमेल तितक्या लवकर, तिच्या वाढीव सदस्यसंख्येचा समावेश असलेल्या समित्यांची पुनर्रचना करण्यात येईल, आणि संबंधित नगरपरिषद कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,— समित्यांची पुनर्रचना.

(अ) वाढीव सदस्यसंख्येच्या अनुरोधाने असे सदस्य म्हणून पद धारण करणाऱ्या सदस्यांचा पदावधी, पूर्वी म्हटल्याप्रमाणे समितीच्या पुनर्रचनेच्या दिनांकास तिचा असा सदस्य म्हणून पद धारण करणाऱ्या सदस्यांच्या पदावधीच्या समाप्तीबरोबरच समाप्त होईल ;

(ब) कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, वाढीव जागांवरील कोणतेही सदस्य, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास सुरू होणाऱ्या व समितीच्या पुनर्रचनेच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत पद धारण करण्यासाठी उपलब्ध नव्हते त्याच केवळ कारणामुळे अवैध असल्याचे समजण्यात येणार नाही ; आणि

(क) केवळ पूर्वोक्त कारणावरून कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे किंवा अधिकाऱ्यापुढे अशा कृतीच्या किंवा कार्यवाहीच्या वैधतेस हरकत घेता येणार नाही.

**स्पष्टीकरण.**— " संबंधित नगरपालिका कायदा " म्हणजे,—

(अ) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्याबाबतीत, मुंबई महानगरपालिका अधिनियम ; १८८८ चा मुंबई ३.

(ब) नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ ; १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(क) अन्य कोणत्याही शहराच्या महानगरपालिकेच्याबाबतीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ ; १९४९ चा मुंबई ५९.

(ड) नगरपरिषदेच्याबाबतीत, ** महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५. ". १९६५ चा महाराष्ट्र ४०.

** आता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

परंतु, असा कोणताही सभापती हा, नगरपरिषदेच्या परवानगीने किंवा परवानगीशिवाय नगरपालिका क्षेत्रातून एक वर्षात एकूण सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी पर्यंत गैरहजर राहिल्यास, तो सभापती असण्याचे बंद होईल.

नगरपरिषदेच्या समित्यांत झालेल्या नैमित्तिक रिकाम्या जागा.

**६९.** कोणत्याही कारणास्तव, नगरपरिषदेच्या कोणत्याही समितीत एखादी जागा रिकामी झाल्यास ज्या सदस्यांची जागा भरावयाची असेल, तो सदस्य ज्या तरतुदीन्वये निवडून आला असेल त्याच तरतुदीच्या अधीन शक्य तितक्या लवकर, त्या जागेवरील सदस्याची निवडणूक करून ती जागा भरली जाईल.

स्थायी समिती आणि विषय समित्या यांची कार्ये व अधिकार.

**७०.** प्रत्येक नगरपरिषद पुढील बाबींची तरतूद करण्यासाठी उप-विधी तयार करील,—

(क) स्थायी समितीला व विषय समित्यांना (कोणत्याही असल्यास) विषय नेमून देणे :

परंतु, [1][वित्त व्यवस्था आणि सफाई कामगारवर्गाचे कल्याण आणि जेथे परिवहन समिती नेमलेली नसेल तेथे, परिवहन उपक्रम हा विषयही, स्थायी समितीकडे नेमून देण्यात येईल] आणि जत्रा व यात्रेकरू हे विषय स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समितीला नेमून देण्यात येतील व जेथे अशी समिती नेमलेली नसेल तेथे स्थायी समितीकडे नेमून देण्यात येतील.

(ख) स्थायी समितीने व विषय समित्यांनी (कोणत्याही असल्यास), त्यांच्याकडे नेमून दिलेल्या विषयांच्या संबंधात, हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही इतर कायदा या अन्वये नगरपरिषदेचे जे अधिकार वापरावयाचे, त्यांची व्याप्ती.

कलम ७० खालील उपविधी संचालकांच्या पूर्वमंजुरीच्या अधीन असणे.

**७१.** कलम ३२२ च्या तरतुदींमध्ये काहीही असले तरी, लगतपूर्ववर्ती कलमानुसार केलेले उप-विधी, संचालकाच्याही पूर्वमंजुरीच्या अधीन असतील.

आवश्यक असल्यास, नगरपरिषदेने किंवा विशेष विषय समितीने स्थायी समितीच्या किंवा विशेष समितीच्या अधिकारांचा वापर करणे व कर्तव्ये पार पाडणे.

[2]**[७१-क.** ज्यावेळी स्थायी समिती किंवा कोणतीही विषय समिती, कोणत्याही कारणामुळे या अधिनियमानुसार किंवा तद्न्वये तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यास किंवा तिच्यावर लादण्यात आलेली कोणतीही कर्तव्ये व कामे पार पाडण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत, नगरपरिषदेस संचालकांच्या पूर्वमंजुरीने, अशा अधिकारांचा वापर करता येईल किंवा अशी कर्तव्ये व कामे पार पाडता येतील किंवा तशाच मंजुरीने विशेष विषय समिती नेमता येईल व अशी विशेष विषय समिती स्थायी समितीच्या किंवा यथास्थिति विषय समितीच्या अधिकारांचा वापर करील व तिची कर्तव्ये व कामे पार पाडील असा निदेश देता येईल.]

---

[1] या मजकुराऐवजी सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ६ अन्वये हा भाग " वाहतूक उपक्रम, वित्त व्यवस्था व साफसफाई कर्मचाऱ्यांचे कल्याण हे विषय स्थायी समितीस वाटून देण्यात येतील ", दाखल करण्यात आला.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४५ कलम ५ द्वारे, कलम ७१-क समाविष्ट करण्यात आले.

[१] **[७२.** नगरपरिषद क्षेत्राच्या निरनिराळ्या वर्गांच्या नगरपरिषदांच्या स्थायी समितीचे आणि विषय समित्यांचे वित्तीय मंजुरी देण्याचे अधिकार, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) व (३) मध्ये दर्शविलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असणार नाहीत

वित्तीय मंजुरीच्या बाबतीत समित्यांच्या आणि [२] [नगर परिषदेच्या] अधिकारांच्या मर्यादा.

| [३] [नगरपालिका क्षेत्राचा वर्ग | पुढील समित्यांच्या बाबतीतील वित्तीय मंजुरीच्या मर्यादा | |
|---|---|---|
| | स्थायी समिती | विषय समिती |
| (१) | (२) | (३) |
| | रुपये | रुपये |
| 'अ' .. .. | ५,००,००० | १,००,००० |
| 'ब' .. .. | २,५०,००० | ५०,००० |
| 'क' .. .. | १,००,००० | २५,००० ] : |

परंतु, [४] [स्थायी समिती किंवा नगरपरिषद] 'अ' किंवा 'ब' वर्ग नगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत [५] [७५,००० रुपयांपेक्षा] अधिक खर्चाचा आणि 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत [६] [४०,००० रुपयांपेक्षा] अधिक खर्चाचा रस्ता, पूल, इमारत किंवा पाणीपुरवठा किंवा जलनि:सारण योजना यांसारखे बांधकाम अंतर्भूत असलेल्या कोणत्याही प्रकल्पास किंवा योजनेस, अशा प्रकल्पास किंवा योजनेस राज्य शासन पदनिर्देशित करील अशा राज्य अभियांत्रिकी सेवेतील अधिकाऱ्यांची तांत्रिक पूर्वमंजुरी घेतलेली नसेल किंवा नगरपरिषदेने, कलम ७५, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या नगरपरिषदेच्या अभियंत्यांची किंवा जलदाय व्यवस्था अभियंत्यांची नेमणूक केली असेल आणि अशा अभियंत्यास याबाबतीत राज्य शासनाकडून मान्यता मिळाली असेल व तो त्या योजनेशी संबंधित असेल तर अशा अभियंत्याची, त्यासाठी तांत्रिक पूर्वमंजुरी घेतली नसेल तर, मंजुरी देणार नाही.]

समित्या नगर-परिषदेच्या अधीन असणे.

**७३.** (१) सर्व विषय समित्या नगरपरिषदेबरोबर स्थायी समितीच्यासुद्धा अधीन असतील.

(२) स्थायी समिती ही नगरपरिषदेच्या अधीन असेल.

(३) विषय समित्या, शक्य होईल तितक्या लवकर, आपले सर्व निर्णय स्थायी समितीस माहितीसाठी कळवतील.

(४) स्थायी समिती, शक्य होईल तितक्या लवकर, विषय समित्यांच्या निर्णयावरील आपल्या निर्णयासह, आपले सर्व निर्णय नगरपरिषदेस तिच्या माहितीसाठी कळवील.

(५) नगरपरिषदेने, एखाद्या विषय समितीस दिलेले निदेश आणि त्या विषय समितीस स्थायी समितीने दिलेले निदेश, यात विरोध निर्माण झाला असेल तर, अशा प्रसंगी नगरपरिषदेने दिलेले निदेश सर्व बाबतीत अधिभावी ठरतील.

---

१ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ५ द्वारे कलम ७२ दाखल करण्यात आले.

२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ च्या कलम १५(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४६(अ) द्वारे मूळ तक्त्याऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

४ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १५(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४६(ब)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ४६(ब)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण चार

## नगरपालिका प्रशासन संचालक आणि जिल्हाधिकारी

नगरपालिका प्रशासन संचालकाची आणि प्रादेशिक संचालकांची नेमणूक व त्यांचे अधिकार व जिल्हाधिकाऱ्याचे अधिकार.

**७४.** (१) राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नगरपालिका प्रशासन संचालकाची नेमणूक करील. त्याची संपूर्ण राज्यावर अधिकारिता असेल. राज्य शासनास, तशाच अधिसूचनेद्वारे प्रादेशिक नगरपालिका प्रशासन संचालकांची नेमणूक करता येईल व राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा राज्याच्या क्षेत्रावर त्यांची अधिकारिता असेल.

(२) संचालक व प्रत्येक जिल्ह्याचा जिल्हाधिकारी या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाद्वारे त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करतील व लादलेली कर्तव्ये पार पाडतील. राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाद्वारे त्यास दिलेला (नियम करण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त) कोणताही अधिकार किंवा त्याच्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परिस्थितीत व अशा शर्तींवर (तशी शर्त असल्यास) संचालकाकडून किंवा जिल्हाधिकाऱ्याकडून वापरली जाईल किंवा पार पाडली जाईल.

(३) प्रत्येक प्रादेशिक संचालक व प्रत्येक सहायक व उप-जिल्हाधिकारी आपापल्या अधिकारितेत, अनुक्रमे संचालकास आणि जिल्हाधिकाऱ्यास जे अधिकार दिलेले असतील किंवा प्रत्यायोजित केले असतील व जी कर्तव्ये लादलेली असतील किंवा सोपविलेली असतील त्यापैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास किंवा कोणतेही कर्तव्य पार पाडण्यास सक्षम असेल :

परंतु, यथास्थिति, संचालकास किंवा जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, तो याबाबतीत आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील असे अधिकार व कर्तव्ये, स्वतःकडे राखून ठेवता येतील.

(४) प्रादेशिक संचालक आणि सहायक व उप-जिल्हाधिकारी, हे, आपल्या अधिकारांचा वापर करताना व आपली कर्तव्ये पार पाडताना अनुक्रमे संचालक व जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणास व देखरेखीस अधीन असतील.

## प्रकरण पाच

## अधिकारी आणि कर्मचारी यासंबंधीच्या तरतुदी

मुख्य अधिकारी, अभियंता, जलदाय व्यवस्था अभियंता, आरोग्य अधिकारी, लेखा परीक्षक, [१] [ शिक्षण अधिकारी आणि अग्निशमन अधिकारी ] व इतर विवक्षित अधिकारी यांची नेमणूक.

**७५.** (१) प्रत्येक नगरपरिषदेसाठी एक मुख्य अधिकारी असेल.

(२) नगरपरिषदेस संचालकाच्या मंजुरीने आणि राज्य शासनाने तसे फर्माविल्यास पुढील पदांपैकी सर्व किंवा कोणतीही पदे निर्माण करता येतील :—

(एक) नगरपालिका अभियंता ;

(दोन) जलदाय व्यवस्था अभियंता ;

(तीन) नगरपरिषद आरोग्य अधिकारी ;

(चार) नगरपरिषद लेखा परीक्षक ;

(पाच) नगरपरिषद शिक्षण अधिकारी ;

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३(ब) द्वारे " आणि शिक्षण अधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(पाच-क) नगरपरिषद अग्निशमन अधिकारी ;]

[२][(सहा) करनिर्धारक व कर समाहारक ;]

[३][(सात)] राज्य शासन याबाबतीत पदनिर्देशित करील असा कोणताही इतर अधिकारी.

(३) [४][कलम ७५-क च्या तरतुदींस अधीन राहून,] पोट-कलम (१) व (२) यात विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांची अर्हता, त्यांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती तसेच त्यांच्या सेवाप्रवेशाची पद्धती या गोष्टींचे विनियमन राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे केले जाईल.

(४) [५][कलम ७५-क च्या] तरतुदींच्या अधीन राहून, पोट-कलम (१) व (२) यात विनिर्दिष्ट केलेल्या पदांवर नेमणूक करण्याचा अधिकार नगरपरिषदेकडे निहित राहील.

[६] * * * * *

महाराष्ट्र नगरपरिषद सेवा स्थापन करणे व त्या संबंधीच्या तरतुदी.

[७][**७५-क.** (१) या अधिनियमानुसार किंवा तद्न्वये असलेली कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी सेवेच्या एकरूप अटी व शर्ती असलेली नगरपरिषदांच्या अधिकाऱ्यांची अधिक कार्यक्षम सेवा तयार करण्याच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनास, त्यास आवश्यक व इष्ट वाटेल तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,-

(क) सर्व नगरपरिषदांसाठी किंवा नगरपालिका क्षेत्रांच्या कोणत्याही वर्गासाठी असलेल्या नगरपरिषदांच्या संबंधात—

(एक) अशा नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी, आणि

(दोन) कलम ७५, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले व ज्यांचे किमान वेतन (भत्ते वगळून) दरमहा २२५ रुपयांहून कमी नसेल असे सर्व किंवा कोणतेही इतर अधिकारी, यांची नगरपालिका सेवा (अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पदनामाने संबोधावयाची) प्रस्थापित करता येईल ;

(ख) अशी प्रत्येक नगरपालिका सेवा ही, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे वर्ग, संवर्ग आणि पदे (पदांच्या वेतनश्रेणी धरून), यांची मिळून बनलेली असेल आणि अशा प्रत्येक वर्गामधील किंवा संवर्गामधील, अधिकाऱ्यांची प्रारंभिक संख्या, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी असेल, असा वेळोवेळी निदेश देता येईल, आणि

(ग) आणखी असा निदेश देता येईल की, अशा कोणत्याही वर्गात किंवा संवर्गात अंतर्भूत केलेले अधिकारी हे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी असतील.

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३(अ) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, याच्या कलम १२(अ) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १२(ब) द्वारे या खंडास हा नवीन क्रमांक देण्यात आला.

[४] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, याच्या कलम २(१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २(२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २(३) द्वारे पोट-कलमे (५), (६) व (७) वगळण्यात आली.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे कलम ७५-क समाविष्ट करण्यात आले.

(२) राज्य शासनास, या कलमान्वये किंवा अन्यथा स्थापन करण्यात आलेल्या नगरपालिका सेवांमध्ये कोणत्याही नगरपालिकेच्या अधीन आधीपासूनच काम करीत असलेल्या व्यक्तींच्या समावेशनाची तरतूद करून आणि समावेशन करून घेण्याची ज्यांची इच्छा नसेल किंवा ज्यांचे समावेशन शक्य नसेल किंवा ज्यांनी सेवानिवृत्त होण्याचे ठरविले असेल त्यांच्यासाठी भरपाई, निवृत्तिवेतन किंवा उपदान किंवा तत्सम अंतिम फायदे यांसाठीची तरतूद करून, परीक्षा घेऊन किंवा अन्य रीतीने, सेवा प्रवेशाच्या पद्धतीचे आणि अशा नगरपालिका सेवांमध्ये नेमलेल्या किंवा त्यात सामावून घेतलेल्या व्यक्तींच्या सेवेच्या शर्ती यांचे विनियमन करण्यासाठी नियम करता येतील ; आणि या कलमान्वये प्रस्थापित केलेल्या अशा नगरपालिका सेवांमध्ये नेमलेल्या किंवा समावेशन केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, कलम ७९ च्या तरतुदी लागू असण्याचे बंद होईल :

परंतु, अशा रीतीने तरतुदी लागू असण्याचे बंद होणे हे, समावेशन झालेल्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत अशा समावेशनापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत कलम ७९ च्या पूर्वीच्या प्रवर्तनावर परिणामक होणार नाही :

परंतु, आणखी असे की, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी कोणत्याही अधिकाऱ्याला लागू असलेल्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय त्याला गैरफायदेशीर होतील अशा रीतीने बदलण्यात येणार नाहीत.

(३) पोट-कलम (२) अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये तरतूद केली असेल त्याशिवाय, वेळोवेळी सुधारण्यात आल्याप्रमाणे आणि त्या त्यावेळी राज्यात अंमलात असलेले आणि राज्य शासनाच्या सेवेतील संबंधित वर्गातील अधिकाऱ्यांना लागू असलेले सर्व नियम, विनियम किंवा आदेश, हे अशा कोणत्याही सेवेत नेमलेल्या किंवा सामावून घेतलेल्या अधिकाऱ्यांना लागू असण्याचे चालू राहील आणि ते, या बाबतीत इतर कोणतेही नियम, विनियम किंवा आदेश करण्यात येईपर्यंत किंवा राज्य शासन, वेळोवेळी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि कोणत्याही इतर विहित रीतीने करील अशा फेरबदलांस अधीन राहून, या अधिनियमाद्वारे करण्यात आलेले नियम, विनियम किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

(४) कलम ७५, पोट-कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पदोन्नती, बदल्या आणि सेवेच्या कोणत्याही शर्तींशी संबंधित अशा सर्व बाबी धरून, या कलमान्वये कोणत्याही नगरपरिषदेवरील अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे किंवा या प्रयोजनाकरिता राज्य शासनाकडून रीतसर प्राधिकृत करण्यात आलेल्या, शासनाच्या उपसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे निहित असेल.

[१][(५) या कलमान्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही नगरपालिका सेवेत असलेले अधिकारी हे, राज्य शासनाचे कर्मचारी असतील, परंतु, त्यांना त्यांचे वेतन व भत्ते हे नगरपालिका निधीमधून थेट मिळतील.]

---

१ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३८(१) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (५) दाखल करण्यात आले.

(६) या कलमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही नगरपालिका सेवेतील अधिकाऱ्याचे [1][ * * ] निवृत्तिवेतन, रजा आणि [2][पोट-कलम (५) अन्वये नगरपालिका निधीमधून मिळणाऱ्या भत्त्याव्यतिरिक्त भत्ते] याबद्दल राज्य शासन निर्धारित करील असा खर्च, आणि या कलमान्वये स्थापन करण्यात आलेल्या नगरपालिका सेवेच्या किंवा सेवांच्या प्रशासनासाठी राज्य शासनाने केलेले सर्व खर्च, नगरपालिका निधीमधून दरवर्षी राज्य शासनास, देण्यात येतील. याबाबतीत विहित करण्यात आलेल्या कालावधीत, असे खर्च [3][किंवा अशा अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते] देण्यात कोणत्याही नगरपरिषदेने कसूर केली तर, कलम ३१२ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदी, त्या कलमान्वये न दिलेला खर्च आणि पारिश्रमिक देण्याच्या संबंधात त्या जशा लागू होतात त्याचप्रमाणे, असे खर्च [3][किंवा, अशा अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते] देण्याच्या बाबतीत लागू होतील.

इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक.

**७६.** (१) [4][कलम ७५ ची] पोट-कलमे (१) व (२) यात विनिर्दिष्ट केलेल्या पदांखेरीज या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये कार्यक्षमतेने बजावण्याकरिता, अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नगरपरिषदेस आवश्यक वाटतील अशी कोणतीही पदे तिला संचालकाच्या मंजुरीने निर्माण करता येतील.

[5][(२) पोट-कलम (३) च्या तरतुदींस अधीन राहून, राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थ वर्ग पदांच्या समतुल्य पदांव्यतिरिक्त, अशा कोणत्याही अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या अर्हता, वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती, ह्या संचालककाकडून काढण्यात आलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करण्यात येतील. राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थ वर्ग पदांच्या समतुल्य पदांच्या बाबतीतील अर्हता, वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती तसेच सेवाप्रवेशाची पद्धती, याबाबतीत नगरपरिषदेकडून करण्यात आलेल्या उपविधींद्वारे निर्धारित करण्यात येतील.

(३) या बाबतीत राज्य शासनाकडून वेळोवेळी काढण्यात येतील अशा कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पोट-कलम (१) अन्वये निर्माण करण्यात आलेल्या पदांवरील नियुक्त्या, मुख्य अधिकाऱ्यांकडून, राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, निवड प्राधिकरणाने किंवा अशा अन्य मंडळाने निवडलेल्या उमेदवारांच्या यादीमधून करण्यात येतील.]

[6][(४) कोणतीही नगरपरिषद, ज्या व्यक्तीला पंधरा वर्षे पूर्ण झालेली नसतील अशा कोणत्याही व्यक्तीस, आपल्या सफाई कामगार वर्गातील कर्मचारी म्हणून सेवा करण्यासाठी नोकरीवर ठेवणार नाही.]

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३८(२)(अ) द्वारे " वेतन " हा शब्द वगळण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३८(२)(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३८(२)(क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] हा मजकूर सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[5] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १३ द्वारे ही पोट-कलमे मूळ पोट-कलमाऐवजी दाखल करण्यात आली.

[6] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ६ अन्वये पोट-कलम (४) ची भर घालण्यात आली.

मुख्य अधिकाऱ्याचे अधिकार आणि कर्तव्ये.

७७. (१) मुख्य अधिकारी—

(क) अध्यक्षांच्या नियंत्रणास, निदेशास व पर्यवेक्षणास अधीन राहून, नगरपरिषदेच्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर देखरेख ठेवील आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास दिलेल्या अधिकारांचा वापर करील आणि त्याच्यावर या अधिनियमाद्वारें किंवा तद्न्वये लादण्यात आलेली किंवा त्याच्याकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये व कामे पार पाडील ;

(ख) नगरपरिषदेचे सर्व निर्णय किंवा तिचे सर्व ठराव यांची अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करील ;

(ग) नगरपरिषदेचे लेखे व नोंदवह्या ठेवण्याची व्यवस्था करवील आणि त्यावर देखरेख ठेवील ;

(घ) सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशांना अधीन राहून, नगरपरिषद लेखा परीक्षकाने दर्शविलेली कोणतीही नियमबाह्यता दूर करण्यासाठी त्वरित उपाययोजना करील ;

(ङ) अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील आणि ते स्थायी समितीस सादर करील ;

(च) नगरपरिषदेचा पैसा आणि तिची मालमत्ता यांच्या संबंधात झालेली लबाडी, अपहार, चोरी किंवा हानीची सर्व प्रकरणे अध्यक्षास व संबंधित समितीस कळवील ;

(छ) नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या कृत्यांवर आणि कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवील ;

(ज) या अधिनियमान्वये केलेल्या नियमांस व उप-विधिस आणि तसेच तद्न्वये काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन राहून, नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांच्या संबंधातील वेतन व भत्ते, रजा व इतर विशेषाधिकार यांसारखे सर्व प्रश्न निकालात काढील.

[१][ (१-क) 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रासाठी असलेल्या प्रत्येक परिषदेचा मुख्य अधिकारी, त्या पालिका क्षेत्रातील पर्यावरणाच्या स्थितीबाबतचा, राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा बाबींचा समावेश असलेला लगतपूर्ववर्ती सरकारी वर्षासंबंधीचा अहवाल राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा रीतीने दरवर्षी ३१ जुलैपूर्वी परिषदेपुढे ठेवील. ]

(२) [२][अध्यक्षांच्या मंजुरीने] मुख्य अधिकाऱ्यास, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यास देण्यात आलेल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार किंवा त्याच्यावर लादण्यात आलेली अथवा त्याच्याकडे सोपविलेली कर्तव्ये व कामे यांपैकी कोणतीही कर्तव्ये व कामे ही, कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्यांकडे प्रत्यायोजित करता येतील :

परंतु, असे अधिकार, कर्तव्ये व कामे अशा रीतीने प्रत्यायोजित करणे हे, त्यासंबंधात नगरपरिषदेने विहित करून दिल्या असतील अशा मर्यादांच्या अधीन असेल आणि तसेच त्यावर मुख्य अधिकाऱ्यांचे नियंत्रण असेल व त्यास त्यासंबंधात पुनरीक्षण करता येईल.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४४ द्वारे पोट-कलम (१-क) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ **७७-क.** नगरपरिषद आपल्या मुख्य अधिकाऱ्याला पुढील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या दराने आतिथ्य भत्ता देईल :— मुख्य अधिकाऱ्याला आतिथ्य भत्ता देणे.

| [२][नगरपालिका क्षेत्राचा वर्ग | दरसाल द्यावयाच्या आतिथ्य भत्त्याची रक्कम |
|---|---|
| (१) | (२) |
| | रुपये |
| 'अ' | ३,००० |
| 'ब' | २,००० |
| 'क' | १,५००] |

**७८.** मुख्य अधिकाऱ्यांखेरीज नगरपरिषदेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये, स्थायी समिती वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील. इतर अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये.

**७९.** (१) त्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना बाध येऊ न देता, [३][आणि कलम ७५-क च्या तरतुदीस आणि त्या अन्वये केलेल्या नियमांस अधीन राहून], नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला सबळ कारणांवरून पुढील शास्ती देता येतील :— अधिकारी व कर्मचारी यांना शिक्षा.

(एक) ठपका देणे ;

(दोन) वेतनवाढ किंवा पदोन्नती रोखणे तसेच दक्षतारोधावर रोखून धरणे ;

(तीन) नियत वेतनावर किंवा समयश्रेणीवर पदावनती किंवा समयश्रेणीतील खालच्या पायरीवर आणणे ;

(चार) त्याने हयगय केल्यामुळे किंवा आदेशांचा भंग केल्यामुळे नगरपरिषदेची जी कोणतीही आर्थिक हानी झाली असेल ती संपूर्ण हानी किंवा तिचा भाग त्याच्या वेतनातून वसूल करणे ;

(पाच) द्रव्यदंड ;

(सहा) निलंबन ;

(सात) ज्यामुळे तो भविष्यात नोकरीकरिता अनर्ह ठरणार नाही अशा रीतीने त्यास सेवेतून दूर करणे ;

(आठ) ज्यामुळे सर्वसाधारणतः तो भविष्यात नोकरीकरिता अनर्ह ठरेल अशा रीतीने त्यास सेवेतून बडतर्फ करणे.

(२) नगरपरिषदेच्या एखाद्या अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याला त्या अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या शास्तीपैकी कोणतीही शास्ती लादता येईल :

[४]* * * * * *

[५][ परंतु, मुख्य अधिकारी, नगरपरिषदेने नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, नगरपरिषदेकडून आदेश मिळेपर्यंत, निलंबित करू शकेल ; आणि मुख्य अधिकारी अशा प्रत्येक निलंबनाबाबत, त्यासंबंधीच्या कारणासह, नगरपरिषदेला ताबडतोब कळवील. [६][ आणि असे निलंबन चौकशी पूर्ण होईपर्यंत चालू राहील ;

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १६ द्वारे ७७क हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ४७ द्वारे हा तक्ता समाविष्ट करण्यात अला.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या अनुसूचीद्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

[५] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १५(अ) द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[६] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १३(अ) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

परंतु आणखी असे की, अशी चौकशी सहा महिन्यांच्या कालावधीत पूर्ण झाली नाही तर, चौकशी पूर्ण होण्यास झालेल्या विलंबाच्या कारणांची तपासणी केल्यानंतर जिल्हाधिकारी विलंबन आदेश रद्द करील किंवा त्याची मुदत सहा महिन्यांसाठी वाढवील :

परंतु आणखी असे की, अशी चौकशी एकूण एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण झाली नाही तर, संबंधित मुख्य अधिकारी ताबडतोब प्रादेशिक संचालकाकडे निलंबन कालावधी आणखी वाढवून देण्याची मागणी करील आणि प्रादेशिक संचालकाला निलंबन आदेश रद्द करता येईल किंवा लेखी कारणे नमूद करून एकावेळी तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतकी आणखी मुदतवाढ देता येईल, मात्र, निलंबनाचा एकूण कालावधी अठरा महिन्यांपेक्षा अधिक होणार नाही. एकूण अठरा महिन्यांच्या कालावधीत चौकशी पूर्ण होणार नाही त्या बाबतीत कोणतीही आणखी मुदतवाढ देण्याचा अधिकार राज्य शासनाला असेल. अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची चौकशी करण्यात येईपर्यंत अशा अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे असे निलंबन हे शास्ती असल्याचे मानण्यात येणार नाही.]

परंतु [१][असे की,] मुख्य अधिकाऱ्यास, कोणत्याही सबळ व पुरेशा कारणांवरून, नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर, पोट-कलम (१) च्या खंड (एक), (दोन), (चार), (पाच) व (सहा) मध्ये विनिर्दिष्ट केलेली किंवा केलेल्या कोणत्याही लहान शास्ती लादता येतील :

परंतु, तसेच,—

(एक) परिषद कर्मचाऱ्याने धारण केलेले पद हे, राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थ वर्ग पदाला समतुल्य असेल तर, स्थायी समिती, अशा कर्मचाऱ्यावर, खंड (तीन), (सात) व (आठ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शास्ती लादू शकेल आणि अशा कर्मचाऱ्यावर अध्यक्षाने शास्ती लादावी असे नगरपरिषदेने ठरविल्यास, अध्यक्ष अशी शास्ती लादू शकेल ;

(दोन) त्या अधिकाऱ्याने धारण केलेले पद, राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थ वर्ग पदाच्या दर्जाहून वरच्या दर्जाचे असेल तर, अशा अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर, नगरपरिषद, अशी शास्ती लादू शकेल किंवा अशा अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर स्थायी समितीने शास्ती लादावी असे नगरपरिषदेने ठरविल्यास, स्थायी समिती अशी शास्ती लादू शकेल. ]

(३) कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, त्याची पदावनती किंवा त्यास सेवेतून दूर करणे किंवा बडतर्फी यासंबंधात कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज त्याची या कलमान्वये पदावनती केली जाणार नाही किंवा त्यास सेवेतून दूर किंवा बडतर्फ केले जाणार नाही :

परंतु,—

(क) एखाद्या व्यक्तीस तिच्या वर्तणुकीमुळे एखाद्या गुन्ह्याच्या आरोपावरून सिद्धापराध ठरविण्यात आल्यामुळे त्या व्यक्तीची पदावनती करण्यात आली असेल किंवा सेवेतून दूर किंवा बडतर्फ करण्यात आले असेल तर, अथवा ;

(ख) अशा व्यक्तीस आपले कारण दर्शविण्याची संधी देणे वाजवीरीत्या व्यवहार्य होणार नाही अशी सक्षम प्राधिकाऱ्याची त्याने लेखी नोंदवून ठेवावयाच्या कारणावरून खात्री झाली असेल तर ;

त्याबाबतीत हे पोट-कलम लागू होणार नाही.

[२][ (४) राज्य शासनाच्या सेवेतील, चतुर्थवर्ग पदाच्या दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे पद कायमस्वरूपी धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय पदावरून दूर करण्यांचा किंवा बडतर्फीचा कोणताही आदेश दिला जाणार नाही.]

[१] वरील अधिनियमाच्या कलम १३(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १८ याच्या कलम १५(ब) द्वारे मूळ पोट-कलम (४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(५) लगतपूर्ववर्ती पोट-कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याकडे निर्णयार्थ पाठविलेल्या प्रत्येक प्रकरणात,—

(एक) चौकशीतील मिष्कर्ष हा विपर्यस्त स्वरूपाचा आहे ; अथवा

(दोन) यथास्थिति, सेवेतून दूर करण्याची किंवा बडतर्फ करण्याची शास्ती ही अत्यंत कडक आहे, अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाली नसेल तर, अशा प्रसंगी जिल्हाधिकारी आपली मान्यता देण्यास नकार देणार नाही.

चौकशीतील निष्कर्ष विपर्यस्त स्वरुपाचा असल्याचे जिल्हाधिकारी नगरपरिषदेस किंवा स्थायी समितीस कळवील, तर अशा प्रसंगी, त्याच बाबीच्या संबंधात संबधित अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणतीही आणखी कार्यवाही करण्यात येणार नाही.

(६) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेली कोणतीही शास्ती करण्याबद्दल दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध, अशी शास्ती करणाऱ्या प्राधिकाऱ्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल. असे प्राधिकारी पुढे नमूद करण्यात आले आहेत :—

| **शास्ती करणारे प्राधिकरण** | | **ज्याच्याकडे अपील करता येईल असे वरिष्ठ प्राधिकरण** |
|---|---|---|
| (एक) मुख्य अधिकारी | . . | स्थायी समिती |
| (दोन) स्थायी समिती | . . | नगरपरिषद |
| (तीन) नगरपरिषद | . . | संचालक. |

(७) ज्या आदेशाविरुद्ध अपील करावयाचे असेल तो आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून असे अपील करण्यात आले नसेल तर, असे कोणतेही अपील दाखल करून घेता येणार नाही.

[१][**७९-क.** कलम ७९ मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परिषदेच्या ज्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलिसांकडून किंवा इतर कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल. त्यास मंजुरी देण्यास मुख्य अधिकारी सक्षम असेल, मुख्य अधिकारी, अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती परिषदेच्या पुढील सभेमध्ये नगर परिषदेला देईल.]:

परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या खटला भरण्याच्या कार्यवाहीस मंजुरी देणे.

**८०.** कलम ७५, पोट-कलमे (१) व (२) मध्ये उल्लेखिलेल्या नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त आपल्या इतर अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या संबंधात, प्रत्येक नगरपरिषद पुढील गोष्टींबाबत उपविधि तयार करील :—

सेवेच्या विवक्षित शर्तींचे विनियमन करण्यासंबंधी उप-विधी करणे.

(क) ज्या कर्मचाऱ्यास नगरपरिषदेच्या मालकीची मालमत्ता, रोख रक्कम किंवा तिचे रोखे यांच्या संबंधात व्यवहार करावा लागत असेल अशा कोणत्याही कर्मचाऱ्याने किंवा ज्याच्याकडून प्रतिभूती घेणे इष्ट आहे असे वाटत असेल अशा कोणत्याही इतर कर्मचाऱ्याने द्यावयाची प्रतिभूतीची रक्कम व स्वरूप निश्चित करणे ;

(ख) कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या रजेचे आणि त्यांच्या रजेमुळे अनुपस्थित असतानाच्या काळात त्यांना द्यावयाच्या रजावेतनांचे व भत्त्याचे विनियमन करणे ;

(ग) उक्त कर्मचाऱ्यांच्या रजेवरील अनुपस्थितीत त्या कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही कर्मचाऱ्यांच्या बदली काम करण्याकरिता नेमण्यात आलेल्या व्यक्तींना द्यावयाचे पारिश्रमिक ठरविणे ;

(घ) कर्मचाऱ्यांच्या प्रवास भत्त्याच्या किंवा वाहन भत्त्याच्या रकमेचे प्रदान प्राधिकृत करणे ;

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११ याच्या कलम ४८ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(ङ) सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधीचे विनियमन करणे ;

(च) असे कर्मचारी किंवा त्यापैकी कोणताही कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर किंवा त्यास कार्यमुक्त करण्यात आल्यावर अथवा त्यास कोणत्याही प्रकारे इजा झाल्यामुळे किंवा नि:समर्थता प्राप्त झाल्यामुळे त्यास ज्या शर्तीवर निवृत्तवेतन, उपदान किंवा अनुकंपा भत्ता मिळेल त्या शर्ती ; तसेच, त्याच्या वारसांना किंवा त्याच्या पश्चात हयात असलेल्या नातलगांना ज्या शर्तींवर असे निवृत्तिवेतन, उपदान किंवा अनुकंपा भत्ता मिळेल त्या शर्ती आणि अशा निवृत्तिवेतनाचा, उपदानाचा व अनुकंपा भत्त्याचा दर किंवा त्याची रक्कम ठरविणे ;

(छ) कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी स्थापन करण्यात येईल अशा कोणत्याही सेवानिवृत्त किंवा भविष्यनिर्वाह निधीस नगरपालिका निधीतून अंशदान देणे, प्राधिकृत करणे ;

(ज) कोणत्याही कर्मचाऱ्यास त्याच्या निलंबनाच्या कालावधीत, चौकशी होईपर्यंत, वेतनाऐवजी द्यावयाचा निर्वाह भत्ता ठरविणे ;

[१][ (झ) राज्य शासनाच्या सेवेतील चतुर्थवर्ग पदांच्या समतुल्य पदांच्या सेवाप्रवेशाची पद्धती व अर्हता, वेतन, भत्ते तसेच सेवेच्या इतर शर्ती निर्धारित करणे :

परंतु, या कलमात उल्लेखिलेल्या कोणत्याही किंवा सर्व बाबींसंबंधात, पूर्वी किंवा नंतर कोणतेही उपविधी केले असल्यास, असे उपविधि, याबाबतीत राज्य शासनाकडून किंवा संचालकाकडून कोणतेही नियम केले गेले असल्यास अशा नियमांना किंवा कोणतेही सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढले गेले असल्यास, अशा आदेशांना अधीन असतील, आणि या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, असे नियम किंवा आदेश, अशा उप-विधिंवर अभिभावी असतील. ]

## प्रकरण सहा

## **कामकाज चालविणे**

### (१) सभा

नगरपरिषदेच्या सभासंबंधी तरतूद.

**८९.** नगरपरिषदेच्या सभांच्या बाबतीत पुढील तरतुदींचे पालन करण्यात येईल.—

[२][(१) या अधिनियमामध्ये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नगरपरिषदेचे अधिकार, कर्तव्ये आणि कामे आणि विख्यात पाहुण्यांच्या स्वागतपर भाषणाचा, विख्यात पाहुण्यांना मानपत्र देण्याबाबतचा किंवा दुखवट्याचा प्रस्ताव (यापैकी सर्व किंवा एक रीतसर प्रस्तावित केले असेल त्या बाबतीत), यांच्याशी संबंधित असलेल्या बाबींपुरतेच जे कामकाज मर्यादित असेल असे सर्वसाधारण कामकाज निकालात काढण्यासाठी दोन महिन्यांतून एकदा सर्वसाधारण सभा घेण्यात येईल, अशी पहिली सभा [३][कलम ५१ अन्वये] ज्या दिनांकास नगरपरिषदेची सभा घेण्यात आली असेल त्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत घेण्यात येईल आणि नंतरची प्रत्येक सर्वसाधारण सभा ही, ज्या दिनांकास निकटपूर्ववर्ती सर्वसाधारण सभा घेण्यात आली असेल त्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत घेण्यात येईल. अध्यक्षास, त्यास आवश्यक वाटतील अशा अतिरिक्त सर्वसाधारण सभासुद्धा भरवता येतील. सर्व सर्वसाधारण सभांसाठी दिनांक निश्चित करणे आणि अशा सभा वेळेवर भरवणे हे अध्यक्षाचे कर्तव्य असेल.]

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १६ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १८ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी खंड (१) हा दाखल करण्यात आला.

[३] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम १६ द्वारे " कलम १९-अ अन्वये " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(१-क) खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, सर्वसाधारण सभा बोलावण्यात अध्यक्षाने कसूर केल्यास, मुख्य अधिकारी अशा कसुरीबद्दल जिल्हाधिकाऱ्यास ताबडतोब कळवील. जिल्हाधिकारी मुख्य अधिकाऱ्याचे प्रतिवेदन मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत, सर्वसाधारण सभा भरवील किंवा तो स्वाधिकारे सर्वसाधारण सभा बोलावील. अशा सभेची कार्यसूची, जिल्हाधिकारी मुख्य अधिकाऱ्याशी विचारविनिमयन करून तयार करील :

परंतु, जिल्हाधिकाऱ्याने भरवलेल्या अशा कोणत्याही सभेमुळे सर्वसाधारण सभांच्या खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुक्रमात अडथळा येणार नाही आणि नंतरची सर्वसाधारण सभा, खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या शेवटच्या अनुज्ञेय दिवशी निकटपूर्ववर्ती सभा घेण्यात आली होती असे समजून अध्यक्षाकडून भरवण्यात येईल.]

(२) अध्यक्षास, योग्य वाटेल तेव्हा, आणि एकूण सभासदांच्या एक-चतुर्थांशाहून कमी नाही इतक्या परिषद-सदस्यांनी लेखी विनंती सादर केली असता, असे विनंतीपत्र अध्यक्षास मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आतील दिनांकेस अशी विशेष सभा भरविता येईल. [2][अशा कोणत्याही सभेत चालवावयाचे कामकाज, खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबीपुरतेच मर्यादित असेल.]

(३) [3][खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या] कालावधीमध्ये सभा भरविण्यात अध्यक्षाने कसूर केल्यास, विशेष सभा भरविण्यात यावी अशी विनंती करणाऱ्या परिषद-सदस्यांना, विशेष सभा भरविण्याची जिल्हाधिकाऱ्यास विनंती करता यईल. असे विनंतीपत्र मिळाल्यावर जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत तो पदनिर्देशित करील असा कोणताही अधिकारी जिल्हाधिकाऱ्यास असे विनंतीपत्र मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आतील दिनांकास विशेष सभा भरवील. अशा सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी किंवा पदनिर्देशित केलेला अधिकारी स्वीकारील, परंतु त्यास मत देण्याचा अधिकार असणार नाही.

(४) (क) सर्वसाधारण सभेच्या बाबतीत पूर्ण सात दिवसांची नोटीस व विशेष सभेच्या बाबतीत पूर्ण तीन दिवसांची नोटीस परिषद-सदस्यावर बजावण्यात येईल आणि ती नगरपालिकेच्या कार्यालयामध्ये लावण्यात येईल. अशा नोटिशीमध्ये सभा भरावयाचा दिनांक, वेळ आणि जागा तसेच त्या सभेत चालवावयाचे कामकाज या गोष्टी विनिर्दिष्ट करण्यात येतील. एखाद्या परिषद सदस्याने जो कोणताही प्रस्ताव किंवा सूचना अशा सभेपुढे मांडण्याच्या आपल्या उद्देशाबद्दल अशा सभेच्यापूर्वी कमीतकमी पूर्ण दहा दिवसांची लेखी नोटीस दिली असेल अशा कोणत्याही प्रस्तावाचा किंवा सूचनेचा आणि विशेष सभेच्या बाबतीत अशा सभेसाठी केलेल्या लेखी विनंतीमध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही प्रस्तावाचा किंवा सूचनेचा समावेश अशा नोटिशीत असेल ;

(ख) उपखंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निकडीच्या परिस्थितीत, लेखी नमूद करावयाच्या कारणासाठी, अध्यक्षाला परिषद-सदस्यांना केवळ एका दिवसाची नोटीस देऊन व ती नगरपरिषदेच्या कार्यालयात लावून विशेष सभा भरविता येईल.

(५) सभा भरविण्यासंबंधीच्या नोटिशीमध्ये कारणे विनिर्दिष्ट केली असतील त्याव्यतिरिक्त, नगरपरिषदेची प्रत्येक सभा, अशा नगरपरिषदेकडून नगरपरिषद कार्यालय म्हणून वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही इमारतीमध्ये भरविण्यात येईल.

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम १८(ब) द्वारे खंड (१-क) समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम १८ (क) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १८ (ड) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(६) अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेही गैरहजर असतील अशा प्रत्येक सभेच्या वेळी सभेस हजर असलेल्या परिषद-सदस्यांपैकी ज्या परिषद-सदस्याची त्या प्रसंगी सभापती म्हणून निवड करण्यात येईल असा परिषद-सदस्य अध्यक्षस्थान स्वीकारील आणि अशा सभेत, कलम ५८, पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये अध्यक्षाकडे निहित केलेल्या सर्व अधिकारांचा असा सभापती वापर करील.

(७) (क) पीठासीन प्राधिकारी अशा सभेमध्ये सुव्यवस्था राखील. पीठासीन प्राधिकारी त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, चर्चा करून अथवा चर्चा न करता हरकतीच्या सर्व मुद्यांवर निर्णय घेईल आणि अशा पीठासीन प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.

(ख) (एक) जर पीठासीन प्राधिकाऱ्याच्या मते, एखादा परिषद-सदस्य बेशिस्त वर्तणूक करीत असेल तर, तो पीठासीन प्राधिकारी, त्या परिषद-सदस्यास तात्काळ नगरपरिषदेच्या सभेतून बाहेर निघून जाण्याचा आदेश देऊ शकेल व असा आदेश देण्यात आलेला परिषद-सदस्य तो आदेश ताबडतोब अंमलात आणील व सभेच्या उरलेल्या वेळात तो गैरहजर राहील :

परंतु, अशा परिषद-सदस्याने माफी मागितली असता अथवा मागितली नसतानाही पीठासीन प्राधिकाऱ्यास असा आदेश परत घेता येईल ;

(दोन) एखाद्या परिषद-सदस्यास बाहेर जाण्याचा आदेश दिला असतानासुद्धा तो सभेमध्ये हजर राहत असेल तर पीठासीन प्राधिकाऱ्यास त्याला तेथून घालवून देण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी उपाययोजना करता येईल.

(८) नगरपरिषदेपुढे चालू असलेली कोणतीही चौकशी किंवा चर्चा गुप्तपणे करण्यात यावी असे पीठासीन प्राधिकाऱ्याचे मत असेल त्याव्यतिरिक्त नगरपरिषदेची प्रत्येक सभा जनतेस खुली राहील :

परंतु, पीठासीन प्राधिकाऱ्यास, सभेत चालू असलेल्या कामकाजात जी कोणी व्यक्ती अडथळा करीत असेल तिला कोणत्याही वेळी घालवून देता येईल.

(९) (क) कामकाज चालविण्याकरिता गणपूर्ती होण्यासाठी—

(एक) सर्वसाधारण सभेमध्ये एकूण परिषद-सदस्यांच्या एक-तृतीयांशाइतके परिषद-सदस्य आवश्यक असतील.

(दोन) विशेष सभेमध्ये एकूण परिषद सदस्यांच्या एक-द्वितीयांशाइतके परिषद सदस्य आवश्यक असतील :

परंतु गणपूर्ती ठरविताना अपूर्णांक विचारात घेतला जाणार नाही ;

(ख) पीठासीन प्राधिकारी धरून सभेमध्ये कोणत्याही वेळी हजर असलेल्या परिषद सदस्यांची संख्या गणपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या संख्येपेक्षा कमी असल्याचं सभा चालू असताना कोणत्याही वेळी पीठासीन प्राधिकाऱ्यास दिसून आले किंवा त्याच्या नजरेला आणून देण्यात आले तर कमीतकमी पंधरा मिनिटे व जास्तीतजास्त तीस मिनिटे वाट पाहून, पीठासीन प्राधिकाऱ्यास वाजविरित्या निश्चित करता येईल अशा पुढील किंवा त्यानंतरच्या इतर कोणत्याही दिवशीच्या ठराविक वेळेपर्यंत सभा तहकूब करता येईल. अशी तहकुबीची नोटीस नगरपालिकेच्या कार्यालयात लावण्यात येईल आणि मूळ सभेमध्ये गणपूर्ती झाली असती तर त्या सभेपुढे जे कामकाज ठेवण्यात आले असते तेच कामकाज अशा तहकूब केलेल्या सभेपुढे ठेवण्यात येईल व अशा सभेतच ते निकालात काढण्यात येईल. मात्र त्याखेरीज अन्य कामकाज अशा सभेत ठेवण्यात येणार नाही.

(१०) पीठासीन प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय (अशी परवानगी कोणताही ठराव संमत झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, त्यात फेरफार करण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी आणलेल्या प्रस्तावाच्या किंवा सूचनेच्या बाबतीत देता येणार नाही). अशी सभा भरविण्यासाठी काढलेल्या नोटिशीमध्ये उल्लेख केलेला असल्याशिवाय किंवा विशेष सभेच्या बाबतीत अशी लेखी विनंती असल्याशिवाय कोणत्याही सभेत कोणतेही कामकाज चालवण्यात येणार नाही किंवा कोणत्याही प्रस्तावावर चर्चा करण्यात येणार नाही :

[१][परंतु, सभेमध्ये, पाचपेक्षा अधिक विषयांवर विचार करण्याकरिता प्राधिकाऱ्यांकडून अशी कोणतीही परवानगी देण्यात येणार नाही.]

(११) या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांस अधीन राहून, कोणत्याही सभेमध्ये चालविण्याच्या कामकाजांचा क्रम हा पीठासीन प्राधिकाऱ्याकडून ठरविण्यात येईल :

परंतु, एखाद्या परिषद-सदस्याने कामकाजातील एखाद्या विशिष्ट बाबीला किंवा एखाद्या विशिष्ट सूचनेला अग्रक्रम द्यावा असे सुचविल्यास पीठासीन प्राधिकारी, ती सूचना सभेपुढे ठेवील व उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या परिषद-सदस्यांनी त्या प्रस्तावाच्या बाजूने किंवा विरूद्ध दिलेल्या बहुमताच्या आधारावर निर्णय घेईल.

(१२) परिषद-सदस्यांची आणि खंड (१७) च्या तरतुदीनुसार कोणी सरकारी अधिकारी हजर असतील तर त्यांची नावे आणि प्रत्येक सभेचे कामकाज यासंबंधीचे कार्यवृत्त त्यासाठी ठेवलेल्या पुस्तकात नगरपरिषद ठरवील त्याप्रमाणे मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत ठेवण्यात येईल. मतदान पद्धतीने मतनोंदणी करण्यात येईल त्या व्यतिरिक्त, कोणत्याही सूचनेच्या किंवा प्रस्तावाच्या बाजूने किंवा विरूद्ध मत देणाऱ्या परिषद-सदस्यांच्या नावाची नोंद कार्यवृत्त पुस्तकात ठेवण्यात येईल. कार्यवृत्तावर अशा सभेचा पीठासीन प्राधिकारी व्यवहार्य असेल तितक्या लवकर सही करील व ते नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही रहिवाशाला सर्व रास्त वेळी पाहण्यासाठी खुले ठेवण्यात येईल. असे कार्यवृत्त नगरपरिषदेच्या पुढील सभेपुढे ठेवण्यात येई : आणि सभेकडून त्याला पुष्टी देण्यात आल्यावर अशा सभेचा पीठासीन प्राधिकारी त्यावर सही करील.

(१३) या अधिनियमाद्वारे अथवा तद्न्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, सर्व प्रश्नांचा निर्णय सभेत हजर असून मत देणाऱ्या परिषद-सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल. समसमान मते पडतील त्या सर्व बाबतीत पीठासीन प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत राहील. नियमाद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे मते देण्यात येतील व त्यांच्या निकालाची नोंद ठेवण्यात येईल :

[२][परंतु, कलम ९, पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या नामनिर्देशित परिषद-सदस्यांना, परिषदेच्या सभेमध्ये मतदानाचा हक्क असणार नाही.]

(१४) कोणतीही सभा, हजर असलेल्या बहुसंख्य परिषद-सदस्यांच्या संमतीने त्याच दिवशी पुढील वेळेपर्यंत किंवा इतर कोणत्याही दिवसापर्यंत वेळोवेळी तहकूब करता येईल ; परंतु, ज्या सभेत तहकुबी करण्यात आली त्या सभेत जे कामकाज निकालात काढले नसेल त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही कामकाज अशा तहकूब केलेल्या सभेत चालविण्यात येणार नाही. नगरपालिका कार्यालयात लावलेली अशा तहकुबीची नोटीस ही अशा तहकूब केलेल्या सभेची पुरेशी नोटीस आहे असे समजण्यात येईल ;

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११ याच्या कलम ४९ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४१ याच्या कलम १४५ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

खंड (९) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा तहकूब केलेल्या सभेसाठी गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

(१५) परिषद-सदस्यांच्या एकूण संख्येच्या कमीत कमी एक-द्वितीयांश परिषद-सदस्यांनी पाठिंबा देऊन सभेत संमत केलेल्या ठरावाव्यतिरिक्त इतर कोणत्याही रीतीने नगरपरिषदेच्या कोणत्याही ठरावात, तो संमत झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत, कोणताही फेरफार करण्यात येणार नाही किंवा तो रद्द करण्यात येणार नाही. अशा सभेची नोटीस खंड (४) मधील आवश्यक बाबींनी परिपूर्ण असेल आणि अशा सभेमध्ये ज्या ठरावात फेरफार करण्याचे किंवा जो रद्द करण्याचे योजिले असेल, तो ठराव आणि अशा ठरावात फेरफार करण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी आणलेला प्रस्ताव किंवा सूचना ही पूर्णपणे नमूद केलेली असेल.

(१६) पीठासीन प्राधिकाऱ्यास निकडीची वाटतील अशा कारणांव्यतिरिक्त, शासनाच्या कोणत्याही विभागाकडून अथवा संबंधित जिल्हा परिषदेकडून नगरपरिषदेसाठी पार पाडण्यात येत असलेले किंवा पार पाडावयाचे असे कोणतेही काम किंवा कोणतीही शैक्षणिक बाब या संबंधीचे कामकाज नगरपरिषदेच्या कोणत्याही सभेत, अशा सभेपूर्वी निदान सात दिवस अगोदर, यथास्थिती, शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यास अथवा शिक्षण निरीक्षकास उद्देशून पत्र पाठविल्यावाचून चालविण्यात येणार नाही. अशा पत्राद्वारे, अशा सभेत जे कामकाज चालविण्याचा उद्देश असेल त्याविषयी व अशा कामकाजासंबंधी जे प्रस्ताव किंवा सूचना मांडण्यात येतील त्याबाबत त्यांना कळविण्यात येईल.

(१७) कोणताही सरकारी अधिकारी किंवा जिल्हा परिषदेचा एखादा अधिकारी ज्या कोणत्याही प्रश्नावर, आपल्या पदाच्या कर्तव्यामुळे नगरपरिषदेस उपयुक्त ठरेल असे आपले मत किंवा माहिती पुरवू शकेल अशा प्रश्नाची चर्चा किंवा त्यावर विचार करण्यासाठी अशा कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने किंवा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याने अशा नगरपरिषदेच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहणे इष्ट आहे असे नगरपरिषदेस वाटत असेल तर, योजलेल्या सभेच्या कमीत कमी पंधरा दिवस अगोदर अशा अधिकाऱ्याला उद्देशून पत्र पाठवून त्यास अशा सभेस हजर राहण्यासाठी बोलाविण्यास नगरपरिषद सक्षम असेल आणि उक्त अधिकारी शक्यतोवर अशा सभेस उपस्थित राहील :

परंतु, अशा अधिकाऱ्यास असे पत्र मिळाल्यानंतर जर स्वतः उपस्थित राहणे शक्य नसेल तर, आपले विचार आपल्या हाताखालील एखाद्या उप अधिकाऱ्यास किंवा सहायक अधिकाऱ्यास किंवा अन्य सक्षम दुय्यम अधिकाऱ्यास समजावून सांगून, अशा सभेस स्वतः हजर राहण्याऐवजी आपला प्रतिनिधी म्हणून त्यास तेथे पाठविता येईल.

(१८) खंड (१६) किंवा (१७) अन्वये नगरपरिषदेच्या सभेस हजर राहणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास अशा सभेमध्ये कोणत्याही सूचनेवर मत देण्याचा हक्क असणार नाही.

(१९) नगरपरिषदेच्या सभांचे कामकाज चालविण्याशी संबधित असलेल्या ज्या बाबींसंबंधी या कलमात तरतूद करण्यात आली नसेल अशा बाबींसंबंधात राज्य शासनाला नियम तयार करता येतील.

समित्यांच्या बैठकी.

**८२.** समित्यांच्या बैठकींना पुढील तरतुदी लागू होतील :—

[१][(१) समितीच्या सर्वसाधारण बैठकी महिन्यातून एकदा घेण्यात येतील. पहिली सर्वसाधारण बैठक, ज्या दिनांकास संबंधित समितीची रचना करण्यात आली असेल त्या दिनांकापासून

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४,कलम १९(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

पंधरा दिवसांच्या आत घेण्यात येईल आणि नंतरची प्रत्येक सर्वसाधारण बैठक, ज्या दिनांकास निकटपूर्ववर्ती सर्वसाधारण बैठक घेण्यात आली असेल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सभापती निश्चित करील, अशा दिवशी आणि अशा वेळी घेण्यात येईल. अशा बैठकीत करावयाचे कामकाज संबंधित समितीस कलम ७० अन्वये नेमून दिलेल्या विषयांपुरतेच मर्यादित असेल.]

(२) अध्यक्षाच्या किंवा समितीच्या कमीत कमी एकचतुर्थांश सदस्यांच्या लेखी विनंतीवरून, सभापती असे विनंतीपत्र मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत समितीची विशेष बैठक भरवील :

परंतु, एकचतुर्थांश सदस्य मोजताना अपूर्णांक हिशेबात घेतला जाणार नाही :

[१][परंतु आणखी असे की, अशा बैठकीत करावयाचे कामकाज देखील संबधित समितीस कलम ७० अन्वये नेमून दिलेल्या विषयांपुरतेच मर्यादित असेल.]

(३) समितीचा सभापती पंधरा दिवसांहून अधिक काळपर्यंत नगरपरिषद क्षेत्रात गैरहजर असल्यास, किंवा त्याने खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये बैठक भरविण्यात कसूर केल्यास अध्यक्ष किंवा त्याच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष समितीची बैठक भरवील.

(४) जर खंड (२) किंवा (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, सभापती, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांनी बैठक भरवण्यात कसूर केली तर, समितीच्या सदस्यांपैकी एक-तृतीयांश सदस्य किंवा दोन सदस्य, यांपैकी जे अधिक असतील, त्यांना अशी बैठक भरविता येईल :

परंतु, एकतृतीयांश सदस्य मोजताना अपूर्णांक हिशेबात घेतला जाणार नाही.

(५) (क) अशी बैठक ज्या दिनांकास घेण्यात येणार असेल तो दिनांक, वेळ आणि जेथे बैठक भरणार असेल ते ठिकाण आणि तेथे चालवावयाचे कामकाज यासंबंधीची माहिती देणारी प्रत्येक बैठकीची नोटीस समितीच्या प्रत्येक सदस्यास देण्यात येईल. आणि बैठकीच्या दिनांकाच्या निदान तीन पूर्ण दिवस अगोदर नगरपरिषदेच्या कार्यालयातही लावण्यात येईल.

(ख) उप-खंड (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निकडीच्या परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करून सदस्यांना केवळ एक दिवसाची नोटीस देऊन आणि नगरपालिकेच्या कार्यालयातही तशी नोटीस लावून सभापतीस समितीची बैठक भरवता येईल.

(६) गणपूर्ती होण्यास समितीच्या सदस्यांपैकी एक-द्वितीयांश सदस्य आवश्यक असतील, परंतु, ही संख्या दोनपेक्षा कमी असणार नाही :

परंतु, एक-द्वितीयांश सदस्य मोजताना अपूर्णांक हिशेबात घेतला जाणार नाही.

(७) समितीच्या प्रत्येक बैठकीचे अध्यक्षपद सभापती स्वीकारील आणि त्यांच्या गैरहजेरीमध्ये ते अध्यक्षपद, बैठकीने अध्यक्ष म्हणून निवडलेला समितीचा कोणताही एक सदस्य स्वीकारील.

(८) समित्यांच्या बैठकींचे कामकाज चालविण्याशी संबंधित असलेल्या ज्या बाबीसंबंधी या कलमामध्ये तरतूद करण्यात आली नसेल अशा बाबीसंबंधात राज्य शासनाला नियम तयार करता येतील.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४ याच्या कलम १९(ब) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(९) खंड (१) ते (७) अन्वये आणि खंड (८) अन्वये केलेल्या नियमांन्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, लगतपूर्ववर्ती कलमाच्या खंड (५), (७), (१०), (११), (१२), (१३), (१४), (१५), (१७) आणि (१८) यांच्या तरतुदी आणि त्या कलमाच्या खंड (१९) अन्वये केलेले नियम सर्व समित्यांच्या बैठकींना योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.

मुख्य अधिकाऱ्याने नगरपरिषदेच्या प्रत्येक सभेस हजर राहणे आणि जरूर असल्यास समितीच्या बैठकीस हजर राहणे, परंतु मत न देणे किंवा कोणतीही सूचना न करणे.

**८३.** (१) मुख्य अधिकारी, वाजवी कारणामुळे त्यास प्रतिबंध झाला नसेल तर, नगरपरिषदेच्या प्रत्येक सभेस हजर राहील. मुख्य अधिकाऱ्यास समितीच्या बैठकीस हजर राहता येईल आणि समितीला तसे आवश्यक वाटेल तर तो समितीच्या बैठकीस हजर राहील.

(२) मुख्य अधिकाऱ्यास, पीठासीन प्राधिकारी किंवा नगरपरिषद यांच्या परवानगीने, अशा सभेमध्ये ज्या कोणत्याही विषयासंबंधी चर्चा चालू असेल त्या विषयासंबंधी वस्तुस्थितीचे निवेदन अथवा स्पष्टीकरण करता येईल. परंतु, तो अशा सभेत मत देणार नाही अथवा कोणतीही सूचना करणार नाही.

(३) नगरपरिषदेला किंवा समितीला, नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, असा अधिकारी ज्या बाबीशी संबंधित असेल अशी कोणतीही बाब, नगरपरिषदेच्या किंवा समितीच्या कोणत्याही सभेत चर्चेला आली असेल तेव्हा त्या सभेला हजर राहण्यासाठी भाग पाडता येईल. अशा प्रकारे कोणत्याही अधिकाऱ्याला कोणत्याही सभेत हजर राहण्यास भाग पाडले असेल तेव्हा त्याला वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण किंवा निवेदन करण्यास किंवा कोणतीही माहिती पुरविण्यास सांगता येईल ; परंतु, त्यास अशा सभेत मत देण्याचा किंवा कोणतीही सूचना करण्याचा हक्क असणार नाही.

मुख्य अधिकाऱ्याकडून माहिती, दस्तऐवज, वगैरे मागविण्याचा नगरपरिषदेचा किंवा समितीचा अधिकार.

**८४.** (१) नगरपरिषदेस किंवा कोणत्याही समितीस मुख्य अधिकाऱ्याकडून पुढील गोष्टी मागविता येतील :—

(क) नगरपरिषदेच्या प्रशासनाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीविषयी कोणतेही विवरण, विवरणपत्र, अंदाज, आकडेवारी किंवा नकाशा किंवा इतर माहिती ;

(ख) अशा कोणत्याही बाबीविषयी अहवाल किंवा स्पष्टीकरण ; आणि

(ग) त्याच्या पदाच्या नात्याने त्याच्या ताब्यात असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या किंवा त्याच्या कार्यालयात किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या कार्यालयात अभिलिखित किंवा फाईल केलेल्या कोणत्याही अभिलेखाची, पत्रव्यवहाराची, नकाशाची किंवा इतर दस्तऐवजाची प्रत.

(२) मुख्य अधिकाऱ्याने पोट-कलम (१) अन्वये आलेल्या कोणत्याही मागणीचे पालन करण्यामुळे ते नगरपरिषदेच्या किंवा जनतेच्या हिताला बाध येईल असे त्याचे मत नसेल तर, तो अशा मागणीचे पालन करील. अन्यथा तो अशी मागणी अध्यक्षांकडे निर्णयासाठी पाठवील आणि त्याच्या निर्णयाचे पालन करील.

स्थानिक संस्थांच्या संयुक्त समित्या.

**८५.** (१) नगरपरिषदेस वेळोवेळी इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाशी खालील बाबतीत सहमत होता येईल :—

(क) ज्यात त्यांचा संयुक्तपणे हितसंबंध आहे अशा कोणत्याही प्रयोजनासाठी आपापल्या संस्थामधून एक संयुक्त समिती नेमणे व अशा समितीचा सभापती नेमणे ; आणि

(ख) संयुक्तपणे करावयाचे कोणतेही बांधकाम करणे व पुढे ते सुस्थितीत राखणे याबाबत अशा प्रत्येक संस्थेस बंधनकारक अशा अटी तयार करण्याचा अधिकार आणि अशा संस्थांपैकी एखाद्या किंवा त्यांपैकी कोणत्याही संस्थेस वापर करता येईल असे कोणतेही अधिकार, अशा कोणत्याही समितीकडे प्रत्यायोजित करणे ; आणि

(ग) ज्या, प्रयोजनासाठी समिती नेमण्यात आली असेल त्या प्रयोजनासंबंधी अशा कोणत्याही समितीच्या कामकाजाचे आणि त्याबाबत करावयाच्या पत्रव्यवहाराचे विनियमन करण्यासाठी विनियम करणे व त्यात फेरफार करणे.

(२) नगरपरिषदेस, भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची क्रमांक दोनमधील नोंद [१][* * *] ५९ खाली येणारा कोणताही कर बसविण्यासाठी इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाबरोबर, वेळोवेळी करार करता येईल ; अशा करारामुळे याप्रमाणे करार करणाऱ्या संस्थांनी बसवावयाचा कर, उक्त संस्थांच्या नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्राच्या हद्दीत स्वतंत्रपणे आकारण्याऐवजी, एकत्रितरीत्या आकारता येईल.

(३) एखाद्या नगरपरिषदेने कोणत्याही बाबीसंबंधी पोट-कलम (१) च्या तरतुदीअन्वये कोणत्याही इतर स्थानिक प्राधिकरणाला सहमती देण्याविषयी विनंती केली असेल आणि अशा इतर स्थानिक प्राधिकरणाने सहमती देण्याचे नाकारले असेल त्याबाबतीत, कटक प्राधिकरणाव्यतिरिक्त अशा इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला, उपरोक्त बाबतीत सहमती देण्यास भाग पाडण्याबाबत योग्य वाटतील असे आदेश राज्य शासनास देता येतील आणि असे इतर स्थानिक प्राधिकरण असे आदेश पाळील.

(४) या कलमान्वये कोणत्याही प्रयोजनासाठी एकत्र येणाऱ्या किंवा करार करणाऱ्या संस्थांमध्ये कोणताही मतभेद निर्माण झाल्यास, राज्य शासनाने किंवा याबाबत राज्य शासन पदनिर्देशित करील अशा अधिकाऱ्याने त्याबाबत दिलेला निर्णय अंतिम असेल :

परंतु, संबंधित संस्थांपैकी एखादी संस्था कटक प्राधिकरण असेल तेव्हा, असा कोणताही निर्णय केंद्र सरकारच्या सहमतीच्या अधीन असेल.

(५) या कलमाच्या प्रयोजनार्थ "स्थानिक प्राधिकरण" या शब्दप्रयोगामध्ये कटक मंडळाचा समावेश असेल.

[२] * * * * *

## (२) कामकाजाची विधिग्राह्यता

**८७.** (१) परिषद सदस्य म्हणून किंवा कोणत्याही सभेचा अध्यक्ष किंवा पीठासीन प्राधिकारी म्हणून किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या समितीचा सभापती किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, यथास्थिती, नगरपरिषदेच्या किंवा अशा कोणत्याही समितीच्या ज्या कोणत्याही कृतीत किंवा कामकाजात भाग घेतला असेल आणि जेथे अशा कृतीत किंवा कार्यवाहीत भाग घेणाऱ्या बहुसंख्य व्यक्तींना अशी कृती करण्याचा हक्क असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही निरर्हतेमुळे किंवा तिच्या निवडणुकीतील वा नेमणुकीतील दोषांमुळे अशी कृती किंवा कार्यवाही रद्दबातल होणार नाही.

नगरपरिषद आणि समित्या यांच्या कृती व कार्यवाही, त्यांच्या सदस्यांची निरर्हता, इत्यादींमुळे रद्दबातल न होणे.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३१ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४१ याच्या कलम १४६ द्वारे कलम ८६ वगळण्यात आले.

(२) नगरपरिषदेचा किंवा अशा कोणत्याही समितीचा कोणताही ठराव, सभासदावर किंवा समितीच्या कोणत्याही सदस्यावर नोटीस बजावण्यात कोणतीही नियमबाह्यता झाल्यामुळे विधिअग्राह्य आहे असे समजले जाणार नाही, मात्र नगरपरिषदेच्या किंवा समितीच्या कामकाजावर अशा नियमबाह्यतेमुळे बाधक परिणाम झालेला असता कामा नये.

(३) त्याविरूद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत, नगरपरिषदेच्या किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या समितीच्या ज्या ज्या सभेतील कामकाजांचे या अधिनियमान्वये किंवा त्याखालील नियमान्वये कार्यवृत्त तयार करण्यात येऊन ते स्वाक्षरित करण्यात आले असेल, ती प्रत्येक सभा रीतसर बोलाविण्यात व भरविण्यात आली होती असे समजले जाईल आणि त्या सभेचे सर्व सदस्य यथोचित अर्हता असलेले होते असे समजण्यात येईल ; आणि जेव्हा असे कामकाज एखाद्या समितीचे कामकाज असेल तेव्हा, अशी समिती रीतसर बनविण्यात आलेली होती व अशा कार्यवृत्तात उल्लेख केलेल्या गोष्टींबाबत कार्यवाही करण्याचा तिला अधिकार होता असे मानण्यात येईल.

(४) नगरपरिषदेत किंवा समितीत कोणतीही जागा रिकामी असेल त्या मुदतीत पदावर असलेल्या पालिका सदस्यास किंवा सदस्यांस ती जागा रिकामी नव्हती असे समजून काम चालविता येईल.

## प्रकरण सात

## नगरपरिषदेची मालमत्ता, निधी, संविदा आणि दायित्वे

मालमत्ता संपादन करण्याचा आणि धारण करण्याचा अधिकार.

**८८.** (१) राज्य शासनाने घालून दिलेल्या विशेष मर्यादा किंवा लादलेल्या विशेष शर्ती यांस अधीन राहून, या कलमात यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या स्वरुपाची (खाजगी मालकीची नसलेली) आणि नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीतील सर्व मालमत्ता नगरपरिषदेकडे निहित असेल आणि तिच्या नियंत्रणाधीन राहील, आणि ती नगरपरिषदेकडे यापूर्वीच निहित असलेल्या किंवा यापुढे निहित होणाऱ्या इतर सर्व मालमत्तेबरोबर या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता नगरपरिषद धारण करील व उपयोजित करील :—

(क) सर्व सार्वजनिक नगरकोट, दरवाजे, बाजार, कत्तलखाने, खत व मैला साठविण्याच्या जागा आणि नगरपालिका निधीतून बांधलेल्या किंवा व्यवस्था ठेवण्यात येत असलेल्या विविध प्रकारच्या सर्व सार्वजनिक इमारती ;

(ख) सर्व सार्वजनिक ओढे, झरे आणि सार्वजनिक प्रयोजनासाठी पाण्याचा पुरवठा, साठा आणि वितरण करण्यासाठी असलेली बांधकामे आणि त्यांना जोडलेले किंवा त्याच्याशी संबधित असलेले सर्व पूल, इमारती, इंजिने, सामान किंवा वस्तू आणि कोणत्याही सार्वजनिक तलावाला किंवा विहिरीला लागून असलेली (खाजगी मालमत्ता नसलेली) कोणतीही जमीन ;

(ग) सर्व सार्वजनिक मलप्रणाल आणि गटारे आणि कोणत्याही रस्त्यावर, रस्त्याच्या अगदी लगत किंवा रस्त्याखाली असलेले सर्व मलप्रणाल, गटारे, मोऱ्या व जलप्रवाह आणि त्याच्याशी संबंधित असलेली सर्व बांधकामे, सामान आणि वस्तू ;

(घ) नगरपरिषदेने रस्ते, घरे, संडास, मलप्रणाल, मलकुंडी किंवा इतर ठिकाणापासून गोळा केलेली किंवा नगरपरिषदेने त्यासाठी नेमलेल्या जागी साठवून ठेवलेली धूळ, घाण, शेण, राख, केरकचरा, प्राणिज पदार्थ किंवा गदळ किंवा कोणत्याही प्रकारचा कचरा किंवा बेवारशी जनावरांचे मृतदेह ;

(ङ) सर्व सार्वजनिक दिवे, दिव्यांचे खांब आणि त्याला जोडलेली किंवा त्याच्याशी संबंधित असलेली उपकरणे ;

(च) केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने नगरपरिषदेकडे हस्तांतरित केलेल्या किंवा स्थानिक सार्वजनिक प्रयोजनासाठी देणगीद्वारे, खरेदीद्वारे किंवा अन्यथा संपादन केलेल्या सर्व जमिनी, इमारती किंवा इतर मालमत्ता ; आणि

(छ) शासनाच्या मालकीच्या खुल्या जागांखेरीज किंवा जमिनीखेरीज सर्व सार्वज़निक रस्ते व त्यांच्या फरशा, दगड व इतर सामान आणि तसेच अशा रस्त्यांसाठी तरतूद केलेली सर्व झाडे उभारलेले इमले, सामान, अवजारे व वस्तू.

(२) शासनाच्या मालकीच्या आणि पोट-कलम (१) च्या खंड (च) अन्वये नगरपरिषदेकडे हस्तांतरित केलेल्या जमिनी आणि इमारती या हस्तांतरण लेखात किंवा आदेशात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली नसेल तर, स्वामित्वाधिकारानुसार नगरपरिषदेच्या मालकीच्या राहणार नाहीत ; परंतु हस्तांतरणाच्या शर्तीस व अटींस अधीन राहून, नगरपरिषदेकडे निहित होतील. उक्त कोणत्याही अटींचा आणि शर्तींचा भंग केल्यास, यथास्थिती, अशी जमीन किंवा इमारत आणि अशा जमिनीस किंवा इमारतीस संलग्न असलेल्या सर्व गोष्टी, तसेच सर्व जोडकामे व संरचना शासनाकडे पुन्हा निहित होतील आणि शासनाने त्यांचा पुन्हा ताबा घेणे आणि कोणतीही भरपाई न देता तिच्या व्यवस्थेसाठी किंवा विल्हेवाटीसाठी त्यास योग्य वाटतीलअसे आदेश देणे कायदेशीर असेल.

नगरपरिषदेने किंवा तिच्याविरूद्ध मालमत्तेसंबंधी सांगितलेल्या दाव्यांचा निर्णय.

**८९.** (१) ज्या जमिनीचा सर्वसामान्यपणे फक्त शेतीच्या प्रयोजनासाठी उपयोग करण्यात येत असेल त्या जमिनीव्यतिरिक्त, इतर जमिनीचे भूमापन ज्या कोणत्याही नगरपालिका क्षेत्रास त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये लागू करण्यात आले असेल किंवा लागू करण्यात येईल, त्या नगरपालिका क्षेत्रात कोणत्याही मालमत्तेवर किंवा कोणत्याही मालमत्तेतील किंवा मालमत्तेवरील कोणत्याही अधिकारावर नगरपरिषदेने किंवा नगरपरिषदेच्या वतीने किंवा नगरपरिषदेच्या विरूद्ध कोणत्याही व्यक्तीने दावा सांगितला असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने रीतसर नोटीस देऊन चौकशी केल्यानंतर अशा दाव्याबाबत निर्णय देणारा आदेश देणे कायदेशीर असेल.

१८७९ चा मुंबई ५. (२) पोट-कलम (१) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षानंतर किंवा अशा आदेशाविरूद्ध कालमर्यादेच्या आत एक किंवा अधिक अपिले करण्यात आली असतील तर, यथास्थिती *मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ चे कलम २०४, हैदराबाद जमीन महसूल अधिनियमाचे कलम १५८, मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता,
१३१७ फसली चा हैद्राबाद ८. १९५४ चे कलम ४१ अन्वये ठरविलेल्या अंतिम अपील प्राधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून, एक वर्षाची मुदत संपल्यानंतर, कोणत्याही दिवाणी न्यायालयात दाखल केलेला कोणताही दावा, जर असा दावा, असा आदेश रद्द करण्यासाठी आणला असेल
१९५५ चा मध्यप्रांत २. किंवा त्यात मागितलेला अनुतोष अशा आदेशांशी विसंगत असेल तर, (मुदतमर्यादेचा मुद्दा घेण्यात आला नसला तरीही) फेटाळण्यात येईल ; मात्र वादीस अशा आदेशाची योग्य ती नोटीस देण्यात आली असली पाहिजे.

---

* येथे कृपया महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या संबद्ध तरतुदी पहाव्यात. (१९६६ चा महाराष्ट्र ४१)

(३) (क) या कलमानुसार जिल्हाधिकाऱ्याला दिलेल्या अधिकारांचा वापर, यथास्थिति, सहायक किंवा उपजिल्हाधिकारी, भूमापन अधिकारी, जमाबंदी अधिकारी किंवा सहायक जमाबंदी अधिकारी यांनासुद्धा करता येईल ;

(ख) या कलमात उल्लेख केलेली चौकशी ही, औपचारिक चौकशीच्या तरतुदींनुसार किंवा नगरपालिका क्षेत्रात अंमलात असेलेल्या संबंधित जमीन महसूल संहितेत किंवा अधिनियमात समाविष्ट असलेल्या चौकशीच्या कामकाजासंबंधीच्या तरतुदींनुसार चालविण्यात येईल.

नगरपालिका निधी.

**९०.** (१) या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या आधारे नगरपरिषदेस किंवा तिच्या वतीने मिळालेला सर्व पैसा, या अधिनियमान्वये तिला दिलेले किंवा तिने वसूल केलेले सर्व कर, कोणत्याही न्यायालयाने बसविलेल्या दंडाव्यतिरिक्त या अधिनियमान्वये तिला दिलेले किंवा तिने वसूल केलेले दंड व शास्ती, नगरपरिषदेने विकलेल्या जमिनी किंवा इतर मालमत्ता यांपासून आलेले सर्व उत्पन्न आणि नगरपरिषदेच्या जमिनी किंवा मालमत्ता यांपासून मिळणारी सर्व भाडी आणि शासनाने किंवा खाजगी व्यक्तींनी दिलेल्या देणग्यांपासून किंवा केलेल्या हस्तांतरणापासून किंवा अन्यथा मिळणारे सर्व व्याज, नफा व इतर पैसा या सर्वांचा मिळून नगरपालिका निधी होईल ; आणि तो अनुक्रमे कलम ८८ व कलम ९७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेसंबंधी जी रीत सांगितली असेल त्याच रीतीने धारण करण्यात येईल व त्याच रीतीने त्यासंबंधी व्यवहार करण्यात येईल :

परंतु,—

(क) कोणत्याही नगरपरिषदेने किंवा तिच्या वतीने करून दिलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही प्रतिज्ञापनांन्वये किंवा कोणत्याही विश्वस्त निधीच्या व्यवस्थेसाठी, धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० अन्वये ठरविलेल्या कोणत्याही योजनेद्वारे किंवा खंड (ब) १८९० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या विश्वस्तव्यवस्थेनुसार अशा नगरपरिषदेने स्वीकारलेल्या चा ६. किंवा तिच्यावर लादलेल्या कोणत्याही बंधनास या कलमातील किंवा कलम ८८ मधील कोणत्याही तरतुदींमुळे कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही ;

(ख) कलमे ५० आणि ९१ अनुसार निर्माण केलेल्या निधींमध्ये आवश्यक त्या रकमा जमा केल्यानंतर त्या या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये नगरपरिषदेवर लादलेली किंवा लादण्यात येणारी सर्व दायित्वे पार पाडण्यासाठी वाजवी तरतूद करण्यात येईल या अटीस अधीन राहून, नगरपरिषदेला शाळा किंवा दवाखाना किवा जलदाय व्यवस्था किवा अग्निशामक दल किंवा संचालक याबाबत मान्य करील अशा इतर विशेष प्रयोजनांसाठी, तिला मिळालेल्या किंवा मुद्दाम राखून ठेवलेल्या नगरपालिका निधीचा कोणताही भाग नगरपालिकेच्या लेख्यात एका स्वतंत्र शीर्षाखाली जमा करता येईल आणि नगरपरिषदेने अशा जमा केलेल्या रकमांचा ज्या खास प्रयोजनांसाठी त्या मिळाल्या असतील किंवा वेगळ्या राखून ठेवल्या असतील, त्यासाठीच उपयोग करील ;

(ग) (एक) आपल्या क्षेत्रातील पवित्र मंदिरास नियतकालिक भेट देणाऱ्या यात्रेकरूंवर कर बसवणारी प्रत्येक नगरपरिषद, उपखंड (दोन) मध्ये, उल्लेखिलेल्या प्रयोजनांसाठी वाजवी तरतूद करण्यात येईल या अटीस अधीन राहून, उक्त कराचे सर्व उत्पन्न, " यात्रेकरु निधी लेखा " म्हणून संबोधण्यात येणाऱ्या नगरपालिकेच्या लेख्यात वेगळ्या शीर्षाखाली जमा करील.

(दोन) यात्रेकरू कराचे उत्पन्न, यात्रेकरू निधी लेख्यामध्ये जमा करण्यापूर्वी ज्या प्रयोजनांसाठी नगरपरिषद तरतूद करील, ती खालीलप्रमाणे असतील. जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेने नगरपरिषद वेळोवेळी निश्चित करील अशी उक्त कराच्या उत्पन्नाची ठराविक टक्के रक्कम खालील गोष्टी करण्यासाठी नगरपरिषदेला देण्यात येईल :—

(क) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये लादलेली किंवा लादता येतील अशी सर्व दायित्वे पार पाडण्यासाठी वाजवी तरतूद करणे ;

(ख) उक्त यात्रेकरूंचे आरोग्य, सोयी आणि सुरक्षितता यासंबंधातील नगरपरिषदेची सर्वसाधारण कर्तव्ये ; आणि

(ग) उक्त कर वसूल करण्याचा खर्च.

(तीन) उप-खंड (एक) अन्वये जमा केलेल्या रकमा, उक्त यात्रेकरूंचे आरोग्य, सोयी आणि सुरक्षितता यास हितावह होतील अशा, जिल्हाधिकाऱ्याने मंजूर केलेल्या कामासाठी खर्च करण्यात येतील.

(२) राज्य शासनास, या बाबतीत योग्य रीतीने करण्यात आलेल्या विनियोजनाद्वारे, पुढील सर्व प्रयोजनांसाठी किवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी त्यास योग्य वाटेल अशा अटींस व शर्तीस अधीन राहून व अशा रीतीने, प्रत्येक वर्षी नगरपरिषदेस, अनुदाने देता येतील :—

(क) पाणीपुरवठा ;

(ख) जलनिःसारण ;

(ग) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ;

१९५४ चा महाराष्ट्र २७. (घ) * मुंबई नगररचना अधिनियम, १९५४ खालील विकास योजना व नगररचना योजना ;

(ङ) नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता ;

(च) [1]* * * *

(छ) सार्वजनिक आरोग्य ;

(ज) अग्निशामक दल ;

(झ) रस्ते बांधणे व त्यांची व्यवस्था ठेवणे ; आणि

(ञ) राज्य शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील अशा इतर सुखसोयी.

अशी अनुदाने नगरपालिका निधीत जमा करण्यात येतील व ज्या योजनांसाठी ती मंजूर करण्यात आली असतील त्याच प्रयोजनांसाठी त्यांचा विनियोग करण्यात येईल.

[2][ (३) राज्य शासन, राज्य शासनास किंवा कोणत्याही शासकीय महामंडळास, शासकीय कंपनीस किंवा महाराष्ट्र शासनाने रचना केलेल्या इतर कोणत्याही वैधानिक प्राधिकरणास देय असलेली कोणतीही रक्कम,—

(क) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या अनुदानांमधून ; किंवा

---

* आता पहा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. २७)

[1] खंड (च) सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३८, कलम ६ द्वारे वगळण्यात आला.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४७ द्वारे पोटकलम (३) जादा दाखल करण्यात आले.

(ख) सहायक अनुदान दर्शविणाऱ्या किंवा राज्य शासनाने बसवलेले कर, शुल्के, पथकर आणि फी यांच्या निव्वळ उत्पन्नातील, वित्त आयोगाच्या शिफारशींवरून राज्य शासनाने निश्चित केल्याप्रमाणे वितरित व नियतवाटप केलेला परिषदेचा हिस्सा दर्शविणाऱ्या कोणत्याही रकमेतून

कापून घेण्यास सक्षम असेल. :

परंतु, अशा प्रकारची वजात करण्यापूर्वी त्याबाबतचे म्हणणे शासन विचारात घेईल]

वेतन राखीव निधीची स्थापना.

**९१.** प्रत्येक नगरपरिषद, [१][तिच्या अधीन काम करणाऱ्या] सर्व अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या एका महिन्याच्या वेतनाच्या व भत्त्यांच्या एकूण रकमेइतकी रक्कम दरवर्षी दिनांक ३१ डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी हस्तांतरित करून तीन वित्तीय वर्षांच्या मुदतीच्या आत "वेतन राखीव निधी" उभारील. उपरोक्त तीन वर्षांच्या मुदतीत किंवा त्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीशिवाय या निधीतून कोणताही खर्च करण्यास नगरपरिषद सक्षम असणार नाही. नियोजित खर्च हा वेतन व भत्ते देण्यासाठी असून, तो नगरपरिषदेच्या बिनराखीव निधीतून करता येणे शक्य नाही, अशी जिल्हाधिकाऱ्यांची खात्री झाल्यास त्यास अशा खर्चास आपली मंजुरी देता येईल. अशी मंजुरी ही, वेतन राखीव निधीची पूर्णपणे भरपाई करण्यात येईपर्यंत, अग्रक्रमानुसार पुढे विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त, त्यानंतर नगरपालिका निधीतून असा खर्च केला जाणार नाही या आणखी शर्तीस अधीन असेल, ती प्रयोजने पुढीलप्रमाणे :—

(क) वेतन राखीव निधीची भरपाई करणे,

(ख) वेतन व भत्ते देणे.

जिल्हाधिकारी, ज्या मुदतीत व जितक्या मासिक हप्त्यांनी उक्त निधीची भरपाई करावयाची असेल ती मुदत व ते मासिक हप्तेसुद्धा विहित करील. अशी मुदत कोणत्याही बाबतीत सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.

टोपलीच्या शौचकूपांच्या रुपांतरासाठी निधी.

[२][**९१-क.** (१) प्रत्येक नगरपरिषद ' टोपलीच्या शौचकूपांच्या रूपांतरासाठी निधी ' या नावाचा एक विशेष निधी स्थापन करील आणि चालू ठेवील, त्यामध्ये पुढील उत्पन्न जमा करण्यात येईल :—

(एक) कलम १०५, पोटकलम (२), खंड (ङ) अन्वये बसविण्यात आलेल्या विशेष शौचकूप कराचे उत्पन्न ;

(दोन) नगरपरिषदेकडून ज्यांचा स्वतंत्र हिशेब ठेवण्यात येईल अशी, टोपलीच्या शौचकूपांचे पाणशौचकूपांमध्ये रूपांतर करण्यासाठी, राज्य शासनाकडून मिळालेली, कोणतीही अनुदाने किंवा कर्जे.

(२) या निधीमध्ये जमा असलेल्या रकमेचा, नगरपालिका क्षेत्रात असलेल्या टोपलीच्या शौचकूपांचे पाणशौचकूपांमध्ये रूपांतर करण्याच्या प्रयोजनासाठीच फक्त विनियोग करण्यात येईल].

नगरपालिकेच्या मालमत्तेच्या हस्तांतरणाविषयी तरतुदी.

**९२.** (१) कोणतीही नगरपरिषद राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय आपली स्थावर मालमत्ता हस्तांतरित करणार नाही.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ याच्या कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ७ अन्वये कलम ९१-क हे, समाविष्ट करण्यात आले.

(२) एकूण परिषद सदस्यांच्या कमीत कमी दोनतृतीयांश इतक्या बहुसंख्येने सभेत मंजूर झालेला नगरपरिषदेचा ठराव, अशा हस्तांतरणाच्या प्रस्तावासोबत जोडण्यात येईल आणि तो याबाबत राज्य शासनाने केलेल्या नियमांशी कोणत्याही प्रकारे विसंगत असणार नाही.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, नगरपरिषदेला जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीसाठी आपली स्थावर मालमत्ता पट्ट्याने देता येईल, आणि पट्टेदाराला अशा स्थावर मालमत्तेवर कोणतेही कायम स्वरूपाचे बांधकाम करण्यास मुभा दिली जाणार नाही. नगरपरिषदेला अशा पट्ट्यांचे, [१]* * *, तीन वर्षापेक्षा अधिक मुदतीपर्यंत नवीकरण करता येईल. तथापि, अशा प्रकारे कोणत्याही पट्ट्यांचा एकूण कालावधी [२][नऊ] वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

असा कोणताही पट्टा किंवा त्याचे नवीकरण, यास, नगरपरिषदेच्या सभेत त्याबाबत ठराव संमत करण्यात आल्याशिवाय, मंजुरी देण्यात येणार नाही.

[३][**९२-क.** या बाबतीत कोणतेही नियम करण्यात आले असल्यास, त्या नियमांस अधीन राहून, नगरपरिषदेस, आपली कोणतीही जंगम मालमत्ता हस्तांतरित करता येईल.] जंगम मालमत्तेचे हस्तांतरण.

**९३.** (१) (क) ज्याची अर्थसंकल्पीय अनुदानात तरतूद केलेली नाही, असा खर्च ज्यामध्ये अंतर्भूत असेल अशा प्रत्येक संविदेच्या बाबतीत ; संविदा व निविदा याबाबतच्या तरतुदी.

(ख) जी संविदा, ती केल्याच्या दिनांकास चालू असलेल्या शासकीय वर्षात पुरी करता येणार नाही अशा प्रत्येक संविदेच्या बाबतीत,

सर्वसाधारण सभेत संमत केलेल्या ठरावाद्वारे दिलेली नगरपरिषदेची मंजुरी आवश्यक असेल.

(२) (क) या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी करावयाची प्रत्येक संविदा, नगरपरिषदेच्या वतीने मुख्य अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(ख) जी कोणतीही संविदा, दुसऱ्या एखाद्या नगरपालिकेच्या प्राधिकाऱ्याची मान्यता किंवा मंजुरी अगोदरच सर्वप्रथम मिळाल्याशिवाय पार पाडण्यास मुख्य अधिकाऱ्यास या अधिनियमाद्वारे अधिकार दिलेला नाही अशी कोणतीही संविदा त्याला अशा मान्यतेवाचून किंवा मंजुरी वाचून करता येणार नाही.

(ग) ज्या कोणत्याही संविदेत [४][रु. ७,५००, रू. ५,००० व रु. २,५००] याहून अधिक खर्च अंतर्भूत असेल अशी कोणतीही संविदा, नगरपरिषदेने याबाबतीत अन्यथा प्राधिकृत केले नसेल तर, अनुक्रमे 'अ' वर्ग, 'ब' वर्ग किंवा 'क' वर्ग नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी नगरपरिषदेची मान्यता किंवा मंजुरी मिळाल्यावाचून करणार नाही.

(घ) खंड (ग) मधील मर्यादेच्या ७५ टक्क्यांपेक्षा अधिक परंतु उक्त मर्यादांपेक्षा अधिक नसेल असा खर्च अंतर्भूत असणाऱ्या, मुख्य अधिकाऱ्याने केलेल्या प्रत्येक संविदेबाबत, तो, अशी संविदा केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत नगरपरिषदेस कळवील.

(ङ) या कलमाच्या पूर्ववर्ती तरतुदी मूळ संविदेस ज्या मर्यादेपर्यंत लागू असतील, त्या मर्यादेपर्यंतच संविदेतील प्रत्येक फेरफारास किंवा ती पार पाडण्याच्या बाबतीत त्या लागू होतील.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम १७(अ) द्वारे "संचालकाच्या परवानगीने" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १७(ब) द्वारे "सात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १९(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) मुख्य अधिकाऱ्याने नगरपरिषदेच्या वतीने केलेली प्रत्येक संविदा, अशा मुख्य अधिकाऱ्याने आपल्या वतीने अशी संविदा केली असती तर ती ज्या रीतीने व ज्या नमुन्यात केली असता त्यास बंधनकारक झाली असती, त्याच रीतीने व त्याच नमुन्यानुसार करण्यात येईल ; आणि तीत, त्याच रीतीने व त्याच नमुन्यानुसार फेरफार करता येईल किंवा ती पार पाडता येईल :

परंतु,—

(क) ज्या बाबतीत अशी कोणतीही संविदा मुख्य अधिकाऱ्याने केली असती तर ती मुद्रांकित करणे आवश्यक झाले असते अशा बाबतीत अशा संविदेवर नगरपरिषदेची सामान्य मुद्रा लावण्यात येईल ;

(ख) ज्यात [१][दोन हजार] रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असेल असे कोणतेही सामान किंवा माल पुरविण्याबाबतचे कोणतेही काम पार पाडण्यासाठी केलेली प्रत्येक संविदा लेखी असेल आणि त्यावर नगरपरिषदेची सामान्य मुद्रा लावण्यात येईल व त्यात, यथास्थिति, करावयाचे काम किंवा पुरवावयाचे सामान किंवा माल तसेच अशा कामासाठी, सामानासाठी किंवा मालासाठी द्यावयाची किंमत व कामाबद्दल केलेल्या संविदेच्या बाबतीत, ते काम किंवा त्यांचा विनिर्दिष्ट करण्यात आलेला भाग ज्या कालावधीच्या किंवा कालावधींच्या आत पूर्ण करण्यात येईल, तो कालावधी किंवा ते कालावधी विनिर्दिष्ट करण्यात येतील.

(४) स्थायी समितीचे दोन सदस्य हजर असल्यावाचून, कोणत्याही संविदेवर किंवा इतर लेखावर नगरपरिषदेची सामान्य मुद्रा लावण्यात येणार नाही ; आणि आपल्या उपस्थितीत ती लावण्यात आली याचे निदर्शक म्हणून त्या संविदेवर किंवा लेखावार ते आपल्या सह्या करतील. अशी कोणतीही संविदा किंवा लेखा करून दिल्याची साक्ष म्हणून कोणत्याही साक्षीदारांनी केलेल्या सह्यांपेक्षा उक्त सदस्यांच्या सह्या सुस्पष्टपणे केलेल्या असतील.

(५) या कलमामध्ये तरतूद केलेल्या रीतीने करण्यात न आलेली संविदा नगरपरिषदेस बंधनकारक असणार नाही.

(६) पोट-कलम (२) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त ज्यांमध्ये [२][दहा हजार] रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असेल असे कोणतेही काम करण्यासाठी किंवा असे कोणतेही सामान किंवा माल पुरविण्यासाठी कोणतीही संविदा करण्यापूर्वी, मुख्य अधिकारी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे नोटीस देईल व ती द्वारे अशा संविदेसाठी निविदा मागवील :

परंतु, ज्या जाहिरातीद्वारे निविदा मागविण्यात आल्या असतील ती जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्याचा दिनांक व मुख्य अधिकाऱ्याने निविदा स्वीकारण्यासाठी निश्चित केलेला शेवटचा दिनांक यामध्ये निदान पूर्ण सात दिवसांचा अवधी दिलेला असेल.

(७) अशा नोटिशीस अनुसरून सादर करण्यात आलेली कोणतीही निविदा स्वीकारणे मुख्य अधिकाऱ्यास बंधनकारक नसेल. परंतु, सर्व परिस्थितीचा विचार केल्यानंतर आलेल्या निविदांपैकी जी निविदा त्यास सर्वांत अधिक फायदेशीर असल्याचे दिसून येईल ती निविदा नगरपरिषदेच्या मान्यतेने त्यास स्वीकारता येईल किंवा त्यास सादर करण्यात आलेल्या सर्व निविदा नाकारता येतील.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम १९(ब) द्वारे "पाचशे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११, च्या कलम ८ द्वारे "१०००" ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(८) जिल्हाधिकाऱ्याची मान्यता मिळविल्यानंतर नगरपरिषदेस आपल्या कार्यवाहीत कारणे अभिलिखित करून मुख्य अधिकाऱ्याला, या कलमात तरतूद केल्याप्रमाणे निविदा न मागविता किंवा त्या मागविण्यात आल्यानंतर त्याच्याकडे आलेल्या कोणत्याही निविदा न स्वीकारता, संविदा करण्यासाठी प्राधिकृत करता येईल.

(९) मुख्य अधिकारी पोट-कलम (६) अन्वये त्याने केलेली प्रत्येक संविदा योग्यरित्या पार पाडली जाण्यासाठी प्रतिभूती मागेल आणि या अधिनियमान्वये तो करील अशी कोणतीही इतर संविदा योग्य रीतीने पार पाडली जाण्यासाठी त्यास स्वेच्छा निर्णयानुसार प्रतिभूती मागता येईल.

अधिकारी किंवा कर्मचारी यांचा संविदेत हितसंबंध असण्यास प्रतिबंध.

**९४.** (१) जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय, नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी नगरपरिषदेशी केलेल्या कोणत्याही व्यवहारांत अथवा संविदेत कोणत्याही प्रकारे संबंध किंवा हितसंबंध असणार नाही.

(२) अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा अशा रीतीने संबंध येत असेल किंवा त्याचा हितसंबंध असेल किंवा आपल्या पदाच्या किंवा नोकरीच्या मिषाने त्याचे रास्त वेतन व भत्ते याखेरीज कोणतीही फी अथवा बक्षीस यांचा तो स्वीकार करील तर, नगरपरिषदेच्या अधीन असलेले कोणतेही पद धारण करण्यास किंवा उक्त पदावर असण्याचे चालू राहाण्यास किंवा नोकरी चालू ठेवण्यास तो त्यानंतर असमर्थ झाला आहे, असे समुचित प्राधिकाऱ्यास जाहीर करता येईल.

(३) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे लगतपुढील कलमाखालील खटल्यास प्रतिबंध होणार नाही.

संविदा वगैरेमध्ये अयोग्य हितसंबंध ठेवल्याबद्दल परिषद सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना शास्ती.

**९५.** (१) कोणताही परिषद सदस्य किंवा नगरपरिषदेचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी, जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय नगरपरिषदेशी केलेल्या कोणत्याही संविदेत, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या हितसंबंधित असेल तर भारतीय दंड संहितेच्या कलम
१८६० चा ४५. १६८ अनुसार त्याने अपराध केल्याचे समजण्यात येईल.

(२) परिषद सदस्य किंवा नगरपरिषदेचा एखादा अधिकारी अथवा कर्मचारी हा, कोणत्याही कंपनीचा अथवा सहकारी संस्थेचा भागधारक आहे किंवा तिचा सदस्य आहे, केवळ याच कारणावरुन, अशी कंपनी किंवा संस्था आणि नगरपरिषद यांच्यातील कोणत्याही संविदेत त्याचा हितसंबंध आहे, असे समजण्यात येणार नाही.

हानी किंवा नुकसानी यासंबंधी परिषद सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे दायित्व.

**९६.** (१) कोणताही परिषद सदस्य किंवा नगरपरिषदेचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी हा, अशा नगरपरिषदेच्या मालकीचा किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेला पैसा किंवा इतर मालमत्ता या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत करण्यात आले नसेल अशा कोणत्याही प्रयोजनाकरिता देईल किंवा तिचे उपयोजन करील किंवा देण्याबद्दल किंवा उपयोजन करण्याबद्दल निदेश देईल किंवा त्यासंबंधातील कोणत्याही होकारात्मक मतदानास किंवा कार्यवाहीस अनुमती देईल किंवा त्याशी सहमत होईल किंवा त्यात सहभागी होईल तर, सद्भावनापूर्वक व योग्य ती दक्षता व काळजी घेऊन त्याने तसे केले होते हे त्याला सिद्ध करता न आल्यास, त्यामुळे झालेल्या हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल अशा नगरपरिषदेस तो व्यक्तिशः दायी असेल.

(२) प्रत्येक परिषद सदस्य किंवा नगरपरिषदेचा प्रत्येक अधिकारी अथवा कर्मचारी हा, नगरपरिषदेच्या मालकीच्या अथवा तिच्या नियंत्रणाखाली असेल अशा कोणत्याही पैशाच्या

किंवा अशा इतर मालमत्तेच्या हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल, जर अशी हानी किंवा नुकसानी ही प्रत्यक्षपणे त्याच्या निष्काळजीपणामुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे झालेली असेल तर, नगरपरिषदेस दायी असेल.

(३) राज्य शासनाच्या आगाऊ मंजुरीखेरीज, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये आपल्या कोणत्याही परिषद सदस्याविरुद्ध नगरपरिषदेला कोणताही दावा दाखल करणार नाही.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये दावा दाखल करता येईल.

(५) दाव्याचे कारण ज्या दिनांकास उद्‌भवले असेल त्या दिनांकापासून सहा वर्षांचा कालावधी संपल्यानंतर या कलमानुसार कोणताही दावा दाखल करण्यात येणार नाही.

नगरपालिका क्षेत्रात व क्षेत्राबाहेर असलेली नगरपालिकेची मालमत्ता व निधी यांचे उपयोजन.

**९७.** नगरपालिका निधी व नगरपरिषदेकडे निहित असलेली सर्व मालमत्ता यांचे उपयोजन नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता केला जाईल :

परंतु, संचालकांची किंवा याबाबत त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याची मंजुरी घेऊन, नगरपरिषदेने पुढील गोष्टी करणे हे कायद्याला धरून असेल :—

(क) नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांसाठी लागणाऱ्या पाणीपुरवठ्यासाठी किंवा नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांच्या उपयोगासाठी विद्युतशक्ती किंवा गॅस पुरविण्याची व्यवस्था करण्याकरिता किंवा कत्तलखाने स्थापन करण्याकरिता किंवा मैल्याची अगर मलप्रवाहाची किंवा जनावरांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी जागांची सोय करण्याकरिता किंवा जलनि:सारणाच्या कामाकरिता किंवा लोकांस नेण्या-आणण्यासाठी यांत्रिक शक्तीने चालणाऱ्या वाहतुकीच्या साधनांची सोय करण्याकरिता किंवा नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांच्या हितासाठी दूध व दूधापासून तयार होणारे पदार्थ यांचा पुरवठा करणे, त्यांचे वाटपे करणे व त्याबाबत प्रक्रिया करणे यासाठी दुग्धशाळा व दुग्धक्षेत्रे स्थापन करण्याकरिता किंवा नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांचे आरोग्य, सुरक्षितता किंवा सोयी वाढण्यास ज्यायोगे मदत होईल अशा कोणत्याही इतर प्रयोजनाकरिता नगरपालिकेच्या हद्दीबाहेर जमीन संपादन करण्याच्या कामी किंवा बांधकाम करण्याच्या, ते सुस्थितीत ठेवण्याच्या त्याची दुरुस्ती करण्याच्या किंवा ते खरेदी करण्याच्या कामी, पैसा खर्च करणे ; अथवा

(ख) जनतेचे आरोग्य, सुरक्षितता किंवा सोय यासंबंधीच्या व अंशदान देण्याऱ्या नगरपरिषदेच्या हद्दीतील रहिवाशांचे प्रत्यक्ष हित साधणाऱ्या योजनांसाठी इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने केलेल्या किंवा कोणत्याही सार्वजनिक निधीतून झालेल्या खर्चापोटी अंशदान देणे :

परंतु आणखी असे की, या कलमाच्या तरतुदीमध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नगरपरिषदेने पूर्वोक्त मंजुरी घेऊन, नगरपालिकेच्या हद्दीबाहेर वर सांगितल्याप्रमाणे पाणीपुरवठा करण्यासाठी किंवा विद्युत्‌शक्तीचा किंवा गॅसचा पुरवठा करण्यासाठी किंवा जलनि:सारणासाठी बांधलेल्या कोणत्याही बांधकामाच्या संबंधात नगरपरिषदेने पुढील गोष्टी करणे हे कायद्याविरुद्ध आहे असे समजले जाणार नाही :—

(एक) कोणत्याही जागेतील,– मग ती जागा नगरपालिकेच्या सीमांच्या आत असो वा नसो,– कोणत्याही व्यक्तींबरोबर किंवा अशा जागेतील कोणत्याही इमारतींच्या

किंवा जमिनींच्या भोगवटादाराबरोबर किंवा मालकाबरोबर केलेल्या करारपत्रात पैसे देण्यासंबंधी आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांकरता त्या नगरपालिका क्षेत्रात आवश्यक नसलेल्या पाण्याचा किंवा विद्युत्‌शक्तीचा किंवा गॅसचा पुरवठा करणे किंवा जलनि:सारण योजनेपासून मिळणारे फायदे उपलब्ध करून देणे चालू ठेवण्यासंबंधी, ज्या अटी व ज्या शर्ती ठरविण्यात येतील त्या अटींवर व त्या शर्तीवर, अशा कोणत्याही व्यक्तींच्या किंवा इमारतींच्या किंवा जमिनींच्या फायद्यासाठी पाणी किंवा विद्युत्‌शक्ती किंवा गॅस पुरविणे किंवा जलनि:सारण योजनेचे फायदे उपलब्ध करून देणे, अथवा

(दोन) पैसा देण्यासंबंधी ज्या कोणत्याही अटी वर सांगितल्याप्रमाणे ठरविण्यात येतील त्या अटींवर असा पुरवठा करण्याच्या किंवा असे फायदे उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असलेले कोणतेही जोडणीचे नळ किंवा कोणत्याही विद्युत्वाहक तारा अथवा गॅसचे नळ किंवा इतर बांधकामे बांधण्यासाठी किंवा ती सुस्थितीत ठेवण्यासाठी, दुरुस्त करण्यासाठी किंवा त्यात फेरफार करण्यासाठी कोणताही खर्च करणे,

(तीन) कलम ४९, पोट-कलम (३), खंड (ट) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थांचे बांधकाम, त्यांची स्थापना किंवा त्या सुस्थितीत राखणे यासाठी अंशदान देणे, मात्र अशी अंशदाने, कोणत्याही एका वित्तीय वर्षातील अशा अंशदानाची एकूण रक्कम, नगरपरिषदेच्या मागील वित्तीय वर्षाच्या सर्वसाधारण महसुलाच्या (शासकीय अनुदाने वगळून) शेकडा दोन टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाहीत, या शर्तीस अधीन असतील :

परंतु, अशी अंशदाने, राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेऊन अशा महसुलाच्या दोन टक्क्यांपेक्षा अधिक परंतु जास्तीत जास्त पाच टक्क्यांइतक्या रकमेपर्यंत देता येतील.

**अग्निशामक सामग्री इत्यादी उसनवारीने देण्याबाबत विशेष तरतूद.**

**९८.** जर निकडीच्या परिस्थितीत नगरपरिषदेने आपली अग्निशामक सामग्री, रोड रोलर, बलिवर्द यंत्र किंवा रुग्णवाहिका जिल्ह्यातील इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास उसनवारीने देण्याचे ठरविले तर नगरपरिषदेस, लगतपूर्ववर्ती कलमानुसार संचालकाची मंजुरी घेणे आवश्यक असणार नाही. नगरपरिषद व सामग्री उसनवारीने घेणारे, स्थानिक प्राधिकरण परस्परास सहमत होतील त्याप्रमाणे उक्त उसनवारीच्या अटी व शर्ती असतील.

**शिलकी पैसा ठेव म्हणून ठेवण्याचा व गुंतवण्याचा अधिकार.**

**९९.** (१) नगरपरिषदेने चालू खर्चासाठी आवश्यक नसलेला, तिच्याकडे शिलकी असलेला कोणताही पैसा भारताच्या स्टेट बँकेत किंवा शासकीय कोषागाराचे काम चालविण्यासाठी यानंतर नेमण्यात येईल अशा इतर बँकेत, किंवा इतर कोणत्याही अनुसूचित बँकेत किंवा राज्य शासनाच्या मंजुरीने महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही सहकारी बँकेत ठेवणे [१][ किंवा राज्य शासनाकडे वा राज्य शासन मान्यता देईल अशा कोणत्याही सांविधिक महामंडळाकडे ठेवणे ] आणि असा पैसा नगरपरिषदेच्या नावे सार्वजनिक रोख्यांत गुंतविणे आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे वेळोवेळी असे रोखे विकणे हे कायदेशीर असेल.

(२) चालू खर्चासाठी आवश्यक असलेल्या पैशाहून अतिरिक्त असलेला सर्व शिलकी पैसा पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ठेव म्हणून ठेवला किंवा गुंतविला नसेल तर, तो स्थानिक शासकीय कोषागारात किंवा जिल्हाधिकारी मान्यता देईल अशा इतर सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येईल.

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ७ याच्या कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

दाव्यात तडजोड करण्याचा [3][*] अधिकार.

**१००.** या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमास अधीन राहून, [1][अध्यक्षास, नगरपरिषदेच्या वतीने,] नगरपरिषदेने दाखल केलेल्या किंवा तिच्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही दाव्याच्या संबंधात किंवा या अधिनियमास अनुसरून नगरपरिषदेने केलेल्या कोणत्याही संविदेतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही दाव्याच्या किंवा मागणीच्या संबंधात तिला पुरेशा वाटणाऱ्या रकमेसाठी किंवा इतर भरपाईसाठी तडजोड करता येईल. [2][अशी कोणतीही तडजोड करण्यात आल्यास अध्यक्ष, आपण केलेल्या कारवाईचा, अहवाल नगरपरिषदेस ताबडतोब सादर करील व अशा अहवालात, इतर गोष्टींबरोबरच ज्यासाठी अशी कारवाई करणे आवश्यक वाटेल ती कारणे नमूद करील.]

सरकारी जागांतून काढून टाकण्याबाबतचा अधिनियम नगरपालिकांच्या जागांबाबत काही फेरबदलांसह लागू करणे.

[4]**[१००-क.** राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून व अशा नगरपालिका क्षेत्रात, मुंबईचा सरकारी जागांतून (काढून टाकण्याबाबत) अधिनियम, १९५५ आणि वेळोवेळी त्याखाली करण्यात आलेले नियम हे, शासकीय जागांना ते ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे, अनुसूची एक-क मध्ये नमूद केलेल्या फेरबदलास अधीन राहून, योग्य त्या फेरबदलांसह, त्या क्षेत्रातील नगरपालिकांच्या जागांनाही लागू होतील.] १९५६ चा मुंबई २.

## प्रकरण आठ

## अर्थसंकल्प आणि लेखे

अर्थसंकल्प.

**१०१.** (१) मुख्य अधिकारी प्रत्येक वर्षी, [5][३१ डिसेंबर पूर्वी, अध्यक्षाच्या निदेशाखाली, पुढील गोष्टी अंतर्भूत असलेला अर्थसंकल्प तयार करील].

(एक) मागील वित्तीय वर्षातील नगरपरिषदेचे उत्पन्न व खर्च दर्शविणारे विवरणपत्र ;

(दोन) त्यावेळी चालू असलेल्या वित्तीय वर्षाच्या १ एप्रिलपासून ३० नोव्हेंबरपर्यंतचे नगरपरिषदेचे उत्पन्न व खर्च दर्शविणारे विवरणपत्र आणि चालू वर्षाच्या उर्वरित भागातील उत्पन्न व खर्च यांचे अंदाज ;

(तीन) आगामी वित्तीय वर्षांमधील नगरपरिषदेच्या उत्पन्नाचे व खर्चाचे अंदाज आणि चालू वर्षाच्या अखेरीस नगरपालिका निधीतील अखेरच्या शिल्लक रकमेचे अंदाज :

[6][परंतु, प्रकरण तेरा व प्रकरण चौदा खालील सेवांच्या संबंधात, आगामी वित्तीय वर्षामधील उत्पन्न व खर्चाचे स्वतंत्र अंदाज तयार करण्यात येतील;]

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४, याच्या कलम २१(अ) द्वारे "नगरपालिकेस तिने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २१(ब) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] "नगरपालिकेचा" हे शब्द, सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २१(क) द्वारे वगळण्यात आले.

[4] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ९ द्वारे कलम १००-क समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २२(१)(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १४८(अ) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(चार) आगामी वर्षात बसवावयाचे कर, फी व इतर आकार यातील कोणतेही फेरफारविषयक प्रस्ताव.

[1][ (१क) पोट-कलम (१) च्या खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेले विवरणपत्र तयार करताना मुख्य अधिकारी त्यासोबत एक अहवाल जोडील व त्यात पुढील सेवा अर्थसहाय्यित रीतीने पुरविण्यात येत होत्या किंवा कसे आणि तसे असल्यास, अर्थसहाय्याची मर्यादा, ज्यामधून अर्थसहाय्य देण्यात येत होते तो स्त्रोत आणि अशा अर्थसहाय्याचा लाभधारक असणाऱ्या स्थानिक जनतेचे विभाग किंवा प्रवर्ग ; जसे—

(क) पाणीपुरवठा व मलप्रवाहाची विल्हेवाट लावणे ;

(ख) कचरा सफाई, कचरा वाहून नेणे व त्याची विल्हेवाट लावणे ;

(ग) नगरपालिकेची वाहतूक व्यवस्था ; आणि

(घ) रस्त्यावर दिवे लावणे.

**स्पष्टीकरण.—** सेवा देणे व ती चालू ठेवणे तसेच मत्तांच्या घसाऱ्यासाठी व ऋणखर्चासाठी केलेली पुरेशी तरतूद यांसाठीचा एकूण खर्च हा, ती सेवा देण्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक होत असेल तर ती सेवा अर्थसहाय्यित सेवा म्हणून देण्यात येते असा त्याचा अर्थ लावण्यात येईल. ]

(२) अशी विवरणपत्रे व अंदाज हे, कलम १०२, पोट-कलम (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या नगरपालिका लेखा संहितेअन्वये विहित करण्यात येतील अशा लेखा शीर्षाखाली व अशा नमुन्यात तयार करण्यात येतील.

[2][(२क) अध्यक्ष, ३१ डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी, पोट-कलम (१) आणि (२) अन्वये तयार करण्यात आलेला अर्थसंकल्प स्थायी समितीपुढे सादर करील आणि उक्त अर्थसंकल्पावर विचारविनिमय करण्यासाठी, १५ जानेवारी रोजी किंवा तत्पूर्वी स्थायी समितीची सभा बो .ावील. अर्थसंकल्पावरील विचारविनिमयाशिवाय इतर कोणतेही कामकाज अशा सभेच्या वेळी करण्यात येणार नाही आणि अशी सभा, आवश्यक असेल तर, वेळोवेळी ३१ जानेवारीपर्यंत चालू ठेवण्यात येईल.

(२ख) स्थायी समितीपुढे अर्थसंकल्प सादर करण्यात किंवा पोट-कलम (२क) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकांना त्या समितीची सभा बोलावण्यात अध्यक्षाने कसूर केली तर जिल्हाधिकारी, मुख्य अधिकाऱ्याकडून किंवा परिषद सदस्याकडून तशा अर्थाची माहिती मिळाल्यानंतर किंवा स्वाधिकारे, अर्थसंकल्प तयार करावयास लावील आणि त्या प्रयोजनार्थ, जिल्हाधिकाऱ्याने बोलावलेल्या सभेत, शक्य तितक्या लवकर , मुख्य अधिकाऱ्यामार्फत तो अर्थसंकल्प स्थायी समितीपुढे सादर करावयास लावील.]

(३) स्थायी समिती, मुख्य अधिकाऱ्याने तयार केलेले अंदाज व प्रस्ताव यांवर विचार आणि तिला योग्य वाटतील अशा शिफारशींसह ते ३१ जानेवारीपूर्वी नगरपरिषदेकडे सादर करील:

परंतु, ३१ जानेवारीपूर्वी स्थायी समितीने आपल्या शिफारशी सादर केल्या नाहीत तर, अध्यक्ष स्थायी समितीच्या शिफारशींशिवाय उक्त विवरणपत्रे व अंदाज नगरपरिषदेपुढे ठेवील.

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम १४८(ब) द्वारे पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २२(१)(ब) अन्वये पोट-कलमे (२क) व (२ख) समाविष्ट करण्यात आली.

(४) नगरपरिषद, मुख्य अधिकाऱ्याने तयार केलेल्या अंदाजांचा व स्थायी समितीच्या कोणत्याही शिफारशी असल्यास, त्यांचा विचार करील अणि २८ फेब्रुवारींच्या आत ते अर्थसंकल्पीय अंदाज फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय स्वीकारील :

[१][परंतु, नगरपरिषदेने शासनाचे कर्ज घेतले असेल किंवा नगरपरिषदेने खुल्या बाजारात किंवा अन्य रीतीने उभारलेल्या कोणत्याही कर्जाबद्दल शासनाने हमी घेतली असेल तेव्हा नगरपरिषदेचा अर्थसंकल्प, जिल्हाधिकाऱ्याची आगाऊ मंजुरी घेऊनच, स्वीकारण्यात येईल. असा जिल्हाधिकारी यासंबंधात संचालकाने दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांनुसारच अशी मंजुरी देईल :]

परंतु आणखी असे की, पहिल्या परंतुकातील कोणत्याही मजकुरामुळे नगरपरिषदेस वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये किंवा अर्थसंकल्प मंजूर करण्यात येईपर्यंत, या दोहोंपैकी जी आधीची असेल त्या मुदतीत आपल्या नगरपालिका निधीतून, मंजूर करण्यात आलेल्या आस्थापनेचा खर्च व आकस्मिक खर्च करण्यास प्रतिबंध होतो असे समजण्यात येणार नाही :

[२][परंतु तसेच, नगरपरिषदेने, २८ फेब्रुवारी रोजी किंवा तत्पूर्वी, अर्थसंकल्प स्वीकृत करण्यात कसूर केली तर, अध्यक्ष ताबडतोब तो अर्थसंकल्प मान्यतेसाठी, संचालकाकडे सादर करील. [३][जिल्हाधिकारी] तो मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, असा अर्थसंकल्प, फेरबदलांसह किंवा फेरबदलाशिवाय मान्य करील किंवा त्यास योग्य वाटेल अशा निदेशांसह, तो पुनर्विचारार्थ अध्यक्षाकडे परत करील असा कोणताही अर्थसंकल्प [३][जिल्हाधिकाऱ्याकडून] मान्य करण्यात येईल तेव्हा तो, रीतसर मंजूर करण्यात आल्याचे समजण्यात येईल.]

(५) पुढील बाबींसाठी तरतूद करण्यात आल्याशिवाय नगरपरिषद कोणत्याही अर्थसंकल्पास मान्यता देणार नाही :—

(क) या अधिनियमान्वये किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नगरपरिषदेवर देण्याचे दायित्व असेल अशा मुद्दलाच्या व व्याजाच्या सर्व रकमा व त्यांचे सर्व हप्ते ते देय होतील तेव्हा देणे ;

(ख) वेतन राखीव निधी व पाणीपुरवठा राखीव निधी यांसारख्या या अधिनियमान्वये स्थापण्यात आलेल्या विशेष निधींना अंशदाने देणे ;

(ग) [४][नगरपरिषदेच्या अधीन काम करणाऱ्या] अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देणे ;

[५][(ग-क) नगरपरिषदेच्या स्वच्छताविषयक कर्मचारीवर्गाच्या राहणीमानात आणि कामाच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी नगरपरिषदेच्या अंदाजित चालू महसुलाच्या, राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल इतक्या टक्केवारी इतकी रक्कम देणे ;]

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम २०(अ) द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २२(१)(क) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २०(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २२(१)(ड) द्वारे "नगरपालिकेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम ८ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

घ) राज्य शासन नियमांद्वारे विहित करील अशी वर्षाअखेरची कमीत कमी रोख शिल्लक रक्कम (कोणत्याही सांविधिक निधीमधील कोणतीही शिल्लक असल्यास ती वगळून).

(६) अशा रीतीने मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात, परिस्थितीनुसार करणे इष्ट असेल त्याप्रमाणे नगरपरिषदेला वेळोवेळी बदल किंवा फेरफार करता येतील :

परंतु, स्थायी समितीस किंवा या अधिनियमान्वये नेमण्यात आलेल्या इतर कोणत्याही समितीस अशा रीतीने मंजूर करण्यात आलेल्या अर्थसकल्पाच्या कक्षेत, प्रत्येक वर्गाच्या नगरपालिकेच्या बाबतीत, नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा मर्यादांच्या बाहेर न जाता, त्याच मुख्य शीर्षाखाली व त्याच समितीच्या नियंत्रणाखाली असलेल्या एका उप-शीर्षातून दुसऱ्या उप-शीर्षात किंवा एका गौण शीर्षातून, दुसऱ्या गौण शीर्षात, पुनर्विनियोजने करण्यास मंजुरी देता येईल. अशा पुनर्विनियोजनांचे विवरणपत्र नगरपरिषदेच्या पुढील सभेत सादर करण्यात येईल :

परंतु तसेच, कोणतेही कर्ज व त्यावरील व्याज यांच्या परतफेडीकरिता आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये स्थापन करण्यात आलेला कोणताही निधी किंवा कोणतेही निधी यांकडे अंशदान देण्याकरिता राखून ठेवण्यात आलेल्या रकमांमधून अशा रीतीने पुनर्विनियोजन करण्यात येणार नाही.

(७) (क) निकडीच्या परिस्थितीखेरीज, कोणत्याही नगरपरिषदेकडून किंवा तिच्या वतीने कोणतीही रक्कम, त्यावेळी अंमलात असलेल्या अर्थसंकल्पात ती अंतर्भूत असल्याशिवाय, खर्च करण्यात येणार नाही.

(ख) अर्थसंकल्पात अशा रीतीने अंतर्भूत करण्यात न आलेली कोणतीही रक्कम निकडीच्या परिस्थितीत खर्च करण्यात आल्यास, अध्यक्षाने, उक्त रक्कम ज्या परिस्थितीत खर्च करण्यात आली असेल ती परिस्थिती, असा जादा खर्च ज्या कोणत्याही रीतीने भरून काढण्याचे योजिले असेल त्याबाबतच्या स्पष्टीकरणासह, नगरपरिषदेस, आणि जिल्हाधिकाऱ्यास ताबडतोब कळवील.

नगरपालिका लेखे.

**१०२.** (१) प्रत्येक नगरपरिषदेच्या जमेचे व संवितरणाचे लेखे राज्य शासनाने विहित केलेल्या नगरपालिका लेखा संहितेत अंतर्भूत असलेल्या नियमांस अनुसरून आणि विहित केलेल्या रीतीने नगरपरिषदेसमोर ठेवण्यात येतील.

(२) प्रत्येक शासकीय वर्षाच्या अखेरीस, मुख्य अधिकारी, नगरपरिषदेचे वर्षाचे लेखे तयार करवून घेण्याची व्यवस्था करील आणि कलम १०४ अन्वये तसे करणे जरुरीचे असल्यास नगरपालिका लेखापरीक्षकाकडून ते तपासून घेईल आणि पुढील वर्षाच्या ३० जूनच्या आत ते नगरपरिषदेपुढे सादर करील.

(३) नगरपरिषदने संमत केल्याप्रमाणे, जमेच्या व संवितरणाच्या प्रत्येक शीर्षाखाली नगरपालिका निधीची जमा व संवितरण दर्शविणारा, तसेच आस्थापनेचा खर्च, निधीतील खर्च न केलेली कोणतीही शिल्लक असल्यास, ती शिल्लक, आणि राज्य शासनाला आवश्यक वाटेल अशी इतर माहिती दर्शविणारा वार्षिक लेख्यांचा गोषवारा पुढील वित्तीय वर्षाच्या ३१ जुलैच्या आत नगरपरिषद संचालकाकडे पाठवील.

लेख्यांची प्रसिद्धी. **१०३.** नगरपरिषदेचे तिमाही व वार्षिक लेखे, जमा व संवितरण आणि मंजूर झालेला अर्थसंकल्प हे, नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही प्रौढ रहिवाशास निरीक्षणासाठी खुले असतील. अशा लेख्यांचे विवरणपत्र आणि अर्थसंकल्प अशा प्रकारे निरीक्षणासाठी ठेवण्यात आले असल्याबद्दलची सूचना स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

लेखापरीक्षा. **१०४.** (१) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० याच्या तरतुदी, प्रत्येक नगरपरिषदेच्या लेखापरीक्षेस लागू होतील. मात्र त्या अधिनियमाद्वारे आयुक्ताला प्रदान केलेले अधिकार व सोपविलेली कर्तव्ये अशा लेखापरीक्षेच्या बाबतीत संचालकाकडूनही वापरण्यात व पार पाडण्यात येतील या फेरफारास त्या अधीन असतील. १९३० चा मुंबई २५.

(२) उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार तरतूद करण्यात आलेल्या लेखापरीक्षेव्यतिरिक्त—

(क) 'अ' वर्ग किंवा 'ब' वर्ग नगरपरिषदेने, विहित करण्यात येईल अशा कालांतराने व अशा रीतीने नगरपालिका लेखापरीक्षकांकडून आपल्या लेख्यांची परीक्षा करण्याची व्यवस्था करील.

(ख) 'क' वर्ग नगरपरिषदेस, विहित करण्यात येईल अशा अभिकरणामार्फत व अशा कालांतराने व अशा रीतीने आपल्या लेख्यांची परीक्षा करण्यासाठी व्यवस्था करता येईल किंवा राज्य शासनाने तसे करण्याबद्दल तिला फर्माविल्यास ती तशी व्यवस्था करील.

(३) लेखापरीक्षकास, लेखापरीक्षेच्या प्रयोजनांसाठी नगरपरिषदेचे सर्व लेखे व संबंधित कागदपत्र पाहता येतील.

## प्रकरण नऊ

## नगरपालिकेची कर आकारणी

### (१) सक्तीचे व ऐच्छिक कर बसविणे

सक्तीचे कर बसविणे. **१०५.** (१) राज्य शासन, याबाबत जे कोणतेही सर्वसाधारण अथवा विशेष आदेश देईल त्यास अधीन राहून, नगरपरिषद या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता खालील यादीत देण्यात आलेले कर बसवील :—

(क) नगरपालिका क्षेत्रातील जमिनी किंवा इमारती यावर अथवा दोहोंवर, कलम ११४ अन्वये ठरविण्यात आल्याप्रमाणे, त्यांच्या करयोग्य मूल्यावर आधारलेला मालमत्तेवरील एकत्रित कर ;

[१][(कक) नगरपालिका क्षेत्रात उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या नगरपालिका क्षेत्राच्या हद्दींमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर बसवावयाचा उपकर ;].

[२][ * * * ] ;

(ग) [३]* * * *

(घ) [४][चित्रपट, नाट्यगृहे, सर्कशी, आनंदबाजार व इतर कार्यक्रम व प्रयोग यांवरील कर];

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ३ द्वारे खंड (कक) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ४ द्वारे खंड (ख) वगळण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६ याच्या अनुसूची, दोन द्वारे खंड (ग) वगळण्यात आला.

[४] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ७ द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (घ) दाखल करण्यात आला.

(ङ) वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातींव्यतिरिक्त इतर जाहिरातींवरील कर :

परंतु, निरनिराळ्या वर्गाच्या नगरपालिका क्षेत्रांत उपरोक्त कर ज्या कमाल व किमान दराने बसविण्यात येतील ते दर आणि उक्त कर बसविणे, त्यांची आकारणी, ते गोळा करणे व त्यांपासून सूट या संबंधातील इतर गोष्टी या, नियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

[१][परंतु आणखी असे की, मालमत्तेवरील एकत्रित कर हा चढत्या श्रेणीत बसवता येईल.]

(२) मालमत्तेवरील एकत्रित करात पुढील गोष्टी अंतर्भूत असतील :—

(क) सर्वसाधारण कर ;

(ख) सर्वसाधारण पाणीपट्टी ;

(ग) दिवाबत्ती कर ;

(घ) सर्वसाधारण स्वच्छताविषयक कर ;

[२][(ङ) विशेष शौचकूप कर ;]

[३][(च) अग्निशमन कर ;]

[४][(छ) पर्यावरणविषयक कर.]

**१०६.** लगतपूर्वीच्या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण आदेशान्वये, उक्त कलमाची पोट-कलमे (१) व (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या करापासून कोणत्याही वर्गातील मालमत्तेच्या किंवा व्यक्तींच्या संबंधात राज्य शासनाने सूट दिल्यास, राज्य शासनास, याबाबतीत कायद्याअन्वये योग्य रीतीने करण्यात आलेल्या विनियोजनाद्वारे, दरवर्षी अशी सूट देण्यात आल्यामुळे उक्त नगरपरिषदेस अदमासे जी तूट येईल त्या तुटीएवढ्या रकमेची संबंधित नगरपरिषदेस प्रतिपूर्ती करता येईल. पुढील बाबतीत राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल :— (सूट दिल्यामुळे करापासून होणाऱ्या उत्पन्नातील तोट्याची शासनाने प्रतिपूर्ती करणे.)

(एक) तूट निर्धारित करण्याची पद्धत; आणि

(दोन) प्रत्येक वर्षी प्रत्येक संबंधित नगरपरिषदेस आलेल्या तुटीची रक्कम.

[५][ **१०६-क.** (१) कलम १०५ मध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या ज्या वेळी,— ([६][अधिक लहान नागरी क्षेत्रात] समाविष्ट करण्यात आलेल्या जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये कमी केलेल्या दराने सर्व-साधारण कर बसविण्यासाठी तात्पुरती तरतूद.)

(क) कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये, एखाद्या नवीन [६][ लहान नागरी क्षेत्रामध्ये], संपूर्णतः किंवा अंशतः एखाद्या जिल्हा परिषद क्षेत्राचा समावेश आहे असे घोषित करण्यात येते ; किंवा

(ख) एखाद्या जिल्हा परिषदेच्या कोणत्याही क्षेत्राचा समावेश करण्यासाठी कलम ६, पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये एखाद्या [६][ लहान नागरी क्षेत्राच्या ] सीमांमध्ये फेरफार करण्यात येतो, त्या त्या वेळी, पूर्वीच्या जिल्हा परिषद क्षेत्रामधील इमारती व जमिनींवर, यासोबत जोडण्यात आलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीमध्ये, त्या तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट करण्यात

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम १४९ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम ९ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ४ द्वारे खंड (च) जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २१ द्वारे खंड (छ) जादा दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे कलम १०६-क समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५०(अ) द्वारे " नगरपालिका क्षेत्रात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

आलेल्या रकमांनुसार सर्वसाधारण कर बसविण्यात येईल आणि उक्त मुदतीमध्ये कलम १४७ अन्वये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींअन्वये या रकमा, त्यांमध्ये वाढ केली जाण्यास पात्र असणार नाहीत.

**तक्ता**

| अनु-क्रमांक | मुदत | सर्वसाधारण कराची रक्कम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | [1][ लहान नागरी क्षेत्रामध्ये ] (जिल्हा परिषद) क्षेत्राचा समावेश करण्यात आल्याच्या दिनांकापासून ते अशा क्षेत्राचा, ज्या वर्षात [1][ लहान नागरी क्षेत्रामध्ये ] समावेश करण्यात आला असेल त्या वर्षानंतर येणाऱ्या दुसऱ्या वर्षाचा ३१ मार्च हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंतचा कालावधी. | (जिल्हा परिषद) क्षेत्राच्या त्या भागात, तो भाग [1][ लहान नागरी क्षेत्रात ] समाविष्ट केला जाण्याच्या लगतपूर्वी, यथास्थिति, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १२४, पोट-कलम (१) च्या खंड (एक) अन्वये किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १५७ च्या खंड (ङ) अन्वये त्या क्षेत्रात देय असलेल्या, इमारती व जमिनींवरील कराच्या दराने परिगणना करण्यात आलेली रक्कम (या तक्त्यात यापुढे जिचा निर्देश " जिल्हा परिषद क्षेत्रात देय असलेली कराची रक्कम " असा करण्यात आला आहे.) |
| २ | नोंद क्रमांक १ मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत समाप्त झाल्यानंतरचा एक वर्षाचा कालावधी. | [1][ लहान नागरी क्षेत्रात ] देय असणाऱ्या सर्वसाधारण कराची रक्कम किंवा जिल्हा परिषद क्षेत्रात देय असलेल्या कराची रक्कम, यांपैकी जी अधिक असेल त्या रकमेच्या २० टक्के रक्कम. |
| ३ | नोंद क्रमांक २ मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत समाप्त झाल्यानंतरचा एक वर्षाचा कालावधी. | [1][ लहान नागरी क्षेत्रात ] देय असणारी सर्वसाधारण कराची रक्कम किंवा जिल्हा परिषद क्षेत्रात देय असलेली कराची रक्कम, यांपैकी जी अधिक असेल, त्या रकमेच्या ४० टक्के रक्कम. |
| ४ | नोंद क्रमांक ३ मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत समाप्त झाल्यानंतरचा एक वर्षाचा कालावधी. | [1][ लहान नागरी क्षेत्रात ] देय असणारी सर्वसाधारण कराची रक्कम किंवा जिल्हा परिषद क्षेत्रात देय असलेली कराची रक्कम, यांपैकी जी अधिक असेल, त्या रकमेच्या ६० टक्के रक्कम. |

१९५९ चा मुंबई ३.
१९६२ चा महा २.

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५०(अ) द्वारे " नगरपालिका क्षेत्रात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५ | नोंद क्रमांक ४ मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत समाप्त झाल्यानंतरचा एक वर्षाचा कालावधी. | [1][ लहान नागरी क्षेत्रात ] देय असलेल्या सर्वसाधारण कराची रक्कम किंवा जिल्हा परिषद क्षेत्रात देय असलेली कराची रक्कम, यांपैकी जी अधिक असेल, त्या रकमेच्या ८० टक्के रक्कम. |
| ६ | नोंद क्रमांक ५ मध्ये निर्दिष्ट केलेली मुदत समाप्त झाल्यानंतरचा कोणताही कालावधी. | [1][ लहान नागरी क्षेत्राच्या ] उर्वरित भागामध्ये अंमलात असलेल्या व देय असलेल्या सर्वसाधारण कराएवढीच रक्कम. |

(२) नगरपरिषद, जिल्हा परिषद क्षेत्राच्या समावेशनाच्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षात नगरपालिका क्षेत्रात करण्यात आलेल्या, दरडोई खर्चाच्या किमान एक तृतीयांश रक्कम किंवा सोयीस्कर असेल अशी कोणतीही त्याहून अधिक रक्कम, पोट-कलम (१) मधील तक्त्याच्या नोंद क्रमांक १ ते ५ मध्ये उल्लेखिलेल्या मुदतीमध्ये, नव्याने समावेश करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये विकास कामांवर खर्च करील. ]

**१०७.** एखाद्या 'क' वर्ग नगरपरिषदेने, एकूण परिषद सदस्यांच्या कमीतकमी दोन-तृतीयांश बहुमताने सभेत ठराव संमत करून अशा ठरावात विनिर्दिष्ट करावयाच्या कारणांकरिता, ती, कलम १०५ ची पोट-कलमे (१) व (२) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या करांपैकी कोणतेही कर बसवू शकत नाही असा निर्णय घेतल्यास राज्य शासनाला त्याबाबतीत, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीकरिता अशा नगरपरिषदेस असा कर बसविण्यापासून अंशतः किंवा पूर्णतः सूट देता येईल. अशा बाबतीत नगरपरिषदेस लगतपूर्वीच्या कलमात तरतूद केल्याप्रमाणे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल प्रतिपूर्ती मिळण्याचा हक्क असणार नाही.

विवक्षित कर बसविण्यापासून 'क' वर्ग नगरपरिषदांना तात्पुरती सूट देण्यासाठी तरतूद.

**१०८.** राज्य शासन याबाबत जे कोणतेही सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देईल त्यांस अधीन राहून नगरपरिषदेस या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता पुढीलपैकी कोणताही कर बसविता येईल :—

नगरपरिषदेस बसविता येतीलअसे इतर कर.

(क) स्वार होण्यासाठी, ओढण्यासाठी किंवा ओझे वाहण्यासाठी वापरण्यात येणारी व नगर क्षेत्रामध्ये उपयोग करण्यासाठी ठेवलेली *(मोटार वाहन अधिनियम, १९३९ यात व्याख्या केलेल्या मोटार वाहनांव्यतिरिक्त) सर्व वाहने, नावा किंवा जनावरे यांवरील कर, मग ती प्रत्यक्षरित्या अशा क्षेत्रात ठेवण्यात येत असोत किंवा बाहेर ठेवण्यात येत असोत;

१९३९ चा ४.

(ख) वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वापरण्यात येणाऱ्या व नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रवेश करणाऱ्या परंतु खंड (क) अन्वये करपात्र नसणाऱ्या वाहनांवरील [2][मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ च्या कलम २० मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त मोटार वाहने वगळून] व जनावरांवरील पथकर ;

१९५८ चा मुंबई ६५.

(ग) नगरपालिका क्षेत्रामध्ये ठेवलेल्या कुत्र्यांवरील कर ;

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५०(अ) द्वारे "नगरपालिका क्षेत्रात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* पहा मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९).

[2] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(घ) यापुढे आवश्यक असल्याप्रमाणे नोटीस दिल्यानंतर नगरपालिकेच्या अभिकरणामार्फत साफ करण्यात येत असतील असे खाजगी संडास, जागा किंवा आवार यांवरील विशेष स्वच्छता कर ;

(ङ) जलनि:सारण कर ;

(च) वैयक्तिक प्रकरणात नगरपरिषदेने पुरविलेल्या पाण्यावरील विशेष पाणीपट्टी, अशा पाणीपुरवठ्याचा आकार कोणत्याही वर्गातील प्रकरणाच्या बाबतीत किंवा कोणत्याही एखाद्या वैयक्तिक प्रकरणात बदलत्या परस्थितीनुरूप सुयोग्य अशा पद्धतीने किंवा पद्धतींनी ठरविण्यात येईल;

(छ) नगरपरिषदेच्या हद्दीतील पवित्र ठिकाणी नियत कालावधीत येणाऱ्या यात्रेकरूंवरील कर ;

(ज) विशेष शिक्षण कर ;

(झ) राज्य विधानमंडळास, भारताच्या संविधानान्वये, राज्यात जो कोणताही कर लादण्याचा अधिकार आहे असा [१][(व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्यांवरील कराव्यतिरिक्त) ] इतर कोणताही कर :

परंतु, खाजगी संडास, जागा किंवा आवार यांच्यासंबंधात, जोपर्यंत नगरपरिषदेकडून,—

(एक) स्वत:च्या श्रमिकांद्वारे ती साफ करण्याची किंवा मलप्रवाह नगरपालिकेच्या प्रणालात नेऊन सोडण्याची किंवा जमा करण्याची तरतूद केली जात नाही; आणि

(दोन) असा कर ज्याच्यावर लादावयाचा त्या व्यक्तीस प्रत्येकी किंवा असा कर ज्या नगरपालिका क्षेत्रामधील किंवा त्याच्या भागामधील रहिवाशांवर बसवावयाचा त्या रहिवाशांना सर्वसाधारणपणे अशा रीतीने सफाई काम करण्याचा व असा कर लादण्याचा आपला इरादा असल्याची एक महिन्याची नोटीस देण्यात येत नाही,

तोपर्यंत, नगरपरिषदेकडून कोणताही स्वच्छता कर बसविला जाणार नाही.

फी. [२][ **१०८-क.** याबाबतीत राज्य शासन, जे कोणतेही सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देईल त्यांस अधीन राहून, नगरपरिषदेस, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, पुढील फी बसविता येईल :—

(क) नगरपरिषदेकडून उपविधिंद्वारे निर्धारित करण्यात येईल अशा निरनिराळ्या मुदतींसाठी, निरनिराळ्या क्षेत्रांसाठी किंवा वसतिस्थानांसाठी किंवा त्यांच्या भागांसाठी, निरनिराळ्या वाहनांकरिता निरनिराळ्या दराने, सार्वजनिक रस्त्यांवर व सार्वजनिक जागी वाहने उभी करण्याकरिता फी ;

(ख) सार्वजनिक रस्ते व फरसबंदी केलेल्या जागांच्या वापरासाठी फी ; यासाठी, नगरपरिषद, उपविधिंद्वारे निर्धारित करील अशा निरनिराळ्या क्षेत्रांसाठी किंवा वसतिस्थानांसाठी किंवा त्यांच्या भागांसाठी निरनिराळ्या दरांनी नगरपरिषदेकडून लायसन दिले जाईल. ]

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ च्या अनुसूची दोन द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५१ द्वारे कलम १०८-क समाविष्ट करण्यात आले.

**१०९.** कलम १०८ मध्ये उल्लेखिलेल्या करांपैकी कोणताही कर [१][आणि कलम १०८-क मध्ये निर्दिष्ट केलेली फी] बसवण्यापूर्वी नगरपरिषद पुढील प्राथमिक कार्यपद्धतीचे अनुसरण करील :— कलम १०८ खाली कर [२][आणि कलम १०८-क खाली फी] बसविण्यापूर्वी अनुसरावयाची कार्यपद्धती.

(क) ती विशेष बैठकीत एक ठराव संमत करून, त्या प्रयोजनासाठी त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या करांपैकी कोणताही एक कर निवडील आणि निवडलेल्या कराच्या संबंधातील उपविधि मान्य करील ; आणि अशा उपविधींमध्ये पुढील गोष्टी विनिर्दिष्ट करील :—

(एक) व्यक्तींच्या किंवा मालमत्तेच्या किंवा या दोहोंच्या ज्या वर्गास करपात्र करण्याचे नगरपरिषद योजित असेल ते वर्ग, आणि जी कोणतीही सूट देण्याचे नगरपरिषद योजित असेल ती सूट ;

(दोन) अशा प्रत्येक वर्गावर ज्या रकमेने किंवा दराने कर आकारण्याचे नगरपरिषद योजित असेल ती रक्कम किंवा तो दर ;

(तीन) असा कर बसविण्याची व वसूल करण्याची पद्धती आणि ज्या दिनांकास तो किंवा त्याचे हप्ते (तसे असल्यास) देय होतील ते दिनांक ;

(चार) राज्य शासन याबाबतीत केलेल्या नियमांद्वारे ज्या इतर बाबी त्यास विनिर्दिष्ट करण्यास सांगेल त्या सर्व बाबी ;

(ख) असा ठराव संमत करण्यात आल्यानंतर कलम ३२२ खालील उपविधिस राज्य शासनाची पूर्वमंजुरी मिळविण्याकरिता नगरपरिषद पुढील कार्यवाही करील.

**११०.** राज्य शासनाने लगतपूर्वीच्या कलमान्वये स्वेच्छाधीन कराच्या संबंधातील उपविधि मंजूर केल्यानंतर, राज्य शासनाने त्याच्या मंजुरीपत्रात विनिर्दिष्ट करावयाच्या दिनांकास किंवा दिनांकानंतर असा कर अंमलात आणला जाईल. त्यानंतर असा कर राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय रद्द करण्यात येणार नाही. स्वेच्छाधीन कर जेव्हा मंजूर करण्यात येईल तेव्हा शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय तो रद्द न करणे.

**१११.** [३][राज्य शासनाने मंजुरी दिलेले आणि **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आलेले, कलमे १०९ आणि ११० यांमध्ये निर्दिष्ट केलेले उपविधि, नगरपरिषद आपल्या कार्यालयातील सूचना फलकावर प्रदर्शित करील. अशा रीतीने प्रदर्शित करण्यात आलेल्या उपविधिंचा विषय आणि ज्या दिनांकास ते उपविधि अंमलात येतील तो दिनांक असलेली एक विहित नमुन्यातील नोटीस नगरपरिषद नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांच्या माहितीसाठी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करील. तथापि, असा दिनांक हा, अशा नोटिशीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून तीस दिवसांपेक्षा कमी दिवसांचा असणार नाही :] करांच्या संबंधातील उपविधींना नोटिशीसह स्थानिकरीत्या प्रसिद्धी.

परंतु,—

(क) वर्षाने बसवावयाचा कर हा, कोणत्याही वर्षातील एप्रिलचा पहिला दिनांक, जुलैचा पहिला दिनांक, ऑक्टोबरचा पहिला दिनांक किंवा जानेवारीचा पहिला दिनांक यांपैकी

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५२(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १५२(ब) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणत्याही दिनांकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही दिनांकास अंमलात येणार नाही ; आणि जर तो एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिनांकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही दिनांकास अंमलात आला तर, तो लगेच पुढे येण्याऱ्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिनांकापर्यंत तिमाहीने बसवण्यायोग्य असेल ;

(ख) एखादा कर किंवा त्याचा भाग वसूल करण्यास फक्त ठराविक मुदतीपुरतीच मंजुरी मिळालेली असेल तर, त्या मुदतीच्या अखेर त्या कराची वसुली करणे बंद होईल ;

मात्र अशा मुदतीत अशा कराची येणे असलेली थकबाकी वसूल करण्यास बाध येणार नाही.

नगरपरिषदेस विहित मर्यादेपर्यंत कराच्या दरात बदल करता येणे.

**११२.** (१) ज्या रकमेने किंवा दराने कर बसविता येईल ती रक्कम किंवा तो दर विनिर्दिष्ट करणारा कोणताही नियम, उपविधी किंवा ठराव असला तरी, नगरपरिषदेस विशेष सभेत संमत केलेल्या ठरावाद्वारे असा कर ज्या रकमेने किंवा ज्या दराने बसविता येईल ती रक्कम किंवा तो दर वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा निर्णय घेता येईल आणि राज्य शासनाने पूर्वीच मंजूर केलेले उपविधी त्या मर्यादेपर्यंत पोट-कलम (२) अन्वये उल्लेखिलेल्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून योग्यरीत्या दुरुस्त करण्यात आले आहेत असे समजण्यात येईल :

परंतु, —

(क) रकमेत किंवा दरात अशी वाढ करणे किंवा ते कमी करणे, हे अशा कराच्या संबंधात या नियमांन्वये ठरविलेल्या कमाल व किमान मर्यादांच्या आत असेल.

[१]* * * *

(२) नगरपरिषदेने, संमत केलेल्या ठरावाद्वारे, कोणताही कर ज्या रकमेने किंवा ज्या दराने बसविता येईल ती रक्कम किंवा तो दर वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा निर्णय घेतला असेल तेव्हा, अशी नगरपरिषद, नगरपलिका क्षेत्रामध्ये असा ठराव व त्यासोबत एक नोटीस प्रसिद्ध करील. अशा नोटिशीत, असा कर ज्या रकमेने किंवा ज्या दराने बसविण्यात येत असेल ती रक्कम किंवा तो दर ज्या दिनांकापासून वाढविण्यात किंवा कमी करण्यात येईल तो दिनांक विनिर्दिष्ट करण्यात येईल असा दिनांक नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याहून आधीचा असणार नाही. असा कर, अशा रीतीने वाढविलेल्या किंवा कमी केलेल्या रकमेने किंवा दराने अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून बसविण्यात येईल. [२][या कलमान्वये ठराव प्रसिद्ध करून बसविता येण्याजोग्या कोणत्याही कराच्या दरात वाढ करण्यात आली असेल तर, त्यामुळे प्रतिकूल परिणाम झालेल्या मालमत्तांच्या मालकांना किंवा भोगवटादारांना त्यासंबंधात कोणतीही स्वतंत्र नोटीस देणे आवश्यक असणार नाही.]

## (२) इमारतींवरील व जमिनीवरील कराचे निर्धारण व दायित्व.

प्राधिकृत मूल्य-निर्धारण अधिकाऱ्याची नेमणूक.

**११३.** (१) राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(क) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी प्राधिकृत मूल्य-निर्धारण अधिकारी म्हणून त्यास योग्य वाटतील अशा नगररचना व मूल्य-निर्धारण विभागाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करता येईल ; आणि

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४५, याच्या कलम ११ द्वारे परिच्छेद (ख) वगळण्यात आला.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(ख) ज्या नगरपालिकाक्षेत्रामध्ये असे अधिकारी या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करतील आणि त्यांच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडतील अशी नगरपालिका क्षेत्रे ठरविता येतील.

(२) कोणत्याही प्राधिकृत मूल्यानिर्धारण अधिकाऱ्याने किंवा अधिकाऱ्यांनी नगरपरिषदेच्या प्रयोजनासाठी त्या वर्षात केलेल्या किंवा करावयाच्या सेवेबद्दल राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवील अशी रक्कम प्रत्येक नगरपरिषद प्रत्येक वर्षी आपल्या महसुलामधून राज्य शासनाला देईल.

(३) कोणत्याही नगरपालिका क्षेत्रासाठी प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईपर्यंत या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अशा अधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार व त्याच्यावर लादलेली कर्तव्ये यांचा त्या क्षेत्रात स्थायी समितीकडून वापर करण्यात येईल व ती पार पाडण्यात येतील.

करयोग्य मूल्य कसे ठरविण्यात यावे.

**११४.** (१) मालमत्ता कर आकारला जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य ठरविण्यासाठी जे वार्षिक भाडे घेऊन अशी इमारत किंवा जमीन सालोसाल वाजवी रीतीने भाड्याने देता येईल अशी अपेक्षा असेल किंवा ती प्रत्यक्ष भाड्याने दिली असेल, त्यापैकी जी अधिक असेल, अशा रकमेतून उक्त वार्षिक भाड्याच्या शेकडा दहा टक्के इतकी रक्कम वजा करण्यात येईल आणि उक्त वजा केलेली रक्कम, दुरुस्तीसाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी मंजूर केलेल्या रकमेच्याऐवजी असेल :

[१][परंतु, राज्य शासन, मालमत्ता कर आकारला जाण्यास पात्र असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य ठरविण्यासाठी, जे वार्षिक भाडे घेऊन कोणतीही अशी इमारत किंवा जमीन वाजवी रीतीने भाड्याने देता येईल अशी अपेक्षा असेल, त्या भाड्याची रक्कम निश्चित करण्याची रीत विहित करू शकेल.]

(२) कोणत्याही इमारतीत किंवा इमारतीवर अथवा जमिनीत किंवा जमिनीवर असलेल्या कोणत्याही यंत्रसामग्रीचे मूल्य अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या करयोग्य मूल्यात समाविष्ट करण्यात येणार नाही.

करनिर्धारण यादी तयार करणे.

**११५.** (१) जेव्हा इमारतीवर किंवा जमिनीवर किंवा या दोहोंवर कर बसवण्यात येईल तेव्हा मुख्य अधिकारी नगरपालिका क्षेत्रामधील सर्व इमारतींची किंवा जमिनींची किंवा जमिनींची व इमारतींची करनिर्धारण यादी विहित नमुन्यामध्ये तयार करवील.

(२) अशी करनिर्धारण यादी तयार करण्यासाठी मुख्य अधिकाऱ्यास किंवा त्याच्या प्राधिकारानुसार काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस नगरपालिका क्षेत्रामधील कोणत्याही इमारतींची किंवा जमिनींची तपासणी करता येईल आणि मुख्य अधिकाऱ्याने मागणी केली असता अशा कोणत्याही इमारतींच्या किंवा जमिनींच्या मालकाने किंवा भोगवटादाराने अशा मागणीत विनिर्दिष्ट केलेल्या वाजवी मुदतीच्या आत, मालकाचे किंवा भोगवटादाराचे किंवा त्या दोहोंचे नाव व राहण्याची जागा व कोणतेही वार्षिक भाडे मिळाले असल्यास ते आणि इमारतीची किंवा जमिनीची त्याने अंदाजलेली किंमत नमूद केलेले, आपल्या पूर्ण माहितीप्रमाणे किंवा समजुतीप्रमाणे खरे असलेले आपल्या सहीचे एक विवरण सादर करणे बंधनकारक असेल.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१, याच्या कलम २ द्वारे वरील परंतुक समाविष्ट करण्यात आले.

मालमत्ता कर देण्यास प्रथमतः दायी असलेल्या व्यक्तीच्या नावाची खात्री करता येत नसेल तर तिला कसे संबोधावे.

**११६.** (१) जेव्हा कोणत्याही जागेच्या संबंधात इमारतींवरील किंवा जमिनींवरील किंवा या दोहोंवरील कर देण्यास प्रथमतः दायी असलेल्या व्यक्तीच्या नावाबद्दल खात्री करता येत नसेल तेव्हा, करनिर्धारणाच्या पुस्तकात व या अधिनियमान्वये उक्त व्यक्तीवर जी कोणतीही नोटीस बजावणे आवश्यक असेल त्या नोटिशीत, अधिक वर्णन न लिहिता अशा जागेचा " धारक " एवढे लिहून त्यास संबोधणे पुरेसे होईल.

(२) जर, अशा कोणत्याही बाबतीत, अशा जागेचा भोगवटा करणारी कोणतीही व्यक्ती, वर सांगितल्याप्रमाणे प्रथमतः दायी कोण हे ठरविण्यासाठी आवश्यक असलेली माहिती देण्याचे नाकारील तर अशी व्यक्ती, अशी माहिती मिळविण्यात येईपर्यंत, त्याच्या भोगवट्यात असलेल्या जागेच्याबाबत बसवावयाचा इमारतींवरील किंवा जमिनींवरील किंवा या दोहोंवरील सर्व कर देण्यास स्वतः दायी असेल.

करनिर्धारण तपासणीसाठी प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकारी.

**११७.** मुख्य अधिकाऱ्याने करनिर्धारण यादी पूर्ण केल्यानंतर त्या नगरपालिका क्षेत्रासाठी राज्य शासनाने नेमलेल्या प्राधिकृत मूल्य-निर्धारण अधिकाऱ्याकडे तो ती सादर करील. मुख्य अधिकाऱ्याने केलेले करनिर्धारण, प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकारी, आवश्यक असल्यास, संबंधित मालमत्तेची तपासणी करून पडताळून पाहील आणि योग्य रीतीने तपासलेली आणि दुरुस्त केलेली ती यादी, दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत मुख्य अधिकाऱ्याकडे परत पाठवील.

करनिर्धारण यादीची नोटीस प्रसिद्ध करणे.

**११८.** लगतपूर्वीच्या कलमाखाली प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकाऱ्याने करनिर्धारण यादी परत पाठविल्यानंतर, मुख्य अधिकारी, अशा यादीबद्दल व ती यादी किंवा तिची प्रत ज्या ठिकाणी पाहण्यास मिळेल त्या ठिकाणाबद्दल एक जाहीर नोटीस देईल ; आणि अशा यादीत समाविष्ट असलेल्या मालमत्तेचा मालक किंवा भोगवटादार आपण आहोत असा हक्क सांगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आणि अशा व्यक्तीच्या कोणत्याही अभिकर्त्यास, अशी यादी विनामूल्य पाहण्याची व तिच्यातून उतारे घेण्याची मुभा असेल.

आक्षेप दाखल करण्यासाठी ठरविलेल्या वेळेबद्दल जाहीर नोटीस.

**११९.** (१) मुख्य अधिकारी लगतपूर्वीच्या कलमान्वये करनिर्धारण यादी प्रसिद्ध करतेवेळी अशा यादीतील ठरविलेल्या मूल्यास किंवा निर्धारणास ज्या दिनांकापूर्वी आक्षेप घेता येतील त्या दिनांकाविषयी जाहीर नोटीस देईल. असा दिनांक ही, यादी प्रकाशित केल्याच्या दिनांकानंतर तीस दिवसांच्या आधीची असणार नाही ; आणि ज्या कोणत्याही मालमत्तेवर प्रथम करनिर्धारण करण्यात आले असेल [१][किंवा बसवता येण्याजोग्या कोणत्याही कराच्या दरात वाढ करण्याव्यतिरिक्त अन्य रीतीने करनिर्धारण वाढविण्यात आले असेल,] त्या सर्व बाबतीत तो मालमत्तेचा मालक किंवा भोगवटादार कोण आहे हे माहीत असल्यास त्यासही नोटीस देईल आणि मालमत्तेचा मालक किंवा भोगवटादार माहीत नसल्यास, तो अशी नोटीस मालमत्तेच्या एखाद्या ठळक भागावर लावील.

(२) अशा यादीतील कोणत्याही मालमत्तेच्या मूल्य-निर्धारणास व करनिर्धारणास आक्षेप घेण्याची, अशा मालमत्तेच्या मालकाची किंवा भोगवटादाराची इच्छा असेल तर असा मालक किंवा भोगवटादार किंवा अशा मालकाचा किंवा भोगवटादाराचा कोणताही अभिकर्ता, उपरोक्त जाहीर नोटिशीत ठरविलेल्या वेळेच्या आत मुख्य अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून आपले आक्षेप सादर करील आणि अशा अर्जात, मूल्य-निर्धारणाबद्दल किंवा करनिर्धारणाबद्दल ज्या कारणांवरून विवाद निर्माण झाला असेल ती कारणे नमूद करील. अशा रीतीने केलेल्या सर्व अर्जांची त्या प्रयोजनासाठी मुख्य अधिकाऱ्याने ठेवावयाच्या पुस्तकात नोंद करण्यात येईल.

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३२, याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१२०.** कलम ११८ मध्ये उल्लेखिलेल्या जाहीर नोटिशीमध्ये नमूद केलेला कालावधी संपल्यानंतर, मुख्य अधिकारी, करनिर्धारण यादी त्याच्याकडे आलेल्या आक्षेपांसह त्या नगरपालिका क्षेत्राच्या प्राधिकृत मूल्य-निर्धारण अधिकाऱ्याकडे पाठवील. आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस जातीने किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकारी आक्षेपांची चौकशी करून ते निकालात काढील आणि लगतपूर्वीच्या कलमान्वये ठेवलेल्या पुस्तकात त्यावरील निर्णय नमूद करवून घेईल आणि अशा निर्णयानुसार आवश्यक असलेली कोणतीही दुरुस्ती करनिर्धारण यादीत करावयास लावील : आक्षेपावर कार्यवाही कशी करावयाची.

परंतु, अशी कोणतीही दुरुस्ती करण्यापूर्वी त्याबद्दलची कारणे उपरिनिर्दिष्ट पुस्तकात नमूद करण्यात येतील.

**१२१.** (१) प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकाऱ्याने अशा रीतीने अंतिमरीत्या तयार केलेली यादी, तो आपल्या कार्यालयाच्या मुद्रेने व आपल्या सहीने अधिप्रमाणित करील आणि तो त्यावर असे प्रमाणपत्र पृष्ठांकित करील की, त्या यादीत ज्याबाबतीत दुरुस्त्या करण्यात आल्या त्याव्यतिरिक्त, मूल्यनिर्धारणास व करनिर्धारणास कोणताही विधिग्राह्य आक्षेप घेण्यात आलेला नाही. करनिर्धारण यादीचे अधिप्रमाणन.

(२) याप्रमाणे अधिप्रमाणित केलेली यादी नगरपालिकेच्या कार्यालयात ठेवण्यात येईल आणि ती तेथे कार्यालयाच्या वेळेत, तीत दाखल केलेल्या मालमत्तेच्या सर्व मालकास व भोगवटादारास किंवा व्यक्तीच्या अभिकर्त्यास पाहण्यासाठी खुली असेल आणि ती याप्रमाणे खुली आहे याबद्दलची नोटीस [१][ ती यादी ज्या सरकारी वर्षाशी संबंधित असेल त्या सरकारी वर्षाच्या ३१ जुलै पूर्वी प्रसिद्ध करण्यात येईल : ]

परंतु जिल्हाधिकारी, कारणे लेखी नमूद करून अशी नोटीस नंतरच्या परंतु उपरोक्त सरकारी वर्षाच्या ३१ डिसेंबरपेक्षा उशिराची नसेल अशा दिनांकास प्रसिद्ध करण्याची मुभा देऊ शकेल.

**१२२.** याप्रमाणे अधिप्रमाणित केलेल्या व ठेवलेल्या करनिर्धारण यादीतील नोंदी आणि यानंतरच्या कलमाच्या तरतुदींनुसार उक्त यादीत कोणत्याही नोंदी समाविष्ट केल्या असल्यास त्या नोंदी, यामध्ये यानंतरच्या कलमाच्या तरतुदींनुसार जे कोणतेही फेरफार करण्यात येतील त्या फेरफारांस व तसेच कलम १६९ किंवा १७१ अन्वये केलेल्या कोणत्याही अपिलाच्या किंवा पुनरीक्षणाच्या निर्णयास अधीन राहून,— अधिप्रमाणित यादी कोठवर निर्णायक आहे.

(एक) नगरपालिकेच्या सर्व करांच्या प्रयोजनासाठी, अशा नोंदी ज्या इमारतीसंबंधी किंवा जमिनीसंबंधी किंवा इमारती व जमिनी या दोहोंसंबंधी अनुक्रमे असतील त्या इमारतींच्या व जमिनींच्या, कलम ११४ मध्ये विहित केलेल्या आधारावर मूल्यनिर्धारणाचा किंवा वार्षिक भाड्याचा ; आणि

(दोन) ज्या करासाठी अशी करनिर्धारण यादी तयार करण्यात आली असेल त्या कराच्या प्रयोजनासाठी, अशी यादी ज्या कोणत्याही शासकीय वर्षात अंमलात असेल त्या वर्षात अशा इमारतीवर किंवा जमिनीवर किंवा अशा इमारती व जमिनी या दोहोंवर बसवावयाच्या कराच्या रकमेचा निर्णायक पुरावा म्हणून स्वीकारण्यात येईल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४५, कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कर निर्धारण यादीची दुरुस्ती.

**१२३.** (१) कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात एखादी नोंद जर लबाडीने, अभावितपणे अथवा चुकीने गाळण्यात आली असेल किंवा चुकीची नोंदण्यात आली असेल तर, त्या मालमत्तेसंबंधीची नोंद किंवा, जर करनिर्धारण यादी तयार करण्यात आल्यानंतर एखादी इमारत पूर्णत: किंवा अंशत: बांधण्यात आली असेल किंवा तीत फेरफार करण्यात आला असेल किंवा वाढ करण्यात आली असेल किंवा ती पुन्हा बांधण्यात आली असेल तर अशा बांधलेल्या, फेरफार केलेल्या, वाढ केलेल्या किंवा पुन्हा बांधलेल्या कोणत्याही इमारतीसंबंधीची नोंद दाखल करून किंवा बदलून मुख्य अधिकाऱ्यास प्राधिकृत मूल्यनिर्धारण अधिकाऱ्याच्या सल्ल्याने उक्त करनिर्धारण यादीत कोणत्याही वेळी फेरफार करता येईल. मात्र उक्त यादीतील फेरफारात हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या दिनांकापूर्वी तिने फेरफारासंबंधी कोणताही आक्षेप सादर करावयाचा असेल त्या दिनांकाविषयी नोटीस देता येईल. असा दिनांक* उक्त नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आधीचा असता कामा नये.

(२) अशा कोणत्याही फेरफारात हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अशा नोटिशीत ठरविलेल्या वेळेपूर्वी व कलम ११९ द्वारे तरतूद केलेल्या रीतीने सादर केलेल्या आक्षेपावर, सर्व बाबतीत तो उक्त कलमान्वये केलला अर्ज आहे असे समजून कार्यवाही करण्यात येईल.

(३) या कलमान्वये केलेली नोंद किंवा फेरफार, कलमे १६९ व १७१ च्या तरतुदींस अधीन राहून, पुढीलप्रमाणे बांधलेल्या, फेरफार केलेल्या, वाढ केलेल्या किंवा पुन्हा बांधलेल्या इमारतीच्या बाबतीत, अशी बांधणी, फेरफार, वाढ किंवा पुनर्बांधणी ज्या दिवशी पुरी झाली तो दिवस, किंवा नवीन बांधलेली, फेरफार केलेली, वाढ केलेली किंवा पुन्हा बांधलेली इमारत ज्या दिवशी प्रथम भोगवट्यात आली तो दिवस, यांपैकी जी गोष्ट प्रथम घडली असेल त्या दिवशी अशी नोंद किंवा फेरफार करण्यात आला असे समजून अंमलात येईल किंवा इतर बाबतीत, नोंद किंवा फेरफार करणे समर्थनीय ठरवणारी परिस्थिती अस्तित्वात असलेल्या, चालू शासकीय वर्षातील सर्वात आधीच्या दिवशी, अशी नोंद किंवा फेरफार करण्यात आला होता असे समजून अंमलात येईल ; आणि, यथास्थिति कर किंवा वाढविलेला कर अशा वर्षी, अशा दिवसानंतर वर्षाच्या शिल्लक दिवसांचे संबंध वर्षाशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणात वसूल केला जाईल.

---

* सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र. ३२ याचे कलम ५ पुढीलप्रमाणे :—

मालमत्तांच्या मालकांना किंवा भोगवटादारांना दरात वाढ करण्यासंबंधातील नोटीस न देता बसविण्यात किंवा वसूल करण्यात आलेले विवक्षित कर विधिग्राह्य असणे.

**५.** मुख्य अधिनियम किंवा तद्न्वये तयार करण्यात आलेले कोणतेही नियम किंवा उपविधि किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यात काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्तेच्या मालकांना किंवा भोगवटादारांना ज्या दराने कर आकारावयाचा त्या कराच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आल्यासंबंधीची किंवा कराच्या दरात अशी कोणतीही वाढ करण्यात आल्याने त्यांच्या मालमत्तेच्या कर निर्धारणात वाढ झाल्यासंबंधीची कोणतीही नोटीस न देता, कोणत्याही नगरपालिकेने, १ एप्रिल, १९८१ रोजी किंवा त्यानंतर, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार बसविलेले किंवा वसूल केलेले कोणतेही कर विधिवत बसवण्यात किंवा वसूल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल व ते नेहमीच विधिग्राह्य असल्याचे समजण्यात येईल आणि अधिक दराने कर बसविण्याच्या पूर्वी किंवा वसूल करण्यापूर्वी कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती याच केवळ कारणावरून अशा कोणत्याही करवाढीबाबत कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही. अशा रीतीने बसवण्यात किंवा वसूल करण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या रकमेचा परतावा मिळण्याबाबत न्यायालयात कोणताही दावा किंवा कोणतीही कार्यवाही चालवता किंवा चालू ठेवता येणार नाही.

[1][१२४. (१) दरवर्षी, नवीन निर्धारण सूची तयार करण्याची आवश्यकता असणार नाही. पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, मुख्य अधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटतील असे फेरफार करून, नवीन वर्षासाठी मागील वर्षाच्या निर्धारण सूचीचा स्वीकार करता येईल :

नवीन निर्धारण सूची तयार करणे व करपात्र मूल्यांमध्ये नियतकालिक सुधारणा.

परंतु,—

(एक) कोणत्याही मालमत्तेचे निर्धारण प्रथमच होत असेल [2][ किंवा बसवता येण्याजोग्या कोणत्याही कराच्या दरात वाढ करण्याव्यतिरिक्त अन्य रीतीने करनिर्धारण वाढवण्यात आले असेल] अशा सर्व बाबतीत, कलम ११९, पोट-कलम (१) अन्वये नोटीस देण्यात येईल ;

(दोन) सूची स्वीकारण्यासंबंधित कलम १२१, पोट-कलम (२) खालील एक नोटीस प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) नगरपालिका क्षेत्रामधील सर्व मालमत्तांच्या करपात्र मूल्यामध्ये शक्य असेल तेथवर, चार वर्षांतून एकदा सुधारणा करण्यात येईल आणि एकदा सुधारणा करण्यात आल्यावर, या पोट-कलमान्वये त्यांमध्ये सुधारणा होईतोपर्यंत ते अंमलात राहील. या बाबतीत कोणतेही नियम केलेले असल्यास, त्यांस अधीन राहून, मुख्य अधिकाऱ्यास एका वेळी संपूर्ण नगरपालिका क्षेत्राच्या करपात्र मूल्यामध्ये सुधारणा करण्याचे काम हाती घेता येईल किंवा नगरपालिका क्षेत्राची विभागणी करता येईल आणि त्यास योग्य वाटेल अशा वेळी, प्रत्येक विभागाच्या मूल्यामध्ये सुधारणा करण्याचे काम हाती घेता येईल, परंतु नगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांच्या करपात्र मूल्यांमध्ये शक्य असेल तेथवर, चार वर्षांत सुधारणा पूर्ण करण्यात येईल :]

[3][परंतु, राज्य शासन कोणत्याही वेळी, लोकहिताच्या दृष्टीने, नगरपालिका क्षेत्रांमधील सर्व मालमत्तांच्या करपात्र मूल्याचे पुनरीक्षण करण्यासाठी नगरपरिषदेला निदेश देऊ शकेल आणि असे निदेश नगरपरिदेवर बंधनकारक राहतील.]

**१२५.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, कोणत्याही जागेवर निर्धारित मालमत्ता कर प्रथमतः पुढीलप्रमाणे वसूल करता येईल :—

मालमत्ता कर देण्याबद्दलची, प्राथमिक जबाबदारी कोणावर असेल.

(क) जागा प्रत्यक्ष शासनाने किंवा नगरपरिषदेने धारण केली असेल तर प्रत्यक्ष भोगवटादाराकडून :

परंतु, शासनाकडे निहित असलेल्या व भाडे देऊन शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या किंवा इतर व्यक्तींच्या भोगवट्यात असलेल्या इमारतीच्या बाबतीत देणे असलेला मालमत्ता कर प्रथमतः शासनाकडून वसूल करता येईल ;

(ख) जागा अशा रीतीने धारण केली नसेल तर—

(एक) जागा भाड्याने देण्यात आली असल्यास, पट्टाकाराकडून,

(दोन) जागा पोट-भाड्याने देण्यात आली असल्यास वरिष्ठ पट्टाकाराकडून,

(तीन) जागा भाड्याने देण्यात आली नसल्यास, ती भाड्याने देण्याचा हक्क ज्या व्यक्तीकडे निहित असेल त्या व्यक्तीकडून.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १३ द्वारे मुळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ याच्या कलम ३ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(२) कोणतीही जमीन एखाद्या भाडेकऱ्यास एका वर्षापेक्षा अधिक मुदतीसाठी भाड्याने दिली असेल आणि अशा भाडेकऱ्याने अशा जमिनीवर इमारत बांधलेली असेल, तर, उक्त जमिनीवर व तिच्यावर बांधलेल्या इमारतीवर निर्धारित करण्यात आलेला मालमत्ता कर अशा भाडेकऱ्याकडून किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीने कायद्याच्या प्रवर्तनामुळे किंवा अभिहस्तांकनामुळे किंवा हस्तांतरणामुळे परंतु पोटपट्ट्याने दिल्यामुळे नव्हे, अशाकडून हक्क संपादन केला असेल त्या व्यक्तीकडून किंवा अशा भाडेकऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधीकडून प्रथमतः वसूल करण्यात येईल— मग अशी जागा उक्त भाडेकऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या किंवा कायदेशीर प्रतिनिधीच्या किंवा पोट-भाडेकऱ्याच्या भोगवट्यात असो वा नसो.

मालमत्ता कर देण्याबद्दल भोगवटादारांना केव्हा जबाबदार धरता येईल.

**१२६.** (१) कोणत्याही मालमत्ता कराबद्दल देय असलेली रक्कम, ती देण्यास प्रथमतः दायी असलेल्या व्यक्तीस त्याबद्दलचे देयक योग्य रीतीने देण्यात आल्यानंतर भरावयाची राहिली असेल आणि उक्त व्यक्ती, ज्या जागेसंबंधी कर देय असेल त्या जागेचा त्यावेळी भोगवटादार नसेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, अशा रकमेचे देयक उक्त जागेच्या भोगवटादारावर बजावता येईल किंवा अशा जागेचे दोन किंवा अधिक भोगवटादार असतील तर, त्यांच्यापैकी प्रत्येकावर, भोगवटा करणाऱ्या अशा व्यक्तीने दिलेल्या भाड्याचे उक्त जागेबद्दल त्या दोघांनी किंवा सर्वांनी दिलेल्या भाड्याच्या एकूण रकमेशी जे प्रमाण बसत असेल त्याच प्रमाणात देय रकमेचा जो हिस्सा देय असलेल्या एकूण रकमेशी बसत असेल त्या रकमेचे देयक देता येईल.

(२) भोगवटादाराने किंवा भोगवटारांपैकी कोणीही असे कोणतेही देयक दिल्यापासून तीस दिवसांच्या आत, त्यात मागणी केलेली रक्कम दिली नाही तर, अशी रक्कम त्याच्याकडून वसूल करता येईल.

(३) मालमत्ता कराची जी थकबाकी एक वर्षापेक्षा अधिक मुदतीपर्यंत देय राहिली असेल किंवा ज्या जागेवर कर निर्धारित करण्यात आला असेल ती जागा ज्या मुदतीत भोगवटादाराच्या भोगवट्यात नव्हती अशा मुदतीबद्दल देय असेल अशी थकबाकी या कलमान्वये कोणत्याही भोगवटादाराकडून वसूल करण्यात येणार नाही.

(४) या कलमान्वये भोगवटादाराने कोणतीही रक्कम भरली असेल किंवा ती त्याच्याकडून वसूल करण्यात आली असेल तर, त्यास ती रक्कम भरण्यास प्रथमतः दायी असलेल्या व्यक्तीच्या खात्यात ती जमा करण्याचा हक्क असेल.

भोगवट्याखाली नसलेल्या मालमत्तेच्या बाबतीत अंशतः माफी.

**१२७.** (१) कोणत्याही इमारतीवर किंवा जमिनीवर वर्षावर्षाने कर द्यावयाचा असेल किंवा जिच्याबद्दल वर्षावर्षाने किंवा हप्त्याने विशेष स्वच्छता कर द्यावयाचा असेल अशी कोणतीही इमारत किंवा जमीन सबंध वर्षभर किंवा वर्षाच्या ज्या भागाबद्दल असा कर आकारणीयोग्य असेल त्या भागाच्या कालावधीत किंवा ज्या कालावधीबद्दल असा हप्ता द्यावयाचा असेल त्या सबंध कालावधीत रिकामी राहिली असेल व तिच्यापासून भाड्याचे उत्पन्न मिळत नसेल तर, नगरपरिषद, यथास्थिति, अशा कराच्या किंवा करांच्या हप्त्याच्या रकमेच्या एक-द्वितीयांशाहून अधिक नसेल इतक्या रकमेची माफी किंवा परतावा देईल :

परंतु, इमारत किंवा जमीन रिकामी होती व तिच्यापासून भाड्याचे कोणतेही उत्पन्न मिळाले नाही अशा अर्थाची लेखी नोटीस मुख्य अधिकाऱ्यास देण्यात आली नसेल तर, अशा रीतीने कोणत्याही रकमेची माफी किंवा परतावा मंजूर करण्यात येणार नाही आणि अशी नोटीस ज्या दिवशी सुपूर्द केली असेल त्या दिवसापूर्वीच्या कोणत्याही कालावधीबद्दल अशा रीतीने माफी किंवा परतावा देण्यात येणार नाही.

(२) जेव्हा पूर्वोक्त अशी कोणतीही इमारत किंवा जमीन—

(क) लागोपाठ नव्वद दिवसांहून कमी नसेल अशा कोणत्याही कालावधीपर्यंत रिकामी व भाड्याचे उत्पन्न मिळाल्यावाचून राहिली असेल, अथवा

(ख) निरनिराळ्या गाळ्यांची मिळून बनलेली असून त्यापैकी एक किंवा अधिक गाळे उपरोक्त अशा कोणत्याही कालावधीपर्यंत रिकामे व भाड्याचे उत्पन्न मिळाल्यावाचून राहिले असतील, अथवा

(ग) ती पूर्णत: किंवा बव्हंशी पाडण्यात आली असेल किंवा आगीने नष्ट झाली असेल किंवा अन्यथा ती मूल्यहीन झाली असेल,

तर नगरपरिषदेस अशा, कोणताही असल्यास, कराच्या किंवा हप्त्याच्या समन्याय वाटेल अशा भागाची माफी किंवा परतावा देता येईल.

(३) कोणत्याही व्यक्तीस ज्या गोष्टीमुळे या कलमान्वये अनुतोष मिळविण्याचा हक्क प्राप्त होतो त्या गोष्टी सिद्ध करण्याचा बोजा त्या व्यक्तीवर राहील.

**१२८.** लगतपूर्वीच्या कलमाचे पोट-कलम (२), खंड (क) च्या प्रयोजनांसाठी एखादी इमारत किंवा जमीन, सतत भोगवट्यात ठेवण्याचा हक्क ज्यास आहे अशा भाडेकरूस भाड्याने दिली असेल तर तिच्यापासून भाड्याने उत्पन्न मिळते असे समजण्यात येईल— मग ती प्रत्यक्ष अशा भाडेकरूच्या भोगवट्यात असो वा नसो.

इमारतीपासून किंवा जमिनीपासून भाड्याचे उत्पन्न मिळते असे केव्हा समजण्यात येईल.

**१२९.** (१) जेव्हा केव्हा इमारतींवरील किंवा जमिनींवरील किंवा या दोहोंवरील कर देण्यास प्रथमत: दायी असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा अशी इमारत किंवा जमीन किंवा दोन्ही यासंबंधी किंवा यावरील मालकी हक्क हस्तांतरित करण्यात येईल तेव्हा, जिचा मालकी हक्क अशा रीतीने हस्तांतरित करण्यात आला असेल ती व्यक्ती आणि ज्या व्यक्तीकडे असा मालकी हक्क हस्तांतरित करण्यात आला असेल ती व्यक्ती, हस्तांतरणाचा लेख करण्यात आल्यानंतर किंवा तो नोंदणे आवश्यक असल्यास त्याच्या नोंदणीनंतर किंवा कोणताही लेख करून देण्यात आला नसेल तेव्हा हस्तांतरण अंमलात आल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत अशा हस्तांतरणाची लेखी नोटीस मुख्य अधिकाऱ्यास देईल.

मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित पक्षकारांनी हस्तांतरणाची नोटीस देणे.

(२) वर सांगितल्याप्रमाणे प्रथमत: दायी असलेली कोणीही व्यक्ती मरण पावल्यास, वारस म्हणून किंवा अन्यथा मयत व्यक्तीचा मालकी हक्क ज्या व्यक्तीकडे हस्तांतरित होईल ती व्यक्ती, मयत व्यक्तीच्या मृत्यूपासून एक वर्षाच्या आत मुख्य अधिकाऱ्यास अशा हस्तांतरणाची नोटीस देईल.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) यात उल्लेख केलेली नोटीस, देण्यास दायी असलेला व्यक्तीने अशी नोटीस दिली नाही तर, अपराध सिद्धझाल्यानंतर, त्यास पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**१३०.** (१) लगतपूर्वीच्या कलमान्वये द्यावयाची नोटीस, यथास्थिति, अनुसूची २ किंवा ३ मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे असेल व तीत उक्त नमुन्याप्रमाणे आवश्यक असलेला सर्व तपशील स्पष्टपणे व बिनचूकपणे नमूद करण्यात येईल.

नोटिशीचा नमुना.

(२) अशी कोणतीही नोटीस मिळाल्यानंतर, मुख्य अधिकारी, आवश्यक वाटल्यास हस्तांतरणाचा कोणताही लेख असल्यास तो, किंवा भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या कलम ५७ अन्वये मिळविलेली त्याची प्रत सादर करण्यास फर्मावू शकेल. १९०८ चा १६.

नोटिशीच्या अभावी मूळ धारकावर कर देण्याचे दायित्व चालू राहणे.

**१३१.** (१) इमारतींवरील किंवा जमिनीवरील किंवा या दोहोंवरील कर देण्यास प्रथमतः दायी असलेली जी कोणतीही व्यक्ती, अशा इमारतीसंबंधातील किंवा जमिनीसंबंधातील किंवा या दोहोसंबंधातील किंवा त्यांवरील आपला मालकी हक्क वर सांगितल्याप्रमाणे मुख्य अधिकाऱ्यास हस्तांतरणाची नोटीस दिल्यावाचून हस्तांतरित करील अशी प्रत्येक व्यक्ती, अशी नोटीस देईपर्यंत किंवा नगरपरिषदेकडून अशा हस्तांतरणाची नोंद होईपर्यंत अशा निष्काळजीपणामुळे जे कोणतेही इतर दायित्व तिला पत्करावे लागत असेल त्या दायित्वाबरोबरच इमारतीवरील किंवा जमिनीवरील किंवा दोहोंवरील उक्त कर देण्यात दायी असण्याचे चालू राहील.

(२) परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, हस्तांतरितीचे उक्त कर देण्याचे दायित्व कमी होते किंवा इमारतींवरील किंवा जमिनींवरील किंवा या दोहोंवरील कर वसूल करण्याबाबत उक्त इमारत व जमीन यांच्या संबंधात कलम १६२ अन्वये नगरपरिषदेस प्रदान केलेल्या पूर्व दाव्यास बाध येते, असे समजले जाणार नाही.

विशेष पाणी कराच्या ऐवजी ठराविक आकार व पैसे देण्याबद्दल करार.

**१३२.** नगरपरिषदेला, वैयक्तिक बाबतीत नेहमीच्या दराने विशेष पाणी कर लादण्याऐवजी, केलेल्या पाणीपुरवठ्याचे मोजमाप करून त्याप्रमाणे दर ठरविता येतील किंवा कोणत्याही व्यक्तीने अर्ज केला असता अशा व्यक्तीबरोबर करार करून ठरविण्यात येतील अशा अटींवर आणि अशा शर्तीस अधीन राहून, ठरविण्यात येईल इतक्या परिमाणात, किंवा अशा घरगुती किंवा इतर प्रयोजनासाठी त्यास नगरपरिषदेच्या मालकीचे पाणी नियतकालाने किंवा इतर रीतीने पैसे दिल्यावर पुरविण्यातबाबत तिच्याबरोबर व्यवस्था करता येईल :

परंतु,—

(क) अशा पुरवठ्यासाठी आवश्यक व आनुषंगिक असलेली मीटर, जोडणीनळ व इतर सर्व कामे व अशा कामांच्या सर्व दुरूस्त्या, त्यातील विस्तार किंवा फेरफार हे नगरपरिषदेच्या नियंत्रणाखाली असतील आणि त्याबद्दलचा खर्च नियमांशी किंवा उपविधींशी विसंगत नसेल तेथवर, अशा पुरवठ्याबद्दल ठरविलेले आकार किंवा रकमा देण्यास दायी असलेल्या व्यक्तीकडून देण्यात येईल ; आणि

(ख) असा पाणीपुरवठा, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या उपविधीत, पाणीपुरवठ्याची मर्यादा किंवा तो बंद करणे यासंबंधी आणि पाण्याचा अपव्यय व दुरुपयोग होऊ न देण्यासंबंधी ज्या शर्ती विहित केलेल्या असतील त्या सर्व शर्तीवर करण्यात येईल व तो तसा करण्यात आला आहे असे समजले जाईल.

विशेष स्वच्छता विषयक कराऐवजी विशेष पट्टी ठरविण्याचा अधिकार.

**१३३.** नगरपरिषदेने कोणताही कारखाना, हॉटेल, क्लब किंवा एकाच प्रयोजनाकरिता वापर केलेला आणि एकाच व्यवस्थेखाली असलेल्या इमारतींचा किंवा जमिनीचा कोणताही गट साफ करण्यासाठी तरतूद केलेली असेल तेव्हा, त्या नगरपरिषदेस या प्रकरणान्वये बसवावयाच्या कोणत्याही विशेष स्वच्छता कराऐवजी एक विशेष पट्टी ठरविता येईल व ती नियतकालाने भरण्याबद्दलचे दिनांक व इतर शर्ती ठरविता येतील ; अशी पट्टी, दिनांक व शर्ती—

(क) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या उपविधींस अनुसरून ठरविण्यात येतील ; किंवा

(ख) जी व्यक्ती अन्यथा कर देण्यात पात्र ठरली असती त्या व्यक्तीबरोबर लेखी करार करून ठरविण्यात येतील ; परंतु अशा पट्टीची रक्कम ठरविताना असे काम करण्याबद्दल नगरपरिषदेस अदांजे जो खर्च येईल तो लक्षात घेतला जाईल.

**१३४.** कलम १३२ किंवा १३३ मधील कोणत्याही तरतुदीअन्वये देय असलेल्या ज्या कोणत्याही रकमेबद्दल नगरपरिषदेकडून मागणी करण्यात येईल अशी प्रत्येक रक्कम, करांबद्दल मागणी करण्यात आलेली रक्कम आहे असे समजण्यात येईल आणि ती, या अधिनियमान्वये कर ज्या रातीने वसूल करता येतो त्याच रीतीने वसूल करण्यात येईल.

लगतपूर्वीच्या दोन कलमांन्वये मागणी केलेल्या रकमांची वसुली.

**१३५.** नगरपरिषदेस तिच्या मालकीचे परंतु तिला आवश्यक नसलेले पाणी नगरपरिषदेच्या हद्दीच्या बाहेर कितीही प्रमाणात वापरण्यासाठी तिला योग्य, वाटतील त्या दरांनी व शर्तीवर पुरविण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीशी करार करण्यास कलम १३२ मधील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही:

परंतु, असा दर हा कोणत्याही बाबतीत, अशाच प्रयोजनांकरिता नगरपालिका क्षेत्रामध्ये पुरविलेल्या पाण्यावर आकारावयाच्या दरापेक्षा कमी असणार नाही.

नगरपरिषदेला नगरपालिका क्षेत्राच्या बाहेर वापरांकरिता जादा पाणी विकता येणे.

## [१][ (३) पथकर ]

**१३६.** [२][ * * * ]

**१३७.** [२][ * * * ]

**१३८.** [२][ * * * ]

**१३९.** [२][ * * * ]

**१४०.** या अधिनियमान्वये कोणताही पथकर बसविणारी नगरपरिषद जेथे असा पथकर वसूल करावयाचा असेल अशा प्रत्येक ठिकाणी, उपविधीमध्ये तरतूद केलेल्या सर्व प्रकरणांत वसूल करावयाच्या रकमा दर्शविणारा एक तक्ता ठेवील व त्यात असा पथकर भरण्याच्या दायित्वाबाबत नियतकालिक रकमा भरून ज्या कोणत्याही अटींवर तडजोड करता येईल त्या अटी, अशा अटी असल्यास, त्यांचा समावेश करील आणि ज्या व्यक्तीला पथकराची मागणी करण्यास प्राधिकृत केले असेल अशा प्रत्येक व्यक्तीने, ज्या कोणत्याही व्यक्तीकडून अशी मागणी करण्यात आली असेल तिने विनंती केली असता तिला तो तक्ता दाखविणे हे तिचे कर्तव्य असेल.

पथकराचे तक्ते मागितले असता ते दाखविणे.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१, याच्या कलम ५ द्वारे मूळ शीर्षकाऐवजी हे शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे कलमे १३६ ते १३९ वगळण्यात आली.

[७][* * *] पथकर न दिल्याबद्दल वाहन किंवा जनावर किंवा माल जप्त करण्याचा आणि जप्त केलेल्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा अधिकार.

**१४१.** (१) नगरपरिषदेने वसूल [१][ करण्याजोगा ] कोणताही [२][* * *] पथकर याची मागणी केली असता तो न दिल्यास, अशी [३][ जकात किंवा ] पथकर वसूल करण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस [४][* * *] ज्या कोणत्याही वाहनावर किंवा जनावरावर पथकर बसविता येईल ते वाहन किंवा ते जनावर किंवा मागणीची भरपाई होण्यास पुरेशा किंमतीचा असा त्या वाहनात किंवा जनावरावर लादलेल्या मालाचा कोणताही भाग जप्त करता येईल व तो अटकावून ठेवता येईल. त्यानंतर तो अशा रीतीने जप्त केलेले वाहन, जनावर किंवा वस्तू कब्जात असलेल्या व्यक्तीस अशा मालमत्तेची यादी व त्या यादीबरोबर अनुसूची सहा मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे एक लेखी नोटीस देईल.

(२) जप्त केलेली कोणतीही मालमत्ता त्वरेने सडण्यासारखी असेल किंवा आकारावयाच्या [५][* * *] पथकराच्या रकमेसह ती ठेवण्याचा खर्च तिच्या किंमतीपेक्षा जास्त होण्याचा संभव असेल तेव्हा, अशी मालमत्ता जप्त करणाऱ्या व्यक्तीने जिच्या कब्जात ती मालमत्ता होती त्या व्यक्तीस ती ताबडतोब विकण्यात येईल असे कळविता येईल ; आणि मागणी केलेल्या [५][* * *] पथकराची रक्कम ताबडतोब भरण्यात आली नाही तर त्याप्रमाणे ती मालमत्ता विकील किंवा तिची विक्री करावयास लावील.

(३) ज्या व्यक्तीच्या कब्जातून मालमत्ता जप्त करण्यात आली असेल त्या व्यक्तीने तिच्या विक्रीची सुरुवात होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, झालेल्या सर्व खर्चाची रक्कम आणि द्यावयाच्या [५][* * *] पथकराची रक्कम नगरपरिषदेच्या कार्यालयात भरली तर मुख्य अधिकारी जप्त केलेली मालमत्ता ताबडतोब तिच्या स्वाधीन करील.

(४) अशी कोणतीही रक्कम भरण्यात आली नाही तर जप्त केलेली मालमत्ता विकता येईल, आणि तिची विक्री करून आलेल्या रकमेचा विनियोग असा [६][* * *] पथकर भरण्यासाठी आणि ती मालमत्ता जप्त करण्यासाठी, अटकावून ठेवण्यासाठी व विकण्यासाठी झालेला आनुषंगिक खर्च देण्यासाठी करण्यात येईल.

(५) विक्री करून आलेल्या रकमेपैकी काही रक्कम अतिरिक्त राहिल्यास ती नगरपालिकेच्या निधीमध्ये जमा करण्यात येईल आणि विक्रीच्या लगेच पुढील तीन वर्षाच्या आत ती मुख्य अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करण्यात आल्यावर ती मालमत्ता जप्त करण्यात आली तेव्हा ज्या व्यक्तीच्या कब्जात होती तिला ती रक्कम देता येईल, आणि जर असा कोणताही अर्ज करण्यात आला नाही तर ती रक्कम नगरपरिषदेची मालमत्ता होईल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१, याच्या कलम ७(अ)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१ याच्या कलम ७(अ)(दोन) द्वारे "जकात किंवा" हे शब्द वगळण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ)(दोन) द्वारे "जकात किंवा" हे शब्द वगळण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ)(तीन) द्वारे मूळ मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७(ब)(तीन) अन्वये मूळ मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ७(क) अन्वये मूळ मजकूर वगळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ७(ड) अन्वये मूळ मजकूर वगळण्यात आला.

**१४२.** [१][ * * * ]

**१४३.** [१][ * * * ]

**१४३ क.** [१][ * * * ]

**१४४.** (१) नगरपरिषदेने या अधिनियमान्वये लादण्यात येणारा कोणताही पथकर वसूल करण्याचा भाडेपट्टा जाहीर लिलावाने देणे हे कायद्याला धरून असेल : पथकराचा मक्ता देणे.

परंतु, भाडेपट्ट्याच्या शर्ती योग्य रीतीने पुऱ्या करण्यासाठी पट्टेदार प्रतिभूती देईल.

(२) या कलमान्वये कोणताही पथकर भाडेपट्ट्याने देण्यात आला असेल तेव्हा, असा पथकर वसूल करण्यासाठी पट्टेदाराने नेमलेली कोणतीही व्यक्ती पट्ट्यांच्या शर्तीस अधीन राहून, पथकर वसूल करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस कलम १४१, पोट-कलमे (१) व (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करील व तिच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडील आणि ताब्यात घेतलेल्या कोणत्याही मालमत्तेची व्यवस्था, जणू ती त्या कलमाच्या तरतुदींअनुसार ताब्यात घेण्यात आली आहे असे समजून लावण्यात येईल :

परंतु, ताब्यात घेण्यात आलेली कोणतीही मालमत्ता मुख्य अधिकाऱ्याच्या आदेशाखेरीज विकता येणार नाही.

## (४) करांसंबंधी पूरक तरतुदी

**१४५.** [२][ (१) ] जेव्हा बसण्यासाठी, ओढून नेण्यासाठी किंवा ओझे वाहण्यासाठी उपयोगात आणलेल्या व अशा रीतीने नगरपालिकेच्या क्षेत्रात वापर करण्यासाठी ठेवलेल्या (मोटार वाहनाव्यतिरिक्त) वाहनांवर किंवा जनावरांवर नगरपरिषदेने कर बसविला असेल, तेव्हा, अशा नगरपरिषदेस एखाद्या घोड्यांच्या तबेल्यांच्या मालकांबरोबर किंवा विक्रीसाठी किंवा भाड्याने देण्यासाठी ठेवलेल्या घोड्यांच्या किंवा अशा वाहनांच्या मालकाबरोबर, असा मालक वर सांगितल्याप्रमाणे लादलेल्या कराबद्दलची जी कोणतीही रक्कम अन्यथा देण्यास पात्र झाला असता, त्या रकमेऐवजी एकाच वेळी एका वर्षाहून अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीसाठी एक ठोक रक्कम देण्याविषयी आपसमेळ करता येईल. वाहने किंवा जनावरे यांवरील कराबद्दल [३][* * *] तडजोड करण्याचा अधिकार.

(२) ] [३][ * * * ]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ८ द्वारे कलमे १४२, १४३ आणि १४३क वगळण्यात आली.

[२] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम ८(अ) व (ब) द्वारे कलम १४५ ला पोट-कलम (१) असा नवा क्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याच्या कलम ९ द्वारे पोट-कलम (२) आणि समासटीपेतील मजकूर वगळण्यात आला.

नमुन्यातील दोषांमुळे करनिर्धारण बेकायदेशीर नसणे.

**१४६.** या अधिनियमाच्या प्राधिकारान्वये केलेल्या कोणत्याही कराचे निर्धारण व आकारणी किंवा मागणी ही, तीत कोणताही लेखनदोष आहे किंवा नमुन्यातील इतर दोष आहे, या कारणांवरून बेकायदेशीर ठरणार नाही आणि जेव्हा कोणत्याही मालमत्तेचे, अशा कोणत्याही कराचे निर्धारण करण्याच्या प्रयोजनासाठी वर्णन करण्यात येईल तेव्हा, ती सर्वसाधारणपणे आकलन होईल अशा रीतीने तिचे वर्णन करणे पुरेसे होईल आणि तिच्या मालकाचे किंवा भोगवटादाराचे नाव देणे आवश्यक असणार नाही.

कर बसविण्यास नगरपरिषदेस भाग पाडण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**१४७.** नगरपरिषदेच्या नगरपालिका निधीची शिल्लक कलम ३०९ अन्वये केलेला कोणताही खर्च भागविण्यासाठी किंवा जी कर्तव्ये पार पाडण्यासाठी कलम ३१२ अन्वये संचालकाने कालावधी ठरविला असेल ती कर्तव्ये पार पाडण्यासाठी पुरेसा नाही असे राज्य शासनाला दिसून आल्यास, राज्य शासनाला अधिसूचनेद्वारे तीत विनिर्दिष्ट केलेला जो कर नगरपालिका क्षेत्रात कलम १०८ अन्वये बसविता येईल आणि जो त्यावेळी त्या नगरपालिका क्षेत्रात बसविलेला नसेल असा कोणताही कर बसविण्याविषयी किंवा कोणताही वर्तमान कर राज्य शासनाला योग्य वाटेल त्या रीतीने व त्या मर्यादेपर्यंत वाढविण्याविषयी नगरपरिषदेस फर्माविता येईल आणि नगरपरिषदेने कलम १०९ अन्वये त्या प्रयोजनासाठी नगरपरिषदेचा ठराव मंजूर झाला आहे असे समजून त्या मागणीनुसार या प्रकरणातील तरतुदींन्वये असा कर बसविण्याच्या किंवा वाढविण्याच्या कामास ताबडतोब लागेल.

## [१][(४-क) मुद्रांक शुल्क

[२][* * *] नगरपालिका क्षेत्रातील स्थावर मालमत्तांच्या विवक्षित हस्तांतरणावर जादा मुद्रांक शुल्क आकारणे.

**१४७-क.** (१) स्थावर मालमत्तेची अनुक्रमे विक्री, दान आणि उपभोग्य गहाण यासंबंधातील लेखांवर, मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९५८ अन्वये आकारण्याजोगे मुद्रांक शुल्क हे, [३] * * * * नगरपालिका क्षेत्रातील स्थावर मालमत्तेच्या संबंधातील आणि राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील, अशा दिनांकास व अशा दिनांकानंतर करण्यात आलेल्या अशा कोणत्याही लेखाच्या बाबतीत, अशा प्रकारे नगरपालिका क्षेत्रात असलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या किंवा दानाच्या बाबतीत, त्या मालमत्तेच्या मूल्यावर आणि उपभोग्य गहाणविषयक लेखाच्या बाबतीत, त्या लेखामध्ये नमूद केल्याप्रमाणे, त्या लेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेवर [४][एक] टक्का या दराने अधिभार आकारून वाढविण्यात येईल. १९५८ चा मुंबई ६०.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याचे कलम २८ हे, त्यात पुढील मालमत्तांच्या संबंधात स्वतंत्रपणे तपशील देणे खासकरून आवश्यक आहे असे समजून वाचण्यात येईल व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. १९५८ चा मुंबई ६०.

(क) [५][नगरपरिषदेच्या] नगरपालिका क्षेत्रात असलेली मालमत्ता, आणि

(ख) अन्य कोणत्याही क्षेत्रात असलेली मालमत्ता.

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम १० द्वारे हे शीर्षक व कलम १४७-क समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २५(ड) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २५(अ) द्वारे " अशा ५०००० हून अधिक लोकसंख्या नसलेल्या " हा मजकूर वगळण्यात आला..

[४] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ५० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २५(ब) द्वारे "पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नगरपालिकांपैकी कोणत्याही " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) राज्य शासन प्रत्येक वर्षी, या बाबतीत कायद्याद्वारे रीतसर विनियोजन करण्यात आल्यानंतर [१]* * * * प्रत्येक नगरपरिषदेला या कलमान्वये उक्त नगरपरिषदेच्या अधिकारितेतील स्थावर मालमत्तांच्या संबंधात आकारण्यात आलेला अधिभार म्हणून वसूल केलेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेएवढे अदमासे सहायक अनुदान देईल.

(४) पोट-कलम (३) खालील हा खर्च भागविण्यासाठी राज्य शासनाला आवश्यक असणारी ही रक्कम, राज्याच्या एकत्रीकृत निधीवर आकारण्यात येईल.

(५) राज्य शासनास, या कलमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.]

## (५) फी

**१४८.** (१) या अधिनियमान्वये कोणतेही लायसन्स देण्यात आले असेल किंवा तद्न्वये कोणतीही तात्पुरती उभारणी करण्यास किंवा कोणतेही पुढे येणारे बांधकाम करण्यास नगरपरिषदेकडे निहित झालेल्या कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा किंवा इतर जमिनीचा तात्पुरता भोगवटा करण्यास परवानगी देण्यात आली असेल तेव्हा, असे लायसन्स किंवा परवानगी देणाऱ्या प्राधिकाऱ्यास, त्याबद्दल उपविधींअन्वये ठरविण्यात आल्याप्रमाणे योग्य ती फी आकारता येईल : विवक्षित लायसने, परवानगी, इत्यादीसाठी फी आकारता येईल.

परंतु, जेव्हा असे पुढे येणारे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली असेल तेव्हा, अशी परवानगी देणाऱ्या प्राधिकाऱ्यास असे पुढे आलेले बांधकाम काढून टाकण्यात येईपर्यंत प्रतिवर्षी आवर्ती फी आकारता येईल.

(२) नगरपरिषदेच्या परवानगीवाचून किंवा लायसन्सवाचून कोणत्याही व्यक्तीने कोणतीही उभारणी केल्याबद्दल किंवा पुढे येणारे बांधकाम केल्याबद्दल किंवा नगरपरिषदेकडे निहित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा किंवा इतर जमिनीचा उपयोग किंवा भोगवटा केल्याबद्दल शास्ती म्हणून नगरपरिषदेस अधिकतर फी आकारता येईल. अशी व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही इतर तरतुदींच्या अधीन राहून कोणतीही इतर शास्ती किंवा दायित्व यांचा भरणा करण्यास पात्र असली तरी अशी फी बसवण्यात येईल.

अशा अधिकतर फीचे दर देखील उपविधींअन्वये ठरविण्यात येतील.

## [२][प्रकरण नऊ-क

## मालाच्या प्रवेशावर उपकर बसविणे, तो गोळा करणे व त्याची वसुली करणे यासबंधीच्या तरतुदी

**१४८क.** (१) या प्रकरणाच्या आणि नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, नगरपरिषदेला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नगरपरिषद क्षेत्रामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या नगरपालिका क्षेत्राच्या हद्दींमध्ये होणाऱ्या, विहित केलेल्या मालाच्या प्रवेशावर विहित करण्यात येईल इतक्या दराने उपकर बसविता येईल. उपकर बसविणे.

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २५(क) द्वारे " पोट-कलम (१) खाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम ४ द्वारे प्रकरण नऊ(क) आणि कलमे १४८क ते १४८ल जादा दाखल करण्यात आली.

(२) या प्रकरणान्वये उपकर भरण्यास पात्र असलेला प्रत्येक व्यापारी, या प्रकरणाच्या व नियमांच्या तरतुदींनुसार उपकर भरील.

(३) मालाच्या प्रवेशावर उपकर बसविणे, तो गोळा करणे आणि त्याची वसुली करणे यासंबंधातील या अधिनियमाच्या तरतुदी 'अ' वर्ग नगरपरिषदांना व राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा इतर सर्व नगरपरिषदांना लागू असतील.

उपकराचा भार. **१४८ख.** (१) नगरपरिषदेने ज्या वर्षामध्ये कलम १०५ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला उपकर बसवण्याचे ठरवले असेल,—

(क) त्या शासकीय वर्षाच्या लगतपूर्वीच्या शासकीय वर्षामध्ये ; किंवा

(ख) त्या शासकीय वर्षामध्ये,

झालेली, ज्या व्यापाऱ्याच्या सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल यासंबंधात विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा अधिक झालेली असेल किंवा अधिक होत असेल तो प्रत्येक व्यापारी, या अधिनियमान्वये उपकर भरण्यास पात्र ठरेल :

परंतु, ज्या व्यापाऱ्याला उप-खंड (क) लागू होत नसेल, परंतु उप-खंड (ख) लागू होत असेल आणि नगरपरिषदेने उपकर बसविण्याचे ठरविले असेल त्या वर्षाच्या १ एप्रिलनंतर ज्या व्यापाऱ्याची सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयाताची उलाढाल, विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा प्रथमत: अधिक होईल तो व्यापारी, त्याने नगरपरिषद क्षेत्राच्या हद्दीमधील उपभोगासाठी, उपयोगासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दीमध्ये आयात केलेल्या मालाच्या संबंधात उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल या संबंधात विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंत उपकर भरण्यास पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या वर्षाच्या नंतरचे शासकीय वर्ष असलेल्या अशा, दिनांक १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या, कोणत्याही वर्षात ज्या व्यापाऱ्याच्या सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल ही, या बाबतीत विहित केलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा प्रथमच अधिक होईल, तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमामध्ये उपकर भरण्यास पात्र ठरेल :

परंतु, तो व्यापारी, त्याने नगरपरिषद क्षेत्राच्या हद्दीमधील उपभोगासाठी, उपयोगासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दीमध्ये आयात केलेल्या मालाच्या संबंधात उपकर भरण्यास, उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आणि उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल या संबंधात विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंतच्या मुदतीत उपकर भरण्यास पात्र ठरणार नाही.

(३) उपकर भरण्यास पात्र झालेला प्रत्येक व्यापारी त्याची नोंदणी योग्य रीतीने रद्द करण्यात येईपर्यंत अशा रीतीने उपकर भरण्यास पात्र असण्याचे चालू राहील ; आणि ज्या दिवशी त्याच्या विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल ही याबाबतीत विहित केलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा पुन्हा प्रथमच अधिक होईल त्या दिवशी तो पुन्हा उपकर भरण्यास पात्र होईल.

**१४८ग.** (१) नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मालावर कोणताही उपकर बसविता येणार नाही. विवक्षित माल उपकरापासून सूट मिळाण्यास पात्र नसणे.

(२) नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालांपैकी कोणत्याही, मालासमोर कोणत्याही शर्ती, निर्बंध किंवा अपवाद नमूद केलेले असल्यास त्या शर्ती, निर्बंध किंवा अपवाद यांच्या अधीन राहून, त्या मालाला उपकर देण्यातून सूट मिळेल.

**१४८घ.** जेव्हा नगरपरिषदेने उपकर बसविण्याकरिता निश्चित केलेल्या दिनांकास आणि त्यानंतर, या प्रकरणान्वये उपकर बसवण्यायोग्य असेल असा कोणताही माल (नोंदणीकृत व्यापारी नसणाऱ्या), कोणत्याही व्यक्तीने नगरपालिका क्षेत्राच्या बाहेरील कोणत्याही ठिकाणाहून नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीमध्ये आयात केला असेल आणि एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याला विकला असेल तेव्हा, नगरपरिषदेने नियमानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने अशा मालावर उपकर बसविण्यात व वसूल करण्यात येईल, आणि असा नोंदणीकृत व्यापारी अशा प्रकारे बसविण्यात आलेला उपकर भरण्यास पात्र असेल : विवक्षित बाबतीत उपकर विषयक दायित्व.

परंतु, जर अशा खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने, उक्त मालावर नगरपरिषदेकडे उपकर अगोदरच भरण्यात आलेला आहे असे मुख्य अधिकाऱ्याची खात्री पटेल अशा प्रकारे सिद्ध केले तर त्या मालावर कोणताही उपकर बसविण्यात येणार नाही.

**१४८ङ.** (१) या प्रकरणाची आणि नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी मुख्य अधिकारी हा मुख्य प्राधिकारी असेल. उपकर प्राधिकारी.

(२) त्याचप्रमाणे, स्थायी समितीला आवश्यक वाटतील तितक्या संख्येतील इतर अधिकारी आणि व्यक्ती यांची नियुक्ती मुख्य अधिकाऱ्यास करता येईल आणि त्यांना स्थायी समितीस योग्य वाटतील अशी पदनामे देता येतील.

(३) मुख्य अधिकाऱ्यास नगरपरिषदेच्या प्रादेशिक हद्दीत अधिकारिता असेल. इतर सर्व अधिकाऱ्यांना आणि व्यक्तींना मुख्य अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा नगरपरिषदेच्या एका किंवा अनेक क्षेत्रात अधिकारिता असेल.

(४) (क) मुख्य अधिकाऱ्याला या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जे अधिकार प्रदान करण्यात आले असतील आणि त्याच्यावर जी कर्तव्ये लादण्यात आली असतील ते सर्व अधिकार त्याला असतील आणि तो ती सर्व कर्तव्ये पार पाडील.

(ख) पोट-कलम (२) अन्वये नियुक्त करण्यात आलेला इतर कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती, अन्यथा करण्यात आलेल्या तरतुदीव्यतिरिक्त या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जे अधिकार मुख्य अधिकाऱ्यास प्रदान करण्यात आले असतील आणि त्यांच्यावर जी कर्तव्ये लादण्यात आली असतील त्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि ती सर्व कर्तव्ये पार पाडील.

(५) कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला, पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या प्रादेशिक अधिकारितेबाबत हरकत घेण्याचा हक्क असणार नाही.

(६) पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी व सर्व व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्यास दुय्यम असतील.

नोंदणी. **१४८च.** (१) कोणताही व्यापारी या प्रकरणातील व नियमांतील तरतुदींन्वये उपकर देण्यास पात्र असताना, विहित करण्यात आलेले विधिग्राह्य नोंदणी प्रमाणपत्र त्याच्याकडे नसेल तर तो, व्यापारी म्हणून धंदा करणार नाही :

परंतु, त्या व्यापाऱ्याने, अशा नोंदणीसाठी, विहित केलेल्या रीतीने व वेळेत अर्ज केल्यानंतर किंवा, यथास्थिति, नोंदणीसाठी केलेला त्याचा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत विहित कालावधीत, तो असा धंदा करीत असेल तर, या कलमाच्या तरतुदींचा भंग झालेला असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने केलेल्या अर्जावरून, त्या व्यक्तीची किंवा व्यापाऱ्याची नियमान्वये व्यापारी म्हणून नोंदणी करण्यात आली असेल आणि त्यानंतर, तिची किंवा त्याची अशा रीतीने नोंदणी करावयास नको होती असे आढळून आले तर, ती व्यक्ती किंवा तो व्यापारी, या प्रकरणातील व नियमांतील इतर तरतुदींअन्वये उपकर देण्यास पात्र नसेल तरीही, तिचे किंवा त्याचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आल्याच्या दिनांकापासून, ते रद्द करण्यात येईपर्यंतच्या कालावधीसाठी उपकर देण्यास पात्र असेल.

विक्रीचे किंवा खरेदीचे ज्ञापन. **१४८छ.** जर,—

(क) एखादा नोंदणीकृत व्यापारी दुसऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्यास माल विकील, किंवा

(ख) एखादा नोंदणीकृत व्यापारी चालू वर्षात कोणत्याही एका व्यवहारात कोणत्याही अन्य व्यक्तीस, दहा रुपयांपेक्षा अधिक किंमत असलेला कोणताही माल विकील तर,—

तो त्याने किंवा त्याच्या नोकराने, व्यवस्थापकाने किंवा अभिकर्त्याने किंवा अनुक्रमांक व दिनांक यांसह सही केलेले आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील दर्शविणारे देयक किंवा रोखीचे टिपण खरेदीदारास देईल, तो अशा देयकाची किंवा रोखीच्या टिपणाची यथोचितरित्या अनुक्रमांक घातलेली, सही केलेली व दिनांक नमूद केलेली स्थळप्रत किंवा दुसरी प्रत स्वतःकडे ठेवील आणि ती, विक्रीच्या दिनांकापासून पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी जतन करील.

उपकर वसूल करण्यास मनाई. **१४८ज.** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मालाच्या विक्रीच्या संबंधात उपकराच्या स्वरूपात कोणतीही रक्कम वसूल करणार नाही :

परंतु, एखाद्या व्यक्तीस त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदींअन्वये तिच्यावर लादण्यात आलेल्या शर्तींचे आणि निर्बंधांचे अनुपालन करण्यासाठी उपकराची अशी रक्कम स्वतंत्रपणे वसूल करणे आवश्यक असेल त्या बाबतीत, हे कलम लागू होणार नाही.

लेखे ठेवण्याची जबाबदारी. **१४८झ.** प्रत्येक व्यापारी आणि विहित केलेली अशी अन्य व्यक्ती, तिने आयात केलेल्या, खरेदी केलेल्या, उपभोग घेतलेल्या, उपयोगात आणलेल्या किंवा विकलेल्या मालाच्या किंमतीचा विहित केल्याप्रमाणे खरा लेखा ठेवील.

लेखे व कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागांची झडती, लेखा पुस्तके आणि माल, इत्यादी जप्त करणे. **१४८ञ.** (१) (क) मुख्य अधिकारी, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्याला कोणतेही लेखे किंवा कागदपत्रे त्याच्याकडे सादर करण्यास किंवा त्या व्यापाऱ्याच्या मालाच्या साठ्यासंबंधी किंवा त्याने केलेली मालाची आयात, खरेदी, विक्री आणि पोचवणी यासंबंधी कोणतीही माहिती पुरवण्यास किंवा त्याच्या धंद्यासंबंधीची आवश्यक असेल अशी अन्य कोणतीही माहिती पुरविण्यास भाग पाडू शकेल.

(ख) मुख्य अधिकारी, ज्याने नगरपालिका क्षेत्रात कोणताही माल आयात केला असेल व तो एखाद्या व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला विकलेला असेल अशा कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा

कोणत्याही व्यक्तीस, अशा मालाच्या संबंधातील आवश्यक असतील अशी कागदपत्रे सादर करण्यास किंवा अशी माहिती पुरविण्यास भाग पाडू शकेल.

(२) कोणत्याही व्यापाऱ्याच्या मालाच्या साठ्याशी किंवा त्याने आयात केलेल्या, खरेदी केलेल्या, विकलेल्या आणि पोचवणी केलेल्या मालाशी संबंधित असलेले सर्व लेखे, नोंदवह्या व कागदपत्रे, आणि कोणत्याही व्यापाऱ्याने कोणत्याही ठिकाणी ठेवलेला सर्व माल व रोकड, ही सर्व, वाजवी वेळी तपासणीसाठी, मुख्य अधिकाऱ्यास खुली असेल आणि मुख्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा उक्त लेख्यांच्या, नोंदवह्यांच्या किंवा कागदपत्रांच्या प्रती किंवा त्यातील उतारे आणि मालाची आणि रोख रकमेची सूची घेता येईल किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल.

(३) कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने त्याच्याकडून किंवा तिच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही उपकराचे प्रदान चुकविले आहे किंवा ते चुकवण्याचा प्रयत्न करत आहे असे मुख्य अधिकाऱ्यास सकारण वाटले तर, त्याला त्या व्यापाऱ्याची किंवा व्यक्तीची झडती घेताना त्या जागेमध्ये सापडलेले लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे यांपैकी आवश्यक असतील असे लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे जप्त करता येतील, आणि त्याबद्दल तो पावती देईल आणि या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात किंवा खटल्याकरता आवश्यक असेल तोपर्यंत ते ठेवून घेईल. तथापि, मुख्य अधिकारी, कोणत्याही व्यापाऱ्याची कोणतीही लेखा पुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे किंवा माल जप्त करील तेव्हा, तो तसे करण्याची कारणे लेखी नमूद केल्याशिवाय, ती लेखा पुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे पंधरा दिवसांपेक्षा जास्त काळ ठेवून घेणार नाही.

(४) पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) च्या प्रयोजनांसाठी, मुख्य अधिकाऱ्यास कोणत्याही व्यापाऱ्याच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी किंवा एखाद्या व्यक्तीच्या व्यवहाराच्या कोणत्याही ठिकाणी किंवा ज्या अन्य कोणत्याही ठिकाणी तो व्यापारी किंवा व्यक्ती त्याच्या धंद्याचे किंवा व्यवहाराचे कोणतेही लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे किंवा त्याच्या धंद्याशी संबंधित मालाचा साठा ठेवत असतो किंवा त्यावेळी त्याने ठेवला आहे असे मुख्य अधिकाऱ्यास सकारण वाटेल तर, अशा अन्य कोणत्याही ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्या जागेची झडती घेता येईल.

(५) कोणत्याही झडतीच्या किंवा तपासणीच्या वेळी, कोणतीही लेखापुस्तके, इतर कागदपत्रे, पैसा किंवा माल कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असल्याचे आढळून येईल त्या बाबतीत, एतद्विरूद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर, अशी लेखापुस्तके, इतर कागदपत्रे, पैसा किंवा माल अशा व्यक्तीच्या मालकीचा असल्याचे समजण्यात येईल.

मुख्य अधिकाऱ्यास दिवाणी न्यायालयांचे अधिकार असणे.

१९०८ चा ५. **१४८ट.** (१) मुख्य अधिकाऱ्यास, या प्रकरणाखालील कामे पार पाडण्यासाठी, पुढील बाबींच्या संबंधात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील :—

(क) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे ;

(ख) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलाविणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर किंवा प्रतिज्ञाकथनावर तिची तपासणी करणे ;

(ग) कागदपत्रांचा शोध घेण्यास किंवा ती सादर करण्यास भाग पाडणे ;

(घ) साक्षीदारांच्या किंवा कागदपत्रांच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे ; आणि

(ङ) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी करावयाच्या कोणत्याही शपथपत्राच्या बाबतीत, मुख्य अधिकाऱ्याने या संबंधात नियुक्त केलेला कोणताही अधिकारी, अभिसाक्षीस शपथ देववू शकेल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींस बाध न आणता, विवक्षित ठिकाणी व वेळी एकतर साक्ष देण्यासाठी किंवा लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा इतर कागदपत्रे सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याबद्दल जिच्या नावे मुख्य अधिकाऱ्याने समन्स काढले असेल अशा व्यक्तीने, अशा विवक्षित ठिकाणी व वेळी हजर राहण्याचे किंवा यथास्थिति, अशी पुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे सादर करण्याचे हेतुपुरस्सर टाळले असेल त्या बाबतीत, मुख्य अधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशा, पाचशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही इतका द्रव्यदंड तिच्यावर लादता येईल व अशा रीतीने बसवण्यात आलेला द्रव्यदंड, उपकराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल :

परंतु, असा कोणताही द्रव्यदंड लादण्यापूर्वी, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(४) मुख्य अधिकाऱ्याने जिच्या नावे समन्स काढले होते त्या व्यक्तीने, कोणतीही कागदपत्रे सादर केली असतील व कोणत्याही व्यक्तीने, तिच्याकडून येणे असलेला कोणताही उपकर चुकवलेला आहे किंवा ती चुकविण्याचा प्रयत्न करीत आहे व सादर करण्यात आलेली कागदपत्रे अशा व्यक्तीविरूद्ध केलेले तथ्यकथन सिद्ध करण्यासाठी आवश्यक आहेत असे मुख्य अधिकाऱ्यास सकारण वाटले तर, मुख्य अधिकाऱ्यास, लेखी नमूद करावयाच्या कारणावरून ती कागदपत्रे अडकवून ठेवता येतील व त्यासाठी तो पावती देईल व या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात किंवा खटल्यासाठी आवश्यक असेल तितक्या मुदतीसाठी तो ती ठेवून घेईल.

(५) मुख्य अधिकारी किंवा त्याला दुय्यम असलेला कोणताही अधिकारी अथवा व्यक्ती याने या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशास कोणत्याही न्यायालयात हरकत घेतली जाणार नाही.

अपराध व शास्ती.

**१४८ठ.** (१) जो कोणी,—

(क) कलम १४८च अन्वये नोंदणीकृत व्यापारी नसताना, माल विकताना किंवा विकत घेताना किंवा आयात करताना किंवा मालाची पोचवणी करताना आपण नोंदणीकृत व्यापारी आहोत किंवा होतो असे खोटेच दर्शवील, किंवा

(ख) जाणूनबुजून खोटे विवरण सादर करील, किंवा

(ग) कलम १४८ज मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जाणूनबुजून खोटे देयक, रोखीचे टिपण, प्रमाणक, प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र किंवा इतर कागदपत्र मुख्य अधिकाऱ्याला सादर करील, किंवा

(घ) कलम १४८झ चे उल्लंघन करून त्याने विकत घेतलेल्या किंवा आयात केलेल्या किंवा विकलेल्या अथवा पोचवणी केलेल्या मालाच्या किंमतीचे जाणूनबुजून खोटे लेखे ठेवील, किंवा

(ङ) जाणूनबुजून खोटे लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्र सादर करील किंवा जाणूनबुजून खोटी माहिती सादर करील, किंवा

(च) कोणत्याही व्यक्तीला, नियमांच्या संबंधित तरतुदीअन्वये आवश्यक अलेले प्रमाणपत्र देईल किंवा जे खोटे आहे असे त्याला माहीत असेल किंवा खोटे असल्याचे सकारण वाटत असेल असे खोटे देयक, रोखीचे टिपण, प्रमाणक किंवा इतर कागदपत्रे देईल, किंवा

(छ) या प्रकरणान्वये बसण्यायोग्य असलेला कोणताही कर चुकविण्यासाठी बुद्धिपुरस्सर कोणत्याही रीतीने प्रयत्न करील, किंवा

(ज) या प्रकरणाच्या तरतुदींखालील कोणताही उपकर, शास्ती, व्याज किंवा जप्त केलेली रक्कम यांचे प्रदान चुकविण्यासाठी बुद्धिपुरस्सर कोणत्याही रीतीने प्रयत्न करील, किंवा

(झ) खंड (क) ते (ज) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृती करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला सहाय्य करील किंवा अपप्रेरणा देईल, किंवा

(ञ) नियमांद्वारे आवश्यक असलेली कोणतीही माहिती देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ट) नियमांद्वारे आवश्यक असलेले कोणतेही विवरण विहित केलेल्या दिनांकापर्यंत व विहित रीतीने पुरवण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ठ) या प्रकरणाअन्वये आवश्यक असलेला कोणताही उपकर देण्यास कसूर करील, किंवा

(ड) कलम १४८ञ अन्वये त्याला आवश्यक करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ढ) कलम १४८ञ अन्वये कोणतीही झडती घेताना किंवा जप्ती आणताना कोणत्याही अधिकाऱ्यास अडथळा आणील, किंवा

(ण) कलम १४८च, १४८छ, १४८ज किंवा १४८झ यांच्या तरतुदींचे पुरेशा आणि वाजवी कारणाशिवाय उल्लंघन करील,—

त्याला, अपराध सिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही कृती करील आणि तो अपराध पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीअन्वये चालू राहणारा असेल तर, त्याला अपराध सिद्ध झाल्यानंतर या कलमान्वये तरतूद करण्यात आलेल्या शिक्षांव्यतिरिक्त आणखी, अपराध करणे चालू राहील त्या कालावधीत दररोज शंभर रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एक वर्षाच्या कालावधीत चुकविण्यात आलेल्या किंवा चुकविण्याचा प्रयत्न करण्यात आलेल्या उपकराची एकूण रक्कम दोनशे रुपयांपेक्षा कमी असेल तर, त्या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कृतींसाठी कोणत्याही व्यक्तीवर त्या पोट-कलमान्वये कार्यवाही करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अपराध केल्याचा आरोप व्यापाऱ्यावर ठेवण्यात आला असेल त्या बाबतीत, अशा व्यापाऱ्याच्या धंद्याचा व्यवस्थापक असल्याचे समजण्यात आलेल्या व्यक्तीने, हा अपराध तिच्या नकळत करण्यात आला होता किंवा तो घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व उचित खबरदारी घेतली होती असे सिद्ध केले नाही तर, ती व्यक्तीदेखील अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल.

(५) या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये मुख्य अधिकाऱ्याकडून ज्या गोष्टींसंबंधात शास्ती लादण्यात आली असेल त्याच गोष्टींसंबंधात, या कलमाखालील अपराधासाठी किंवा कोणत्याही नियमाचा भंग केल्याबद्दल कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

मुख्य अधिकारी, परिषद अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती उघड करणे.

**१४८ड.** (१) या प्रकरणानुसार किंवा नियमांनुसार केलेल्या कोणत्याही निवेदनातील, पुरविलेल्या कोणत्याही विवरणातील किंवा सादर केलेल्या कोणत्याही लेख्यांतील किंवा कागदपत्रांतील किंवा (फौजदारी न्यायालयापुढील कार्यवाही व्यतिरिक्त) या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी दिलेल्या कोणत्याही साक्षीपुराव्याच्या किंवा अभिलेखातील किंवा या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या, कोणत्याही आकारणीच्या, कार्यवाहीच्या किंवा मागणीच्या वसुलीसंबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीच्या कोणत्याही अभिलेखातील सर्व तपशील, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, गोपनीय समजण्यात येईल.

(२) पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीजकरून एरव्ही, जर कोणत्याही नगरपरिषद कर्मचाऱ्याने, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या तपशिलापैकी कोणताही तपशील उघड केला तर, त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) या कलमाच्या तरतुदी, नियमांद्वारे विहित केलेल्या प्रयोजनांसाठी उघड करण्यात आलेल्या बाबींच्या बाबीतीत लागू होणार नाहीत.

अपराधांबाबत तडजोड करणे.

**१४८ढ.** (१) मुख्य अधिकाऱ्याला, स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने, कलम १४८ल अन्वये शिक्षापात्र असलेल्या अशा कोणत्याही अपराधाबद्दल कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, असा आरोप ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अपराधाबाबत तडजोड म्हणून, उपकराची जितकी रक्कम देय झाली असती त्या रकमेच्या चार पट असेल इतकी रक्कम स्वीकारता येईल :

परंतु, असे अपराधाबाबत तडजोड करण्याचे अधिकार दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर केलेल्या अपराधाच्या संबंधात अनुज्ञेय असणार नाहीत.

(२) पोट-कलम (१) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे रक्कम दिल्यानंतर त्याच अपराधाच्या संबंधात आरोपी व्यक्तीविरूद्ध आणखी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

क्षतिपूर्ती.

**१४८ण.** या प्रकरणाच्या तरतुदींन्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, कोणत्याही नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्याविरूद्ध, कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.]

## प्रकरण दहा

## नगरपालिकेने दावा सांगितलेल्या रकमांची वसुली

या अधिनियमान्वये दावा सांगता येईल अशी कोणतीही रक्कम वसूल करण्याची पद्धती.

**१४९.** या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार केलेल्या नियमांन्वये किंवा उपविधीअन्वये लादलेले किंवा यानंतर लादण्यात येतील अशा कर, फी किंवा शास्ती याबद्दलच्या सर्व रकमा आणि संविदा, लिलाव, पट्टा यांबद्दलच्या सर्व रकमा किंवा या अधिनियमान्वये किंवा तद्‌नुसार केलेल्या नियमांन्वये किंवा उपविधीअन्वये दावा सांगता येण्यासारखा कोणताही पैसा, अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, या प्रकरणात तरतूद केलेल्या रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

**१५०.** (१) या अधिनियमान्वये अगर तद्न्वये केलेल्या नियमांन्वये किंवा उपविधीअन्वये नगरपरिषदेस कोणतीही रक्कम देय असेल तेव्हा, मुख्य अधिकारी, ती देण्यास दायी असलेल्या व्यक्तीस, देय म्हणून दावा सांगितलेल्या रकमेबद्दल, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, देयक देण्याची व्यवस्था करील. नगरपरिषदेस देय असलेल्या रकमांबद्दल देयक देणे आणि रक्कम सत्वर भरल्याबद्दल सूट देणे.

(२) अशा प्रत्येक देयकात, ज्या कालावधीबद्दल व ज्या मालमत्तेबाबत, व्यवसायाबाबत किंवा वस्तूबाबत त्या रकमेवर दावा सांगितला असेल तो कालावधी, ती मालमत्ता, तो व्यवसाय किंवा ती वस्तू विनिर्दिष्ट करण्यात येईल. तसेच त्यात, ती रक्कम देण्यात कसूर केल्याबद्दल येणाऱ्या दायित्वाविषयी आणि अशा दाव्याविरुद्ध यापुढे तरतूद केल्याप्रमाणे ज्या मुदतीत अपील करता येईल त्या मुदतीविषयी नोटीस देण्यात येईल.

(३) ज्या व्यक्तीस असे देयक देण्यात आले असेल त्या व्यक्तीने देय म्हणून दावा सांगितलेली संपूर्ण रक्कम, ते देयक देण्यात आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत चुकती केली तर, नगरपरिषद विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा कालावधीत तिला अशा रकमेच्या एक टक्क्याइतकी सूट देईल.

**१५१.** लगतपूर्ववर्ती कलमात तरतूद केल्याप्रमाणे ज्या व्यक्तीस देयक देण्यात आले असेल त्या व्यक्तीने, जर [१][ज्या मुदतीच्या आत अशा दाव्याच्या विरूद्ध अपील करता येते अशी मुदत समाप्त होण्याच्या आत,—] मागणीची नोटीस केव्हा देण्यात येईल.

(क) देयकात देय म्हणून दावा सांगितलेली रक्कम दिली नाही, अथवा

(ख) ती रक्कम भरण्यास ती का दायी नाही याबद्दल मुख्य अधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने कारण दाखविले नाही, अथवा

(ग) कलम १६९ च्या तरतुदींनुसार अशा दाव्याविरुद्ध अपील केले नाही,

तर, मुख्य अधिकाऱ्यास, अशी रक्कम भरण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीवर अनुसूची चार मधील नमुन्यातील किंवा तशा स्वरूपाच्या नमुन्यातील मागणीची नोटीस बजावण्याची व्यवस्था करता येईल.

**१५२.** लगतपूर्ववर्ती कलमान्वये जिच्यावर मागणीची नोटीस बजावण्यात आली असेल त्या व्यक्तीने, अशी नोटीस बजावल्यापासून पंधरा दिवसांच्या आत नोटिशीत मागणी केलेली रक्कम भरली नाही तर, अशी रक्कम व ती वसूल करण्याचा सर्व खर्च, अनुसूची पाच च्या नमुन्यात असलेले किंवा तशा स्वरूपाचे, मुख्य अधिकाऱ्याच्या सहीचे अधिपत्र काढून कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या जंगम किंवा स्थावर मालमत्तेची अटकावणी करून व ती विकून वसूल करता येईल : अधिपत्र केव्हा काढता येईल.

परंतु, राज्य शासनाने दावा सांगितलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी अशा मालमत्तेच्या संबंधात कोणतेही सावधगिरीचे किंवा इतर उपाय योजण्यात आले असतील तर, अशा मालमत्तेच्या बाबतीत, या प्रकरणान्वये चालविलेली कोणतीही कारवाई समाप्त होईल.

**१५३.** (क) मालमत्ता नगरपालिकेच्या क्षेत्रात असेल त्याबाबतीत, लगतपूर्ववर्ती कलमान्वये काढलेले अधिपत्र नगरपरिषदेच्या अधिकाऱ्याला उद्देशून लिहिले जाईल ; अधिपत्र कोणाला उद्देशून लिहावे.

(ख) मालमत्ता दुसऱ्या नगरपालिकेच्या क्षेत्रात असेल त्याबाबतीत, अधिपत्र त्या क्षेत्राच्या मुख्य अधिकाऱ्याला उद्देशून लिहिण्यात येईल ;

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१ याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्याल आला.

(ग) मालमत्ता मुंबई महानगरपालिकेखेरीज अन्य महानगरपालिकेच्या सीमेत असेल त्याबाबतीत, अधिपत्र, अशा महानगरपालिकेच्या महापालिका आयुक्ताला उद्देशून लिहिण्यात येईल ;

(घ) मालमत्ता बृहन्मुंबईत असेल त्याबाबतीत, अधिपत्र, मुंबई येथील लघुवाद न्यायालयाच्या प्रबंधकाला उद्देशून लिहिण्यात येईल ;

(ङ) मालमत्ता कटकाच्या सीमेत असेल त्याबाबतीत, अधिपत्र, अशा कटकाच्या कार्यकारी अधिकाऱ्याला उद्देशून लिहिण्यात येईल ;

(च) मालमत्ता महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या क्षेत्राच्या अगर कटकाच्या सीमेत नसेल त्याबाबतीत अधिपत्र, महलकरी किंवा नायब तहसीलदार यांच्यापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या एखाद्या शासकीय अधिकाऱ्याला उद्देशून लिहिण्यात येईल :

परंतु, असा मुख्य अधिकारी, पालिका आयुक्त, प्रबंधक कार्यकारी अधिकारी किंवा शासकीय अधिकारी यांना, असे अधिपत्र पृष्ठांकित करून ते आपल्या हाताखालील अधिकाऱ्याकडे पाठविता येईल.

विशेष आदेशान्वये बळाचा वापर करून प्रवेश करण्याचा अधिकार.

**१५४.** कलम १५२ अन्वये काढण्यात आलेले अधिपत्र, ज्याला उद्देशून लिहिले असेल किंवा पृष्ठांकित केले असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने ताब्यात घेतली जाण्यास पात्र असलेली मालमत्ता अशा इमारतीत आहे असे मानण्यात त्यास वाजवी कारण असेल आणि आपला अधिकार व प्रयोजन अधिसूचित करून आत प्रवेश करण्याची यथोचित रीतीने मागणी केली असताही इतर रीतीने त्यास प्रवेश मिळत नसेल तर, याबाबत त्यास प्राधिकृत करणारा विशेष आदेश अशा अधिपत्रात अंतर्भूत असल्यास, अधिपत्रात निर्देशित केल्याप्रमाणे कोणतीही अटकावणी करण्यासाठी, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या अवधीत कोणत्याही वेळी, इमारतीचे कोणतेही बाहेरचे किंवा आतले दार किंवा खिडकी फोडून उघडणे हे, कायद्याला धरून असेल :

परंतु, असा अधिकारी स्त्रियांच्या उपयोगासाठी असलेल्या कोणत्याही दालनाचे दार, तीन तास अगोदर आपल्या उद्देशाची सूचना दिल्यावाचून व स्त्रियांना तेथून निघून जाण्याची संधी दिल्यावाचून, फोडून उघडणार नाही किंवा त्यात प्रवेश करणार नाही.

अधिपत्राची अंमलबजावणी कशी व्हावी.

**१५५.** अशा कोणत्याही अधिकाऱ्याने, त्यास अधिपत्रान्वये (मालमत्ता) अटकावून ठेवण्याचा प्राधिकार दिलेला असल्यास खालील शर्ती, अपवाद व सूट यांच्या अधीन, कसूर करणारी म्हणून जिचे नाव कलम १५२ अन्वये काढलेल्या अधिपत्रात दाखल केले असेल त्या व्यक्तीची कोणतीही जंगम मालमत्ता, ती ज्या ठिकाणी असेल तेथे अटकावून ठेवणे व तसेच कोणतीही स्थावर मालमत्ता जप्त करणे कायद्याला धरून असेल.

(क) पुढील मालमत्ता अटकावून ठेवण्यात येणार नाही :--

(एक) कसूर करणारा, त्याची पत्नी व मुले यांचे परिधान करावयाचे आवश्यक तेवढे कपडे व बिस्तरा,

(दोन) कारागिरांची हत्यारे,

(तीन) कसूर करणारा शेतकरी असेल तर त्याची शेतीकामाची अवजारे आणि त्याच्या उपजीविकेसाठी आवश्यक असतील ती गुरे व बी-बियाणे,

(ख) अटकावून ठेवलेली मालमत्ता किंमतीने शक्य होईल तितपत अधिपत्रान्वये वसूल करावयाच्या रकमेच्या मूल्याइतकी असेल आणि जी मालमत्ता अटकावून ठेवावयास नको होती असे मुख्य अधिकाऱ्याचे किंवा जिला उद्देशून अधिपत्र लिहिले असेल त्या व्यक्तीचे मत असेल तर, अशी कोणतीही मालमत्ता अटकावून ठेवली असल्यास ती कसूरदारास तात्काळ परत करण्यात येईल ;

(ग) मालमत्ता अटकावून ठेवल्यावर किंवा ती जप्त केल्यावर संबंधित अधिकारी तिची ताबडतोब एक वस्तूसूची तयार करील आणि अटकावून ठेवण्याच्या किंवा जप्त करण्याच्या वेळी ती जिच्या कब्जात असेल त्या व्यक्तीस अनुसूची सहा मधील नमुन्यात एक लेखी नोटीस देईल ;

(घ) (एक) मालमत्ता स्थावर असेल तेव्हा, ती कसूर करणाऱ्यास अशा मालमत्तेचे कोणत्याही रीतीने हस्तांतरण करण्यास किंवा तिच्यावर भार निर्माण करण्यास, तसेच सर्व व्यक्तींस अशा हस्तांतरणापासून किंवा भारांपासून कोणताही फायदा मिळविण्यास मनाई करणाऱ्या आदेशाद्वारे जप्त करण्यात येईल ;

(दोन) असा आदेश हा, मालमत्ता ज्या जागेवर असेल त्या जागेत किंवा तिच्या जवळपास दवंडी पिटवून किंवा इतर रूढ पद्धतीने घोषित करण्यात येईल आणि अशा आदेशाची एक प्रत मालमत्तेच्या ठळक भागावर व नंतर नगरपालिकेच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात येईल आणि तसेच सदर मालमत्ता ही, जर राज्य शासनाला महसूल देणारी जमीन असेल तर, अशी जमीन ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात लावण्यात येईल ;

(ङ) जप्त मालमत्तेचे मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय केलेले कोणतेही हस्तांतरण किंवा तिच्यावर निर्माण केलेला कोणताही भार किंवा तिच्यातील कोणत्याही हितसंबंधाचे हस्तांतरण, नगरपरिषदेच्या ज्या मागण्या जप्ती आणून बजावता येतील त्या सर्व मागण्यांच्या दृष्टीने रद्दबातल ठरेल.

अटकावून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री ; विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग.

**१५६.** (१) जर ताब्यात घेतलेली मालमत्ता त्वरित व नैसर्गिकपणे सडून जाण्यासारखी नसेल तर, अशी अटकावून ठेवलेली किंवा जप्त केलेली मालमत्ता किंवा स्थावर मालमत्तेच्या बाबतीत तिचा पुरेसा भाग हा, मुख्य अधिकाऱ्याने अधिपत्र तहकूब केले नसेल तर किंवा कसूर करणाऱ्या व्यक्तीकडून देय असलेली रक्कम, नोटीस, अधिपत्र व मालमत्तेची अटकावणी किंवा जप्ती व ती ताब्यात ठेवणे यास आनुषंगिक अशा सर्व खर्चासह भरण्यात आली नसेल तर, अधिपत्राची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने बजावलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली वेळ संपल्यावर मुख्य अधिकाऱ्याच्या आदेशान्वये जाहीर लिलावाद्वारे विकता येईल ; आणि मालमत्ता विकून आलेल्या उत्पन्नाच्या किंवा त्याच्या आवश्यक तेवढ्या भागाचा विनियोग, प्रथम अशा मालमत्तेच्या संबंधात राज्य शासनाला देय असलेल्या कोणत्याही रकमेची फेड करण्यासाठी आणि नंतर देय असलेली रक्कम व वर सांगितलेला सर्व आनुषंगिक खर्च यांची फेड करण्यासाठी करण्यात येईल. नगरपरिषदेला देय असलेली रक्कम व खर्च आणि खरेदीदारास देण्यासाठी खरेदीच्या रकमेच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम, जर कसूर करणाऱ्या व्यक्तीने विक्री कायम करण्यापूर्वी भरली असेल तर, स्थावर मालमत्तेवर जप्ती आणली असल्यास, अशी जप्ती उठविण्यात आली आहे असे समजण्यात येईल आणि जप्त केलेली जंगम मालमत्ता कसूरदारास परत करण्यात येईल. या कलमान्वये स्थावर किंवा जंगम मालमत्तेची करावयाची विक्री त्याबाबतीत केलेल्या नियमांत विहित केलेल्या रीतीने करण्यात येईल.

(२) वर सांगितल्याप्रमाणे मालमत्तेची लिलावाने विक्री केल्यानंतर मुख्य अधिकारी अशा मालमत्तेचा कब्जा, खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या व्यक्तीस देईल आणि तिला एक प्रमाणपत्र देईल. अशा प्रमाणपत्रात, त्यात उल्लेखिलेली मालमत्ता तिने खरेदी केली आहे अशा अर्थाचा मजकूर असेल.

(३) लिलावात काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत नगरपरिषदेस नाममात्र बोली बोलता येईल आणि तिने तसे करणे हे कायद्याला धरून असेल. मात्र, अशा रीतीने बोली बोलण्यास नगरपरिषदेने जिल्हाधिकाऱ्याची पूर्वमान्यता मिळविलेली असेल. [१][ तथापि, नगरपरिषदेने जिची मालमत्ता नाममात्र बोली लावून संपादित केली असेल अशा व्यक्तीने, अशा लिलावाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, सर्व देय रकमा तसेच कोणताही द्रव्यदंड असल्यास, असा दंड भरल्यास, नगरपरिषद, ती मालमत्ता तिला परत करील :

परंतु, यासंबंधात केलेला किंवा करावयाचा कोणताही खर्च तसेच, कोणतेही मुद्रांक शुल्क दिले असल्यास किंवा द्यावयाचे असल्यास, त्यासंबंधातील कोणताही खर्च अशा व्यक्तींकडून करण्यात येईल आणि तो अशा मालमत्तेच्या संबंधातील कोणतीही हानिची किवा भरपाईची रक्कम मिळण्यास हक्कदार असणार नाही. ]

काही रक्कम शिल्लक राहिल्यास तिची व्यवस्था कशी लावावी.

**१५७.** लगतपूर्ववर्ती कलमान्वये मालमत्तेची विक्री करण्यात आल्यानंतर काही रक्कम शिल्लक राहिल्यास ती शिल्लक रक्कम ताबडतोब नगरपालिका निधीच्या खाती जमा करण्यात येईल व त्याचवेळी, तसे केल्याबद्दलची नोटीस, अशी मालमत्ता अटकावून ठेवण्याच्या किंवा ती जप्त केली जाण्याच्या वेळी ती जिच्या ताब्यात होती त्या व्यक्तीस देण्यात येईल. अशा व्यक्तीने अशा शिल्लक रकमेबाबत या कलमान्वये दिलेल्या नोटिशीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत मुख्य अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून दावा सांगितला तर, मुख्य अधिकारी, ती रक्कम त्यास परत करील. अशा नोटिशीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत दावा सांगण्यात न आलेली कोणतीही रक्कम नगरपरिषदेची मालमत्ता होईल.

नगरपालिकेच्या क्षेत्राबाहेरील विक्री.

**१५८.** कलम १५३ अन्वये नगरपालिका क्षेत्राच्या बाहेर अधिपत्र पाठविले असेल त्याबाबतीत मुख्य अधिकाऱ्यास, त्यावर पृष्ठांकन करून, ज्या अधिकाऱ्याला उद्देशून असे अधिपत्र लिहिले असेल त्या अधिकाऱ्यास, किंवा असे अधिपत्र ज्याला उद्देशून लिहिले असेल त्या प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई, यास अशा रीतीने अटकावून ठेवलेली किंवा जप्त केलेली मालमत्ता विकण्याचा निर्देश देता येईल. अशा बाबतीत अशा अधिकाऱ्याने किंवा प्रबंधकाने कलमे १५५, १५६ व १५७ यांच्या तरतुदींनुसार अशी मालमत्ता विकणे व विक्रीसंबंधी सर्व आनुषंगिक गोष्टी करणे आणि अशा विक्रीच्या बाबतीत, अधिपत्र तहकूब करण्याच्या अधिकारांव्यतिरिक्त कलमे १५६ व १५७ अन्वये मुख्य अधिकाऱ्यास असलेल्या सर्व अधिकारांचा वापर करणे व त्या कलमान्वये त्याची सर्व कर्तव्ये बजावणे हे कायद्याला धरून असेल. असा अधिकारी किंवा प्रबंधक, अधिपत्रान्वये वसूल केलेली रक्कम, वसुलीसाठी त्यास आलेला सर्व खर्च त्यातून वजा करून आणि विक्री कायम करून, असे अधिपत्र पाठविणाऱ्या मुख्य अधिकाऱ्याकडे पाठवील व मुख्य अधिकारी, कलम १५६ व १५७ च्या तरतुदींनुसार त्या रकमेचा विनियोग करील.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम २६ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

**१५९.** कलम १५१ अन्वये काढलेल्या प्रत्येक नोटिशीबद्दलची फी, कलम १५२ अन्वये काढलेल्या प्रत्येक अधिपत्राबद्दलची फी किंवा कलम १५५ अन्वये अटकावणीबद्दलची किंवा केलेली जप्तीबद्दलची फी आणि उक्त कलमान्वये जप्त केलेली कोणतीही जनावरे पोसण्याची फी नगरपरिषदेच्या उपविधीत त्याबाबत अनुक्रमे जे दर विनिर्दिष्ट केलेले असतील त्या दरांप्रमाणे आकारण्यात येईल आणि ती वसुलीच्या खर्चात समाविष्ट करण्यात येईल.

आकारण्या-योग्य फी व खर्च.

**१६०.** (१) ज्या कोणत्याही व्यक्तीकडून या प्रकरणाच्या तरतुदीनुसार वसूल करावयाची कोणतीही रक्कम देय असेल किंवा ती लवकरच देय होणार असेल ती व्यक्ती ताबडतोब नगरपालिका क्षेत्र सोडून जाण्याच्या बेतात आहे असे कोणत्याही वेळी मुख्य अधिकाऱ्यास मानण्यास सयुक्तिक कारण असेल तर, त्यास अशा व्यक्तीकडून देय असलेल्या किंवा लवकरच देय होणाऱ्या रकमेचा भरणा ताबडतोब करण्याविषयी त्या व्यक्तीस निदेश देता येईल आणि त्या रकमेबद्दल तिला देयक देवविता येईल.

नगरपालिका क्षेत्र सोडून जाण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तीविरूद्ध संक्षिप्त कार्यवाही करता येईल.

(२) असे देयक दिल्यानंतर उक्त व्यक्तीने तिच्याकडून देय असलेली किंवा लवकरच देय होणारी रक्कम ताबडतोब भरली नाही तर, यात यापूर्वी विहित केलेल्या रीतीने कसूरदाराच्या जंगम मालमत्तेची अटकावणी करून व विकून किंवा स्थावर मालमत्ता जप्त करून व विकून अशी रक्कम वसूल करता येईल. मात्र कसूरदारावर मागणीची कोणतीही नोटीस बजावण्याची आवश्यकता असणार नाही आणि अटकावणी करण्यासाठी व विक्रीसाठी काढावयाचे मुख्य अधिकाऱ्याचे अधिपत्र कोणताही विलंब न लावता काढता व बजावता येईल.

**१६१.** राज्य शासनास या अधिनियमान्वये अटकावणी केलेल्या किंवा जप्त केलेल्या कोणत्याही मालमत्तेची किंवा मालमत्तेच्या वर्गाची विक्री सार्वजनिक लिलावाद्वारे करण्याच्या संबंधात आदेश देण्यासाठी आणि अशी विक्री करून ती कायम करण्यासाठी, त्यास योग्य वाटतील अशा पूरक किंवा आनुषंगिक तरतुदी करण्याकरिता नियम करता येतील.

इतर प्रकरणांत विक्रीबाबत आदेश कोणी द्यावयाचा आणि अशी विक्री करण्याची व ती कायम करण्याची रीत.

**१६२.** जमिनींवरील किंवा इमारतींवरील अथवा या दोहोंवरील कोणत्याही कराबद्दल देय असलेल्या सर्व रकमा या, त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात कोणताही जमीन महसूल शासनास देय असल्यास, तो अगोदर दिला पाहिजे या शर्तीस अधीन राहून, ज्या इमारतीच्या किंवा जमिनींच्या संबंधात असा कर वसूल करावयाचा असेल त्या इमारतीवर किंवा जमिनीवर, तसेच कर देण्यास दायी असलेल्या व्यक्तीच्या मालकीची अशा इमारतीत किंवा जमिनीवर कोणतीही जंगम मालमत्ता सापडल्यास, त्या मालमत्तेवर प्रथम भार म्हणून असतील :

जमिनी, इमारती, वगैरे यांच्यावरील कराचे दायित्व.

परंतु, अशा कोणत्याही कराची कोणतीही थकबाकी एक वर्षापेक्षा अधिक मुदतीपर्यंत थकलेली असेल आणि मालक नसलेला भोगवटादार ज्या मुदतीत भोगवटा करीत नव्हता त्या मुदतीबद्दल देय असेल तर, अशी थकबाकी अशा भोगवटादाराकडून वसूल करण्यात येणार नाही.

मिळालेल्या सर्व रकमांबद्दल पावत्या देणे.

**१६३.** या अधिनियमान्वये कोणत्याही कराच्या संबंधात दिलेल्या सर्व रकमांबद्दल त्या रकमा घेणारी व्यक्ती पावती देईल. अशा पावतीत दिलेली रक्कम व ज्या कराच्या संबंधात ती दिली असेल त्या गोष्टी नमूद केलेल्या असतील.

जमीन महसुलाची थकबाकी म्हणून विवक्षित रकमा वसूल करणे.

**१६४.** कलम १४९ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही रक्कम देय झाली असेल आणि ती देण्यास दायी असलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्याबाहेर राहत असल्यामुळे किंवा तिची राज्यात कोणतीही किंवा पुरेशी मालमत्ता नसल्यामुळे ती या प्रकरणातील पूर्ववर्ती तरतुदीन्वये वसूल करता येत नसेल आणि अशा व्यक्तीची मालमत्ता राज्याबाहेर असेल तर त्याबाबतीत, अशी रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल आणि महसूल वसुली अधिनियम, १८९०, याच्या तरतुदी अशा रकमेच्या वसुलीस लागू होतील. १८९० चा १.

अधिपत्राच्या बाबतीत स्थगन आदेश कोणी द्यावेत.

**१६५.** कलम १५३ अन्वये एखादे अधिपत्र काढण्यात आले असेल तेव्हा, ज्या मुख्य अधिकाऱ्याने असे अधिपत्र काढले असेल त्याच्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राधिकाऱ्यास त्या अधिपत्राची अंमलबजावणी रोखून धरण्याचा अधिकार असणार नाही :

परंतु, कलम १६९ अन्वये ज्या अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करण्यात आले असेल त्या अपील प्राधिकाऱ्यासह, किंवा कलम १७१ अन्वये ज्या प्राधिकाऱ्याकडे पुनरीक्षणासाठी अर्ज केला असेल त्या प्राधिकाऱ्यास, त्या प्रकरणाच्या परिस्थितीवरून स्थगन आदेश देणे आवश्यक झाले असेल तर, असे अपील किंवा पुनरीक्षणासाठी केलेला अर्ज योग्य रीतीने दाखल करून घेतल्यानंतरच आणि स्थगन आदेश देण्याबाबतची आपली कारणे लेखी नमूद केल्यानंतर केवळ असा स्थगन आदेश देता येईल.

करांबाबत देय असणाऱ्या रकमांवर द्यावयाचे व्याज.

**१६६.** ज्या व्यक्तीवर कलम १५१ अन्वये मागणीची नोटीस बजावण्यात आली आहे त्या व्यक्तीने, अशी नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, अशा नोटिशीद्वारे मागणी करण्यात आलेली रक्कम न भरल्यास, अशी व्यक्ती, देय असलेल्या रकमेच्या किंवा इतर आकाराच्या अतिरिक्त व्याजादाखल पुढीलप्रमाणे रक्कम देण्यास दायी राहील :—

(क) उपरोक्त पंधरा दिवसांची मुदत संपण्याच्या दिनांकापासून पहिल्या सहा महिन्यांकरिता, अशा प्रत्येक संपूर्ण महिन्याच्या संबंधात देय होणाऱ्या रकमेच्या एक-द्वितीयांश टक्क्याइतकी रक्कम, आणि

(ख) त्यानंतर अशी देय असलेली रक्कम भरण्यात ती व्यक्ती ज्या मुदतीपर्यंत कसूर करील त्या मुदतीत, अशा प्रत्येक संपूर्ण महिन्याच्या संबंधात देय होणाऱ्या रकमेच्या एक टक्क्याइतकी रक्कम, देय असलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्याच रीतीने व्याजाची रक्कम देखील वसूल केली जाईल :

परंतु, मुख्य अधिकाऱ्यास, विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत, आणि अपील प्राधिकाऱ्यास किंवा ज्या प्राधिकाऱ्याकडे पुनरीक्षणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्या प्राधिकाऱ्यास, कोणत्याही मुदतीच्या संबंधात देय असलेल्या व्याजाच्या संपूर्ण रकमेची किंवा तिच्या कोणत्याही भागाची सूट देता येईल.

रकमा निर्लेखित करण्याचा अधिकार.

**१६७.** जिल्हाधिकाऱ्याच्या मान्यतेस अधीन राहून आणि राज्य शासन या बाबतीत जे नियम करील त्यांना अधीन राहून, नगरपरिषदेस देय असलेला परंतु तिच्या मते वसूल न होण्याजोगा कोणताही कर, फी किंवा तिला देय असलेली कोणतीही अशी इतर रक्कम निर्लेखित करता येईल :

परंतु, अशा रीतीने रक्कम निर्लेखित करण्यात येईल अशा आशयाचा ठराव परिषद-सदस्यांच्या एकूम संख्येच्या कमीत कमी तीन-चर्तुर्थांश सदस्यांच्या बहुमताने संमत केल्याखेरीज अशी कोणतीही रक्कम निर्लेखित करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, निर्लेखित करावयाची रक्कम ही, एखाद्या संविदेखालील रक्कम नसेल आणि ती कोणत्याही बाबतीत [१] [पाचशे] रुपयांहून अधिक नसेल तर अशा बाबतीत जिल्हाधिकाऱ्याची मान्यता मिळविण्याची आवश्यकता असणार नाही.

**१६८.** (१) या अधिनियमाद्वारे वसुलीच्या कोणत्याही इतर पद्धतीची तरतूद करण्यात आली असली तरीही, कोणत्याही कराची कोणतीही थकबाकी किंवा संविदा, करार, पट्टा, लिलाव, प्रतिभूती किंवा एखादे क्षतिपूर्ती बंधपत्र या अन्वये नगरपरिषदेस देय असलेली कोणतीही रक्कम किंवा हा अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम अथवा उपविधी याअन्वये नगरपरिषदेस देय असलेला कोणताही इतर पैसा आणि आदेशिका-फी, व्याज व इतर खर्च याबद्दलची कोणतीही रक्कम ही, या प्रयोजनार्थ नेमण्यात येणारा महसूल अधिकारी, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करील. असा महसूल अधिकारी हा, महालकरी किंवा नायब तहसीलदार यांच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जाचा असेल तर, त्याची नेमणूक विभागीय आयुक्ताकडून केली जाईल आणि तो महालकरी किंवा नायब तहसीलदार यांच्या दर्जाच्या किंवा त्यापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या असेल, तर त्याची नेमणूक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून केली जाईल : वसुली अधिकाऱ्याची नेमणूक.

परंतु, त्या प्रयोजनार्थ नगरपरिषदेने घेतलेल्या विशेष सभेत संमत करण्यात आलेल्या ठरावाद्वारे तिने संबंधित आयुक्तास किंवा जिल्हाधिकाऱ्यास लेखी विनंती केल्यावाचून अशा कोणत्याही वसुली अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) दिनांक ३१ डिसेंबर रोजी नगरपरिषदेस देय असलेल्या सर्व प्रकारच्या थकबाकीची रक्कम ही, मागील वित्तीय वर्षाच्या अखेरीस असलेल्या अशा थकबाकीच्या एकूण रकमेच्या पन्नास टक्क्यांहून अधिक असेल तर, संचालकास, वसुली अधिकाऱ्याची नेमणूक करण्यासाठी, नगरपरिषदेकडे निर्देश न करता, संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा आयुक्ताकडे मागणी करता येईल.

(३) वरीलपैकी कोणत्याही बाबतीत, वसुली अधिकाऱ्याचे आणि त्यास सहाय्य करण्याकरिता, यथास्थिति जिल्हाधिकारी किंवा आयुक्त नेमील अशा इतर दुय्यम कर्मचारीवर्गाचे वेतन व भत्ते यांवर होणारा खर्च नगरपरिषदेकडून देण्यात येईल.

(४) अशा रीतीने नेमण्यात आलेल्या वसुली अधिकाऱ्यास, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९* याचे प्रकरण १० याअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्यान्वये महसुली अधिकाऱ्यास जे अधिकार असतात ते सर्व अधिकार असतील. परंतु, ते केवळ जमीन महसुलाची थकबाकी म्हणून या अधिनियमान्वये वसूल करावयाची नगरपरिषदेची थकबाकी वसूल करण्याच्या प्रयोजनापुरतीच असतील. १८७९ चा मुंबई ५.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८, याच्या कलम २७ द्वारे "शंभर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता जमीन महसूल अधिनियम, १९६६ पहा. (१९६६ चा महा. ४१).

[१][दंडाधिकाऱ्यां-कडे किंवा [२][समितीकडे] अपिले.

**१६९.** [३][ (१) ] कलम १५० अन्वये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींअन्वये कोणत्याही व्यक्तीस दिलेल्या देयकात अंतर्भूत असलेल्या कराच्या [४][(इमारती व जमिनींवरील किंवा या दोहोंवरील कर वगळता) ] किंवा इतर देय रकमेच्या कोणत्याही दाव्याविरूद्ध करावयाची अपिले, अशा प्रकारच्या प्रकरणाची न्यायचौकशी सत्र न्यायाधीशाच्या निदेशानुसार ज्या कोणत्याही न्यायिक दंडाधिकाऱ्याने किंवा अशा दंडाधिकाऱ्यांच्या खंडपीठाने करावयाची असेल त्या न्यायिक दंडाधिकाऱ्याकडे किंवा अशा दंडाधिकाऱ्यांच्या खंडपीठाकडे करता येतील.

[५][ [६][ (२) कलम १५० अन्वये कोणत्याही व्यक्तीस दिलेल्या देयकात अंतर्भूत असलेल्या, इमारती व जमिनींवरील किवा या दोहोंवरील कराच्या तसेच त्यासंबंधातील इतर कोणत्याही असल्यास, देय रकमांच्या कोणत्याही दाव्याविरूद्ध करावयाचे अपील, (कर) निर्धारितीच्या स्वेच्छानिर्णयानुसार, पुढील व्यक्तींकडे करता येईल :—

(क) प्रथमतः , प्रत्येक नगरपरिषदेच्या मालमत्ता कर अपील समितीकडे यात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, किंवा उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याची नामनिर्देशित व्यक्ती | पदसिद्ध सभापती ; |
| (दोन) | नगरपरिषदेचा अध्यक्ष . . | पदसिद्ध सदस्य ; |
| (तीन) | महिला व बालकल्याण समितीचा सभापती ; व जेथे अशा कोणत्याही समितीची रचना करण्यात आली नसेल त्याबाबतीत, अशा समितीची रचना करण्यात येईतोपर्यंत परिषद निर्धारित करील असा अन्य कोणत्याही विषय समितीचा सभापती. | पदसिद्ध सदस्य ; |
| [७][(चार) | नगरपरिषदेतील विरोधी पक्षनेता | सदस्य ; ] |
| (पाच) | संबंधित विभागाच्या उप संचालक, नगररचना याच्याकडून नामनिर्देशित करण्यात यावयाच्या, संबंधित मूल्यनिर्धारण अधिकारी नसणारा असा, नगररचनाकाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसणारा, नगररचना व मूल्यनिर्धारण बिभागाचा एक अधिकारी ; | सदस्य ; |

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ४ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ४ (अ) द्वारे कलम १६९ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४ (अ) द्वारे हा कंस व मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) द्वारे, कलम १६९ ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आल्यानंतर पोट-कलमे (२) ते (८) जादा दाखल करण्यात आली.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ (अ) द्वारे मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[७] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ५ (अ)(एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][**स्पष्टीकरण.—**उप-खंड (चार) च्या प्रयोजनांसाठी, नगरपरिषदेमधील विरोधी पक्षनेता म्हणजे, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ याखाली तयार करण्यात आलेले महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम, १९८७ याच्या नियम ३ अन्वये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याकडे, राजकीय पक्षाने, आघाडीने किंवा फ्रंटने कळविल्याप्रमाणे, या नगरपरिषदेमध्ये संख्याबळ जास्त असलेल्या परंतु, विरोधी बाजूस असलेल्या राजकीय पक्षाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा त्यावेळी नेता असलेला निर्वाचित परिषद सदस्य ;]

१९८७ चा महा. २०.

किंवा

(ख) अशा वर्गातील प्रकरणांची न्यायचौकशी सत्र न्यायाधीशांच्या निदेशानुसार ज्याने करावयाची असेल अशा कोणत्याही न्यायिक दंडाधिकाऱ्याकडे किंवा अशा दंडाधिकाऱ्यांच्या खंडपीठाकडे थेट अपील करता येईल :

परंतु, खंड (क) खालील मालमत्ता कर अपील समितीच्या निर्णयाविरूद्ध करावयाचे अपील हे, खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या न्यायिक दंडाधिकाऱ्याकडे किंवा अशा दंडाधिकाऱ्यांच्या खंडपीठाकडे करण्यात येईल ; ]

[२][(२क) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्तांच्या करपात्र मूल्यामध्ये, कलम १२४ अन्वये करण्यात आलेल्या शेवटच्या पूर्ववर्ती सुधारणेपेक्षा, तिपटीने किंवा त्याहून, अधिक वाढ झालेली असेल त्याबाबतीत, मालमत्ता कर अपील समिती स्वत: होऊन, [पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये, ज्यांच्या बाबतीत थेट अपिले करण्यात आलेली असतील अशी प्रकरणे वगळून] सर्व प्रकरणांचे पुनरीक्षण करू शकेल :

परंतु, प्रादेशिक संचालक, मालमत्ता कर अपील समितीच्या निर्णयाच्या दिंकापासून पंधरा दिवसांच्या आत मालमत्तेच्या मालकाने पुनरीक्षण अर्ज केल्यावर, उक्त समितीच्या निर्णयावर पुनर्विचार करू शकेल व प्रकरणाच्या योग्यतेबाबत खात्री पटल्यावर, उक्त निर्णयामध्ये सुधारणा करण्याचा निदेश देऊ शकेल आणि अशा प्रकारे सुधारणा करण्यात आलेला निर्णय, हा समितीचा अंतिम निर्णय असल्याचे मानण्यात येईल.]

(३) [३][ समितीच्या ] सर्व बैठकींच्या अध्यक्षस्थानी सभापती असेल.

(४) प्रत्येक अपिलाच्या सुनावणीचा दिनांक, वेळ व जागा सभापती निश्चित करील आणि मुख्य अधिकारी व अपीलकर्ता यांना सुनावणीची स्वतंत्र नोटीस पाठवील.

(५) न्यायाधिकरणाच्या प्रत्येक बैठकीची गणपूर्ती तीन सदस्यांनी होईल व त्यात [३][ समितीच्या ] सभापतीचा समावेश असेल :

परंतु, [३][ समितीच्या ] बैठकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत, गणपूर्ती न झाल्यास व एकटा सभापती किंवा सभापती व कोणताही एक सदस्य उपस्थित असल्यास, असा एकटा सभापती किंवा यथास्थिति, असा सभापती व अन्य सदस्य मिळून गणपूर्ती झाली असल्याचे मानण्यात येईल. त्यानंतर (सभापती सुनावणीच्या कामास सुरूवात करील व त्या अपिलावरील आपला निर्णय अभिलिखित करील व असा निर्णय हा, त्या [३][ समितीचा ] निर्णय असल्याचे मानण्यात येईल.

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१, याच्या कलम ५(अ)(दोन) द्वारे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

[२] वरीलअधिनियमाच्या कलम ५(ब) द्वारे पोट-कलम (२क) जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(६) पोट-कलम (५) मध्ये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, [१][ समितीचे ] सर्व निर्णय हे उपस्थित सदस्यांच्या बहुमताने घेण्यात येतील व मते समसमान विभागली जातील त्याबाबतीत, सभापतीचा निर्णय हा [१][समितीचा ] निर्णय असेल.

(७) अशा कोणत्याही [१][ समितीची ] कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, तिच्या सदस्यांमध्ये कोणतेही पद रिक्त आहे किंवा तिच्या रचनेत कोणताही दोष आहे एवढ्याच केवळ कारणावरून अवैध समजली जाणार नाही.

(८) [१][ समितीच्या ] निर्णयाची एक प्रमाणित प्रत [१][ समितीकडून ] संबंधित पक्षकारांना पुरविण्यात येईल.

अपिलाची कार्यपद्धती. **१७०.** पुढील गोष्टींची पूर्तता केली असल्याखेरीज, [२][ लगतपूर्ववर्ती कलमाअन्वये कोणतेही अपील ] दाखल करून घेतले जाणार नाही :—

[३][ (क) (एक) ज्या देयकाबद्दल तक्रार करण्यात आली असेल ते देयक सादर करण्यात आल्यानंतर लगेच पुढील [४][तीस दिवसांच्या] आत, कलम १६९ च्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) ज्या देयकाबद्दल तक्रार करण्यात आली असेल ते देयक सादर करण्यात आल्यानंतर लगेच पुढील [४][तीस दिवसांच्या] आत, कलम १६९, पोट-कलम (२) च्या खंड (क) खाली मालमत्ता कर अपील समितीकडे अपील दाखल करण्यात आले नसेल तर ; आणि

(तीन) मालमत्ता कर अपील समितीच्या निर्णयाविरूद्ध, समितीच्या त्या निर्णयानंतर लगेच पुढील [४][तीस दिवसांच्या] आत, कलम १६९, पोट-कलम (२) च्या परंतुकाखाली न्यायिक दंडाधिकाऱ्याकडे अपील दाखल करण्यात आले नसेल तर :

[५][परंतु, ज्यांना मागणीची नोटीस किंवा देयक १ एप्रिल १९९५ नंतर देण्यात आलेले असेल आणि ज्यांना विनिर्दिष्ट मुदतीच्या आत, देयकामध्ये करण्यातआलेल्या कराच्या अशा मागणीविरूद्ध मालमत्ता कर अपील समितीकडे अपील दाखल करणे शक्य झाले नसेल, अशा व्यक्तींच्या प्रकरणांच्या बाबतीत, त्या व्यक्तींना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, १९९६ अंमलात आल्यानंतर, नंतरच्या १९९६ चा.
नव्वद दिवसांच्या आत मालमत्ता कर समितीकडे अपील दाखल करता येईल.] महा. २१.

(ख) इमारतींवरील किंवा जमिनींवरील किंवा या दोहोंवरील कराच्या बाबतीत नगरपरिषदेच्या दाव्यावर ज्या कारणांवरून आक्षेप घेण्यात आला असेल ती कारणे नमूद

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ३ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) द्वारे मूळ खंड (क) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

४ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ६(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ६(चार) अन्वये मूळ परंतुकाऐवजी दाखल करण्यात आले.

करणारा लेखी अर्ज, अशा कराच्या आकारणीबाबत किंवा त्यात बदल करण्यात आल्याबाबत कलम ११९ किंवा कलम १२३ अन्वये दिलेल्या आणि ज्याअन्वये देयक तयार करण्यात आले असेल त्या नोटिशीत निश्चित करून दिलेल्या वेळेच्या आत नगरपरिषदेकडे केला नसेल; आणि

[1][ (ग) (एक) कलम १६९ च्या पोट-कलम (१) खालील अपिलकर्त्याने देयकात समाविष्ट असलेली संपूर्ण रक्कम नगरपालिका कार्यालयात भरली असेल ; आणि

[2][ (दोन) कलम १६९ च्या पोट-कलम (२) खालील अपिलकर्त्याने,—

(क) मागील निर्धारण वर्षासाठी त्याने भरलेल्या कराच्या पूर्ण रकमेइतकी रक्कम नगरपालिका कार्यालयात भरली असेल ;

(ख) प्रथमच करनिर्धारण करण्यात येणाऱ्या नवीन मालमत्तांच्या संबंधात, नगरपरिषदेने देयकात दावा केलेल्या कराच्या रकमेच्या तीस टक्के एवढी रक्कम नगरपालिका कार्यालयात भरली असेल. ]

[3] * * * * * *

[4][ १७१. कलम १६९ अन्वये केलेल्या कोणत्याही अपिलात, दंडाधिकाऱ्याने किंवा दंडाधिकाऱ्यांच्या खंडपीठाने दिलेला निर्णय कोणत्याही एका पक्षकाराच्या सांगण्यावरून, अशा दंडाधिकाऱ्याच्या किंवा अशा दंडाधिकाऱ्यांच्या खंडपीठाच्या निर्णयाविरूद्ध सामान्यतः ज्या न्यायालयाकडे अपील करता येते त्या न्यायालयाच्या पुनरीक्षणाधीन राहील.] न्यायालयाकडून पुनरीक्षण.

**१७२.** या अधिनियमात तरतूद करण्यात आलेल्या रीतीव्यतिरिक्त किंवा प्राधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही रीतीने किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून कोणत्याही मूल्यनिर्धारणाबाबत, करनिर्धारणाबाबत किंवा कर बसविण्याबाबत आक्षेप घेण्यात येणार नाही किंवा ज्या कोणत्याही व्यक्तींवर कर निर्धारण करावयाचे असेल किंवा कर बसवावयाचा असेल तिच्या दायित्वाबाबतदेखील कोणत्याही प्रकारे आक्षेप घेण्यात येणार नाही. इतर कार्यवाहींना रोध.

## प्रकरण अकरा

## रस्ते आणि खुल्या जागा

**१७३.** (१) नगरपरिषदेने खालील गोष्टी करणे कायदेशीर असेल :— सार्वजनिक रस्त्यासंबंधी अधिकार.

(क) नवीन सार्वजनिक रस्ते आखणे व तयार करणे तसेच बोगदे, पूल, भुयारी मार्ग व सार्वजनिक रस्त्यांच्या बांधकामाला आनुषंगिक अशी इतर बांधकामे करणे ;

---

[1] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याच्या कलम ५ (क) द्वारे मूळ खंड (ग) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३ (क) द्वारे मूळ उपखंड (दोन) ऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३(ड) द्वारे खंड (घ) वगळण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ कलम १७१ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(ख) कोणताही सार्वजनिक रस्ता रूंद करणे, खुला करणे, वाढवणे किंवा अन्य प्रकारे सुधारणे किंवा सार्वजनिक रस्त्याला आनुषंगिक असे कोणतेही बांधकाम करणे ;

(ग) कोणत्याही सार्वजनिक रस्त्याला तात्पुरता फाटा फोडणे किंवा तो बंद करणे ;

(घ) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, कोणताही सार्वजनिक रस्ता कायमचा बंद करणे.

(२) कोणताही सार्वजनिक रस्ता कायम बंद करण्यासाठी नगरपरिषदेमध्ये कोणताही ठराव संमत होण्यापूर्वी मुख्य अधिकारी, जो रस्ता कायम बंद करण्याचे ठरविले असेल त्या रस्त्यावर आणि नगरपालिका कार्यालयातील सूचना फलकावरही तो रस्ता कायम बंद करण्याचा नगरपरिषदेचा उद्देश जाहीर करणारी नोटीस लावील. तो रस्ता अशा रीतीने बंद करण्याबद्दलचा ठराव संमत करण्यापूर्वी नगरपरिषद या पोट-कलमान्वये नोटीस प्रसिद्ध झाली असेल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, वरील प्रस्तावावर लेखी स्वरूपात केलेल्या व नगरपालिका कार्यालयात सुपूर्द केलेल्या सर्व आक्षेपांवर विचार करील.

(३) कोणताही सार्वजनिक रस्ता आखताना, तयार करताना, त्याची दिशा बदलताना, त्याला फाटे फोडताना, तो रूंद करताना, खुला करताना, वाढविताना किंवा अन्य प्रकारे सुधारताना अशा रस्त्यावरील वाहनमार्गासाठी, पायमार्गासाठी व निचऱ्यासाठी लागणाऱ्या जमिनीव्यतिरिक्त असा रस्ता तयार व्हावा म्हणून बाजूस बांधावयाच्या इमारतींसाठी आवश्यक असलेली जमीन नगरपरिषदेस संपादन करता येईल आणि कलम ९२ च्या तरतुदींच्या अधीन राहून, अशी जादा जमीन तिला शाश्वत काळाकरिता विकता येईल व तिची विल्हेवाट लावता येईल किंवा ती काही वर्षांच्या मुदतीसाठी पट्ट्याने देता येईल. असे करताना नगरपरिषदेस, अशा जमिनीवर बांधावयाच्या इमारतींच्या वर्गासंबंधी व प्रकारासंबंधी तिला योग्य वाटतील त्या शर्ती घालता येतील.

मालकांच्या आक्षेपांच्या अधीन, कोणताही रस्ता हा, सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करण्याचा अधिकार.

**१७४.** (१) सार्वजनिक रस्ता नसलेल्या कोणत्याही रस्त्यावर अथवा रस्त्याच्या कोणत्याही भागावर नगरपरिषदेस कोणत्याही वेळी नोटीस लावून तो सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करण्याचा उद्देश असल्याची सूचना देता येईल आणि त्याप्रमाणे अशी नोटीस लावल्यानंतर लगेच पुढील एका महिन्याच्या कालावधीत अशा रस्त्याच्या मोठ्या हिश्श्याच्या किंवा एखाद्या रस्त्याच्या अशा भागाच्या मालकाने अथवा एकाहून अधिक मालक असल्यास, मालकांनी, त्याविरूद्ध नगरपालिका कार्यालयामध्ये आक्षेप सादर न केल्यास, नगरपरिषदेला अशा रस्त्यावर अथवा रस्त्याच्या अशा भागावर लेखी नोटीस लावून तो सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करता येईल.

(२) अशा मालकाने किंवा मालकांनी पोट-कलम (१) खालील प्रस्तावास आक्षेप घेतला तर, अशा आक्षेपांचा विचार करून आणि जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वमंजुरी घेऊन, नगरपरिषदेस असा रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करता येईल आणि अशा रीतीने आक्षेप घेणाऱ्या मालकास किंवा मालकांना कलम ३३० मध्ये तरतूद केलेल्या रीतीने ठरविण्यात येणारी भरपाई मिळण्याचा हक्क असेल.

(३) या कलमाअन्वये सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित होणारा प्रत्येक रस्ता नगरपरिषदेकडे निहित होईल.

**१७५.** (१) नगरपालिका क्षेत्रामधील सार्वजनिक नसणाऱ्या कोणत्याही रस्त्यावर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर असा रस्ता किंवा त्याचा कोणताही भाग समतल करण्याकरिता, त्यावर फरसबंदी करण्याकरिता, खडी घालण्याकरिता, फरशी घालण्याकरिता, त्यात पाट काढण्याकरिता, निःस्सारणाकरिता, दिवाबत्तीकरिता किंवा तो साफ करण्याकरिता कोणतेही काम करणे हे सार्वजनिक आरोग्य, सोय व सुरक्षितता या दृष्टीने आवश्यक आहे असे नगरपरिषदेस वाटल्यास, त्या रस्त्याच्या किंवा त्याच्या भागाच्या समोरील, शेजारच्या किंवा त्यास लागून असलेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या संबंधित मालकांना लेखी नोटीस देऊन, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करावयाच्या रीतीने आणि अशा मुदतीच्या आत असे काम करण्याविषयी फर्माविता येईल.

खाजगी रस्त्यांची दुरुस्ती, वगैरे करण्यास भाग पाडण्याचा व ते सार्वजनिक रस्ते म्हणून घोषित करण्याचा अधिकार.

(२) असे काम अशा मालकांनी किंवा कलम ३२८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अशा मालकांच्या खर्चाने नगरपरिषदेने केल्यानंतर, आणि अशा रस्त्यात किंवा त्याच्या भागात समाविष्ट झालेल्या जमिनीबद्दल राज्य शासनास द्यावयाच्या सर्व जमीन महसूल अशा मालकांनी दिलेला असेल तर, कलम १७४ च्या तरतुदींन्वये आणि त्या कलमामध्ये विहित केलेल्या रीतीने, नगरपरिषद, असा रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करू शकेल आणि अशा रस्त्याच्या किंवा त्याच्या मोठ्या हिश्श्याच्या मालकांनी संयुक्तपणे मागणी केली असता, नगरपरिषद असा रस्ता वरीलप्रमाणे सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करील आणि असा रस्ता त्यानंतर नगरपरिषदेकडे निहित होईल.

(३) पोट-कलम (१) खालील नोटिशीचे पालन करण्यात आले नसेल आणि असे काम कलम ३२८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नगरपरिषदेकडून कार्यान्वित करण्यात आले तर, नगरपरिषद त्यावर झालेला खर्च हा, असा कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकांनी किंवा भोगवटदारांनी आधीच केलेल्या कोणत्याही कामाची रक्कम व मूल्य लक्षात घेऊन, अशा मालकांमध्ये नगरपरिषदेस योग्य वाटेल अशा रीतीने विभागून देईल.

**१७६.** (१) मुख्य अधिकारी, नगरपरिषदेच्या मान्यतेच्या अधीन, नगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक सार्वजनिक रस्त्याच्या प्रत्येक बाजूस एक रेषा विहित करील.

सार्वजनिक रस्त्याची नियमित रेषा.

(२) मुख्य अधिकारी, कोणत्याही रस्त्यासाठी अशी रेषा विहित करण्याच्या प्रस्तावाची जाहीर नोटीस देईल आणि ज्या रस्त्याकरिता अशी रेषा विहित करण्याचे योजिले असेलअशा रस्त्यावर देखील तो विशेष नोटीस लावील. नगरपरिषद, रस्त्याच्या रेषेस मान्यता देण्यापूर्वी, उक्त प्रस्तावाच्या संबंधात लेखी केलेल्या व या पोट-कलमान्वये नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत नगरपालिकेच्या कार्यालयात सादर केलेल्या सर्व आक्षेपांवर व सूचनांवर विचार करील.

(३) त्यावेळी अशा रीतीने विहित केलेल्या रेषेस " सार्वजनिक रस्त्याची नियमित रेषा " असे संबोधण्यात येईल.

(४) मुख्य अधिकाऱ्यास, वेळोवेळी, पोट-कलमे (१) व (२) मध्ये घालून दिलेल्या रीतीने, कोणत्याही रस्त्याच्या अगोदरच विहित केलेल्या नियमित रेषेऐवजी सुधारलेली नवीन रेषा विहित करता येईल आणि या अधिनियमात सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेसंबंधात केलेल्या कोणत्याही उल्लेखात अशा सुधारलेल्या रेषेसंबंधीच्या उल्लेखांचा समावेश होत असल्याचे समजण्यात येईल.

(५) सार्वजनिक रस्त्याच्या ज्या नियमित रेषेमुळे किंवा सुधारलेल्या रेषेमुळे रस्त्याच्या रुंदीवर परिणाम होत असेल किंवा त्यामुळे अशी कोणतीही रेषा रस्त्याच्या मध्यभागापर्यंत येत असेल तर, नगरपरिषद, पोट-कलम (१) अन्वये सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेस मान्यता देणारा किंवा पोट-कलम (४) अन्वये सुधारलेल्या रेषेस मान्यता देणारा कोणताही ठराव जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय संमत करणार नाही.

(६) (क) कलम १८० च्या तरतुदींनुसार असेल त्या व्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती, सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेत किंवा सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या मागे उप-विधीन्वये विहित करण्यात येईल अशा अंतरावर मुख्य अधिकाऱ्याची परवानगी घेतल्याखेरीज एखाद्या इमारतींचा कोणताही भाग बांधणार नाही किंवा त्याची पुनर्बांधणी करणार नाही ;

(ख) मुख्य अधिकाऱ्याने सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेतील कोणत्याही क्षेत्रात कोणतीही इमारत बांधण्यास किंवा तिची पुनर्बांधणी करण्यास परवानगी नाकारल्यास, असे क्षेत्र नगरपरिषदेच्या मान्यतेने रस्त्यास जोडून घेण्यात येईल आणि त्यानंतर ते सार्वजनिक रस्त्याचा भाग असल्याचे समजण्यात येईल व ते नगरपरिषदेकडे निहित करण्यात येईल ;

(ग) खंड (ख) अन्वये रस्त्यास जोडलेल्या कोणत्याही जमिनीच्या मालकास उक्त जमिनीच्या किंमतीबद्दल आणि कोणत्याही इमारतीच्या मालकास, या पोट-कलमान्वये मुख्य अधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा दिलेल्या आदेशामुळे त्याची जी कोणतीही हानी किंवा नुकसानी झाली असेल किंवा त्यास जो खर्च आला असेल त्याबद्दल, नगरपरिषदेकडून भरपाई देण्यात येईल; अशा भरपाईच्या रकमेबाबत विवाद निर्माण झाल्यास, ती भरपाई कलम ३३० मध्ये तरतूद केलेल्या रीतीने निश्चित करण्यात येईल व ठरविण्यात येईल :

परंतु, जिच्यासंबंधात कलम १९५, पोट-कलम (१) अन्वये नोटीस देण्यात आली असेल अशा कोणत्याही इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या बाबतीत, अशी भरपाई देय असणार नाही.

(७) पोट-कलम (६), खंड (क) च्या तरतुदींचे उल्लंघन करून बांधलेल्या कोणत्याही इमारतीस किंवा इमारतीच्या भागास, कलम १८९ ची पोट-कलमे (८), (९), (१०) व (११) च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

पुढे येणाऱ्या इमारती मागे हटविणे.

**१७७.** (१) (क) इमारतीचा कोणताही भाग, लगतपूर्वीच्या कलमान्वये ठरविलेल्या सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या पुढे येत असेल तर, नगरपरिषदेस,—

(एक) अशा इमारतीचा असा पुढे येणारा भाग मुख्य इमारतींच्या बाहेरील कोणतीही संरचना असल्यास, कोणत्याही वेळी ; किंवा

(दोन) असा प्रक्षेपित भाग हा, वर सांगितलेल्या प्रकाराची बाहेरील संरचना नसल्यास जेव्हा केव्हा अशा इमारतीचा अधिकांश भाग किंवा अशा पुढे आलेल्या भागांपैकी कोणताही मोठा हिस्सा पाडण्यात आला असेल, जाळून टाकण्यात आला असेल किंवा पडला असेल तेव्हा ;

लेखी नोटिशीद्वारे, एकतर उक्त नियमित रेषेच्या पुढे येणारा तो भाग किंवा भागाचा काही हिस्सा काढून टाकण्यास किंवा अशी इमारत पुन्हा बांधण्यात आल्यास ती उक्त नियमित रेषेच्या मागे हटविण्यास किंवा ती त्या रेषेपर्यंत बांधण्यास, फर्माविता येईल ;

(ख) खंड (क) च्या तरतुदी लागू होत नसतील आणि नगरपरिषदेच्या मते सदर इमारत सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत मागे हटविणे आवश्यक असेल तर, लेखी नोटिशीद्वारे अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत असा पुढे आलेला भाग का पाडून

टाकण्यात येऊ नये आणि उक्त रेषेच्या आत येत असलेली जमीन नगरपरिषदेने का संपादन करू नये याविषयी कारण दाखविण्यात फर्माविता येईल.

(२) अशा मालकाने, असा पुढे येणारा भाग का पाडण्यात येऊ नये आणि वर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त रेषेतील जमीन का संपादन करण्यात येऊ नये, याबद्दल नगरपरिषदेचे समाधान होईल अशा रीतीने पुरेसे कारण दाखविले नाही तर, नगरपरिषदेस लेखी नोटिशीद्वारे अशा मालकास तो पुढे आलेला भाग पाडून टाकण्यास फर्माविता येईल.

(३) पोट-कलम (१), खंड (क) किंवा (ख) अन्वये, किंवा पोट-कलम (२) अन्वये जो पुढे आलेला भाग अशा रीतीने पाडून टाकण्यात आला असेल किंवा मागे हटविण्यात आला असेल त्या भागाखालील सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या आतील जमिनीच्या हिश्शाचा जो हिस्सा, अशा रीतीने पुढे आलेला भाग पाडून टाकण्यापूर्वी किंवा मागे हटविण्यापूर्वी अशा पुढे आलेल्या भागाने व्यापला होता त्या भागाचा नगरपरिषद तोबडतोब कब्जा घेईल आणि त्यानंतर अशी जमीन सार्वजनिक रस्त्याचा एक भाग असल्याचे समजण्यात येईल व तो अशा प्रकारे नगरपरिषदेकडे निहित होईल.

(४) नगरपरिषदेकडे निहित नसलेली कोणतीही जमीन-- मग ती खुली असो व कुंपण घातलेली असो— जर ती सार्वजनिक रस्त्याच्या नियमित रेषेच्या आत असेल आणि अशा जमिनीवर मुख्य इमारतीच्या बाहेरील संरचनेव्यतिरिक्त इतर कोणतीही इमारत नसेल तर, नगरपरिषदेने अशा जमिनीच्या मालकास आपल्या हेतूची कमीत कमी तीस पूर्ण दिवसांची लेखी नोटीस दिल्यानंतर, किंवा जर ती जमीन, शासनाकडे निहित असेल तर, जिल्हाधिकाऱ्याची लेखी परवानगी घेतल्यानंतर, तिला उक्त जमीन तिच्याभोवती असलेल्या कुंपणाच्या भिंती, वई किंवा कुंपण यांसह किंवा कोणतीही बाहेरील संरचना असल्यास, त्यासह तिचा ताबा घेता येईल, आणि आवश्यक वाटल्यास, ती भिंत, कुंपण किंवा वई काढून टाकता येईल आणि अशा रीतीने संपादन करण्यात आलेली जमीन त्यानंतर सार्वजनिक रस्त्याचा भाग असल्याचे समजण्यात येईल व ती नगरपरिषदेकडे निहित होईल.

(५) पोट-कलम (३) अन्वये रस्त्यास जोडलेल्या किंवा पोट-कलम (४) अन्वये संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीच्या मालकास जमिनीच्या किंमतीबद्दल, आणि कोणत्याही इमारतीच्या मालकास उक्त जमिनीच्या उक्त पोट-कलमांपैकी कोणत्याही पोट-कलमान्वये नगरपरिषदेने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमुळे अशा मालकाची जी कोणतीही हानी किंवा नुकसान झाले असेल किंवा त्यास जो खर्च झाला असेल त्याबद्दल नगरपरिषद जी भरपाई देईल त्या भरपाईच्या रकमेबाबत विवाद निर्माण झाल्यास, ती भरपाई कलम ३३० अन्वये तरतूद केलेल्या रीतीने निश्चित करण्यात व ठरविण्यात येईल :

परंतु, कलम १९५, पोट-कलम (१) अन्वये नोटीस देण्यात आली असेल अशा कोणत्याही इमारतीच्या किंवा तिच्या हिश्श्याच्या बाबतीत, अशा भरपाई देय असणार नाही.

(६) अशा रीतीने भरपाईच्या रकमेबाबत निश्चिती करून घेण्यात आली असेल व ती ठरविण्यात आली असेल किंवा पोट-कलम (१) च्या कक्षेत येणारी मोडकळीस आलेली किंवा धोकादायक इमारत कलम १९५ च्या तरतुदींन्वये पाडून टाकण्यात आली असेल त्यावेळी, नगरपरिषदेस देय असलेली भरपाईची कोणतीही रक्कम असल्यास ती दिल्यानंतर नगरपरिषदेस रस्त्यास जोडलेल्या जमिनीचा कब्जा घेता येईल व आवश्यक असल्यास तिला तिची सफाई करता येईल.

(७) सार्वजनिक रस्त्याच्या कोणत्याही हिश्श्यासंबंधी कलम १७६ अन्वये सार्वजनिक रस्त्याची नियमित रेषा ठरविण्यात आली नसेल आणि जर इमारतीचा कोणताही भाग इमारतीच्या दर्शनी भागाच्या पलिकडे तिच्या कोणत्याही एका बाजूस येत असेल तर, असा पुढे आलेला भाग रस्त्याच्या नियमित रेषेत येत असल्याचे समजण्यात येईल आणि या कलमाच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह अशा भागास लागू होतील.

रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत इमारत पुढे घेणे.

**१७८.** कोणत्याही सार्वजनिक रस्त्याला लागून असलेली कोणतीही इमारत अशा रस्त्याच्या नियमित रेषेच्या मागे असेल तर,—

(क) नगरपरिषदेस, तिला योग्य वाटेल अशा अटींवर, रस्त्याच्या रेषेत सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी अशी इमारत पुढे घेण्याची परवानगी देता येईल ; आणि

(ख) अशा इमारतीची पुन्हा बांधणी करण्याचे किंवा उक्त रस्त्यास लागून असलेली अशी इमारत किंवा तिचा बराचसा भाग पाडून टाकणे किंवा पुन्हा बांधणे ज्यायोगे आवश्यक होईल अशा कोणत्याही रीतीने त्यात फेरफार किंवा दुरूस्ती करण्याचे योजिले असेल तेव्हा नगरपरिषदेस अशा कामासाठी कोणतीही परवानगी देताना, रस्त्याची रेषा सुधारण्याच्या दृष्टीने अशी इमारत पुढे घेण्यास फर्माविता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये इमारत पुढे घेण्यास परवानगी दिलेल्या किंवा फर्माविलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या जागेत समाविष्ट होणारी जमीन नगरपरिषदेच्या मालकीची असेल तर, इमारत अशा रीतीने पुढे घेण्यासाठी नगरपरिषदेने दिलेली परवानगी किंवा केलेली मागणी ही, उक्त जमिनीसंबंधी उक्त मालकास करून दिलेले पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असेल व अशा जमिनीबद्दल उक्त मालकाने नगरपरिषदेस द्यावयाची किंमत व अभिहस्तांतरणपत्राच्या इतर अटी व शर्ती, यथास्थिति उक्त परवानगीत वा मागणीत नमूद केलेल्या असतील.

(३) या कलमाच्या प्रयोजनाकरिता सार्वजनिक रस्त्यापासून कोणतीही जागा वेगळी करणारी भिंत ही इमारत आहे असे समजण्यात येईल; आणि नगरपरिषद मान्य करील असे साहित्य वापरून आणि अशा परिमाणाची भिंत उक्त रेषेवर बांधण्यात आली असेल तर, इमारत रस्त्याच्या नियमित रेषेपर्यंत पुढे घेण्यासंबंधी ज्या आदेशाद्वारे परवानगी देण्यात आली असेल किंवा तसे फर्माविण्यात आले असेल त्याचे पुरेसे पालन झाले आहे असे समजण्यात येईल.

सार्वजनिक रस्त्याच्या पृष्ठभागावरील प्रक्षेपणे, अडथळे व अतिक्रमणे.

**१७९.** (१) पोट-कलम (४) अन्वये मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय, कोणतीही व्यक्ती, कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर किंवा अशा रस्त्यातील कोणतीही नाली, गटारे, मलप्रणाल किंवा सेतुप्रणाल यांवर—

(क) कोणतेही कुंपण, कठडा, खांब, गाळा, चबुतरा किंवा कोणतीही प्रक्षेपित होणारी संरचना किंवा वस्तू बांधणार नाही किंवा मांडणार नाही किंवा अन्य कोणतेही अतिक्रमण किंवा अडथळा करणार नाही ;

(ख) कोणतीही पेटी, गासडी, पुडके किंवा व्यापारी जिन्नस किंवा इतर कोणतीही वस्तू ठेवणार नाही किंवा टाकणार नाही किंवा ठेवावयास अगर टाकावयास लावणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला, कलम १७६, पोट-कलम (६), खंड (क) मधील तरतुदी लागू होत नसतील तर, अपराध सिद्ध-झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि सतत चालू राहणाऱ्या उल्लंघनाच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, असे उल्लंघन ज्या कालावधीपर्यंत सतत चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसास आणखी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) मुख्य अधिकाऱ्यास,—

(एक) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून किंवा पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या कोणत्याही परवानगीविरुद्ध जाऊन कोणत्याही रीतीने केलेले; किंवा

(दोन) ज्यासंबंधी पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या परवानगीत विनिर्दिष्ट केलेली मुदत संपलेली असेल,

असे कोणतेही प्रक्षेपण, अतिक्रमण किंवा अडथळा नोटीस न देता काढून टाकण्याचा अधिकार असेल.

(४) कोणतेही उपविधी असल्यास, त्यांच्या तरतुदींना अधीन राहून, मुख्य अधिकाऱ्यास,—

(एक) लोकांची किंवा कोणत्याही व्यक्तीची गैरसोय होणार नाही अशा रीतीने, उत्सवाच्या किंवा समारंभाच्या प्रसंगी ;

(दोन) इमारती बांधण्याच्या कामी उपयोगात आणण्यात येत असलेले किंवा उपयोगात आणण्याचा हेतू असलेले इमारती लाकूड, विटा किंवा इतर सामग्री ठेवण्यासाठी ;

(तीन) उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी ;

कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा तात्पुरता भोगवटा करण्याची किंवा त्यावर तात्पुरते इमले उभारण्याची परवानगी देता येईल.

(५) जिला पोट-कलम (१) किंवा (४) अन्वये परवानगी देण्यात आली असेल तिला मुख्य अधिकाऱ्याने स्वेच्छानिर्णयानुसार, कमीत कमी चोवीस तासांची लेखी नोटीस दिल्यावर ती परवानगी रद्द केली जाऊ शकेल अशा नोटिशीत अशा कारवाईची कारणे नमूद करण्यात येतील.

(६) पोट-कलम (१) किंवा (४) अन्वये कोणतीही परवानगी देण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, तिने ज्या जागी कोणतीही उभारणी केली असेल किंवा ज्या जागी कोणतीही वस्तू ठेवली असेल त्या प्रत्येक जागेस योग्य रीतीने कुंपण घालण्याची व तिची राखण करण्याची स्वतःच्या खर्चाने व्यवस्था करील आणि अपघात टाळण्यासाठी अशा जागी रात्रीच्या वेळी चांगल्या प्रकारे दिवाबत्तीची सोय करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबतीत तसे करील.

(७) पोट-कलम (१) किंवा (४) अन्वये कोणतीही परवानगी देण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, केलेली उभारणी काढून टाकल्यानंतर किंवा ठेवलेली अगर टाकलेली वस्तू तेथून दूर केल्यानंतर मुख्य अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने तो रस्ता ताबडतोब पूर्ववत व नीट करील.

(८) पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या कोणत्याही परवानगीतील अटींचे जो कोणी उल्लंघन करील किंवा पोट-कलम (६) किंवा (७) च्या तरतुदींचे पालन करण्यात कसूर करील, त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि सतत चालू राहणाऱ्या उल्लंघनाच्या बाबतीत पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, असे उल्लंघन ज्या कालावधीपर्यंत सतत चालू राहील त्यातील प्रत्येक दिवसास त्यास आणखी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

रस्ते, इत्यादींच्या पृष्टभागावरील प्रक्षेपणां-व्यतिरिक्त इतर प्रक्षेपणांवर प्रतिषेध.

**१८०.** (१) पोट-कलम (२) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती, जी संरचना किंवा जोडकाम—

(क) कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर लोंबकळत राहील किंवा त्यातून वर येईल किंवा त्यावर प्रक्षेपित होईल किंवा अशा रस्त्यावरून लोकांस सुरक्षितपणे किंवा सोयीस्करपणे जाण्यायेण्यास अडथळा करील; अथवा

(ख) कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावरील कोणत्याही नालीतून किंवा उघड्या जलमार्गातून वर येईल किंवा त्यावर प्रक्षेपित होईल किंवा अशा नालीचा किंवा उघड्या जलमार्गाचा उपयोग करण्यात किंवा तो योग्य रीतीने चालू राहण्यात कोणत्याही प्रकारे अड्थळा होईल किवा त्याची तपासणी करण्यास किंवा तो साफ करण्यास कोणत्याही प्रकारे व्यत्यय येईल ;

अशी कोणतीही संरचना किंवा जोडकाम कोणत्याही जागेस लागून किंवा तिच्यासमोर उभारणार नाही किंवा ठेवणार नाही.

(२) नगरपरिषदेस, या बाबतीत केलेल्या उपविधींस अधीन राहून, सार्वजनिक रस्त्यावरील कोणत्याही इमारतीच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास अशा इमारतीच्या कोणत्याही वरच्या मजल्यावरून प्रक्षेपित होणाऱ्या पड्व्या, सज्जे किंवा खोल्या किंवा भुयारे, हवामान चौकटी आणि तसेच इतर पुढे येणारे भाग इमारतीच्या जोत्याच्या किंवा तळभागाच्या भिंतीच्या रेषेपुढे चार फुटांहून अधिक येणार नाहीत अशा तऱ्हेने उभारण्यास लेखी परवानगी देता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये देण्यात आलेली परवानगी ही कायमस्वरूपाची असू शकेल किंवा अशी परवानगी दिली त्यावेळी जी मुदत लेखी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीसाठी असेल.

(४) पोट-कलम (७) अन्वये कोणतीही कार्यवाही करता येत असली तरीही,—

(एक) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या परवानगीने किंवा परवानगीशिवाय किंवा परवानगीविरुद्ध कोणत्याही रीतीने बांधण्यात आलेले असे कोणतेही प्रक्षेपण किंवा केलेला अडथळा ;

(दोन) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीविरुद्ध बांधण्यात किंवा करण्यात आलेले जे कोणतेही प्रक्षेपण किंवा अडथळा नेमलेल्या दिवसापूर्वी बांधण्यात किंवा करण्यात आला असेल तर, असे प्रक्षेपण किंवा केलेला अडथळा ;

(तीन) पोट-कलम (२) अन्वये ज्या मुदतीकरिता परवानगी दिली असेल ती मुदत संपली असल्यास ;

नगरपरिषदेस, लेखी नोटिशीद्वारे, अशा इमारतीच्या मालकास किंव भोगवटादारास तो काढून टाकण्याविषयी किंवा त्यात फेरफार करण्याविषयी फर्माविता येईल.

(५) नगरपरिषदेस, इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास अभिवेदन करण्याची संधी दिल्यानंतर, ज्यास पोट-कलम (४) लागू होत नाही असा कोणताही बांधलेला प्रक्षेपित भाग किंवा अडथळा काढून टाकण्यास किंवा त्यात फेरफार करण्यांस त्यास नोटिशीद्वारे फर्माविता येईल :

परंतु, या पोट-कलमान्वये अशा प्रकारे प्रक्षेपित होणारा भाग किंवा अडथळा काढून टाकण्यामुळे किंवा त्यात फेरफार केल्यामुळे जिला नुकसान सोसावे लागले आहे अशा प्रत्येक व्यक्तीस नगरपरिषद वाजवी भरपाई देईल.

(६) कोणत्याही इमारतीच्या भोगवटादाराने अशा नोटिशीनुसार कोणतीही संरचना किंवा जोडकाम काढून टाकले असेल किंवा त्यात फेरफार केले असतील तर, अशी संरचना किंवा जोडकाम हे, त्याने स्वतः उभारले, मांडले किंवा ठेवले नसेल तर, त्यास, उक्त नोटिशीचे पालन करताना त्याने केलेला सर्व वाजवी खर्च हा, त्या इमारतीच्या मालकाच्या खाती टाकण्याचा हक्क असेल.

(७) असा कोणताही मालक किंवा भोगवटादार, नगरपरिषदेच्या पोट-कलम (२) खालील परवानगीशिवाय किंवा अशा परवानगीचे उल्लंघन करून कोणतेही प्रक्षेपण उभारील किंवा अडथळा करील किंवा कोणताही मालक किंवा भोगवटादार नगरपरिषदेकडून पोट-कलम (४) किंवा (५) अन्वये नोटीस मिळाल्यानंतर कोणतेही प्रक्षेपण, अतिक्रमण किंवा अडथळा काढून टाकणार नाही त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि सतत चालू राहणाऱ्या अपराधाच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, असा अपराध ज्या कालावधीपर्यंत सतत चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसास त्यास आणखी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

नगरपरिषदेकडे निहित असलेल्या किंवा निहित नसलेल्या व सार्वजनिक जागा व खुल्या जागा यांवरील प्रक्षेपणे, अतिक्रमणे, इत्यादी.

**१८१.** (१) कलम १८० च्या तरतुदी नगरपरिषदेकडे निहित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक जागेस किंवा कोणत्याही खुल्या जागेस योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

(२) कलम १८०, पोट-कलमे (२) व (३) यांच्या तरतुदी कोणत्याही सार्वजनिक जागेस किंवा खाजगी मालमत्ता नसलेल्या आणि नगरपरिदेकडे निहित नसेल अशा कोणत्याही खुल्या जागेस लागू होतील :

परंतु, अशी सार्वजनिक जागा किंवा खुली जागा शासनाकडे निहित असेल तर, प्रथम जिल्हाधिकाऱ्याची परवानगी घेण्यात येईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, त्याबाबत तिला रीतसर प्राधिकृत करण्यात आले नसता, खाजगी मालमत्ता नसलेल्या कोणत्याही खुल्या जागेतून माती, रेती किंवा इतर सामग्री काढून नेईल किंवा तीत किंवा तीवर कोणतेही अतिक्रमण करील, तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि असा अपराध चालू राहण्याचा बाबतीत पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, असा अपराध ज्या कालावधीपर्यंत सतत चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसास तिला आणखी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

सीमा-भिंती, वई, इत्यादी बांधण्यास किंवा काढून टाकण्यास फर्माविण्याचा अधिकार.

**१८२.** नगरपरिषदेस, नोटिशीद्वारे, कोणत्याही सार्वजनिक रस्त्यालगत असणाऱ्या कोणत्याही जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास,—

(क) तिच्या मते, ज्यामुळे रहदारीस अडथळा येण्याचा किंवा अडथळा निर्माण होण्याचा संभव असेल किंवा जी अन्यथा आक्षेपार्ह असेल अशी कोणतीही सीमा-भिंत; वई किंवा इतर कुंपण जमिनीवरून अंशतः किंवा पूर्णतः काढून टाकण्यास ;

(ख) अशा जमिनीवर, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा सामग्रीच्या वर्णनाच्या आणि मोजमापाच्या सीमा-भिंती, वई किंवा इतर कुंपणे बांधण्यास ;

(ग) अशा जमिनीवरील सीमा-भिंती, वई किंवा इतर कुंपणे सुस्थितीत ठेवण्यास ;

(घ) अशा जमिनीवर वाढणारी आणि रस्त्यावर लोंबकळणारी आणि वाहतुकीस अडथळा आणणारी किंवा अशा वाहतुकीस धोका निर्माण करणारी झाडे कापण्यास किंवा नीटनेटकी छाटण्यास ;

फर्माविता येईल.

नवीन खाजगी रस्ते.

**१८३.** (१) कोणताही नवीन रस्ता रेखांकित करण्याचा किंवा तयार करण्याचा जिचा हेतू असेल अशी प्रत्येक व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्यास त्या बाबतीत लेखी नोटीस देईल आणि अशा नोटिशीबरोबर,—

(क) रस्त्याची नियोजित पातळी, दिशा व रुंदी ;

(ख) अशा रस्त्यालगत असणाऱ्या किंवा अशा रस्त्याचा उपयोग होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही इमारतींची किंवा भूखंडांची स्थिती आणि त्यांच्या सीमा ;

(ग) ज्याला नवीन रस्ता जाऊन मिळेल अशा कोणत्याही सार्वजनिक रस्त्याची किंवा रस्त्यांची स्थिती ;

(घ) रस्ता समतल करण्याकरिता, त्यावर फरसबंदी करण्याकरिता, खडी घालण्याकरिता, फरशी घालण्याकरिता, त्यात पाट काढण्याकरिता, निःसारणाकरिता, दिवाबत्ती करण्याकरिता किंवा तो साफ करण्याकरिता करावयाची व्यवस्था ;

या बाबी दर्शविणारे नकाशे व छेद आणि त्याचबरोबर या बाबतीत करण्यात आलेले कोणतेही उपविधी असल्यास तद्नुसार आवश्यक असेल असा कोणताही इतर तपशील पुरवील.

(२) अशा व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेली सर्व माहिती व कागदपत्रे देण्यात कसूर केली किंवा नगरपरिषदेस आणखी माहिती किंवा कागदपत्र मागवणे आवश्यक वाटत असेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, उक्त नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, लेखी नोटिशीद्वारे अशा व्यक्तीस आवश्यक ती माहिती किंवा कागदपत्रे सादर करण्यास फर्माविता येईल.

(३) मुख्य अधिकाऱ्यास, नोटीस आणि पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती व कागदपत्रे मिळाल्यानंतर साठ दिवसांच्या आत किंवा पोट-कलम (२) अन्वये कोणतीही जादा माहिती किंवा कागदपत्रे मागविण्यात आली असतील तर, अशी आणखी माहिती व कागदपत्रे मिळाल्यापासून साठ दिवसांच्या आत नगरपरिषदेस,—

(क) तिला योग्य वाटतील अशा फेरबदलांस किंवा शर्तीस अधीन राहून, नवीन रस्त्याच्या रेखांकनास किंवा तो तयार करण्यास मंजुरी देता येईल ; किंवा

(ख) त्यासाठी परवानगी नाकारता येईल. मात्र नाकारण्याबाबतची कारणे अर्जदारास लेखी कळविण्यात येतील.

(४) पोट-कलम (३) अन्वये त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत कोणताही आदेश देण्यात नगरपरिषदेने कसूर केल्यास, नोटीस देणाऱ्या व्यक्तीस पोट-कलम (१) खालील नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आले असेल अशा रीतीने आणि या अधिनियमाच्या किंवा त्याखाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदींशी विसंगत असणार नाही अशा रीतीने नियोजित रस्ता रेखांकित करण्याचा आणि तयार करण्याचा हक्क असेल.

(५) पोट-कलम (३) किंवा (४) अन्वये कोणतेही काम सुरू करण्याचा जिला हक्क आहे अशा कोणत्याही व्यक्तीने तिला ज्या दिनांकास असा हक्क प्राप्त झाला असेल त्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत असे काम केले नाही तर, असे काम करण्याचा तिचा हक्क समाप्त होईल.

(६) जो कोणी, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेली नोटीस दिल्यावाचून किंवा नगरपरिषदेने पोट-कलम (३) च्या खंड (क) अन्वये दिलेल्या अनुदेशानुसार असेल त्या व्यतिरिक्त किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या तरतुदींविरुद्ध, कोणत्याही रीतीने अशा कोणत्याही रस्त्याचे रेखांकन करील किंवा तो तयार करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू

शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि नगरपरिषदेस, अशा रीतीने रेखांकित केलेल्या किंवा तयार केलेल्या रस्त्यात फेरफार करण्याची आणि अशा रस्त्यावर बांधलेल्या कोणत्याही इमारतीत फेरफार करण्याची किंवा ती काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल आणि त्यासाठी झालेला खर्च अपराधी व्यक्ती नगरपरिषदेस देईल आणि तो खर्च मालमत्तेवरील कराच्या रूपाने देय असलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने वसुलीयोग्य असेल.

(७) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, सार्वजनिक रस्त्यांची पातळी व रुंदी आणि त्यालगतच्या इमारतीची उंची याबाबत या अधिनियमाच्या किंवा त्या खाली केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी यांच्या तरतुदी, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या नवीन खाजगी रस्त्यांच्या बाबतीत देखील लागू होतील आणि त्या पोट-कलमात उल्लेख केलेला सर्व तपशील हा, नगरपरिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहील.

पावसाच्या पाण्यासाठी पन्हाळी व नळ.

**१८४.** कोणत्याही रस्त्यावरील एखाद्या इमारतीतून किंवा जमिनीवरून येणाऱ्या पाण्यामुळे कोणत्याही रस्त्याचे नुकसान होऊ नये किंवा रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना गैरसोयीचे होऊ नये म्हणून [१][अध्यक्षांच्या नियंत्रणास अधीन राहून, मुख्य अधिकाऱ्यास] ते पाणी धरण्यासाठी आणि वाहून नेण्यासाठी आणि सोडून देण्यासाठी योग्य पन्हाळी व नळ लावण्याविषयी व ते सुस्थितीत ठेवण्याविषयी अन्य इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास नोटीस देऊन फर्माविता येईल.

रस्त्यांना नावे व क्रमांक देणे व जागांना क्रमांक देणे.

**१८५.** (१) नगरपरिषद,—

(क) प्रत्येक सार्वजनिक रस्त्यास नाव किंवा क्रमांक देईल ;

(ख) असा रस्ता ज्या नावाने किंवा क्रमांकाने ओळखण्यात यावयाचा असेल असे नाव किंवा क्रमांक अशा रस्त्याच्या प्रत्येक टोकाशी किंवा कोपऱ्याशी किंवा तोंडाशी किंवा त्याच्या जवळ असलेल्या कोणत्याही इमारतीच्या एखाद्या ठळक भागावर, भिंतीवर किंवा कोणत्याही इतर जागी लावण्याची किंवा रंगविण्याची व्यवस्था करील ;

(ग) कोणत्याही जागा किंवा तिचा भाग ज्या क्रमांकाने किंवा पोट-क्रमांकाने ओळखण्यात यावयाचा असेल असा क्रमांक व पोट-क्रमांक ठरवील ;

आणि तिला कोणत्याही जागेच्या किंवा तिच्या भागाच्या मालकास, लेखी नोटिशीद्वारे एकतर अशा जागेवर किंवा तिच्या भागावर अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी आणि अशा रितीने धातुच्या पट्टीवर खंड (ग) अन्वये ठरविलेले क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावण्यास किंवा नगरपरिषदेच्या आदेशान्वये अशा कामाची अंमलबजावणी व्हावी अशी त्याची इच्छा असल्यास तसे लेखी कळविण्यास सांगता येईल.

(२) जी कोणतीही व्यक्ती, सार्वजनिक रस्त्याचे असे कोणतेही नाव किंवा क्रमांक किंवा कोणत्याही जागेचा किंवा तिच्या भागाचा क्रमांक किंवा पोट-क्रमांक नष्ट करील, काढून टाकील किंवा विरूप करील किंवा नगरपरिषदेने ठरविलेल्या नावाहून, क्रमांकाहून किंवा पोट-क्रमांकाहून वेगळे नाव, क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावील त्या व्यक्तीस, आणि कोणत्याही जागेचा किंवा तिच्या भागाचा जो कोणताही मालक स्वखर्चाने अशा जागेवर किंवा तिच्या भागावर नगरपरिषदेने ठरविलेला क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावणार नाही अशा मालकास अपराध सिद्ध झाल्यानंतर, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ याच्या कलम २३ द्वारे "नगरपालिकेस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) नगरपरिषदेच्या आदेशान्वये कोणत्याही जागेवर किंवा तिच्या भागावर पोट-कलम (१) अनुसार क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावलेला असेल तर, त्या बाबतीत अशा कामाचा खर्च, यथास्थिति, अशा जागेच्या किंवा तिच्या भागाच्या मालकाकडून देय होईल.

**स्पष्टीकरण.—** या कलमात " जागा " याचा अर्थ, कोणतीही इमारत, असा आहे. परंतु, फक्त भिंती, आवाराच्या भिंती, कुंपण, व्हरांडे, कायम बसविलेले चबुतरे, जोती, दरवाजाच्या पायऱ्या किंवा तत्सम भाग म्हणजे जागा नव्हे.

**फरसबंदी, इत्यादी काढून टाकणे.**

**१८६.** (१) मुख्य अधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही कायदेशीर प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कोणतीही व्यक्ती, कोणत्याही सार्वजनिक रस्त्याची फरशी, गटार, फरशीचे दगड किंवा इतर सामग्री किंवा त्यांची कुंपणे, भिंती किंवा खांब किंवा त्यातील कोणताही नगरपरिषदेचा दिवा, दिव्याचा खांब, त्रिकोणी आधार, पाण्याचा खांब, नळखांब (हेड्रंट) किंवा दिवा, पाण्याचा खांब किंवा नळखांब यांची इतर उपसाधने किंवा त्यातील नगरपरिषदेची अशी इतर मालमत्ता विस्थापित करणार नाही, काढून घेणार नाही, त्यात कोणताही फेरफार करणार नाही, त्यात छिद्र पाडणार नाही किंवा त्याचे इतर प्रकारे नुकसान करणार नाही, नगरपरिषदेचा दिवा विझवून टाकणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणतीही परवानगी देण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, स्वतःच्या खर्चाने, ज्या जागी जमीन किंवा फरसबंदी उघडण्यात किंवा फोडण्यात आली असेल किंवा ज्या जागेवरून कोणतेही सामान नेण्यात आले असेल किंवा कोणतीही उभारणी करण्यात आली असेल किंवा इतर वस्तू बसविण्यात आली असेल त्या प्रत्येक जागेस योग्य रीतीने कुंपण घालण्याची आणि ती सुरक्षित राखण्याची व्यवस्था करील आणि अपघात टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक असेल तेव्हा अशा सर्व बाबतीत अशा जागी रात्रीच्या वेळी दिवा-बत्तीची सोय करील.

(३) जी कोणीतीही व्यक्ती, पोट-कलम (१)-च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) ज्या कोणत्याही व्यक्तीने, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या परवानगीने किंवा परवानगीवाचून कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावरील अशी कोणतीही फरशी, गटार, फरशीचे दगड किंवा इतर सामग्री किंवा अशी कुंपणे, भिंती, खांब, नगरपरिषदेचे दिवे, दिव्याचे खांब, त्रिकोणी आधार, पाण्याचे खांब, नळखांब किंवा दिवा, पाण्याचे खांब किंवा नळखांब यांची इतर उपसाधने किंवा नगरपरिषदेची इतर मालमत्ता विस्थापित केली असेल, काढून नेली असेल किंवा त्यात कोणताही फेरफार केला असेल किंवा त्या ठिकाणी छिद्र पाडले असेल किंवा नगरपषिदेचा दिवा विझवून टाकला असेल तर, ती व्यक्ती, पोट-कलम (३) खालील कोणत्याही शास्तीच्या जोडीने वरील सामग्री पूर्वीच्या जागी बसविण्यासाठी किंवा पूर्ववत करण्यासाठी नगरपरिषदेस जो खर्च येईल तो खर्च देण्यास जबाबदार राहील. असा खर्च, मालमत्तेवरील कर म्हणून देय असलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

**सार्वजनिक रस्त्यांवर लायसन-शिवाय वस्तू विकण्यास मनाई.**

**१८७.** (१) कोणतीही व्यक्ती, या बाबतीत नगरपरिषदेने केलेल्या उपविधी अन्वये दिलेल्या लायसनशिवाय आणि तद्नुसार असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागी कोणत्याही वस्तूची फेरीने विक्री करणार नाही किंवा ती विकणार नाही किंवा विक्रीसाठी ठेवणार नाही.

(२) जी कोणीतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे किंवा तिला देण्यात आलेल्या कोणत्याही लायसनमधील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) मुख्य अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास पोट-कलम (१) चे उल्लंघन करून फेरीने विकलेली, विक्री केलेली किंवा विक्रीसाठी मांडलेली वस्तू ताब्यात घेता येईल.

**लायसन-शिवाय हातगाड्या चालविण्यास मनाई.**

**१८८.** (१) कोणतीही व्यक्ती, या बाबतीत नगरपरिषदेने केलेल्या उपविधींअन्वये दिलेल्या लायसनखाली व तद्नुसार असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागी कोणतीही हातगाडी चालविणार नाही :

**१९२० चा मुंबई ७.** परंतु, ज्या नगरपालिका क्षेत्रात मुंबई सार्वजनिक वाहनांबाबत अधिनियम, १९२० अंमलात असेल आणि त्यानुसार सार्वजनिक वाहने म्हणून उपयोग करण्यात येणाऱ्या हातगाड्यांबद्दल लायसन आवश्यक असेल तर, अशा कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात असे लायसन आवश्यक असणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या किंवा तिला देण्यात आलेल्या कोणत्याही लायसनच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला, अपराध सिद्ध झाल्यानंतर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) मुख्य अधिकाऱ्यास किंवा या बाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून उपयोगात आणलेली कोणतीही हातगाडी ताब्यात घेता येईल.

## प्रकरण बारा

## इमारतींवर नियंत्रण

**इमारत बांधण्याची नोटीस.**

**१८९.** (१) या प्रकरणात सर्वत्र " इमारत बांधणे " या शब्दप्रयोगात पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

(क) कोणतीही इमारत किंवा आवाराची भिंत धरून कोणतीही भिंत व कुंपण, व्हरांडा, कायम बसविलेला चबुतरा, जोते, दाराची पायरी किंवा तत्सम इतर भाग— मग तो इमारतीचा भाग असो वा नसो— यात कोणताही महत्त्वाचा फेरफार करणे, वाढ करणे किंवा त्याचे बांधकाम करणे ;

(ख) जी कोणतीही इमारत आरंभी माणसाने राहण्यासाठी म्हणून बांधलेली नसेल तिचे माणसाने राहण्याच्या जागेत रूपांतर करणे ;

(ग) माणसाने राहण्यासाठी आरंभी एकच जागा म्हणून बांधलेल्या कोणत्याही जागेचे अनेक जागांत रूपांतर करणे ;

(घ) माणसाने राहण्यास म्हणून असलेल्या दोन किंवा अधिक जागांचे त्याहून अधिक जागांत रूपांतर करणे ;

(ङ) इमारतींच्या आतील व्यवस्थेत केलेल्या ज्या फेरफारांमुळे तिचे जलनिस्सारण, हवा खेळती राहण्याच्या सोयी किंवा स्वच्छताविषयक इतर व्यवस्था किंवा तिची सुरक्षितता व टिकाऊपणा यांवर परिणाम होत असेल असे कोणतेही फेरफार करणे, आणि

(च) कोणत्याही इमारतींत कोणत्याही खोल्या, इमारती किंवा इतर संरचना यांची भर टाकणे; आणि अशा रीतीने फेरफार केलेल्या, वाढविलेल्या, पुन्हा बांधलेल्या व रूपांतर केलेल्या किंवा भर टाकलेल्या इमारतीचा या प्रकरणात सर्व ठिकाणी "नवीन इमारत" या संज्ञेत समावेश होतो ;

(२) कोणत्याही इमारतीच्या बांधकामास सुरूवात करण्यापूर्वी, ज्या व्यक्तीचा असे बांधकाम करण्याचा हेतू असेल ती व्यक्ती त्याबद्दल मुख्य अधिकाऱ्यास लेखी नोटीस देईल आणि त्याबरोबरच तिने उप-विधी अन्वये किंवा विशेष आदेशान्वये तसे करणे आवश्यक असल्यास, मुख्य अधिकाऱ्यास माहीत असलेल्या कोणत्याही पातळीस अनुलक्षून अशा इमारतीचा पाया व अगदी खालचा मजला ज्या पातळीवर घ्यावयाचे योजले असेल ती पातळी दर्शविणारा नकाशा पुरवील. तसेच, ती नियोजित इमारतीच्या सीमा, तिचे संकल्पचित्र, इमारतीतील वायुवीजनाची व्यवस्था व सामग्री यासंबंधी आणि त्या इमारतीसंबंधाने वापरावयाचे कोणतेही गटार, संडास, शौचकूप, घराची नाली व मलकुंडी हे सर्व कोठे व कसे बांधण्याचे योजिले आहे याविषयी आणि अस्तित्वात असलेल्या किंवा नियोजित अशा कोणत्याही रस्त्यास अनुलक्षून त्या इमारतीचे स्थान कोठे असेल याविषयी व इमारतीत प्रवेश करण्याचे मार्ग आणि ज्या प्रयोजनांकरिता इमारतींचा उपयोग करावयाचा असेल त्या प्रयोजनांविषयी उप-विधी अन्वये आवश्यक असलेली किंवा मुख्य अधिकाऱ्याने मागितलेली सर्व माहिती पुरवील :

परंतु, नगरपरिषदेने तयार केलेल्या उप-विधींअन्वये जर तसे करणे आवश्यक असेल तर, अशी नोटीस नगरपरिषद वेळोवेळी विहित करील अशा नमुन्यामध्ये असेल आणि अशा नकाशांवर उप-विधींमध्ये जी अर्हता नमूद केली असेल ती धारण करणारी व्यक्ती किंवा अशा नकाशावर उप-विधीअन्वये जिला सही करण्यासाठी लायसन दिलेले असेल अशी व्यक्ती सही करील.

(३) जर, पोट-कलम (२) अन्वये नोटीस देणारी व्यक्ती,—

(एक) पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असलेली सर्व माहिती किंवा कागदपत्रे पुरविण्यात कसूर करील ; किंवा

(दोन) मुख्य अधिकाऱ्यास आणखी इतर कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे मागविणे आवश्यक वाटत असेल तर ;

मुख्य अधिकारी अशी नोटीस मिळाल्यानंतर साठ दिवसांच्या आत, लेखी आदेशाद्वारे, अशा व्यक्तीस अशी माहिती किंवा कागदपत्रे पुरविण्यास फर्मावील.

(४) पोट-कलम (२) अन्वयेची नोटीस मुख्य अधिकाऱ्यास मिळाल्यानंतर साठ दिवसांच्या आत किंवा पोट-कलम (३) अन्वये कोणतीही अधिक माहिती व कागदपत्रे मागविण्यात आली असतील तर, अशी सर्व अधिक माहिती किंवा कागदपत्रे मिळाल्यानंतर साठ दिवसांच्या आत, मुख्य अधिकाऱ्यास,—

(क) पोट-कलम (२) व पोट-कलम (३) अन्वये पुरविलेले नकाशे व माहिती यास अनुसरून इमारत बांधण्यासाठी आवश्यक ती परवानगी देता येईल ;

(ख) पातळी, जलनिस्सारण, स्वच्छता, साधनसामग्री यांविषयी किंवा बांधावयाच्या मजल्यांच्या संख्येविषयी किंवा अस्तित्वात असलेल्या किंवा नियोजित कोणत्याही रस्त्याच्या संबंधात त्या इमारतीचे स्थान कोठे असावे याविषयी किंवा अशा इमारतीत प्रवेश

करण्याच्या मार्गाविषयी किंवा ज्या प्रयोजनाकरिता ती इमारत उपयोगात आणावयाची आहे त्या प्रयोजनाविषयी हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम व उप-विधी यांस अनुसरून, कोणत्याही शर्ती लादता येतील ;

(ग) त्या इमारतींच्या स्थानासंबंधी किंवा रस्त्याच्या स्थानासंबंधी सर्व प्रश्नांचा निर्णय स्वतःचे समाधान होईल अशा रितीने झाल्याशिवाय व होईपर्यंत ते काम सुरू करू नये असा निदेश देता येईल ;

(घ) लगत पुढील कलमाच्या तरतुदींस अधीन राहून, अर्जदारास अशी परवानगी नाकारता येईल. त्याबाबतची कारणे त्यास लेखी कळविण्यात येतील.

(५) पोट-कलम (४) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही परवानगीनुसार कोणत्याही कामास सुरूवात होण्यापूर्वी, नगरपरिषदेला, अशी परवानगी रद्द करता येईल आणि त्याऐवजी नवीन परवानगी देता येईल किंवा मुख्य अधिकाऱ्यास पोट-कलम (४) अन्वये देता येईल असा इतर कोणताही आदेश काढता येईल.

(६) मुख्य अधिकाऱ्याने पोट-कलम (४) च्या खंड (ग) किंवा (घ) अन्वये त्या पोट-कलमात विहित केलेल्या मुदतीत असा आदेश दिला नाही तर, पोट-कलम (२) अन्वये नोटीस देणारी व्यक्ती, उक्त मुदत संपल्यानंतर पोट-कलम (२) अन्वये ज्या कामाच्या संबंधात अशी नोटीस दिलेली होती ते काम, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, सुरू करण्याचा हक्क असेल, परंतु, अशी रीत या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी किंवा त्याखालील त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही नियमाशी किंवा उप-विधीशी विसंगत नसेल.

(७) पोट-कलम (२) अन्वये ज्यासंबंधी नोटिशीची आवश्यकता आहे असे कोणतेही उद्देशित काम सुरू करण्याचा हक्क पोट-कलम (४), (५) किंवा (६) अन्वये जिला प्राप्त झाला असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, अशा रीतीने काम सुरू करण्याचा हक्क तिला प्रथम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर पोट-कलमे (२) ते (६) यांच्या तरतुदींचे पुन्हा पालन केल्यामुळे तिला याप्रमाणे पुनःहक्क प्राप्त झाला असेल त्याव्यतिरिक्त, ते काम सुरू करणार नाही.

(८) कोणत्याही व्यक्तीने, पोट-कलम (२) अन्वये ज्यासंबंधी नोटीस देण्याची आवश्यकता आहे अशी कोणतीही इमारत बांधण्याचे काम,—

(एक) पोट-कलम (६) अन्वये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, पोट-कलम (४) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने परवानगी दिल्याशिवाय किंवा पोट-कलम (५) अन्वये नगरपरिषदेने परवानगी दिल्याशिवाय; किंवा

(दोन) पोट-कलम (४) च्या खंड (क) अन्वये परवानगी मिळाल्यानंतर पोट-कलमे (२) व (३) अन्वये पुरविलेले नकाशे व माहिती यांच्याविरुद्ध ; किंवा

(तीन) पोट-कलम (४) च्या खंड (ख) अन्वये परवानगी मिळवून उक्त खंडान्वये लादण्यात आलेल्या शर्तींच्या विरुद्ध किंवा पोट-कलमे (२) व (३) अन्वये सादर करावयाचे नकाशे व माहिती यांत अशा शर्तींद्वारे फेरबदल करण्यात आलेले नसताना, उक्त पोट-कलमांन्वये सादर केलेले नकाशे व माहिती यांच्याविरुद्ध परवानगी मिळवून; किंवा

(चार) ज्या वेळेस पोट-कलम (६) अन्वये इमारतीचे बांधकाम सुरू झाले असेल तेव्हा, त्या कलमाच्या तरतुदींविरुद्ध ;

सुरू केले असेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, लेखी नोटिशीद्वारे अशा व्यक्तीस अशी इमारत बांधण्याचे काम बंद करण्यास आणि नोटिशीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अगोदरच बांधण्यात आलेल्या कोणत्याही बांधकामात फेरफार करण्यास किंवा ते पाडून टाकण्यास भाग पाडता येईल. असे कोणतेही बांधकाम पाडून टाकण्यासाठी नोटीस बजावण्यात आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत ते बांधकाम पाडण्याचे काम सुरू झाले नसेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, असे बांधकाम पाडण्याचे काम करून घेता येईल आणि त्यासाठी आलेला खर्च, मालमत्ता कराची देय असलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्याच रीतीने संबंधित व्यक्तीकडून वसूल करण्यायोग्य असेल.

(९) जी व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्याने पोट-कलम (८) अन्वये काढलेल्या नोटिशीचे पालन करण्यात कसूर करील अशी कोणतीही व्यक्ती, अपराध सिद्ध झाल्यानंतर पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र राहील.

(१०) अशा व्यक्तीस सिद्धापराध ठरविणाऱ्या न्यायालयास तिला, मुख्य अधिकाऱ्याच्या आदेशानुसार किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा रीतीने व न्यायालयाने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत ती इमारत पाडून टाकण्याविषयी किंवा त्या इमारतीत फेरफार करण्याविषयी निदेश देता येईल. अशी व्यक्ती, न्यायालयाने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत किंवा न्यायालयास आवश्यक वाटेल त्या रीतीने, ती इमारत पाडून टाकण्यात किंवा तीत फेरफार करण्यात कसूर करील तर, त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर, न्यायालयाच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या आदेश पालनाची मुदत संपल्यानंतर ज्या कालावधीपर्यंत असे उल्लंघन चालू असेल त्या कालावधीतील प्रत्येक दिवसास पंचवीस रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची आणखी शिक्षा होईल.

(११) पोट-कलम (८) किंवा (१०) यातील कोणत्याही गोष्टीमुळे, नगरपरिषदेच्या किंवा मुख्य अधिकाऱ्याच्या, कलम १९५ अन्वये इमारत पाडून टाकण्याविषयीच्या किंवा तीत फेरफार करण्याविषयीच्या अधिकारास बाध येत असल्याचे समजण्यात येणार नाही.

(१२) मुख्य अधिकाऱ्यास, तपासणीच्या आपल्या हेतूची नोटीस न देता पोट-कलम (२) अन्वये ज्याबाबत नोटिशीची आवश्यकता असेल अशा कोणत्याही बांधकामाची कोणत्याही वेळी तपासणी करता येईल ; आणि एखादे काम करण्यात येत असताना कोणत्याही वेळी, लेखी नोटिशींद्वारे, ज्या कोणत्याही गोष्टीमुळे, असे कोणतेही बांधकाम करणे या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीविरूद्ध किंवा या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही उपविधीच्या विरूद्ध किंवा या कलमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाविरूद्ध होत असेल तर, ती गोष्ट विनिर्दिष्ट करता येईल ; आणि असे काम करणाऱ्या व्यक्तीस, कोणत्याही अशा तरतुदीविरूद्ध किंवा उपविधीविरूद्ध किंवा आदेशाविरूद्ध जे काही करण्यात आले असेल ते सुधारण्याची व्यवस्था करण्याविषयी किंवा अशा कोणत्याही तरतुदीनुसार किंवा उपविधीनुसार किंवा आदेशानुसार जी कोणतीही गोष्ट करणे आवश्यक असून करण्यात आलेली नसेल तर ती करण्याविषयी फर्माविता येईल.

**परवानगी नाकारण्याचा मुख्य अधिकाऱ्याचा व नगरपरिषदेचा अधिकार.**

**१९०.** (१) एखाद्या व्यक्तीने इमारत बांधण्याचा आपला हेतू असल्याविषयी लगतपूर्वीच्या कलमाचे पोट-कलम (२) अन्वये मुख्य अधिकाऱ्यास नोटीस दिली असेल तेव्हा, अशा रीतीने अर्ज करून मागितलेली परवानगी मुख्य अधिकाऱ्यास पुढील कारणांवरून नाकारता येईल व त्याने तसे करणे कायदेशीर असेल :—

(एक) ज्या जमिनीवर इमारत बांधण्याचे योजिले असेल ती जमीन संपादन करण्याविषयी नगरपरिषदेचा ठराव संमत केला असेल तर ; किंवा

(दोन) नियोजित बांधकामामुळे, या अधिनियमाच्या तरतुदींचे, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचे किंवा या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखालील कोणत्याही योजनांचे, नियमांचे, उपविधींचे किंवा इतर आदेशांचे उल्लंघन करण्यात आले असेल तर ; किंवा

(तीन) लगतपूर्वीच्या कलमाचे पोट-कलम (२) अन्वये दिलेली नोटीस ही, त्या पोट-कलमाच्या तरतुदींस अनुसरून नसेल किंवा त्या नोटिशीसोबत त्या पोट-कलमान्वये आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे दिलेली नसतील किंवा अशी नोटीस देणाऱ्या व्यक्तीने त्या कलमाच्या पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे पुरविण्यात कसूर केली तर ; किंवा

(चार) ज्या भागात इमारत बांधण्याचे काम करावयाचे असेल अशा भागाकरिता रस्त्यांच्या रेखांकनाचा नकाशा तयार केला नसेल तर ; किंवा

(पाच) इमारतीत प्रवेश करण्यासाठी पुरेशी सोय केली नसेल तर ; किंवा

(सहा) नियोजित बांधकाम हे, शासकीय किंवा नगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमण असेल तर ; किंवा

(सात) मुख्य अधिकाऱ्यास पुरेशी वाटतील अशा इतर कोणत्याही कारणांसाठी, अशी कारणे लेखी नमूद करण्यात येतील ;

अर्ज करून मागितलेली परवानगी जेव्हा नाकारण्यात आली असेल तेव्हा, घेण्यात आलेला निर्णय आणि त्याची कारणे अर्जदारास कळविण्यात येतील.

(२) पोट-कलम (१), खंड (एक) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने नाकारलेली परवानगी पुढील शर्तींच्या अधीन असेल :—

(क) मालमत्ता संपादन करण्यात आली असेल व लगतपूर्वीच्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये नोटीस देणाऱ्या व्यक्तीस द्यावयाच्या भरपाईच्या रकमेसंबंधी कोणतेही करारपत्र झाले नसेल तर, ती परवानगी नाकारण्यात आली नसती तर अशा व्यक्तीस जो संभाव्य फायदा मिळाला असता तो विचारात घेऊन, कलम ३३० च्या तरतुदींनुसार अशी रक्कम ठरविण्यात येईल.

(ख) अशी जमीन संपादन करण्यास सुचवणारा नगरपरिषदेचा ठराव संमत झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत नगरपरिषदेने पैसे भरून करारपत्राने जमीन संपादन केली नसेल तर, किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या तरतुदींअन्वये सक्तीने (१८९४ चा १.) जमीन संपादन करण्यासाठी कार्यवाही चालविण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात आला नसेल तर किंवा नगरपरिषदेने ती जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव रद्द केल्यास यथास्थिति, उक्त सहा महिन्यांची मुदत ज्या दिनांकास संपली असेल त्या दिनांकापासून किंवा ज्या दिनांकास नगरपरिषदेने तो प्रस्ताव सोडून देण्याचा निर्णय घेतला त्या दिनांकापासून, लगतपूर्वीच्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये दिलेली नोटीस पुन्हा देण्यात आली आहे असे समजण्यात येईल. असा निर्णय, नोटीस देण्याऱ्या व्यक्तीस तो घेतल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत कळविण्यात येईल ; आणि नगरपरिषदेने ती जमीन संपादन करण्याविषयीचा ठराव संमत केला नव्हता असे समजून त्या नोटिशीवर कार्यवाही करण्यात येईल. नगरपरिषदेने परवानगी देण्याचे नाकारल्यामुळे उक्त व्यक्ती आपणास जो तोटा झाल्याचे सिद्ध करील त्याबद्दल तिला भरपाई देण्यास नगरपरिषद जबाबदार असेल :

परंतु लगतपूर्वीच्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये द्यावयाची नोटीस अशी जमीन संपादन करण्याविषयी नगरपरिषदेने ठराव संमत केल्यानंतर देण्यात आली असेल तर, नगरपरिषद भरपाई देण्यास जबाबदार असणार नाही.

इमारतींची पातळी.

**१९१.** नेमलेल्या दिवसानंतर, एखादी इमारत बांधावयाची असेल तेव्हा, अशा इमारतीतून करावयाचे जलनि:सारण गटार, त्यावेळी अस्तित्वात असलेल्या किंवा नगरपरिषदेने बांधण्याचे योजिलेल्या एखाद्या सार्वजनिक मलप्रणालात किंवा नाल्यात किंवा एखाद्या ओहोळात किंवा नदीत किंवा समुद्रात किंवा एखाद्या मलकुंडीत किंवा मुख्य अधिकारी मान्य करील अशा इतर योग्य जागेत ज्या पातळीवरून सोडता येईल त्या पातळीपेक्षा कमी पातळीवर ती इमारत बांधण्यात येणार नाही.

इमारतींची छप्परे व बाहेरील भिंती ज्वालाग्राही साहित्यापासून तयार न करणे.

**१९२.** (१) नेमलेल्या दिवसानंतर बांधण्यात आलेल्या किंवा नवीकरण करण्यात आलेल्या इमारतींची बाहेरील छप्परे व भिंती मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीवाचून गवत, लाकूड, कापड, कॅनव्हॉस, पाने, तट्टे किंवा इतर ज्वालाग्राही साहित्यापासून तयार करण्यात येणार नाहीत अशी परवानगी विशेष करून वैयक्तिक बाबतीत किंवा सर्वसाधारणत: तीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत देता येईल.

(२) नगरपरिषदेला उपविधींद्वारे पुढील गोष्टी विहित करता येतील :—

(एक) ज्या क्षेत्रात कोणत्याही ज्वालाग्राही पदार्थापासून इमारतीची बाहेरील छप्परे व भिंती बांधण्यास मुख्य अधिकारी परवानगी देईल अशी क्षेत्रे ;

(दोन) इतर कोणत्याही क्षेत्रात असे बांधकाम करण्यास परवानगी देताना मुख्य अधिकारी घालून देईल अशा शर्ती.

(३) मुख्य अधिकाऱ्यास, ज्या कोणत्याही इमारतीचे बाहेरील छप्पर किंवा भिंत वर सांगितलेले सामान वापरून बांधलेली असेल अशा इमारतीच्या मालकास, लेखी नोटिशीद्वारे, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वाजवी मुदतीत असे छप्पर किंवा भिंत काढून टाकण्याविषयी कोणत्याही वेळी फर्मावता येईल— मग असे छप्पर किंवा अशी भिंत नेमलेल्या दिवसांपूर्वी बांधलेली असो किंवा नसो— आणि ते ती मुख्य अधिकाऱ्याच्या परवानगीने बांधलेली असो किंवा नसो.

(४) पोट-कलम (१) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने दिलेल्या ज्या आदेशान्वये परवानगी नाकारण्यात आली असेल अशा कोणत्याही आदेशाविरूद्ध किंवा पोट-कलम (३) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही नोटिशीविरूद्ध नगरपरिषदेकडे अपील करता येईल ; मात्र असे अपील यथास्थिति, अशी परवानगी नाकारणारा आदेश किंवा नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत केले पाहिजे.

(५) जो कोणी, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या परवानगीवाचून वर सांगितलेले साहित्य वापरून कोणतेही छप्पर किंवा भिंत बांधील किंवा बांधवील किंवा पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या नोटिशी अन्वये ज्या गोष्टी करणे आवश्यक असेल त्या गोष्टींची अवज्ञा करून असे छप्पर किंवा भिंत राहू देईल, त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि असा अपराध चालू राहण्याच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, ज्या कालावधीपर्यंत असा अपराध चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाबद्दल त्यास आणखी पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**१९३.** (१) इमारत बांधणारी प्रत्येक व्यक्ती, अशी इमारत बांधून झाल्यावर एक महिन्याच्या आत अशा इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याची लेखी नोटीस मुख्य अधिकाऱ्यास त्याच्या कार्यालयात देईल किंवा पाठवील किंवा देण्याची किंवा पाठविण्याची व्यवस्था करील आणि अशा इमारतीच्या पाहणीसाठी आवश्यक त्या सर्व सवलती मुख्य अधिकाऱ्यास देईल : बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, भोगवटा किंवा वापर करण्याची परवानगी.

परंतु,—

(क) अशी पाहणी, इमारत पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत सुरू करण्यात येईल ; आणि

(ख) मुख्य अधिकाऱ्यास इमारत पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत इमारत पूर्ण झाल्याची नोटीस ज्या व्यक्तीकडून मिळाली त्या व्यक्तीच्या पत्त्यावर एक लेखी सूचना पाठवून,—

(एक) अशा इमारतीचा भोगवटा करण्याची किंवा अशा इमारतीचा किंवा अशा बांधकामाशी संबंध असलेल्या तिच्या भागाचा वापर करण्याची परवानगी देता येईल ; किंवा

(दोन) अशी इमारत या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या किंवा कलम १८९ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करून बांधण्यात आली असेल तर, अशा बाबतीत अशी परवानगी नाकारता येईल. अशी परवानगी नाकारताना तो त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये नोटीस देणाऱ्या व्यक्तीस अशी परवानगी नाकारण्याची कारणे कळवील. तसेच, मुख्य अधिकाऱ्यास अशा व्यक्तीस किंवा उक्त कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये नोटीस देणारी व्यक्ती अशी नोटीस देण्याच्या वेळी अशी इमारतीचा मालक नसेल तर, अशा इमारतीच्या मालकास या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखालील केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या किंवा कलम १८९ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या कोणत्याही तरतुदीविरुद्ध असलेली कोणतीही गोष्ट सुधारण्यास किंवा अशा अधिनियमान्वये किंवा उपविधीअन्वये किंवा आदेशान्वये जी कोणतीही गोष्ट तिने करणे आवश्यक होते, परंतु जी करावयाची राहून गेली असेल, अशी कोणतीही गोष्ट करण्याविषयी फर्मावील.

(२) कोणत्याही व्यक्तीने,—

(क) पोट-कलम (१), परंतुक (ख) यात उल्लेख केलेली परवानगी मिळेपर्यंत, किंवा

(ख) इमारत पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्यापासून एक महिना पूर्ण होईपर्यंत वर सांगितल्याप्रमाणे परवानगी नाकारल्याचे मुख्य अधिकाऱ्याने कळविले नसेल तर,

अशा कोणत्याही इमारतीचा भोगवटा करणार नाही किंवा करण्याची परवानगी देणार नाही किंवा अशा बांधकामाशी संबंध असलेल्या तिच्या कोणत्याही भागाचा वापर करणार नाही किंवा वापर करण्याची परवानगी देणार नाही.

(३) जो कोणी,—

(क) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेली कोणतीही नोटीस दिल्याशिवाय किंवा पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून अशा कोणत्याही इमारतीचा किंवा

अशा बांधकामाशी संबंध असलेल्या तिच्या भागाचा भोगवटा करील किंवा करण्याची परवानगी देईल ; किंवा

(ख) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा मागणीचे पालन करण्यात कसूर करील, त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल व उल्लंघन किंवा पालन न करणे चालू राहिल्याच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, ज्या कालावधीत असे उल्लंघन किंवा पालन न करणे चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाबद्दल पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

माणसाने राहण्यासाठी असलेली इमारत ही गोदाम, इत्यादी म्हणून न वापरणे किंवा गोदाम वगैरेकरिता असलेली इमारत मनुष्यवस्तीसाठी न वापरणे.

**१९४.** (१) कोणतीही व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय किंवा अशा परवानगीच्या अटींस अनुरूप असेल त्याव्यतिरिक्त—

(एक) जी इमारत मनुष्याच्या वस्तींसाठी तिचा वापर करण्याच्या मूळ उद्देशाने बांधण्यात आली आहे किंवा तसा तिचा वापर प्राधिकृत करण्यात आला आहे अशा कोणत्याही इमारतीचा किंवा तिच्या भागाचा गोदाम, वखार, कर्मशाळा, काम करण्याची जागा, कारखाना, तबेला किंवा मोटारघर म्हणून वापर करणार नाही किंवा वापर करण्यास परवानगी देणार नाही ; किंवा

(दोन) मूलतः मनुष्यवस्तीच्या वापराकरिता न बांधलेल्या किंवा प्राधिकृत न केलेल्या इमारतीच्या कोणत्याही भागाचा त्या प्रयोजनाकरिता वापर करणार नाही किंवा वापर करण्यास परवानगी देणार नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन केले तर, तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि उल्लंघन चालू राहिल्याच्या बाबतीत पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, ज्या कालावधीत असे उल्लंघन चालू राहील त्या कालावधीतील प्रत्येक दिवसाबद्दल आणखी दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

भग्नावस्थेतील किंवा पडण्याचा संभव असलेल्या इमारती, संरचना, वगैरे काढून टाकणे.

**१९५.** (१) कोणतीही इमारत किंवा इतर संरचना किंवा अशा इमारतीवर किंवा संरचनेवर बसविलेली कोणतीही वस्तू भग्नावस्थेत असेल किंवा पडण्याचा संभव असेल किंवा अशा इमारतीत किंवा संरचनेत किंवा तिच्या शेजारच्या इतर कोणत्याही संरचनेत किंवा जागेत राहणाऱ्या, आश्रय घेणाऱ्या किंवा तिच्या जवळून जाणाऱ्या येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस तिच्यापासून कोणत्याही रीतीने धोका आहे असे मुख्य अधिकाऱ्यास कोणत्याही वेळी आढळून आल्यास, अशा इमारतीच्या किंवा संरचनेच्या मालकास किंवा भोगवटादारास, लेखी नोटिशीद्वारे, अशी इमारत, संरचना किंवा वस्तू पाडण्यास, मजबूत करण्यास, काढून टाकण्यास किंवा दुरुस्त करण्यास किंवा यापैकी एक किंवा अनेक गोष्टी करण्यास आणि त्यापासून असलेल्या धोक्याची सर्व कारणे टाळण्यास भाग पाडता येईल.

(२) तसेच, मुख्य अधिकाऱ्यास, जर त्यास योग्य वाटले तर, उक्त मालकास किंवा भोगवटादारास उक्त नोटिशीद्वारे जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांच्या व इतर लोकांच्या संरक्षणासाठी, एकतर ताबडतोब किंवा अशी इमारत, संरचना किंवा वस्तू पाडण्यास, मजबूत करण्यास, काढून टाकण्यास किंवा दुरुस्त करण्यास सुरूवात करण्यापूर्वी, योग्य व पुरेसे उंच फळ्यांचे कुंपण वा इतर कुंपण घालण्यास सांगता येईल.

(३) भग्नावस्थेत किंवा पडण्याचा संभव असलेल्या इमारतीपासून, संरचनेपासून किंवा वस्तूपासून काही घटकेच्या अवधीतच धोका निर्माण होण्यासारखा आहे असे मुख्य अधिकाऱ्यास आढळून आले तर, वर सांगितल्याप्रमाणे नोटीस देण्यापूर्वी किंवा अशा नोटिशीची मुदत संपण्यापूर्वीच तो उक्त संरचनेस कुंपण घालील, ती पाडून टाकील, मजबूत करील किंवा दुरुस्त करील किंवा धोका आटोक्यात आणण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजना करील किंवा आवश्यक असे काम करवून घेईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने केलेला कोणताही खर्च इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून देण्यात येईल, आणि तो खर्च मालमत्ता कराची देय रक्कम ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

**१९६.** जी व्यक्ती,—

(क) मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या संमतीवाचून आणि नगरपालिकेच्या मालमत्तेच्या बाबतीत, मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीवाचून कोणत्याही इमारतीत, भिंतीस, फलकास कुंपणास, मेढीस, खांबास, किंवा दिव्याच्या खांबास किंवा इतर तत्सम वस्तूस किंवा त्यांवर कोणतेही भित्तिपत्रके, मोठी जाहिरात किंवा इतर कागद किंवा जाहिरातीचे साधन चिकटवील ; किंवा इमारत, इत्यादी खराब करण्याबद्दल शास्ती.

(ख) वर सांगितलेल्या प्रकारच्या संमतीवाचून किंवा परवानगीवाचून अशा कोणत्याही इमारतीवर, भिंतीवर, कुंपणावर, मेढीवर, खांबावर, दिव्याच्या खांबावर किंवा तत्सम वस्तूवर खडूने, रंगाने किंवा इतर कोणत्याही रीतीने लिहील, ती मळवील किंवा खराब करील किंवा त्यावर खुणा करील, अशा कोणत्याही व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

१९१० चा ९. **१९७.** मुख्य अधिकाऱ्यास, तेलाच्या किंवा गॅसच्या दिव्यासाठी किंवा भारतीय विद्युत अधिनियम, १९१० याच्या तरतुदींना अधीन राहून, विजेच्या किंवा इतर प्रकारच्या दिव्यांसाठी
१८८५ चा १३. किंवा भारतीय तारायंत्र अधिनियम, १८८५ यांच्या तरतुदींस अधीन राहून, तारायंत्राच्या किंवा दूरध्वनीच्या तारांसाठी किंवा गतियंत्राकरिता लागणाऱ्या विद्युतवाहक तारांसाठी कोणत्याही इमारतीच्या बाहेरच्या बाजूस त्रिकोणी आधार बसविता येईल. असे त्रिकोणी आधार अशा इमारतीत राहणाऱ्या व्यक्तींना किंवा जवळपासच्या इतर कोणत्याही इमारतीत राहणाऱ्या व्यक्तींना किंवा सर्वसामान्य लोकांना कोणतीही गैरसौय किंवा उपद्रव न होईल अशा रीतीने उभे करण्यात येतील किंवा पक्के बसविण्यात येतील. घरांना दिवे, त्रिकोणी आधार, इत्यादी बसविणे.

**१९८.** मुख्य अधिकाऱ्यास आगाऊ नोटीस दिल्यावाचून कोणत्याही व्यक्तीने कोणतीही झोपडी किंवा झोपड्यांची रांग किंवा त्यांचा समूह किंवा नेमलेल्या दिवसाच्या आधीच अस्तित्वात असलेल्या झोपड्यांच्या रांगेत किंवा समूहात आणखी झोपडी उभारणे कायदेशीर ठरणार नाही. मुख्य अधिकाऱ्यास, अशा झोपड्या एका सरळ रेषेत येतील अशा रीतीने व प्रत्येक दोन रांगांच्या समोर व त्यांच्यामध्ये वायुवीजनासाठी व मेहेतर कामासाठी सोयीचे पडण्यासाठी जितकी रुंदी असणे त्यास योग्य वाटेल तितक्या रुंदीचा मोकळा रस्ता किंवा मार्ग सोडण्यास, तसेच जलनिःसारणाची पुरेशी व्यवस्था होऊ शकेल अशा पातळीवर त्या बांधण्यास फर्माविता येईल, आणि अशा झोपड्यांसाठी त्यास आवश्यक वाटतील इतक्या संडासांची व जलनिःसारणाच्या साधनांची तरतूद करण्याविषयी फर्माविता येईल. जर अशी झोपड्यांचे नियमन.

कोणतीही झोपडी किंवा झोपड्यांची रांग अथवा समूह मुख्य अधिकाऱ्यास अशी नोटीस दिल्यावाचून किंवा मुख्य अधिकाऱ्याने फर्माविले असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने बांधण्यात आली असेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, त्यांच्या मालकास किंवा ती बांधणाऱ्या व्यक्तीस किंवा ती ज्या जमिनीवर बांधली असेल किंवा बांधण्यात येत असेल त्या जमिनींच्या मालकास किंवा भोगवटादारास एक लेखी नोटीस देता येईल वअशा नोटिशीद्वारे तीत विनिर्दिष्ट केलेल्या वाजवी मुदतीत ती पाडण्यास व काढून टाकण्यास फर्माविता येईल किंवा स्वच्छताविषयक बाबींचा विचार करून, त्यास योग्य वाटतील असे फेरफार त्यात करण्यास किंवा त्यात भर टाकण्यास फर्माविता येईल.

झोपड्यांची सुधारणा.

**१९९.** (१) ज्या कोणत्याही झोपडीमुळे, मग तिचा राहण्याची जागा म्हणून किंवा इतर कोणत्याही कारणासाठी, उपयोग करण्यात येत असो आणि ती नेमलेल्या दिवशी अस्तित्वात असो किंवा त्यानंतर उभारलेली असो—

(क) अपुरे वायुवीजन किंवा अशी झोपडी ही दाटीने इतर झोपड्यांना लागून असल्यामुळे ; किंवा

(ख) जोत्याच्या अभावी, पुरेशा जोत्याच्या किंवा पुरेशा जलनिःसारणाच्या अभावी ; अथवा

(ग) मेहतर काम करणे अशक्य असल्यामुळे,

आसपासच्या रहिवाश्यांस रोग होण्याचा धोका आहे असे नगरपरिषदेचे मत असल्यास, ती अशा झोपडीच्या ठळक भागावर एक नोटीस लावून तिच्याद्वारे या बाबतीत नगरपरिषदेकडून ठरविण्यात येईल अशा वाजवी मुदतीच्या आत अशी झोपडी पाडून व काढून टाकण्यास किंवा असा धोका टाळण्यासाठी नगरपरिषदेस योग्य वाटतील असे फेरफार किंवा अशी बांधकामे करण्यास अशा झोपडीच्या मालकास किंवा भोगवटादारास किंवा ज्या जमिनीवर अशी झोपडी बांधली असेल त्या जमिनीच्या मालकास भाग पाडील.

(२) अशा कोणत्याही मालकाने किंवा भोगवटादाराने नेमून दिलेल्या वेळेच्या आत अशी झोपडी पाडून वा काढून टाकण्याचे किंवा असे फेरफार किंवा बांधकाम करण्याचे नाकारल्यास किंवा तसे करण्यात हयगय केल्यास, मुख्य अधिकाऱ्यास, नगरपरिषदेच्या आवश्यकतांनुसार अशी झोपडी पाडण्याची किंवा असे फेरफार किंवा अशी बांधकामे पार पाडण्याची व्यवस्था करता येईल.

(३) मुख्य अधिकारी, अशी झोपडी पाडील तेव्हा, तो अशा झोपडीचे सामान विकता येणे शक्य असल्यास ते विकण्याची व्यवस्था करील ; आणि सर्व खर्च वजा जाता विकून आलेली रक्कम झोपडीच्या मालकास देईल किंवा मालक कोण आहे हे माहीत नसल्यास किंवा मालकी हक्काविषयी विवाद असल्यास, अशी रक्कम तिच्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तीस ती देण्याविषयी सक्षम न्यायालयाचा आदेश मिळेपर्यंत, नगरपरिषदेकडे अनामत ठेवील :

परंतु, एखादी झोपडी, बांधण्यात आली त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून ती बांधण्यात आली नसेल व ती या कलमान्वये पाडल्यास किंवा काढून टाकल्यास असा झोपडीच्या मालकास किंवा मालकांना आणखी भरपाई देण्यात येईल व विवाद निर्माण झाल्यास अशा भरपाईची रक्कम कलम ३३० मध्ये तरतूद केलेल्या रीतीने निश्चित करून ठरविण्यात येईल.

## प्रकरण तेरा

## जलनि:सारण

जल-निसारणावर नगरपालिकेचे नियंत्रण.

**२००.** (१) नगरपालिका क्षेत्रातील सर्व मोऱ्या, मलप्रणाल, संडास, शौचकूप, घरांच्या नाल्या, गटारे आणि मलकुंड्या यांची पाहणी व नियंत्रण नगरपरिषदेकडेच राहील.

(२) सर्व झाकलेल्या मोऱ्या, मलप्रणाल व मलकुंड्या यांसाठी, मग ती सार्वजनिक असोत किंवा खाजगी असोत, नगरपरिषद किंवा ती ज्या ज्या व्यक्तींच्या मालकीची असतील त्या त्या व्यक्ती, योग्य जाळीची झाकणे, आच्छादने किंवा वायुवीजनाची इतर साधने पुरवतील व मुख्य अधिकाऱ्यास लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही अशा झाकलेल्या मोऱ्यांच्या, मलप्रणालांच्या किंवा मलकुंड्यांच्या मालकास त्याप्रमाणे तरतूद करण्यास सांगता येईल.

मोऱ्या तयार करण्याचा व दुरुस्त करण्याचा अधिकार.

**२०१.** (१) नगरपरिषदेने कोणत्याही जलनि:सारणाच्या प्रयोजनासाठी कोणतीही मोरी, नाली विवरमार्ग, अध:प्रणाल, नळ किंवा जलप्रवाह कोणत्याही रस्त्याच्या किंवा रस्ता म्हणून किंवा रस्त्याकरिता योजिलेल्या कोणत्याही जागेच्या मधून पलीकडे किंवा खालून किंवा कोणत्याही रस्त्याखाली असलेल्या कोणत्याही भुयाराखालून किंवा कमानीखालून नेणे आणि मालकास किंवा भोगवटादारास वाजवी लेखी नोटीस देऊन नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नेणे, हे कायदेशीर असेल.

(२) नगरपरिषदेस किंवा तिच्या प्राधिकारानुसार काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस ज्या कोणत्याही जमिनीत नगरपरिषदेकडे निहित असलेली कोणतीही मोरी आधीच बांधलेली असेल अशा जमिनीत, अस्तित्वात असलेल्या मोरीच्या जागी नवीन मोरी बांधता येईल किंवा नगरपरिषदेकडे निहित असलेली कोणतीही मोरी दुरुस्त करता येईल किंवा तिच्यात फेरफार करता येईल.

(३) नगरपालिकेच्या मालकीच्या मोऱ्यांत हवा खेळती राहण्यासाठी, नगरपरिषदेस, आवश्यक वाटेल असा कोणताही वायुवीजनाचा दांडा किंवा नळ, कोणत्याही इमारतीवर किंवा जागेवर उभारता येईल किंवा कोणत्याही इमारतींच्या किंवा संरचनेच्या बाहेरील भागास किंवा कोणत्याही झाडासदेखील जोडता येईल आणि असा दांडा किंवा नळ शेजारच्या घराच्या सर्वांत उंच भागावर कमीत कमी सहा फुटांइतक्या उंचीवर नेण्यात येईल. तसेच, ज्या इमारतीस असा दांडा किंवा नळ जोडण्यात आला असेल असा इमारतीच्या किंवा जवळपासच्या इतर कोणत्याही इमारतींच्या भोगवटदारास किंवा सर्वसामान्य लोकांस कोणताही उपद्रव किंवा गैरसोय न होईल अशी रीतीने तो उभारण्यात येईल.

(४) पोटकलमे (१), (२) व (३) याअन्वये कोणत्याही अधिकारांचा वापर करताना कोणतीही अनावश्यक हानी करण्यात येणार नाही आणि अशा अधिकारांचा वापर करताना कोणत्याही व्यक्तीचे नुकसान झाल्यास त्याबद्दल तिला नगरपरिषदेकडून भरपाई दिली जाईल. अशा भरपाईच्या रकमेबद्दल विवाद उत्पन्न झाल्यास, कलम ३३० मध्ये तरतूद केलेल्या रीतीने ती निश्चित करून ठरविण्यात येईल.

(५) नगरपालिकेची कोणतीही मोरी निरुपयोगी किंवा अनावश्यक झाली आहे असे नगरपरिषदेचे मत झाल्यास, तिला तिचा वापर थांबविता येईल, ती बंद करता येईल किंवा नष्ट करता येईल किंवा अशा इतर कोणत्याही मोरीचा उपयोग करण्यास एकतर संपूर्णपणे मनाई करता येईल किंवा घाण पाण्याच्या निचऱ्यासाठी किंवा जमिनीच्या पृष्ठभागावरील निचऱ्यासाठी तिचा उपयोग करण्यास मनाई करता येईल :

परंतु, या कलमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे एखादी व्यक्ती कोणत्याही मोरीचा कायदेशीर वापर करण्यापासून वंचित होत असेल तर, नगरपरिषदेने ज्या मोरीचा वापर थांबविला असेल किंवा ती बंद केली असेल किंवा नष्ट केली असेल किंवा तिचा वापर करण्यास मनाई केली असेल अशा मोरीसारखीच दुसरी एखादी कार्योपयोगी मोरी त्या व्यक्तीच्या वापरासाठी पुरवील.

घरांसाठी जलनिस्सारणाची पुरेशी व्यवस्था आवश्यक ठरविण्याचा अधिकार.

**२०२.** (१) कोणत्याही इमारतीतून किंवा जमिनीतून निचऱ्यासाठी कोणत्याही वेळी मोरीची व्यवस्था केली नसेल किंवा मुख्य अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने मोरीची व्यवस्था झालेली नसेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, [१][अध्यक्षाच्या नियंत्रणास] अधीन राहून, मालकास लेखी नोटीस देऊन, त्याद्वारे, अशा इमारतीतील किंवा जमिनीतील पाण्याचा,—

(क) अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या कोणत्याही भागापासून पन्नास फुटांच्या आत एखादी सोयीस्कर मोरी किंवा मलप्रणाल असल्यास त्या मोरीत किंवा मलप्रणालात, अथवा

(ख) मुख्य अधिकाऱ्याने मान्य करावयाच्या आणि अशा मालकाने पुरवावयाच्या, झाकलेल्या मलकुंडीत,

निःस्सारण करण्यासाठी मुख्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशा आकाराची व अशा सामग्रीपासून बनविलेली व अशा पातळीवर व असा उतार असलेली मोरी किंवा नळ त्या इमारतीपासून किंवा जमिनीपासून बांधण्यात किंवा टाकण्यास मालकास फर्माविता येईल.

(२) मुख्य अधिकाऱ्यास, [२][अध्यक्षाच्या नियंत्रणास] अधीन राहून, अशा इमारतीच्या मालकास, लेखी नोटिशीद्वारे तो निदेश देईल तशी सामग्री वापरून व त्या रीतीने दोन किंवा अधिक इमारतींच्या मधील आवार, गल्ली किंवा रस्ता फरसबंद करण्यास फर्माविता येईल.

(३) जो कोणी, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने दिलेल्या नोटिशीचे पालन करण्यात कसूर करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल व अशा अपराध चालू राहण्याच्या बाबतीत पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, ज्या मुदतीत असा अपराध चालू राहील त्या मुदतीत प्रत्येक दिवसाबद्दल आणखी दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

जलनिस्सारणाची व्यवस्था केल्यावाचून नवीन इमारत न बांधणे.

**२०३.** (१) कोणतीही इमारत बांधणे किंवा पुन्हा बांधणे किंवा नव्याने बांधलेली किंवा पुन्हा बांधलेली कोणतीही इमारत भोगवट्यात आणणे किंवा भोगवट्यात आणण्यास परवानगी देणे, हे—

(क) उपविधीअन्वये आवश्यक असेल त्याआकाराची, सामग्रीची व प्रकारची, तसेच अशा पातळीवर व असा उतार असलेली किंवा नगरपरिषदेने कोणतेही उपविधी तयार केले नसतील तर, अशा इमारतीतील पाणी पूर्णपणे निघून जाण्यासाठी मुख्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशी मोरी बांधल्यावाचून व बांधण्यात येईपर्यंत ;

(ख) अशा इमारतीमधील व जमिनीमधील निःस्सारण करावयाचे पाणी गोळा करण्यासाठी व जमा करण्यासाठी व ते उक्त इमारतीमधून व उक्त जमिनीमधून वाहून नेण्यासाठी आणि

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४, याच्या कलम २४ द्वारे "नगरपालिकेच्या नियंत्रणास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या क्रमांक ४ याच्या कलम २४ द्वारे "नगरपालिकेच्या नियंत्रणाच्या अधीन" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उक्त इमारतीतील व तिच्याशी जोडण्यात आलेल्या प्रत्येक वस्तूमधील सांडपाणी पूर्णपणे धुऊन काढण्यासाठी अशी इमारत व त्या इमारतीत लागून असलेली जमीन यांच्यासाठी व त्यांमध्ये उपविधीद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे किंवा नगरपरिषदेने कोणतेही उपविधी तयार केले नसतील तर, मुख्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशी सर्व उपयंत्रे व जोडण्या यांची तरतूद करण्यात व ती बसविण्यात आल्यावाचून व येईपर्यंत ;

कायदेशीर असणार नाही.

(२) वर सांगितल्याप्रमाणे बांधावयाच्या मोरीचे पाणी अशा इमारतीपासून पन्नास फुटांपेक्षा अधिक अंतरावर नसेल अशा नगरपालिकेच्या मोरीत किंवा जलनि:सारणासाठी नगरपरिषदेने निराळ्या राखून ठेवलेल्या एखाद्या जागेत सोडण्यात येईल. परंतु, अशा अंतराच्या आत अशी कोणतीही मोरी किंवा जागा नसेल तर, अशा मोरीचे पाणी, अशा इमारतीच्या मालकाने बांधलेल्या व मुख्य अधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या मलकुंडीत सोडण्यात येईल.

इमारतींच्या किंवा जमिनीच्या मालकाचा व भोगवटादाराचा मोरीचे पाणी नगरपालिकेच्या मोऱ्यांत सोडण्याचा अधिकार.

**२०४.** (१) नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास किंवा भोगवटदारास आपल्या मोऱ्यांचे पाणी नगरपालिकेच्या मोऱ्यांत सोडण्याचा हक्क असेल :

परंतु, तसे करण्यापूर्वी तो मुख्य अधिकाऱ्याची लेखी परवानगी मिळवील, आणि नगरपरिषदेकडे निहित नसलेल्या मोऱ्या तिच्याकडे निहित असलेल्या मोऱ्यांना जोडण्याची पद्धती व त्यावरील अधीक्षण यासंबंधी कोणतेही उपविधी असल्यास, त्यांच्या तरतुदीस अधीन राहून, मुख्य अधिकारी विहित करील त्या शर्ती तो पाळील.

(२) पोट-कलम (१) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध नगरपरिषदेकडे अपील करता येईल. मात्र असे अपील, आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत केलेले असेल.

इतर व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीतून किंवा मोऱ्यांतून सांडपाणी नेण्याचा अधिकार.

**२०५.** (१) कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास आपली इमारत किंवा जमीन अन्य कोणत्याही व्यक्तींच्या मालकीच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या भोगवट्यात असलेल्या किंवा वापरात असलेल्या जमिनीतून मोरी बांधून किंवा अशा प्रकारच्या मोरीशी जोडून नगरपालिकेच्या कोणत्याही मोरीशी जोडावयाची इच्छा असेल तर, त्यास त्याबाबत मुख्य अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करता येईल.

(२) त्यानंतर, मुख्य अधिकाऱ्यास, [१][अध्यक्षाच्या नियंत्रणास] अधीन राहून, अशा अर्जासंबंधी कोणतीही हरकत असल्यास ती नमूद करण्यास अशा इतर व्यक्तीस वाजवी संधी देऊन व कोणतीही हरकत घेण्यात न आल्यास किंवा घेण्यात आलेली कोणतीही हरकत त्याच्या मते पुरेशी नसल्यास, भाडे वा भरपाई देण्याबाबत व उक्त मोऱ्या सुस्थितीत राखणे, दुरुस्त करणे, पाण्याने धुऊन काढणे, साफ करणे, व रिकाम्या करणे यासंबंधी संबंधित पक्षकारांच्या जबाबदाऱ्यांबाबत, त्यास योग्य व न्याय वाटतील अशा शर्तीवर व अशा रीतीने अर्जदारास, यथास्थिति, आपली मोरी अशा जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नेण्यासाठी किंवा उक्त मोरीत सोडण्यासाठी लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत करता येईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४, याच्या कलम २५ द्वारे "नगरपालिकेच्या नियंत्रणास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) अशा प्रत्येक आदेशान्वये तो, ज्या व्यक्तीच्या नावे काढण्यात आला असेल त्या व्यक्तीस किंवा या प्रयोजनासाठी तिने नेमलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा इतर व्यक्तीस, उक्त आदेशात विनिर्दिष्ट केलेली भरपाईची रक्कम किंवा काही भाडे असल्यास, ते उक्त जमिनींच्या किंवा मोरीच्या मालकास, भोगवटादारास किंवा वापर करणाऱ्यास दिल्यानंतर किंवा देऊ केल्यानंतर आणि उक्त आदेशातील शर्ती शक्य तेथवर अन्यथा पूर्ण केल्यानंतर व अशा मालकास किंवा भोगवटादारास किंवा वापर करणाऱ्यास वाजवी लेखी नोटीस दिल्यानंतर, अशा आदेशात निर्दिष्ट केलेल्या जमिनींवर मदतनीस व कामगार घेऊन सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करण्याचा व या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, पुढील गोष्टी करण्यासाठी आवश्यक असतील अशी व सर्व कामे करण्याचा पुरेसा प्राधिकार प्राप्त झालेला असेल :—

त्या गोष्टी पुढीलप्रमाणे असतील,—

(क) उक्त आदेशान्वये प्राधिकृत करण्यात येईल अशी मोरी बांधणे किंवा जोडणे ;

(ख) वेळोवेळी आवश्यक असेल त्याप्रमाणे तिचे नूतनीकरण करणे, दुरुस्त करणे किंवा तीत फेरफार करणे ; अथवा

(ग) उक्त मोरी किंवा तिचा कोणताही भाग सुस्थितीत राखणे, दुरुस्त करणे, पाण्याने धुऊन काढणे, साफ करणे किंवा रिकामा करणे याबाबत अशा आदेशाच्या अटींनुसार त्याच्यावर असलेली कोणतीही जबाबदारी पार पाडणे.

(४) या कलमान्वये कोणतेही काम पार पाडताना शक्य तितकी कमी हानी होईल हे पाहिले जाईल व ज्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या फायद्यासाठी असे काम करण्यात येईल त्या इमारतींचा किंवा जमिनींचा मालक किंवा भोगवटादार,—

(क) असे काम शक्य तितक्या त्वरेने पार पाडण्याची व्यवस्था करील ;

(ख) उक्त काम पार पाडण्यासाठी जी जमीन किंवा कोणत्याही इमारतीचा किंवा इतर बांधकामाचा जो कोणताही भाग उखडला, फोडला किंवा काढला असेल तो, शक्य तितक्या लवकर, आपल्या स्वतःच्या खर्चाने भरून काढील त्याची भरपाई करील व पूर्ववत करून देईल ; आणि

(ग) उक्त काम पार पाडल्यामुळे ज्या व्यक्तीचे नुकसान होईल तिला भरपाई देईल.

ज्या जमिनीतून मोरी काढण्यात आली आहे त्या जमिनीच्या मालकाचे त्यानंतर त्या जमिनीवर इमारत बांधण्याबाबतचे अधिकार.

**२०६.** ज्या कोणत्याही जमिनीत, जमिनीतून किंवा जमिनीखालून कोणतीही मोरी, त्या जमिनीवर इमारत बांधलेली नसतांना लगतपूर्ववर्ती कलमान्वये काढण्यात आली असेल, अशा जमिनीच्या मालकाची जर पुढे कोणत्याही वेळी त्या जमिनीवर इमारत बांधण्याची इच्छा असेल तर, [1][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, मुख्य अधिकारी, तो अशी इमारत बांधण्यास मंजुरी देत असल्यास तो, ज्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या फायद्यासाठी ती मोरी बांधण्यात आली असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास किंवा त्याच्या भोगवटदारास लेखी नोटीस देऊन अशा नोटिशीद्वारे नियोजित इमारत बांधता यावी किंवा तिचा सुरक्षितपणे उपभोग घेता यावा या दृष्टीने, त्यास आवश्यक वाटेल अशा रीतीने ती मोरी बंद करण्यास, काढून टाकण्यास किंवा वळविण्यास तसेच अशी जमीन भरून काढण्यास व पूर्ववत करून देण्यास फर्मावील.

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४, याच्या कलम २६ अन्वये "नगरपालिकेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२०७.** (१) जेव्हा मुख्य अधिकाऱ्याच्या मते, कोणत्याही इमारतीत किंवा कोणत्याही जमिनीवर कोणतेही संडास किंवा मलकुंडी किंवा जादा संडास किंवा मलकुंड्या यांची तरतूद करणे आवश्यक असेल किंवा ज्या कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात जलधौत शौचकूपांची पद्धत चालू करण्यात आली आहे अशा कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात, कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर जलधौत शौचकूपांची किंवा अशा जादा शौचकूपांची तरतूद करणे किंवा अस्तित्वात असलेल्या संडासांच्या बदली त्याच्या मते आवश्यक असतील इतके जलधौत शौचकूप बांधणे आवश्यक असेल तर, त्यास [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, लेखी नोटिशीद्वारे, त्यास योग्य वाटेल अशा जागी योग्य वाटतील तितके संडास, मलकुंड्या किंवा शौचकूप यांची तरतूद करण्याविषयी किंवा अस्तित्वात असलेल्या संडासांच्या बदली जलधौत शौचकूप बांधण्याविषयी त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास फर्माविता येईल. संडास, वगैरेची तरतूद.

(२) मुख्य अधिकाऱ्यास, [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, ज्या कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी वीसपेक्षा अधिक कामगार किंवा मजूर कामावर लावले असतील किंवा जी कोणतीही व्यक्ती किंवा ज्या कोणत्याही व्यक्ती, कोणत्याही बाजाराचे, शाळेचे, नाट्यगृहाचे किंवा इतर सार्वजनिक स्थळाचे मालक असतील किंवा त्यांची व्यवस्था पाहत असतील अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींनी लेखी नोटीस देऊन, त्या नोटिशीद्वारे तो निदेश देईल अशा जागी, अशा संडासांची किंवा जलधौत शौचकूपांची तरतूद करण्याविषयी आणि ती योग्य स्थितीत ठेवण्याची व दररोज साफ करण्याची व्यवस्था करण्याविषयी त्या व्यक्तींना फर्माविता येईल.

(३) मुख्य अधिकाऱ्यास, [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, ज्या कोणत्याही जमिनीवर संडास किंवा जलधौत शौचकूप असेल त्या जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन त्या नोटिशीद्वारे, असे संडास किंवा जलधौत शौचकूप जाणाऱ्या-येणाऱ्या किंवा जवळपास राहणाऱ्या लोकांना दिसणार नाही अशा रीतीने पुरेसे छप्पर व भिंत किंवा कुंपण घालून त्यास आडोसा करण्याविषयी फर्माविता येईल. तसेच, त्यास ज्या कोणत्याही संडासाचे किंवा जलधौत शौचकूपाचे दार किंवा झडप कोणत्याही सडकेवर उघडत असेल व त्यापासून उपद्रव होतो असे त्यास वाटत असेल अशा दारात किंवा झडपेत तो निदेश देईल त्याप्रमाणे बदल करण्याविषयी अशा मालकास किंवा अशा भोगवटादारास फर्माविता येईल.

**२०८.** (१) एखाद्या नगरपालिका क्षेत्रातील सर्व मोऱ्या, संडास, जलधौत शौचकूप, घरांच्या नाल्या, गटारे व मलकुंड्या आणि सर्व प्रकारची जलनिःसारणाची कामे ही नगरपरिषदेच्या खर्चाने बांधलेली नसतील तर, ती ज्या जमिनीत किंवा इमारतीत असतील किंवा ती ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या उपयोगासाठी बांधली असतील किंवा चालू ठेवली असतील त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकांच्या खर्चाने त्यात फेरफार करण्यात येईल, ती दुरुस्ती करण्यात येतील किंवा चांगल्या स्थितीत ठेवण्यात येतील ; आणि मुख्य अधिकाऱ्यास, [२][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, अशा कोणत्याही मालकास लेखी नोटीस देऊन, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने त्यात फेरफार करण्याविषयी, ती दुरुस्त करण्याविषयी व चांगल्या स्थितीत ठेवण्याविषयी फर्माविता येईल. मोऱ्या, इत्यादी चांगल्या स्थितीत ठेवण्याविषयी अथवा संडास किंवा मलकुंडी पाडून टाकण्याविषयी किंवा बंद करण्याविषयी मालकास फर्माविण्याचा अधिकार.

[१] १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम २७ अन्वये " नगरपालिकेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ व २९ द्वारे " नगरपालिकेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) जमिनीच्या किंवा इमारतीच्या अशा प्रत्येक मालकाने, अशा मोऱ्या, संडास, जलधौत शोचकूप, घरांच्या नाल्या, गटारे आणि मलकुंड्या या नगरपालिकेच्या अभिकरणाद्वारे किंवा मुख्य अधिकारी संमत करील अशा इतर अभिकरणाद्वारे आणि तो फर्मावील अशा कालांतराने, साफ करवून घेण्याची व्यवस्था करणे हे अशा प्रत्येक मालकाचे कर्तव्य असेल.

(३) मुख्य अधिकाऱ्यास, [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, नेमलेल्या दिवसापूर्वी किंवा त्या दिवसानंतर बांधलेला जो कोणताही संडास किंवा मलकुंडी त्याच्या मते उपद्रवकारक असेल किंवा मेहतर कामासाठी दुर्गम अशा रीतीने बांधला असेल किंवा योग्य प्रकारे साफ करणे किंवा चांगल्या स्थितीत ठेवणे अशक्य होत असेल असा संडास किंवा मलकुंडी लेखी नोटीस देऊन पाडून टाकण्याविषयी किंवा बंद करण्याविषयी मालकास फर्मावता येईल.

खाजगी मोऱ्या व मलकुंड्या बंद करण्याचा अधिकार.

**२०९.** नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही इमारतीची किंवा जमिनीची मोरी कोणत्याही मलकुंडीस किंवा नगरपालिकेच्या मोरीस किंवा जलनिःसारण करण्यासाठी अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही इतर जागेस जोडलेली असेल आणि अशी मोरी अशा इमारतीतील किंवा जमिनीतील जलनिःसारण होण्यास पुरेशी असली व अन्यथा हरकत घेण्याजोगी नसली तरीही ती मुख्य अधिकाऱ्याच्या मते अशा वस्तीतील सर्वसाधारण जलनिःसारणाच्या पद्धतीची जुळणारी नसेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, अशा इमारतीतील किंवा जमिनीतील जलनिःसारण तितक्याच परिणामक्षम रीतीने ज्यायोगे करता येईल अशा मोरीची किंवा मोऱ्यांची किंवा मलकुंडीची तरतूद केल्यानंतर अशी मोरी, अशी मलकुंडी किंवा नगरपालिकेची मोरी मग ती नगरपरिषदेकडे निहित असलेल्या जमिनीवर असो वा नसो—बंद करता येईल, आणि वर सांगितल्याप्रमाणे [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, त्या प्रयोजनासाठी आवश्यक असे कोणतेही काम करता येईल.

नगरपालिकेच्या मोऱ्यांवर अतिक्रमण.

**२१०.** (१) मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी संमतीवाचून कोणतीही व्यक्ती,—

(एक) नगरपरिषदेकडे निहित असलेल्या मोऱ्यांपैकी कोणत्याही मोरीत कोणतीही मोरी सोडणार नाही किंवा सोडण्याची व्यवस्था करणार नाही किंवा त्यातून कोणतीही मोरी काढणार नाही किंवा काढण्याची व्यवस्था करणार नाही; अथवा

(दोन) नगरपरिषदेकडे निहित असलेल्या कोणत्याही मोरीवर, अधःप्रणालावर किंवा गटारावर कोणतीही इमारत बांधणार नाही.

(२) मुख्य अधिकाऱ्यास, लेखी नोटिशीद्वारे, कोणत्याही व्यक्तीस,—

(एक) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून बांधलेली कोणतीही मोरी त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे पाडून टाकण्याविषयी, तिच्यात फेरफार करण्याविषयी, ती पुन्हा बांधण्याविषयी किंवा त्याबाबत अन्यथा तिची व्यवस्था लावण्याविषयी फर्मावता येईल ; अथवा

(दोन) पोट-कलम (१) चे उल्लंघन करून बांधलेली कोणतीही इमारत किंवा तिचा भाग पाडून टाकण्याविषयी किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे तिची अन्यथा व्यवस्था करण्याविषयी फर्मावता येईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ याच्या कलम २८ व २९ द्वारे "नगरपालिकेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२११.** (१) नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही जमिनीवरील कोणतीही मोरी, संडास, जलधौत शौचकूप, घराची नाली किंवा मलकुंडी नगरपरिषदेच्या संमतीवाचून किंवा नगरपरिषदेचे आदेश, निदेश किंवा उपविधी यांच्याविरुद्ध किंवा ती बांधली, पुन्हा बांधली किंवा उघडली त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींविरुद्ध ती अशा प्रकारे बांधली, पुन्हा बांधली किंवा उघडली असेल तर, मुख्य अधिकाऱ्यास, [1][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे लेखी नोटिशीद्वारे अशी कोणतीही मोरी, संडास, जलधौत शौचकूप, घराची नाली किंवा मलकुंडी पाडून टाकण्याविषयी किंवा त्यात फेरफार अथवा सुधारणा करण्याविषयी फर्मावित येईल.

प्राधिकारावाचून बांधलेल्या पुन्हा बांधलेल्या किंवा उघडलेल्या मोऱ्या इत्यादी संबंधी अधिकार.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) अन्वये मुख्य अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही नोटिशीचे पालन करण्यात कसूर करील, तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**२१२.** (१) मुख्य अधिकाऱ्यास, भोगवटादारास योग्य नोटीस दिल्यानंतर कोणतीही मोरी, संडास, जलधौत शौचकूप, घराची नाली, गटार किंवा मलकुंडी यांची तपासणी करता येईल आणि त्या प्रयोजनासाठी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत कोणत्याही वेळी कोणत्याही जमिनीवर किंवा इमारतीमध्ये त्याचे मदतनीस व कामगार यांच्यासह प्रवेश करता येईल आणि त्यास किंवा त्यांना योग्य वाटेल त्या ठिकाणी शक्य तितके कमी नुकसान होईल अशी काळजी घेऊन जमीन किंवा कोणतीही इतर संरचना उघडून घेता येईल किंवा फोडून घेता येईल.

मोरी, वगैरे यांची तपासणी.

(२) अशा तपासणीचा आणि अशी कोणतीही जमीन किंवा संरचना बंद करविण्याचा किंवा दुरूस्त करून पूर्ववत नीट करविण्याचा खर्च, नगरपरिषद करील. मात्र अशी मोरी, संडास, जलधौत शौचकूप, घराची नाली, गटार किंवा मलकुंडी ही नादुरुस्त किंवा वाईट स्थितीत असल्याचे आढळून येईल किंवा तो असे बांधकाम करण्यात आले त्यावेळेस अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही उप-विधींच्या तरतुदींचा किंवा आदेशाचा भंग करून किंवा अशा बांधकामासंबंधी दिलेल्या आदेशाचा भंग करून बांधण्यात आल्या असतील तर, उक्त खर्च नगरपरिषद सोसणार नाही व अशा बाबतीत असा खर्च, अशी मोरी, संडास, जलधौत शौचकूप, घराची नाली, गटार किंवा मलकुंडी यांच्या मालकाकडून देण्यात येईल व तो मालमत्ता कराबद्दल येणे असलेली रक्कम ज्या रीतीने वसूल केली जाते त्याच रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

**२१३.** (१) नगरपरिषदेस योग्य वाटेल तर, या प्रकरणाच्या पूर्ववर्ती तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीन्वये जे काम करण्याविषयी तिला किंवा तिच्यावतीने आदेश देता येतील असे कोणतेही काम, ते अन्यथा ज्या व्यक्तीने करावयास पाहिजे होते तिला ते करण्याचा पहिल्या प्रथम विकल्प न देता आपल्या स्वतःच्या आदेशानुसार नगरपालिकेच्या किंवा इतर कोणत्याही अभिकरणामार्फत करवून घेता येईल.

नगरपरिषदेस विवक्षित कामें संबंधित व्यक्तींना ती करण्याचा विकल्प न देता स्वतः करता येतील.

(२) अशा रीतीने केलेले कोणतेही काम नगरपालिकेच्या निधीतून खर्च करून पार पाडण्याविषयी नगरपरिषदने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे किंवा ठरावाद्वारे मंजुरी दिली नसेल तर, अशा कामाचा खर्च उपरोक्त व्यक्ती देईल.

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४, याच्या कलम २८ व २९ द्वारे "नगरपालिकेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नगरपरिषदेने बांधलेले नळ, वगैरे नगरपालिकेची मालमत्ता असणे.

२१४. कोणत्याही खाजगी इमारतीच्या किंवा जमिनीच्या जलनि:सारणासाठी लागणारे किंवा त्याच्याशी जोडलेले कोणतेही नळ, जोडण्या, पात्रे किंवा इतर साधने ही जर नगरपरिषदेच्या खर्चाने पुरविण्यात, बांधण्यात किंवा उभारण्यात आली असतील तर आणि नगरपरिषदेने त्यामधील आपला हितसंबंध अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाकडे हस्तांतरित केला नसेल तर, नगरपालिकेची मालमत्ता आहे असे समजण्यात येईल.

## प्रकरण चौदा

## पाणीपुरवठा

नगरपालिकेच्या जलव्यवस्था केंद्रास हानिकारक ठरतील अशी विवक्षित कृत्ये करण्यास मनाई.

२१५. (१) ज्यामधून नगरपालिकेच्या जलव्यवस्था केंद्रासाठी अथवा नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांच्या वापरासाठी पाणी घेण्यात येत असेल अशा तलावाच्या, तळ्याच्या, विहिरीच्या किंवा जलाशयाच्या जल विभाजक क्षेत्राच्या सीमा नगरपरिषदेस संचालकाच्या मंजुरीने आखून देता येतील व त्या अधिसूचित करता येतील.

(२) नगरपरिषेदेच्या परवानगीवाचून कोणतीही व्यक्ती,—

(क) अशा सीमांत कोणत्याही प्रयोजनार्थ कोणतीही इमारत बांधणार नाही ;

(ख) अशा जल विभाजक क्षेत्राची सीमाचिन्हे काढून टाकणार नाही, त्यात फेरफार करणार नाही, त्यांना हानी पोचविणार नाही, त्यांना नुकसान पोचविणार नाही किंवा त्यात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही ;

(ग) उक्त सीमांत आधीच अस्तित्वात असलेल्या कोणत्याही इमारतीत वाढ करणार नाही, तीत फेरफार करणार नाही किंवा तिचा यापूर्वी ज्यासाठी उपयोग करण्यात येत होता त्याव्यतिरिक्त निराळ्या प्रयोजनासाठी उपयोग करणार नाही; किंवा

(घ) उक्त सीमांत कोणत्याही रीतीने वस्तूनिर्माणविषयक, व्यापरविषयक किंवा शेतीविषयक कोणतेही काम चालू ठेवणार नाही; किंवा ज्यायोगे असा कोणताही तलाव, तळे, विहीर किंवा जलाशय किंवा त्याचा कोणताही भाग त्याला नुकसान पोहोचेल किंवा कोणत्याही अशा तलावातील, तळ्यातील, विहिरीतील किंवा जलाशयातील पाणी दूषित होईल किंवा कमी आरोग्यप्रद होईल अशा रीतीने कोणतेही कृत्य करणार नाही.

(३) मुख्य अधिकाऱ्याच्या परवानगीवाचून कोणतीही व्यक्ती,—

(क) ज्यामुळे कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रातील पाणी कोणत्याही प्रकारे दूषित किंवा खराब होईल किंवा त्याच्या गुणधर्मात बदल होईल असे काहीही अशा जलव्यवस्था केंद्रात किंवा त्यावर पाझरु देणार नाही, निचरा होऊ देणार नाही किंवा आणू देणार नाही किंवा असे कोणतेही कृत्य करु देणार नाही ;

(ख) कोणत्याही अशा जलव्यवस्था केंद्रास लागून असलेल्या किंवा त्याचा भाग असलेल्या कोणत्याही नगरपालिकेच्या जमिनीत खणून किंवा तिच्यावर कोणताही पदार्थ साठवून तिच्या पृष्ठभागात कोणताही फेरफार करणार नाही ;

(ग) अशा जलव्यवस्था केंद्रातील पाण्यात कोणतेही जनावर घालणार नाही किंवा शिरू देणार नाही ;

(घ) अशा जलव्यवस्था केंद्राजवळ किंवा त्यात स्नान करणार नाही ;

(ङ) अशा जलव्यवस्था केंद्रातील पाण्यात किंवा पाण्यावर कोणतीही वस्तू फेकणार नाही किंवा टाकणार नाही ;

(च) अशा जलव्यवस्था केंद्रात किंवा त्याच्याजवळ कोणतेही जनावर किंवा कोणतीही वस्तू घालणार नाही किंवा धुऊ देणार नाही.

(४) जो कोणी, पोट-कलम (२) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर एक महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची किंवा शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

१९६० चा ४५. (५) जो कोणी, पोट-कलम (३) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील, त्याने भारतीय दंड संहितेच्या कलम २७७ अनुसार शिक्षेस पात्र असा अपराध केल्याचे समजण्यात येईल.

(६) जेव्हा कोणत्याही व्यक्तीस पोट-कलम (४) अन्वये सिद्धापराध ठरविण्यात आले असेल तेव्हा, तिला सिद्धापराध ठरविणाऱ्या दंडाधिकाऱ्याला ज्या बाबतीत अपराध सिद्ध झाला आहे अशी कोणतीही इमारत ताबडतोब पाडून टाकण्याचा किंवा अशा जमिनीवरील काम किंवा तिचा उपयोग करण्याचे ताबडतोब बंद करण्याचा आदेश देता येईल.

(७) पोट-कलम (६) अन्वये दिलेल्या आदेशाचे पालन न केल्यास किंवा त्याची अंमलबजावणी करण्यास प्रतिकार केल्यास, अपराध्याला अपराध सिद्ध झाल्यानंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची किंवा तीनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

जलव्यवस्था केंद्राबाबत हेतुपुरस्सर किंवा निष्काळजीपणाची कृत्ये करण्यास मनाई.

**२१६.** (१) कोणतीही व्यक्ती हेतुपुरस्सर किंवा निष्काळजीपणे—

(क) नगरपरिषदेच्या मालकीच्या कोणत्याही मीटरला किंवा अशा मीटरच्या कोणत्याही जोडणीला हानी पोचवणार नाही किंवा पोचवू देणार नाही ;

(ख) कोणत्याही नगरपालिका जलव्यवस्था केंद्रास लावलेले कोणतेही कुलूप, मोहोर, तोटी, झडप, नळ, इतर काम, इंजिन, टाकी किंवा जोडणी यांची मोडतोड करणार नाही, त्यांना हानी पोचवणार नाही अगर ती उघडणार नाही ;

(ग) नगरपालिकेच्या जलव्यवस्था केंद्रातील किंवा त्यातून काढलेले पाणी वाया जाईल अशा रीतीने कोणतेही कृत्य करणार नाही किंवा करू देणार नाही ;

(घ) पाण्याच्या कोणत्याही मोठ्या नळात अथवा वाहिनीत अडथळा आणणार नाही, ती दुसरीकडे वळवणार नाही किंवा कोणत्याही रीतीने त्यांना हानी पोचवणार नाही किंवा त्यात फेरफार करणार नाही ;

(ङ) मुख्य अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये पुरविण्यात आलेले कोणतेही कुलूप उघडणार नाही, तोडणार नाही अथवा त्यास हानी पोचवणार नाही किंवा ते बिघडवणार नाही ;

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

पाणीपुरवठ्याच्या साधनांजवळ मोऱ्या वगैरे बांधण्यास मनाई.

**२१७.** (१) मुख्य अधिकाऱ्यास, लेखी नोटिशीद्वारे ज्या मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या जमिनीवर कोणतीही मोरी, संडास, जलधौत शौचकूप, मलकुंडी किंवा इतर घाण अथवा कचरा साठविण्याची पात्रे ही ज्यामधून सार्वजनिक वापरासाठी पाणी घेण्यात येत असेल किंवा घेता येईल असा कोणताही झरा, विहीर, ओढा, पाट, तलाव, जलाशय यांच्यापासून किंवा अन्य साधनांपासून त्यावेळी उपविधीमध्ये विहित केलेल्या अंतराच्या आत असतील आणि त्यांची

स्थिती अशी असेल की, त्यामुळे पाण्याच्या साधनास हानी होण्याचा किंवा तेथील पाणी दूषित होण्याचा संभव असेल तर, नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत, अशी मोरी, संडास, जलधौत शौचकूप, मलकुंडी किंवा इतर घाण अथवा कचरा साठविण्याची पात्रे काढून टाकण्यास किंवा बंद करण्यास फर्माविता येईल.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या नोटिशीचे पालन करण्यात कसूर करील त्याला अपराध सिद्ध झाल्यानंतर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि असा अपराध चालू राहिल्याच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, ज्या मुदतीत असा अपराध चालू राहिला त्या मुदतीच्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पाच रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

पाण्याचे मोठे नळ पुढे नेण्यासंबंधी अधिकार.

**२१८.** पाणीपुरवठा मिळविण्याच्या किंवा अधिक पाणीपुरवठा मिळविण्याच्या किंवा त्याचे वाटप करण्याच्या प्रयोजनांसाठी नगरपरिषदेच्या क्षेत्रात किंवा अशा क्षेत्राबाहेर पाण्याचे मोठे नळ व नळ वाहिनी पुढे नेण्यासाठी, नवीन करण्यासाठी, दुरूस्त करण्यासाठी, त्यांत फेरफार करण्यासाठी आणि तपासण्यासाठी, नगरपरिषदेस नगरपालिका क्षेत्रातील मोऱ्या पुढे नेण्यासाठी, नवीन करण्यासाठी, दुरूस्त करण्यासाठी, त्यात फेरफार करण्यासाठी व त्या तपासण्यासाठी यात यापूर्वी असलेल्या तरतुदींनुसार जे अधिकार आहेत व ज्या निर्बंधास ती अधीन आहे तेच अधिकार असतील व त्याच निर्बंधांस ती अधीन राहील.

पाणीपुरवठा घेणे आवश्यक ठरविण्याचा अधिकार.

**२१९.** कोणत्याही वेळी, नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही इमारतीत अगर जमिनीस संरक्षित पाण्याचा योग्य पुरवठा होत नाही असे मुख्य अधिकाऱ्यास आढळून आल्यास, त्यास [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास, पट्टेदारास किंवा भोगवटादारास लेखी नोटिशीद्वारे, त्या इमारतीत किंवा जमिनीवर नेहमी राहण्याऱ्या किंवा नोकरीवर असलेल्या लोकांच्या गरजांच्या दृष्टीने पुरेशा पाणीपुरवठा नगरपालिकेच्या जलव्यवस्था केंद्रामधून मिळविण्यास आणि कोणतेही उपविधी असतील तर त्यात विहित केलेल्या आणि जर कोणतेही उपविधी करण्यात आलेले नसतील तर, मुख्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा आकाराचे, सामग्रीचे व प्रकारचे जोडनळ पुरविण्यास आणि त्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यास फर्माविता येईल.

धोकादायक, साचलेल्या किंवा अनारोग्यकारक अशा प्रकारच्या पाणीपुरवठ्याच्या साधनासंबंधी अधिकार व कर्तव्ये.

**२२०.** (१) मुख्य अधिकाऱ्यास, कोणतीही विहीर, ओहोळ, पाट, तळे, किंवा पाणीपुरवठ्याचे इतर साधन—मग ती खाजगी मालमत्ता असो अथवा नसो, त्यांच्या मालकास किंवा त्यावर नियंत्रण असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही वेळी लेखी नोटीस देऊन, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वाजवी वेळेच्या आत किंवा खंड (घ) खाली येणाऱ्या कोणत्याही बाबतीत अशी नोटीस दिल्यापासून चोवीस तासांच्या आत पुढील गोष्टी करण्याविषयी फर्माविता येईल :—

(क) ओहोळव्याव्यतिरिक्त इतर कोणतेही पाणीपुरवठ्याचे असे साधन चांगल्या स्थितीत ठेवणे व राखणे; अथवा

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ याच्या कलम ३१ द्वारे "नगरपालिकेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) असे कोणतेही पाणीपुरवठ्याचे साधन त्यातील गाळ, कचरा व सडलेली झाडे-झुडपे काढून स्वच्छ करणे ; अथवा

(ग) असे कोणतेही पाणीपुरवठ्याचे साधन दूषित किंवा सांसर्गिक होऊ नये म्हणून मुख्य अधिकारी विहित करील त्या रीतीने त्याचे संरक्षण करणे ; अथवा

(घ) पाणीपुरवठ्याचे असे कोणतेही साधन पुरेशी दुरूस्ती, संरक्षण किंवा कुंपण यांच्या अभावी मुख्य अधिकाऱ्याच्या मते लोकांच्या किंवा जिला ते वापरण्याचा किंवा त्याच्या जवळून किंवा जवळ जाण्याचा प्रसंग येत असेल त्या व्यक्तीच्या आरोग्यास किंवा सुरक्षिततेस धोकादायक असल्यास, मुख्य अधिकारी संमत करील अशी रीतीने ते दुरुस्त किंवा सुरक्षित करणे किंवा त्यास कुंपण घालणे ; अथवा

(ङ) ज्याचे पाणी पिण्यास योग्य नसल्याची मुख्य अधिकाऱ्याची खात्री झाली असेल अशा कोणत्याही पाणीपुरवठ्याच्या साधनाचा पिण्यासाठी उपयोग करण्यापासून व इतरांस तसा उपयोग करण्यास परवानगी देण्यापासून परावृत्त करणे; अथवा

(च) जर खंड (ङ) अन्वये अशी कोणतीही नोटीस दिली असतानासुद्धा असा उपयोग करणे चालू राहिल्यास, आणि मुख्य अधिकाऱ्याच्या मते त्यास अन्य रीतीने प्रतिबंध करणे शक्य नसेल तर, वर म्हटल्याप्रमाणे त्या साधनाचा असा उपयोग बंद करण्यास मुख्य अधिकाऱ्यास पुरेसे वाटेल अशा रीतीने पाणीपुरवठ्याचे असे साधन तात्पुरते किंवा कायमचे बंद करणे, ते भरून काढणे, किंवा त्यास आवाराची भिंत किंवा कुंपण घालणे; अथवा

(छ) जे कोणतेही साचलेले पाणी मुख्य अधिकाऱ्याच्या मते आरोग्यास हानिकारक किंवा जवळपासच्या लोकांस त्रासदायक असेल ते अशा कोणत्याही पाणीपुरवठ्याच्या साधनातून किंवा त्यास जोडून किंवा त्या लगत असलेल्या जमिनीतून किंवा जागेतून किंवा पात्रातून, जलाशयातून निचरा करून किंवा इतर रीतीने काढून टाकणे.

(२) मालकाने किंवा वर उल्लेख केल्याप्रमाणे नियंत्रण असलेल्या व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत त्या नोटिशीचे पालन करण्यास कसूर केल्यास किंवा दुर्लक्ष केल्यास, आणि मुख्य अधिकाऱ्याच्या मते कोणत्याही व्यक्तीच्या आरोग्याचे रक्षण किंवा सुरक्षितता राखण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक असेल तर, त्यास अशा नोटिशीअन्वये आवश्यक असलेले काम ताबडतोब अंमलात आणता येईल ; आणि मुख्य अधिकाऱ्याने त्याबाबत केलेला सर्व खर्च अशा पाणीपुरवठ्याचा मालक किंवा त्यावर जिचे नियंत्रण आहे ती व्यक्ती देईल; आणि असा खर्च संपत्ती कराबाबतच्या रकमेची वसुली ज्या रीतीने करता येते त्याच रीतीने वसूल करण्यायोग्य असेल :

परंतु, कोणतीही विहीर किंवा खाजगी ओहोळ किंवा कोणतेही खाजगी पाट, तळे किंवा पाणीपुरवठ्याचे इतर साधन यातून सर्व लोक किंवा विशिष्ट जमातीचे लोक अधिकार म्हणून पाणी वापरीत असतील तर, अशा प्रसंगी मुख्य अधिकाऱ्याने केलेला खर्च किंवा अशा मालकाने किंवा असे नियंत्रण असलेल्या व्यक्तीने आवश्यक तेवढा केलेला खर्च नगरपरिषद निदेश देईल तर, नगरपालिका निधितून देता येईल.

(३) जी झाडे कोणत्याही सार्वजनिक तळ्यावर, विहिरींवर अथवा पाणीपुरवठ्याच्या इतर साधनावर लोंबकळत राहिल्याने पाणी दूषित होत असेल किंवा होण्याचा संभव असेल अशी सर्व झाडे किंवा झुडपे कापून टाकण्याविषयी, त्यांच्या फांद्या तोडण्याविषयी किंवा त्या योग्य प्रकारे छाटण्याविषयी मुख्य अधिकाऱ्यास लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास फर्माविता येईल.

स्नानाच्या व धुण्याच्या जागांचे नियमन करण्याचा अधिकार.

**२२१.** (१) नगरपरिषदेस स्नानासाठी योग्य अशा जागा अलग राखून ठेवता येतील, आणि त्या जागा कोणत्या वेळात आणि स्त्रिया किंवा पुरुष यांपैकी कोणी वापराव्या हे विनिर्दिष्ट करता येईल. त्याचप्रमाणे जनावरे, कपडे किंवा भांडी धुण्यासाठी किंवा नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांचे आरोग्य, स्वच्छता आणि सुखसोयी यांच्याशी संबंधित अशा सर्व प्रयोजनांसाठी योग्य जागा अलग राखून ठेवता येतील.

(२) [१][अध्यक्षाच्या नियंत्रणाधीन राहून, मुख्य अधिकाऱ्यास] अशा प्रकारे अलग राखून न ठेवलेल्या किंवा पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेव्यतिरिक्त किंवा व्यक्तींव्यतिरिक्त इतर वेळी किंवा इतर व्यक्तींनी कोणत्याही सार्वजनिक जागेमध्ये स्नान करणे किंवा जनावरे, कपडे किंवा भांडी धुणे किंवा इतर गोष्टी करणे यास, जाहीर नोटिशीद्वारे मनाई करता येईल किंवा सार्वजनिक जागांमधील पाणी जेणेकरून दूषित होईल किंवा वापरास अयोग्य ठरेल किंवा ज्यामुळे या स्नानाच्या किंवा धुण्याच्या जागांचा वापर करणाऱ्या व्यक्तींना गैरसोय किंवा त्रास सोसावा लागत असेल अशा इतर कृत्यास मनाई करता येईल.

(३) जो कोणी, पोट-कलम (२) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघम करील त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

राज्य शासनाने नेमलेल्या व्यक्तींनी नगरपालिका जलव्यवस्था केंद्राची तपासणी करणे.

**२२२.** नगरपालिका जलव्यवस्था केंद्राच्या तपासणीसाठी राज्य शासनाने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही वाजवी वेळी अशा जलव्यवस्था केंद्रामध्ये प्रवेश करून त्याची तपासणी करण्याचे स्वातंत्र्य असेल.

परवानगीशिवाय विहिरी वगैरे खोदण्यास मनाई.

**२२३.** (१) मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीवाचून कोणतीही नवीन विहीर, तलाव, तळे, हौद किंवा कारंजे खोदण्यात किंवा बांधण्यात येणार नाही.

(२) जर अशा परवानगीवाचून असे कोणतेही काम सुरू किंवा पूर्ण करण्यात आले असेल तर, मुख्य अधिकाऱ्यास,—

(क) असे बांधकाम करणाऱ्या मालकाला किंवा व्यक्तीला लेखी नोटीस देऊन असे काम मुख्य अधिकारी विहित करील अशा रीतीने भरून काढण्याविषयी किंवा पाडून टाकण्याविषयी फर्माविता येईल ; अथवा

(ख) असे बांधकाम तसेच ठेवण्याची लेखी परवानगी देता येईल :

परंतु, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल होणाऱ्या कार्यवाहीतून अशा मालकाला या परवानगीमुळे सूट मिळणार नाही.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३२ द्वारे "नगरपालिकेस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण पंधरा

## सार्वजनिक सुरक्षितता आणि सोयी

**२२४.** (१) मुख्य अधिकारी नगरपरिषदेकडे निहित असलेल्यांपैकी कोणत्याही रस्त्याचे, मोरीचे किंवा इतर जागेचे बांधकाम किंवा दुरुस्ती चालू असताना लगतच्या इमारतींना अपघात होऊ नये म्हणून नेटावे देऊन व संरक्षण करून योग्य ते सावधगिरीचे उपाय योजील आणि असे बांधकाम किंवा अशी दुरुस्ती चालू असताना वाहनें, बैलगाड्या किंवा इतर वाहने किंवा गुरेढोरे किंवा घोडे यांच्या येण्याजाण्यास प्रतिबंध करण्यासाठी, तो योग्य वाटतील अशा कांबी, साखळ्या किंवा खांब कोणत्याही रस्त्याच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूपर्यंत किंवा रस्त्यामध्ये लावण्याची व्यवस्था करील आणि अशा कोणत्याही बांधकामाजवळ किंवा दुरुस्तीच्या कामाजवळ रात्री दिव्यांची आणि पहारा ठेवण्याची पुरेशी व्यवस्था करील. दुरूस्ती, इत्यादी चालू असताना कुंपण घालणे व दिव्यांची व्यवस्था करणे.

(२) जो कोणी, मुख्य अधिकाऱ्याच्या प्राधिकाराशिवाय किंवा संमतीशिवाय उक्त कांबी, साखळ्या किंवा खांब यापैकी कोणतीही कांब, साखळी किंवा खांब काढून टाकील, त्यात फेरफार करील किंवा तो काढून नेईल किंवा असा कोणताही दिवा काढून नेईल किंवा विझवील, त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**२२५.** (१) कोणत्याही दगडखाणीचे काम किंवा कोणत्याही जागेतील दगड, माती किंवा इतर सामग्री काढण्याचे काम हे मुख्य अधिकाऱ्याच्या मते त्याच्या आसपास राहणाऱ्या किंवा तेथे जाण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तींना धोक्याचे किंवा उपद्रवकारक असेल किंवा त्यामुळे उपद्रव होण्याचा संभव असेल तर, त्यास, अशा दगडखाणीच्या किंवा जागेच्या मालकास किंवा अशा रीतीने सामग्री काढून नेण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस लेखी नोटीस देऊन, अशा दगडखाणीचे काम किंवा अशी सामग्री काढून नेण्याचे काम पुढे न चालविण्याविषयी किंवा त्यासाठी परवानगी न देण्याविषयी किंवा अशा दगडखाणीपासून किंवा जागेपासून होणारा किंवा होण्याचा संभव असलेला धोका टाळण्याकरिता किंवा तसा उपद्रव कमी करण्याकरिता अशा खाणीसंबंधाने किंवा जागेसंबंधाने मुख्य अधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे इतर उपाययोजना करण्याविषयी फर्माविता येईल : धोकादायक खाणकाम.

परंतु, अशी दगडखाण किंवा जागा शासनाकडे निहित असेल तर, किंवा वर सांगितल्याप्रमाणे अशा दगडखाणीचे काम किंवा अशा जागेतून सामग्री काढून नेण्याचे काम शासनाकडून किंवा शासनाच्या वतीने करण्यात येत असेल तर किंवा ते शासनाच्या किंवा त्या नात्याने काम करणाऱ्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याच्या परवानगीने किंवा प्राधिकारानुसार काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने करण्यात येत असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने तसे करण्यास संमती दिल्यावाचून व देईपर्यंत, मुख्य अधिकारी अशी कारवाई करणार नाही :

परंतु आणखी असे की, निकटवर्ती धोका टाळण्यासाठी अशा दगडखाणीजवळ किंवा जागेजवळ योग्य असे उंच फळ्यांचे कुंपण किंवा इतर कुंपण घालणे आवश्यक आहे असे मुख्य अधिकाऱ्यास वाटल्यास, तो जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या संरक्षणासाठी ताबडतोब तसे कुंपण उभारण्याची व्यवस्था करील.

(२) मुख्य अधिकाऱ्याला या कलमान्वये कार्यवाही करताना आलेला कोणताही खर्च, दगड-खाणीच्या कामासाठी किंवा सामग्री काढून नेण्यास जबाबदार असलेला मालक किंवा व्यक्ती देईल असा खर्च संपत्ती करामुळे देय असलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्याच रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

दुरुस्ती, इत्यादी चालू असताना उंच फळ्यांचे कुंपण उभारणे.

**२२६.** (१) कोणतीही इमारत बांधण्याचा किंवा पाडण्याचा किंवा कोणत्याही इमारतीत बाहेरच्या बाजूने फेरफार किंवा दुरुस्ती करण्याचा उद्देश असलेली व्यक्ती, ज्यायोगे कोणत्याही रस्त्यात अडथळा, धोका किंवा गैरसौय होईल किंवा होण्याचा संभव असेल अशी कामाची जागा किंवा परिस्थिती असेल तर, असे काम सुरू करण्यापूर्वी,—

(क) तसे करण्यासाठी प्रथम मुख्य अधिकाऱ्यांकडून लेखी परवानगी मिळवील, आणि

(ख) असे काम ज्या जागेत चालू करण्यात यावयाचे असेल ती जागा रस्त्यापासून अलग करण्यासाठी उंच फळ्यांची पुरेशी कुंपणे किंवा इतर कुंपणे उभारण्याची व्यवस्था करील. आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी व सोयीसाठी मुख्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल इतक्या वेळेपर्यंत असे उंच फळ्यांचे कुंपण किंवा मुख्य अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने उभारील व सुस्थितीत राखील आणि त्याच्याजवळ रात्री दिव्याची पुरेशी व्यवस्था करील आणि मुख्य अधिकारी निदेश देईल तेव्हा ती काढून टाकील.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि उल्लंघन चालू राहिल्यास, पहिल्या उल्लंघनानंतर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू असेल त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

सार्वजनिक करमणुकीच्या जागी सावधगिरीचे उपाय आवश्यक करण्याचा अधिकार.

**२२७.** (१) सार्वजनिक करमणुकीसाठी असलेल्या कोणत्याही जागेच्या व्यवस्थापकाचे किंवा मालकाचे, उपविधीद्वारा विहित केले असेल त्याप्रमाणे किंवा जर असे उपविधी तयार केले नसतील तर, आग टाळण्यासाठी आणि विझविण्यासाठी आणि आग लागल्यास प्रेक्षकांना सहज रीतीने बाहेर जाता येण्यासाठी मुख्य अधिकारी, लेखी सूचनेद्वारे फर्मावील त्याप्रमाणे तरतूद करणे, हे कर्तव्य राहील.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल व उल्लंघन चालू राहिल्यास, पहिल्या उल्लंघनानंतर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू असेल त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

आग विझविण्या-बाबत अधिकार.

**२२८.** (१) अग्निशामक पथकाला आपली कामे पार पाडीत असताना मदत करणे, हे सर्व पोलीस अधिकाऱ्यांचे, सर्व नगरपालिका अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे कर्तव्य असेल.

(२) नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत आग लागल्यास कोणत्याही दंडाधिकाऱ्यास, अध्यक्षास, मुख्य अधिकाऱ्यास [1][अग्निशमन अधिकाऱ्यास] किंवा नगरपरिषदेने किंवा राज्य शासनाने ठेवलेल्या अग्निशामक पथकाच्या कामाचे निर्देशन करणाऱ्या कोणत्याही सदस्यास आणि वर नमूद केलेल्या व्यक्तीपैकी कोणत्याही व्यक्तीने असा आदेश दिल्यास शिपायाच्या वरच्या दर्जाच्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास,—

(क) आग विझविण्याच्या किंवा जीवित किंवा मालमत्ता वाचविण्याच्या कामात जी व्यक्ती स्वत:च्या उपस्थितीने अडथळा किंवा व्यत्यय आणीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीला घालवून देता येईल किंवा घालवून देण्याचे आदेश देता येतील ;

---

[1] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ याच्या कलम ५(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ख) जेथे कोणतीही आग लागली असेल तेथील किंवा त्याच्या जवळील कोणताही रस्ता किंवा वाट बंद करता येईल ;

(ग) आग विझविण्याच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही घरात किंवा घरातून घुसता येईल किंवा ते पाडून टाकता येईल किंवा त्या घरात किंवा त्या घरातून घुसण्याची किंवा ते पाडून टाकण्याची व्यवस्था करता येईल किंवा पाण्याचे लवचिक नळ किंवा इतर उपकरणे यांची ने-आण करण्याचा मार्ग म्हणून त्याचा उपयोग करता येईल ;

(घ) ज्या भागात आग लागली असेल त्या भागात किंवा त्याच्याजवळ पाण्याचा दाब वाढावा म्हणून मोठ्या नळातील किंवा नळांमधील पाणी बंद करविता येईल ;

(ङ) शक्य तितके जास्तीत जास्त सहाय्य देण्यासाठी कोणतेही आगीचे बंब ताब्यात असलेल्या व्यक्तींना बोलावता येईल ; आणि

(च) जीवित किंवा मालमत्ता यांच्या संरक्षणाकरिता आवश्यक वाटतील असे कोणतेही उपाय सर्वसाधारणपणे योजता येतील.

[१][ (२क) नगरपालिका क्षेत्रात लागलेल्या प्रत्येक आगीचा अहवाल नगरपालिका अग्निशमन अधिकाऱ्याकडून किंवा अग्निशमन दलाच्या कोणत्याही सदस्याकडून आग लागलेल्या दिवसानंतर येणाऱ्या दिवसापेक्षा उशीराच्या नसेल अशा दिवशी, मुख्य अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल व तो अधिकारी, कोणतीही अधिक चौकशी करणे त्यास आवश्यक वाटल्यास तसे करील व नगरपालिका क्षेत्रात लागणाऱ्या सर्व आगीसंबंधात एक मासिक विवरण स्थायी समितीकडे, जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे व महाराष्ट्र शासनाच्या अग्निशमन सल्लागाराकडे सादर करील. ]

(३) जेव्हा कोणतीही सरकारी इमारत अशा आगीमुळे धोक्यात आली असेल तेव्हा, ती इमारत त्यावेळी ज्याच्या ताब्यात असेल त्या शासकीय अधिकाऱ्यास, पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये कोणत्याही व्यक्तीने सद्भावनापूर्वक केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल तिला कोणतीही नुकसानभरपाई द्यावी लागणार नाही.

## प्रकरण सोळा

### उपद्रव

धूळ, वगैरे जमा करून उपद्रव देणे.

**२२९.** (१) जी कोणतीही व्यक्ती, मुख्य अधिकारी ज्या जागा, जी रीत व जी वेळ ठरवील त्याव्यतिरिक्त इतर जागी, इतर रीतीने व इतर वेळी, कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याखालील कोणत्याही कमानीत किंवा रस्त्याच्या बाजूस असलेल्या कोणत्याही मोरीत किंवा खाजगी मालमत्ता नसेल अशा कोणत्याही खुल्या जागेत किंवा कोणत्याही धक्क्यावर, लहान धक्क्यावर किंवा उतरण्याच्या जागेवर किंवा समुद्र किनाऱ्याच्या कोणत्याही भागावर किंवा खाडीच्या काठाच्या कोणत्याही भागावर किंवा भरतीच्या सीमेच्या वर किंवा खाली किंवा नदीच्या, जलप्रवाहाच्या किंवा नाल्याच्या काठावर कोणतीही धूळ, घाण, शेण, राख, कचरा किंवा कोणत्याही प्रकारची गदळ किंवा कोणताही प्राणिज पदार्थ किंवा कोणतेही काचेचे किंवा

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २६ याच्या कलम ५(ब) द्वारे पोट-कलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

मातीच्या वस्तूचे तुकडे किंवा इतर केरकचरा किंवा उपद्रवकारक किंवा धोकादायक असलेली किंवा होऊ शकेल अशी कोणताही इतर वस्तू टाकील किंवा आपल्या कुटुंबातील किंवा घरातील कोणत्याही व्यक्तीस टाकण्यास लावील किंवा टाकू देईल आणि जी कोणतीही व्यक्ती, वर सांगितलेल्या कोणत्याही जागेत उपद्रव करील किंवा आपल्या कुटुंबातील किंवा घरातील कोणत्याही व्यक्तीस उपद्रव करू देईल तिला, अपराध सिद्ध झाल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मोरीत, अधःप्रणालात, बोगद्यात, गटारात किंवा जलप्रवाहात मैल्याव्यतिरिक्त पोट-कलम (१) मध्ये वर्णन केलेल्या वस्तूपैकी कोणतीही वस्तू किंवा मुख्य अधिकाऱ्याच्या परवानगीवाचून कोणताही मैला फेकील किंवा टाकील किंवा आपल्या कुटुंबातील किंवा घरातील कोणत्याही व्यक्तीस फेकण्यास किंवा टाकण्यास लावील किंवा तिला तसे करू देईल त्या व्यक्तीस आणि जी कोणतीही व्यक्ती, अशा कोणत्याही मोरीत, अधःप्रणालात, गटारात, बोगद्यात किंवा जलप्रवाहात किंवा ती दूषित होतील इतक्या त्यांच्या सान्निध उपद्रव करील किंवा आपल्या कुटुंबातील किंवा घरातील कोणत्याही व्यक्तीस तसे करू देईल, तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

मलप्रवाह, इत्यादी सोडून देणे.

**२३०.** जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही सांडवणीचे, मलप्रणालाचे किंवा मलकुंडीचे पाणी किंवा उपद्रवकारक असणारा किंवा उपद्रवकारक होण्याचा संभव असलेला इतर कोणताही द्रव किंवा इतर पदार्थ, आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही इमारतीतून किंवा जमिनीतून कोणत्याही रस्त्यावरून किंवा खुल्या जागेवरून वाहील, निःसारित होईल किंवा त्यावर उडेल किंवा पडेल किंवा कोणत्याही बाहेरच्या भिंतीत मुरेल असे करवील किंवा होऊ देईल किंवा मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीवाचून कोणत्याही मलप्रणालातून किंवा संडासातून कोणताही दुर्गंधीयुक्त पदार्थ कोणत्याही रस्त्यावरील उघड्या मोरीत वाहील किंवा निःसारित होईल किंवा उडेल असे करवील किंवा होऊ देईल किंवा जी व्यक्ती अशा परवानगीत विहित केलेली कोणतीही शर्त पाळण्यात कसूर करील, तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

घाम, इत्यादी काढून न टाकणे.

**२३१.** जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार असून अशा इमारतीत किंवा जमिनीवर कोणतीही घाण, शेण, हाडे, राख, मैला, गदळ किंवा कोणताही अपायकारक किंवा दुर्गंधीयुक्त पदार्थ, चोवीस तासांपेक्षा अधिक वेळ किंवा अधिक काळ योग्य अशा पात्रात न ठेवता इतर रीतीने ठेवील किंवा ठेवू देईल किंवा असे पात्र घाणेरड्या किंवा अपायकारक स्थितीत राहू देईल किंवा अशा पात्रातून गाळ काढून ते साफ व स्वच्छ करण्यासाठी योग्य साधन वापरण्यात हयगय करील किंवा अशा इमारतीत किंवा जमिनीवर उपद्रव होईल अशा रीतीने कोणतेही जनावर ठेवील किंवा ठेवू देईल, त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि असा अपराध चालू राहिल्याचे बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या प्रत्येक दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी आणखी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

मैला काढून टाकणे.

**२३२.** (१) मैला किंवा असा इतर दुर्गंधीयुक्त पदार्थ ज्या वेळात आणि ज्या मार्गानेच केवळ कायदेशीररित्या काढून टाकता येईल त्या वेळा, आणि ते मार्ग मुख्य अधिकाऱ्यास वेळोवेळी निश्चित करता येतील.

(२) मुख्य अधिकारी, कलम ३२६ मध्ये विहित केलेल्या रीतीने अशा वेळा व मार्ग यासंबंधी नोटीस देण्याची व्यवस्था करील.

(३) जो कोणी,—

(क) मुख्य अधिकाऱ्याने अशा वेळा व मार्ग ठरवून त्याची जाहीर नोटीस दिलेली असल्यानंतर असा कोणताही दुर्गंधीयुक्त पदार्थ मुख्य अधिकारी ठरवील अशा वेळेव्यतिरिक्त इतर कोणत्याही वेळी किंवा अशा मार्गाव्यतिरिक्त इतर कोणत्याही मार्गाने, कोणत्याही रस्त्यावरून हलवील किंवा हलवावयास लावील ; अथवा

(ख) मुख्य अधिकाऱ्याने अशा वेळा किंवा मार्ग ठरविलेले असोत किंवा नसोत, कोणत्याही वेळी,—

(एक) आतील वस्तू किंवा तिची दुर्गंधी बाहेर न जाईल अशा प्रकारचे पुरेसे झाकण नसलेल्या कोणत्याही गाडीचा, वाहनाचा, पात्राचा किंवा भांड्याचा अशा कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोग करील ; अथवा

(दोन) अशी कोणतीही दुर्गंधीयुक्त वस्तू काढून नेत असता हेतुपुरस्सर किंवा हयगयीने सांडील किंवा लवंडील; अथवा

(तीन) अशी कोणतीही दुर्गंधीयुक्त वस्तू ज्या ठिकाणी सांडली किंवा लवंडली असेल अशी प्रत्येक जागा काळजीपूर्वक झाडणार नाही व स्वच्छ करणार नाही ; अथवा

(चार) अशी दुर्गंधीयुक्त वस्तू असलेले कोणतेही भांडे कोणत्याही सार्वजनिक जागेत ठेवील किंवा मांडील त्यास ;

अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

[१][(४) (क) कोणतीही व्यक्ती, नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही भागात, कोणत्याही जागेहून किंवा ठिकाणाहून दुसऱ्या कोणत्याही जागी किंवा ठिकाणी, मैला नेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी तो डोक्यावरून वाहून नेण्यास दुसऱ्या व्यक्तीला भाग पाडणार नाही किंवा तशी सक्ती करणार नाही आणि कोणतीही व्यक्ती मैला डोक्यावरून वाहून नेणार नाही ;

(ख) जी व्यक्ती, खंड (क) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला, अपराध सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(ग) या पोट-कलमाखाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध घडावा म्हणून जी व्यक्ती अपप्रेरणा देईल तिला, त्या अपप्रेरणेच्या परिणामी उक्त अपप्रेरणा मिळालेले कृत्य घडले असेल तर, अशा अपराधासाठी तरतूद करण्यात आलेली शिक्षा होईल.]

**२३३.** जो कोणी, मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीखेरीज आणि अशा परवानगीच्या शर्तीनुसार असेल त्या व्यतिरिक्त, मैला किंवा ज्यापासून दुर्गंधी येते असे इतर खत किंवा पदार्थ शेजाऱ्याला उपद्रव होईल अशा रीतीने साठवील किंवा वापरील त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. दुर्गंधीयुक्त खत, इत्यादी वापरणे.

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६७ च्या कलम ३ द्वारे हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

विहिरी, इत्यादींपासून होणाऱ्या उपद्रवाची समाप्ती.

**२३४.** मुख्य अधिकाऱ्याच्या मते,—

(क) कोणतेही डबके, खंदक, दगडखाण, छिद्र, खळगा, तलाव, विहीर, तळे, मोरी, जलप्रवाह किंवा कोणतेही साचलेले पाणी, किंवा

(ख) एखाद्या इमारतीच्या आतील किंवा बाहेरील पाण्याची कोणतीही टाकी किंवा इतर पात्र, अथवा

(ग) जेथे पाणी साचले असेल अशी कोणतीही जमीन,

ही डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे असतील किंवा होण्याचा संभव असेल किंवा इतर कोणत्याही प्रकारे उपद्रवकारक असतील किंवा उपद्रवकारक होण्याचा संभव असतील तर मुख्य अधिकाऱ्यास, त्याच्या मालकास लेखी नोटीस देऊन पुढील गोष्टी करण्याविषयी फर्मावता येईल :—

(एक) मुख्य अधिकारी विहित करील अशा रीतीने व अशा वस्तूंनी ती भरून काढणे, झाकणे किंवा त्यातील पाण्याचा निचरा करणे, किंवा

(दोन) नोटिशीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे उपद्रव दूर करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी, त्यासंबंधात प्राकृतिक, रासायनिक व जीवशास्त्रीय पद्धती वापरून उपाययोजना करणे.

माणसाला राहण्यास अयोग्य अशा इमारती किंवा इमारतीतील खोल्या.

**२३५.** (१) राहण्यासाठी योजिलेली किंवा उपयोगात असलेली कोणतीही इमारत किंवा इमारतीतील कोणतीही खोली माणसाला राहण्यास अयोग्य आहे असे नगरपरिषदेस कोणत्याही कारणावरून दिसून आल्यास नगरपरिषद अशा इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन तीत असे कारण नमूद करील व यथास्थिति, अशा इमारतीचा किंवा खोलीचा राहण्याची जागा म्हणून त्यानंतर उपयोग करण्यास मनाई करण्याचा आपला हेतू असल्याचे कळवील व तसेच अशी नोटीस मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत, त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास ती लेखी कळविण्याविषयी अशा नोटिशीद्वारे उपरिनिर्दिष्ट मालकास किंवा भोगवटादारास आदेश देईल आणि वर सांगितलेल्या मुदतीत अशा मालकाने किंवा भोगवटादाराने कोणतीही हरकत घेतली नाही किंवा अशा मुदतीत अशा मालकाने किंवा भोगवटादाराने घेतलेली कोणतीही हरकत विधिअग्राह्य किंवा अपुरी आहे असे नगरपरिषदेस आढळून आले तर, तिला, लेखी आदेश देऊन, त्याद्वारे अशा इमारतीचा किंवा खोलीचा, राहण्याची जागा म्हणून त्यानंतर उपयोग करण्यास मनाई करता येईल.

(२) वर सांगितल्याप्रमाणे, नगरपरिषदेकडून कोणतीही मनाई करण्यात आली असेल तेव्हा, मुख्य अधिकारी, यथास्थिति, अशा इमारतीच्या किंवा खोलीच्या दरवाजावार किंवा अशा इमारतीच्या किंवा खोलीच्या एखाद्या ठळक भागावर, अशी मनाईची नोटीस लावण्याची व "माणसांना राहण्यास अयोग्य" हा मजकूर व तत्सम मराठी मजकूर रंगाने लिहिण्याची व्यवस्था करील आणि अशा इमारतीचा किंवा खोलीचा कोणताही मालक किंवा भोगवटादार यथास्थिति, अशी इमारत किंवा खोली मनुष्यास राहण्यास योग्य करण्यात आली आहे,अशा अर्थाचे लेखी प्रमाणपत्र नगरपरिषद देईपर्यंत ती माणसाला राहण्यासाठी उपयोगात आणणार नाही किंवा तिचा अशाप्रकारे उपयोग करू देणार नाही.

गलिच्छ इमारती इत्यादी.

**२३६.** (१) राहण्यालायक किंवा अन्यथा असलेली कोणतीही इमारत किंवा जमीन,—

(एक) अस्वच्छ, घाणेरड्या किंवा अनारोग्यकारक स्थितीत असेल, किंवा

(दोन्) मुख्य अधिकाऱ्याच्या मते शेजारी राहणाऱ्या लोकांस उपद्रवकारक ठरत असेल, किंवा

(तीन) तिच्यावर काटेरी निवडुंग किंवा उग्र आणि अपायकारक वनस्पती माजली असेल,

तर, मुख्य अधिकाऱ्यास, लेखी नोटीस देऊन, अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास किंवा, भोगवटादारास, अशी इमारत किंवा जमीन स्वच्छ करण्याबद्दल, तिला आतून किंवा बाहेरून चुना लावण्याबद्दल किंवा अन्य रीतीने ती इमारत किंवा जमीन योग्य स्थितीत आणण्याबद्दल फर्माविता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या नोटिशीचे पालन करण्यात कसूर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि नोटिशीचे पालन न करण्याचे चालू ठेवल्याच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या ज्या दिवशी अशा रीतीने पालन न करण्याचे चालू राहिले असेल त्या प्रत्येक दिवसासाठी तिला आणखी दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) जेथे कोणतीही इमारत, मोडकळीस आल्यामुळे, तिच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे, ती सोडून दिल्यामुळे, वापरात नसल्यामुळे किंवा विवाद्य मालकीमुळे किंवा ती रिकामी राहिल्यामुळे—

(क) आळशी व गैरशिस्त लोकांचे किंवा प्रकट दिसणारे असे निर्वाहाचे साधन ज्यांस नाही किंवा ज्यांस स्वत:विषयी समाधानकारक माहिती देता येत नाही अशा लोकांचे आश्रयस्थान झाली असेल; अथवा

(ख) अस्वच्छ किंवा अनैतिक अशा कोणत्याही कारणासाठी वापरण्यात येत असेल; अथवा

(ग) सर्प, उंदीर किंवा इतर भयंकर किंवा त्रासदायक प्राण्यांचे आश्रयस्थान झाली असेल व त्यामुळे ती उपद्रवकारक किंवा धोक्याची झाली आहे अशी किंवा शेजारच्या लोकांस किंवा तिच्याजवळून जाणाऱ्या येणाऱ्यांस, तिच्यापासून पीडा, गैरसोय किंवा त्रास होईल, इतकी ती अनारोग्यकारक किंवा विद्रूप झाली आहे अशी तिच्याबद्दल हरकत घेण्यात येत असेल त्याबाबतीत, नगरपरिषदेस, अशी हरकत, या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीन्वये अन्यथा दूर करता येणे शक्य नाही असे वाटल्यास, अशा इमारतीचा मालक म्हणून दावा सांगत असेल अशा नगरपालिका क्षेत्रात माहीत असलेल्या किंवा राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे लेखी नोटीस पाठवून तिला, किंवा इतर कोणत्याही बाबतीत अशा इमारतीच्या दारावर किंवा दुसऱ्या कोणत्याही ठळक भागावर लेखी नोटीस लावून अशा इमारतीत हितसंबंध असल्याच्या दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींना व अशा नोटिशीच्या दिनांकापासून एका महिन्यापेक्षा कमी असणार नाही एवढ्या मुदतीच्या आत,-

(एक) असा उपद्रव, धोका, पीडा, गैरसोय किंवा त्रास नाहीसा करण्यासाठी किंवा त्यास प्रतिबंध करण्यासाठी नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी उपाययोजना करण्याबद्दल, किंवा

(दोन) अशी इमारत पाडण्याची व तिचे सामान काढून नेण्याची व्यवस्था करण्याबद्दल,

फर्माविता येईल.

## प्रकरण सतरा

## घातक रोगांचा प्रतिबंध व त्यावर नियंत्रण

घातक रोग.

**२३७.** या प्रकरणाच्या प्रयोजनार्थ " घातक रोग " याचा अर्थ, खालीलप्रमाणे कोणताही रोग, असा समजावा :—

(एक) काळपुळी (ॲन्थ्रेक्स) ;

(दोन) मेंदू व मणक्याचा ज्वर (सेरिब्रोस्पायनल फीव्हर) ;

(तीन) कांजिण्या ;

(चार) पटकी ;

(पाच) घटसर्प ;

(सहा) आंत्रज्वर (एन्टीरिक ग्रुप अफ फीव्हर्स) ;

(सात) धावरे (एरीसीपेलेस) ;

(आठ) शीतज्वरोद्भूत फुफ्फुस दाह, तीव्र शीतज्वर (इन्फ्युएन्जल न्युमोनिया) ;

(नऊ) कुष्ठरोग ;

(दहा) गोवर ;

(अकरा) प्लेग ;

(बारा) पोलिओ ;

(तेरा) श्वानदंश ;

(चौदा) पुनरावर्ती ज्वर (रिलॅपसिंग फीव्हर) ;

(पंधरा) लोहितांग ज्वर (स्कारलेट फीव्हर) ;

(सोळा) देवी ;

(सतरा) फुफ्फुस व आतड्यांचा क्षय ;

(अठरा) आंत्रज्वर (टायफस) ;

(एकोणीस) पीतज्वर ;

(वीस) चार दिवसांपेक्षा अधिक मुदतीचा अज्ञात उगमस्थानाचा सतत प्रदाहित ज्वर,

(एकवीस) राज्य शासन, वेळोवेळी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे " धातक रोग " म्हणून जाहीर करील असा इतर कोणताही रोग.

घातक रोगाने पीडित असलेल्या व्यक्तींची ने-आण करण्यासाठी सार्वजनिक वाहनांचा वापर करण्यास मनाई करण्याचा अधिकार.

**२३८.** कोणत्याही धातक रोगाने पीडित असलेल्या व्यक्तींची विनामूल्य ने-आण करण्यासाठी ज्या नगरपालिका क्षेत्रात नगरपरिषदेने, योग्य अशा वाहनांची तरतूद केलेली असेल अशा कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात, नगरपरिषदेने जाहीर नोटिशीद्वारे कोणत्याही किंवा सर्व सार्वजनिक वाहनांतून अशा व्यक्तींची ने-आण करण्यास मनाई करणे, आणि अशा कोणत्याही व्यक्तीस नेण्या-आणण्यासाठी जे कोणतेही वाहन कोणत्याही वेळी उपयोगात आणले जाईल ते ताबडतोब रोगजंतू विरहित करण्याविषयी निदेश देणे हे कायद्याला धरून असेल.

**२३९.** (१) कोणताही घातक रोग झालेल्या कोणत्याही व्यक्ती, स्वतः जाणूनबुजून उघड्यावर राहणार नाही आणि घातक रोग झालेली कोणतीही व्यक्ती जिच्या ताब्यात असेल अशी कोणतीही व्यक्ती उक्त रोगाचा फैलाव होऊ नये म्हणून योग्य सावधगिरी घेतल्यावाचून, कोणत्याही रस्त्यावर किंवा कोणत्याही शाळेत किंवा कारखान्यात किंवा कोणत्याही खानावळीत, धर्मशाळेत, नाट्यगृहात, बाजारात किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी उक्त व्यक्तीस उघड्यावर ठेवणार नाही.

घातक रोगाने पीडित असलेल्या व्यक्तींवरील निर्बंध.

(२) कोणताही दुर्धर रोग झालेली व्यक्ती,—

(क) माणसाच्या सेवनासाठी असलेले कोणतेही अन्नपदार्थ किंवा पेय किंवा औषध व औषधिद्रव्य तयार करणार नाही किंवा विक्रीसाठी देऊ करणार नाही ; किंवा

(ख) इतरांकडून विक्रीसाठी मांडण्यांत येईल तेव्हा, अशा कोणत्याही वस्तूस, औषधास किंवा औषधिद्रव्यास जाणूनबुजून स्पर्श करणार नाही ; किंवा

(ग) कपडे धुण्याच्या किंवा ते वाहून नेण्याच्या कामात कोणताही भाग घेणार नाही.

(३) मुख्य अधिकाऱ्याने ज्या व्यक्तीवर या बाबतीत आदेश बजावला असेल अशा व्यक्ती, जी कोणतीही वस्तू कोणत्याही घातक रोगाच्या संसर्गात आली असल्याचे अशा मनाई करण्यात आलेल्या व्यक्तीस माहीत असेल किंवा त्यास तसे वाटण्यास सयुक्तिक कारण असेल ती वस्तू रोगजंतुविरहित करण्याव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी दुसऱ्या जागेत नेणार नाही किंवा इतर व्यक्तीस हस्तांतरित करणार नाही.

**२४०.** (१) एखादे नगरपालिका क्षेत्र कोणत्याही वेळी, कोणत्याही घातक रोगाचा प्रादुर्भाव होऊन धोक्यात येण्याची भीती असल्यास किंवा तेथे त्याचा प्रादुर्भाव झाल्यास, नगरपरिषद रोगाचा असा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी, त्यावर उपचार करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच, अशा रोगांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींना वेगळे ठेवण्यासाठी आणि रोगाचा फैलाव किंवा त्याचा प्रादुर्भाव याच्या कारणांचे अन्वेषण करण्यासाठी उपाययोजना करील.

घातक रोगांचे नियंत्रण व त्यांचा प्रतिबंध.

(२) जिल्हाधिकाऱ्याला, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून आणि स्थानिक क्षेत्रात त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने, नगरपालिका क्षेत्रात दुर्धर रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे किंवा होण्याची भीती आहे असे जाहीर करता येईल आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याला आदेश काढून अशा रोगांचा प्रतिबंध, उपचार किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अवधीत नगरपरिषदेस उपाययोजना करण्यास भाग पाडता येईल आणि जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करणे, हे नगरपरिषदेचे कर्तव्य असेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे नगरपरिषदेने पालन केले नाही तर, उक्त आदेश अंमलात आणण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास, आवश्यक वाटेल अशी इतर उपाययोजना करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशा प्रकारे नेमणूक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा जिल्हाधिकाऱ्यास आलेला खर्च नगरपरिषद सोसेल.

घातक रोगांचा प्रादुर्भाव झाल्याची माहिती मुख्य अधिकाऱ्यास किंवा आरोग्य अधिकाऱ्यास देणे.

**२४१.** (एक) कोणत्याही घरात किंवा सार्वजनिक रुग्णालयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही जागेत आपल्या व्यवसायाच्या ओघात ज्यास कोणतीही व्यक्ती घातक रोगाने आजारी असल्याचे आढळून येईल किंवा तिला घातक रोग झाल्याचा संशय येईल अशा प्रत्येक वैद्यक व्यवसायीने ;

(दोन) कोणत्याही घातक रोगाने आजारी असलेल्या किंवा अशा कोणत्याही घातक रोगाने आजारी असल्याचा संशय येत असेल अशा व्यक्तीवर ज्या कोणत्याही रुग्णालयात किंवा दवाखान्यात उपचार करण्यात येत असेल किंवा तिला उपचारासाठी आणण्यात आले असेल त्या रुग्णालयाच्या किंवा दवाखान्याच्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याने ;

(तीन) आपल्या व्यवस्थापनाखाली किंवा नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही जागेत राहणारी कोणतीही व्यक्ती कोणत्याही घातक रोगाने आजारी आहे किंवा त्या रोगाने मरण पावली आहे असे ज्यास माहीत असेल किंवा असे वाटण्यास सयुक्तिक कारण असेल अशा कारखान्याच्या व्यवस्थापकाने किंवा शाळेच्या मुख्याध्यापकाने किंवा निवासगृहाच्या चालकाने ;

(चार) आपल्या सोबत राहत असलेली कोणतीही व्यक्ती घातक रोगाने आजारी आहे असे ज्यास माहीत असेल किंवा वाटण्यास सयुक्तिक कारण असेल अशा कोणत्याही कुटुंबप्रमुखाने ;

त्याबद्दलची माहिती शक्यतोवर, विलंब न लावता नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यास किंवा आरोग्य अधिकाऱ्यास देणे हे त्याचे कर्तव्य असेल.

घातक रोग झालेले रुग्ण असल्याचा संशय असेल अशा ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकार.

**२४२.** मुख्य अधिकाऱ्यास, आरोग्य अधिकाऱ्यास किंवा मुख्य अधिकाऱ्याने किंवा आरोग्य अधिकाऱ्याने योग्य रीतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, दिवसा अथवा रात्री कोणत्याही वेळी सहाय्यकासह किंवा सहाय्यकाशिवाय, ज्या कोणत्याही जागेत घातक रोग झालेला रुग्ण असल्याबद्दल बातमी मिळाली असेल किंवा संशय येत असेल अशा जागेत किंवा जागेवर, तिला देणे वाजवी वाटेल अशी नोटीस दिल्यानंतर आणि कारखाना, कर्मशाळा, कामाच्या जागा, कार्यालये, धंद्याच्या जागा किंवा तत्सम ठिकाणे यांच्याबाबतीत कोणतीही नोटीस न देता, तपासणी करण्यासाठी, अन्वेषण करण्यासाठी व रोग पसरण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा इतर उपाययोजना लागू करण्यासाठी, प्रवेश करता येईल. अशा उपाययोजनेत, रोगसंसर्ग झालेल्या व्यक्तीस उपचाराकरिता, ज्या रुग्णालयात किंवा ज्या जागेत उक्त रोगाने पीडित असलेल्या व्यक्ती औषधोपचारासाठी दाखल करून घेतल्या जातात अशा कोणत्याही रुग्णालयात किंवा जागी हलविण्यासारख्या उपाययोजनांचा समावेश असेल आणि अशा रीतीने हलविण्यात आलेल्या व्यक्तीस, ज्या अधिकाऱ्याच्या किंवा ज्या व्यक्तीच्या आदेशानुसार तिला हलविण्यात आले असेल, त्यांच्या किंवा अशा रुग्णालयाच्या किंवा जागेच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, उक्त रुग्णालय किंवा जागा सोडून जाण्यास मनाई करता येईल :

परंतु, जिल्हाधिकाऱ्याने, कलम २४०, पोट-कलम (२) अन्वये घोषणा केली असेल त्या बाबतीत मुख्य अधिकारी, आरोग्य अधिकारी किंवा कोणतीही प्राधिकृत व्यक्ती यांनी ज्या कोणत्याही जागेत कोणताही घातक रोग झालेला रुग्ण असल्याबद्दल बातमी मिळाली असेल किंवा तसा संशय येत असेल अशा जागेत नोटिशीशिवाय प्रवेश करणे हे कायद्याला धरून असेल.

**२४३.** मुख्य अधिकारी किंवा आरोग्य अधिकारी किंवा मुख्य अधिकाऱ्याने अथवा आरोग्य अधिकाऱ्याने या बाबतीत रीतसर प्राधिकृत केलेला इतर कोणताही नगरपालिका अधिकारी यास लेखी नोटिशीद्वारे,—

मुख्य अधिकाऱ्याने किंवा आरोग्य अधिकाऱ्याने मालकास किंवा भोगवटादारास विवक्षित सावधगिरीच्या उपाययोजना करण्याबद्दल निदेश देणे आणि तसे करण्यात कसूर झाल्यास त्या स्वतः करणे.

(क) जेथे घातक रोग झालेला रुग्ण आहे अशा कोणत्याही इमारतीच्या किंवा इमारतींच्या भागाच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास अशी नोटीस देणाऱ्या अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने अशी इमारत साफ करण्याकरिता, तिला सफेदी करण्याकरिता किंवा ती जंतुविरहित करण्याकरिता किंवा अशा इमारतीतील कोणतीही वस्तू स्वच्छ किंवा जंतुविरहित करण्याकरिता भाग पाडता येईल ;

(ख) ज्या कोणत्याही हॉटेलात, खाणावळीत, धर्मशाळेत किंवा सराईमध्ये कोणी व्यक्ती घातक रोगाने आजारी असेल किंवा आजारी आहे असे वाटण्यास सयुक्तिक कारण असेल, असे कोणतेही हॉटेल, खाणावळ, धर्मशाळा किंवा सराई भाड्याने देऊ इच्छिणाऱ्या किंवा तेथे राहण्याच्या सोयीची तरतूद करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीने, अशी इमारत किंवा तिचा भाग, अशी नोटीस देणाऱ्या अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने साफ केल्यावाचून, तिला सफेदी केल्यावाचून किंवा ती जंतुविरहित केल्यावाचून व करीतोपर्यंत किंवा त्यामधील कोणतीही वस्तू स्वच्छ किंवा जंतुविरहित केल्याशिवाय किंवा करीतोपर्यंत भाड्याने देण्यास किंवा त्यामध्ये राहण्याच्या सोयीची तरतूद करण्यास मनाई करता येईल :

परंतु,—

(एक) मुख्य अधिकारी, आरोग्य अधिकारी किंवा असा प्राधिकृत अधिकारी यांच्या मते इमारतीचा मालक किंवा भोगवटादार अतिशय गरीब असल्याने इमारत जंतुविरहित करण्याचा, ती साफ करण्याचा किंवा तिला सफेदी करण्याचा खर्च देऊ शकत नसेल तर, त्याने नगरपालिकेच्या निधीतून ती इमारत जंतुविरहित किंवा स्वच्छ करावी किंवा तिला सफेदी करावी असा त्यास निदेश देता येईल ;

(दोन) जिल्हाधिकाऱ्याने कलम २४०, पोट-कलम (२) अन्वये घोषणा केली असेल त्या बाबतीत मुख्य अधिकाऱ्यास, आरोग्य अधिकाऱ्यास किंवा अशा प्राधिकृत अधिकाऱ्यास, नोटीस दिल्याशिवाय नगरपालिकेच्या निधीतून नगरपालिका कर्मचाऱ्यांकडून, कोणत्याही वेळी अशा रीतीने इमारत जंतुविरहित किंवा साफ करवून घेता येईल किंवा तिला सफेदी लावून घेता येईल.

**२४४.** (१) कोणत्याही विहिरीचे, तळ्याचे किंवा इतर ठिकाणचे पाणी पिण्यासाठी, स्नानासाठी, धुण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात आल्यास त्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात येण्याचा किंवा कोणत्याही घातक रोगाचा प्रसार होण्याचा संभव आहे असे नगरपरिषदेस दिसून आल्यास तिला,—

घातक रोग पसरण्याचा संभव असेल अशा पाण्याचा वापर करण्यास मनाई.

(एक) अशी विहीर, तळे किंवा इतर ठिकाणी त्यांच्या मालकास किंवा ते जिच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीस लेखी नोटिशीद्वारे, सार्वजनिक आरोग्यास होणाऱ्या धोक्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा कोणत्याही घातक रोगाच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असेल अशी उपाययोजना करण्यास भाग पाडता येईल.

(दोन) जाहीर नोटिशीद्वारे, अशा कोणत्याही प्रयोजनासाठी उक्त पाणी नेण्यास किंवा त्याचा वापर करण्यास मनाई करता येईल आणि अशी विहीर, तळे किंवा इतर ठिकाण यामधून असे पाणी नेण्यास किंवा त्याचा वापर करण्यास कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असतील असे उपाय योजता येतील :

परंतु, जेव्हा कलम २४० च्या पोट-कलम (२) अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून घोषणा करण्यात येईल तेव्हा, मुख्य अधिकाऱ्याने किंवा आरोग्य अधिकाऱ्याने, या पोट-कलमान्वये कार्यवाही करणे आणि केलेली कार्यवाही मान्यतेसाठी नगरपरिषदेस कळविणे कायद्यास धरून असेल.

(२) कोणतीही व्यक्ती, ज्याबाबत अशा प्रकारची कोणतीही जाहीर नोटीस काढण्यात आली असेल अशा कोणत्याही विहिरीचे, तळ्याचे किंवा इतर ठिकाणचे पाणी काढून नेणार नाही किंवा त्याचा वापर करणार नाही.

घातक रोगाचा प्रादुर्भाव होण्याची भीती उत्पन्न झाल्यावर नगरपरिषदेचे जादा अधिकार.

**२४५.** कलम २४० पोट-कलम (२) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने घोषणा केली असेल त्याबाबतीत, नगरपरिषदेस—

(क) कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने, राहण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या संसर्गदूषित इमारतीत किंवा तिच्या कोणत्याही भागात किंवा अशा इमारतीच्या लगतच्या अशा रीतीने वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही इमारतीत, नेहमी किंवा तात्पुरत्या राहणाऱ्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना ती इमारत किंवा तो भाग सोडून जाण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार असेल. मात्र उक्त आदेशामुळे बाधित झालेल्या सर्व व्यक्तींची राहण्याची सोय इतरत्र उपलब्ध असली पाहिजे किंवा तशी तरतूद करण्यात आली असली पाहिजे ;

(ख) कार्यकारी दंडाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने, ज्यामध्ये घातक रोग झालेला रुग्ण असेल किंवा राहून गेलेला असेल किंवा ज्यायोगे कोणत्याही धोकादायक रोगाचा प्रसार होण्याचा संभव असेल अशी कोणतीही अनारोग्यकारक छपरी किंवा झोपडी नष्ट करण्याचा आदेश देण्याचा अधिकार असेल ;

(ग) नगरपरिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्याच्या किंवा जिल्हा शल्यचिकित्सकाच्या लेखी नमूद केलेल्या मताप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत किंवा कोणत्याही परिस्थितीत किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी पन्नासहून अधिक लोक जमल्याने रोग पसरण्याचा किंवा तो अधिक प्राणघातक होण्याचा संभव असेल तर, अशा जागी किंवा अशा परिस्थितीत किंवा अशा प्रयोजनासाठी अशा प्रकारे जमण्यास, कोणत्याही वैयक्तिक प्रकरणात सर्वसाधारणपणे किंवा विशेष आदेशाद्वारे मनाई करण्याचा अधिकार असेल;

(घ) नगरपालिका क्षेत्राबाहेरील ठिकाणाहून येणाऱ्या किंवा कोणत्याही संसर्गदूषित इमारतीला लागून असलेल्या कोणत्याही इमारतीत राहणाऱ्या व्यक्तींची वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करण्याविषयी आणि जर आवश्यक असेल तर संसर्गदूषित झाल्याचा संशय असलेले त्याचे कपडे, बिछाना किंवा इतर वस्तू जंतुविरहित करण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार असेल ; तसेच अशा कोणत्याही व्यक्तीने आपले नाव व पत्ता द्यावा व विहित करण्यात येईल अशा वेळी व अशा जागी दहा दिवसांहून अधिक असणार नाही एवढ्या मुदतीपर्यंत वैद्यकीय तपासणीसाठी दररोज स्वतः हजर व्हावे असा निदेश देण्याचा अधिकार असेल.

घातक रोगा-संबंधातील तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

**२४६.** (१) जो कोणी, कलमे २३८, २३९, २४१, २४२, २४३ किंवा २४४ किंवा कलम २४५ च्या खंड (घ) च्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे जाणूनबुजून उल्लंघन करील किंवा कोणत्याही पूर्वोक्त कलमान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा फर्मानाचे पालन करणार नाही अथवा नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा नगरपरिषदेच्या

प्राधिकाराखाली काम करणाऱ्या इतर व्यक्तींना अशा कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करताना अडथळा करील, त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि अपराध करण्याचे चालू राहिल्याच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या प्रत्येक दिवशी असे उल्लंघन करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल त्यास आणखी वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) जो कोणी, कलमे २३८, २३९, २४१, २४२, २४३ किंवा २४४ च्या किंवा कलम २४५, खंड (क), (ख) किंवा (घ) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील किंवा उपरोक्त कोणत्याही खंडान्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा फर्मानाचे पालन करणार नाही किंवा नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा नगरपरिषदेच्या प्राधिकारान्वये काम करणाऱ्या व्यक्तीस, अशा कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करताना अडथळा करील, त्याचा अपराध सिद्ध झाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि अपराध चालू राहिल्याच्या बाबतीत, पहिला अपराध सिद्ध झाल्याच्या दिनांकानंतर, ज्या प्रत्येक दिवशी, असा अपराध करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी त्यास आणखी पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

भरपाई देणे.

**२४७.** नगरपरिषदेस स्वेच्छानिर्णयानुसार, कलमे २४२, २४३, २४४ आणि २४५ यांअन्वये करण्यात आलेल्या किंवा करणे आवश्यक झालेल्या कोणत्याही कारवाईमुळे जिची मोठ्या प्रमाणावर हानी किंवा नुकसानी झाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस त्याबद्दल भरपाई देता येईल. परंतु, नगरपरिषदेने ज्या भरपाईस मान्यता दिली असेल त्या व्यतिरिक्त, उपरोक्त कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाराच्या वापरामुळे जी कोणतीही हानी किंवा नुकसानी होईल त्याबद्दल भरपाई मिळण्याबद्दलचा कोणताही दावा सांगता येणार नाही.

जनावरांमधील रोग.

**२४८.** एखाद्या नगरपालिका क्षेत्रात कोणत्याही वेळी, गुरे, मेंढ्या, बकऱ्या किंवा इतर जनावरे यांमध्ये कोणत्याही संक्रामक रोगाचा प्रादुर्भाव होण्याची भीती असल्यास किंवा त्याचा प्रादुर्भाव झाल्यास, नगरपरिषद त्या रोगास किंवा त्याच्या प्रादुर्भावास किंवा त्याच्या प्रारंभास प्रतिबंध करण्यासाठी, त्यास प्रतिकार करण्यासाठी, त्याचे उपशमन करण्यासाठी किंवा त्याला आळा घालण्यासाठी तीस आवश्यक वाटतील अशा सर्व उपाययोजना करील आणि कलमे २३८ ते २४७ च्या तरतुदी अशा वेळी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

इमारतीच्या अंतर्भागातील अतिगर्दी कमी करण्यासाठी कार्यवाही.

**२४९.** (१) एखाद्या इमारतीच्या आतील बाजूस अतिगर्दी झाल्याने त्या इमारतीतील किंवा शेजारच्या कोणत्याही इमारतीतील रहिवाशांच्या आरोग्यास धोका किंवा अपाय होत आहे किंवा होण्याचा संभव आहे असे नगरपरिषदेस जेव्हा वाटेल तेव्हा, नगरपरिषदेस अशा अतिगर्दीस प्रतिबंध करण्याबद्दल आदेश मिळविण्याकरिता कार्यकारी दंडाधिकाऱ्यापुढे कार्यवाही चालविण्याची व्यवस्था करता येईल.

(२) तक्रार करण्यात आलेल्या अतिगर्दीमुळे रोग होण्याचा किंवा रोगाचा धोका उद्‌भवण्याचा संभव आहे अशा अभिप्रायाचे प्रमाणपत्र वैद्यकीय अधिकाऱ्याने सादर केल्यावर अशा दंडाधिकाऱ्यास, त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही आणखी चौकशी केल्यावर, इमारतीच्या मालकास सहा आठवड्यांहून अधिक नसेल अशा किंवा दहा दिवसांहून कमी नसेल अशा वाजवी मुदतीच्या आत उक्त इमारतीतील निवासीची, भाडेकऱ्यांची किंवा इतर सहवासींची संख्या त्यास विहित करणे आवश्यक वाटेल इतक्या मर्यादेपर्यंत कमी करण्यास भाग पाडता येईल किंवा त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा इतर आदेश देता येईल.

(३) उक्त इमारतीच्या मालकाने ती भाड्याने दिली असेल तर, तिच्यातील निवासी, भाडेकरी व प्रत्यक्ष सहवासी यांचा घरमालक हा या कलमाच्या प्रयोजनाकरिता त्या इमारतीचा मालक आहे असे समजण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) अन्वये ज्या कोणत्याही मालकावर फर्मान बजावण्यात आले असेल त्यास अशा फर्मानात विहित केलेल्या शर्ती पूर्ण करण्याकरिता उक्त इमारतीतील आवश्यक असतील तेवढ्या निवासी, भाडेकरी किंवा तीत प्रत्यक्ष राहणाऱ्या सहवासींना अशा फर्मानात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत अशी इमारत रिकामी करण्याविषयी ताबडतोब अशी लेखी नोटीस देणे भाग होईल व तसेच अशी नोटीस अशा ज्या कोणत्याही निवासींना, भाडेकऱ्यांना किंवा तीत राहणाऱ्या इतर सहवासींना मिळेल, त्यांनी तिचे पालन करणे बंधनकारक असेल.

(५) जो कोणताही मालक पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या कोणत्याही फर्मानात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर अशा फर्मानाचे उल्लंघन करून कोणत्याही इमारतीत अतिगर्दी होऊ देईल त्यास आणि पोट-कलम (४) अन्वये दिलेल्या नोटिशीनुसार जो कोणी अशी कोणतीही इमारत रिकामी करणार नाही त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, अशा फर्मानात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकनंतर ज्या प्रत्येक दिवशी अशी अतिगर्दी करण्याचे किंवा अशा रीतीने जागा रिकामी न करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

या प्रकरणाखालील अधिकार व आदेश मागे घेणे व त्यात फेरबदल करणे.

**२५०.** (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वेळी,---

(क) कलमे २३८ ते २४९ अन्वये देण्यात आलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार एखाद्या नगरपरिषदेकडून काढून घेता येतील ;

(ख) अशा कोणत्याही अधिकाराच्या वापराबाबत कोणत्याही नगरपरिषदेवर कोणत्याही मर्यादा, निर्बंध किंवा शर्ती लादता येतील ; अथवा

(ग) अशा कोणत्याही अधिकाराचा वापर करताना नगरपरिषदेने दिलेला कोणताही आदेश रद्द करता येईल.

(२) नगरपरिषदेने किंवा नगरपरिषदेच्या अधीन असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने, पूर्वोक्त कोणत्याही अधिकाराचा वापर करताना दिलेला प्रत्येक आदेश, असा अधिकार काढून घेण्यात आल्यावर, असा आदेश अंमलात असण्याचे बंद होण्यापूर्वी ज्या गोष्टी करण्यात आल्या असतील किंवा करावयाच्या राहून गेल्या असतील त्या व्यतिरिक्त, नगरपालिका क्षेत्रात अंमलात असण्याचे बंद होईल.

(३) राज्य शासनास, तत्सम अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वेळी पोट-कलम (१) अन्वये ज्या नगरपरिषदेकडून अधिकार काढून घेण्यात आले असतील अशा नगरपरिषदेस असे कोणतेही अधिकार पुन्हा देता येतील.

अतिगर्दी असलेल्या क्षेत्रासंबंधी विशेष अधिकार.

**२५१.** (१) नगरपालिका क्षेत्राच्या कोणत्याही भागातील कोणत्याही भोगवटादारास, किंवा त्या भागाच्या जवळपासच्या कोणत्याही रहिवाशास,—

(क) अशा क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या किंवा योजलेल्या इमारतीत किंवा इमारतींच्या गटांत ज्या रीतीने गर्दी झालेली आहे किंवा होण्याचा संभव आहे ती रीत ; अथवा

(ख) आधीच अस्तित्वात असलेल्या किंवा योजलेल्या अशा कोणत्याही इमारतीची किंवा इमारतींच्या गटाची साफसफाई करण्यातील असाध्य अडचणी ; अथवा

(ग) वर सांगितलेल्या प्रकारच्या कोणत्याही इमारतीत किंवा इमारतींच्या गटात जलनिस्सारणाच्या किंवा मेहतरकामाच्या साधनांचा अभाव किंवा त्यात अशा साधनांची व्यवस्था करण्यात येणारी अडचण ; अथवा

(घ) रस्ते किंवा इमारती किंवा इमारतींचे गट यांचा अरुंदपणा, कोंदटपणा, वाईट रचना किंवा वाईट स्थिती ;

यांपैकी कोणत्याही दोषामुळे रोग होण्याचा धोका निर्माण झाला आहे किंवा होण्याचा संभव आहे असे नगरपरिषदेला वाटले तर, नगरपरिषदेस, लगतपूर्वीच्या कलमान्वये तिच्या अधिकारांपैकी कोणताही अधिकार काढून घेण्यात आला नसल्यास, पुढील अधिकारांचा वापर करता येईल :—

(एक) खंड (क), (ख), (ग) किंवा (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दोषामुळे जेव्हा आधीच अस्तित्वात असलेल्या किंवा उभारण्यात येत असलेल्या कोणत्याही इमारतीमुळे किंवा इमारतींच्या गटामुळे वर सांगितलेल्या प्रकारचा धोका निर्माण झाला असेल किंवा नगरपरिषदेच्या मते निर्माण होण्याचा संभव असेल तेव्हा व नगरपरिषदेस योग्य वाटेल त्याप्रमाणे अशा इमारतीच्या किंवा अशी इमारत किंवा इमारतींचा गट ज्या जमिनीवर उभारलेला असेल किंवा उभारण्यात येत असेल त्या जमिनीच्या मालकाच्या नावे लेखी नोटीस काढून व ती अशा इमारतीच्या किंवा इमारतींच्या गटाच्या ठळक भागावर लावून, तिच्याद्वारे, ज्यांच्या नावे नोटीस काढली असेल त्या व्यक्तींनी नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वाजवी वेळेच्या आत अशी इमारत किंवा इमारतींचा गट पाडण्याविषयी किंवा काढून टाकण्याविषयी किंवा अशा धोक्यास प्रतिबंध करण्यासाठी नगरपरिषदेस आवश्यक वाटतील अशी त्यासंबंधीची बांधकामे किंवा उपाययोजना करण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार ;

(दोन) उक्त नोटीस ज्या व्यक्तींच्या नावे काढली असेल त्या व्यक्तींनी नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, अशी इमारत किंवा इमारतींचा गट पाडण्याची किंवा काढून टाकण्याची किंवा पूर्वी म्हटल्याप्रमाणे अशी बांधकामे किंवा उपाययोजना करण्यात हयगय केल्यास, नगरपालिकेकडून किंवा इतर अभिकरणाकडून तसे करविण्याचा अधिकार.

(२) जेव्हा पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या कोणत्याही नोटिशीनुसार कोणतीही इमारत पाडण्यात आली असेल तेव्हा, नगरपरिषद अशी इमारत या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदींविरुद्ध उभारण्यात आलेली नसल्यास, ती पाडल्यामुळे ज्या मालकाचे किंवा भोगवटादाराचे नुकसान झाले असेल त्यास वाजवी भरपाई देईल आणि भरपाईच्या रकमेसंबंधी विवाद निर्माण झाल्यास अशी रक्कम कलम ३३० मध्ये तरतूद करण्यात आलेल्या रीतीने निश्चित करण्यात किंवा ठरविण्यात येईल.

(३) या कलमान्वये कोणत्याही अधिकाराचा वापर करताना नगरपरिषदेने दिलेल्या कोणत्याही नोटिशीचा किंवा लादलेल्या कोणत्याही शर्तीचा जो कोणी भंग करील, त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

## प्रकरण अठरा

## शवांची व जनावरांच्या मृतदेहांची विल्हेवाट

नगरपरिषदेने दहनभूमी व दफनभूमी यांची तरतूद करणे किंवा त्यासाठी परवानगी देणे.

**२५२.** (१) नगरपरिषदेस, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने, प्रेतांच्या दहनासाठी किंवा दफनासाठी किंवा त्यांची अन्य रीतीने विल्हेवाट लावण्यासाठी योग्य जागांची तरतूद करता येईल आणि अशा कोणत्याही जागेचा वापर करण्यासाठी किंवा कोणत्याही वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी, नगरपरिषद वेळोवेळी ठरवील, अशी फी आकारता येईल.

(२) नगरपरिषदेची परवानगी असल्याखेरीज, कोणतीही व्यक्ती, नेमलेल्या दिवसानंतर प्रेतांच्या विल्हेवाटीसाठी नगरपालिका क्षेत्रात कोणतीही नवीन जागा खुली करणार नाही किंवा त्यासाठी तरतूद करणार नाही :

परंतु,—

(एक) जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय नगरपरिषद अशी कोणतीही परवानगी देणार नाही.

(दोन) अशी परवानगी देताना जिल्हाधिकाऱ्याची मंजुरी घेऊन नगरपरिषदेने तिला योग्य वाटतील अशा शर्ती लादणे कायद्याला धरून असेल.

(३) नगरपरिषदेस, कोणत्याही वेळी सर्वसाधारण किंवा विशेष नोटिशीद्वारे, नेमलेल्या दिवशी प्रेतांची व्यवस्था लावण्यासाठी असलेली कोणतीही जागा ज्या कोणत्याही व्यक्तीच्या मालकीची असेल किंवा जी व्यक्ती उक्त जागेची व्यवस्था ठेवीत असेल त्या व्यक्तीस अशी जागा सुस्थितीत व आरोग्यप्रद स्थितीत ठेवण्यासाठी, उक्त नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा उपाययोजना करण्याबद्दल भाग पाडता येईल किंवा उक्त जागा बंद करण्यासाठी लगतनंतरच्या कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(४) पोट-कलम (२) अन्वये लादावयाच्या शर्ती किंवा पोट-कलम (३) अन्वये करणे आवश्यक असतील अशा उपाययोजना, शवांची विल्हेवाट लावण्यासाठी ठेवलेल्या जागांचा उपयोग करण्याचा हक्क ज्या समाजास किंवा समाजाच्या गटास असेल त्यांच्या धार्मिक रिवाजांकडे योग्य लक्ष पुरवून, अशा जागा सुस्थितीत ठेवण्यासाठी नगरपरिषदेकडून करण्यात येतील अशा कोणत्याही उपविधींशी विसंगत असणार नाहीत.

(५) पोट-कलम (२) च्या कोणत्याही तरतुदीचे जी कोणतीही व्यक्ती उल्लंघन करील ती व्यक्ती अपराध सिद्ध झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

शवांची विल्हेवाट लावण्याच्या जागा बंद करणे.

**२५३.** (१) शवांची विल्हेवाट लावण्याची कोणतीही जागा आरोग्यास हानिकारक होईल अशा किंवा आरोग्यास हानिकारक होण्याचा संभव असलेल्या स्थितीत आहे किंवा अशी कोणतीही जागा इतर कोणत्याही कारणासाठी बंद करण्यात यावी असे नगरपरिषदेचे मत झाल्यास, नगरपरिषदेस आपले मत त्याबद्दलच्या कारणांसह जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करता येईल आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, त्यास अशी आणखी जी कोणतीही चौकशी करवणे योग्य वाटेल ती करविल्यानंतर, अधिसूचनेद्वारे, तीत याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकपासून, अशा जागेचा असा वापर बंद करण्याबद्दल निदेश देता येईल.

(२) उक्त अधिसूचनेची तिच्या मराठी भाषांतरासहित एक प्रत, एखादे स्थानिक वर्तमानपत्र असल्यास त्यात प्रसिद्ध करण्यात येईल आणि ती नगरपालिका कार्यालयात आणि उक्त अधिसूचना ज्या जागेच्या संबंधात असेल त्या जागेतील किंवा जागेजवळील एका किंवा अधिक अशा ठळक ठिकाणी लावण्यात येईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, अशा कोणत्याही जागेत, ती जागा बंद करण्यात आल्याबद्दलच्या उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकानंतर कोणतेही प्रेत पुरील किंवा त्याची अन्यथा विल्हेवाट लावील तीस, अपराध सिद्ध झाल्यानंतर दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**२५४.** (१) मुख्य अधिकाऱ्याच्या परवानगीखेरीज कोणतीही व्यक्ती,— शवाची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात मनाई केलेली कृत्ये.

(क) जाळण्याच्या, पुरण्याच्या किंवा अन्यथा विल्हेवाट लावण्याच्या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या जागेखेरीज इतर जागी कोणतेही प्रेत जाळणार नाही पुरणार नाही किंवा अन्यथा त्याची विल्हेवाट लावणार नाही ;

(ख) मृत्यूनंतर एखादे प्रेत, उपद्रव निर्माण होईल एवढ्या वेळेपर्यंत कोणत्याही जागेवर, जाळल्याशिवाय, पुरल्याशिवाय, किंवा त्याची इतर रीतीने कायदेशीररित्या विल्हेवाट लावल्याशिवाय ठेवणार नाही ;

(ग) एखादे प्रेत चांगल्या रीतीने आच्छादलेले असल्याशिवाय किंवा आच्छादून ठेवल्याशिवाय किंवा सार्वजनिक आरोग्यास रोग संक्रमणाचा धोका होण्यास किंवा अपाय होण्यास प्रतिबंध करण्यासाठी नगरपरिषदेस जाहीर नोटिशीद्वारे, वेळोवेळी जे सावधगिरीचे उपाय योजण्यास फर्मावणे योग्य वाटेल ते न योजता, कोणत्याही रस्त्यातून नेणार नाही ;

(घ) मात्र, जेव्हा इतर कोणताही रस्ता उपलब्ध नसेल त्यावेळी, ज्या रस्त्यावरून प्रेत नेण्यास नगरपरिषदेने याबाबत काढलेल्या जाहीर नोटिशीद्वारे प्रतिबंध केला असेल अशा कोणत्याही रस्त्यावरून प्रेत नेता येईल ;

(ङ) जे विच्छेदनासाठी ठेवले असेल किंवा विच्छेदनाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आले असेल असे प्रेत बंद पेटीत किंवा वाहनात घातल्याशिवाय इतर रीतीने हलविणार नाही ;

(च) प्रेत नेत असताना निकडीची आवश्यकता असल्याखेरीज ते कोणत्याही रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ ठेवणार किंवा सोडून जाणार नाही ;

(छ) ज्यात पूर्वीच प्रेत पुरलेले असेल असे थडगे किंवा प्रेतकक्षक हे, दुसरे प्रेत पुरवण्याकरिता पुन्हा उघडणार नाही ;

(ज) कोणतेही प्रेत दहनभूमीत आणल्यानंतर किंवा आणविल्यानंतर अशा भूमीत ते आणल्यापासून सहा तासांच्या आत प्रेत जाळण्यात किंवा जाळण्याची व्यवस्था करण्यात कसूर करणार नाही ;

(झ) कोणतेही प्रेत किंवा प्रेताचा भाग जाळताना किंवा जाळण्याची व्यवस्था करताना असे प्रेत किंवा त्याचा कोणताही भाग याची पूर्णपणे राख झाल्यावाचून राहू देणार नाही किंवा असे प्रेत किंवा प्रेताचा भाग वाहून नेण्याकरिता किंवा जाळण्याकरिता वापरलेले कोणतेही कापड किंवा इतर वस्तू नेऊ देणार नाही किंवा ती पूर्णपणे राख झाल्यावाचून जाळण्याच्या जागी किंवा अशा जागेजवळ राहू देणार नाही ;

१८९८ चा ५. (ञ) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* चे कलम १७६ च्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींन्वये असेल त्या व्यतिरिक्त, शवांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या कोणत्याही जागेतून कोणतेही शव उकरून काढणार नाही.

---

* आता फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनासाठी "शव" या संज्ञेत, त्याच्या कोणत्याही भागाचा समावेश होईल.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

शवाची विल्हेवाट लावण्यासाठी प्रमाणपत्र.

**२५५.** शवाची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या कोणत्याही जागेची प्रभारी व्यक्ती, मृत्यू झाल्याचा दिनांक, वेळ व त्याचे कारण विनिर्दिष्ट करणारे नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींच्या सहीचे प्रमाणपत्र किंवा मुख्य अधिकाऱ्याने किंवा त्या भागात राहणाऱ्या परिषद सदस्याने सही केलेले ना हरकत प्रमाणपत्र सादर करण्यात आल्याशिवाय, अशा जागी कोणत्याही शवाची विल्हेवाट लावण्यास परवानगी देणार नाही.

मृत जनावरांची विल्हेवाट.

**२५६.** (१) नगरपरिषदेस, जनावरांच्या प्रेतांची व्यवस्था लावण्यासाठी जागांची तरतूद करता येईल आणि जनावरांच्या प्रेतांची विल्हेवाट लावण्यासंबंधातील बाबींचे विनियमन करणारे उपविधी तयार करता येतील.

(२) नगरपरिषदेने किंवा नगरपरिषदेच्या अभिकरणामार्फत पुरविलेल्या कोणत्याही जागेत जनावरांच्या प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपरिषद वेळोवेळी ठरवील अशा दराने नगरपरिषदेस फी सुद्धा आकारता येईल.

## प्रकरण एकोणीस

## जीवनविषयक आकडेवारी

नगरपरिषदेने नोंदणीसाठी निधीची तरतूद करणे व कर्मचारी-वर्ग नेमणे.

**२५७.** आरोग्य अधिकारी किंवा आरोग्य अधिकारी नसेल तर, नगरपरिषद याबाबतीत नेमील असा अन्य अधिकारी हा, नगरपालिका क्षेत्रासाठी निबंधक, जन्म आणि मृत्यू, असेल.

जन्म व मृत्यूच्या नोंदवह्या.

**२५८.** (१) प्रत्येक निबंधक, शासनाचा आरोग्य संचालक, वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात जन्मासंबंधीच्या व मृत्युसंबंधीच्या वेगवेगळ्या नोंदवह्या ठेवील किंवा ठेवण्याची व्यवस्था करील आणि त्यात नगरपालिका क्षेत्रात घडून येणाऱ्या प्रत्येक जन्मासंबंधीची व मृत्यूसंबंधीची नोंद करील.

(२) आरोग्य संचालक तसे करण्याबद्दल फर्मावील तर निबंधक मृतजात बालकाच्या जन्मासंबधीच्या नोंदणीसाठी वेगळी नोंदवही ठेवील.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) मृतजात बालक म्हणजे गरोदरपणातील अठ्ठाविसाव्या आठवड्यानंतर जे मूल त्याच्या मातेच्या उदरातून बाहेर आले असेल आणि आपल्या मातेच्या उदरातून बाहेर आल्यानंतर कोणत्याही वेळी ज्याने श्वासोच्छवास केला नसेल किंवा ज्याने जिवंत असल्याबद्दलचे इतर कोणतेही लक्षण दर्शविले नसेल असे बालक ; आणि

(ख) जन्मलेले व कोणत्याही वेळेपर्यंत—मग अशी वेळ कितीही अल्प असो—जिवंत असलेल्या कोणत्याही बालकाची नोंद जिवंत बालक म्हणून करण्यात येईल.

**२५९.** (१) कोणत्याही रुग्णालयात, प्रसूतिगृहात किंवा शुश्रूषालयात जन्मलेल्या प्रत्येक मुलाच्या बाबतीत, अशा रुग्णालयाच्या, प्रसूतिगृहाच्या किंवा शुश्रूषालयाच्या प्रभारी वैद्यक व्यवसायीने मुलाचा जन्म झाल्यानंतर सात दिवसांच्या आत—मग असे मूल मृत, जिवंत किंवा मृतजात असो—याबाबतीत करण्यात आलेल्या उपविधींद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा जन्माबाबतची नोटीस निबंधकाकडे पाठवणे हे त्याचे कर्तव्य असेल. जन्माबद्दलची खबर देणे.

(२) ज्या मुलाचा जन्म नगरपालिका क्षेत्रात झाला असेल, परंतु रुग्णालयात किंवा प्रसूतिगृहात किंवा शुश्रूषालयात झाला नसेल अशा प्रत्येक मुलाच्या बाबतीत,—

(क) अशा मुलाच्या जन्माच्या वेळी सहाय्य करणारा वैद्यक व्यवसायी, परिचारिका किंवा प्रसाविका यांनी ;

(ख) अशा वैद्यक व्यवसायीने, परिचारिकेने किंवा प्रसाविकेने न कळविल्यास मुलाच्या आई-वडिलांनी ; आणि

(ग) मुलाच्या आईवडिलांनी न कळविल्यास, मूल ज्या इमारतीत जन्मले असेल त्या इमारतीच्या भोगवटादाराने आणि जन्माच्यावेळी उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने आणि मूल ताब्यात असणाऱ्या व्यक्तीने ;

आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे निबंधकास, अशा जन्मासंबंधीची माहिती अशा जन्मानंतर सात दिवसांच्या आत, या बाबतीत करण्यात आलेल्या उपविधींद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात देणे, हे त्याचे किंवा तिचे कर्तव्य असेल :

परंतु, मुलाच्या आईच्या बाबतीत, हे पोट-कलम, जणू "सात दिवस" या मजकुराऐवजी "एक महिना" हा मजकूर दाखल करण्यात आला आहे, असे समजून लागू होईल :

परंतु आणखी असे की, केवळ दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने न कळविल्यामुळे ज्या व्यक्तीने माहिती देणे भाग आहे त्या व्यक्तीला, अशी माहिती देण्याची प्राथमिक जबाबदारी असलेल्या, व्यक्तींनी अगोदरच ती दिलेली होती असे वाटत असेल आणि तसे वाटण्यास वाजवी कारणे असतील तर, अशी माहिती देणे बंधनकारक असणार नाही.

(३) अनौरस मुलाच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीस, अशा मुलाचे वडील म्हणून, अशा मुलाच्या जन्मासंबंधी माहिती देण्यास भाग पाडले जाणार नाही आणि अशा मुलाची आई आणि अशा मुलाचा बाप असल्याचे कबूल करणारी व्यक्ती यांनी संयुक्त विनंती केलेली असल्याखेरीज निबंधक, कोणत्याही व्यक्तीचे नाव अशा मुलाचा बाप म्हणून नोंदवहीत दाखल करणार नाही आणि अशा बाबतीत अशी व्यक्ती व मुलाची आई नोंदवहीत सही करील.

**२६०.** कोणतेही नवजात बालक उघड्यावर आढळल्यास, असे बालक जिला आढळले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने आणि जिच्या ताब्यात असे बालक देण्यात येईल अशा कोणत्याही व्यक्तीने आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे अशा बालकाच्या जन्मासंबंधीच्या ज्या तपशीलांची नोंद करणे आवश्यक असेल अशा तपशीलासंबंधी उक्त व्यक्तीस असेल अशी माहिती, असे बालक आढळल्यानंतर सात दिवसांच्या आत, निबंधकास देणे हे तिचे कर्तव्य असेल. बेवारशी मुलांबद्दल माहिती देणे.

**२६१.** जेव्हा कोणत्याही मुलाच्या जन्मासंबंधीची नोंद करण्यात आली असेल आणि— मुलाच्या नावाबाबत खबर देणे.

(क) ज्या कोणत्याही नावाने त्याची नोंद करण्यात आली असेल, त्या नावात जर फेरफार करण्यात आला ; किंवा

(ख) जर नावाशिवाय त्याची नोंद करण्यात आली असेल आणि नंतर त्याला नाव देण्यात आले असेल,

तेव्हा अशा मुलाच्या आई-वडिलांना किंवा पालकांस किंवा अशा नावात बदल करवून घेणाऱ्या किंवा असे नाव देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, जन्मनोंदणी झाल्यापासून पुढील बारा महिन्यांच्या आत, नाव किंवा फेरफार केलेले नाव, निबंधकास कळविता येईल आणि अशी खबर मिळाल्यानंतर निबंधक मूळ नोंदीत कोणतीही खाडाखोड न करता, यथास्थिति, मुलाचे नाव किंवा फेरफार करण्यात आलेले नाव याची नोंदवहीत ताबडतोब नोंद करील.

मृत्यूबद्दल खबर देणे.

**२६२.** (१) प्रत्येक रुग्णालयातील किंवा प्रसूतिगृहातील किंवा शुश्रूषालयातील प्रभारी वैद्यक व्यवसायी, रुग्णालयात, प्रसूतिगृहात किंवा शुश्रूषालयात झालेल्या प्रत्येक मृत्यूबद्दलची खबर, आणि अशा प्रत्येक मृत्यूचे कारण, असा मृत्यू झाल्यापासून बारा तासांच्या आत, निबंधकाकडे पाठवील.

(२) नगरपालिका क्षेत्रामध्ये परंतु, रुग्णालयाच्या, प्रसूतिगृहाच्या किंवा शुश्रूषालयाच्या बाहेर घडून येणाऱ्या प्रत्येक मृत्यूच्या बाबतीत,—

(एक) मृताच्या मृत्यूसमयी उपस्थित असलेल्या किंवा मृताच्या शेवटच्या आजारात त्याची शुश्रूषा करणाऱ्या त्याच्या अगदी जवळच्या नातेवाईकाने ; आणि

(दोन) अशा नातेवाईकाने न कळविल्यास, मृत्यूसमयी उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने आणि ज्या जागेत मृत्यू घडला असेल त्या जागेच्या भोगवटादाराने, राखणदाराने किंवा व्यवस्थापकाने ;

आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे अशा मृत्यूची सूचना आणि अशा मृत्यूचे कारण, प्रेताची विल्हेवाट लावण्यापूर्वी किंवा मृत्यू घडून आल्यापासून चोवीस तासांच्या आत, यांपैकी जो कालावधी अगोदरचा असेल त्या कालावधीच्या आत, निबंधकास देणे, हे त्याचे कर्तव्य असेल :

परंतु, दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने न कळविल्यास ज्या व्यक्तीने खबर देणे आवश्यक असेल अशा व्यक्तीस, अशी सूचना अगोदरच देण्यात आलेली आहे असे वाटत असेल किंवा असे वाटण्यात तिला वाजवी कारण असतील तर, अशी सूचना देणे तिच्यावर बंधनकारक असणार नाही.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये द्यावयाची खबर या बाबतीत केलेल्या उपविधींद्वारे विहित केलेल्या नमुन्यात दिली जाईल.

वैद्यक व्यवसायीचे प्रतिवेदन.

**२६३.** नगरापालिका क्षेत्रामध्ये परंतु रुग्णालयाच्या, प्रसूतिगृहाच्या किंवा शुश्रूषालयाच्या बाहेर मरण पावलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या शेवटच्या आजारात उपचार करणारा प्रत्येक वैद्यक व्यवसायी अशा व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे त्यास कळल्यापासून चोवीस तासांच्या आत, आपल्या पराकाष्ठा निर्णयशक्तीनुसार, मृत्यूचे कारण नमूद करून निबंधकाकडे लेखी माहिती पाठवील आणि अशा माहितीमध्ये नमूद केलेले कारण वैद्यक व्यवसायीच्या नावासहित मृत्यूच्या नोंदवहीत दाखल करण्यात येईल. अशी माहिती ही, याबाबतीत केलेल्या उपविधींद्वारे विहित केलेल्या नमुन्याप्रामाणे असेल.

नोंदवहीतील चुकांची दुरुस्ती.

**२६४.** (१) जन्माच्या नोंदवहीत किंवा मृत्यूच्या नोंदवहीत कोणताही लेखनदोष कोणत्याही वेळी आढळून आला तर, निबंधकास तो दुरुस्त करता येईल.

(२) अशा कोणत्याही नोंदवहीतील वस्तुस्थितीविषयक किंवा सारविषयक कोणतीही चूक, अशी चूक दुरुस्त करण्याची मागणी करणाऱ्या व्यक्तीने, ज्या संदर्भात चूक झालेली असेल त्या जन्मासंबंधी किंवा मृत्यूसंबंधी माहिती या अधिनियमान्वये ज्यांनी देणे आवश्यक असेल अशा दोन व्यक्तींनी किंवा अशा व्यक्तींनी न दिल्यास त्या प्रकरणाची माहिती असणाऱ्या दोन विश्वसनीय व्यक्तींनी, दंडाधिकाऱ्यासमोर शपथेवर केलेले आणि आपल्या समक्ष करण्यात आले आहे असे दंडाधिकाऱ्याने प्रमाणित केलेले, चुकीचे स्वरूप आणि प्रकरणाची खरी हकीकत नमूद असलेले प्रतिज्ञापत्र, निबंधकापुढे सादर केल्यानंतर निबंधकाला मूळ नोंदीत कोणतीही फेरफार न करता, समासात नोंद करून दुरुस्त करता येईल :

परंतु, कोणत्याही मरणान्वेषणावरून किंवा न्यायचौकशीवरून मृत्यूचे कारण मृत्यूच्या नोंदवहीत नमूद केलेल्या कारणापेक्षा निराळे आहे असे आढळून आल्यास, निबंधक मरणान्वेषणात किंवा न्यायचौकशीत सिद्ध झालेले कारण नोंदवहीत नमूद करण्यासाठी नोंदवहीत दुरुस्ती करील.

(३) असे प्रतिज्ञापत्र, या बाबतीत केलेल्या उपविधींद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

(४) वर सांगितले असेल त्याव्यतिरिक्त, अशा कोणत्याही नोंदवहीत कोणताही फेरफार केला जाणार नाही.

जन्म आणि मृत्यूबद्दलची माहिती न दिल्याबद्दल आणि खोटी निवेदने केल्याबद्दल शास्ती.

**२६५.** (१) जो कोणी, कलम २५९, २६०, २६२ किंवा २६३ अनुसार आवश्यक असलेली माहिती देण्यात कसूर करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) जो कोणी, जन्माच्या किंवा मृत्यूच्या नोंदवहीत समाविष्ट करण्याच्या हेतूने कोणतीही खोटी निवेदने करील किंवा करवील, त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

## प्रकरण वीस

## बाजार, कत्तलखाने, व्यापार आणि व्यवसाय

### (१) बाजार आणि कत्तलखाने

नगरपालिका बाजार आणि कत्तलखाने यांची तरतूद करण्याचा आणि ते सुस्थितीत ठेवण्याचा अधिकार.

**२६६.** (१) नगरपरिषदेला, नगरपालिका बाजार किंवा नगरपालिका कत्तलखाने स्थापन करण्याच्या किंवा कोणत्याही विद्यमान नगरपालिका बाजार किंवा कत्तलखाना यांची वाढ किंवा सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही इमारत बांधता येईल किंवा कोणतीही इमारत किंवा जमीन खरेदी करता येईल, पट्ट्याने घेता येईल किंवा अन्य रीतीने संपादन करता येईल आणि वेळोवेळी अशा नगरपालिका बाजारात किंवा कत्तलखान्यात व्यापार किंवा धंदा करणाऱ्या किंवा तेथे येणाऱ्या लोकांच्या उपयोगासाठी तीस योग्य वाटतील असे नगरपालिका बाजार, कत्तलखाने आणि असे गाळे, दुकाने, छपरे, कोंडवाडे आणि इतर इमारती किंवा सोयीच्या जागा बांधता येतील व त्या सुस्थितीत ठेवता येतील आणि अशा नगरपालिका बाजारामध्ये तेथे विकण्यात येणाऱ्या मालाचे वजन करण्यासाठी व तो मापण्यासाठी नगरपालिकेस योग्य वाटतील अशी यंत्रे, वजने, तराजू आणि मापे यांची तरतूद करता येईल व ती सुस्थितीत ठेवता येतील.

(२) नगरपरिषदेला, कोणत्याही वेळी, कोणताही नगरपालिका बाजार किंवा नगरपालिका कत्तलखाना किंवा त्याचा कोणताही भाग तात्पुरता किंवा कायमचा बंद करता येईल.

खाजगी बाजार वगैरे लायसनशिवाय न भरविणे.

**२६७.** (१) या बाबतीत केलेल्या उपविधींच्या तरतुदींनुसार देण्यात आलेल्या लायसन्सच्या शर्तीअन्वये व तद्नुसार असेल त्या व्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती, कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात कोणत्याही जागेचा--

(एक) खाजगी बाजार म्हणून ; किंवा

(दोन) खाजगी कत्तलखाना म्हणून ; किंवा

(तीन) मानवी खाद्यासाठी मांस किंवा मासे किंवा जनावरे किंवा पक्षी ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या विक्रीसाठी,

उपयोग करणार नाही किंवा करू देणार नाही :

परंतु, गच्च सीलबंद केलेल्या पात्रातील मांस किंवा मासे विकण्याकरिता किंवा साठविण्याकरिता या कलमान्वये कोणत्याही लायसन्सची आवश्यकता असणार नाही ;

(२) जो कोणी, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, लायसन्सशिवाय, किंवा पोट-कलम (१) अन्वये ज्या शर्तीस अधीन राहून, लायसन्स देण्यात आले असेल त्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून कोणत्याही जागेचा उपयोग करील किंवा उपयोग करण्यास परवानगी देईल तर त्यास, अपराध सिद्ध-झाल्यानंतर, जर पोट-कलम (१), खंड (एक) किंवा (दोन) चे उल्लंघन करण्यात आले असेल तर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि जर त्या पोट-कलमाच्या खंड (तीन) चे उल्लंघन करण्यात आले असेल तर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि उक्त खंड (एक) किंवा (दोन) चे उल्लंघन करण्याचे चालू राहिल्यास, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या दिवशी असे उल्लंघन करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पन्नास रुपये इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि उक्त खंड (तीन) चे उल्लंघन करण्याचे चालू राहिल्यास, अशा प्रत्येक दिवसाबद्दल आणखी दहा रुपये इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

नगरपालिका क्षेत्राबाहेरील कत्तलखाने वगैरे.

**२६८.** (१) जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीने, नगरपरिषदेने, नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीबाहेर नगरपालिका कत्तलखाने स्थापन करणे किंवा खाजगी कत्तलखान्यांना लायसन्स देणे हे कायदेशीर असेल आणि नगरपालिका क्षेत्रातील अशा कत्तलखान्यासंबंधी या अधिनियमाच्या आणि तदन्वये अंमलात असलेल्या उपविधींच्या सर्व तरतुदी या कलमान्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन्स दिलेल्या कत्तलखान्यांच्याबाबतीत ते जणू त्या नगरपालिका क्षेत्रामध्ये आहेत, असे समजून पूर्णपणे अंमलात येतील.

(२) नगरपरिषदेने, नगरपालिका कत्तलखान्यात किंवा पोट-कलम (१) अन्वये नगरपरिषदेने लायसन्स दिलेल्या कत्तलखान्यात कत्तल केलेल्या जनावरांच्या मांसाव्यतिरिक्त कोणतेही मांस नगरपालिका क्षेत्रात आणण्यास प्रतिबंध करणे, हे कायदेशीर असेल.

(३) पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट, खारवलेल्या किंवा संस्करण केलेल्या मांसाच्या बाबतीत लागू होते असे समजले जाणार नही.

विक्रीकरिता जनावरांची कत्तल करण्यावर निर्बंध.

**२६९.** (१) कोणतीही व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीवाचून, नगरपालिका कत्तलखान्याव्यतिरिक्त किंवा लायसन्स दिलेल्या खाजगी कत्तलखान्याव्यतिरिक्त नगरपालिका क्षेत्रात मांस विकण्यासाठी किंवा पुरविण्यासाठी कोणत्याही जनावराची कत्तल करणार नाही किंवा त्याची कत्तल करविणार नाही.

(२) अशा कोणत्याही नोंदवहीतील वस्तुस्थितीविषयक किंवा सारविषयक कोणतीही चूक, अशी चूक दुरुस्त करण्याची मागणी करणाऱ्या व्यक्तीने, ज्या संदर्भात चूक झालेली असेल त्या जन्मासंबंधी किंवा मृत्यूसंबंधी माहिती या अधिनियमान्वये ज्यांनी देणे आवश्यक असेल अशा दोन व्यक्तींनी किंवा अशा व्यक्तींनी न दिल्यास त्या प्रकरणाची माहिती असणाऱ्या दोन विश्वसनीय व्यक्तींनी, दंडाधिकाऱ्यासमोर शपथेवर केलेले आणि आपल्या समक्ष करण्यात आले आहे असे दंडाधिकाऱ्याने प्रमाणित केलेले, चुकीचे स्वरूप आणि प्रकरणाची खरी हकीकत नमूद असलेले प्रतिज्ञापत्र, निबंधकापुढे सादर केल्यानंतर निबंधकाला मूळ नोंदीत कोणतीही फेरफार न करता, समासात नोंद करून दुरुस्त करता येईल :

परंतु, कोणत्याही मरणान्वेषणावरून किंवा न्यायचौकशीवरून मृत्यूचे कारण मृत्यूच्या नोंदवहीत नमूद केलेल्या कारणापेक्षा निराळे आहे असे आढळून आल्यास, निबंधक मरणान्वेषणात किंवा न्यायचौकशीत सिद्ध झालेले कारण नोंदवहीत नमूद करण्यासाठी नोंदवहीत दुरुस्ती करील.

(३) असे प्रतिज्ञापत्र, या बाबतीत केलेल्या उपविधींद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

(४) वर सांगितले असेल त्याव्यतिरिक्त, अशा कोणत्याही नोंदवहीत कोणताही फेरफार केला जाणार नाही.

जन्म आणि मृत्यूबद्दलची माहिती न दिल्याबद्दल आणि खोटी निवेदने केल्याबद्दल शास्ती.

**२६५.** (१) जो कोणी, कलम २५९, २६०, २६२ किंवा २६३ अनुसार आवश्यक असलेली माहिती देण्यात कसूर करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(२) जो कोणी, जन्माच्या किंवा मृत्यूच्या नोंदवहीत समाविष्ट करण्याच्या हेतूने कोणतीही खोटी निवेदने करील किंवा करवील, त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

## प्रकरण वीस

## बाजार, कत्तलखाने, व्यापार आणि व्यवसाय

### (१) बाजार आणि कत्तलखाने

नगरपालिका बाजार आणि कत्तलखाने यांची तरतूद करण्याचा आणि ते सुस्थितीत ठेवण्याचा अधिकार.

**२६६.** (१) नगरपरिषदेला, नगरपालिका बाजार किंवा नगरपालिका कत्तलखाने स्थापन करण्याच्या किंवा कोणत्याही विद्यमान नगरपालिका बाजार किंवा कत्तलखाना यांची वाढ किंवा सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही इमारत बांधता येईल किंवा कोणतीही इमारत किंवा जमीन खरेदी करता येईल, पट्ट्याने घेता येईल किंवा अन्य रीतीने संपादन करता येईल आणि वेळोवेळी अशा नगरपालिका बाजारात किंवा कत्तलखान्यात व्यापार किंवा धंदा करणाऱ्या किंवा तेथे येणाऱ्या लोकांच्या उपयोगासाठी तीस योग्य वाटतील असे नगरपालिका बाजार, कत्तलखाने आणि असे गाळे, दुकाने, छपरे, कोंडवाडे आणि इतर इमारती किंवा सोयीच्या जागा बांधता येतील व त्या सुस्थितीत ठेवता येतील आणि अशा नगरपालिका बाजारामध्ये तेथे विकण्यात येणाऱ्या मालाचे वजन करण्यासाठी व तो मापण्यासाठी नगरपालिकेस योग्य वाटतील अशी यंत्रे, वजने, तराजू आणि मापे यांची तरतूद करता येईल व ती सुस्थितीत ठेवता येतील.

(२) नगरपरिषदेला, कोणत्याही वेळी, कोणताही नगरपालिका बाजार किंवा नगरपालिका कत्तलखाना किंवा त्याचा कोणताही भाग तात्पुरता किंवा कायमचा बंद करता येईल.

खाजगी बाजार वगैरे लायसनशिवाय न भरविणे.

**२६७.** (१) या बाबतीत केलेल्या उपविधींच्या तरतुदींनुसार देण्यात आलेल्या लायसन्सच्या शर्तीअन्वये व तद्नुसार असेल त्या व्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती, कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात कोणत्याही जागेचा—

(एक) खाजगी बाजार म्हणून ; किंवा

(दोन) खाजगी कत्तलखाना म्हणून ; किंवा

(तीन) मानवी खाद्यासाठी मांस किंवा मासे किंवा जनावरे किंवा पक्षी ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या विक्रीसाठी,

उपयोग करणार नाही किंवा करू देणार नाही :

परंतु, गच्च सीलबंद केलेल्या पात्रातील मांस किंवा मासे विकण्याकरिता किंवा साठविण्याकरिता या कलमान्वये कोणत्याही लायसन्सची आवश्यकता असणार नाही ;

(२) जो कोणी, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी, लायसन्सशिवाय, किंवा पोट-कलम (१) अन्वये ज्या शर्तीस अधीन राहून, लायसन्स देण्यात आले असेल त्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून कोणत्याही जागेचा उपयोग करील किंवा उपयोग करण्यास परवानगी देईल तर त्यास, अपराध सिद्ध-झाल्यानंतर, जर पोट-कलम (१), खंड (एक) किंवा (दोन) चे उल्लंघन करण्यात आले असेल तर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि जर त्या पोट-कलमाच्या खंड (तीन) चे उल्लंघन करण्यात आले असेल तर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि उक्त खंड (एक) किंवा (दोन) चे उल्लंघन करण्याचे चालू राहिल्यास, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या दिवशी असे उल्लंघन करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पन्नास रुपये इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि उक्त खंड (तीन) चे उल्लंघन करण्याचे चालू राहिल्यास, अशा प्रत्येक दिवसाबद्दल आणखी दहा रुपये इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

नगरपालिका क्षेत्राबाहेरील कत्तलखाने वगैरे.

**२६८.** (१) जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीने, नगरपरिषदेने, नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीबाहेर नगरपालिका कत्तलखाने स्थापन करणे किंवा खाजगी कत्तलखान्यांना लायसन्स देणे हे कायदेशीर असेल आणि नगरपालिका क्षेत्रातील अशा कत्तलखान्यासंबंधी या अधिनियमाच्या आणि तदन्वये अंमलात असलेल्या उपविधींच्या सर्व तरतुदी या कलमान्वये स्थापन केलेल्या किंवा लायसन्स दिलेल्या कत्तलखान्यांच्याबाबतीत ते जणू त्या नगरपालिका क्षेत्रामध्ये आहेत, असे समजून पूर्णपणे अंमलात येतील.

(२) नगरपरिषदेने, नगरपालिका कत्तलखान्यात किंवा पोट-कलम (१) अन्वये नगरपरिषदेने लायसन्स दिलेल्या कत्तलखान्यात कत्तल केलेल्या जनावरांच्या मांसाव्यतिरिक्त कोणतेही मांस नगरपालिका क्षेत्रात आणण्यास प्रतिबंध करणे, हे कायदेशीर असेल.

(३) पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट, खारवलेल्या किंवा संस्करण केलेल्या मांसाच्या बाबतीत लागू होते असे समजले जाणार नही.

विक्रीकरिता जनावरांची कत्तल करण्यावर निर्बंध.

**२६९.** (१) कोणतीही व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीवाचून, नगरपालिका कत्तलखान्याव्यतिरिक्त किंवा लायसन्स दिलेल्या खाजगी कत्तलखान्याव्यतिरिक्त नगरपालिका क्षेत्रात मांस विकण्यासाठी किंवा पुरविण्यासाठी कोणत्याही जनावराची कत्तल करणार नाही किंवा त्याची कत्तल करविणार नाही.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील, त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) मुख्य अधिकाऱ्याला, पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या विरुद्ध कत्तल केलेल्या कोणत्याही जनावराचे प्रेत किंवा मांस जप्त करता येईल आणि त्यास योग्य वाटेल अशा रीतीने त्याची विक्री करण्याची, ते नष्ट करण्याची किंवा त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करता येईल.

खाजगी बाजाराच्या इमारतीत व कत्तलखान्यात योग्य रीतीने फरशी घालण्यास व निस्सारणासंबंधी व्यवस्था करण्यास भाग पाडण्याबाबत तरतुदी.

**२७०.** [१][अध्यक्षाच्या नियंत्रणाधीन राहून मुख्य अधिकाऱ्याला] लेखी नोटिशीद्वारे, कोणत्याही खाजगी बाजाराच्या किंवा कत्तलखान्याच्या मालकास किंवा प्रभारी व्यक्तीस खालील गोष्टी करण्यास फर्माविता येईल—

(क) बाजाराच्या जागेच्या किंवा कत्तलखान्याच्या संपूर्ण जमिनीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची पातळी वर उचलण्यास किंवा कापून नीट आकार दिलेल्या दगडांची किंवा इतर योग्य सामग्रीची फरशी घालण्यास ;

(ख) बाजाराच्या इमारतीत, बाजाराच्या जागेत किंवा कत्तलखान्यात अथवा त्यामधून नगरपरिषदेस आवश्यक वाटेल अशा सामग्रीच्या, आकाराच्या किंवा अशा प्रकारच्या आणि अशा पातळीवर आणि असे पातमुख असलेल्या मोऱ्या बांधण्यास ;

(ग) अशी बाजाराची इमारत किंवा बाजाराची जागा किंवा कत्तलखाना स्वच्छ व चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी पाण्याच्या पुरवठ्याची सोय करून घेण्यास ;

(घ) कोणत्याही खाजगी बाजारात असलेले कोणतेही दुकान, गाळा, छप्पर किंवा माल विकण्याची जागा किंवा अन्य संरचना यात नगरपरिषदेस योग्य वाटेल अशा रीतीने फेरफार किंवा सुधारणा करवून घेण्यास ;

(ङ) नगरपरिषदेस आवश्यक व इष्ट वाटेल अशा जागी आणि अशा रीतीने कोणतेही संडास, शौचकूप किंवा मूत्री किंवा स्वच्छतेच्या व्यवस्थेसंबंधी इतर कोणतेही बांधकाम बांधून घेण्यास किंवा करवून घेण्यास ; आणि

(च) तिच्या मते सार्वजनिक आरोग्याच्या किंवा स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक असतील अशा इतर कोणत्याही उपाययोजना करविण्यास.

खाजगी बाजारांचे प्रवेशमार्ग व भोवतालच्या जागा याबाबत तरतुदी.

**२७१.** (१) नगरपरिषदेला,—

(क) कोणत्याही खाजगी बाजाराच्या सीमा ठरवून देता येतील किंवा निर्धारित करता येतील किंवा अशा बाजाराचे कोणते भाग अशा बाजाराकडील किंवा बाजारातील विद्यमान प्रवेशमार्गाचे, रस्त्यांचे व वाटांचे भाग होतील ते जाहीर करता येईल ; आणि

(ख) अशा बाजाराच्या मालकाची किंवा प्रभारी व्यक्तीची बाजू ऐकून घेतल्यावर लेखी नोटीस देऊन तिच्याद्वारे अशा मालकास किंवा व्यक्तीस खालील गोष्टींसाठी फर्माविता येईल,—

(एक) अशा बाजाराकडे किंवा बाजारात जाण्यायेण्यासाठी नगरपरिषदेला योग्य वाटतील असे प्रवेशमार्ग, रस्ते, बोळ व वाटा नगरपरिषदेस समाधानकारक वाटतील अशा रीतीने आखण्यास, बांधण्यास, त्यात बदल करण्यास, स्वच्छ करण्यास, रुंद करण्यास, त्यांना फरसबंदी, मोऱ्या व दिवाबत्ती करण्यास ;

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३३ अन्वये " नगरपालिकेला " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) अशा बाजारात जमणाऱ्या व्यक्तींना उपयोगी होईल अशा सोयी पुरविण्यास ; आणि

(तीन) बाजाराच्या इमारतीत किंवा दुकाने व गाळे धरून तिच्या कोणत्याही भागात नगरपरिषदेला योग्य वाटेल अशा प्रकारे पुरेशी हवा खेळती राहण्याची व दिवाबत्तीची सोय करण्यास.

(२) नगरपरिषदेला, लेखी नोटिशीद्वारे अशा मालकास किंवा भोगवटादारास अशा बाजाराकडे किंवा बाजारातील जाण्यायेण्याचे प्रवेशमार्ग, रस्ते, बोळ व वाटा व बाजारात जमणाऱ्या लोकांच्या उपयोगाकरिता केलेल्या असतील अशा इतर सोयी सुस्थितीत ठेवण्यास फर्मावता येईल.

गाळाभाडे, भाडे आणि फी बसविणे.

**२७२.** (१) नगरपरिषदेस,—

(क) तिच्याकडून या बाबतीत वेळोवेळी ठरविण्यात येईल असे गाळाभाडे, भाडे किंवा फी पुढील कारणांकरिता आकारता येईल,—

(एक) नगरपालिका बाजारामधील किंवा नगरपालिका कत्तलखान्यामधील कोणताही गाळा, दुकान, दुकानाचा ओटा, छपरी, कोंडवाडा किंवा जागा यांचा भोगवटा किंवा वापर ;

(दोन) नगरपालिका बाजारामध्ये विक्रीकरिता वस्तू मांडण्याचा हक्क ;

(तीन) कोणत्याही नगरपालिका बाजारामध्ये पुरविलेली यंत्रे, वजने, तराजू व मापे यांचा वापर ; आणि

(चार) कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यात जनावरांची कत्तल करण्याचा हक्क आणि त्यांना कत्तल करण्यास नेण्यापूर्वी अशा जनावरांना चारापाणी देणे ; किंवा

(ख) नगरपरिषदेस योग्य वाटेल अशा मुदतीसाठी व अशा शर्तीवर अशा नगरपालिकेच्या बाजारातील किंवा नगरपालिका कत्तलखान्यातील कोणताही गाळा, दुकान, दुकानाचा ओटा, छपरी, कोंडवाडा किंवा जागा यांचा भोगवटा करण्याच्या किंवा वापर करण्याच्या विशेषाधिकारांचा सार्वजनिक लिलाव करता येईल किंवा खाजगी रीतीने विक्री करून त्याचा विनियोग करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नगरपालिका बाजारामधील कोणताही गाळा, दुकान, दुकानाचा ओटा, छपरी, कोंडवाडा किंवा जागा यांचा भोगवटा करण्यास किंवा वापर करण्यास किंवा नगरपालिका बाजारामध्ये कोणत्याही वस्तू विक्रीसाठी मांडण्यास किंवा नगरपालिका कत्तलखान्यामध्ये जनावरांची कत्तल करण्यास प्राधिकृत केलेल्या प्रत्येक व्यक्तीस, मुख्य अधिकारी, या बाबतीत केलेल्या उपविधीच्या तरतुदीनुसार मंजूर केलेले लायसन्स देईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (२) अन्वये मुख्य अधिकाऱ्याकडून लायसन्स मिळविल्याशिवाय नगरपालिका बाजारामधील कोणताही गाळा, दुकान, दुकानाचा ओटा, छपरी, कोंडवाडा किंवा जागा यांचा भोगवटा करील किंवा नगरपालिका बाजारामध्ये कोणत्याही वस्तूची विक्री करील किंवा विक्रीसाठी ती मांडील किंवा नगरपालिका कत्तलखान्याचा वापर करील, तिला अपराध सिद्ध झाल्यानंतर, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) मुख्य अधिकाऱ्याने किंवा नगरपालिका बाजाराच्या किंवा कत्तलखान्याच्या कोणत्याही प्रभारी अधिकाऱ्याने,—

(एक) अशा नगरपालिका बाजारामध्ये किंवा कत्तलखान्यामध्ये नगरपरिषदेच्या लायसनशिवाय कोणताही गाळा, दुकान, दुकानाचा ओटा, छपरी, कोंडवाडा किंवा जागा यांचा भोगवटा करणाऱ्या किंवा त्यामध्ये विक्रीसाठी कोणत्याही वस्तू मांडणाऱ्या ; किंवा

(दोन) लायसनशिवाय कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्याचा वापर करणाऱ्या किंवा वापर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ;

(तीन) अशा बाजारासंबंधीच्या किंवा कत्तलखान्यासंबंधीच्या कोणत्याही उपविधींचे उल्लंघन करणाऱ्या ;

(चार) कोणत्याही संक्रामक किंवा संसर्गजन्य रोगाने पीडित असलेल्या ;

(पाच) अशा बाजारामध्ये किंवा कत्तलखान्यामध्ये शांतताभंग करणाऱ्या ;

कोणत्याही व्यक्तीस बाजारामधून किंवा कत्तलखान्याबाहेर काढून टाकणे, हे कायदेशीर असेल.

**२७३.** (१) लगतपूर्ववर्ती कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये बसविण्यात आलेले कोणतेही गाळा भाडे, भाडे किंवा फी वसूल करण्याचा मक्ता नगरपरिषदेने जाहीर लिलावाद्वारे किंवा निविदा मागवून किंवा खाजगी करार करून, मक्तेदाराकडून मक्त्यातील अटी योग्य रीतीने पुऱ्या करण्यासाठी पुरेसे तारण घेतल्यानंतर देणे हे कायदेशीर असेल. बाजार व कत्तलखाने यांचे भाडे वसूल करण्याचा मक्ता देणे.

(२) ज्या कोणत्याही व्यक्तीस अशा रीतीने गाळाभाडे, भाडे किंवा फी वसूल करण्याचा मक्ता दिलेला असेल अशा व्यक्तीस, गाळाभाडे, भाडे किंवा फी दिल्याशिवाय, गाळा, दुकाने, दुकानाचा ओटा, छपरी, कोंडवाडा किंवा जागा याचा भोगवटा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा बाजारामध्ये विक्रीकरिता कोणत्याही वस्तू मांडणाऱ्या किंवा अशा कोणत्याही कत्तलखान्याचा वापर करणाऱ्या किंवा वापर करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला बाजार किंवा कत्तलखाना यामधून काढून टाकण्याचा अधिकार असेल.

## (२) इतर व्यवसाय आणि व्यापार

**२७४.** (१) कोणतीही व्यक्ती, याबाबतीत केलेल्या उपविधीच्या तरतुदीअन्वये दिलेल्या लायसन्सच्या शर्तीन्वये किंवा तद्नुसार असेल त्या व्यतिरिक्त,— खाद्यपदार्थ तयार करण्यावर, खाणावळी, हॉटेल, निवासगृहे, इत्यादींवर नियंत्रण.

(क) खाणावळ, चहाचे किंवा कॉफीचे दुकान, उपाहारगृह, भोजनगृह, अल्पोपाहार कक्ष म्हणून किंवा तत्सम प्रयोजनाकरिता ; किंवा

(ख) व्यापाराच्या प्रयोजनाकरिता कोणताही मानवी खाद्यपदार्थ किंवा पेय तयार करण्यासाठी किंवा त्याच्या विक्रीसाठी ; किंवा

(ग) हॉटेल किंवा निवासगृह म्हणून ;

नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही इमारतीचा उपयोग करणार नाही किंवा करण्यास परवानगी देणार नाही.

(२) मुख्य अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनांकरिता वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही इमारतीत प्रवेश करून अशा इमारतींची तपासणी करता येईल आणि अशा प्रयोजनांकरिता वापरण्यात येणारा कोणताही माल, पात्रे किंवा उपकरणे

किंवा इतर वस्तू यांची तपासणी करता येईल आणि त्यास लेखी नोटिशीद्वारे अशा जागेच्या मालकास किंवा ती ताब्यात असलेल्या व्यक्तीस असा धंदा स्वच्छतेने चालविण्यासाठी नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे वाजवी उपाय योजण्यास फर्माविता येईल किंवा अशा प्रयोजनासाठी अशा जागेचा वापर बंद करण्यास फर्माविता येईल.

(३) जो कोणी, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही जागेचा वापर करील किंवा करण्यास परवानगी देईल, किंवा जो कोणी, मुख्य अधिकाऱ्याने पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या कोणत्याही नोटिशीचे पालन करण्याचे नाकारील, त्यास, अपराध सिद्ध-झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि अपराध चालू राहिल्यास, प्रथम अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

दुग्धशाळा आणि दूध, दुग्धपदार्थ व मिठाई यांच्या धंद्यावरील नियंत्रण.

**२७५.** (१) कोणतीही व्यक्ती, याबाबतीत केलेल्या उपविधींच्या तरतुदींनुसार दिलेल्या लायसन्सच्या शर्तीअन्वये किंवा तद्नुसार असेल त्या व्यतिरिक्त,—

(क) मिठाई, दूध, लोणी किंवा इतर दुग्धपदार्थ यांची देवघेव करणारा किंवा त्यांची आयात किंवा विक्री करणारा या नात्याने व्यापार किंवा धंदा चालविणार नाही ; किंवा

(ख) व्यापाराच्या प्रयोजनाकरिता दूध साठविण्यासाठी किंवा विकण्यासाठी किंवा लोणी किंवा इतर दुग्धपदार्थ किंवा मिठाई तयार करण्यासाठी, साठविण्यासाठी किंवा विकण्यासाठी कोणत्याही जागेचा वापर करणार नाही किंवा करण्याची परवानगी देणार नाही.

(२) मुख्य अधिकाऱ्यास पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही इमारतीत प्रवेश करून अशा इमारतींची तपासणी करता येईल आणि अशा प्रयोजनांकरिता वापरण्यात येणारा कोणताही माल, पात्रे किंवा उपकरणे किंवा इतर वस्तू यांची तपासणी करता येईल आणि त्यास लेखी नोटिशीद्वारे अशा जागेच्या मालकास किंवा ती ताब्यात असलेल्या व्यक्तीस असा धंदा स्वच्छतेने चालविण्यासाठी अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे वाजवी उपाय योजण्यास फर्माविता येईल किंवा अशा प्रयोजनासाठी अशा जागेचा वापर बंद करण्यास फर्माविता येईल.

(३) जो कोणी, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही जागेचा वापर करील किंवा करण्यास परवानगी देईल किंवा जो कोणी, मुख्य अधिकाऱ्याने पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या कोणत्याही नोटिशीचे पालन करण्याचे नाकारील त्यास, अपराध सिद्ध-झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि अपराध चालू राहिल्यास प्रथम अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

गोठ्यांचे नियंत्रण.

**२७६.** (१) याबाबतीत केलेल्या उपविधींच्या तरतुदींनुसार दिलेल्या लायसन्सच्या शर्तीअन्वये व तद्नुसार असेल त्या व्यतिरिक्त कोणतीही व्यक्ती,—

(क) दुभत्या गुरांसाठी गोठा म्हणून, किंवा

(ख) घोडे, ऊंट, गाढवे आणि दुभत्या गुरांव्यतिरिक्त इतर जनावरे आणि मानवी खाद्याकरिता योजिलेली जनावरे बांधण्याकरिता किंवा ठेवण्याकरिता ;

नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही जागेचा उपयोग करणार नाही.

(२) मुख्य अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही जागेत प्रवेश करून अशा जागेची तपासणी करता येईल आणि अशा जागेत ठेवलेल्या कोणत्याही जनावरांची किंवा अशा जागेत वापरण्यात येणारी कोणतीही पात्रे किंवा उपकरणे यांची तपासणी करता येईल आणि त्यास लेखी नोटिशीद्वारे, अशा जागेच्या मालकास किंवा ती ताब्यात असलेल्या व्यक्तीस अशा जागेत योग्य रीतीने हवा खेळती राहण्यासाठी, स्वच्छतेसाठी किंवा जलनि:सारणासाठी किंवा अशा जागेत ठेवलेल्या जनावरांना योग्य रीतीने पाणीपुरवठा करण्याकरिता अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येतील असे वाजवी उपाय योजण्यास फर्माविता येईल किंवा अशा प्रयोजनासाठी अशा जागेचा वापर बंद करण्यास फर्माविता येईल.

(३) जो कोणी, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणत्याही जागेचा वापर करील किंवा वापर करण्यास परवानगी देईल किंवा जो कोणी, मुख्य अधिकाऱ्याने पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या कोणत्याही नोटिशीचे पालन करण्याचे नाकारील त्यास, अपराध सिद्ध-झाल्यानंतर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि अपराध चालू राहिल्यास प्रथम अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियमान्वये लायसन्स मिळविण्यात आले असल्यास वेगळ्या लायसन्सची आवश्यकता नसणे.

**२७७.** कलम २७४ व २७५ यात काहीही अंतर्भूत असले तरी, त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता किंवा कोणताही व्यापार करण्याकरिता ज्या कोणत्याही इमारतीच्या बाबतीत अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४ अन्वये लायसन्स मिळविण्यात आले असेल त्या इमारतीचा तसा उपयोग करण्यासाठी उक्त कलमान्वये कोणत्याही लायसन्सची आवश्यकता असणार नाही.

१९५४ चा ३७.

लायसन वाचून कारखाना वगैरे स्थापन न करणे.

**२७८.** (१) कोणतीही व्यक्ती, याबाबतीत केलेल्या उपविधींनुसार दिलेल्या लायसन्सवाचून ज्यात वाफेचा, विजेचा, पाण्याचा किंवा इतर यांत्रिक शक्तीचा उपयोग करण्याचे योजिले असेल असा कोणताही कारखाना, कर्मशाळा किंवा धंद्याचे ठिकाण स्थापन करणार नाही, किंवा त्यात महत्त्वाचे फेरफार करणार नाही, वाढ करणार नाही किंवा विस्तार करणार नाही किंवा ते स्थापन करण्यास किंवा त्यात महत्त्वाचा फेरफार, वाढ किंवा विस्तार करण्यास परवानगी देणार नाही.

(२) अशा कारखान्याची, कर्मशाळेची किंवा धंद्याच्या ठिकाणाची स्थापना केल्यास किंवा त्यात फेरफार, वाढ किंवा विस्तार केल्यास त्यांच्या जवळपास असणाऱ्या दाट लोकवस्तीमुळे ते आक्षेपार्ह होईल किंवा त्यामुळे जवळपासच्या रहिवाशांना उपद्रव होईल किंवा धोका पोहोचेल असे नगरपरिषदेचे मत असेल तर, नगरपरिषदेस, अर्जदारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि कारणे नमूद केल्यानंतर लायसन्स देण्याचे नाकारता येईल.

(३) जो कोणी, लायसनशिवाय किंवा ज्या शर्तींच्या अधीन लायसन्स देण्यात आले असेल अशा कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून असा कोणताही कारखाना, कर्मशाळा किंवा धंद्याचे

ठिकाण स्थापन करील, त्यात फेरफार, वाढ किंवा विस्तार करील किंवा ते स्थापन करण्यास किंवा त्यात महत्त्वाचे फेरफार, वाढ किंवा विस्तार करण्यास परवानगी देईल त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**स्पष्टीकरण.—** या कलमातील किंवा कलम २८० मधील कोणत्याही तरतुदींमुळे, भारतीय बॉयलर अधिनियम, १९२३ यातील कोणत्याही तरतुदीस बाध येते असे किंवा ज्यास कारखाने अधिनियम, १९४८ च्या तरतुदी लागू आहेत, अशा कोणत्याही कारखान्यात कोणतेही इंजिन, मिलगिअरिंग उच्चलन यंत्र (हॉईस्ट) किंवा इतर यंत्रसामग्री बसविण्याविषयी किंवा त्यांना कुंपण घालण्याविषयी कोणतेही आदेश देण्याचा प्राधिकार प्राप्त होतो, असे समजले जाणार नाही.

१९२३ चा ५. १९४८ चा ६३.

वाफेच्या शिट्या वगैरे वापरण्यास मनाई.

**२७९.** (१) कोणतीही व्यक्ती, कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही इतर जागेत, कामावर लावलेल्या कामगारांना किंवा व्यक्तींना बोलविण्यासाठी किंवा कामावरून सोडून देण्यासाठी, वाफेने किंवा यांत्रिक साधनाने वाजवावयाची कोणतीही शिटी किंवा तुतारी, याबाबत केलेल्या उपविधींच्या तरतुदींअन्वये देण्यात आलेल्या लायसनच्या शर्तीनुसार व तद्‌अन्वये असेल त्याव्यतिरिक्त वापरणार नाही, किंवा उपयोगात आणणार नाही.

(२) जो कोणी, वर सांगितलेल्या प्रकारची कोणतीही शिटी किंवा तुतारी पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून वापरील किंवा उपयोगात आणील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, आणि अपराध चालू राहिल्यास प्रथम अपराध सिद्ध झाल्यानंतर, ज्या ज्या दिवशी असा अपराध करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पाच रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

लायसन वाचून काही इतर व्यापार व व्यवसाय न चालविणे.

**२८०.** (१) कोणतीही व्यक्ती, याबाबतीतील उपविधींच्या तरतुदींन्वये देण्यात आलेल्या लायसनच्या शर्तीन्वये व तदनुसार असेल त्या व्यतिरिक्त, अनुसूची सातमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता नगरपालिका क्षेत्रांतील कोणत्याही जागेचा उपयोग करणार नाही.

(२) मुख्य अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनांकरिता वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही जागेत प्रवेश करून तिची तपासणी करता येईल व अशा प्रयोजनासाठी वापरण्यात येणारा कोणताही माल, पात्रे किंवा उपकरणे किंवा इतर वस्तू यांची तपासणी करता येईल आणि लेखी नोटिशीद्वारे त्यापासून होणारा कोणताही उपद्रव किंवा धोका यास प्रतिबंध करण्यासाठी नोटिशीत विनिर्दिष्ट करता येईल त्याप्रमाणे वाजवी उपाययोजना करण्यास अशा जागेच्या मालकास किंवा अशी जागा ताब्यात असणाऱ्या व्यक्तीस फर्माविता येईल किंवा अशा जागेचा अशा प्रयोजनासाठी होणारा वापर बंद करण्यास फर्माविता येईल.

(३) जो कोणी, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणत्याही जागेचा उपयोग करील किंवा उपयोग करण्यास परवानगी देईल किंवा जो कोणी, पोट-कलम (२) अन्वये काढलेल्या कोणत्याही नोटिशीचे पालन करण्यास नकार देईल, त्यास अपराध सिद्ध-झाल्यानंतर, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि अपराध करण्याचे चालू राहिल्यास पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर जितके दिवस हा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल पन्नास रुपयांर्यंत असू शकेल एवढ्या आणखी द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**२८१.** (१) कोणतीही व्यक्ती, याबाबतीत केलेल्या उपविधींच्या तरतुदींन्वये देण्यात आलेल्या लायसनच्या शर्तीन्वये व तद्नुसार असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही जागेत किंवा जागेवर अनुसूची आठ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही वस्तू ठेवणार नाही किंवा ठेवण्यास मुभा देणार नाही. विवक्षित वस्तू लायसन शिवाय न ठेवणे.

(२) कोणतीही व्यक्ती, याबाबतीत केलेल्या उपविधींच्या तरतुदींन्वये देण्यात आलेल्या लायसनच्या शर्तीन्वये आणि तद्नुसार असेल त्या व्यतिरिक्त,—

(क) कोणत्याही जागेत किंवा जागेवर कोणत्याही वेळी, अनुसूची नऊच्या भाग एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तूंपैकी कोणतीही वस्तू, अशा वस्तूंच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या संबंधित कमाल प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात ठेवणार नाही किंवा देण्यास मुभा देणार नाही, किंवा

(ख) कोणत्याही जागेत किंवा जागेवर विक्रीसाठी किंवा घरगुती वापराव्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी उक्त अनुसूचीच्या भाग दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तूंपैकी कोणतीही वस्तू ठेवणार नाही किंवा ठेवण्यास मुभा देणार नाही.

(३) जो कोणी, पोट-कलम (१) किंवा (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून किंवा ज्या शर्तीच्या अधीन लायसन देण्यात आले असेल त्यापैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून कोणत्याही जागेत किंवा जागेवर कोणतीही वस्तू ठेवील त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, आणि असा अपराध करण्याचे चालू राहिल्यास पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर जितके दिवस हा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल वीस रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या आणखी द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(४) मुख्य अधिकाऱ्यास कोणत्याही वेळी, कोणत्याही जागेत प्रवेश करता येईल आणि पोट-कलम (१) किंवा (२) चे उल्लंघन करून किंवा ज्या शर्तींच्या अधीन पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये लायसन देण्यात आले असेल त्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन करून ठेवलेली कोणतीही वस्तू जप्त करता येईल.

## प्रकरण एकवीस

## कोंडवाडे व जनावरांसंबंधी इतर तरतुदी

### (१) कोंडवाडे

**२८२.** हा अधिनियम लागू असलेल्या प्रत्येक नगरपालिका क्षेत्रास, गुरे अतिक्रमण गुरे अतिक्रमण अधिनियम नगरपालिका क्षेत्रांस लागू असण्याचे बंद होणे.
१८७१ चा १. अधिनियम, १८७१ (ज्याचा यात यापुढे " उक्त अधिनियम " असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या तरतुदी लागू होण्याचे बंद होईल :

परंतु,—

(क) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अशा रीतीने अंमलात असण्याचे बंद होणाऱ्या उक्त अधिनियमान्वये कोणतीही शास्ती देण्याच्या कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वास बाध येणार नाही.

(ख) उक्त अधिनियमान्वये कोणत्याही नगरपालिकेच्या क्षेत्राच्या सीमेतील कोणत्याही कोंडवाड्याच्या बाबतीत केलेली किंवा केली आहे असे मानलेली कोणतीही नेमणूक किंवा काढलेली किंवा काढण्यात आली आहे असे मानलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला

किंवा देण्यात आला आहे असे मानलेला कोणताही आदेश किंवा केलेला किंवा केला आहे असे मानलेला कोणताही नियम या अधिनियमाच्या तरतुदींशी जेथवर विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमान्वये केलेली नेमणूक किंवा काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश किंवा केलेला नियम आहे असे समजले जाईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नेमणुकीद्वारे किंवा काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे किंवा केलेल्या कोणत्याही नियमांद्वारे त्यांचे अधिक्रमण करण्यात येईपर्यंत ते अंमलात राहतील.

(ग) अशा रीतीने अंमलात असण्याचे बंद होणाऱ्या उक्त अधिनियमान्वये स्थापन केलेला किंवा स्थापन केल्याचे समजला जाणारा स्थानिक क्षेत्रातील कोणताही कोंडवाडा, ज्या नगरपरिषदेच्या सीमेत असेल त्या नगरपरिषदेकडे निहित असल्याचे समजण्यात येईल आणि ती नगरपरिषद या अधिनियमाच्या तरतुदींनुसार तो सुस्थितीत राखील व त्याची व्यवस्था ठेवील.

कोंडवाडे स्थापन करण्याचा व कोंडवाड्यांचे रखवालदार नेमण्याचा अधिकार.

**२८३.** (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक नगरपरिषद, आपल्या अधिकारितेच्या मर्यादेत सार्वजनिक कोंडवाडे म्हणून ज्या जागा नेमून देणे, तिला योग्य वाटेल अशा जागा सार्वजनिक कोंडवाडे म्हणून वेळोवेळी नेमून देईल आणि अशा कोंडवाड्याचे रखवालदार म्हणून योग्य व्यक्तींची तिला नेमणूक करता येईल.

(२) अशा रीतीने नेमलेल्या कोंडवाड्याचा प्रत्येक रखवालदार हा, आपली कर्तव्ये पार पाडताना नगरपरिषदेच्या निदेशाखाली व नियंत्रणाखाली असेल.

कोंडवाड्याच्या रखवालदारांची कर्तव्ये.

**२८४.** (१) प्रत्येक कोंडवाड्याचा रखवालदार, राज्य शासन वेळोवेळी नियमांद्वारे विहित करील अशा नोंदवह्या ठेवील आणि अशी विवरणे तयार करील.

(२) गुरे जेव्हा कोंडवाड्यात आणली जातात तेव्हा कोंडवाड्याचा रखवालदार आपल्या नोंदवहीत,—

(क) गुरांची संख्या व वर्णन ;

(ख) ज्या दिवशी व ज्या वेळी ती अशा रीतीने आणली जातील तो दिवस व ती वेळ ;

(ग) गुरे जप्त करणाऱ्याचे नाव व पत्ता ; आणि

(घ) माहीत असेल तर मालकाचे नाव व पत्ता ;

यांची नोंद करील आणि गुरे जप्त करणाऱ्यास किंवा त्याच्या अभिकर्त्यास उक्त नोंदीची एक प्रत देईल.

(३) कोंडवाड्याचा रखवालदार यात यापुढे दिलेल्या रीतीने गुरांची विल्हेवाट लावण्यात येईल तोपर्यंत ती ताब्यात ठेवील व त्यांच्या चारापाण्याची व्यवस्था करील.

गुरे कोंडवाड्यात घालणे.

**२८५.** (१) नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही रस्त्यावर कोणतीही गुरे भटकत असल्याचे किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या जागी अतिक्रमण करीत असल्याचे आढळून आल्यास, ती गुरे जप्त करून त्यास अशा कोणत्याही सार्वजनिक कोंडवाड्यात टाकणे हे प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल आणि नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा मुख्य अधिकाऱ्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्याने ती गुरे जप्त करून कोंडवाड्यात टाकणे कायदेशीर असेल.

(२) कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेचा मालक असणाऱ्या किंवा प्रभारी असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, अशा मालमत्तेच्या जागी अतिक्रमण करणाऱ्या किंवा तिला नुकसान पोचविणाऱ्या कोणत्याही गुरांना जप्त करून अशा कोणत्याही सार्वजनिक कोंडवाड्यात टाकणे हे कायदेशीर असेल.

(३) जो कोणी, या कलमान्वये धरली जाण्यास पात्र असलेली गुरे जप्त करण्यास बळजबरीने विरोध करील व जो कोणी, ती जप्त केल्यानंतर कोंडवाड्यातून किंवा कोंडवाड्याकडे नेणाऱ्या किंवा नेण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तीच्या हातून सोडवून नेईल त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर, सहा महिने मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

**२८६.** लगतपूर्ववर्ती कलमान्वये कोंडवाड्यात टाकलेल्या गुरांच्या मालकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने हजर होऊन गुरांची मागणी केली तर, कलम २८९ अन्वये कोंडवाड्याची फी व अशा गुरांच्या संबंधात आकारणीयोग्य असलेला खर्च दिल्यावर कोंडवाड्याचा रखवालदार ती गुरे त्याच्या स्वाधीन करील. मागणी केलेली गुरे स्वाधीन करणे.

**२८७.** (१) प्रत्येक कोंडवाड्याचा रखवालदार, कोंडवाड्यात टाकलेली कोणतेही गुरे सोडून देण्यापूर्वी कोंडवाड्यात टाकलेल्या गुरांच्या मालकास किंवा त्याच्या अभिकर्त्यास अशा गुरांच्या मालकीसंबंधी नियमांन्वये विहित केलेल्या नमुन्यात, एक निवेदन करून देण्यास आणि राज्य शासन नियमांन्वये विहित करील अशी रक्कम प्रतिभूती म्हणून देण्यास फर्मावील. निरनिराळ्या क्षेत्रांसाठी व गुरांच्या निरनिराळ्या वर्गासाठी निरनिराळे दर ठरविता येतील. कोंडवाड्यात टाकलेल्या गुरांसंबंधी प्रतिभूती.

(२) प्रतिभूती देण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जर अशा मालकाची कोणतीही गुरे कोंडवाड्यात टाकण्यात आली आणि गुरे ताब्यात घेणे हे बेकायदेशीर ठरविण्यात आले नसेल तर, नियमांन्वये विहित केलेली अनामत रक्कम किंवा तिचा भाग, नगरपरिषदेकडे जमा होईल. वर सांगितल्याप्रमाणे गुरे कोंडवाड्यात टाकण्यात आली नसतील तर, प्रतिभूती देणाऱ्याने किंवा त्याच्या वतीने अर्ज करण्यात आला असता, प्रतिभूती म्हणून ठेवलेली रक्कम, ती मुदत संपल्यानंतर, त्यास परत करण्यात येईल.

**२८८.** (१) कोणत्याही गुरास कोंडवाड्यात टाकल्यानंतर दहा दिवसांच्या आत कोणत्याही व्यक्तीने अशा गुरांचा मालक म्हणून कलम २८६ अन्वये गुरांची मागणी केली नाही तर लिलाव करून त्यांची ताबडतोब विक्री केली जाईल. मागणी न केलेल्या गुरांची विक्री.

(२) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत मालकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने गुरांची मागणी केली परंतु, कोंडवाड्याची फी आणि लगतपुढील कलमान्वये आकारता येईल असा खर्च देण्यास नकार दिला किंवा देण्यात कसूर केली तर, त्या गुरांची किंवा त्यांच्यापैकी आवश्यक तितक्या गुरांची लिलावाने विक्री करण्यात येईल :

परंतु, पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये करण्यात आलेल्या लिलावात गुरे विकली गेली नाहीत तर, राज्य शासन नियमांन्वये विहित करील त्याप्रमाणे त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये करण्यात येणाऱ्या लिलावाची रीत विहित करण्यासाठी राज्य शासनास नियम करता येईल.

(४) विक्रीच्या उत्पन्नातून कोंडवाड्याची फी व उपरिनिर्दिष्ट खर्च वजा करता राहिलेली शिल्लक , विक्री करण्यात आल्यावर पंधरा दिवसांच्या आत, जी कोणतीही व्यक्ती, अशा गुरांचा ती मालक आहे असे मुख्य अधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध करील त्या

व्यक्तीस दिली जाईल आणि इतर कोणत्याही बाबतीत, अशी अधिक रक्कम नगरपालिका निधींचा भाग होईल.

(५) कोणताही पोलीस अधिकारी किंवा परिषद सदस्य किंवा कोंडवाड्याच्या रखवालदारासहित नगरपालिकेचा अधिकारी किंवा कर्मचारी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या, पोट-कलम (१) किंवा (२) खालील विक्रीच्या वेळी कोणतीही गुरे खरेदी करणार नाही.

कोंडवाड्याची आकारण्यायोग्य फी व खर्च ठरविणे.

**२८९.** (१) आकारण्यात येणारी कोंडवाड्याची फी ही, राज्य शासन वेळोवेळी प्रत्येक प्रकारच्या गुरांसाठी नियमांद्वारे विहित करील अशी असेल.

(२) आकारण्यात येणारा खर्च हा, ज्या दिवशी कोणत्याही वेळी, एखाद्या गुरास कोंडवाड्यात टाकण्यात आले असेल त्या प्रत्येक दिवसाबद्दल, नगरपरिषद उपविधींद्वारे निश्चित करील त्या दरांनी आकारण्यात येईल.

बेकायदेशीररीत्या गुरे जप्त केल्याच्या किंवा त्यांची अटकावणी केल्याच्या तक्रारी.

**२९०.** (१) या प्रकरणाखाली ज्या व्यक्तीची गुरे जप्त करण्यात आली असतील किंवा अशा रीतीने जप्त केल्यानंतर, या प्रकरणाचे उल्लंघन करून ती अटकावून ठेवली असतील त्या व्यक्तीस, गुरे जप्त केल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत, प्रथम वर्गाच्या दंडाधिकाऱ्याकडे फिर्याद करता येईल.

(२) फिर्यादी हा जातीने किंवा परिस्थितीची जातीने माहिती असलेल्या अभिकर्त्याद्वारे फिर्याद दाखल करील. फिर्यादीची किंवा त्याच्या अभिकर्त्याची तपासणी केल्यावर ती फिर्याद साधार आहे असे वाटण्यास कारण आहे असे दंडाधिकाऱ्यास दिसून आल्यास तो, ज्यांच्याविरुद्ध फिर्याद दाखल करण्यात आली त्या व्यक्तींना बोलावून घेईल व त्या प्रकरणाची चौकशी करील.

(३) अशा रीतीने गुरे जप्त करणे किंवा अटकावून ठेवणे हे बेकायदेशीर ठरविण्यात आले तर, गुरे जप्त केल्यामुळे किंवा अटकावून ठेवल्यामुळे फिर्यादीचे जे नुकसान झाले असेल त्याबद्दल त्यास, ज्या व्यक्तीने ती गुरे जप्त केली असतील व अटकावून ठेवली असतील त्या व्यक्तीकडून वाजवी भरपाई म्हणून शंभर रुपयांहून अधिक नाही इतकी रक्कम, तसेच ती गुरे सोडवून घेण्यासाठी फिर्यादीने जी फी दिली असेल ती फी व त्यास जो खर्च झाला असेल तो खर्च देण्यात यावा असा निवाडा दंडाधिकारी देईल आणि जर त्या गुरांना सोडून देण्यात आले नसेल तर, दंडाधिकारी अशा भरपाईच्या निवाड्या व्यतिरिक्त त्यांना सोडून देण्याचा आदेश देईल व या प्रकरणाखाली आकारावयाची फी व खर्च ज्याने ती गुरे जप्त केली व अटकावून ठेवली असतील त्या व्यक्तीने दिला पाहिजे असा निदेश देईल.

(४) या कलमात उल्लेख केलेली भरपाई, फी व खर्च, जणू दंडाधिकाऱ्याने लादलेला दंड आहे असे समजून वसूल करता येईल.

## (२) जनावरांसंबंधी इतर तदतुदी

रस्त्यावर गुरे भटकू दिल्याबद्दल किंवा खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवरील अतिक्रमणाबद्दल शास्ती.

**२९१.** (१) जो कोणी, त्याच्या मालकीची किंवा त्याच्या ताब्यात असलेली गुरे एखाद्या नगरपालिकेच्या क्षेत्रातील कोणत्याही रस्त्यांवर भटकू देईल किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या जागी त्यांना अतिक्रमण करू देईल, त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर,——

(एक) पहिल्या अपराधाबद्दल तीनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ;

(दोन) दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) पोट-कलम (१) खालील अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या दंडाधिकाऱ्यास,—

(क) ज्या कोणत्याही व्यक्तीच्या मालमत्तेचे किंवा जमिनीच्या उत्पन्नाचे, आरोपीच्या नियंत्रणाखाली असलेल्या जनावराने त्याच्या जमिनीवर अतिक्रमण केल्यामुळे नुकसान झाले असल्याचे सिद्ध झाले असेल त्या व्यक्तीस दंडाधिकाऱ्यास वाजवी वाटेल इतकी अडीचशे रुपयांपेक्षा अधिक नसलेली रक्कम भरपाईदाखल आरोपी देईल ; आणि तसेच

(ख) ज्या जनावराच्या बाबतीत अपराध घडला असेल ते जनावर, राज्य शासनाकडून अभिग्रहण केले जाईल, असा आदेश देता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेली भरपाईची कोणतीही रक्कम, जणू ती या कलमान्वये लादलेला दंड आहे असे समजून, वसूल करता येईल.

(४) या कलमाखालील अपराध दखलपात्र असेल.

गुरै वगैरे दोराने बांधून ठेवणे.

**२९२.** जो कोणी, कोणत्याही सार्वजनिक रस्त्यात किंवा जागेत लोकांच्या तेथील रहदारीस अडथळा किंवा धोका होईल किंवा उपद्रव होईल अशा रीतीने गुरे किंवा इतर जनावरे बांधील किंवा आपल्या कुटुंबातील किंवा घरातील कोणत्याही व्यक्तीस बांधण्यास सांगेल किंवा बांधू देईल किंवा राखणदारावाचून अशा जनावरास मोकळे भटकण्यास लावील किंवा भटकू देईल यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर,—

(क) पहिल्या अपराधाबद्दल, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल ;

(ख) दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल, अडीचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

कुत्र्यांसंबंधी तरतुदी.

**२९३.** (१) नगरपरिषदेस, प्रत्येक कुत्र्यास, तो रस्त्यावर असताना व कोणत्याही व्यक्तीकडून नेला जात नसतांना, त्यास मोकळेपणी श्वासोच्छवास करता येईल व पिता येईल परंतु चावता येणे पूर्णपणे अशक्य होईल अशा रीतीने मुस्की बांधली पाहिजे असे जाहीर नोटिशीद्वारे फर्मावता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नोटीस प्रसिद्ध करण्यात आली असेल तेव्हा, मुख्य अधिकाऱ्यास, कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर किंवा जागेत मुस्कीवाचून भटकताना आढळून येणारा कोणताही कुत्रा ताब्यात घेता येईल व त्याचा मालक त्यावर आपला दावा सांगेपर्यंत त्याच्यासाठी योग्य मुस्कीची तरतूद करीपर्यंत व त्यास अटकावून ठेवण्याबाबत झालेला सर्व खर्च देईपर्यंत, त्यास अटकावून ठेवता येईल किंवा पोट-कलम (३) व (४) च्या तरतुदींच्या अधीन त्यास विकण्याची किंवा मारून टाकण्याची व्यवस्था करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये अटकावून ठेवलेल्या कुत्र्याच्या गळ्यांत मालकाचे नाव व पत्ता असलेला पट्टा असेल किंवा नंबर असलेला बिल्ला असेल किंवा ज्यामुळे मालकास ओळखता येईल अशी इतर कोणतीही खूण असेल तर, अशा कुत्र्यास अटकावून ठेवले आहे अशा मजकुराचे पत्र अशा पत्त्यावर पाठविण्यात येईपर्यंत आणि तो कुत्रा बेवारशी राहून पूर्ण तीन दिवस लोटेपर्यंत त्यास मारून टाकण्यात येणार नाही.

(४) मुख्य अधिकाऱ्यास, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत ज्या कुत्र्यावर दावा सांगण्यात आला नसेल अशा कोणत्याही कुत्र्यास किंवा अटकावून ठेवण्याबाबत झालेला सर्व खर्च देण्याचे कुत्र्याच्या मालकाने नाकारले आहे अशा कोणत्याही कुत्र्यास पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तीन दिवसांच्या मुदतीस अटकावून ठेवल्यानंतर विकून टाकता येईल किंवा मारून टाकता येईल :

परंतु, पिसाळलेला असल्याचे आढळून आलेल्या कुत्र्यास कोणत्याही वेळी मारून टाकता येईल.

(५) मुख्य अधिकाऱ्यास कोणत्याही वेळी, अलर्क रोगाने पिसाळलेल्या किंवा पिसाळले असल्याचा वाजवी संशय असलेल्या किंवा वर सांगितल्याप्रमाणे पिसाळलेला किंवा तसा संशय असलेला कोणताही कुत्रा किंवा जनावर चावलेल्या कोणत्याही कुत्र्यास किंवा इतर जनावरास मारून टाकता येईल किंवा मारून टाकण्याची व्यवस्था करता येईल किंवा त्यास आवश्यक वाटेल अशा मुदतीपर्यंत अटकावून ठेवता येईल किंवा अटकावून ठेवण्याची व्यवस्था करता येईल.

(६) या कलमान्वये मुख्य अधिकाऱ्यास आलेला सर्व खर्च, ताब्यात घेतलेल्या किंवा अटकावून ठेवलेल्या कोणत्याही कुत्र्याच्या मालकाकडून संपत्ती कराबद्दल येणे असलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने वसून करता येईल.

(७) या कलमान्वये मारून टाकलेल्या किंवा अन्यथा विल्हेवाट लावलेल्या कोणत्याही कुत्र्याच्या बाबतीत कोणतीही भरपाई देय असणार नाही.

डुकरे पाळण्यासंबंधी तरतूद.

**२९४.** (१) नगरपालिका क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात डुकरे पाळल्यामुळे लोकांना उपद्रव किंवा त्रास होतो असे कोणत्याही वेळी कोणत्याही नगरपरिषदेस आढळून आल्यास, नगरपरिषदेस जाहीर नोटिशीद्वारे कोणत्याही व्यक्तीने मुख्य अधिकाऱ्याच्या लेखीपरवानगीवाचून किंवा अशा परवानगीच्या अटीनुरूप असेल त्या व्यतिरिक्त इतर रीतीने नगरपालिका क्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही विशिष्ट भागात कोणतीही डुकरे पाळता कामा नये, असा निदेश देता येईल.

(२) जो कोणी, असा निदेश देण्यात आल्यानंतर, वर सांगितल्याप्रमाणे आवश्यक असलेल्या परवानगीवाचून किंवा अशा परवानगीच्या अटींनुरूप असेल त्या व्यतिरिक्त इतर रीतीने, नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही जागेत किंवा त्याच्या विशिष्ट भागात कोणतीही डुकरे पाळील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) भटकताना आढळून आलेल्या कोणत्याही डुकराला ताबडतोब मारून टाकता येईल आणि मुख्य अधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावता येईल. अशा रितीने मारून टाकलेल्या कोणत्याही डुकराबद्दल भरपाई मिळण्यासाठी कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

जनावरांना गलिच्छ पदार्थ खाऊ घालण्यास मनाई.

**२९५.** (१) कोणतीही व्यक्ती, दुग्धव्यवसायाच्या प्रयोजनांकरिता ठेवलेल्या किंवा मनुष्याने खाण्यासाठी योजलेल्या कोणत्याही जनावरास विष्ठा, तबेल्यातील कचरा, घाण किंवा इतर दुर्गंधीयुक्त पदार्थ खाऊ घालणार नाही, खाऊ देणार नाही किंवा खाऊ घालण्यास परवानगी देणार नाही.

(२) जो कोणी, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

प्रकरण बावीस

## खटले, दावे व पोलिसांचे अधिकार

फौजदारी कारवाई दाखल करणे, तडजोड करणे, वगैरेसंबंधी तरतुदी.

**२९६.** (१) [१][अध्यक्षाच्या] नियंत्रणास अधीन राहून, मुख्य अधिकाऱ्यास, ज्या कोणत्याही व्यक्तीवर,—

(क) हा अधिनियम किंवा तद्न्वये केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी यांविरुद्ध कोणताही अपराध केल्याबद्दल ;

(ख) ज्या कोणत्याही अपराधामुळे नगरपरिषदेच्या कोणत्याही मालमत्तेस किंवा हितसंबंधास किंवा या अधिनियमाची योग्य रीतीने अंमलबजावणी होण्यास बाध येत असेल किंवा येण्याचा संभव असेल असा कोणताही अपराध केल्याबद्दल ; किंवा

(ग) कोणत्याही प्रकारचा उपद्रव केल्याबद्दल ;

आरोप ठेवण्यात आला असेल त्या व्यक्तीविरुद्ध [१][कार्यवाही करता येईल किंवा करण्याची व्यवस्था करता येईल]:

परंतु, मुख्य अधिकारी, [२][अध्यक्षाच्या मंजुरीने असेल त्या शिवाय] पुढील कलमाच्या किंवा पोट-कलमाच्या तरतुदीविरुद्ध अपराध करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस शिक्षा होण्यासाठी खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करण्याचा आदेश देणार नाही :

(एक) कलम १७६ चे पोट-कलम (७) आणि कलम १८९ ची पोट-कलमे (८) व (९);

(दोन) कलम १८३ चे पोट-कलम (६) ;

(तीन) कलम २४९ चे पोट-कलम (५).

(२) हा अधिनियम किंवा तद्न्वये केलेले नियम किंवा उपविधी यांखालील कोणत्याही अपराधाबद्दल करावयाचा कोणताही खटला, असा अपराध घडल्याच्या दिनांकापासून लगतच्या सहा महिन्यांनंतर दाखल केला जाणार नाही, किंवा असा दिनांक माहीत नसल्यास किंवा अपराध करण्याचे चालू राहिल्यास असा अपराध घडल्यावर किंवा तो उघडकीस आल्यावर सहा महिन्यांनंतर दाखल केला जाणार नाही.

(३) या अधिनियमान्वये किंवा तदन्वये केलेले नियम किंवा उपविधी या अन्वये करावयाचा कोणताही खटला, त्यात, अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही दंडाधिकाऱ्यापुढे दाखल करता येईल, आणि हा अधिनियम, किंवा तद्न्वये केलेला कोणताही नियम किंवा उपविधी यांअन्वये किंवा त्यांच्या आधारे बसविलेला प्रत्येक दंड किंवा शास्ती आणि ज्यांच्या वसुलीसाठी या अधिनियमात अन्यथा विशेष तरतूद केलेली नाही अशी कोणतीही भरपाई, खर्च, आकार किंवा हानी यांची रक्कम आपदग्रस्त व्यक्तीने कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यावर, अशी रक्कम येणे असलेल्या व्यक्तीची अशा दंडाधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या हद्दीत जी कोणतीही जंगम मालमत्ता असेल तिच्यावर टाच आणून व ती विकून वसूल करता येईल.

---

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३४(क)(एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३४(क)(दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ चे कलम २४८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही दंडाधिकारी, हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम व उपविधी या अन्वये शिक्षापात्र अपराधाच्या बाबतीत त्या कलमान्वये दाखल केलेली फिर्याद ही सद्भावनापूर्वक दाखल करण्यात आली असली तरी, ती चुकीच्या गोष्टीवर किंवा अपुऱ्या माहितीवर आधारलेली होती अशी त्याची खात्री झाल्याशिवाय अशी फिर्याद मागे घेण्यास परवानगी देणार नाही. १८९८ चा ५.

(५) *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम किंवा उपविधी या अन्वये शिक्षापात्र असलेल्या सर्व अपराधांची तडजोड [1][अध्यक्षास] करता येईल. परंतु, अशी तडजोड केवळ ज्या न्यायालयापुढे अशा अपराधाबद्दल कोणताही खटला प्रलंबित असेल अशा न्यायालयाच्या परवानगीनेच करता येईल, किंवा जेव्हा आरोपीस न्यायचौकशी सुपूर्द करण्यात आले असेल किंवा त्यास सिद्धापराध ठरविण्यात आले असून अपील प्रलंबित असेल तेंव्हा, यथास्थिति, त्यास ज्या न्यायालयाच्या सुपूर्द करण्यात आले असेल त्या न्यायालयाच्या किंवा, ज्या न्यायालयापुढे त्या अपिलाची सुनावणी व्हावयाची असेल त्या न्यायालयाच्या परवानगीने अशी तडजोड करता येईल. १८९८ चा ५.

(६) [2][अध्यक्ष], लगतपूर्ववर्ती पोट-कलमान्वये कोणत्याही अपराधाची तडजोड करण्यापूर्वी स्थायी समितीची मान्यता मिळवील, आणि आरोपीने, अपराधाच्या तडजोडीदाखल, स्थायी समितीकडून ठरविण्यात येईल अशी रक्कम भरल्याशिवाय स्थायी समिती आपली मान्यता देणार नाही. [3][अशी रक्कम ही, त्या अपराधासाठी विहित केलेल्या द्रव्यदंडाच्या कमाल रकमेच्या निम्म्याहून कमी असणार नाही, आणि त्यासाठी विहित केलेल्या द्रव्यदंडाची रक्कम मर्यादित नसेल तर, अशी रक्कम पाचशे रुपयांहून कमी असणार नाही].

(७) या कलमान्वये केलेल्या अपराधाच्या तडजोडीचा परिणाम, ज्या आरोपीशी अशा अपराधासंबंधी तडजोड करण्यात आली असेल त्या आरोपीच्या दोषमुक्तीसारखा होईल.

(८) सर्व खटल्याचा किंवा कार्यवाहींचा खर्च नगरपालिका निधीतून देण्यात येईल.

अटकावणीच्या पद्धतीत दोष असला तरी ती कायदेशीर असणे.

**२९७.** कोणत्याही समन्समध्ये, अपराध सिद्ध झाल्याच्या किंवा अटकावणीच्या किंवा जप्तीच्या अधिपत्रात किंवा त्यासंबंधीच्या इतर कार्यवाहीत कोणताही दोष असल्यामुळे किंवा पद्धती नसल्यामुळे या अधिनियमान्वये केलेली कोणतीही अटकावणी किंवा केलेली कोणतीही जप्ती ही, बेकायदेशीर आहे. तसेच, अशी जप्ती करणारा कोणताही पक्षकार हा, अतिचारी आहे असे समजले जाणार नाही, किंवा अशा पक्षकाराच्या हातून नंतर घडलेल्या कोणत्याही नियमबाह्यतेमुळे तो आरंभतः अतिचारी आहे असे समजले जाणार नाही ; परंतु, अशा नियमबाह्यतेमुळे पीडित झालेल्या सर्व व्यक्तींना कोणत्याही सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयात विशेष नुकसानीबद्दल पूर्ण भरपाई वसूल करता येईल.

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ याच्या कलम ३४(ख) द्वारे "मुख्य अधिकाऱ्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३४(ग)(एक) द्वारे "मुख्य अधिकारी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम २८ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता पहा फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ (१९७४ चा २).

**२९८.** ज्या कोणत्याही कृत्याबद्दल, हयगयीबद्दल किंवा कसुरीबद्दल कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये बसविलेली कोणतीही शास्ती द्यावी लागली असेल, आणि त्या कृत्यामुळे, हयगयीमुळे किंवा कसुरीमुळे अशा व्यक्तीने नगरपालिकेच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान केले असेल तर, अशी व्यक्ती, अशा नुकसानीची भरपाई करून देण्यास, तसेच अशी शास्ती देण्यास पात्र ठरेल ; आणि अशा नुकसानीच्या रकमेसंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास, अशा नुकसानीची रक्कम, अशा शास्तीस पात्र झालेल्या व्यक्तीस ज्याने सिद्धापराध ठरविले असेल असा दंडाधिकारी ठरवील आणि मागणी केल्यावर अशी नुकसानीची रक्कम दिली नाही तर, ती अटकावणी करून वसूल करण्यात येईल व त्यानुसार असा दंडाधिकारी आपले अधिपत्र काढील. नगरपालिकेच्या मालमत्तेचे नुकसान कसे भरून काढावे.

**२९९.** जो कोणी,— सर्वसाधारण शास्ती.

(क) या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांच्या किंवा उपविधींच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून कोणतेही कृत्य करील किंवा करण्याचे वर्जित करील; किंवा

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारानुसार नगरपरिषद किंवा तिच्या वतीने काढलेल्या लेखी नोटिशीद्वारे किंवा आदेशाद्वारे दिलेल्या कोणत्याही कायदेशीर निदेशांची अवज्ञा करील किंवा त्यांचे अनुपालन करणार नाही ; किंवा

(ग) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये दिलेल्या कोणत्याही अधिकारानुसार नगरपरिषदेने किंवा तिच्या वतीने ज्या शर्तीवर कोणतीही परवानगी किंवा लायसन्स दिले असेल त्या शर्तीचे अनुपालन करणार नाही ; किंवा

(घ) या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा उपविधींच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली त्याच्या जवळील माहिती पुरविण्यास मुख्य अधिकाऱ्याने किंवा रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने कायदेशीररित्या फर्माविले असताना अशी माहिती पुरविणार नाही किंवा जाणूनबुजून खोटी माहिती पुरवील;

त्यास, अशा अपराधाकरिता इतर कोणत्याही शास्तीची तरतूद केली नसेल तर, अपराध सिद्ध झाल्यानंतर, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि असा अपराध चालू राहिल्यास, पहिला अपराध सिद्ध झाल्यानंतर ज्या मुदतीकरीता असा अपराध चालू राहिला असेल त्या मुदतीत प्रत्येक दिवसाबद्दल आणखी दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल :

परंतु, जेव्हा नोटिशीत किंवा आदेशात एखादे कृत्य करण्यासाठी मुदत नेमून दिली असेल परंतु या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये मुदत नेमून दिलेली नसेल तेव्हा, याप्रमाणे नेमून दिलेली मुदत ही वाजवी आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्याकडे राहील.

**३००.** ज्या प्रकरणात कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये शिक्षापात्र अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असेल आणि त्यास फक्त द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात यावी असे न्यायालयास वाटत असेल अशा प्रत्येक प्रकरणात, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात तद्विरुद्ध विशेष व पुरेशी कारणे नमूद करण्यात आली नसतील तर, त्याच्यावर बसविण्यात यावयाचा द्रव्यदंड हा, त्या अपराधाकरिता विहित केलेल्या द्रव्यदंडाच्या कमाल रकमेच्या एक-चतुर्थांशापेक्षा कमी असणार नाही आणि त्या अपराधाकरिता विहित केलेल्या द्रव्यदंडाच्या रकमेवर मर्यादा नसेल तर तो, द्रव्यदंड दोनशे पन्नास रुपयांहून कमी असणार नाही. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल किमान शास्ती.

दावे वगैरे दाखल करणे व त्यांतील बचाव याबाबत अधिकार.

**३०१.** (१) नगरपरिषदेच्या सर्वसाधारण नियंत्रणास अधीन राहून, मुख्य अधिकाऱ्यास,—

(क) नगरपरिषदेच्या वतीने सांगितलेल्या कोणत्याही दाव्याच्या किंवा केलेल्या कोणत्याही मागणीच्या संबंधात किंवा नगरपरिषदेच्या कोणत्याही मालमत्तेस, अधिकारास किंवा विशेषधिकारास नुकसान पोहचत असल्यास त्यासंबंधात कोणताही वाद किंवा इतर कार्यवाही दाखल करता येईल व चालविता येईल ;

(ख) नगरपरिषदेच्या वतीने दाखल केलेला कोणताही वाद किंवा सांगितलेला कोणताही दावा किंवा केलेली कोणतीही मागणी काढून घेता येईल किंवा त्याबाबत समझोता किंवा तडजोड करता येईल ;

(ग) खर्च किंवा भरपाई याबद्दल नगरपरिषदेला जी रक्कम येणे आहे असा दावा सांगण्यात आला असेल ती रक्कम वसूल करण्याकरिता कोणताही वाद दाखल करता येईल, तो मागे घेता येईल किंवा त्याबाबत तडजोड करता येईल किंवा तो आपसात मिटवता येईल ;

(घ) पट्टीसाठी मूल्य किंवा कर याबाबत केलेल्या कोणत्याही अपिलाच्या कामात बचाव करता येईल, ते दाखल करून घेता येईल किंवा त्याबाबत तडजोड करता येईल किंवा ते आपसात मिटवता येईल ;

(ङ) नगरपरिषदेविरुद्ध किंवा नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने आपल्या पदाच्या नात्याने कोणतीही गोष्ट केल्याबद्दल अनुक्रमे किंवा करण्याचे वर्जित केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध, जो कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात आली असेल त्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कामात बचाव करता येईल ;

(च) नगरपरिषदेविरुद्ध किंवा नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने वर म्हटल्याप्रमाणे कोणतीही गोष्ट केल्याबद्दल किंवा करण्याचे वर्जित केल्याबद्दल त्याच्याविरुद्ध उपस्थित केलेला कोणताही दावा, वाद, किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करून घेता येईल किंवा त्याबाबत तडजोड करता येईल :

परंतु,—

(एक) कोणतीही संविदा करण्यासाठी या अधिनियामान्वये कोणतीही मंजुरी आवश्यक असेल तर, अशा संविदेतून उद्‌भवलेला कोणताही दावा किंवा मागणी आपसात मिटवण्यासाठी किंवा त्याबाबत तडजोड करण्यासाठी तशाच प्रकारची मंजुरी मिळविली जाईल;

(दोन) असा कोणताही दावा कलम १७३, पोट-कलम (३) अन्वये पट्ट्याने दिलेल्या किंवा विकलेल्या जमिनीच्या संबंधी असेल किंवा तीन वर्षांहून अधिक मुदतीसाठी पट्ट्याने दिलेल्या किंवा विकलेल्या किंवा हस्तांतरित केलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेसंबंधी असेल तर अशा कोणत्याही वादाच्या बाबतीत, संचालकाच्या पूर्वमंजुरीवाचून नगरपरिषदेने आपसात मिटवणूक करणे किंवा तडजोड करणे कायदेशीर असणार नाही.

(२) या अधिनियमान्वये नगरपरिषदेकडे, तिच्या समित्यांकडे किंवा कर्मचाऱ्यांकडे निहित असलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर केल्यामुळे जिचे नुकसान झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस नगरपालिका निधीतून नुकसान भरपाई देता येईल.

(३) नगरपरिषदेच्या वतीने चालविलेल्या किंवा बचाव केलेल्या कोणत्याही दिवाणी कार्यवाहीचा खर्च नगरपालिका निधीतून देय असेल.

**३०२.** प्रत्येक परिषद सदस्य आणि नगरपरिषदेचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी व नगरपरिषदेने कोणताही कर वसूल करण्यासाठी नेमलेला प्रत्येक कंत्राटदार किंवा अभिकर्ता किंवा अशा कंत्राटदाराने किंवा अभिकर्त्याने असा कर वसूल करण्यासाठी नेमलेली प्रत्येक व्यक्ती, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. परिषद सदस्य, अधिकारी, कर्मचारी वगैरे हे लोकसेवक असणे.

१८६० चा ४५.

**३०३.** या अधिनियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात [१][जिल्हाधिकाऱ्याविरुद्ध, संचालकाविरुद्ध, विभागीय संचालकाविरुद्ध किंवा राज्य शासनाच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा] कोणत्याही नगरपरिषदेविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये घटित केलेल्या कोणत्याही समितीविरुद्ध किंवा नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध किंवा अशा कोणत्याही नगरपरिषदेच्या, समितीच्या, अधिकाऱ्याच्या किंवा कर्मच्याऱ्याच्या किंवा दंडाधिकाऱ्याच्या निदेशान्वये किंवा त्यानुसार काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा दाखल केला जाणार नाही. सद्भावनेने केलेल्या कृत्याबद्दल नगरपरिषद, तिचे अधिकारी, कर्मचारी, वगैरे यांच्या विरुद्ध वाद दाखल करण्यास रोध.

**३०४.** (१) या अधिनियमास अनुसरून किंवा या अधिनियमाची अंमलबजावणी करताना किंवा या अधिनियमाची अंमलबजावणी व्हावी या हेतूने केलेल्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात किंवा या अधिनियमाच्या अंमलबजावणीत झालेल्या कोणत्याही अभिकथित हयगयीच्या किंवा कसुरीच्या संबंधात नगरपरिषदेविरुद्ध किंवा या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही समितीविरुद्ध किंवा नगरपरिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणताही वाद,— या अधिनियमास अनुसरून किंवा त्याची अंमलबजावणी करताना केलेल्या कृत्याबद्दल नगरपरिषद, तिच्या समित्या, अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूद्ध वाद दाखल करण्याची मुदत.

(क) असे कारण घडल्याच्या लगतनंतर सहा महिन्यांच्या आत तो सुरू करण्यात आला नसेल तर, आणि

(ख) नगरपरिषदेच्या किंवा तिच्या समितीच्या बाबतीत लेखी नोटीस नगरपरिषदेच्या कार्यालयात दिल्यापासून किंवा ठेवल्यापासून आणि नगरपरिषदेच्या अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या बाबतीत अशी नोटीस त्यास दिल्यापासून किंवा त्याच्या कार्यालयात किंवा निवासस्थानी ठेवल्यापासून एक महिन्याची मुदत संपेपर्यंत,

दाखल करण्यात येणार नाही; आणि अशा सर्व नोटिसांमध्ये वादाच्या प्रयोजनाकरिता अशा वादाची कारणे व वाद दाखल करण्याचा ज्याचा विचार असेल अशा वादीचे व त्याच्या अधिवक्त्याचे, वकिलाचे किंवा अभिकर्ता असल्यास त्यांचे नाव व निवासस्थान वाजवी तपशीलासह नमूद करण्यात येईल.

(२) अशा कोणत्याही वादाच्या न्यायचौकशीच्या वेळी,—

(क) वादीस वर सांगितल्याप्रमाणे त्याने दिलेल्या किंवा ठेवलेल्या नोटिशीत वादाचे जे कारण निर्दिष्ट केले असेल त्याव्यतिरिक्त वादाच्या इतर कोणत्याही कारणासंबंधी साक्षीपुरावा दाखल करण्याची परवानगी दिली जाणार नाही ;

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम ५१ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ख) असा वाद क्षतिपूर्तीबद्दल असेल आणि कार्यवाही दाखल करण्यापूर्वी पुरेशी प्रतिपूर्ती देऊ केली असेल तर वादीला अशा रीतीने देऊ केलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम वसूल करता येणार नाही व अशा रीतीने रक्कम देऊ केल्यानंतर प्रतिवादाचा झालेला सर्व खर्च वादी देईल.

(३) अशा कोणत्याही वादातील प्रतिवादी नगरपरिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी असेल तर वादात किंवा वाद दाखल केल्यामुळे, त्याने द्यावयाची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग नगरपरिषदेच्या मंजुरीने नगरपालिका निधीतून देता येईल.

(४) पोट-कलम (१), खंड (क) आणि (ख) यांतील कोणतीही गोष्ट, विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ याच्या कलम ३८ अन्वये केलेल्या किंवा या अधिनियमाच्या कलम ९६, पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये केलेल्या वादास लागू होणार नाही. १९६३ चा४७.

पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार.

**३०५.** (१) या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधींच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींविरुद्ध कोणतीही व्यक्ती, एखादा अपराध करीत आहे असे कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास वाटत असेल, व अशा व्यक्तीचे नाव व पत्ता त्या पोलीस अधिकाऱ्यास माहीत नसेल, आणि अशी व्यक्ती आपले नाव व पता सांगण्यास नकार देत असेल किंवा दिलेल्या अशा नावाच्या व पत्त्याच्या अचूकपणाबद्दल संशय घेण्यास त्या पोलीस अधिकाऱ्यास कारण असेल तर त्यास, अशा व्यक्तीला अटक करता येईल व अशा व्यक्तीचे नाव व पत्ता याविषयी योग्य रीतीने खात्री पटेपर्यंत तिला पोलीस ठाण्यात अटकावून ठेवता येईल:

परंतु, अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, दंडाधिकाऱ्याच्या आदेशावाचून, दंडाधिकाऱ्याच्या समोर तिला हजर करण्यास जेवढा वेळ आवश्यक असेल त्याहून किंवा तिच्या अटकेपासून चोवीस तासांहून अधिक वेळेपर्यंत — यापैकी जी वेळ जास्त असेल त्या वेळेपर्यंत — अटकावून ठेवता येणार नाही.

(२) तसेच, या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधींच्या तरतुदीविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाची माहिती नगरपरिषदेस ताबडतोब देणे व नगरपालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी हे आपल्या कायदेशीर प्राधिकाराचा वापर करीत असता त्या सर्वांस मदत करणे हे सर्व पोलीस अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

## प्रकरण तेवीस

## नियंत्रण

पाहणी व पर्यवेक्षण याबाबतचे अधिकार.

**३०६.** संचालकास, जिल्हाधिकाऱ्यास किंवा राज्य शासनाने, संचालकाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यास, पुढील गोष्टी करण्याचा पृथकपणे अधिकार असेल :—

(क) कोणत्याही नगरपरिषदेच्या भोगवट्यात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत किंवा तिच्या जंगम मालमत्तेत किंवा तिच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थेखाली असलेल्या कोणत्याही संस्थेच्या मालकीच्या कोणत्याही जंगम मालमत्तेत किंवा तिच्या निदेशान्वये चालू असलेल्या कोणत्याही बांधकामाच्या ठिकाणी प्रवेश करणे व त्याची पाहणी करणे किंवा प्रवेश करविणे व त्याची पाहणी करविणे ;

(ख) कोणत्याही नगरपरिषदेच्या किंवा तिच्या समितीच्या कामकाजाचा कोणताही उतारा मागविणे किंवा त्याची पाहणी करणे आणि कोणत्याही नगरपरिषदेच्या किंवा तिच्या समित्यांपैकी कोणत्याही समितीच्या ताब्यात असलेले किंवा नियंत्रणाखाली असलेले कोणतेही पुस्तक किंवा दस्तऐवज मागविणे किंवा त्याची पाहणी करणे.

**३०७.** संचालकास किंवा जिल्हाधिकाऱ्यास,—— विवरणे व प्रतिवृत्ते मागविण्याचे अधिकार.

(क) जे प्रस्तुत करण्याविषयी कोणत्याही नगरपरिषदेस फर्माविणे त्यास योग्य वाटेल असे कोणतेही विवरण, विवरणपत्र लेखा किंवा प्रतिवृत्त मागविण्याचा ;

(ख) अशा नगरपरिषदेकडून किंवा तिच्या वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल ती करण्यास त्याच्या मते असलेला कोणताही आक्षेप किंवा तो पुरवू शकेल अशा ज्या कोणत्याही माहितीमुळे अशा नगरपरिषदेने एखादी गोष्ट करणे त्याच्या मते आवश्यक असेल अशी माहिती विचारात घेण्याविषयी नगरपरिषदेस फर्माविण्याचा, तसेच अशी गोष्ट करण्यापासून परावृत्त न होण्याची किंवा अशी गोष्ट न करण्याची आपली कारणे नमूद करून एक लेखी उत्तर वाजवी मुदतीत त्याला देण्याविषयी अशा नगरपरिषदेस फर्माविण्याचा ;

अधिकार असेल.

**३०८.** (१) नगरपरिषदेचा कोणताही आदेश किंवा ठराव अंमलात आणल्याने किंवा नगरपरिषदेकडून किंवा तिच्यावतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल अशी गोष्ट केल्याने लोकांस हानी पोहचत असेल किंवा त्रास होत असेल किंवा हानी पोहचण्याचा किंवा त्रास होण्याचा संभव असेल किंवा ती लोकहिताविरुद्ध आहे किंवा शांततेचा भंग करणारी आहे किंवा बेकायदेशीर आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत असेल तर, त्यास, आपल्या सहीनिशी लेखी आदेशाद्वारे, अशी अंमलबजावणी तहकूब करता येईल किंवा ती गोष्ट करण्यास मनाई करता येईल. विवक्षित कारणांवर नगरपरिषदेचे आदेश व ठराव यांची अंमलबजावणी तहकूब करण्याचे अधिकार.

(२) जिल्हाधिकारी आपल्या सहीने कोणताही असा आदेश देईल तेव्हा, त्याने तसा आदेश का दिला त्यासंबंधीच्या कारणांचा उल्लेख करून तो अशा आदेशाची एक प्रत, तो लागू असलेल्या नगरपरिषदेकडे पाठवील आणि तसेच तो एक प्रतिवृत्त अशा आदेशाच्या प्रतीसह, संचालकास सादर करील.

(३) जिल्हाधिकाऱ्याचा असा आदेश नगरपरिषदेला मिळाल्याच्या दिनांकापासून [१][तीस दिवसांच्या] आत, जिल्हाधिकाऱ्याचा आदेश का रद्द करण्यात यावा, त्यात सुधारणा का करण्यात यावी किंवा त्यात फेरफार का करण्यात यावे या गोष्टींचा उल्लेख करणारे एक निवेदन, नगरपरिषदेची तशी इच्छा असल्यास नगरपरिषद संचालकाकडे पाठवील. संचालकास असे निवेदन दिलेल्या मुदतीत मिळाले नाही तर, जिल्हाधिकाऱ्याचा आदेश कायम करण्यास नगरपरिषदेची कोणतीही हरकत नाही असे संचालक गृहीत धरील.

(४) जिल्हाधिकाऱ्याकडून असे प्रतिवृत्त आणि पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेले नगरपरिषदेचे निवेदन असल्यास, ते निवेदन मिळाल्यानंतर, संचालकास [२][असे प्रतिवृत्त मिळाल्यापासून सहा महिन्यांच्या मुदतीत किंवा संचालकाने केलेल्या विनंतीवरून राज्य शासनाकडून वाढवून देण्यात येईल अशा सहा महिन्यांपलीकडील मुदतीत] आदेश रद्द करता येईल किंवा त्यात सुधारणा किंवा फेरफार करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा तो आदेश फेरफारांसह किंवा फेरफारावाचून, अंमलात असण्याचे चालू राहील असा निदेश देता येईल :

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम २९(अ) द्वारे " वीस दिवसांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २९(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

परंतु, असा आदेश देण्यापूर्वी नगरपरिषदेकडून असे निवेदन मिळाले तर संचालक ते विचारात घेईल.

निकडीच्या परिस्थितीत विवक्षित कामांची अंमलबजावणी करण्याचे असाधारण अधिकार.

**३०९.** (१) निकडीच्या परिस्थितीत, जे नगरपरिषदेकडून किंवा तिच्या वतीने पार पाडता येईल किंवा करता येईल व जे ताबडतोब पार पाडणे किंवा करणे लोकांच्या आरोग्याच्या किंवा सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्याच्या मते आवश्यक असेल असे कोणतेही काम पार पाडण्यासाठी किंवा अशी कोणतीही कृती करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास व्यवस्था करता येईल, तसेच, ते काम पार पाडण्यास किंवा ती कृती करण्यास लागणारा वाजवी खर्च, ते काम पार पाडण्यास किंवा ती कृती करण्यास नेमलेल्या व्यक्तीस द्यावयाच्या वाजवी पारिश्रमिकासह नगरपरिषदेने ताबडतोब द्यावा, असा त्यास निदेश देता येईल.

(२) असा खर्च व पारिश्रमिक अशा रीतीने देण्यात आले नाहीत तर, जिल्हाधिकाऱ्यास नगरपरिषदेच्या वतीने नगरपरिषदेचा अधिकारी, खजिनदार किंवा बँकर म्हणून किंवा इतर कोणत्याही नात्याने, ज्या कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात त्यावेळी कोणताही पैसा असेल तिने आपल्या हाती असलेल्या किंवा वेळोवेळी आपल्या हाती येणाऱ्या पैशातून असा खर्च व पारिश्रमिक द्यावे असा आदेश देता येईल, आणि अशा व्यक्तीने अशा आदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल. अशा व्यक्तीने तिच्याजवळ असलेल्या किंवा तिला मिळालेल्या नगरपरिषदेच्या पैशातून, अशा आदेशास अनुसरून केलेल्या प्रत्येक प्रदानामुळे ती व्यक्ती अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्या किंवा रकमांच्या बाबतीत नगरपरिषदेसंबंधीच्या सर्व दायित्वातून पुरेशा रीतीने मुक्त होईल.

(३) लगतपूर्ववर्ती कलमाची पोट-कलमे (२), (३) व (४) यांच्या तरतुदी शक्य तेथवर या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास लागू होतील.

कर्मचारीवर्गाची नेमणूक करण्यात होणाऱ्या उधळपट्टीस प्रतिबंध करण्याचा संचालकाचा अधिकार.

**३१०.** अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून नगरपरिषदेने कामावर ठेवलेल्या व्यक्तींची संख्या किंवा ज्यांना कामावर ठेवण्याचे नगरपरिषद ठरवीत असेल अशा व्यक्तींची संख्या, किंवा अशा व्यक्तींना किंवा कोणत्याही विशिष्ट व्यक्तीस नगरपरिषदेने नेमून दिलेले पारिश्रमिक हे, वाजवीपेक्षा अधिक आहे असे संचालकाचे मत झाल्यास नगरपरिषद, संचालकाने तसे फर्माविले असता उक्त व्यक्तींची संख्या किंवा उक्त व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे पारिश्रमिक कमी करील :

परंतु, नगरपरिषदेला अशा कोणत्याही फर्मानाविरुद्ध राज्य शासनाकडे अपील करता येईल व राज्य शासनाने दिलेला निर्णय निर्णायक असेल.

राज्य शासनाकडून नगर-पालिकेच्या कारभाराची चौकशी.

**३११.** (१) राज्य शासनास, कोणत्याही नगरपरिषदेच्या नगरपालिका प्रशासनाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीविषयी किंवा या अधिनियमान्वये ज्याच्या संबंधात त्याची मंजुरी, मान्यता किंवा संमती आवश्यक आहे अशा कोणत्याही बाबीविषयी, त्याने याबाबत नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यासाठी आदेश देता येईल.

(२) अशी चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यास, अशा चौकशीच्या प्रयोजनासाठी, पुढील गोष्टींच्या संबंधात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतील तेच अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) शोध व तपासणी,

(ख) साक्षीदारास हजर राहण्यास भाग पाडणे व त्यांच्या खर्चाच्या रकमेचा निक्षेप करण्यास फर्माविणे,

(ग) दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे,

(घ) साक्षीदारांची शपथेवर तपासणी करणे,

(ङ) तहकुबी देणे,

(च) शपथपत्रावर दिलेला साक्षीपुरावा स्वीकारणे, आणि,

(छ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

आणि त्यास त्या व्यक्तीची साक्ष महत्त्वाची वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला स्वाधिकारे समन्स काढून बोलबिता येईल व त्याची तपासणी करता येईल ; आणि असा अधिकारी, १८९८ चा ५. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८,* कलमे ४८० व ४८२ यांच्या अर्थानुसार दिवाणी न्यायालय आहे असे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—** साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्याच्या प्रयोजनाकरिता, राज्याच्या सीमा याच अशा अधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमा असतील.

(३) चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यास, साक्षीपुरावा देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने केलेला वाजवी खर्च त्यास मान्य करता येईल आणि तो खर्च एकूण दावा खर्चाचा भाग असेल.

(४) दावा खर्च ठरविणे हे, राज्य शासनाच्या स्वेच्छानिर्णयाधीन असेल आणि असा खर्च कोणी, कोणाला व कोणत्या मर्यादेपर्यंत दिला पाहिजे ते ठरविण्याचा राज्य शासनाला पूर्ण अधिकार असेल. आणि असा खर्च जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

कर्तव्ये बजावण्यास भाग पाडण्याचा संचालकाचा अधिकार.

**३१२.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये नगरपरिषदेकडे सोपविलेले कोणतेही कर्तव्य बजावण्यात तिने कसूर केली आहे असे संचालकास, तक्रार करून किंवा अन्य रीतीने कळविण्यात आल्यास, नगरपरिषदेवर ज्या कसुरीबद्दल आरोप करण्यात आला ती कसूर तिने केलेली आहे अशी, योग्य चौकशी केल्यानंतर, संचालकाची खात्री झाल्यास, त्यास आदेशाद्वारे ते कर्तव्य बजावण्याविषयी मुदत ठरविता येईल आणि असा आदेश नगरपरिषदेस कळविता येईल.

(२) असे कर्तव्य अशा रीतीने ठरविलेल्या मुदतीत बजावण्यात आले नाही तर, संचालकास, ते बजावण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल, आणि ते बजावण्यासाठी लागणारा खर्च व ते बजावण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस द्यावयाचे वाजवी पारिश्रमिक हे नगरपरिषदेने ताबडतोब दिले पाहिजे असाही निदेश त्यास देता येईल.

(३) याप्रमाणे खर्च व पारिश्रमिक देण्यात न आल्यास, नगरपरिषदेचे कोणतेही पैसे ज्या बँकेत जमा ठेवले असतील त्या बँकेस, किंवा ज्यात नगरपरिषदेचे पैसे जमा ठेवले असतील असे कोणतेही स्थानिक शासकीय कोषागार किंवा पैसे सुरक्षित ठेवण्याची कोणतीही इतर जागा जिच्या ताब्यात असेल अशा व्यक्तीस, अशा बँकेत नगरपरिषदेच्या खाती जमा असलेल्या कोणत्याही पैशातून किंवा अशा व्यक्तीच्या हाती असलेल्या पैशातून, किंवा अशा बँकेस किंवा व्यक्तीस नगरपरिषदेकडून किंवा तिच्या वतीने ठेव म्हणून वेळोवेळी मिळतील अशा पैशातून असा खर्च व पारिश्रमिक देण्याविषयी फर्माविणारा आदेश संचालकास देता येईल ; आणि अशा बँकेस किंवा व्यक्तीस अशा आदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल. अशा आदेशानुसार केलेल्या प्रत्येक प्रदानामुळे अशा बँकेत किंवा व्यक्तीकडे अशा रीतीने ठेव म्हणून ठेवलेल्या नगरपरिषदेच्या पैशातून, अशा बँकेने किंवा व्यक्तीने अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेबाबत किंवा रकमांबाबत नगरपरिषदेसंबंधी असलेल्या सर्व दायित्वातून अशा बँकेची किंवा व्यक्तीची पुरेशा रीतीने मुक्तता झाली आहे असे समजले जाईल.

* आता फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ (१९७४ चा दोन) पहा.

[1][नगरपरिषद विसर्जित करण्याचा अधिकार.]

**३१३.** (१) जर राज्य शासनाच्या मते,—

(क) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याद्वारे किंवा तदन्वये, तिच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये बजावण्यास एखादी नगरपरिषद सक्षम नसेल, किंवा

(ख) अशी कर्तव्ये बजावताना किंवा जिल्हाधिकारी, संचालक, राज्य शासन किंवा नगरपरिषदेस निदेश किंवा आदेश देण्यासाठी कायद्यान्वये अधिकार दिलेला इतर कोणताही प्राधिकारी, याने दिलेल्या कायदेशीर निदेशांचे किंवा आदेशांचे पालन करताना तिच्याकडून सतत कसूर होत असेल, किंवा

[2][(खख) कलम ४९, पोट-कलम (२), खंड (ध-एक क) खालील आपली कर्तव्ये बजावण्यात एखाद्या नगरपरिषदेने कसूर केली असेल, किंवा]

(ग) तिने आपल्या अधिकारांच्या मर्यादेचे अतिक्रमण केले असेल किंवा अधिकारांचा दुरुपयोग केला असेल, किंवा

(घ) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नगरपरिषदेचा कारभार चालविणे शक्य नाही अशी परिस्थिती उद्भवलेली असेल, किंवा

(ङ) नगरपरिषदेची आर्थिक स्थिती आणि पत यास गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण झाला असेल तर, [3][राज्य शासनास, त्या नगरपरिषदेला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्यासंबंधीची कारणे नमूद करून परिषद विसर्जित करता येईल.]

[4][(२) परिषदेतील जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांशापेक्षा अधिक पदे रिक्त झालेली असतील तर राज्य शासनाला राजपत्रातील आदेशाद्वारे अशी परिषद विसर्जित करता येईल :

परंतु, अशी कोणतीही परिषद विसर्जित करण्यापूर्वी, अशा परिषदेला तिची बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.]

[5] * * * * *

[6] * * * * *

विसर्जनाचे परिणाम.

[7][**३१६.** कलम ३१३ चे पोट-कलम (१) किंवा भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-यच च्या परंतुकाअन्वये परिषद विसर्जित करण्यात आल्यामुळे पुढील परिणाम होतील :—

(क) नगरपरिषदेचे सर्व परिषद सदस्य [8][ विसर्जनाच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून किंवा ] अनुच्छेद २४३ यच च्या परंतुकाअन्वये ज्या दिनांकास परिषद विसर्जित झाली असेल त्या दिनांकापासून असे परिषद सदस्य म्हणून धारण केलेली आपली पदे सोडतील ;

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४१ याच्या कलम १५३(क) द्वारे मूळ समासटिपेऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[2] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६७ याच्या कलम ४ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५३(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम १४ द्वारे पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[5] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५४ द्वारे कलम ३१४ वगळण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १५५ द्वारे कलम ३१५ वगळण्यात आले.

[7] वरील अधिनियमाच्या कलम १५४ द्वारे मूळ कलम ३१६ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[8] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ११ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ख) नगरपरिषद, अध्यक्ष, उपाध्यक्ष, निरनिराळ्या समित्या, परिषद सदस्य व मुख्य अधिकारी यांच्याकडे या अधिनियमाअन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याअन्वये निहित असलेले किंवा त्यांनी वापरावयाचे सर्व अधिकार व करावयाची सर्व कामे, राज्य शासन याबाबतीत वेळोवेळी नियुक्त करील अशा एका किंवा अनेक शासकीय अधिकाऱ्यांकडे निहित असतील व अशा एका किंवा अनेक अधिकाऱ्यांकडून ती कामे पार पाडण्यात येतील, आणि अशा एका किंवा अनेक अधिकाऱ्यांना, राज्य शासन, वेळोवेळी, निर्धारित करील असे पारिश्रमिक नगरपालिका निधीतून मिळेल ;

(ग) मुख्य अधिकारी हा, खंड (ख) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या अशा एका किंवा अनेक अधिकाऱ्यांना दुय्यम असेल व मुख्य अधिकाऱ्याचे कोणते अधिकार अशा परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्याला वापरता येतील, त्याची कोणती कर्तव्ये अशा परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्याला पार पाडता येतील हे अशा एका किंवा अनेक अधिकाऱ्यांकडून निर्धारित करण्यात येईल ;

(घ) नगरपरिषदेकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, तिचे विसर्जन झाल्यानंतरच्या काळात राज्य शासनाकडे निहित होईल. ]

[1][ **३१७.** कलम ३१३ अन्वये नगरपरिषदेचे विसर्जन होईल त्याबाबतीत, अशा नगरपरिषदेची रचना करण्यासाठी, राज्य निवडणूक आयुक्ताकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास सार्वत्रिक निवडणूक घेण्यात येईल : — विसर्जनानंतर नगरपरिषद पुन्हा स्थापन करणे.

परंतु, नगरपरिषदेची रचना करण्यासाठी घ्यावयाची निवडणूक, अशा नगरपरिषदेचे विसर्जन झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल. ]

**३१८.** राज्य शासनाला, कोणत्याही वेळी, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणत्याही नगरपरिषदेने किंवा अशा नगरपरिषदेच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने तिला किंवा त्याला देण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करताना दिलेल्या कोणत्याही आदेशाचा कायदेशीरपणा किंवा औचित्य याविषयी, किंवा त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या नियमानुसारितेविषयी स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, अशा कोणत्याही नगरपरिषदेपुढे किंवा अधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेल्या किंवा त्याने निकालात काढलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या कागदपत्रांची तपासणी करता येईल आणि त्यासंबंधात, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल : — राज्य शासनाचे पुनरीक्षण-विषयक अधिकार.

परंतु, हजर राहण्याबाबत व आपली बाजू मांडण्याबाबत हितसंबंधित पक्षकारांना नोटीस देण्यात आल्याशिवाय, अशा कोणत्याही आदेशात फेरफार केला जाणार नाही किंवा तो फिरवला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, ज्या प्रकरणात अपील करण्याची तरतूद केलेली असेल व असे अपील दाखल केलेले असेल किंवा त्यावर निर्णय देण्यात आलेला असेल अशा कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत असा कोणताही आदेश दिला जाणार नाही :

परंतु तसेच, संबंधित नगरपरिषदेने किंवा अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्ष झाल्यानंतर, राज्य शासन असा कोणताही अभिलेख मागविणार नाही.

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५७ द्वारे मूळ कलम ३१७ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

आपल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याचे राज्य शासनाचे अधिकार.

**३१९.** या अधिनियमाशी संबंधित असलेल्या सर्व बाबींच्या संबंधातील, या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा उपविधीअन्वये त्यास दिलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करताना राज्य शासनाने किंवा नगरपरिषदेव्यतिरिक्त इतर प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करण्यात नगरपरिषदेने कसूर केली तर, राज्य शासनाला नगरपरिषदेच्या खर्चाने अशा आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

पुनर्विलोकनासंबंधी अधिकार.

**३२०.** राज्य शासनाला स्वतः होऊन किंवा हितसंबंधित पक्षकाराने अर्ज केल्यानंतर, त्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही मंजुरीचे किंवा मान्यतेचे पुनर्विलोकन करता येईल आणि त्याचप्रमाणे संचालकास किंवा जिल्हाधिकाऱ्यास, त्याने स्वतः दिलेल्या आदेशाचे किंवा या अधिनियमान्वये त्याने दिलेल्या कोणत्याही मंजुरीचे किंवा मान्यतेचे पुनर्विलोकन करता येईल आणि त्यावर त्यासंबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

परंतु,—–

(एक) हितसंबंधित पक्षकारांना हजर राहण्याबाबत व आपली बाजू मांडण्याबाबत नोटीस देण्यात आल्याशिवाय अशा कोणत्याही आदेशांत फेरफार केला जाणार नाही किंवा तो फिरविला जाणार नाही, किंवा कोणत्याही मंजुरीचे किंवा मान्यतेचे पुनर्विलोकन केले जाणार नाही.

(दोन) ज्याच्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल किंवा ज्याबाबत पुनरीक्षणाची कार्यवाही होत असेल अशा कोणत्याही आदेशाचे, असे अपील किंवा अशी कार्यवाही प्रलंबित असेल तोपर्यंत पुनर्विलोकन केले जाणार नाही.

(तीन) कार्यवाहीशी संबंधित एखाद्या पक्षकाराने अर्ज केला असेल त्याव्यतिरिक्त, खाजगी व्यक्ती मधील हक्काबाबतच्या कोणत्याही प्रश्नास बाध आणणाऱ्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन केले जाणार नाही आणि अशा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी केलेला कोणताही अर्ज, तो आदेश देण्यात आल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत करण्यात आला नसेल तर, स्वीकारला जाणार नाही.

## प्रकरण चोवीस

## नियम आणि उप-विधी

नियम करण्याचा शासनाचा अधिकार.

**३२१.** (१) या अधिनियमाखाली सर्व नियम करण्याच्या अधिकारांचा वापर, राज्य शासनाला, **राजपत्रात** अधिसूचना देऊन करता येईल.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्यासंबंधीच्या कोणत्याही अधिकाराला बाध न आणता, राज्य शासनाला, सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील :

[१][परंतु, राज्य निवडणूक आयुक्ताशी विचारविनिमय केल्याखेरीज, मतदार याद्या तयार करणे व निवडणूक घेणे यांसंबंधातील कोणत्याही बाबतीत कोणतेही नियम केले जाणार नाहीत :]

[२][परंतु आणखी असे की, तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री पटल्यास, या अधिनियमाखाली निवडणूक घेण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास या कलमान्वये करावयाच्या नियमांसाठी पूर्वप्रसिद्धीची अट काढून टाकता येईल. ]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम १५८ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २० हे परंतुक दाखल करण्यात आले.

(३) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे एक अधिवेशन किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरता अधिवेशन चालू असताना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर तो नियम अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, यथास्थिति, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा तो नियम अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

उपविधी करण्याचा नगरपरिषदेचा अधिकार.

**३२२.** (१) या अधिनियमान्वये सर्व उपविधी तयार करण्याच्या अधिकारांचा वापर प्रत्येक नगरपरिषदेस, यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी किंवा राज्य शासन यांच्या पूर्वमंजुरीस अधीन राहून करता येईल.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या उपविधी तयार करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न आणता, नगरपरिषदेस, आपला कारभार चालविण्यासाठी आणि आपल्या समित्यांच्या, अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी हा अधिनियम व त्या अन्वये केलेले नियम यांच्याशी सुसंगत असे उपविधी तयार करता येतील.

(३) (क) जेव्हा नगरपरिषदेस, या अधिनियमान्वये उपविधी तयार करण्याची इच्छा असेल तेव्हा. ती आपल्या विशेष सभेतील ठरावाद्वारे अशा उपविधींचा मसुदा मान्य करून घेईल.

[१][(ख) असा कोणताही ठराव संमत झाल्यानंतर, नगरपरिषद उपविधीचा मसुदा आपल्या सूचना फलकावर लावील आणि अशा रीतीने सूचना फलकावर लावलेल्या उपविधींच्या मसुद्यांच्या विषयासंबंधी नगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांना माहिती देण्यासाठी आणि नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी मुदतीत उक्त मसुद्यासंबंधीच्या त्यांच्या हरकती व सूचना मागविण्यासाठी, स्थानिक वृत्तपत्रात एक नोटीस प्रसिद्ध करील.]

(ग) त्यानंतर नगरपरिषद आपल्या विशेष सभेत अशा कोणत्याही हरकती अगर सूचना आल्या असल्यास त्यावर विचार करील आणि ठरावाद्वारे उपविधीच्या अंतिम मसुद्यास मान्यता देईल.

(घ) असा ठराव संमत झाल्यापासून सात दिवसांच्या आत नगरपरिषद असा अंतिम मसुदा जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील.

(ङ) जिल्हाधिकारी, खंड (घ) अन्वये त्याच्याकडे पाठविण्यात आलेल्या उपविधींचा अंतिम मसुदा तपासील आणि,—

(एक) (क) ते उपविधी, हा अधिनियम किंवा त्या अन्वये केलेले नियम यांच्याशी विसंगत आहेत आणि उपविधींत महत्वाची दुरूस्ती केल्याशिवाय ती विसंगती दूर करता येणार नाही ; किंवा

---

[१] मूळ खंडाऐवजी हा खंड सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४५, कलम १४ द्वारे दाखल करण्यात आला.

(ख) उपविधींस घेण्यात आलेली कोणतीही हरकत नगरपरिषदेने योग्यरीत्या विचारात घेतलेली नाही ; किंवा

(ग) उपविधींस एखादी नवीन हरकत घेण्यात आली आहे ; किंवा

(घ) उपविधींत सुचविण्यात आलेले कराचे किंवा फीचे दर अपुरे आहेत ;

असे त्यांचे मत झाल्यास, त्यास त्या उपविधीस मंजुरी देण्यास नकार देता येईल किंवा ते नगरपरिषदेकडे परत पाठविता येतील ; किंवा

(दोन) त्यास आवश्यक वाटतील असे फेरबदल करून किंवा फेरबदल न करता त्यास मंजुरी देता येईल.

जिल्हाधिकारी त्याने मंजुरी दिलेले उपविधी **राजपत्रात** प्रसिद्ध करील आणि ते उपविधी **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून किंवा त्यात उल्लेख करण्यात येईल अशा त्या नंतरच्या इतर दिनांकापासून अंमलात येतील.

(च) खंड (ङ) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही नगरपरिषदेने खंड (घ) अन्वये पाठविलेले उपविधी कोणताही कर बसवणे, तो रद्द करणे, तो माफ करणे, त्यात फेरफार करणे किंवा त्याचे विनियमन करणे याच्याशी संबंधित असतील तर जिल्हाधिकारी, मंजुरीसाठी ते उपविधी राज्य शासनाकडे पाठवील आणि त्यानंतर खंड (ङ) च्या तरतुदी उक्त खंडातील " जिल्हाधिकारी " या शब्दाऐवजी " राज्य शासन " हे शब्द दाखल करण्यात आले आहेत असे समजून लागू होतील.

(४) सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने, एखाद्या नगरपरिषदेच्या कोणत्याही उपविधींत दुरुस्ती करणे आवश्यक किंवा इष्ट आहे किंवा ते उपविधी हा अधिनियम किंवा त्या अन्वये केलेले नियम यांच्या कोणत्याही तरतुदीशी विसंगत आहेत असे राज्य शासनाला दिसून आल्यास, राज्य शासनाला, नगरपरिषदेशी विचारविनिमय करून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा उपविधींपैकी कोणत्याही उपविधीत सुधारणा करता येईल, किंवा तो रद्द करता येईल आणि अशी अधिसूचना काढण्यात आल्यानंतर ते उपविधी तद्नुसार योग्यरीत्या सुधारण्यात आल्याचे किंवा यथास्थिति रद्द करण्यात आल्याचे समजण्यात येईल. परंतु, अशा सुधारणेमुळे किंवा रद्द करण्यामुळे यापूर्वी केलेल्या किंवा करावयाच्या राहून गेलेल्या, कोणत्याही गोष्टींच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

नमुनेवजा उपविधी तयार करण्याचा व ते स्वीकारण्यास भाग पाडण्याचा अधिकार.

**३२३.** (१) ज्या बाबींच्या संबंधात उपविधी तयार करण्याचा नगरपरिषदेला अधिकार असेल त्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबतीत राज्य शासनाला नमुनेवजा उपविधी तयार करता येतील आणि नगरपरिषदांच्या मार्गदर्शनासाठी ते **राजपत्रात** प्रसिद्ध करता येतील.

(२) राज्य शासनाने ज्या बाबींसाठी नमुनेवजा उपविधी तयार केले असतील त्याबाबत नगरपरिषदेने आधीच उपविधी तयार केले असतील तर नगरपरिषदेस विशिष्ट स्थानिक परिस्थितीनुसार आवश्यक असतील एवढे कमीत कमी बदल करून ते नमुनेवजा उपविधी स्वीकारता येतील.

(३) नगरपरिषदेने कोणत्याही बाबींच्या संबंधात केलेले उपविधी अशा बाबींचे नियमन करण्यास अपुरे आहेत आणि राज्य शासनाने अशा बाबींसाठी नमुनेवजा उपविधी तयार केलेले आहेत असे कोणत्याही वेळी संचालकास आढळून आल्यास संचालकास याबाबत आदेश काढून स्थानिक परिस्थितीनुसार योग्य वाटतील त्याप्रमाणे फेरबदल करून असे नमुनेवजा उपविधी स्वीकारण्यास नगरपरिषदेस भाग पाडता येईल.

(४) वरील पोट-कलम (३) अन्वये संचालकाने दिलेल्या आदेशांचे नगरपरिषद अशा आदेशांच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत पालन करील.

(५) नगरपरिषदेने संचालकाच्या आदेशाचे पालन न केल्यास, संचालकास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नगरपरिषदेने त्याबाबतीत आधीच कोणतेही उपविधी केले असल्यास त्यांचे अधिक्रमण करून, स्थानिक परिस्थितीनुसार त्यास आवश्यक वाटेल असा फेरबदल करून ते नमुनेवजा उपविधी त्या नगरपरिषदेस लागू करता येतील. तसे घडल्यास अशा रीतीने लागू केलेले नमुनेवजा उपविधी नगरपरिषदेने योग्यरीत्या तयार केल्याचे समजण्यात येईल.

(६) राज्य शासनाने तयार केलेले नमुनेवजा उपविधी कोणताही कर बसविण्याशी, तो रद्द करण्याशी, तो माफ करण्याशी, त्यात फेरफार करण्याशी किंवा त्याचे विनियमन करण्याशी संबंधित असतील तर, पोट-कलम (३), (४) आणि (५) च्या तरतुदी जणू काही त्यातील " संचालक " या शब्दाऐवजी " राज्य शासन " हे शब्द दाखल करण्यात आले आहेत असे समजून लागू होतील.

**३२४.** प्रत्येक नगरपरिषद, आपल्या मुख्य कार्यालयात, हा अधिनियम, त्या खाली केलेले आणि नगरपालिका विभागात अंमलात असलेले नियम व उपविधी यांच्या इंग्रजी व मराठी प्रती कार्यालयाच्या वेळात, त्या क्षेत्रातील रहिवाश्यांना पाहण्यासाठी, विनामूल्य खुल्या ठेवील. तसेच नगरपरिषदेस या पुस्तकांच्या प्रतींच्या विक्रीसाठी व्यवस्था करता येईल.

अधिनियम, नियम आणि उपविधी यांच्या प्रती लोकांना पाहण्यासाठी आणि विक्रीसाठी नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध करून देणे.

## प्रकरण पंचवीस

## नोटिसा बजावणे, कसूर केली असता कामे पार पाडणे व भरपाई

**३२५.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीवर या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणतीही नोटीस बजावावयाची असेल किंवा तिला पाठवावयाची असेल किंवा तिला द्यावयाची असेल तेव्हा, या अधिनियमात अन्यथा तरतूद न केलेल्या सर्व बाबतीत अशी नोटीस बजावण्याचे, पाठविण्याचे किंवा देण्याचे काम पुढील रीतीने पार पाडले जाईल :—

व्यक्तींच्या नावांनी काढलेल्या नोटिसा वगैरे बजावणे.

(क) ज्या व्यक्तीस उद्देशून नोटीस काढलेली असेल त्या व्यक्तीस ती देणे किंवा तिच्या स्वाधीन करणे ; किंवा

(ख) अशी व्यक्ती सापडत नसेल तर, तिच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणी किंवा तिच्या शेवटी माहीत असलेल्या निवासस्थानी आढळून आलेल्या तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीस किंवा नोकरास ती नोटीस देणे किंवा त्याच्या स्वाधीन करणे ;

(ग) वरीलपैकी कोणताही मार्ग उपलब्ध नसेल तर, किंवा ज्या व्यक्तीस अशी नोटीस देण्यात आली असेल किंवा जिच्या स्वाधीन करण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती स्वीकारण्यास नकार दिल्यास ती नोटीस, ज्या इमारतीशी किंवा जमिनीशी संबंधित असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या एखाद्या ठळक भागावर लावण्याची व्यवस्था करणे.

(२) जेव्हा या अधिनियमाखाली द्यावयाची कोणतीही नोटीस, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर बजावणे, पाठवणे किंवा देणे आवश्यक असेल किंवा तसे करण्यास परवानगी दिलेली असेल तेव्हा,—

(एक) अशा नोटिशीत, अशा मालकाचे किंवा भोगवटादाराचे नाव देणे आवश्यक असणार नाही ;

(दोन) असे मालक किंवा भोगवटादार एकापेक्षा अधिक असतील तर, अशी नोटीस त्यापैकी कोणत्याही एकावर बजावता येईल किंवा पाठविता येईल किंवा त्यास देता येईल.

(३) जेव्हा जेव्हा एखादी नोटीस कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर बजावण्यात यावी किंवा त्याला पाठविण्यात यावी किंवा त्यास देण्यात यावी अशी या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तरतूद करण्यात आली असेल आणि मालक व भोगवटादार या दोन वेगवेगळ्या व्यक्ती असतील तर, अशी नोटीस, तिचे पालन करण्याचे दायित्व जिच्यावर प्रथमतः असेल अशा त्यांपैकी एका व्यक्तीवर बजावण्यात येईल, तिला पाठविण्यात येईल किंवा तिला देण्यात येईल आणि शंका उत्पन्न झाल्यास अशा दोन्ही व्यक्तींवर बजावण्यात येईल, त्यांना पाठविण्यात येईल किंवा त्यांना देण्यात येईल :

परंतु, अशा कोणत्याही बाबतीत, मालक नगरपालिकेच्या क्षेत्रात राहत नसेल तर अशी नोटीस भोगवटादारास देणे पुरेसे होईल.

(४) पोट-कलम (१), (२) आणि (३) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये बजावावयाच्या, पाठवावयाच्या किंवा द्यावयाच्या कोणत्याही देयकास, मागणीपत्रास, आदेशास, किंवा समन्सला किंवा अशा इतर दस्तऐवजास लागू असतील.

(५) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, 'अ' वर्ग किंवा 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत, नगरपालिका कराचे देयक, ते देण्याचे दायित्व असलेल्या व्यक्तीवर, नगरपालिका क्षेत्रातील त्या व्यक्तीच्या शेवटी माहीत असलेल्या निवासस्थानी किंवा तिच्या धंद्याच्या ठिकाणी तिला उद्देशून लिहिलेल्या व टपालखर्च आधी भरलेल्या पत्राद्वारे टपाल दाखल्यासहित टपालाने पाठवून तिच्यावर बजावता येईल आणि अशा रीतीने पाठविलेले प्रत्येक देयक, ज्या दिनांकास असे पत्र डाकेने पाठविण्यात आले त्या दिनांकाच्या पुढील दिनांकास बजावण्यात आल्याचे समजले जाईल, आणि अशा रीतीने देयक बजावण्यात आल्याचे सिद्ध करून देताना, ते पत्र योग्य पत्त्यावर लिहिलेले होते आणि टपाल दाखला घेऊन पाठवले होते हे सिद्ध करणे पुरेसे होईल.

सार्वजनिक आणि सर्वसाधारण नोटिसा प्रसिद्ध करणे.

**३२६.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये, जी नोटीस नगरपरिषदेने किंवा कोणत्याही नगरपालिका प्राधिकरणाने किंवा अधिकाऱ्याने प्रकाशित करणे आवश्यक आहे किंवा जी प्रसिद्ध करण्याचा त्यास अधिकार आहे अशी प्रत्येक सर्वसाधारण किंवा सार्वजनिक नोटीस ही, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये ती प्रसिद्ध करण्यासाठी घालून दिलेली जी कोणतीही इतर कार्यपद्धती असेल तिच्या जोडीने आणखी नगरपालिकेच्या सूचनाफलकावर अशी नोटीस लावून प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) त्याशिवाय, अशी सर्वसाधारण किंवा सार्वजनिक नोटीस, पुढीलपैकी कोणत्याही रीतीने प्रसिद्ध करता येईल :—

(क) नगरपालिकेच्या क्षेत्रातील प्रमुख ठिकाणी किंवा अशी नोटीस नगरपालिकेच्या क्षेत्रातील केवळ एखाद्या वसतिस्थानालाच लागू असेल तर, नगरपरिषद वेळोवेळी निवड करील अशा त्या वसतिस्थानातील प्रमुख ठिकाणी ती नोटीस लावणे ;

(ख) नगरपरिषद वेळोवेळी मान्य करील अशा, नगरपालिकेच्या क्षेत्रात खप असलेल्या वृत्तपत्रात अशी नोटीस प्रसिद्ध करणे ;

(ग) दवंडी पिटवणे किंवा नगरपालिका क्षेत्रात रूढ असलेल्या प्रसिद्धीच्या कोणत्याही इतर पद्धतीने.

(३) पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये नोटीस प्रसिद्ध करणे आवश्यक असेल आणि प्रसिद्धीचा खर्च विचारात घेता, मूळ नोटिशीचा संपूर्ण मजकूर प्रसिद्ध करणे व्यवहार्य नाही असे नोटीस प्रसिद्ध करणाऱ्या प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास, अशी नोटीस नगरपालिकेच्या सूचनाफलकावर लावणे आणि नगरपालिकेच्या सूचनाफलकावर नोटिशीचा संपूर्ण मजकूर लावलेला आहे अशा घोषणेसह, पोट-कलम (२), खंड (ख) अन्वये मान्यता दिलेल्या वृत्तपत्रात, अशा नोटिशीचा मतितार्थ प्रसिद्ध करणे हे, पोट-कलम (२), खंड (ख) चे अनुपालन करण्यास पुरेसे असल्याचे मानण्यात येईल.

(४) या कलमाच्या तरतुदी, नगरपालिकेच्या क्षेत्रातील रहिवाशांच्या सर्वसाधारण माहितीसाठी जी प्रसिद्ध करणे नगरपरिषदेस किंवा कोणत्याही नगरपालिका प्राधिकरणास किंवा अधिकाऱ्यास आवश्यक आहे किंवा तसे करण्यास त्यांना अधिकार दिलेला आहे अशा कोणत्याही उद्घोषणेस, आदेशास किंवा इतर लेखास लागू असतील.

**३२७.** जे कृत्य करण्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये कोणतीही मुदत निश्चित केली नसेल असे कोणतेही कृत्य करण्यास फर्मावणारी या अधिनियमाखालील नोटीस, आदेश किंवा फर्मावणीपत्र यांमध्येच असे कृत्य करण्यासाठी वाजवी मुदत निश्चित करण्यात येईल.

कोणत्याही फर्मावणीसाठी अधिनियमान्वये मुदत निश्चित केलेली नसेल तेव्हा वाजवी मुदत निश्चित करणे.

**३२८.** (१) जेव्हा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली, कोणत्याही व्यक्तीने कोणतेही काम किंवा कोणतीही गोष्ट पार पाडणे आवश्यक असेल आणि असे काम किंवा गोष्ट पार पाडताना त्यात कसूर झाली असेल तेव्हा, नगरपरिषदेस ते काम करवून घेता येईल. मग अशा कसुरीबद्दल कोणतीही शास्ती देण्याविषयी तरतूद केलेली असो अगर नसो ; आणि अशा कामावर झालेला खर्च, या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली नसल्यास, असे काम जिने करावयास पाहिजे होते ती व्यक्ती नगरपरिषदेस देईल; आणि तो खर्च मालमत्ता कर म्हणून दावा सांगितलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करता येते त्याचरीतीने नगरपरिषदेस योग्य वाटेल त्याप्रमाणे एका ठोक रकमेत किंवा हप्त्याहप्त्याने, वसूल करण्यायोग्य असेल :

मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केली असता नगरपरिषदेस कामे पार पाडता येणे व खर्च वसूल करता येणे.

परंतु,—

(क) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत, अशा व्यक्तीस, असे काम पार पाडण्यास किंवा अशी गोष्ट करण्यास तिला फर्मावणारी नोटीस दिली जाईल ;

(ख) कोणत्याही नगरपरिषदेने कोणतीही जलनिस्सारण योजना किंवा जलव्यवस्था योजना सुरू केली असेल तेव्हा, कलम २०२ खालील किंवा या अधिनियमांच्या इतर कोणत्याही तरतुदीखालील नगरपरिषदेस असलेल्या अधिकारांना बाध येऊ न देता,

नगरपरिषदेस, कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाशी जलनिस्सारणाचे किंवा तीत पाण्याचे नळ बसविण्याचे काम ज्या रीतीने पार पाडले जाईल त्या रीतीबाबत, तसेच नगरपरिषद जी कोणतीही आर्थिक किंवा इतर मदत देईल त्या मदतीबाबत, खास करारपत्र करता येईल व तिने तसे करणे हे कायदेशीर असेल ; आणि मालकाने संमत केलेली कोणतीही रक्कम अशा करारपत्राच्या अटींस अनुसरून वसूल केली जाईल किंवा ती तशी वसूल न झाल्यास पोट-कलम (२) व (३) यांत सांगितलेल्या रीतीने वसूल केली जाईल.

(ग) जेव्हा कलम १७५ चे पोट-कलम (१), कलम १८३, कलम १८९ चे पोट-कलम (४) किंवा (१२) किंवा कलमे २००, २०२, २०७ किंवा कलम २०८ खाली आदेश देण्यात आला असेल किंवा फर्मावणी करण्यात आली असेल किंवा कलम २०४ अन्वये परवानगी देण्यात आली असेल किंवा या पोट-कलमाच्या परंतुक (ख) खाली व्यवस्था करण्यात आली असेल तेव्हा, नगरपरिषदेस, तिने अशा आदेशाची अंमलबजावणी करताना किंवा अशी फर्मावणी, परवानगी किंवा व्यवस्था पार पाडताना केलेला कोणताही खर्च तिला योग्य वाटल्यास, या अधिनियमान्वये तिला मिळालेल्या इतर कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता, सुधारणा खर्च म्हणून ठरविता येईल. अशा सुधारणा खर्चाचा भार अशा जागेवर किंवा जमिनीवर असेल व तो दरसाल दर शेकडा साडेसात या दराने होणाऱ्या व्याजासह, नगरपरिषद ठरवील इतक्या हप्त्यांनी आकारण्यात येईल व तो पोट-कलमे (२) व (३) मध्ये सांगितलेल्या रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

(२) कसूर करणारी व्यक्ती ही, ज्या इमारतीबाबत किंवा जमिनीबाबत कोणतेही काम पार पाडण्यास किंवा कोणतीही गोष्ट करण्यास फर्माविण्यात आले असेल अशा इमारतीचा किंवा जमिनीचा मालक असेल तर, नगरपरिषदेस, अशा मालकाच्या विद्यमाने जी व्यक्ती त्यावेळी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही वेळी त्या इमारतीचा किंवा जमिनीचा भोगवटा करीत असेल, तिच्याकडून अतिरिक्त उपाययोजना म्हणून त्यावेळी त्या मालकाकडून येणे असलेला सर्व खर्च किंवा त्याचा कोणताही भाग, पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, मागता येईल —— मग अशा मालकावर दावा लावलेला असो किंवा त्याच्या विरुद्ध कार्यवाही करण्यात आलेली असो किंवा नसो —— आणि अशा खर्चाची मागणी केल्यावर अशा भोगवटादाराने तो दिला नाही तर, तो खर्च अशा भोगवटादाराकडून वसूल करता येईल आणि याप्रमाणे वसूल करावयाची प्रत्येक रक्कम कोणत्याही मालमत्तेवरील कर म्हणून दावा सांगितलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने वसूल करण्यायोग्य असेल ; अशा प्रत्येक भोगवटादारास, अशा कोणत्याही खर्चाबद्दल त्याने अशा रीतीने जेवढी रक्कम दिली असेल किंवा त्याच्याकडून वसूल करण्यात आली असेल तेवढी रक्कम आपल्या घरमालकास द्यावयाच्या भाड्याच्या रकमेतून वजा करण्याचा हक्क असेल.

(३) कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनींच्या मालकावर या अधिनियमान्वये आकारलेल्या खर्चाच्या बाबतीत, अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या भोगवटादारावर, अशा खर्चाची मागणी त्याच्याकडे करण्यात येईल त्यावेळी, ज्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत असा खर्च द्यावयाचा असेल अशा इमारतीचे किंवा जमिनीचे जे भाडे त्याने देणे असेल त्यापेक्षा अधिक रक्कम देण्याचे दायित्व असणार नाही, किंवा अशी मागणी केल्यानंतर व अशा मालकास भाडे न देण्याविषयी नोटीस दिल्यानंतर कोणत्याही वेळी भाड्याची जी रक्कम उपार्जित होईल होईल किंवा अशा भोगवटादाराने जी द्यावयाची असेल त्यापेक्षा अधिक रक्कम देण्याचे दायित्व

त्याच्यावर असणार नाही ; मात्र त्याने त्या प्रयोजनासाठी नगरपरिषदेने विनंती केलेली आपल्या भाड्याची रक्कम, तसेच ती ज्या व्यक्तीस देणे आहे तिचे नाव व पत्ता याविषयी खरी माहिती सांगण्यास हयगय करता कामा नये किंवा नकार देता कामा नये. परंतु, अशा कोणत्याही भोगवटादाराकडे मागितलेली रक्कम अशा मागणीच्या वेळी त्याने देणे असलेल्या किंवा त्यानंतर उपार्जित झालेल्या भाड्याच्या रकमेहून अधिक आहे असे सिद्ध करण्याचा भार अशा भोगवटादारावर राहील :

परंतु, वर उल्लेख केल्याप्रमाणे असा कोणताही खर्च देण्यासंबंधी असा कोणताही भोगवटादार व मालक यांच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही विशेष करारास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे बाध येते, असे समजले जाणार नाही.

**३२९.** कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाने, अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्याचा आपला इरादा असल्याची नोटीस अशा इमारतीच्या भोगवटादारास दिल्यानंतर, त्याप्रमाणे, त्या तरतुदी अंमलात आणण्याच्या कामी त्या भोगवटादाराने प्रतिबंध केल्यास कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्यास, ती गोष्ट सिद्ध झाली असता व मालकाने त्याच्याकडे अर्ज केला असता, या अधिनियमाच्या अशा तरतुदी अंमलात आणण्यासाठी त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत, आवश्यक असतील ती सर्व कामे मालकास करू देण्याविषयी अशा भोगवटादारास लेखी आदेशाद्वारे फर्माविता येईल व तसेच त्यास योग्य वाटल्यास त्या अर्जासंबंधी किंवा आदेशासंबंधी झालेला खर्च मालकास देण्याविषयी भोगवटादारास आदेश देता येईल ; आणि त्या आदेशाच्या दिनांकापासून आठ दिवस झाल्यानंतर, असा भोगवटादार मालकास ते काम करू न देण्याचे चालू ठेवील तर त्यास अपराध सिद्ध झाल्यानंतर अशा रीतीने ते काम करू न देण्याचे जितके दिवस त्याने चालू ठेवले असेल त्या प्रत्येक दिवसाबद्दल पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि अशा रीतीने ते काम करू न दिल्याच्या मुदतीत असा प्रत्येक मालक अशी कामे न केल्याबद्दल अन्यथा ज्या कोणत्याही शास्तीस पात्र झाला असता त्या शास्तीपासून मुक्त होईल.

कोणत्याही भोगवटादाराने या अधिनियमाच्या अंमलबजावणीस विरोध केल्यास कार्यवाही.

**३३०.** (१) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त जी कोणतीही भरपाई किंवा हानिपूर्ती देण्याविषयी या अधिनियमान्वये निदेश देण्यात आले असतील अशा भरपाईच्या किंवा हानिपूर्तीच्या रकमेबाबत करार होऊ शकत नसेल तर, अशी रक्कम व आवश्यक असल्यास तिचे संविभाजन कसे करण्यात यावे ते नगरपरिषद निश्चित करून ठरवील.

हानिपूर्ती, भरपाई, इत्यादी ठरविणे.

(२) नगरपरिषदेने ठरविलेल्या भरपाईच्या किंवा हानिपूर्तीच्या रकमेमुळे किंवा अशा भरपाईच्या किंवा हानिपूर्तीच्या रकमेच्या संविभाजनामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, भरपाई किंवा हानिपूर्ती किंवा तिचे नगरपरिषदेने ठरविलेले संविभाजन याबाबतची सूचना मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत, नगरपरिषदेने ठरविलेल्या रकमेविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील करता येईल.

(३) नगरपरिषदेने भरपाईची किंवा हानिपूर्तीची रक्कम किंवा तिचे संविभाजन ठरविण्यात केलेल्या कसुरीमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, त्या प्रकरणाची परिस्थिती नमूद करणारी व भरपाईची किंवा हानिपूर्तीची रक्कम किंवा तिचे संविभाजन ठरविण्याची नगरपरिषदेस विनंती करणारी नोटीस नगरपरिषदेस देता येईल. जर नगरपरिषद उपरोक्त नोटीस

मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत भरपाईची किंवा हानिपूर्तीची रक्कम किंवा तिचे संविभाजन ठरविण्यात कसूर करील तर, अशा व्यक्तीस, भरपाईची किंवा हानिपूर्तीची रक्कम किंवा तिने संविभाजन ठरविण्यासंबंधी जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(४) जमिनीच्या संबंधात भरपाईची मागणी ज्या प्रकरणात केलेली असेल अशा प्रकरणांच्या बाबतीत, पोट-कलम (२) किंवा (३) खालील कोणत्याही अपिलाचा किंवा अर्जाचा निर्णय करताना जिल्हा न्यायालय, न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठविलेल्या प्रकरणांच्या संबंधातील कार्यवाहीसाठी भूमि संपादन अधिनियम, १८९४ याद्वारे ज्या कार्यपद्धतीची तरतूद केलेली असेल ती कार्यपद्धती शक्य असेल तेथवर अनुसरील : १८९४ चा १.

परंतु,—

(क) निर्देशासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे कोणताही अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही ; आणि

(ख) सर्व कार्यवाहींवरील खर्च, आपणास योग्य वाटेल त्या रीतीने देण्यास व त्याचे संविभाजन करण्यास न्यायालयाला संपूर्ण अधिकार असेल.

(५) एखाद्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात भरपाई मागितली असेल अशा कोणत्याही प्रकरणात, यथास्थिति, नगरपरिषदेने किंवा जिल्हा न्यायालयाने निवाडा दिल्यानंतर, नगरपरिषदेने किंवा जिल्हा न्यायालयाने ठरविलेली भरपाईची रक्कम ज्या पक्षकारास ती देणे असेल त्यास ती नगरपरिषदेने दिल्यानंतर, अशी जमीन किंवा इमारत नगरपरिषदेस आपल्या कब्जात घेता येईल. जर असा पक्षकार भरपाईची रक्कम स्वीकारण्यास नकार देईल किंवा अशी जमीन किंवा इमारत अन्यसंक्रामित करण्यास सक्षम अशी कोणतीही व्यक्ती नसेल किंवा भरपाईची रक्कम मिळण्याच्या हक्कासंबंधी किंवा तिच्या संविभाजनासंबंधी कोणताही विवाद असेल तर, नगरपरिषद भरपाईची रक्कम जिल्हा न्यायालयाकडे जमा करील.

दावा खर्च किंवा इतर खर्च कसा ठरवावा व वसूल करावा.

**३३१.** या अधिनियमान्वये जो कोणताही दावा खर्च किंवा इतर खर्च देण्याविषयी निदेशित करण्यात आले असेल त्या खर्चासंबंधाने कोणताही विवाद निर्माण झाल्यास, त्याची रक्कम व आवश्यक असल्यास, त्याची संविभाजित रक्कम या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त, नगरपरिषद निश्चित करून ठरवील व मालमत्तेवरील कर म्हणून दावा सांगितलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने ती वसुलीयोग्य असेल.

## प्रकरण सव्वीस

## संकीर्ण

कर निर्धारणात उपचार दोष आणि चुका झाल्यामुळे असे निर्धारण वगैरे विधिअग्राह्य न होणे.

**३३२.** (१) या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाखाली किंवा उपविधीखाली करण्यात आलेल्या कोणत्याही कर निर्धारणात किंवा अटकावणीच्या कार्यवाहीत किंवा काढलेल्या कोणत्याही नोटिशीत, देयकात, समन्समध्ये किंवा इतर कोणत्याही दस्तऐवजात कोणताही उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन किंवा नमुन्यातील दोष, कोणत्याही वेळी, शक्य असेल तेथवर,—

(क) असा उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन किंवा इतर नमुन्यातील दोष सुधारण्यासाठी या अधिनियमान्वये किंवा त्याखाली कोणतीही विशेष कार्यपद्धती घालून देण्यात आली असेल तेव्हा, अशी कार्यपद्धती अनुसरल्यानंतर, आणि

(ख) अशी कोणतीही कार्यपद्धती घालून देण्यात आली नसेल त्याबाबतीत, अशी दुरुस्ती जिच्याबाबतीत परिणामक होईल अशा कोणत्याही व्यक्तीस लेखी सूचना दिल्यानंतर, दुरुस्त करता येतील.

(२) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा उपविधीच्या तरतुदींचे परिपूर्णतः अनुपालन करण्यात आले असेल तर, असा कोणताही उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन किंवा इतर दोष यामुळे, करनिर्धारण, अटकावणी, नोटीस, देयक, समन्स किंवा इतर दस्तऐवज विधिअग्राह्य किंवा बेकायदेशीर असल्याचे समजण्यात येणार नाही. परंतु, असा कोणताही उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन अथवा इतर दोष घडल्यामुळे कोणत्याही व्यक्तीची विशेष हानी झाली असल्यास, तिला, सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयातून अशा विशेष हानीबद्दल पूर्ण भरपाई वसूल करण्याचा हक्क असेल.

[१][(३) या अधिनियमाखालील कोणत्याही आकारणीमध्ये कोणताही उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन किंवा नमुन्यातील इतर दोष या कारणांमुळे आकारणी विधिअग्राह्य असल्याचे ठरवण्यात आले असल्यास, नगरपरिषदेने कायदेशीररित्या करण्यात आलेल्या कोणत्याही पूर्वीच्या आकारणीच्या आधारे कोणताही कर बसवणे व तो वसूल करणे कायदेशीर असेल.]

**३३३.** (१) पोट-कलम (२) ते (४) च्या तरतुदींना अधीन राहून, अध्यक्षाने, उपाध्यक्षाने, मुख्य अधिकाऱ्याने किंवा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली प्राधिकृत करण्यात आलेल्या किंवा मुख्य अधिकाऱ्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता त्यास आवश्यक वाटतील तितके सहायक बरोबर घेऊन, कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर प्रवेश करणे कायदेशीर असेल आणि कोणताही दरवाजा, प्रवेशद्वार किंवा अन्य अडथळा— या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता प्रवेश करणे.

(क) अशा प्रवेशासाठी तो उघडणे आवश्यक आहे असे त्याला वाटल्यास ; आणि

(ख) मालक किंवा भोगवटादार गैरहजर असेल किंवा हजर असून असा दरवाजा, प्रवेशद्वार उघडण्याचे किंवा अडथळा दूर करण्याचे नाकारील ;

तर असा कोणताही दरवाजा किंवा प्रवेशद्वार उघडणे किंवा अडथळा दूर करणे किंवा तसे करवून घेणे कायदेशीर असेल.

(२) या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमात किंवा उप-विधीमध्ये अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही असा प्रवेश, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या कालावधीतच करता येईल.

(३) या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमात किंवा उप-विधीमध्ये अन्यथा तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही जमिनीवर किंवा इमारतीत, भोगवटादाराच्या किंवा भोगवटादार नसेल तर, तिच्या मालकाच्या संमतीशिवाय प्रवेश करण्यात येणार नाही आणि यथास्थिति, भोगवटादारास किंवा मालकास, असा प्रवेश करण्याबद्दलच्या इराद्याची कमीत कमी चोवीस तासांची लेखी नोटीस दिल्याखेरीज असा कोणताही प्रवेश करण्यात येणार नाही :

परंतु, पाहणी करण्यात यावयाची जागा ही, कारखाना किंवा कर्मशाळा किंवा धंद्याची जागा किंवा घोड्याचा तबेला किंवा गुरांचा गोठा किंवा संडास किंवा मुत्री किंवा बांधकाम चालू असलेली जागा असेल किंवा या अधिनियमाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही उपविधीचे

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५, कलम १५ द्वारे हे पोट कलम समाविष्ट करण्यात आले.

उल्लंघन करून, माणसाचे खाद्य असलेले कोणतेही जनावर त्या जागेत कापण्यात आले आहे किंवा काय याची खात्री करण्यासाठी म्हणून असा प्रवेश करण्यात येत असेल तर, अशा नोटिशीची आवश्यकता असणार नाही.

(४) माणसांना राहण्यासाठी म्हणून उपयोग करण्यात येत असलेल्या जागेत या अधिनियमाखाली प्रवेश केला असेल तेव्हा, प्रवेश करण्यात आलेल्या जागेच्या भोगवटदारांच्या सामाजिक व धार्मिक रूढीकडे व परिपाठाकडे योग्य ते लक्ष पुरविण्यात येईल, आणि एखाद्या स्त्रीच्या प्रत्यक्ष भोगवट्यात असलेल्या कोणत्याही जागेत, तिला तेथून निघून जाण्याची मोकळीक असल्याचे तिला कळविण्यात आल्याखेरीज व तिला तेथून निघून जाण्यासाठी प्रत्येक वाजवी सुविधा देण्यात आल्याखेरीज प्रवेश करण्यात येणार नाही किंवा उक्त जागा उघडण्यात येणार नाही.

लागून असलेल्या जागेत प्रवेश करण्यास मुख्य अधिकाऱ्यास कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत करता येणे

**३३४.** (१) ज्या ज्या वेळेस, कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाच्या तरतुदीद्वारे किंवा तदन्वये कोणतेही काम पार पाडणे आवश्यक असेल आणि मुख्य अधिकाऱ्याकडे अशा व्यक्तीकडून अर्ज आल्यानंतर किंवा अन्यथा, व्यक्तींच्या मालकीच्या, लगतच्या कोणत्याही जागेत प्रवेश करणे हेच अशा व्यक्तीस असे काम पार पाडणे शक्य होण्यासाठी एकमेव किंवा अत्यंत सोयीस्कर साधन आहे, असे मुख्य अधिकाऱ्याचे मत झाल्यास मुख्य अधिकाऱ्यास, अशा लगतच्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास त्याची कोणतीही हरकत असल्यास, ती सांगण्याची वाजवी संधी देऊन, जर अशी हरकत घेण्यात आली नसेल किंवा घेण्यात आलेली हरकत मुख्य अधिकाऱ्यास बेकायदेशीर किंवा अपुरी वाटत असेल तर लेखी आदेशाद्वारे, काम करण्याची आवश्यकता असणाऱ्या व्यक्तीस अशा लगतच्या जागेत प्रवेश करण्यासाठी प्राधिकृत करता येईल :

परंतु, निकडीच्या परिस्थितीत अशा लगतच्या जागेच्या मालकास, त्याची कोणतीही हरकत असल्यास, ती सांगण्याची संधी न देता, मुख्य अधिकारी, कोणत्याही व्यक्तीस, अशा लगतच्या जागेत प्रवेश करण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) पोट-कलम (२) च्या तरतुदीस अधीन राहून, मुख्य अधिकाऱ्याची सही असलेला असा प्रत्येक आदेश हा, जिच्या नावे तो दिला असेल त्या व्यक्तीस, अथवा या प्रयोजनासाठी तिने नेमलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस उक्त जागेत आपले सहायक व कामगार यांच्यासह प्रवेश करण्यासाठी व आवश्यक ते काम करण्यासाठी पुरेसा प्राधिकार असेल.

(३) लगतपूर्ववर्ती कलमाच्या पोट-कलम (३) च्या परंतुकाखेरीज, त्या कलमाची पोट-कलमे (२), (३) आणि (४) च्या तरतुदी, आवश्यक त्या फेरफारांसह या कलमान्वये करण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेशास लागू असतील.

(४) असा प्रवेश करताना किंवा असे काम पार पाडीत असताना, लगतच्या जागेच्या मालकाच्या मालमत्तेस फारसे नुकसान पोचणार नाही याची दक्षता घेण्यात येईल आणि ज्या जागेच्या फायद्यासाठी काम करण्यास आले असेल अशा जागेचा मालक किंवा भोगवटादार—

(एक) फारसा विलंब न लावता काम करवून घेईल, आणि

(दोन) असे काम केल्यामुळे जिचे नुकसान झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस भरपाई देईल.

जर द्यावयाच्या भरपाईच्या रकमेसंबंधात कोणताही विवाद निर्माण झाला तर, अशी रक्कम मुख्य अधिकाऱ्याकडून ठरविण्यात येईल.

(५) जिच्या लाभासाठी काम करण्यात आले असेल अशा जागेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने पोट-कलम (४) अन्वये देणे असलेली भरपाई देण्यास नकार दिल्यास अशी भरपाईची रक्कम, मुख्य अधिकाऱ्यास मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल व असे काम केल्यामुळे जिचे नुकसान झाले असेल त्या व्यक्तीस ती देता येईल.

**३३५.** (१) कोणतीही नोटीस, देयक, समन्स किंवा असा इतर दस्तऐवज कोणत्याही व्यक्तीवर बजावण्याचे, काढण्याचे, सादर करण्याचे किंवा देण्याचे काम सुकर होण्यासाठी मुख्य अधिकाऱ्यास, कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या मालकास किंवा तिच्या भोगवटदारास किंवा कोणत्याही जंगम मालमत्तेच्या मालकास किंवा ती ताब्यात असलेल्या व्यक्तीस लेखी नोटीस देऊन तिच्याद्वारे, मुख्य अधिकारी या नोटिशीत विनिर्दिष्ट करील अशा मुदतीत त्या मालमत्तेत असलेल्या आपल्या हितसंबंधाचे स्वरूप आणि त्यात हितसंबंध असलेल्या इतर कोणत्याही त्याला माहीत असलेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता—मग ती व्यक्ती असा हितसंबंध पूर्ण मालकीने धारण करणारी असो किंवा गहाणदार किंवा पट्टेदार म्हणून किंवा अन्य नात्याने असो—लेखी नमूद करण्यास फर्माविता येईल.

कोणत्याही मालमत्तेच्या मालकीसंबंधात माहिती मागविण्याचा मुख्य अधिकाऱ्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अनुसार किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीनुसार मुख्य अधिकाऱ्याने जिला एखादी माहिती देण्यास फर्मावले आहे अशा कोणत्याही व्यक्तीने अशा आदेशाचे अनुपालन करणे व तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी माहिती पुरविणे तिच्यावर बंधनकारक असेल.

**३३६.** (१) नगरपरिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, परिषद सदस्य किंवा नगरपरिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी या नात्याने ज्या कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेत नगरपरिषदेच्या मालकीचे कोणतेही अभिलेख, तिचे भांडार, पैसे किंवा तिची इतर मालमत्ता असून अशा कोणत्याही व्यक्तीने, यथास्थिति, तिचा पदावधी संपल्यानंतर किंवा तिला पदावरून काढून टाकल्यानंतर किंवा निलंबित केल्यानंतर देखील असे अभिलेख, भांडार, पैसे किंवा अशी इतर मालमत्ता ही, आपल्या पदाच्या उत्तराधिकाऱ्यांच्या स्वाधीन केलेली नाही असे, मिळालेल्या माहितीवरून जिल्हाधिकाऱ्याचे मत झाल्यास, त्यास लेखी आदेशाद्वारे अशा रीतीने अटकावून ठेवण्यात आलेले अभिलेख, भांडार, पैसा किंवा इतर मालमत्ता ही, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या आत अशा उत्तराधिकाऱ्याच्या स्वाधीन करविण्यास फर्मावता येईल.

अभिलेख व पैसे ताब्यात घेण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

(२) असा अध्यक्ष, उपाध्यक्ष, परिषद सदस्य किंवा नगरपरिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी पूर्ववर्ती पोट-कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात कसूर करील तर, जिल्हाधिकाऱ्याने पुढील गोष्टी करणे हे कायदेशीर असेल—

(क) असा कोणताही पैसा वसूल करण्यासाठी, तो जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात यावा असा निदेश देणे, आणि जिल्हाधिकाऱ्याकडून असा निदेश देण्यात आल्यावर तो पैसा अशा व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.

(ख) असे कोणतेही अभिलेख किंवा भांडार किंवा अशी इतर मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी झडतीचे अधिपत्र काढणे आणि त्यासंबंधात, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* च्या प्रकरण ७ च्या तरतुदींन्वये एखाद्या दंडाधिकाऱ्यास ज्या अधिकारांचा कायदेशीरपणे वापर करता येईल त्या सर्व अधिकारांचा वापर करणे. १८९८ चा ५.

(३) संबंधित व्यक्तीस, तिच्याविरूद्ध अशी कारवाई का करण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्यावाचून या कलमान्वये कोणतीही कारवाई केली जाणार नाही.

(४) मावळता अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्याविरूद्ध या कलमाच्या तरतुदींअन्वये कारवाई करण्यात येत आहे किंवा अशी कारवाई करण्यात आली होती या गोष्टीमुळे अशा अध्यक्षावर किंवा उपाध्यक्षावर कलम ५७, [१][पोट-कलम (५)] अन्वये खटला भरला जाण्यास रोध असणार नाही.

कार्योत्तर मंजुरी देण्याचा अधिकार.

**३३७.** कोणताही कर्मचारीवर्ग किंवा कोणताही खर्च यांच्या संबंधात या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये कोणत्याही प्राधिकरणाची पूर्वमंजुरी आवश्यक असेल आणि अशी पूर्वमंजुरी घेण्यात आली नसेल तर, अशा प्रसंगी अशी कार्यवाही ही सद्भावनापूर्वक करण्यात आली होती आणि त्यामुळे कोणत्याही व्यक्तीस कोणतीही हानी पोचलेली नाही किंवा पोचण्याचा संभव नाही किंवा ती लोकहिताच्या दृष्टीने करण्यात आली होती, याबद्दल त्या प्रधिकाऱ्याचे समाधान झाले असेल तर, अशा प्राधिकरणास त्याबाबत कार्योत्तर मंजुरी देता येईल.

लायसन्स व लेखी परवानगी देणे, तहकूब करणे किंवा काढून घेणे आणि फी बसविणे वगैरे याबाबत सर्वसाधारण तरतुदी.

**३३८.** (१) कोणत्याही प्रयोजनासाठी एखादे लायसन किंवा लेखी परवानगी देता येईल अशी या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये तरतूद करण्यात आली असेल तेव्हा, अशा बाबतीत असे लायसन किंवा लेखी परवानगी ज्या मुदतीकरिता आणि ज्या निर्बंधाच्या व शर्तींच्या अधीन देण्यात आली असेल ती मुदत आणि ते निर्बंध व शर्ती त्या लायसनमध्ये किंवा लेखी परवानगीत विनिर्दिष्ट केल्या जातील आणि असे लायसन किंवा परवानगी यांचे नवीकरण करण्यासाठी ज्या दिनांकास अर्ज करावयाचा तो दिनांक विनिर्दिष्ट केली जाईल. तसेच असे लायसन्स किंवा लेखी परवानगी मुख्य अधिकाऱ्याच्या किंवा ती देण्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये किंवा मुख्य अधिकाऱ्याकडून अधिकार देण्यात आलेल्या कोणत्याही इतर नगरपालिका अधिकाऱ्याच्या सहीने दिली जाईल.

(२) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त—

(क) असे लायसन्स देण्याच्या बाबतीतील उप-विधीच्या संबंधित तरतुदीत वेळोवेळी जे दर विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या दराने अशा प्रत्येक लायसन्सकरिता फी आकारण्यात येईल; आणि

(ख) याबाबतीत केलेल्या उप-विधीत जे दर वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या दराने अशा प्रत्येक लेखी परवानगीकरिता, फी आकारण्यात येईल :

परंतु,—

(एक) अशी फी ही आवर्ती स्वरूपाची असू शकेल ;

(दोन) कोणत्याही व्यक्तीने लायसन्सशिवाय किंवा लेखी परवानगीशिवाय केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल शास्ती म्हणून अशा फी पेक्षा उच्चतर फी आकारण्याची तरतूद अशा उप-विधीत करता येईल;

---

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम २६ द्वारे "पोट-कलम (४)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(तीन) या परंतुकाच्या खंड (दोन) अन्वये आकारण्यात आलेली उच्चतर फी ही, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा उप-विधींच्या तरतुदींन्वये ज्या कोणत्याही इतर शास्तीस किंवा दायित्वास अशी व्यक्ती जबाबदार असेल त्या शास्तीच्या किंवा दायित्वाच्या जोडीने जादा फी म्हणून आकारण्यायोग्य असेल.

(३) या अधिनियमान्वये दिलेले कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी ही ती धारण करणाऱ्या व्यक्तीने अपवेदनाद्वारे किंवा कपटाने मिळविली आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास किंवा ती जिला देण्यात आली अशा व्यक्तीने तिच्या कोणत्याही निर्बंधाचे किंवा शर्तीचे उल्लंघन केले असेल किंवा त्या टाळल्या असतील किंवा उक्त व्यक्तीस या अधिनियमाच्या किंवा असे लायसन किंवा लेखी परवानगी ज्या कोणत्याही बाबींशी संबंधित आहे त्या बाबींच्या संबंधातील कोणत्याही नियमांच्या किंवा उप-विधींच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचा भंग केल्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असेल तर, सक्षम प्राधिकाऱ्यास असे कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी कोणत्याही वेळी निलंबित करता येईल किंवा रद्द करता येईल.

(४) कोणतेही असे लायसन किंवा लेखी परवानगी निलंबित किंवा रद्द करण्यात आली असेल किंवा ती ज्या मुदतीकरिता देण्यात आली ती मुदत संपली असेल तेव्हा यथास्थिति, ते लायसन किंवा लेखी परवानगी निलंबित किंवा रद्द करण्यासाठी देण्यात आलेला आदेश जोपर्यंत रद्द करण्यात येत नाही किंवा असे लायसन किंवा लेखी परवानगी यांचे जोपर्यंत नवीकरण करण्यात येत नाही तोपर्यंत, असे लायसन किंवा परवानगी देण्यात आली होती त्या व्यक्तीजवळ ते लायसन किंवा परवानगी नाही असे या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनाकरिता समजण्यात येईल :

परंतु, असे लायसन किंवा लेखी परवानगी यांचे नवीकरण करण्यासाठी, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापर्यंत अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, अर्जदारास आदेश मिळेपर्यंत, असे लायसन किंवा लेखी परवानगी यांचे नवीकरण करण्यात आले आहे असे समजून वागण्याचा त्याला हक्क असेल.

(५) असे कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी देण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, असे लायसन किंवा परवानगी अंमलात असेपर्यंत सर्व वाजवी वेळी, मुख्य अधिकाऱ्याने किंवा याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर नगरपालिका अधिकाऱ्याने ते सादर करण्यास फर्माविले असता, असे लायसन किंवा लेखी परवानगी सादर करील.

(६) लायसनसाठी किंवा लेखी परवानगीसाठी प्रत्येक अर्ज मुख्य अधिकाऱ्याच्या नावे करण्यात येईल.

(७) लायसनसाठी किंवा लेखी परवानगीसाठी नगरपरिषदेने फी स्वीकारली आहे किंवा तिच्या वतीने फी स्वीकारण्यात आली आहे एवढ्याच कारणावरून फी देणाऱ्या व्यक्तीस लायसन किंवा लेखी परवानगी मिळण्याचा हक्क असणार नाही.

**३३९.** एखाद्या लायसनवाचून किंवा परवानगीवाचून अथवा कोणतेही लायसन किंवा परवानगी ज्या शर्तींना अधीन राहून देण्यात आली असेल त्या शर्तींचे उल्लंघन करून कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही जागेचा उपयोग करण्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असता, दंडाधिकाऱ्यास, असे लायसन किंवा परवानगी देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याच्या अर्जावरून, अशी जागा बंद करण्याविषयी आदेश देता येईल, अन्यथा त्याला असा आदेश देता येणार नाही, आणि त्यानंतर अशा जागेचा अशा रीतीने उपयोग केला जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी कोणत्याही एका किंवा अनेक व्यक्तींची नेमणूक करता येईल किंवा इतर उपाययोजना करता येईल. जागा बंद करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

जेव्हा एखादे नगरपालिका क्षेत्र निर्माण करण्यात येईल किंवा त्यात बदल करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे योग्य तरतुदी करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**३४०.** (१) या कलमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(क) " विनिर्दिष्ट दिवस " याचा अर्थ, ज्या दिवसापासून कोणतेही स्थानिक क्षेत्र कलम ३ याच्या [१][पोट-कलम (२) अन्वये अधिक लहान नागरी क्षेत्र] म्हणून जाहीर करण्यात आले असेल तो दिवस किंवा कलम ६, पोट-कलम (१), खंड (क) ते (घ) यापैकी कोणत्याही खंडात उल्लेखिलेला बदल ज्या दिवसापासून अंमलात आला असेल तो दिवस, असा होतो ;

(ख) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात " विद्यमान स्थानिक प्राधिकरण " या संज्ञेचा अर्थ, नगरपरिषद किंवा पंचायत किंवा अशी कोणताही नगरपरिषद किंवा पंचायत नसेल तेव्हा, विनिर्दिष्ट केलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी अशा क्षेत्रावर अधिकारिता असणारी जिल्हा परिषद, असा होतो ;

(ग) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात " उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, नगरपरिषद किंवा पंचायत किंवा अशी कोणतीही नगरपरिषद किंवा पंचायत नसेल तेव्हा, विनिर्दिष्ट दिवसापासून अशा क्षेत्रावर अधिकारिता असणारी जिल्हा परिषद, असा होतो ;

(घ) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात " जिल्हा परिषद " याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेली आणि अशा क्षेत्रावर अधिकारिता असणारी जिल्हा परिषद, असा होतो ; १९६२ चा महा. ५.

(ङ) " पंचायत " याचा अर्थ, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये कोणत्याही गावासाठी किंवा गावाच्या गटासाठी स्थापन करण्यात आलेली किंवा स्थापन करण्यात आली असल्याचे समजण्यात येणारी ग्रामपंचायत, असा होतो. १९५९ चा मुंबई ३.

(२) जेव्हा,—

(क) कोणतेही स्थानिक क्षेत्र [२][अधिक लहान नागरी क्षेत्र] म्हणून जाहीर करण्यात येईल ;

(ख) कोणतेही स्थानीक क्षेत्र एखाद्या [२][अधिक लहान नागरी क्षेत्रास] जोडण्यात येईल ;

(ग) एखाद्या [२][अधिक लहान नागरी क्षेत्रातून] कोणतेही स्थानिक क्षेत्र वगळण्यात येईल ;

(घ) दोन किंवा अधिक नगरपालिका क्षेत्रांचे एका नगरपालिका क्षेत्रात एकत्रीकरण करण्यात येईल; किंवा

(ङ) एखादे [२][अधिक लहान नागरी क्षेत्र] दोन किंवा अधिक नगरपालिकाक्षेत्रांत विभागण्यात येईल ;

तेव्हा, राज्य शासनास, या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

[३][ (एक) खंड (क), (घ) किंवा (ङ) खाली येणाऱ्या प्रकरणामध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नवीन एक किंवा यथास्थिति, अनेक परिषदांची यथोचितरित्या रचना करण्यात

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५९(अ) द्वारे पोट-कलम (१) अन्वये " नगरपालिका क्षेत्र " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १५९(ब)(१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १५८(ख)(२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा परिच्छेद (एक) दाखल करण्यात आला.

येईतोपर्यंत या अधिनियमाखालील परिषदेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी एका किंवा अनेक शासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे :

परंतु,—

(एक) अशा एका किंवा अनेक अधिकाऱ्यांच्या (पारिश्रमिकासह) सेवेच्या अटी व शर्ती राज्य शासनाकडून निर्धारित करण्यात आल्याप्रमाणे असतील ;

(दोन) परिषदेची पहिली बैठक होईतोपर्यंत असा एक किंवा अनेक अधिकारी पद धारण करतील ; ]

[1][ (दोन) खंड (ख) खाली येणाऱ्या प्रकरणाच्या बाबतीत, जोडण्यात आलेल्या स्थानिक क्षेत्रामधील परिषद सदस्यांच्या निवडणुकीद्वारे, परिषद सदस्यांच्या संख्येत अंतरिम वाढ करणे ; ]

(तीन) खंड (ग) खाली येणाऱ्या प्रकरणामध्ये, जे [2][ अधिक लहान नागरी क्षेत्रामधून ] वगळण्यात आलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करीत आहेत असे राज्य शासनाचे मत असेल, अशा परिषद सदस्यांना काढून टाकणे ;

[3]* * * * *

(सहा) विद्यमान स्थानिक प्राधिकरणाची मत्ता, हक्क व दायित्वे (यामध्ये त्याने केलेल्या कोणत्याही कराराखालील किंवा संविदेखालील हक्कांचा आणि दायित्वांचा समावेश होतो) सर्वस्वी किंवा अशंतः कोणत्याही उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरणाकडे किंवा राज्य शासनाकडे हस्तांतरित करणे व अशा हस्तांतरणाच्या अटी आणि शर्ती ;

(सात) विद्यमान स्थानिक प्राधिकरण ज्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत एक पक्षकार असेल त्या कायदेशीर कार्यवाहीत विद्यमान स्थानिक प्राधिकरणाऐवजी कोणताही असा हस्तांतरिती दाखल करणे किंवा त्या स्थानिक प्राधिकरणाच्या जोडीने आणखी कोणताही असा हस्तांतरिती दाखल करणे ; आणि विद्यमान स्थानिक प्राधिकरणापुढे किंवा त्यांच्या हाताखालील कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे किंवा अधिकाऱ्यांपुढे प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही अशा हस्तांतरितीकडे किंवा त्याच्या हाताखालील कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे, हस्तांतरित करणे ;

(आठ) विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची कोणत्याही अशा हस्तांतरितीकडे बदली करणे किंवा त्यांच्याकडे अशा कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर नेमणे किंवा अशा हस्तांतरितीकडून बदली होणे किंवा त्यांच्याकडून कर्मचाऱ्यांना कामावर नेमले जाणे किंवा विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सेवेची समाप्ती करणे आणि अशा बदलीनंतर किंवा पुन्हा कामावर नेमल्यानंतर किंवा नोकरी समाप्त केल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना लागू होणाऱ्या अटी व शर्ती ;

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५८(ख)(३) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा परिच्छेद (दोन) दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १५८(ख)(४) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १५८(५) द्वारे परिच्छेद (चार) व (पाच) वगळण्यात आले.

(नऊ) विद्यमान स्थानिक प्राधिकरणाद्वारे किंवा अशा विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या संबंधात करण्यात आलेल्या व विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी त्याच्या क्षेत्रात अंमलात असलेल्या सर्व किंवा कोणत्याही नेमणुका, काढलेल्या अधिसूचना किंवा नोटिसा, बसविलेले कर, दिलेले आदेश, मंजूर केलेल्या योजना, दिलेली लायसन्से, परवानगी किंवा केलेले नियम, उप-विधी, विनियम किंवा नमुने त्यांचे या अधिनियमाखाली अधिक्रमण किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत अशा विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या क्षेत्रात चालू ठेवणे ;

(दहा) कोणत्याही विद्यमान नगरपरिषदेद्वारे किंवा तिच्या संबंधात या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या आणि विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी अशा नगरपरिषदेच्या क्षेत्रात अंमलात असलेल्या सर्व किंवा कोणत्याही नेमणुका वा काढलेल्या अधिसूचना किंवा नोटिसा, बसविलेले कर, दिलेले आदेश, मंजूर केलेल्या योजना, दिलेली लायसन्से, परवानगी किंवा केलेले नियम, उप-विधी, विनिमय किंवा नमुने यांचा उत्तराधिकारी नगरपरिषदेच्या इतर सर्व किंवा कोणत्याही क्षेत्रात, अशा विनिर्द्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी अशा इतर क्षेत्रांत अंमलात असलेल्या तत्सम नेमणुका, अधिसूचना, नोटिसा, कर, आदेश, योजना, लायसन्स, परवानगी, नियम, उप-विधी, विनियम किंवा नमुने (असल्यास) यांचे अधिक्रमण करून विस्तार करणे व त्यास प्रारंभ करणे, मात्र अशा रीतीने विस्तार केलेल्या व अंमलात आणलेल्या बाबी या अधिनियमान्वये त्यांचे आणखी अधिक्रमण करण्यात किंवा त्यात आणखी फेरबदल करण्यात येईपर्यंत अंमलात असतील ;

(अकरा) विद्यमान स्थानिक प्राधिकरणाद्वारे किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाच्या संबंधात करण्यात आलेली किंवा अधिप्रमाणित केलेली व विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी त्याच्या क्षेत्रात अंमलात असलेली सर्व किंबा कोणतीही अंदाजपत्रके, करनिर्धारणे, करनिर्धारणाच्या याद्या, मूल्यनिर्धारणे, मोजण्या किंवा विभागण्या या गोष्टी संबंधित कायद्यान्वये अधिक्रमित करण्यात किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, अशा विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या क्षेत्रात चालू ठेवणे ;

(बारा) खंड (क) ते (ङ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बदलामुळे कोणतीही अडचण निर्माण झाल्यास ती दूर करणे.

(३) या कलमान्वये विद्यमान स्थानिक प्राधिकरणाची मत्ता, अधिकार व दायित्वे हस्तांतरित करण्याबाबत आदेश काढण्यात आल्यानंतर त्या आदेशाच्या आधारे विद्यमान स्थानिक प्राधिकरणाची अशी मत्ता, अधिकार व दायित्वे हस्तांतरितीकडे निहित होतील व ती त्याची मत्ता, अधिकार व दायित्वे होतील.

(४) (क) या कलमाअन्वये आदेश काढण्यात आला असेल त्याबाबतीत, संचालक, [१]* * * यथास्थिति, एका किंवा अनेक नगरपरिषदांच्या परिषद सदस्यांची संख्या निर्धारित करण्यासाठी आणि यथास्थिति, एका किंवा अनेक नगरपरिषदांच्या निवडणुका घेण्यासाठी या अधिनियमाच्या [२][ कलमे ९ व १० ] ला अनुसरून उपाययोजना करील.

(ख) [३]* * * * *

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५९ (क) (१) (एक) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १५९ (क) (१) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १५९ (क) (२) द्वारे हा खंड वगळण्यात आला.

(ग) या कलमाद्वारे किंवा त्या अन्वये अन्यथा जी तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त या अधिनियमाच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, अशा कोणत्याही नगरपरिषदेस, तिच्या परिषद सदस्यांस [१][अध्यक्ष व उपाध्यक्ष धरून] किंवा प्रशासकास लागू होतील.

**३४१.** जेव्हा एखादे नगरपालिका क्षेत्र समाविष्ट असलेले संपूर्ण स्थानिक क्षेत्र हे नगरपालिका क्षेत्र असण्याचे बंद झाले असेल तेव्हा, असे स्थानिक क्षेत्र ज्या दिवसापासून नगरपालिका क्षेत्र असण्याचे बंद झाले असेल त्या दिवसापासून,— नगरपालिका अस्तित्वात असण्याचे बंद होणे.

(एक) अशा नगरपालिका क्षेत्रासाठी स्थापन केलेली नगरपरिषद अस्तित्वात असण्याचे किंवा काम करण्याचे बंद होईल ;

(दोन) नगरपरिषदेचे परिषद सदस्य [२] * * आपली अधिकार पदे सोडतील ;

(तीन) संचालकाला, या अधिनियमात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा क्षेत्रासाठी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, कलम ३४० च्या पोट-कलम (२) च्या परिच्छेद (सहा) ते (बारा) (दोन्ही समाविष्ट करून) मध्ये उल्लेख केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल आणि त्या कलमाच्या पोट-कलम (३) ची तरतूद अशा आदेशास लागू होईल.

## [३][ प्रकरण सव्वीस— क

## नगरपंचायती

**३४१ क.** (१) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ च्या खंड (२) मध्ये उल्लेखिलेले घटक विचारात घेऊन राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ग्रामीण क्षेत्रामधून नागरी क्षेत्रात संक्रमित होत असलेले क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करता येईल : संक्रमणात्मक क्षेत्र विनिर्दिष्ट करणे व नगरपंचायत विधिसंस्थापित करणे.

परंतु,—

(क) अशा क्षेत्राची लोकसंख्या दहा हजारापेक्षा कमी नाही आणि पंचवीस हजारापेक्षा अधिक नाही ; आणि

(ख) असे क्षेत्र कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा " अ " वर्ग नगरपरिषदेच्या प्रादेशिक सीमांपासून वीस किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावर नाही आणि अशा क्षेत्रातील अकृषिक कामांमधील रोजगाराची टक्केवारी पंचवीस टक्क्यांपेक्षा कमी नाही ; किंवा

(ग) असे क्षेत्र कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा " अ " वर्ग नगरपरिषदेच्या प्रादेशिक सीमांपासून वीस किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावर आहे. परंतु अशा क्षेत्रातील अकृषिक कामांमधील रोजगाराची टक्केवारी पन्नास टक्क्यांपेक्षा कमी नाही ;

असे असल्याखेरीज असे कोणतेही क्षेत्र अशाप्रकारे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केले जाणार नाही.

त्याखेरीज असे कोणतेही क्षेत्र अशा प्रकारे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केले जाणार नाही.

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम २७(२)(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २० द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १६० द्वारे प्रकरणे सव्वीस क व सव्वीस ख समाविष्ट करण्यात आली.

[१][(१क) पोट-कलम (१) च्या परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, जिल्हा मुख्यालय किंवा तालुका मुख्यालय असलेले क्षेत्र, संक्रमणात्कम क्षेत्र म्हणून घोषित करता येईल ;

(१ख) पोट-कलम (१) किंवा (१क) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, कलम ३ च्या पोट-कलम (३), (४) व (५) मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे योग्य त्या फेरफारांसह अनुसरण करण्यात येईल.]

(२) पोट-कलम (१) अन्वये अशा प्रकारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक संक्रमणात्मक क्षेत्राकरिता कलम ३४१-ब मध्ये तरतूद केल्याप्रमाणे एका नगरपंचायतीची रचना करण्यात येईल व ती . . . . . . . नगर पंचायत या नावाने ओळखली जाईल. अशी प्रत्येक नगर पंचायत हा एक निगम निकाय असेल व त्याची एक अखंड अधिकार परंपरा व सामाईक शिक्का असेल व तिला मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा तसेच करार करण्याचा अधिकार असेल व उक्त नावाने तिला किंवा तिच्याविरूद्ध दावा दाखल करता येईल.

नगर पंचायतीची रचना व निवडणुका.

**३४१ ख.** (१) नगर पंचायतीमध्ये थेट निवडून दिलेल्या दहा पंचायत सदस्यांचा समावेश असेल.

(२) निवडणुकींच्या प्रयोजनार्थ, पंचायत सदस्यांच्या संख्येच्या प्रमाणात संक्रमणात्मक क्षेत्राची प्रादेशिक मतदारसंघात विभागणी करण्यात येईल, व त्यांना प्रभाग असे म्हणण्यात येईल.

(३) प्रत्येक प्रभागातून एक पंचायत सदस्य निवडून देण्यात येईल.

(४) नगरपरिषदेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग व स्त्रिया यांच्याकरिता जागा राखून ठेवण्याच्या संबंधातील कलमे ९ व १० च्या तरतुदी आणि नगरपरिषदेच्या अध्यक्षांचे पद राखून ठेवण्याच्या संबंधातील कलम ५१-१क च्या तरतुदी या, योग्य त्या फेरफारांसह नगर पंचायतीला लागू होतील.

नगर परिषदांच्या संबंधातील या अधिनियमाच्या तरतुदी संक्रमणात्मक क्षेत्राला लागू करण्याचा अधिकार.

**३४१ ग.** (१) राज्य शासनाला, या प्रकरणाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता " क " वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्राच्या नगरपरिषदेला लागू असणाऱ्या या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी त्यास आवश्यक वाटतील अशा आनुषंगिक किंवा परिणामारूप फेरफारांसह, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात यावयाच्या आदेशाद्वारे, संक्रमणात्मक क्षेत्राला लागू करता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये लागू करण्यात आलेल्या, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अन्वये एखाद्या नगर-पंचायतीकडून, तिच्या स्थानिक क्षेत्रात कोणताही कर बसविण्यात येईल त्याबाबतीत, अशा करापासून मिळणारे उत्पन्न हे नगरपरिषदेकडून पालिका निधी ज्या रीतीने व ज्या प्रयोजनांसाठी खर्च केला जातो त्याच रीतीने व त्याच प्रयोजनार्थ खर्च करण्यात येईल.

संक्रमणात्मक क्षेत्र रद्द करणे किंवा त्यात फेरफार करणे.

**३४१ घ.** राज्य शासनास, कोणत्याही वेळी, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे,—

(क) एखाद्या संक्रमणात्मक क्षेत्राची किंवा त्याच्या भागाची अधिक लहान नागरी क्षेत्र म्हणून रचना करता येईल ; किंवा

(ख) एखाद्या संक्रमणात्मक क्षेत्राचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा अधिक लहान नागरी क्षेत्रामध्ये समावेश करता येईल.

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ याच्या कलम ५२ द्वारे ही पोटकलमे समाविष्ट करण्यात आली.

**३४१ ङ.** (१) एखाद्या संपूर्ण संक्रमणात्मक क्षेत्राची एक अधिक लहान नागरी क्षेत्र म्हणून रचना करण्यात येईल त्याबाबतीत, ते संक्रमणात्मक क्षेत्र अस्तित्वात असण्याचे बंद होईल आणि त्या संक्रमणात्मक क्षेत्राच्या नगर पंचायतीकडे निहित असलेली मालमत्ता, निधी व इतर मत्ता तसेच अशा नगर पंचायतीचे सर्व हक्क व दायित्वें त्या अधिक लहान नागरी क्षेत्राच्या नगरपरिषदेकडे निहित व प्रक्रांत होतील. अशा प्रकारे रद्द केल्याचे किंवा फेरफार केल्याचे परिणाम.

(२) एखाद्या संक्रमणात्मक क्षेत्राच्या एखाद्या भागाची कोणतेही अधिक लहान नागरी क्षेत्र म्हणून रचना करण्यात येईल किंवा कोणत्याही अधिक लहान नागरी क्षेत्रामध्ये तो समाविष्ट करण्यात येईल त्याबाबतीत, असा भाग हा कलम ३४१ क अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संक्रमणात्मक क्षेत्रामधून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्या संक्रमणात्मक क्षेत्राच्या नगर पंचायतीकडे निहित असेल ती मालमत्ता, निधी व इतर मत्ता यांपैकी तसेच त्या नगर पंचायतीचे हक्क व दायित्वे यांपैकी, याबाबतीत राज्य शासनाकडून आदेशाद्वारे नेमून देण्यात येईल तेवढी मालमत्ता, निधी व इतर मत्ता आणि हक्क व दायित्वे, अशा अधिक लहान नागरी क्षेत्राच्या नगरपरिषदेकडे निहित व प्रक्रांत होतील.

## प्रकरण सव्वीस—ख

## औद्योगिक नगरी

**३४१ च.** राज्य शासनाला, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ थ च्या खंड (१) च्या परंतुकामध्ये उल्लेखिलेले घटक तसेच, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१अन्वये रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे [१][कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये विधिसंस्थापित केलेल्या महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादितद्वारे] किंवा सहकारी औद्योगिक वसाहत विकसित करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या सहकारी संस्थेद्वारे विकसित करण्यात आलेल्या कोणत्याही विशिष्ट औद्योगिक क्षेत्रांचे नेमके स्थान विचारात घेऊन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणतेही नागरी क्षेत्र किंवा त्याचा भाग औद्योगिक नगरी म्हणून विनिर्दिष्ट करता येईल. औद्योगिक नगरी विनिर्दिष्ट करणे. (१९५६ चा १.)

**३४१ छ.** प्रत्येक औद्योगिक नगरीसाठी, एक औद्योगिक नगरी प्राधिकरण असेल. असे प्रत्येक प्राधिकरण हे "........... औद्योगिक नगरी प्राधिकरण" नावाचा निगमनिकाय असेल व त्याची एक अखंड अधिकार परंपरा व सामाईक शिक्का असेल आणि त्याला मालमत्ता खरेदी करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा अधिकार असेल, व त्याला किंवा त्याच्याविरूद्ध त्या नावाने दावा दाखल करता येईल. औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे विधी द्वारा संस्थापन.

**३४१ ज.** औद्योगिक नगरी प्राधिकरणामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :— औद्योगिक नगरी प्राधिकरणाची रचना.

(क) अध्यक्ष . . महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून [२][महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित कडून] किंवा त्या औद्योगिक नगरीमध्ये सहकारी औद्योगिक वसाहत विकसित करण्याकरता स्थापन करण्यात आलेल्या सहकारी संस्थेकडून नामनिर्देशित करावयाचा व तो अशासकीय सदस्य असेल ;

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ख) दोन सदस्य . . महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून [३][महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित कडून] किंवा त्या औद्योगिक नगरीत सहकारी औद्योगिक वसाहत विकसित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सहकारी संस्थेकडून पदनिर्देशित करावयाचे, यापैकी एक औद्योगिक नगरी प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल ;

(ग) दोन सदस्य . . औद्योगिक नगरीत वसलेल्या औद्योगिक युनीट संघाने नामनिर्देशित करावयाचे ; आणि

(घ) एक सदस्य . . अशी औद्योगिक नगरी ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून नामनिर्देशित करावयाचा.

सदस्यांचा पदावधी.

**३४१ झ.** (१) अध्यक्ष आणि कलम ३४१ ज च्या खंड (ख) व (ग) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी हा, कलम ३४१ ह च्या खंड (ख) व (ग) मध्ये उल्लेखिलेल्या पदनिर्देशन करणाऱ्या संबंधित संस्थांनी त्या अध्यक्षाचे नाव किंवा सदस्यांची नावे आधीच मागे घेतली नाहीत तर, पाच वर्षाचा असेल.

(२) कोणत्याही अशासकीय सदस्याला अध्यक्षाला उद्देशून व स्वतःच्या सहीने आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल. अध्यक्षाला, जिल्हाधिकाऱ्याला उद्देशून व स्वतःच्या सहीने आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल. अध्यक्षाला किंवा यथास्थिति, जिल्हाधिकाऱ्याला राजीनामा मिळाल्याच्या दिनांकापासून तो राजीनामा अंमलात येईल.

(३) असा राजीनामा देण्यामुळे किंवा अध्यक्ष किंवा एखादा सदस्य याचा मृत्यू किंवा असमर्थता यासारख्या कोणत्याही अन्य कारणामुळे निर्माण होणारे कोणतेही नैमित्तिक रिक्त पद, कलम ३४१ज मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.

(४) पोट-कलम (४) अन्वये अशा प्रकारे नामनिर्देशित करण्यात आलेला कोणताही सदस्य, ज्याच्या जागी त्याला नामनिर्देशित करण्यात आले आहे त्या सदस्याने असे पद जेवढ्या उर्वरित काळासाठी धारण केले असते केवळ तेवढ्याच काळासाठी ते पद धारण करील.

मुख्य कार्यकारी अधिकारी व सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

**३४१ ञ.** (१) कलम ३४१ज च्या खंड (ब) अन्वये नामनिर्देशित करण्यात आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या सेवेच्या अटी व शर्ती तसेच त्याचे पारिश्रमिक ह्या बाबी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ [२][महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित] किंवा उक्त सहकारी संस्था यांच्याकडून, याबाबतीत वेळोवेळी काढण्यात येतील अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील.

औद्योगिक नगरी प्राधिकरणाच्या सभा.

**३४१ ट.** (१) औद्योगिक नगरीच्या प्राधिकरणाची महिन्यातून किमान एक सभा होईल.

(२) प्राधिकरणाच्या अशा कोणत्याही सभेची गणपूर्ती होण्यासाठी तीन सदस्यांची आवश्यकता असेल.

(३) अशा सभेमध्ये होणाऱ्या कोणत्याही कामकाजाच्या संबंधातील निर्णय बहुमताने घेण्यात येतील. समान मते पडतील त्याबाबतीत अध्यक्षाचे मत निर्णायक असेल.

(४) बाबीच्या गुणावगुणांना बाधक न ठरणाऱ्या अशा, औद्योगिक नगरी प्राधिकरणाच्या कोणत्याही कृतीला किंवा कार्यवाहीला, केवळ त्या औद्योगिक नगरी प्राधिकरणामध्ये कोणतेही

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५ याच्या कलम ३(ख) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

पद रिक्त असल्याच्या किंवा तिच्या रचनेमध्ये कोणताही दोष असल्याच्या किंवा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नामनिर्देशनामध्ये कोणताही दोष असल्याच्या किंवा औद्योगिक नगरी प्राधिकरणाच्या कोणताही कार्यपद्धतीमध्ये, बैठक घेण्याकरता काढावयाच्या नोटिशीच्या कार्यपद्धतीसह कोणतीही नियमबाह्यता असल्याच्या कारणावरून आक्षेप घेण्यात येणार नाही किंवा ती अवैध ठरवली जाणार नाही.

**३४१ ठ.** औद्योगिक नगरी प्राधिकरणाची सर्व कागदपत्रे, प्राधिकरणाच्या अध्यक्षाच्या सहीने किंवा या बाबतीत प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येतील.

औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे आदेश व कागदपत्रे यांचे अधिप्रमाणन.

**३४१ ड.** औद्योगिक नगरी प्राधिकरण जी साधने किंवा उपाय वापरण्यास किंवा योजण्यास कायदेशीर रीतीने सक्षम असेल ती कोणतीही साधने किंवा उपाय वापरुन किंवा योजून पुढीलपैकी प्रत्येक बाबीसाठी पुरेशी तरतूद करणे औद्योगिक नगरी प्राधिकरणावर बंधनकारक असेल त्या बाबी म्हणजे,----

औद्योगिक नगरी प्राधिकरणाची कामे व कतर्व्ये.

(एक) राज्य शासन, त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये, अशा औद्योगिक नगरीच्या क्षेत्रामध्ये, बसवील किंवा लादेल असा कोणताही कर (कोणत्याही शास्तीसह) विहित रीतीने गोळा करणे ;

(दोन) सार्वजनिक रस्त्यांवर, जागांमध्ये व इमारतींमध्ये प्रकाशयोजना करणे ;

(तीन) सार्वजनिक रस्ते, जागा व गटारे साफ करणे, अपायकारक झाडेझुडपे काढून टाकणे व सर्व प्रकारचे सार्वजनिक उपद्रव दूर करणे ;

(चार) अग्निशमन करणे व आग लागली असता जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करणे ;

(पाच) मृतांच्या विल्हेवाटीकरिता जागा संपादन करणे व त्यांचे परिरक्षण करणे, जागा बदलणे व त्यांचे विनियमन करणे ;

(सहा) सार्वजनिक रस्ते, अधःप्रणाल, सीमाचिन्हे, बाजार, कत्तलखाने, शौचकूप, संडास, मुताऱ्या, गटारे, मलप्रणाल, जलनिःसारणाची बांधकामे, मलप्रणालीची बांधकामे, स्नानगृहे, कपडे धुण्याच्या जागा, पिण्याच्या पाण्याची कारंजी, तलाव, विहिरी बांधणे व तत्सम बांधकामे करणे ;

(सात) नगरीतील रहिवाशांना सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे आणि विद्यमान अपुऱ्या किंवा आरोग्यास हानिकारक असणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्यामुळे नगरीतील रहिवाशांच्या आरोग्याला असलेला धोका टाळण्याकरिता त्यांच्यासाठी योग्य व पुरेशा पाण्याचा पुरवठा किंवा जादा पुरवठा मिळविणे ;

(आठ) जन्ममृत्यूची नोंद ठेवणे ;

(नऊ) सार्वजनिक दवाखान्यांची स्थापना करणे व ते चालवणे व सार्वजनिक वैद्यकीय सहाय्याची तरतूद करणे व कुटुंब नियोजन केंद्रांचे आयोजन करणे ;

(दहा) प्राथमिक शाळा स्थापन करणे व चालवणे ;

(अकरा) प्राधिकरणाच्या स्वच्छता कर्मचारीवर्गाच्या राहण्याच्या व कामाच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्याकरिता राज्य शासन वेळोवेळी निदेशित करील अशा उपाययोजना हाती घेणे ;

(बारा) घातक किंवा संसर्गजन्य रोगांच्या वेळी, आजारी व्यक्तींना विशेष वैद्यकीय सहाय्य व जागा यांची तरतूद करणे व अशा रोगाच्या प्रादुर्भावास प्रतिबंध करण्यासाठी किंवा असा रोग पुन्हा उद्‌भवू नये याकरिता तो आटोक्यात आणण्यासाठी व त्यास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे ; आणि

(तेरा) राज्य शासन नेमून देईल अशी कोणतीही इतर कामे व कर्तव्ये.

औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे अधिकार.

**३४१ ढ.** (१) औद्योगिक नगरी प्राधिकरणास, कलम ३४०ण अन्वये तयार करण्यात आलेल्या विनियमांनुसार, या प्रकरणाखालील आपली कामे पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक किंवा इष्ट असेल अशी कोणतीही गोष्ट करण्याचे अधिकार असतील. या प्रयोजनाकरिता प्राधिकरणास, त्यास योग्य वाटतील असे अधिकार आदेशाद्वारे, आपल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, प्राधिकरण, रस्ते सुस्थितीत ठेवण्याकरिता, जलनिःसारण, पाणीपुरवठा चालू ठेवण्याकरिता तसेच, रस्त्यांवर दिवे लावण्याच्या तरतुदींसह त्याच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या अशा इतर सेवा व सुविधा यांकरिता त्यास येणारा खर्च भागविण्यासाठी, फी किंवा सेवा शुल्क बसवील. अशी फी किंवा शुल्क, मालमत्तेचा मालक किंवा मालमत्तांचे भोगवटादार किंवा या सेवा किंवा सुविधांचा लाभ मिळणाऱ्या अन्य व्यक्ती यांच्यावर बसवता येईल :

परंतु, पूर्वोक्त कर ज्या कमाल व किमान दरांनी बसविण्यात येतील ते दर नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा प्रकारचे असतील.

विनियम करण्याचा अधिकार.

**३४१ण.** औद्योगिक नगरी प्राधिकरणास, या प्रकरणाखालील आपली कामे पार पाडण्याकरिता, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनियम करता येतील.

शासनाचे सर्वसाधारण नियंत्रण.

**३४१ त.** राज्य शासनास, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, सर्वसाधारण किंवा विशेष धोरणात्मक निदेश औद्योगिक नगरी प्राधिकरणाला देता येतील आणि अशा निदेशांचे पालन करण्यास व त्यानुसार कृती करण्यास प्राधिकरण बांधील राहील.

विवक्षित कारणांवरून औद्योगिक नगरी प्राधिकरणाचे आदेश व निर्णय यांची अंमलबजावणी स्थगित करण्याचे अधिकार.

**३४१ थ.** (१) औद्योगिक नगरी प्राधिकरणाच्या कोणत्याही आदेशाची किंवा निर्णयाची अंमलबजावणी अथवा प्राधिकरणाकडून किंवा त्याच्यावतीने करण्यात यावयाची किंवा करण्यात येत असलेली कोणतीही गोष्ट करण्यामुळे जनतेला इजा किंवा उपद्रव होत आहे किंवा इजा वा उपद्रव होण्याची शक्यता आहे किंवा तसे करणे सार्वजनिक हिताच्या विरूद्ध आहे किंवा त्यामुळे शांतताभंग होण्याची शक्यता आहे किंवा तसे करणे अवैध आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत असेल त्याबाबतीत, तो, त्याच्या सहीने लेखी आदेशाद्वारे, प्राधिकरणाच्या त्या आदेशाची किंवा निर्णयाची किंवा अंमलबजावणी स्थगित करू शकेल किंवा त्या कृतीस मनाई करू शकेल.

(२) जिल्हाधिकारी, आपल्या सहीने, कोणताही आदेश काढील त्याबाबतीत तो, त्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या प्राधिकरणास त्या आदेशाची एक प्रत पाठवील व त्यामध्ये असा आदेश काढण्याची कारणे निर्दिष्ट करील, तसेच त्याबाबतचा अहवाल व अशा आदेशाची प्रत संचालकांकडे सादर करील.

(३) जिल्हाधिकाऱ्याचा असा आदेश मिळाल्यापासून वीस दिवसांच्या आत, प्राधिकरण, त्याची तशी इच्छा असल्यास, संचालकास एक निवेदन पाठवून त्यामध्ये जिल्हाधिकाऱ्याचा आदेश का रद्द करण्यात यावा, त्यात का सुधारणा करण्यात यावी किंवा का फेरफार करण्यात यावा ते नमूद करील. त्या अवधीमध्ये संचालकांकडे असे कोणतेही निवेदन न आल्यास, जिल्हाधिकाऱ्याचा आदेश कायम करण्याला प्राधिकरणाची कोणतीही हरकत नाही असे संचालक गृहीत धरील.

(४) जिल्हाधिकाऱ्याकडून असा अहवाल तसेच, पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेले प्राधिकरणाचे, कोणतेही निवेदन असल्यास, ते निवेदन मिळाल्यावर संचालक आदेश रद्द करू शकेल किंवा त्या आदेशामध्ये सुधारणा, फेरफार करू शकेल, किंवा तो कायम करू शकेल किंवा तो आदेश फेरफारांसह किंवा फेरफाराशिवाय अंमलात असण्याचे चालू राहील असा निदेश देऊ शकेल :

परंतु, असा आदेश काढण्यापूर्वी संचालक, त्याच्याकडे प्राधिकरणाचे कोणतेही निवेदन आले असल्यास, ते विचारात घेईल.

**३४१ द.** औद्योगिक नगरी प्राधिकरण, आपली कर्तव्ये किंवा कामे योग्य व समाधानकारक रीत्या पार पाडण्यास असमर्थ आहे किंवा तसे करण्यात ते अपयशी ठरले आहे असे राज्य शासनाचे मत असेल त्याबाबतीत, राज्य शासन, त्या प्राधिकरणास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखी आदेशाद्वारे, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल एवढ्या मुदतीसाठी, एका शासकीय अधिकाऱ्याची उक्त नगरीचा प्रशासक म्हणून नियुक्ती करू शकेल. विवक्षित परिस्थितीमध्ये प्रशासकाची नियुक्ती करण्याचा अधिकार.

१९६६ चा महा ३६. **३४१ ध.** औद्योगिक नगरीतील नगररचनाविषयक बाबींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदींद्वारे नियंत्रण करण्यात येईल. ] प्रादेशिक व नगररचना अधिनियम लागू होणे.

[1][ प्रकरण सत्तावीस ]

**नगर पंचायती**

**३४२.** [वगळण्यात आले].

प्रकरण अठ्ठावीस

**निरसन आणि संक्रमणकालीन तरतुदी**

**३४३.** या प्रकरणाच्या तरतुदींना अधीन राहून,— निरसन.

१९०१ चा मुंबई ३. १९२५ चा मुंबई १८. १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९५६ चा हैद्राबाद १८.

(क) राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असलेले, मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ आणि मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ ;

(ख) राज्याच्या विदर्भ प्रदेशात अंमलात असलेला मध्यप्रांत आणि वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ ;

(ग) राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रामध्ये अंमलात असलेला हैद्राबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ ;

हे नेमलेल्या दिवशी निरसित होतील.

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १६१ द्वारे प्रकरण सत्तावीस वगळण्यात आले.

अर्थ लावणे

**३४४.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या प्रकरणातील—

(क) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात "विद्यमान नगरपरिषद" याचा अर्थ, यथास्थिति पुढीलप्रमाणे स्थापन झालेली व नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेली ;

(एक) मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ अन्वये स्थापन झालेली बरो नगरपालिका ; १९२५ चा मुंबई १८.

(दोन) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ अन्वये स्थापन झालेली जिल्हा किंवा शहर नगरपालिका ; १९०१ चा मुंबई ३.

(तीन) मध्यप्रांत आणि वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ या अन्वये स्थापन झालेली नगरपालिका समिती ; १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(चार) हैद्राबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन झालेली नगरपालिका समिती किंवा नगर समिती ; १९५६ चा हैद्राबाद १८.

असा होतो.

(ख) "निरसित कायदा" याचा अर्थ—

(एक) राज्याच्या मुंबई क्षेत्रातील बरो नगरपालिकेच्या संबंधात मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ ; १९२५ चा मुंबई १८.

(दोन) राज्याच्या मुंबई क्षेत्रातील जिल्हा अगर शहर नगरपालिकांच्या संबंधात मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ ; १९०१ चा मुंबई ३.

(तीन) राज्याच्या विदर्भ प्रदेशातील नगरपालिका समितीच्या संबंधात मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२; आणि १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(चार) राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रातील नगरपालिका समिती किंवा नगर समितीच्या संबंधात हैद्राबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ ; १९५६ चा हैद्राबाद १८.

असा होतो.

(ग) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात "उत्तराधिकारी नगरपरिषद" याचा अर्थ, नियत दिवशी आणि त्या दिवसापासून अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेली नगरपरिषद, असा होतो.

ज्यांचा पदावधी ३१ डिसेंबर, १९६५ नंतर समाप्त व्हावयाचा असेल अशा, विद्यमान नगरपरिषदांच्या परिषद सदस्यांबाबत विशेष तरतूद.

**३४५.** कोणत्याही निरसित कायद्यात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही विद्यमान नगरपरिषदेच्या सदस्याचा किंवा सदस्यांचा जो पदावधी किंवा वाढविलेला पदावधी दिनांक ३१ डिसेंबर १९६५ नंतर संपणार असेल, तो पदावधी [1][३१ डिसेंबर, १९६७ रोजी किंवा **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासन या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा [2][त्या आधीच्या दिनांकास मध्यरात्री १२ वाजता संपेल. ]

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५२, याच्या कलम ३(एक) द्वारे "३१ डिसेंबर १९६५ रोजी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] १४ जून १९६६, पहा—शासकीय अधिसूचना नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रमांक यूएमए-१३६६ (ड) एकत्रीकरण चार, २ जून १९६६.

[१][**३४५. क** (१) या अधिनियमात काहीही असले तरी, राज्य शासनाने कलम ३४५ अन्वये ३१ डिसेंबर, १९६७ च्या आधीचा दिनांक विनिर्दिष्ट केला असेल तर, अशा आधीच्या दिनांकाच्या लगत नंतरच्या दिवसापासून प्रत्येक विद्यमान नगरपरिषदेच्या जागी संबंधित नगरपालिका क्षेत्राकरिता पहिली उत्तराधिकारी नगरपरिषद या अधिनियमान्वये स्थापन झाल्याचे समजण्यात येईल. विद्यमान परिषद सदस्यांची मुदत ३१ डिसेंबर, १९६७ पूर्वी संपविण्यास भाग पाडण्यास पहिल्या उत्तराधिकारी नगरपरिषदांची स्थापना, घडण आणि पदावधी.

(२) अशा उक्त आधीच्या दिनांकास कोणत्याही विद्यमान नगरपरिषदेचे परिषद सदस्य किंवा सदस्य अधिकार पदावर असतील तर, उत्तराधिकारी नगरपरिषदेमध्ये या अधिनियमान्वये झालेल्या निवडणुकीमध्ये जे रीतसर निवडून आले आहेत असे समजण्यात येईल, असे यथास्थिति, उक्त परिषद सदस्य किंवा सदस्य असतील; आणि कलम ९ च्या जागा राखून ठेवण्याबाबत किंवा परिषद सदस्यांच्या स्वीकृतीबाबत असलेल्या तरतुदी अशा उत्तराधिकारी नगरपरिषदेस लागू होणार नाहीत.

(३) विद्यमान नगरपरिषदेच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी, सर्व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी सर्व कार्ये पार पाडण्यासाठी नेमलेला कोणताही अधिकारी— मग त्याचा उल्लेख कोणत्याही पदनामाने केलेला असो— अशा आधीच्या दिनांकास अधिकार पदावर असेल तर, तो या अधिनियमान्वये प्रशासक म्हणून नेमलेला आहे असे समजण्यात येईल आणि त्याला उत्तराधिकारी नगरपरिषदेचे, तिच्या सर्व प्राधिकरणांचे, परिषद समित्यांचे आणि परिषद सदस्यांचे सर्व अधिकार असतील आणि तो त्यांचा वापर करील आणि सर्व कर्तव्यांचे पालन करील आणि सर्व कार्ये पार पाडील.

(४) उत्तराधिकारी नगरपरिषदेमध्ये पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निवडून आल्याचे समजण्यात येणारे परिषद सदस्य असतील तर, जिल्हाधिकारी पोट-कलम (१) अन्वये अशी नगरपरिषद स्थापन करण्यात आल्याचे समजण्यात आल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीसाठी उक्त नगरपरिषद सदस्यांची विशेष सभा बोलावील आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडण्यासाठी कलम ५१ मध्ये विहित केलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह लागू होईल.

(५) या कलमान्वये निवडून आल्याचे समजण्यात येणाऱ्या नगरपरिषद सदस्यांचा आणि नेमण्यात आल्याचे समजण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रशासकाचा पदावधी, [२][**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासन याबाबत विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास] मध्यरात्री १२ वाजता संपेल. परंतु कोणत्याही बाबतीत अशी तारीख ३१ डिसेंबर, १९६७ नंतरची असणार नाही :

परंतु, अनुसूची एक, भाग दोन, स्तंभ तीनमध्ये उल्लेख केलेल्या थंड हवेच्या ठिकाणांच्या नगरपरिषद क्षेत्राच्या पहिल्या उत्तराधिकारी नगरपरिषदांच्या बाबतीत, राज्य शासनास, महाराष्ट्र नगरपालिका (नगरपालिका कायद्याचे एकीकरण करण्यात येईपर्यंत निवडणुकी पुढे ढकलण्याबाबत) अधिनियम, १९६४ च्या तरतुदी नसत्या तर, संबंधित अधिनियमान्वये तत्सम विद्यमान नगरपरिषदाच्या परिषद सदस्यांचा किंवा सदस्यांचा पदावधी किंवा वाढविलेला पदावधी ज्या दिनांकास संपला असता, त्या दिनांकानंतर केव्हाही, या कलमान्वये निवडून आल्याचे समजण्यात येणाऱ्या परिषद सदस्यांच्या जागी, उत्तराधिकारी नगरपरिषदेचे परिषद

[१] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १४ याच्या कलम ९ द्वारे कलम ३४५क समाविष्ट करण्यात आले.

[२] १ जुलै १९६७ (पहा शासकीय अधिसूचना, नगरविकास सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रमांक ३-एएम ०१०-६७ ए, दिनांक ११ मार्च १९६७).

सदस्य म्हणून पंधरा व्यक्तींस आणि त्यांच्यापैकी एकास अध्यक्ष म्हणून नेमता येईल. या पंधरा परिषद सदस्यांपैकी कमीत कमी ८ व्यक्ती निवडून येण्यासाठी यथोचित अर्हता असलेल्या असतील व उरलेल्या व्यक्ती याबाबतीत, शासनाने योग्य मानलेल्या आणि पदाच्या आधारे किंवा नावाने नेमलेल्या असू शकतील अशा परिषद सदस्यांचा पदावधी, निवडून आल्याचे समजण्यात येणाऱ्या परिषद सदस्यांचा पदावधी या पोट-कलमान्वये ज्यावेळी संपेल त्याचवेळी संपेल.

[१][परंतु आणखी असे की, जेव्हा या पोट-कलमान्वये राज्य शासनाने ३१ डिसेंबर १९६७ च्या आधीचा दिनांक विनिर्दिष्ट केला असेल आणि न्यायालयाने मनाई हुकूम किंवा स्थगिती देणे यासारख्या काही कारणामुळे कोणत्याही नगरपरिषदेच्या परिषद सदस्यांच्या सर्वसाधारण निवडणुकीचे सर्व टप्पे अशा आधीच्या दिनांकापूर्वी पूर्ण करणे शक्य नाही, असे राज्य शासनास वाटत असेल तेव्हा, असा आधीचा दिनांक अगोदरच विनिर्दिष्ट केलेला असला तरीही, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ते वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असा, पूर्वोक्त आधीच्या दिनांकानंतरच्या कोणत्याही दिनांकापर्यंत, परंतु कोणत्याही बाबतीत [२][३१ डिसेंबर १९६८ नंतरच्या दिनांकपर्यंत] नसेल, असा यथास्थिति, नगरपरिषदेच्या परिषद सदस्यांचा किंवा प्रशासकाचा पदावधी वाढविता येईल किंवा परिषद सदस्यांच्या ऐवजी तत्सम अधिसूचनेद्वारे, संबंधित नगरपरिषदेच्या आणि तिच्या सर्व प्राधिकरणांच्या, समित्यांच्या, परिषद सदस्यांच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी, सर्व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी व सर्व कामे पार पाडण्यासाठी, प्रशासक म्हणून एक अधिकारी नेमता येईल.].

(६) पोट-कलम (१) अन्वये ज्या दिनांकास उत्तराधिकारी नगरपरिषदा स्थापन झाल्याचे समजण्यात येते त्या दिनांकास प्रारंभ होणाऱ्या व [३][पोट-कलम (५)] अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत, उत्तराधिकारी नगरपरिषदेतील कोणतेही रिकामे पद भरण्यासाठी,कोणतीही निवडणूक घेता येणार नाही किंवा नामनिर्देशन करता येणार नाही. परंतु आवश्यक असेल त्याप्रमाणे व तेव्हा वेगवेगळ्या प्राधिकरणांसाठी व समित्यांसाठी निवडणूक घेण्यात येईल व कलम ६३ पोट-कलम (३) मधील निर्बंध आणि कलम ६६ चे परंतुक हे अशा निवडणुकीस लागू असणार नाही.]

विद्यमान नगरपरिषदेच्या पुनःस्थापनेमुळे होणारे परिणाम.

**३४६.** नेमलेल्या दिवशी आणि त्या दिवसापासून पुढील परिणाम घडून येतील :—

(क) नेमलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी एखाद्या विद्यमान नगरपरिषदेच्या अधिकारितेखाली असलेले प्रत्येक स्थानिक क्षेत्र हे या अधिनियमान्वये जाहीर केलेले नगरपालिका क्षेत्र म्हणून समजण्यात येईल आणि त्यास अनुसूची एक मध्ये दिलेल्या तत्सम नावाने संबोधण्यात येईल आणि त्या अनुसूचीमध्ये ज्या वर्गाखाली त्याचा निर्देश केला असेल त्या वर्गाचे म्हणून त्याला समजण्यात येईल आणि त्यासाठी असलेल्या नगरपरिषदेस उक्त अनुसूचीच्या स्तंभ तीनमध्ये त्यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या नावाने संबोधण्यात येईल ;

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ७ द्वारे हे परंतुक दिनांक १० जून १९६७ रोजी जादा दाखल करण्यात आले असे समजण्यात आले.

[२] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६, याच्या कलम २ द्वारे " ३१ मार्च १९६८ नंतरच्या तारखेपर्यंत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ६ द्वारे " पोट-कलम (४) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व तसा नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात आले.

(ख) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी एखाद्या विद्यमान नगरपरिषदेकडे निहित असलेल्या सर्व जंगम व स्थावर मालमत्ता आणि अशा मालमत्तेत असलेले कोणत्याही स्वरूपाचे आणि कोणत्याही प्रकारचे सर्व हितसंबंध नेमलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी अंमलात किंवा अस्तित्वात असलेल्या सर्व मर्यादा, शर्ती, तसेच कोणत्याही व्यक्तीचे, संस्थेचे किंवा प्राधिकरणाचे सर्व अधिकार किंवा हितसंबंध यांस अधीन राहून, आणखी हस्तांतरण न करता उत्तराधिकारी नगरपरिषदेकडे हस्तांतरित आणि निहित झाले आहेत असे समजले जाईल ;

(ग) विद्यमान नगरपरिषदेकडे सर्व अधिकार, दायित्वे व आबंधने (यात कोणत्याही करारपत्रान्वये किंवा संविदेअन्वये निर्माण झालेल्या अधिकारांचा, दायित्वाचा व आबंधनांचा अंतर्भाव होतो) ही, उत्तराधिकारी नगरपरिषदेचे अधिकार, दायित्वे व आबंधने आहेत असे समजले जाईल.

(घ) कोणत्याही कराच्या संबंधात किंवा अन्यथा विद्यमान नगरपरिषदेस देय असलेल्या सर्व रकमा उत्तराधिकारी नगरपरिषद वसूल करू शकेल, आणि अशा वसुलीच्या प्रयोजनासाठी विद्यमान नगरपरिषदेस किंवा तिच्या कोणत्याही प्राधिकरणास नेमलेल्या दिवसापूर्वी जी कोणतीही उपाययोजना करता आली असती किंवा जी कोणतीही कारवाई दाखल करता आली असती अशी कोणतीही उपाययोजना किंवा कारवाई करण्यास अशी उत्तराधिकारी नगरपरिषद सक्षम असेल ;

(ङ) विद्यमान नगरपरिषदेचा निधी हा उत्तराधिकारी नगरपरिषदेचा निधी म्हणून समजण्यात येईल ;

(च) विद्यमान नगरपरिषदेशी केलेल्या सर्व संविदा आणि तिच्या वतीने करून दिलेले सर्व लेख हे, उत्तराधिकारी नगरपरिषदेशी केलेल्या संविदा व तिच्या वतीने करून दिलेले लेख आहेत असे समजण्यात येईल आणि त्यानुसार ते अंमलात येतील ;

(छ) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी निरसित कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याअन्वये कोणत्याही प्राधिकरणाकडे अनिर्णीत असलेल्या सर्व कार्यवाही व बाबी या अधिनियमान्वये अशा कार्यवाही व बाबी स्वीकारण्यास व निकालात काढण्यास सक्षम असलेल्या तत्सम प्राधिकरणाकडे हस्तांतरित केल्या आहेत असे समजण्यात येईल ;

(ज) नेमलेल्या दिवशी अनिर्णित असलेल्या ज्या दाव्यांमध्ये व कायदेशीर कार्यवाह्यांमध्ये किंवा त्यांच्या संबंधात विद्यमान नगरपरिषद पक्षकार म्हणून असेल, तिच्या ऐवजी अशा सर्व दाव्यांमध्ये व कायदेशीर कार्यवाह्यांमध्ये किंवा त्यांच्या संबंधात, उत्तराधिकारी नगरपरिषद पक्षकार म्हणून समजण्यात येईल.

(झ) कोणत्याही निरसित कायद्यांखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली एखाद्या विद्यमान नगरपरिषदेने किंवा तिच्या संबंधात अशा विद्यमान नगरपरिषदेच्या क्षेत्रात केलेली, काढलेली, बसविलेली किंवा मंजुरी दिलेली आणि नेमलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी अंमलात असलेली कोणतीही नेमणूक, अधिसूचना, नोटीस, कर, आदेश, योजना, लायसन्स, परवानगी, नियम, उप-विधी, विनिमय किंवा नमुना या बाबी जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर ; त्यांचे अधिक्रमण करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याने त्यांचे अधिक्रमण करीपर्यंत जणू ते उत्तराधिकारी नगरपरिषदेच्या तत्सम क्षेत्राच्या संबंधात करण्यात, काढण्यात बसविण्यात किंवा मंजूर करण्यात आल्या आहेत असे समजून अंमलात असण्याचे चालू राहील :

परंतु,—

(एक) विद्यमान नगरपरिषदेच्या बाबतीत, निरसित कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याखाली केलेला आणि नेमलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी अंमलात असलेला कोणताही नियम अशा नियमात तरतूद केलेल्या बाबींच्या संबंधात, या अधिनियमान्वये एखाद्या नियमाखेरीज केवळ एखादा उप-विधी किंवा कोणताही इतर लेख करण्याचीच परवानगी देण्यात आली आहे याच केवळ कारणावरून या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत आहे, असे समजले जाणार नाही.

(दोन) या परंतुकाचा खंड (एक) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह विद्यमान नगरपरिषदेच्या संबंधात निरसित कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याखाली केलेल्या आणि नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही उप-विधींस, विनियमास किंवा कोणत्याही इतर लेखास लागू होतील :

[1][परंतु आणखी असे की, कोणत्याही विद्यमान नगरपरिषदेने नेमलेल्या दिवसांपूर्वी केलेली व त्या दिवसाच्या लगतपूर्वी अंमलात असलेली कोणतीही आकारणी किंवा लादलेला कोणताही कर, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींशी विसंगत असला तरीही, उत्तराधिकारी नगरपरिषदेने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार केलेल्या आकारणीद्वारे किंवा लादलेल्या कराद्वारे तो पुनःस्थापित केला जाईपर्यंत किंवा ३१ मार्च, १९७७ पर्यंत, यापैकी जो अगोदरचा असेल त्या दिनांकापर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील :

परंतु, तसेच नेमलेल्या दिवशी प्रलंबित असलेली किंवा राज्य शासनाने या अधिनियमान्वये नियम करण्यापूर्वी कोणत्याही वेळी सुरू झालेली कोणत्याही कराच्या आकारणीविषयीची कार्यवाही, अशा नियमांच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर केव्हाही पूर्ण झालेली असो, ती या अधिनियमाखाली नियम तयार करण्यात आले नव्हते किंवा कोणत्याही नगरपरिषदेने स्वीकारलेले कराचे दर हे अशा नियमात तरतूद केलेल्या दराहून वेगळे होते, केवळ याच गोष्टीच्या आधारे बेकायदेशीर ठरणार नाही].

(ञ) एखाद्या विद्यमान नगरपरिषदेकडून किंवा तिच्या संबंधात निरसित कायद्यांपैकी कोणत्याही कायद्यानुसार किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यानुसार अशा विद्यमान नगरपरिषदेच्या क्षेत्रात करण्यात आलेली आणि नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अंमलात असलेली सर्व अंदाजपत्रके, करनिर्धारणे, करनिर्धारणाच्या याद्या, मूल्यनिर्धारणे, मोजणी व विभागणी या सर्व गोष्टी या प्रस्तृत अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, त्या क्षेत्रासाठी असलेल्या उत्तराधिकारी नगरपरिषदेकडून किंवा तिच्या संबंधात करण्यात आल्या आहेत असे समजण्यात येईल.

(ट) कोणत्याही निरसित कायद्याच्या तरतुदीसंबंधी कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संलेखात करण्यात आलेला कोणताही उल्लेख हा, त्यावरून निराळा आशय अभिप्रेत नसेल तर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीसंबंधी केलेला उल्लेख आहे असे समजून त्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल ;

(ठ) कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संलेखात विद्यमान नगरपरिषदेसंबंधी केलेला कोणताही उल्लेख हा, त्यावरून निराळा आशय अभिप्रेत नसेल तर, उत्तराधिकारी

[1] ही परंतुके सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४५, याच्या कलम १६ द्वारे समाविष्ट करण्यात आली व ते नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात आले.

नगरपरिषदेसंबंधी केलेला उल्लेख आहे असे समजून त्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल आणि असा कायदा किंवा संलेख उत्तराधिकारी नगरपरिषदेस लागू होईल ;

(ड) उपरोक्त परिच्छेदामध्ये विद्यमान नगरपरिषदेसंबंधी केलेला कोणताही उल्लेख हा, अशी नगरपरिषद निष्प्रभावित करण्यात किंवा विसर्जित करण्यात आली असेल किंवा ती अन्यथा कार्य करीत नसेल तर, अशा नगरपरिषदेच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्याची नेमण्यात आलेल्या व्यक्तीसंबंधी किंवा व्यक्तींसंबंधी केलेला उल्लेख आहे असे समजण्यात येईल.

अधिकारी व कर्मचारी यांच्यासंबंधी तरतुदी.

**३४७.** (१) नेमलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी विद्यमान नगरपरिषदेच्या नोकरीत असलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांची उत्तराधिकारी नगरपरिषदेच्या सेवेत बदली झालेली आहे असे समजण्यात येईल आणि सक्षम प्राधिकरणाकडून इतर तरतुदी करण्यात येईपर्यंत, अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना दिनांक २६ मार्च, १९६५ च्या लगतपूर्वी जे वेतन व भत्ते, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी, उपदान आणि सेवानिवृत्तिनंतरचे इतर लाभ मिळण्याचा हक्क होता तेच वेतन, भत्ते, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी, उपदान व सेवानिवृत्तिनंतरचे इतर लाभ मिळतील. तसेच अशा दिवसाच्या लगतपूर्वी ते सेवेच्या ज्या इतर शर्तीस अधीन होते त्याच शर्तींना अधीन असतील :

परंतु, अशा रीतीने उत्तराधिकारी नगरपरिषदेच्या सेवेत बदली झालेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या बाबतीत, त्या दिवसांच्या लगतपूर्वी लागू असलेल्या सेवेच्या शर्तीमध्ये राज्य शासनाची पूर्वसंमती घेतल्यावाचून त्यास अहितकारक ठरतील अशा रीतीने फेरफार करण्यात येणार नाहीत :

परंतु आणखी असे की, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्याचे उत्तराधिकारी नगरपरिषदेस जे अधिकार आहेत त्यांना या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी,—

१९२५ चा मुंबई १८. (क) मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५, कलम ३३ अन्वये कोणत्याही बरो नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याचे पद धारण करीत असेल ;

१९०१ चा मुंबई ३. (ख) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, कलम १८२, पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही शहर नगरपालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याचे पद धारण करीत असेल ;

१९०१ चा मुंबई ३. (ग) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ खालील खंड (ब) खाली न येणाऱ्या कोणत्याही जिल्हा नगरपालिकेच्या किंवा शहर नगरपालिकेच्या सचिवाचे पद धारण करीत असेल ; किंवा

१९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. (घ) मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ च्या कलम २५ खाली कोणत्याही नगरपालिका समितीच्या सचिवांचे पद धारण करीत असेल ;

अशी व्यक्ती नेमलेल्या दिवसापासून आणि पोट-कलम (१) च्या तरतुदीस अधीन राहून, या अधिनियमाच्या कलम ७५ अन्वये उत्तराधिकारी नगरपरिषद मुख्य अधिकारी म्हणून नेमली असल्याचे समजले जाईल :

[१][परंतु, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, कोणत्याही विद्यमान नगरपरिषदेत असे कोणतेही पूर्वोक्त पद अस्तित्वात नसेल किंवा कोणतीही व्यक्ती असे कोणतेही पद धारण करीत नसेल तर, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये मुख्य अधिकाऱ्याला देण्यात आलेले अधिकार आणि त्याच्यावर लादलेली कर्तव्ये व सोपवलेली कामे, उत्तराधिकारी नगरपरिषदेकडून उक्त कलम ७५ अन्वये मुख्य अधिकारी नेमण्यात येईपर्यंत, जिल्हाधिकारी या बाबतीत पदनिर्देशित करील असा नगरपरिषदेचा किंवा शासनाचा अधिकारी, नेमलेल्या दिवसापासून वापरील, त्यांचे पालन करील व ती पार पाडील.]

(३) जी कोणतीही व्यक्ती, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी—

(एक) मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ च्या कलम ३४ च्या पोट-कलम (५-अ) अन्वये कोणत्याही बरे नगरपालिकेच्या आरोग्याधिकाऱ्याचे, किंवा १९२५ चा मुंबई १८.

(दोन) मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ च्या कलम २५-अ अन्वये नगरपालिका समितीच्या आरोग्यधिकाऱ्याचे ; १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

पद धारण करीत असेल अशी व्यक्ती, नेमलेल्या दिवसापासून आणि पोट-कलम (१) च्या तरतुदींस अधीन राहून, या अधिनियमाच्या कलम ७५ अन्वये उत्तराधिकारी नगरपरिषदेचा आरोग्याधिकारी म्हणून नेमली असल्याचे समजले जाईल.

(४) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी जी कोणी व्यक्ती, मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ च्या कलम ३४ च्या पोट-कलम (५) अन्वये कोणत्याही बरो नगरपालिकेच्या अभियंत्याचे पद धारण करीत असेल, ती, नेमलेल्या दिवसापासून आणि पोट-कलम (१) च्या तरतुदींस अधीन राहून, या अधिनियमाच्या कलम ७५ अन्वये उत्तराधिकारी नगरपरिषदेचा नगरपालिका अभियंता म्हणून नेमली असल्याचे समजले जाईल. १९२५ चा मुंबई १८.

हैद्राबाद स्थानिक शासन सेवेतील विद्यमान सदस्यांच्या संबंधात विशेष तरतुदी.

**३४८.** (१) हैद्राबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ च्या कलम ६६ किंवा कलम ६७ अन्वये हैद्राबाद क्षेत्र स्थानिक शासन सेवेमध्ये नेमण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती, नेमलेल्या दिवशी व त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत असल्याचे चालू राहील आणि नेमलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी पारिश्रमिक, रजा आणि निवृत्तिवेतन याबाबतच्या सेवेच्या ज्या शर्तींचा तसेच शिस्तविषयक बाबी किंवा अधिकार याबाबतच्या ज्या अधिकारांचा त्या व्यक्तीस हक्क होता त्या सर्व शर्ती व अधिकारांचा तिला हक्क राहील. १९५६ चा हैद्राबाद १८.

(२) राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रातील कोणत्याही उत्तराधिकारी नगरपरिषदेमध्ये काम करण्यासाठी पूर्वोक्त हैद्राबाद क्षेत्र स्थानिक शासन सेवेच्या अधिकाऱ्यांपैकी राज्य शासनाला आवश्यक वाटेल तेवढे अधिकारी, त्यास, वेळोवेळी नेमता येतील. नगरपरिषदेमध्ये काम करण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांना त्यांचे वेतन व भत्ते नगरपालिका निधीमधून मिळतील. कोणत्याही अशा अधिकाऱ्याला नगरपरिषदेमध्ये काम करण्यासाठी नेमण्यात येईल त्यावेळी राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ठरवील, अशा पदावर किंवा अशा अटींवर व शर्तीवर त्याची सेवा नगरपरिषदेकडे घेण्यात येईल.

---

[१] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४, याच्या कलम १० द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

**३४९.** कलम ४९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक उत्तराधिकारी नगरपरिषद, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी विद्यमान नगरपरिषद जे कोणतेही कर्तव्य पार पाडीत असेल, अशा परिषदांची कर्तव्ये पार पाडणे किंवा अशी नगरपरिषद, जी संस्था, व्यापारी संस्था, उपक्रम, उपाययोजना कार्य किंवा सेवा यांची व्यवस्था करीत असेल, चालवीत असेल अगर त्यावर देखरेख ठेवीत असेल ती संस्था, आस्थापना, उपक्रम, उपाययोजना, कार्य किंवा सेवा यांची व्यवस्था करणे, चालविणे अगर देखरेख करणे या गोष्टी, अशा कर्तव्यांतून किंवा कार्यातून राज्य शासन आदेशाद्वारे उत्तराधिकारी नगरपरिषदेस मुक्त करीपर्यंत चालू ठेवील. विद्यमान नगरपरिषदांची विवक्षित कर्तव्ये व कामे पार पाडण्याबाबत आबंधने.

**३५०.** [१][अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची निवड करण्यासाठी, यथास्थिति, दिनांक १ जानेवारी, १९६८ रोजी किंवा विनिर्दिष्ट दिनांकास विशेष सभा घेणे शक्य नसल्यास प्रशासक नेमण्याचा अधिकार.]

**३५१.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या कामात जर काही अडचण उद्भवली तर, त्या प्रसंगी जरूर असेल त्याप्रमाणे ती अडचण दूर करण्यासाठी, राज्य शासनाला, आदेश काढून, आवश्यक वाटेल ती कारवाई करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षांची मुदत संपल्यानंतर या कलमान्वये कोणताही आदेश काढता येणार नाही.

---

[१] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र. १४, याच्या कलम ११ द्वारे वगळण्यात आले.

# [१][अनुसूची एक

(कलमे ४ आणि ३४६ पहा)

**(नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी यांव्यतिरिक्त अन्य नगरपरिषद क्षेत्रे)**

| अनुक्रमांक | अधिक लहान नागरी क्षेत्राचे नाव | नगरपरिषदेचे नाव | जिल्ह्याचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | "अ" वर्ग | | |
| १ | अंबरनाथ अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अंबरनाथ नगरपरिषद . . | ठाणे |
| २ | भिवंडी-निजामपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | भिवंडी-निजामपूर नगरपरिषद . . | ठाणे |
| ३ | मिरा-भाईंदर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मिरा-भाईंदर नगरपरिषद . . | ठाणे |
| ४ | नालासोपारा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | नालासोपारा नगरपरिषद . . | ठाणे |
| ५ | नवघर-माणिकपूर अधिक लहान नागरी क्षेत्र | नवघर-माणिकपूर नगरपरिषद | ठाणे |
| ६ | विरार अधिक लहान नागरी क्षेत्र . . | विरार नगरपरिषद . . | ठाणे |
| ७ | पनवेल अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पनवेल नगरपरिषद . . | रायगड |
| ८ | मालेगाव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मालेगाव नगरपरिषद . . | नाशिक |
| ९ | धुळे अधिक लहान नागरी क्षेत्र . . | धुळे नगरपरिषद . . | धुळे |
| १० | जळगाव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | जळगाव नगरपरिषद . . | जळगांव |
| ११ | भुसावळ अधिक लहान नागरी क्षेत्र . . | भुसावळ नगरपरिषद . . | जळगांव |
| १२ | अहमदनगर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अहमदनगर नगरपरिषद . . | अहमदनगर |
| १३ | सातारा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | सातारा नगरपरिषद . . | सातारा |
| १४ | बार्शि अधिक लहान नागरी क्षेत्र . . | बार्शि नगरपरिषद . . | सोलापूर |
| १५ | इचलकरंजी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | इचलकरंजी नगरपरिषद . . | कोल्हापूर |
| १६ | जालना अधिक लहान नागरी क्षेत्र . . | जालना नगरपरिषद . . | जालना |
| १७ | परभणी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | परभणी नगरपरिषद . . | परभणी |
| १८ | लातूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | लातूर नगरपरिषद . . | लातूर |
| १९ | बीड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | बीड नगरपरिषद . . | बीड |
| २० | अकोला अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अकोला नगरपरिषद . . | अकोला |
| २१ | अचलपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अचलपूर नगरपरिषद . . | अमरावती |
| २२ | यवतमाळ अधिक लहान नागरी क्षेत्र . . | यवतमाळ नगरपरिषद . . | यवतमाळ |
| २३ | वर्धा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | वर्धा नगरपरिषद . . | वर्धा |
| २४ | गोंदिया अधिक लहान नागरी क्षेत्र . . | गोंदिया नगरपरिषद . . | गोंदिया |
| २५ | चंद्रपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | चंद्रपूर नगरपरिषद . . | चंद्रपूर |

[१] शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक सर्व १०२००१/सीआर-७०/२००१/यूडी-१६, दिनांक १० सप्टेंबर २००१ द्वारे अनुसूची एक समाविष्ट करण्यात आली.

अनुसूची एक— चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | "ब" वर्ग | | |
| १ | डहाणू अधिक लहान नागरी क्षेत्र . . | डहाणू नगरपरिषद . . | ठाणे |
| २ | कुळगाव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कुळगाव नगरपरिषद . . | ठाणे |
| ३ | पालघर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पालघर नगरपरिषद . . | ठाणे |
| ४ | वसई अधिक लहान नागरी क्षेत्र . . | वसई नगरपरिषद . . | ठाणे |
| ५ | खोपोली अधिक लहान नागरी क्षेत्र . . | खोपोली नगरपरिषद . . | रायगड |
| ६ | चिपळूण अधिक लहान नागरी क्षेत्र . . | चिपळूण नगरपरिषद . . | रत्नागिरी |
| ७ | रत्नागिरी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | रत्नागिरी नगरपरिषद . . | रत्नागिरी |
| ८ | मनमाड अधिक लहान नागरी, क्षेत्र . . | मनमाड नगरपरिषद . . | नाशिक |
| ९ | येवला अधिक लहान नागरी क्षेत्र . . | येवला नगरपरिषद . . | नाशिक |
| १० | नंदूरबार अधिक लहान नागरी क्षेत्र . . | नंदूरबार नगरपरिषद . . | नंदूरबार |
| ११ | शहादा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | शहादा नगरपरिषद . . | नंदूरबार |
| १२ | दोंडोईचा-वरवाडे अधिक लहान नागरी क्षेत्र. . | दोंडोईचा-वरवाडे नगरपरिषद. . | धुळे |
| १३ | शिरपूर-वरवाडे अधिक लहान नागरी क्षेत्र . . | शिरपूर-वरवाडे नगरपरिषद . . | धुळे |
| १४ | अंमळनेर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अंमळनेर नगरपरिषद . . | जळगाव |
| १५ | चाळिसगांव अधिक लहान नागरी क्षेत्र. . . | चाळिसगाव नगरपरिषद . . | जळगाव |
| १६ | चोपडा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | चोपडा नगरपरिषद . . | जळगाव |
| १७ | पाचोरा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पाचोरा नगरपरिषद . . | जळगाव |
| १८ | श्रीरामपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | श्रीरामपूर नगरपरिषद . . | अहमदनगर |
| १९ | संगमनेर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | संगमनेर नगरपरिषद . . | अहमदनगर |
| २० | कोपरगाव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कोपरगाव नगरपरिषद . . | अहमदनगर |
| २१ | बारामती अधिक लहान नागरी क्षेत्र . . | बारामती नगरपरिषद . . | पुणे |
| २२ | दौंड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | दौंड नगरपरिषद . . | पुणे |
| २३ | लोणावळा अधिक लहान नागरी क्षेत्र | लोणावळा नगरपरिषद . . | पुणे |
| २४ | तळेगाव-दाभाडे अधिक लहान नागरी क्षेत्र . . | तळेगाव-दाभाडे नगरपरिषद. . | पुणे |
| २५ | कराड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कराड नगरपरिषद . . | सातारा |
| २६ | फलटण अधिक लहान नागरी क्षेत्र . . | फलटण नगरपरिषद . . | सातारा |
| २७ | इस्लामपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | इस्लामपूर नगरपरिषद . . | सांगली |
| २८ | विटा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | विटा नगरपरिषद . . | सांगली |
| २९ | पंढरपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पंढरपूर नगरपरिषद . . | सोलापूर |
| ३० | जयसिंगपूर अधिक लहान नागरी क्षेत्र | जयसिंगपूर नगरपरिषद . . | कोल्हापूर |

**अनुसूची एक—** चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **"ब" वर्ग—** चालू | | |
| ३१ | सिल्लोड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | सिल्लोड नगरपरिषद . . | औरंगाबाद |
| ३२ | गंगाखेड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | गंगाखेड नगरपरिषद . . | परभणी |
| ३३ | हिंगोली अधिक लहान नागरी क्षेत्र . . | हिंगोली नगरपरिषद . . | हिंगोली |
| ३४ | बसमतनगर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | बसमतनगर नगरपरिषद . . | हिंगोली |
| ३५ | उदगीर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | उदगीर नगरपरिषद . . | लातूर |
| ३६ | उस्मानाबाद अधिक लहान नागरी क्षेत्र | उस्मानाबाद नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ३७ | अंबेजोगाई अधिक लहान नागरी क्षेत्र | अंबेजोगाई नगरपरिषद . . | बीड |
| ३८ | माजलगाव अधिक लहान नागरी क्षेत्र | माजलगाव नगरपरिषद . . . | बीड |
| ३९ | परळी-वैजनाथ अधिक लहान नागरी क्षेत्र . . | परळी-वैजनाथ नगरपरिषद. . | बीड |
| ४० | देगलूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | देगलूर नगरपरिषद . . | नांदेड |
| ४१ | बुलढाणा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | बुलढाणा नगरपरिषद . . | बुलढाणा |
| ४२ | चिखली अधिक लहान नागरी क्षेत्र . . | चिखली नगरपरिषद . . | बुलढाणा |
| ४३ | खामगांव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | खामगांव नगरपरिषद . . | बुलढाणा |
| ४४ | मलकापूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मलकापूर नगरपरिषद . . | बुलढाणा |
| ४५ | शेगांव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | शेगांव नगरपरिषद . . | बुलढाणा |
| ४६ | अकोट अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अकोट नगरपरिषद . . | अकोला |
| ४७ | कारंजा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कारंजा नगरपरिषद . . | वाशिम |
| ४८ | वाशिम अधिक लहान नागरी क्षेत्र . . | वाशिम नगरपरिषद . . | वाशिम |
| ४९ | अंजनगाव-सुर्जी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अंजनगाव-सुर्जी नगरपरिषद | अमरावती |
| ५० | वरूड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | वरूड नगरपरिषद . . | अमरावती |
| ५१ | वणी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | वणी नगरपरिषद . . | यवतमाळ |
| ५२ | पुसद अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पुसद नगरपरिषद . . | यवतमाळ |
| ५३ | कामठी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कामठी नगरपरिषद . . | नागपूर |
| ५४ | उमरेड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | उमरेड नगरपरिषद . . | नागपूर |
| ५५ | हिंगणघाट अधिक लहान नागरी क्षेत्र . . | हिंगणघाट नगरपरिषद . . | वर्धा |
| ५६ | आर्वी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | आर्वी नगरपरिषद . . | वर्धा |
| ५७ | भंडारा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | भंडारा नगरपरिषद . . | भंडारा |
| ५८ | तुमसर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | तुमसर नगरपरिषद . . | भंडारा |
| ५९ | बल्लारपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | बल्लारपूर नगरपरिषद . . | चंद्रपूर |
| ६० | भद्रावती अधिक लहान नागरी क्षेत्र . . | भद्रावती नगरपरिषद . . | चंद्रपूर |
| ६१ | वरोरा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | वरोरा नगरपरिषद . . | चंद्रपूर |
| ६२ | गडचिरोली अधिक लहान नागरी क्षेत्र . . | गडचिरोली नगरपरिषद . . | गडचिरोली |

**अनुसूची एक—** चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **"क" वर्ग** | | |
| १ | जव्हार अधिक लहान नागरी क्षेत्र .. | जव्हार नगरपरिषद .. | ठाणे |
| २ | अलिबाग अधिक लहान नागरी क्षेत्र .. | अलिबाग नगरपरिषद .. | रायगड |
| ३ | महाड अधिक लहान नागरी क्षेत्र .. | महाड नगरपरिषद .. | रायगड |
| ४ | पेण अधिक लहान नागरी क्षेत्र .. | पेण नगरपरिषद .. | रायगड |
| ५ | रोहा अधिक लहान नागरी क्षेत्र .. | रोहा नगरपरिषद .. | रायगड |
| ६ | उरण अधिक लहान नागरी क्षेत्र .. | उरण नगरपरिषद .. | रायगड |
| ७ | मुरूड-जंजिरा अधिक लहान नागरी क्षेत्र | मुरुड-जंजिरा नगरपरिषद .. | रायगड |
| ८ | श्रीवर्धन अधिक लहान नागरी क्षेत्र .. | श्रीवर्धन नगरपरिषद .. | रायगड |
| ९ | माथेरान अधिक लहान नागरी क्षेत्र .. | माथेरान नगरपरिषद .. | रायगड |
| १० | कर्जत अधिक लहान नागरी क्षेत्र .. | कर्जत नगरपरिषद .. | रायगड |
| ११ | खेड अधिक लहान नागरी क्षेत्र .. | खेड नगरपरिषद .. | रत्नागिरी |
| १२ | राजापूर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | राजापूर नगरपरिषद .. | रत्नागिरी |
| १३ | मालवण अधिक लहान नागरी क्षेत्र .. | मालवण नगरपरिषद .. | सिंधुदूर्ग |
| १४ | वेंगुर्ला अधिक लहान नागरी क्षेत्र .. | वेंगुर्ला नगरपरिषद .. | सिंधुदूर्ग |
| १५ | सावंतवाडी अधिक लहान नागरी क्षेत्र .. | सावंतवाडी नगरपरिषद .. | सिंधुदूर्ग |
| १६ | इगतपुरी अधिक लहान नागरी क्षेत्र .. | इगतपुरी नगरपरिषद .. | नाशिक |
| १७ | नांदगाव अधिक लहान नागरी क्षेत्र .. | नांदगाव नगरपरिषद .. | नाशिक |
| १८ | सिन्नर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | सिन्नर नगरपरिषद .. | नाशिक |
| १९ | त्रिंबक अधिक लहान नागरी क्षेत्र .. | त्रिंबक नगरपरिषद .. | नाशिक |
| २० | भागुर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | भागुर नगरपरिषद .. | नाशिक |
| २१ | सटना अधिक लहान नागरी क्षेत्र .. | सटना नगरपरिषद .. | नाशिक |
| २२ | तळोदा अधिक लहान नागरी क्षेत्र .. | तळोदा नगरपरिषद .. | नंदुरबार |
| २३ | नवापूर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | नवापूर नगरपरिषद .. | नंदूरबार |
| २४ | फैजपुर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | फैजपुर नगरपरिषद .. | जळगाव |
| २५ | यावल अधिक लहान नागरी क्षेत्र .. | यावल नगरपरिषद .. | जळगाव |
| २६ | रावेर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | रावेर नगरपरिषद .. | जळगाव |
| २७ | सावदा अधिक लहान नागरी क्षेत्र .. | सावदा नगरपरिषद .. | जळगाव |
| २८ | पारोळा अधिक लहान नागरी क्षेत्र .. | पारोळा नगरपरिषद .. | जळगाव |
| २९ | धरणगाव अधिक लहान नागरी क्षेत्र .. | धरणगाव नगरपरिषद .. | जळगाव |
| ३० | एरंडोल अधिक लहान नागरी क्षेत्र .. | एरंडोल नगरपरिषद .. | जळगाव |

**अनुसूची एक**— चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **"क" वर्ग**—चालू | | |
| [१][३०-क | जामनेर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | एरंडोल नगरपरिषद . . | जळगाव |
| ३१ | राहुरी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | राहुरी नगरपरिषद . . | अहमदनगर |
| ३२ | देवळाली-प्रवरा अधिक लहान नागरी क्षेत्र | देवळाली नगरपरिषद . . | अहमदनगर |
| ३३ | पाथर्डी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पाथर्डी नगरपरिषद . . | अहमदनगर |
| ३४ | रहाता अधिक लहान नागरी क्षेत्र . . | रहाता नगरपरिषद . . | अहमदनगर |
| ३५ | श्रीगोंदा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | श्रीगोंदा नगरपरिषद . . | अहमदनगर |
| ३६ | सासवड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | सासवड नगरपरिषद . . | पुणे |
| ३७ | जेजुरी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | जेजुरी नगरपरिषद . . | पुणे |
| ३८ | इंदापूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | इंदापूर नगरपरिषद . . | पुणे |
| ३९ | शिरूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | शिरूर नगरपरिषद . . | पुणे |
| ४० | आळंदी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | आळंदी नगरपरिषद . . | पुणे |
| ४१ | जुन्नर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | जुन्नर नगरपरिषद . . | पुणे |
| ४२ | भोर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | भोर नगरपरिषद . . | पुणे |
| ४३ | रहिमतपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | रहिमतपूर नगरपरिषद . . | सातारा |
| ४४ | महाबळेश्वर अधिक लहान नागरी क्षेत्र | महाबळेश्वर नगरपरिषद . . | सातारा |
| ४५ | म्हसवड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | म्हसवड नगरपरिषद . . | सातारा |
| ४६ | वाई अधिक लहान नागरी क्षेत्र . . | वाई नगरपरिषद . . | सातारा |
| ४७ | पांचगणी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पांचगणी नगरपरिषद . . | सातारा |
| ४८ | तासगांव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | तासगांव नगरपरिषद . . | सांगली |
| ४९ | आष्टा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | आष्टा नगरपरिषद . . | सांगली |
| ५० | करमाळा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | करमाळा नगरपरिषद . . | सोलापूर |
| ५१ | सांगोला अधिक लहान नागरी क्षेत्र . . | सांगोला नगरपरिषद . . | सोलापूर |
| ५२ | अक्कलकोट अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अक्कलकोट नगरपरिषद . . | सोलापूर |
| ५३ | मंगळवेढा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मंगळवेढा नगरपरिषद . . | सोलापूर |
| ५४ | मेंदर्गी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मेंदर्गी नगरपरिषद . . | सोलापूर |
| ५५ | दुधनी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | दुधनी नगरपरिषद . . | सोलापूर |
| ५६ | कुर्डूवाडी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कुर्डूवाडी नगरपरिषद . . | सोलापूर |

[१] शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक जीईएन-१०२०००/१६५३/सीआर-१२८/२०००/न.वि.-१६, दिनांक २८ ऑक्टोबर २००२ द्वारे ३०-क हिं नोंद समाविष्ट करण्यात आली.

**अनुसूची एक**— चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **"क" वर्ग**—चालू | | |
| ५७ | पन्हांळा अधिक लहान नागरी क्षेत्र .. | पन्हाळा नगरपरिषद .. | कोल्हापूर |
| ५८ | मलकापूर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | मलकापूर नगरपरिषद .. | कोल्हापूर |
| ५९ | मुरगूड अधिक लहान नागरी क्षेत्र .. | मुरगूड नगरपरिषद .. | कोल्हापूर |
| ६० | वडगाव अधिक लहान नागरी क्षेत्र .. | वडगाव नगरपरिषद .. | कोल्हापूर |
| ६१ | गडहिंग्लज अधिक लहान नागरी क्षेत्र .. | गडहिंग्लज नगरपरिषद .. | कोल्हापूर |
| ६२ | कुरंदवाड अधिक लहान नागरी क्षेत्र .. | कुरंदवाड नगरपरिषद .. | कोल्हापूर |
| ६३ | कागल अधिक लहान नागरी क्षेत्र .. | कागल नगरपरिषद .. | कोल्हापूर |
| ६४ | कन्नड अधिक लहान नागरी क्षेत्र .. | कन्नड नगरपरिषद .. | औरंगाबाद |
| ६५ | पैठण अधिक लहाम नागरी क्षेत्र .. | पैठण नगरपरिषद .. | औरंगाबाद |
| ६६ | वैजापूर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | वैजापूर नगरपरिषद .. | औरंगाबाद |
| ६७ | खुल्ताबाद अधिक लहान नागरी क्षेत्र .. | खुल्ताबाद नगरपरिषद .. | औरंगाबाद |
| ६८ | गंगापूर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | गंगापूर नगरपरिषद .. | औरंगाबाद |
| ६९ | अंबड अधिक लहान नागरी क्षेत्र .. | अंबड नगरपरिषद .. | जालना |
| ७० | भोकरदन अधिक लहान नागरी क्षेत्र .. | भोकरदन नगरपरिषद .. | जालना |
| ७१ | पारतुर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | पारतुर नगरपरिषद .. | जालना |
| ७२ | मानवत अधिक लहान नागरी क्षेत्र .. | मानवत नगरपरिषद .. | परभणी |
| ७३ | सोनपेठ अधिक लहान नागरी क्षेत्र .. | सोनपेठ नगरपरिषद .. | परभणी |
| ७४ | पूर्णा अधिक लहान नागरी क्षेत्र .. | पूर्णा नगरपरिषद .. | परभणी |
| ७५ | सेलू अधिक लंहान नागरी क्षेत्र .. | सेलू नगरपरिषद .. | परभणी |
| ७६ | जिंतुर अधिक लहान नागरी क्षेत्र .. | जिंतुर नगरपरिषद .. | परभणी |
| ७७ | पाथरी अधिक लहान नागरी क्षेत्र .. | पाथरी नगरपरिषद .. | परभणी |
| ७८ | कळमनुरी अधिक लहान नागरी क्षेत्र .. | कळमनुरी नगरपरिषद .. | हिंगोली |
| ७९ | बिल्लोली अधिक लहान नागरी क्षेत्र .. | बिल्लोली नगरपरिषद .. | नांदेड |
| ८० | उमरी अधिक लहान नागरी क्षेत्र .. | उमरी नगरपरिषद .. | नांदेड |
| ८१ | मुदखेड अधिक लहान नागरी क्षेत्र .. | मुदखेड नगरपरिषद .. | नांदेड |
| ८२ | कंधार अधिक लहान नागरी क्षेत्र .. | कंधार नगरपरिषद .. | नांदेड |
| ८३ | हदगाव अधिक लहान नागरी क्षेत्र .. | हदगाव नगरपरिषद .. | नांदेड |
| ८४ | धर्माबाद अधिक लहान नागरी क्षेत्र .. | धर्माबाद नगरपरिषद .. | नांदेड |
| ८५ | कुंदलवाडी अधिक लहान नागरी क्षेत्र ... | कुंदलवाडी नगरपरिषद .. | नांदेड |

**अनुसूची एक**— चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | **"क" वर्ग**—चालू | | |
| ८६ | मुखेड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मुखेड नगरपरिषद . . | नांदेड |
| ८७ | किनवट अधिक लहान नागरी क्षेत्र . . | किनवट नगरपरिषद . . | नांदेड |
| ८८ | लोहा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | लोहा नगरपरिषद . . | नांदेड |
| ८९ | अहमदपूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | अहमदपूर नगरपरिषद . . | लातूर |
| ९० | निलंगा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | निलंगा नगरपरिषद . . | लातूर |
| ९१ | औसा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | औसा नगरपरिषद . . | लातूर |
| ९२ | तुळजापूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | तुळजापूर नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ९३ | उमरगा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | उमरगा नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ९४ | भूम अधिक लहान नागरी क्षेत्र . . | भूम नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ९५ | परांडा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | परांडा नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ९६ | मुरुम अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मुरुम नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ९७ | नळदुर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र . . | नळदुर्ग नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ९८ | कळंब अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कळंब नगरपरिषद . . | उस्मानाबाद |
| ९९ | गेवराई अधिक लहान नागरी क्षेत्र . . | गेवराई नगरपरिषद . . | बीड |
| १०० | धारूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | धारूर नगरपरिषद . . | बीड |
| १०१ | जळगाव-जामोद अधिक लहान नागरी क्षेत्र | जळगाव-जामोद नगरपरिषद | बुलढाणा |
| १०२ | मेहकर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मेहकर नगरपरिषद . . | बुलढाणा |
| १०३ | नांदुरा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | नांदुरा नगरपरिषद . . | बुलढाणा |
| १०४ | देऊळगाव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | देऊळगाव नगरपरिषद . . | बुलढाणा |
| १०५ | लोणार अधिक लहान नागरी क्षेत्र . . | लोणार नगरपरिषद . . | बुलढाणा |
| १०६ | सिंदखेडराजा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | सिंदखेडराजा नगरपरिषद . . | बुलढाणा |
| १०७ | मुर्तिजापुर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मुर्तिजापूर नगरपरिषद . . | अकोला |
| १०८ | बाळापूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | बाळापूर नगरपरिषद . . | अकोला |
| १०९ | तेल्हारा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | तेल्हारा नगरपरिषद . . | अकोला |
| ११० | पातुर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पातुर नगरपरिषद . . | अकोला |
| १११ | मंगरुळपीर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मंगरुळपीर नगरपरिषद . . | वाशिम |
| ११२ | रिसोड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | रिसोड नगरपरिषद . . | वाशिम |
| ११३ | मोर्शी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मोर्शी नगरपरिषद . . | अमरावती |
| ११४ | दर्यापूर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | दर्यापूर नगरपरिषद . . | अमरावती |

अनुसूची एक— चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | "क" वर्ग—चालू | | |
| ११५ | चांदूर रेल्वे अधिक लहान नागरी क्षेत्र | चांदूर रेल्वे नगरपरिषद . . | अमरावती |
| ११६ | चांदूर बाजार अधिक लहान नागरी क्षेत्र | चांदूर बाजार नगरपरिषद . . | अमरावती |
| ११७ | धामणगाव अधिक लहान नागरी क्षेत्र | धामणगाव नगरपरिषद . . | अमरावती |
| ११८ | शेंदुरजना अधिक लहान नागरी क्षेत्र . . | शेंदुरजना नगरपरिषद . . | अमरावती |
| ११९ | चिखलदरा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | चिखलदरा नगरपरिषद . . | अमरावती |
| १२० | दिग्रस अधिक लहान नागरी क्षेत्र . . | दिग्रस नगरपरिषद . . | यवतमाळ |
| १२१ | दारव्हा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | दारव्हा नगरपरिषद . . | यवतमाळ |
| १२२ | पांढरकवडा अधिक लहान नागरी क्षेत्र | पांढरकवडा नगरपरिषद . . | यवतमाळ |
| १२३ | उमरखेड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | उमरखेड नगरपरिषद . . | यवतमाळ |
| १२४ | घाटंजी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | घाटंजी नगरपरिषद . . | यवतमाळ |
| १२५ | रामटेक अधिक लहान नागरी क्षेत्र . . | रामटेक नगरपरिषद . . | नागपूर |
| १२६ | खापा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | खापा नगरपरिषद . . | नागपूर |
| १२७ | कळमेश्वर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | कळमेश्वर नगरपरिषद . . | नागपूर |
| १२८ | मोवाड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मोवाड नगरपरिषद . . | नागपूर |
| १२९ | सावनेर अधिक लहान नागरी क्षेत्र . . | सावनेर नगरपरिषद . . | नागपूर |
| १३० | काटोल अधिक लहान नागरी क्षेत्र . . | काटोल नगरपरिषद . . | नागपूर |
| १३१ | नरखेड अधिक लहान नागरी क्षेत्र . . | नरखेड नगरपरिषद . . | नागपूर |
| १३२ | मोहपा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मोहपा नगरपरिषद . . | नागपूर |
| १३३ | पुलगाव अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पुलगाव नगरपरिषद . . | वर्धा |
| १३४ | देवळी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | देवळी नगरपरिषद . . | वर्धा |
| १३५ | सिंदी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | सिंदी नगरपरिषद . . | वर्धा |
| १३६ | पवनी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | पवनी नगरपरिषद . . | भंडारा |
| १३७ | तिरोरा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | तिरोरा नगरपरिषद . . | गोंदिया |
| १३८ | राजुरा अधिक लहान नागरी क्षेत्र . . | राजुरा नगरपरिषद . . | चंद्रपूर |
| १३९ | मूल अधिक लहान नागरी क्षेत्र . . | मूल नगरपरिषद . . | चंद्रपूर |
| १४० | ब्रम्हपुरी अधिक लहान नागरी क्षेत्र . . | ब्रम्हपुरी नगरपरिषद . . | चंद्रपूर |
| १४१ | देसाईगंज अधिक लहान नागरी क्षेत्र . . | देसाईगंज नगरपरिषद . . | गडचिरोली |

## [१] [ अनुसूची एक-क ]

(कलम १००-क पहा)

मुंबईचा सरकारी जागांतून काढून टाकण्याबाबत अधिनियम, १९५५ (१९५६ चा मुंबई २) आणि वेळोवेळी त्याखाली करण्यात आलेले नियम हे काही विशिष्ट फेरफारांसह, राज्याच्या विनिर्दिष्ट नगरपालिका क्षेत्रातील नगरपालिका जागांना लागू असणे.

राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून व अशा नगरपालिका क्षेत्रात, मुंबईचा सरकारी जागांतून काढून टाकण्याबाबत अधिनियम, १९५५ (सन १९५६ चा मुंबई २) आणि वेळोवेळी त्याखाली करण्यात आलेले नियम हे, योग्य त्या फेरफारांसह, पुढील फेरबदलांस अधीन राहून, उक्त नगरपालिका क्षेत्रातील नगरपालिका जागांना लागू होतील,

**१.** कलम २ मध्ये, खंड (क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (कक) " नगरपरिषद " किंवा " परिषद " म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र ४०) अन्वये रचना करण्यात आलेली किंवा रचना करण्यात आल्याचे समजण्यात आलेली आणि उक्त अधिनियमाच्या कलम १००-क अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली, नगरपालिका आणि " नगरपालिकांच्या जागा " म्हणजे अशा परिषदेच्या मालकीची किंवा तिने अथवा तिच्या वतीने भाडेपट्ट्याने घेतलेली कोणतीही जागा. ".

**२.** कलम ३ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक.

" ३. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शासनाच्या मते उप-जिल्हाधिकारी किंवा कार्यकारी अभियंता यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले पद जो धारण करीत असेल किंवा ज्याने धारण केले असेल अशा अधिकाऱ्याची, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, अशा नगरपालिका क्षेत्राकरिता किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता आणि त्यातील नगरपालिका जागांच्या सर्व किंवा कोणत्याही वर्गाकरिता, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सक्षम प्राधिकारी, म्हणून नेमणूक करता येईल आणि उक्त क्षेत्रातील सर्व नगरपालिका जागांच्या किंवा नगरपालिका जागांच्या विविध वर्गांच्या संबंधात एकाच क्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून एकापेक्षा अधिक अधिकाऱ्यांची नेमणूक करता येईल. ".

**३.** कलमे ३ आणि १२ या व्यतिरिक्त या अधिनियमात, आणि या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये " राज्य शासन " आणि " शासन " यासंबंधीचे निर्देश हे, " नगरपरिषदे " संबंधीचे निर्देश म्हणून समजण्यात येतील आणि " सरकारी जागा " संबंधीचे निर्देश हे "नगरपालिका जागा" संबंधीचे निर्देश म्हणून समजण्यात येतील.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११, याच्या कलम १२ द्वारे " अनुसूची एक-क "समाविष्ट करण्यात आली.

## अनुसूची दोन

(कलम १३० पहा)

### संलेख करून हस्तांतरण करण्यात आले असेल त्याबाबतीत द्यावयाच्या हस्तांतरणाच्या नोटिशीचा नमुना

मुख्य अधिकारी,

............................................. नगरपरिषद यांस,

मी, अ. ब. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १३० याद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे, मालमत्तेच्या पुढील हस्तांतरणाची नोटीस देत आहे :—

| नोटिशीचा दिनांक | संलेख करून दिल्याचा दिनांक | विकणाऱ्याचे किंवा अभिहस्तांकनकर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकितीचे नाव | मोबदल्याची रक्कम | मालमत्तेचे वर्णन | | | | | | कोणताही संलेख नोंदण्यात आला असेल तर, नोंदणीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ती कोणकोणत्या स्वरूपात आहे | ठिकाण | निर्धारण पुस्तकातील क्रमांक | मुख्य अधिकाऱ्याचा क्रमांक | जमिनीची लांबी—रुंदी | सीमा | | |
| | | | | | | | | | | | | |

(सही) .........................,

दिनांक

(शा.म.मु.) एच ४२५१—३८ (११,०६७—५-२००७)

## अनुसूची तीन

(कलम १३० पहा)

### संलेख करून न देता अन्य रितीने हस्तांतरण करण्यात आले असेल त्याबाबतीत द्यावयाच्या हस्तांतरणाच्या नोटिशीचा नमुना

मुख्य अधिकारी,

.............................................. नगरपरिषद यांस,

मी, अ. ब. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १३० द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे, मालमत्तेच्या पुढील हस्तांतरणाची नोटीस देत आहे :—

| नोटिशीचा दिनांक | मुख्य अधिकाऱ्याच्या अभिलेखात सध्या ज्या नावावर मालमत्तेची नोंद करण्यात आली असेल ते नाव | कोणास हस्तांतरित करून द्यावयाची त्याचे नाव | ती कोणकोणत्या स्वरूपात आहे | मालमत्तेचे वर्णन | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ठिकाण | निर्धारण पुस्तकातील क्रमांक | मुख्य अधिकाऱ्याचा क्रमांक | जमिनीची लांबी—रुंदी | सीमा | |
| | | | | | | | | | |

(सही) ..........................,

दिनांक

## अनुसूची चार

(कलम १५१ पहा)

### मागणीच्या नोटिशीचा नमुना

श्री. अ. ब. राहणार, ........................................................ यांस, नोटीस देण्यात येत आहे की, ............................................ नगरपालिका, दिनांक ................., माहे ......................, १९ पासून सुरू होऊन दिनांक ................, माहे ................., सन १९ रोजी संपणाऱ्या मुदतीकरिता ............................................. (येथे ज्या मालमत्तेबद्दल किंवा ज्या इतर बाबींबद्दल कर वसूल करावयाचा असेल तिचे वर्णन लिहावे) ............................ बद्दल उपविधी क्रमांक ........................... अन्वये वसूल करावयाच्या व ................................ कडून यावयाच्या रु. ............................................... रकमेची .................................... यांजकडे मागणी करत आहे; आणि ही नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत उक्त रक्कम ................................ येथील नगरपालिकेच्या कार्यालयात भरली नाही आणि ती न भरण्याबद्दल मुख्य अधिकाऱ्याची खात्री होईल असे पुरेसे कारण दाखविले नाही तर, ती खर्चासह वसूल करण्याकरिता अटकावणीचे अधिपत्र किंवा जप्तीचे अधिपत्र काढण्यात येईल.

(सही) ..........................,

दिनांक ......................... सन १९ .

मुख्य अधिकारी.

---

## अनुसूची पाच

(कलम १५२ पहा)

### अधिपत्राचा नमुना

(अधिपत्र बजावण्याचे काम ज्या अधिकाऱ्याकडे सोपविले असेल त्याचे नाव येथे घालावे.)

ज्याअर्थी, श्री. अ. ब. राहणार, .......................................... यांनी, दिनांक ................., माहे ...................., सन १९ पासून सुरू होऊन दिनांक ................, माहे ................., सन १९ रोजी संपणाऱ्या मुदतीसंबंधी ........................................ (येथे कराचे वर्णन द्यावे) करांबद्दल येणे असलेली आणि नियम/उपविधी क्रमांक ........................... अन्वये वसूल करावयाची रकम ........................................ भरली नाही, आणि ती न भरण्याचे समाधानकारक कारण दाखविले नाही ;

आणि ज्याअर्थी, या रकमेच्या मागणीची नोटीस त्यांवर बजावल्यापासून पंधरा दिवसांचा कालावधी होऊन गेला आहे ;

त्याअर्थी, याद्वारे तुम्हास अशी आज्ञा करण्यात येत आहे की, तुम्ही महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, कलम १५२ याच्या तरतुदीस अधीन राहून, उक्त श्री. अ. ब. यांजकडून खाली लिहिल्याप्रमाणे म्हणजे—

| | | रु. | पै. |
|---|---|---|---|
| उक्त कराबद्दल | . . | . . | . . |
| नोटीस बजावल्याबद्दल | . . | . . | . . |
| अधिपत्र काढण्याबद्दल | . . | . . | . . |

येणे असलेली रक्कम रुपये ......... बद्दल त्या रकमेच्या (किंमतीचा त्यांचा माल व जंगम मत्ता अटकावून ठेवावी / किंमतीची त्यांची कोणतीही मालमत्ता जप्त करावी) आणि या अधिपत्रान्वये तुम्ही (अटकावून ठेवलेल्या मालाचा / जप्त केलेल्या मालमत्तेचा) सर्व तपशील प्रमाणित करून तो या अधिपत्रासह ताबडतोब माझ्याकडे पाठवावा.

(सही) ..........................,

दिनांक ......................... सन १९ मुख्य अधिकारी.

---

## अनुसूची सहा

[कलम १५५, खंड (ग) व कलम १४१, पोट-कलम (१) पहा]

## वस्तुसूचीचा व नोटिशीचा नमुना

श्री. अ. ब. राहणार, ........................................................ यांस नोटीस देण्यात येत आहे की, मी आज रोजी, दिनांक ................., माहे ......................., सन १९ पासून सुरू होऊन दिनांक ................., माहे ................., सन १९ रोजी संपणाऱ्या मुदतीसंबंधी ................................... (येथे कराचे वर्णन द्यावे) करांबद्दल येणे असलेली रक्कम रुपये ......................... आणि मागणी नोटीस बजावण्याबद्दल रुपये ................................... व अधिपत्र काढण्याबद्दल येणे असलेली रक्कम रुपये ................................ मिळून होणाऱ्या रकमेइतक्या किंमतीची खाली दिलेल्या वस्तुसूचीत निर्दिष्ट केलेली (जंगम मत्ता / मालमत्ता) आज रोजी (अटकावून ठेवली / जप्त केली) आहे; आणि जर या नोटिशीच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत तुम्ही .............................. येथील नगरपालिकेच्या कार्यालयात उक्त रक्कम, वसुलीच्या खर्चासह भरली नाही तर, उक्त (माल व जंगम मत्ता / मालमत्ता) विकण्यात येईल.

दिनांक माहे ....... सन १९ (अधिपत्र बजावणाऱ्या / जकात किंवा पथकर वसूल करणाऱ्या) अधिकाऱ्याची सही.

### वस्तुसूची

(येथे जप्त केलेल्या (मालाचा व जंगम मत्तेचा / मालमत्तेचा) तपशील नमूद करावा.)

## अनुसूची सात

(कलम २८० पहा)

कोणत्याही जागेचा ज्या कोणत्याही प्रयोजनांसाठी लायसन्सशिवाय उपयोग करता येणार नाही ती प्रयोजने—

(१) शिळे मांस, रक्त, हाडे, किंवा चिंध्या उकळणे किंवा त्यांचा साठा करणे.

(२) मासे खारविणे, खारवून सुकविणे किंवा साठविणे,

(३) कातडी कमाविणे,

(४) चामड्याचे किवा चामड्याच्या वस्तूंचे उत्पादन करणे,

(५) रंगविणे,

(६) चरबी किंवा गंधक वितळविणे,

(७) लोकर किंवा केस धुणे किंवा सुकविणे,

(८) विटा, मातीची भांडी किंवा चुना यांचे कोणत्याही प्रक्रियेने उत्पादन करणे किंवा त्या वस्तू तयार करणे,

(९) साबण तयार करणे,

(१०) तेल उकळविणे किंवा तेल गाळणे,

(११) साबुदाणा तयार करणाचा कारखाना म्हणून,

(१२) आसवनी म्हणून,

(१३) तपकीर तयार करण्याचा कारखाना म्हणून,

(१४) दारूकामाला लागणारे सामान तयार करणे,

(१५) केस प्रसाधन गृह किंवा न्हाव्याचे दुकान किंवा हमामखाना म्हणून, व

(१६) ज्या कोणत्याही कामापासून किंवा धंद्यापासून दुर्गंध किंवा अपायकारक वास येईल किंवा ज्यामुळे आग लागण्याचा धोका संभवेल किंवा (जागांचा) अशा रीतीने उपयोग केल्यामुळे किंवा त्याच्या स्थानवैशिष्ट्यामुळे जवळपासच्या लोकांना उपद्रव होण्याचा संभव असेल असा कारखाना किंवा इतर कोणत्याही स्वरूपाची धंद्याची जागा.

**स्पष्टीकरण.**—बाब (१६) च्या प्रयोजनासाठी, " उपद्रव " या संज्ञेत ज्यायोगे काजळी धरते अशी वातावरणातील कोणतीही दूषितता किंवा यंत्राचा कोणताही आवाज याचा अंतर्भाव होतो.

---

## अनुसूची आठ

[कलम २८१, पोट-कलम (१) पहा]

**लायसन्सवाचून कोणत्याही जागेत किंवा जागेवर ठेवता येणार नाहीत अशा वस्तू**

(१) डायनामाईट ;

(२) सुरुंगासाठी वापरावयाची दारू (ब्लास्टिंग पावडर) ;

(३) फलमिनेट ऑफ मरक्युरी ;

(४) गन कॉटन किंवा बंदुकीची दारू (गन पावडर) ;

(५) नायट्रो ग्लिसरीन ;

(६) फॉस्फरस.

## अनुसूची नऊ

[कलम २८१, पोट-कलम (२) पहा]

### भाग एक

**कोणत्याही जागेत किंवा जागेवर कोणत्याही एकावेळी अशा प्रत्येक वस्तूसमोर निर्दिष्ट केलेल्या कमाल परिमाणापेक्षा जास्त परिमाणात, लायसन्सवाचून ठेवता येणार नाहीत अशा वस्तू.**

| | वस्तू | कोणत्याही एकावेळी लायसन्सवाचून जेवढ्या परिमाणात वस्तू ठेवता येतील ते कमाल परिमाण. |
|---|---|---|
| (१) | बांबू | ५०० किलोग्रॅम |
| (२) | विडीची पाने | ५०० किलोग्रॅम |
| (३) | कापूर | २ किलोग्रॅम |
| (४) | सेल्यूलाईड | २५ किलोग्रॅम |
| (५) | सेल्यूलाईडच्या वस्तू | २५ किलोग्रॅम |
| (६) | चलतचित्रपटाच्या फिल्मस् | १ किलोग्रॅम |
| (७) | खोबरे | ५० किलोग्रॅम |
| (८) | कापसातील केर व कचरा | ५० किलोग्रॅम |
| (९) | सरकी | २०० किलोग्रॅम |
| (१०) | वाळलेली पाने (पत्रावळ, इत्यादी) | २५ किलोग्रॅम |
| (११) | मासळी (सुकी) | ५०० किलोग्रॅम |
| (१२) | बंदुकीची दारू | ५०० ग्रॅम |
| (१३) | आगपेट्या | १ ग्रोस पेट्या |
| (१४) | अपेय स्पिरिट व विप्रकृत स्पिरिट | ५ लिटर |
| (१५) | रंग | ५० किलोग्रॅम |
| (१६) | पेट्रोलियम अधिनियम, १९३४ यात व्याख्या केल्याप्रमाणे पेट्रोलियम | २५ लिटर |
| (१७) | तेल (इतर प्रकारचे) | २५ लिटर |
| (१८) | सरकी व्यतिरिक्त इतर गळित धान्ये | ५०० किलोग्रॅम |
| (१९) | वृत्तपत्रे, नियतकालिके व मासिके धरून (रद्दी) ऑईल पेपर | ५० किलोग्रॅम |
| (२०) | चिंध्या | ५० किलोग्रॅम |
| (२१) | गंधक | २ किलोग्रॅम |
| (२२) | डांबर, पिच, डामर किंवा बिटुमेन | ५ किलोग्रॅम |
| (२३) | टर्पेंटाईन | ५ लिटर |
| (२४) | वॉर्निश | १० लिटर |
| (२५) | लोकर (कच्ची) | ५० किलोग्रॅम |

## भाग दोन

**कोणत्याही जागेत किंवा जागेवर घरगुती उपयोगासाठी असेल त्या व्यतिरिक्त विक्रीसाठी किंवा इतर प्रयोजनासाठी, लायसन्सवाचून ज्या वस्तू ठेवता येणार नाहीत अशा वस्तू.**

| | |
|---|---|
| (१) हाडे | (१२) वाळलेले गवत व वैरण |
| (२) काथ्या | (१३) भांग |
| (३) कोळसा | (१४) तागाचे कापड (गोणपाटाचे कापड) |
| (४) दगडी कोळसा | (१५) कातडी (सुकी) |
| (५) कोक | (१६) कातडी (कच्ची) |
| (६) चरबी | (१७) खूर |
| (७) जळाऊ लाकूड | (१८) शिंगे |
| (८) दारूकामाच्या वस्तू<br>(९) गवत (वाळलेले) | (१९) खोके, लाकडी पेट्या किंवा पिंप (यांचे उत्पादन व साठा करणे) |
| (१०) गोणपाटे | (२०) कातडी |
| (११) केस | (२१) इमारती लाकूड. |